# रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील वसाहतींचे पुरातत्त्वीय अध्ययन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

भारतीयविद्या (Indology) या विषयात

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) साठी सादर केलेला प्रबंध

संशोधक विद्यार्थ्याचे नाव : अंजय शंकर धनावडे

विषय मार्गदर्शक : डॉ. प्रमोद जोगळेकर

डिसेंबर २०१६

# प्रतिज्ञापत्र

संशोधक अंजय शंकर धनावडे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की डॉ. प्रमोद जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली **'रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील वसाहतींचे** पुरातत्त्वीय **अध्ययन'** या शीर्षकाचा संशोधन प्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करण्यात येत आहे. प्रस्तुत संशोधन कार्य माझे स्वत:चे आहे. यात समाविष्ट करण्यात आलेले संशोधन हे स्व-प्रयत्नाचे फलित असून माझे मार्गदर्शक डॉ. प्रमोद जोगळेकर व इतर तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्या मदतीने संशोधन काम पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत या विषयावरील प्रस्तुत संशोधन प्रबंध माझा असून तो अन्यत्र कोठेही प्रकाशित केला गेलेला नाही, तसेच या अथवा अन्य कोणत्याही विद्यापीठास अगर तत्सम संस्थेस सादर केलेला नाही. इतर स्त्रोतामार्फत मिळवलेल्या माहितीचा प्रबंधात ऋणनिर्देश केला आहे.

स्थळ: पुणे<br>
दिनांक

अंजय शंकर धनावडे<br>
(संशोधक विद्यार्थी)

# प्रमाणपत्र

अंजय शंकर धनावडे यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, येथून **'रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील वसाहतींचे** पुरातत्त्वीय **अध्ययन'** या शीर्षकाचा संशोधन प्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केला आहे. प्रस्तुत संशोधन कार्य त्यांचे स्वत:चे असून हे संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत विषयावरील संशोधन प्रबंध त्यांचा स्वतःचा असून तो अन्यत्र कोठेही प्रकाशित केला गेलेला नाही, तसेच या अथवा अन्य कोणत्याही विद्यापीठास अगर तत्सम संस्थेस सादर केलेला नाही. इतर स्त्रोतामार्फत मिळवलेल्या माहितीचा प्रबंधात ऋणनिर्देश केला आहे.

स्थळ : पुणे<br>दिनांक

डॉ. प्रमोद जोगळेकर<br>(संशोधन मार्गदर्शक)

# ऋणनिर्देश

विद्यावाचस्पती पदवीकरिता प्रबंध सादर करीत असताना ज्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे.

माझे मार्गदर्शक डॉ. प्रमोद जोगळेकर यांचे अमूल्य, काटेकोर मार्गदर्शन लाभल्यामुळेच हे प्रबंधरुपी शिवधनुष्य मला पेलता आले. त्यांच्या या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा विशेष ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. श्रीपाद भट यांनी मला कायम प्रोत्साहन व काम पूर्ण करण्याची प्रेरणा दिली याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालयाचे माजी संचालक व पुरातत्त्वज्ञ डॉ. अरविंद जामखेडकर व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या, भारतीयविद्या या विषयाच्या सहप्राध्यापिका डॉ. मंजिरी भालेराव व डॉ. अंबरीश खरे यांचे मार्गदर्शन मला मिळाले, या बद्दल मी त्यांचे आभार मानतो.

पुरातत्त्वज्ञ डॉ. एस. नागराजू सारख्या अभ्यासकासोबत कोकणातील लेणी पाहता व अभ्यासता आली व त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले यासाठी मी त्यांचा ऋणी आहे. डॉ. श्रीकांत प्रधान व डॉ. अभिजित दांडेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मला मृदभांड्याची रेखाचित्रे काढण्यासाठी मिळाले त्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

कोकण इतिहास परिषद व परिषदेतील पदाधिकारी विशेष म्हणजे मला कायम सूचना करणारे डॉ. दाऊद दळवी, श्री. रवींद्र लाड, श्री. सदाशिव टेटविलकर आणि श्री. रणजीत हेर्लेकर यांनी दिलेले प्रोत्साहन यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

लोकविकास सामाजिक संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष, माजी आमदार श्री. माणिक जगताप यांचा खंबीर पाठिंबा मला लाभला व या संस्थेचे सर्व पदाधिकारी, तसेच माझ्या एम.एम. जगताप महाविद्यालयाचे माझे सहकारी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले त्यांचाही मी आभारी आहे.

हे काम आपले समजून माझ्या कामात सहकार्य करणारे आणि माझ्या भटकंतीत कायम सोबत असणारे माझे मित्र योगेश शिंदे, रुपेश वनारसे, दीपक सकपाळ, बिपीन सावंत, सनिल इंगावले, प्रशांत कांबळे, ज्ञानेश्वर काकडे, महेश मोरे आणि गणेश मेहेंदळे यांचा मी आभारी आहे. माझ्या वाटचालीत अनेक संस्थाची मदत झाली यापैकी सहयाद्री मित्र, महाड चे सर्व सदस्य व डॉ. राहुल वारंगे, यंग ब्लड एडव्हेंचर या संस्थेचे सर्व सदस्य विशेषतः

प्रशांत भूतकर, सचिन मेहता आणि सुभाष अधिकारी, सीस्केपचे सर्व सदस्य व संस्थापक पक्षिमित्र प्रेमसागर, कोकणकडा मित्रमंडळाचे सर्व सदस्य व अध्यक्ष सुरेश पवार, पत्रकार दीपक शिंदे तसेच माझे विद्यार्थी कुणाल गोसावी, चेतन पवार, निकेश शिंदे या सर्वांचा मी ऋणी आहे. मी ज्या ठिकाणी गेलो त्या प्रत्येक ठिकाणच्या ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्यामुळेच मी हे काम पूर्ण केले आहे, त्यांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे. नकाशे व अहवाल लेखनात मदत करणारे स्थापत्यविशारद अदिती महाजन, ओंकार अधिकारी, डॉ. राजश्री क्षीरसागर, कृष्णा सुतार, प्रा.सौ. स्वाती पवार, पंकज धनावडे, ओमकार माने आणि ज्यांच्याशी या विषयावर अभ्यासपूर्ण चर्चा करता आली ते श्री. सतीशचंद्र टिपणीस आणि माझे मित्र स्थापत्यविशारद सलील सय्यद, त्यांची आई व बहीण नेहा यांचाही मी फार ऋणी आहे. माझ्या प्रत्येक समाजाभिमुख उपक्रमात माझे मित्र श्री. हनुमंत जगताप यांचे नेहमीच मला पाठिंबा व सहकार्य मिळते या बद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

मला वाचन व संशोधनाची आवड ज्यांच्यामुळे लागली व ज्यांनी माझ्यासाठी अपार कष्ट घेतलेले माझे वडील कै. शंकर धनावडे आणि माझी प्रेमळ आई सुमित्रा धनावडे, माझ्या दोन्ही वहिनी भारती व अंजली, दोन्ही भाऊ अरविंद व इंद्रजीत, बहिण व भाऊजी श्री. व सौ. भारती चंद्रशेखर घावरे, मावसभाऊ श्री. व सौ. कल्पना सुधीर जाधव हे सर्व माझे कुटुंबीय माझ्या या निर्मितीत माझ्या सोबत गुंतले होते, या सर्वांच्या ऋणातच राहणे मी पसंत करीन.

दिनांक 27-12-2016

अंजय शंकर धनावडे.

# अनुक्रमणिका


ऋणनिर्देश

नकाशांची सूची

छायाचित्रांची सूची

प्रकरण एक - प्रस्तावना पृष्ठ १-१०

१.१ अभ्यास क्षेत्र

१.२ संशोधनासाठी निवडलेला कालखंड

१.३ संशोधनाची उद्दिष्टे

१.४ संशोधनाची कार्यपद्धती

१.५ प्रबंधाची व्याप्ती

१.६ रायगड जिल्ह्याची निर्मिती

१.७ प्रबंधाची मांडणी

प्रकरण दोन - अभ्यास क्षेत्राची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी पृष्ठ ११-२२

२.१ रचना

२.२ भूगर्भशास्त्रीय माहिती

२.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.४ पूर्वी झालेले संशोधन

२.५ पुरातत्त्वीय अवशेषांचे स्वरूप

प्रकरण तीन - सर्वेक्षण वृत्तांत पृष्ठ २३-२५८

३.१ मुरुड तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.२ रोहा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.३ माणगाव तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.४ तळा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.५ म्हसळा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.६ श्रीवर्धन तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.७ महाड तालुक्यातील सर्वेक्षण वृतांत

३.८ पोलादपूर तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.९ सर्वेक्षण कार्यात आलेल्या मर्यादा

प्रकरण चार - पुरावशेषांचे स्वरूप व महत्वाचे पुरावशेष पृष्ठ २५९-२६८

४.१ पुरावशेषांचे स्वरूप

४.२ महत्वाचे पुरावशेष

प्रकरण पाच - अभ्यास क्षेत्रातील वसाहतींचे स्वरुप पृष्ठ २६९-२८४

५.१ वसाहत निर्मितीचे स्वरुप आणि प्रेरणा

प्रकरण सहा - अनुमाने व निष्कर्ष पृष्ठ २८५-२९०

छायाचित्रे पृष्ठ २९१-३०२

संदर्भ पृष्ठ ३०३-३०४

## नकाशांची सूची


नकाशा क्रमांक १  अभ्यास क्षेत्राचा नकाशा

नकाशा क्रमांक २  मुरूड व रोहा तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

नकाशा क्रमांक ३  तळा व माणगाव तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

नकाशा क्रमांक ४  श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

नकाशा क्रमांक ५  महाड व पोलादपूर तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे


## छायाचित्रांची सूची


छायाचित्र क्रमांक १ पिंगळसई येथील मंदिराजवळील गजलक्ष्मी आणि वीरगळ

छायाचित्र क्रमांक २ शेडसई येथील गजलक्ष्मी शिल्प, तालुका रोहा.

छायाचित्र क्रमांक ३ घोसाळगडावरील खांब असलेल्या पाण्याच्या टाक्या

छायाचित्र क्रमांक ४ जननीचा दुर्गावरील पाण्याचे टाके,  तिसे

छायाचित्र क्रमांक ५ जननीचा दुर्ग,  तिसे येथील शुष्कसांधी मंदिर

छायाचित्र क्रमांक ६ कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या,  आद्य ऐतिहासिक काळ, तळवली

छायाचित्र क्रमांक ७ भैरव लेणी

छायाचित्र क्रमांक ८  भैरीचा दुर्ग,  भिनाड माणगाव

छायाचित्र क्रमांक ९ पानसई येथील शिवमंदिराचे अवशेष

छायाचित्र क्रमांक १० वडघर येथील उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील लेणी

छायाचित्र क्रमांक ११ उंबार्डी येथील तटबंदीचे अवशेष.

छायाचित्र क्रमांक १२ उंबार्डी येथील एका वास्तूच्या पायाचे अवशेष

छायाचित्र क्रमांक १३ विहुळे येथील कातळातील कोरीव लेणी

छायाचित्र क्रमांक १४ देगाव येथील वीरगळ

छायाचित्र क्रमांक १५ कोस्ते खुर्द येथील तळ्याचा शुष्कसांधी पद्धतीने बांधलेला घाट

छायाचित्र क्रमांक १६ शिरसाड येथील गद्धेगळ सदृश्य प्रतिमा

छायाचित्र क्रमांक १७ तळा येथील संरक्षक वसाहत, तळागड किल्ला

छायाचित्र क्रमांक १८ कुडा लेणीचे मुखदर्शन

छायाचित्र क्रमांक १९ वैताकवाडी येथील गद्धेगळ

छायाचित्र क्रमांक २० चरई येथील उमामहेश्वर शिल्प

छायाचित्र क्रमांक २१ काळकाई मंदिराचे अवशेष, तळेगाव

छायाचित्र क्रमांक २२ नांदगाव येथील गद्धेगळ

छायाचित्र क्रमांक २३ महालोर येथील गायवासरू शिल्प

छायाचित्र क्रमांक २४ नागशेत येथील शिल्पे

छायाचित्र क्रमांक २५ चौखर पाखाडी येथील विष्णूमूर्तीचे अवशेष, श्रीवर्धन

छायाचित्र क्रमांक २६ उत्तरेश्वर मंदिराजवळील गद्धेगळ, श्रीवर्धन

छायाचित्र क्रमांक २७ बोर्लीपंचयतन येथील गायवासरू शिल्प

छायाचित्र क्रमांक २८ देवखोल येथील गद्धेगळ व इतर शिल्प

छायाचित्र क्रमांक २९ देवखोल येथील उमामहेश्वर स्थानक मूर्ती

छायाचित्र क्रमांक ३० दिवेआगर येथील निजामशाही शिलालेख

छायाचित्र क्रमांक ३१ पाण्याच्या टाक्या, भारडोली

छायाचित्र क्रमांक ३२ वांजळे येथील मदगडावरील इमारतींचे अवशेष

छायाचित्र क्रमांक ३३ चिरगाव येथील गद्धेगळ

छायाचित्र क्रमांक ३४ केल्टे येथील पुरावशेष

छायाचित्र क्रमांक ३५ तोराडी येथील शिल्पे

छायाचित्र क्रमांक ३६ कुडगाव जवळील मोडी लिपीतील शिलालेख

छायाचित्र क्रमांक ३७ वावे येथील शिवमंदिराचे अवशेष

छायाचित्र क्रमांक ३८ सावर येथील पुरावशेष

छायाचित्र क्रमांक ३९ म्हसळा येथील लखमेश्वर मंदिराजवळील शिल्पे

छायाचित्र क्रमांक ४० म्हसळा येथील करकरणीमाता पुरावशेष

छायाचित्र क्रमांक ४१ भापट येथील गजलक्ष्मी चौथरा

छायाचित्र क्रमांक ४२ महाड येथील महिकावती बंदराचे अवशेष

छायाचित्र क्रमांक ४३ वीरेश्वर मंदिराची उत्तर बाजू

छायाचित्र क्रमांक ४४ चांभारगडावरील खांब टाके

छायाचित्र क्रमांक ४५ साहिलनगर येथील लेणीचा अंतर्भाग

छायाचित्र क्रमांक ४६ मुठवली जवळील कातळातील कोरीव टाकी

छायाचित्र क्रमांक ४७ विन्हेरे येथील शिल्पावशेष व वीरगळ

छायाचित्र क्रमांक ४८ नडगाव येथील कातळातील कोरीव टाकी

छायाचित्र क्रमांक ४९  जिते येथील मुख कोरलेली शिळा

छायाचित्र क्रमांक ५० भावे येथील मुखलिंग शिल्प

छायाचित्र क्रमांक ५१ सांदोशी येथील विष्णू शिल्प

छायाचित्र क्रमांक ५२ रोहन गावातील गद्धेगळ

छायाचित्र क्रमांक ५३ कसबे शिवथर येथील कातळात कोरलेली लेणी

छायाचित्र क्रमांक ५४ कापडे येथील गद्धेगळ शिल्प

छायाचित्र क्रमांक ५५ पोलादपूर येथील सिद्धेश्वर मंदिर

छायाचित्र क्रमांक ५६ मंगळगडावरील तटबंदीचे अवशेष

छायाचित्र क्रमांक ५७ देवपूर येथील वीरगळ व सतीशिळा

छायाचित्र क्रमांक ५८ आद्य ऐतिहासिक काळातील लाल लेप दिलेली खापरे

छायाचित्र क्रमांक ५९ उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील करडी मृदभांडी

छायाचित्र क्रमांक ६० आद्य ऐतिहासिक काळातील शंखाच्या व हस्तिदंताच्या बांगड्या

छायाचित्र क्रमांक ६१ मध्ययुगीन काळातील काचेच्या बांगड्या

छायाचित्र क्रमांक ६२ पूर्व मध्ययुगीन ते मध्ययुगातील दगडी अवजारे

छायाचित्र क्रमांक ६३ आद्य ऐतिहासिक काळातील लाल लेप दिलेली खापरे

छायाचित्र क्रमांक ६४ काचेचा लेप दिलेली मध्ययुगीन खापरे

# प्रकरण एक

# प्रस्तावना

१.१ अभ्यास क्षेत्र

१.२ संशोधनासाठी निवडलेला कालखंड

१.३ संशोधनाची उद्‌दिष्टे

१.४ संशोधनाची कार्यपद्‌धती

१.५ प्रबंधाची व्याप्ती

१.६ रायगड जिल्ह्याची निर्मिती


१.७ प्रबंधाची मांडणी

**प्रकरण १ प्रस्तावना**

भारतासारख्या वैविध्यपूर्ण भाषा असलेल्या देशामध्ये महाराष्ट्राचे भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थान हे महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्राला भारताच्या इतर भाषिक प्रदेशानुसार स्वतंत्र अस्तित्व आहे. इथला समुद्रकिनारा, सह्याद्रीच्या डोंगररांगा, नद्या यांच्यामुळे हे वेगळेपण उठून दिसते.विविध प्रकारचे पर्जन्यमान, जमीन, हवामान अशा नैसर्गिक बाबींमुळे महाराष्ट्रात अनेक उपप्रदेश आढळून येतात.असे भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्य असणारे उपप्रदेश म्हणजे कोकण, तापी - पूर्णा खोरे (खानदेश), वर्धा-वैनगंगा खोरे (विदर्भ), गोदावरी खोरे (मराठवाडा) आणि भीमा-कृष्णेचे खोरे (पश्चिम महाराष्ट्र) (कर्वे १९९६: २-३).

महाराष्ट्रात आद्य संस्कृतीचा प्रारंभ प्राचीन काळी गोदावरीच्या खोऱ्यात झाला, असे असले तरी महाराष्ट्रास लाभलेल्या प्रदीर्घ अशा समुद्र किनाऱ्यालगतच्या कोकण विभागास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत विशेष महत्वाचे स्थान आहे. प्राचीन काळात कोकणाने सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आणि कलेच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्रात पैठण येथून राज्य करणारे सातवाहन, कंधार व लातूरचे राष्ट्रकुट, बदामीचे व कल्याणीचे चालुक्य आणि देवगिरीचे यादव यांसारख्या प्रभावशाली राजघराण्यांनी राज्य केले असले, तरी कोकणातील रठी, महारठी, महाभोज, त्रैकुटक, कोकण मौर्य, शिलाहार, तसेच नायते राजे यांसारख्या स्थानिक परंतु कायमच कोणत्यातरी केंद्रीय सत्तेचे मांडलिक असलेल्या घराण्याने देखील कोकणच्या किंबहुना महाराष्ट्रच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि स्थापत्य व कला क्षेत्रात विकास करण्याचा प्रयत्न केला. प्राचीन काळी हा भाग अपरांत म्हणून ओळखला जात होता.

महाराष्ट्रात सातवाहन काळात भरभराटीस आलेल्या आद्य ऐतिहासिक काळामध्ये राजकीय व व्यापारी दृष्ट्या महत्त्वाची अशी सोपारा, चौल, पालशेत व चिंचणी ही सर्व बंदरस्थळे व अगदी ठाणे, घारापुरी सारखी कित्येक स्थळे कोकणातील याच भागात आहेत. कोकणातील सम्राट अशोकाचा शिलालेख सोपारा येथे आढळून आला असून या नंतरचे कित्येक ब्राम्ही लिपीतील व प्राकृत भाषेतील शिलालेख या परिसरातील लेणींमध्ये आहेत (Luders 1912:109-113). इसपूर्व तिसऱ्या शतकातील कोंडाण्याच्या लेणींपासून ते रायगडा सारखे मध्ययुगीन किल्ले येथे आहेत (रायगड गॅझेटिअर १९९३: ६६३-८७८).




नकाशा क्रमांक १ अभ्यास क्षेत्राचा नकाशा

## १.१ संशोधनाचा मुख्य हेतू

मौर्य सम्राट अशोकाच्या काळातच संपूर्ण कोकण परिसरात विशेष महत्त्व प्राप्त झाले. इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकातील सातवाहन साम्राज्य आणि रोमन साम्राज्य यांच्यातील व्यापारास त्यांनी दिलेले प्रोत्साहन यांमुळे दख्खनच्या पठारावर काही ‘तगर’ म्हणजे तेर व पैठण सारख्या नगरांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे स्वरूप प्राप्त झाले. यांसारख्या बाजारपेठांना लागणारा माल सागरकिनारी असलेल्या कोकणातील बंदरांवर उतरवला जात होता. समुद्रकाठावरील बंदरे (Open Sea Ports) व अंतर्गत बंदरे (Inland Ports) यांना महत्त्व प्राप्त झाले होते. येथून माल तो पठारी प्रदेशातील महत्वाच्या व्यापारी स्थळी रवाना होई. कोकणातील बंदरावरून घाटमाथ्यावरील देशावर जाणारे घाटमार्ग यांना देखील व्यापारी मार्गांचे स्वरूप आले होते. हे चौल येथे झालेल्या उत्खननावरून अथवा चौलच्या संदर्भात मिळणाऱ्या लिखित साहित्य, अभिलेखीय पुरावे आणि येथे असणाऱ्या वास्तूंच्या आधारावरून स्पष्ट होते (Gogate 2003:1-8). आद्य ऐतिहासिक काळातील चिंचणी तसेच पालशेत जिल्हा रत्नागिरी येथील बंदराचे महत्त्व मध्ययुगीन कालखंडातही तेवढेच होते हे स्पष्ट होते.

ऐतिहासिकदृष्ट्या हा प्रदेश फार महत्त्वाचा असूनही चौल उत्खनन वगळता उल्लेखनीय असे इतर कोणतेही संशोधन या भागात झालेले आढळून येत नाही. त्यामुळे याभागात सर्वेक्षण करून आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन स्थळांचा अभ्यास व नोंदणी करून या भागातील सांस्कृतिक कालक्रमाची पुर्नमांडणी करणे हा संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

## १.२ अभ्यास क्षेत्र

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या कोकण विभागाचा रायगड जिल्हा हा एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. हा जिल्हा अरबी समुद्र किनाऱ्यावर १७° ५१’ उत्तर ते १९° ८०’ उत्तर अक्षांश आणि ७२° ५१’ पूर्व ते ७३° ४०’ पूर्व रेखांश असा पसरलेले आहे. जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १५० किलोमीटर असून व पूर्वपश्चिम रुंदी २४ ते ४८ किलोमीटर आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७१४८ चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.३२ टक्के आहे. रायगड जिल्ह्याची पूर्व सीमा सह्याद्री पर्वताच्या बेलाग रांगातून जात असून त्या पलीकडे पुणे जिल्ह्याची हद्द चालू होते. अथांग अरबीसमुद्राने पश्चिमेकडील सीमा निश्चित केली आहे. जिल्ह्याच्या दक्षिण सीमेकडे रत्नागिरी जिल्ह्याची हद्द सुरु होते. उत्तरेस ठाणे व मुंबई जिल्हा हद्द, तर अग्न्येयेस

सातारा जिल्हा हद्द आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल, खालापूर, कर्जत, उरण, पेण, मुरूड, रोहा, सुधागड, अलिबाग, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, माणगाव, महाड, पोलादपूर या १५ तालुक्यांचा समावेश होतो.

या प्रबंधासाठी प्रामुख्याने मुरूड, रोहा, तळा, माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा, महाड आणि पोलादपूर हे आठ तालुके अभ्यासक्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहेत. कोकणातील सांस्कृतिक कालक्रम निश्चितीसाठी रायगड जिल्ह्याच्या दक्षिण भागाचे नमुना चाचणी पद्धतीने संशोधन करणे उपयोगाचे आहे. अभ्यास क्षेत्रातील सर्व तालुके कुंडलिका व सावित्री या नद्या व त्यांच्या उपनद्यांच्या खोऱ्यांमध्ये येत असल्यामुळे या नद्यांच्या खोऱ्यातील वसाहत रचनेत झालेला फरक लक्षात येऊ शकतो. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील दक्षिण भागातील आठ तालुक्यांची निवड संशोधनासाठीकरण्यात आली आहे (नकाशा क्र. १)

### १.३ संशोधनासाठी निवडलेला कालखंड

या संशोधनासाठी आद्य ऐतिहासिकते मध्ययुगीन कालखंडाची (सनपूर्व ३०० ते सन १८००) निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रात दुसऱ्या नागरिकरणापासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंत अनेक स्थित्यंतरे घडून आली. यामुळे लोकांच्या सांस्कृतिक जीवनावर झालेला प्रभाव व त्या त्या कालखंडातील वसाहत रचनेत झाला. हा बदल अभ्यासण्याच्या दृष्टीकोनातून वरील कालखंडाची निवड करण्यात आली आहे. उत्तर कोकणातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील अनेक लेणी, मंदिरे, किल्ले इत्यादि सारखे अवशेष सर्वज्ञात आहेत. मात्र या परिसरात केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात याच काळातून आजही न नोंदलेले (undocumented) असे अनेक अवशेष मोठ्या प्रमाणात दिसून येतात. प्रस्तुत संशोधनातून आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडात असलेले या विभागातील प्रत्येक विभागाचे महत्त्व स्पष्ट करून त्याचबरोबर संपूर्ण भागाचे एक सलग चित्र उभे करणे यासाठी या संपूर्ण कालखंडाची निवड करण्यात आली आहे.

### १.४ संशोधनाची उद्दिष्टे

१) आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील संस्कृतींच्या वसाहत रचनेचा अभ्यास करून ग्रामीण व नागरी संस्कृतींच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा तयार करणे.

२) आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील सांस्कृतिक वसाहतींचे विविध स्तरांवर वर्गीकरण आणि परीक्षण करणे, उदा. वसाहतींची रचना, व्याप्ती व वसाहतींची जागा इत्यादि.

३) आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील महत्त्वाच्याव्यापारकेंद्रांचा अभ्यास करूनव्यापारी मार्ग व व्यापारी केंद्रांचा अभ्यास करणे.

४) सर्वेक्षणातून निष्पन्न झालेल्या नवीन माहितीचा तौलनिक अभ्यास करून सांस्कृतिक कालक्रमाची पुर्नमांडणी करून नव्याने संस्कृतीवार इतिहासाची पुर्नरचना करणे.

५) इतिहासाचे पूर्वग्रहदूषीत निष्कर्ष टाळण्यासाठी पुरातत्त्वीय व लिखित पुराव्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**सिद्धांत कल्पना**

१) भारताचे प्राचीन व्यापारी संबंध पाहता तसेच परदेशी पर्यटकांनी प्राचीन बंदरांची केलेली वर्णने पाहता येथील समुद्रकाठच्या भौगोलिकदृष्ट्या योग्य गावांची बंदर म्हणून नियोजनबद्ध रचना केलेली असावी.

२) किनारपट्टीवरील बंदरे आणि घाटमाथ्यावरील व्यापारी पेठा यांना जोडणारे मुख्य व्यापारी मार्ग तसेच त्यांना माल पुरवणाऱ्या गावांना जाणारे छोटे उपमार्ग असावेत.

३) घाटमाथ्यावरील तगर, पैठण सारखी व्यापारी केंद्रे आणि महाड व अष्टमी यांसारखी बंदरे यांच्या दरम्यान अनेकव्यापारी उपकेंद्रे असावीत.

४) पाचव्या व सहाव्या शतकात याव्यापारास लागलेल्या ओहोटीस सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीयकारणे असावीत.

५) मध्य कोकणातील गावांमध्ये प्राचीन व मध्ययुगीन ग्रामीण संस्कृतीचे अवशेष मिळतील.

६) प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातील परकीय आक्रमणांचा वसाहतीवर प्रतिकूल वा अनुकूल झालेला परिणाम असावा.

**१.५ संशोधनाची कार्यपद्धती**

या संशोधनाचे मुख्य उदिष्ट रायगड जिल्ह्यातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील वसाहत रचनेचा अभ्यास करणे हे होय. या मुख्य उद्देशाच्या दृष्टीकोनातून खालील संशोधन कार्यपद्धती करण्यात आली होती.

१) अभ्यास क्षेत्रातील प्रत्येक गावास भेट देऊन पुरातत्त्वीय स्थळांचा विस्तार, स्वरूप, व्याप्ती व वसाहत रचनेचा अभ्यास करून त्याची कारणे शोधणे.

२) सर्वेक्षणाच्या कामात भारतीय सर्वेक्षण नकाशांचा वापर करणे. या नकाशामधून प्राचीन अवशेषांची माहिती मिळू शकते. हे नकाशे विशिष्ट परिमाणाने बनवलेले असून त्यात नदीचे वळणे, निरंतर पाणी असलेली स्थळे, नदीच्या पात्राचे स्वरूप, लेणी व किल्ले तसेच विशिष्ट प्रदेशातील उंच-सखलपणा, समुद्रपातळीपासून निरनिराळ्या प्रदेशांची उंची, नदीकाठचे थर व त्यांची उंची वगैरे वैशिष्ट्ये असतात. या नकाशांवरून प्रत्येक स्थळांचे अक्षांश व रेखांश निश्चित करता येतात.

३) सर्वेक्षण नकाशावरून मिळालेल्या तसेच स्थानिक माहितीच्या आधारे पुरातत्त्वीय स्थळांचे सर्वेक्षण व त्यांची नोंदणी करणे व अशा स्थळांवर जाऊन तेथे पृष्ठभागावर मिळणारे अवशेष गोळा करून या पुरावशेषांचे वर्गीकरण करणे. वर्गीकृत पुराव्यांचा इतर भागातील उत्खननात किंवा सर्वेक्षणात मिळालेल्या पुराव्यांशी तौलनिक अभ्यास करून रायगड जिल्ह्यातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील वसाहतींचा तौलनिक कालक्रम ठरविणे.

४) काही निवडक पुरातत्त्वीय स्थळांवर चाचणी उत्खनन करणे अथवा तेथे नैसर्गिकरित्या तयार झालेल्या कडांची तासणी करून निदर्शनास आलेले स्तर अभ्यासणे. या अभ्यासामुळे त्या ठिकाणच्या पूर्ण कालखंडाची माहिती मिळू शकते व स्थूलमानाने कालक्रम जाणण्यास उपयोग होतो. अशा संशोधनामुळे तौलनिक अभ्यासासाठी खूप मदत होते.

५) जीपीएस (GLOBAL POSITIONING SYSTEM) सारख्या अत्याधुनिक तंत्राचा वापर करून पुरातत्त्वीय स्थळांची अचूक नोंद करणे.

६) नाणी, शिलालेख, ताम्रपट वगैरे प्रकाशित पुराव्यांचा उपयोग करणे आणि कोकणातील इतर भागातील, तसेच महाराष्ट्रातील इतर भागात आढळलेल्या पुरावशेषांची तुलना करणे.

या माहितीवरून लिखित साधने व पुरावशेष यांच्यातील साधर्म्य कळून येते. तसेच गावाची प्राचीन नावे, त्यांचे महत्त्व, स्थान, राज्यकर्ते, राज्याच्या आर्थिक, धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा अंदाज लावता येतो.

७) रायगड जिल्ह्यामधील वसाहतींच्या स्वरूपाविषयी पुरातत्त्वीय निष्कर्षांना इतरपुराव्यांची जोड देऊन आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळाबद्दल अनुमाने काढणे व ते प्रबंधरुपात सादर करणे.

### १.६ संशोधनाची व्याप्ती

रायगड जिल्ह्यातील या संशोधनामुळे कोकणच्या आद्य ऐतिहासिककाळापासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंतच्या सांस्कृतिक कालक्रमाचे अनेक पैलू उजेडात आले आहेत. प्राचीन काळात तेर, पैठण यासारखीव्यापारी नगरे होती व त्यांना चौल, पालेपटन, संजान या सारख्या बंदरांमुळे परदेशाशी व्यापार करता येत होता. या प्राचीन बंदरांच्या अस्तित्वा पासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंतच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर पुरातत्त्वीय दृष्टीकोनातून प्रकाश पडू शकतो. या प्रस्तावित संशोधनामुळे कोकणच्या आद्य ऐतिहासिककाळापासून ते मध्ययुगीन कालखंडा पर्यंतच्या सांस्कृतिक कालक्रमाचे अनेक पैलू उजेडात आले.

### १.७ रायगड जिल्ह्याची निर्मिती

कोकण विभागातील मध्यवर्ती स्थानी असलेला रायगड हा महत्त्वाचा जिल्हा आहे. रायगड हे नाव यास प्राप्त होण्यापूर्वी हा जिल्हा कुलाबा या नावाने प्रसिद्ध होता. कुलाबा हे नाव भौगोलिक असून व्युत्पत्ती शास्त्रानुसार कुलाबा म्हणजे समुद्रात गेलेल्या जमिनीची दांडी अथवा भूशीर होय. आज जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असलेल्या अलिबाग नजीक कुलाबा हा शिवकालीन किल्ला आहे. या किल्ल्याच्या नावावरून जिल्ह्यास हे नाव प्राप्त झाले होते.

पेशवा बाळाजी बाजीरावच्या काळात सन १७५६ मध्ये आंग्रेच्या विरुद्ध झालेल्या व इंग्रजांशी केलेल्या तहात दासगाव व कुंबळा ही महाड मधील सावित्री खाडी जवळील गावे आणि बाणकोट किल्ला मराठ्याकडून ब्रिटिशांना मिळाला आणि या भागात ब्रिटीशांचा प्रथम शिरकाव झाला. सन १८१८ मध्ये पेशवे राज्य नष्ट झाल्यानंतर सांक्षी उपविभागातील पेण, राजपुरी उपविभागातील रोहा आणि रायगड उपविभागातील महाड व माणगाव हे भागही इंग्रजांकडे आले. सन १८१८ ते सन १८५० या काळातील रायगडचा प्रदेश इंग्रज सत्ता, भोरचे

संस्थानिक व कुलाबाकर आंग्रे यांच्या अमलाखाली होता. सांक्षी, रायगड व राजपुरी हे उपविभाग इंग्रज सत्तेच्या नियंत्रणाखाली रत्नागिरी जिल्ह्यास जोडले होते. नागोठणे भागातील काही खेडी भोर संस्थांच्या व काही आंग्रे यांच्या मालकीची होती. सन १८३० मध्ये नागोठण्याचा अर्धा भाग भोरच्या पंत सचिवांनी इंग्रजांना देऊन त्यांच्या मोबदल्यात अवचित गडाजवळील अर्धा भूभाग आपल्या ताब्यात घेतला. सन १८६९ मध्ये ठाणे जिल्ह्यापासून कुलाबा जिल्हा वेगळा निर्माण करून कुलाबा जिल्हाधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. या विभागात अलिबाग, पेण, नागठाणे, माणगाव, रोहा आणि महाड यांचा समावेश होता. स्वातंत्र्यपूर्व काळात जंजिरा येथे सिद्दी तर भोर या संस्थानावर पंत सचिवांची राजवट होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संस्थानाचे विलीनीकरण करण्याच्या भारत सरकारच्या धोरणामुळे जंजिरा संस्थानामधील सर्व तालुके व भोरमधील सुधागड महाल कुलाबा जिल्ह्यात सन १९४८ मध्ये विलीन करण्यात आला.

छत्रपती शिवरायांची राजधानी रायगड किल्ल्याच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने १ मे १९८१ रोजी कुलाबा जिल्ह्याचे नामांतर रायगड जिल्हा असे नवीन नामकरण केले. पुढे २६ जून १९९९ रोजी रोजी माणगाव तालुक्याचे विभाजन करून तळा हा स्वतंत्र तालुका तयार केला. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग, पेण, रोहा, पनवेल, खालापूर, कर्जत, उरण, सुधागड, महाड, माणगाव, मुरूड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, तळा असे पंधरा तालुके आहेत.

**१.८ प्रबंधाची मांडणी**.

पहिल्या प्रकरणात संशोधनाचा मुख्य हेतू, अभ्यास क्षेत्र, संशोधनासाठी निवडलेला कालखंड, रायगड जिल्ह्याची निर्मिती, रायगड नावाची उत्पत्ती ही प्रास्ताविक माहिती आहे. संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन कार्यपद्धती व संशोधनाची व्याप्ती यांची सविस्तर चर्चा केली आहे.

दुसऱ्या प्रकरणात रायगड जिल्ह्यामधील विविध भौगोलिक रचना, भूगर्भशास्त्रीय, नद्या, माती, पिके व वातावरण या माहितीसह या भागाची ऐतिहासिक रूपरेषा, पूर्वी झालेले संशोधनव संशोधनपर प्रकाशित साहित्य यांचे सारांशात्मक विवेचन केले आहे.

तिसऱ्या प्रकरणाच्या सुरुवातीस अभ्यास क्षेत्रात केलेल्या सर्वेक्षणाचा सविस्तर वृत्तांत, मुरूड तालुका, रोहा तालुका, माणगाव तालुका, तळा तालुका, म्हसळा तालुका,

श्रीवर्धन तालुका, महाड तालुका व पोलादपूर तालुका या क्रमाने मांडला आहे. तसेच प्रकरणाच्या शेवटी सर्वेक्षण कार्यात आलेल्या मर्यादांची चर्चा केलेली आहे.

चौथ्या प्रकरणात सर्वेक्षणात मिळालेल्या पुरावशेषांची चर्चा केलेली आहे. कालखंड ठरविण्यास उपयोगात आणलेल्या महत्वाच्या सांस्कृतिक पुरावशेषांचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

पाचव्या प्रकरणात वसाहत रचना, स्वरूपयावर चर्चा आहे. वसाहत रचना, स्वरूप व कार्य यावरून त्यांची वर्गवारी करून या भागातील आद्य ऐतिहासिक, उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन व मध्ययुगीन कालखंडात झालेल्या वसाहतींच्या निर्मितीमागच्या प्रेरणांची चर्चा करण्यात आली आहे.

शेवटच्या सहाव्या प्रकरणात सर्वेक्षणातून हाती आलेल्या माहितीचा तुलनात्मक अभ्यास करून काढलेल्या निष्कर्षाचा वृत्तांत मांडला आहे.

# प्रकरण २

## अभ्यास क्षेत्राची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.१ रचना

२.२ भूगर्भशास्त्रीय माहिती

२.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.४ पूर्वी झालेले संशोधन

२.४.१ उत्खनने

२.४.२ सर्वेक्षण

या प्रकरणातली भूगर्भशास्त्रीय माहिती रायगड गॅझेटिअर १९९३ या मधून घेतली आहे.

**२.१ रचना**

उंचसखलपणा हे रायगड जिल्ह्यातील प्राकृतिक भूस्वरूपाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. पूर्वेकडे प्रामुख्याने शिखरे आणि सहयाद्रीचे खिंडीयुक्त डोंगरमाथे आणि सहयाद्रीचा कडा आहे. जिल्ह्यामधून वाहणाऱ्या काही नद्यांचे उगम येथे होतात. सहयाद्रीच्या डोंगररांगा पश्चिमेकडे समुद्रापर्यंत भूशिरासारख्या पसरलेल्या आहेत.

**नद्या**

रायगड जिल्ह्यातील नद्यांच्या प्रवाहांचे दोन भाग स्पष्टपणे दिसून येतात. भरती-ओहोटीचा परिणाम होणारा नदीच्या प्रवाहाचा मुखाकडील भाग आणि भरती-ओहोटीचा न होणारा नदीच्या प्रवाहाच्या उगमाकडील भाग.

रायगडच्या दक्षिण भागात अंबा, कुंडलिका, चांद नदी, सावित्री या मुख्य नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. काही नद्यांच्या मुखाकडील भाग खडकाळ आहे. काही नद्यांची मुखाकडील पात्रे रुंद झाली आहेत, तर काही नद्यांचे तट जास्त उंच असून नद्या त्या उंच तटांमधून नागमोडी वळणांनी वाहतात.

मध्य रायगडामधून कुंडलिका आणि मांदाड या दोन नद्या वाहतात. मांदाड ही कुंडलिकेच्या तुलनेत लहान नदी असून माणगावच्या पठारावर तिचा उगम होतो. ही नदी राजपुरी-म्हसळा खाडीला मुरुडजवळ दक्षिणेस मिळते. म्हसळा गावाच्या उत्तरेला दलदलीचा प्रदेश असून खाडी खूपच रुंद होते.

मांदाड खोरे आणि म्हसळा खाडीच्या दक्षिणेकडील भाग समुद्र काठाला जास्त उंचसखल आहे. परंतु काठापासून दूर असलेला मध्यभाग मात्र कमी उंचसखल असून त्यातून सावित्री नदीच्या चार उपनद्या वाहतात. त्या पैकी घोड, गांधारी आणि काळ या उत्तरेकडून आणि नागेश्वरी दक्षिणेकडून वाहून सावित्रीला मिळतात. सावित्री नदी सहयाद्री पर्वतातील महाबळेश्वर भागात उगम पावून बाणकोटजवळ समुद्राला मिळते. उत्तरेला आणि पश्चिमेला भूरचना जास्त गुंतागुंतीची होत जाते. घोड या उपनदीची दरी मात्र रुंद आहे.काही नद्यांच्या मुखाकडील भागात जलवाहतूक चालते. मागील शंभर वर्षात गाळ साचल्याने जलवाहतूकीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**डोंगररांग**

जिल्हयातील प्रमुख डोंगररांगा सहयाद्री पर्वताच्या आहेत. जिल्हयाची ईशान्य सीमा सहयाद्रीच्या पायथ्याजवळील डोंगररांगामधून व एका उपशाखेवरुन जाते. दक्षिण भागात मात्र जिल्हयाची सीमा सहयाद्रीच्या माथ्यावरुन जाते. दऱ्यामध्ये सदाहरित घनदाट जंगले आहेत. तसेच सह्याद्रीच्या डोंगररांगेत अनेक शिखरे व अनेक खिंडी आहेत. शिवाय जवळच्या बहुतेक खेडयांमधून सह्याद्री ओलांडणाऱ्या अनेक पाऊलवाटा आहेत. यापैकी वरंधा आणि आंबेनळी हे तीन घाट, कोकण व सातारा जिल्ह्याला जोडणारा मार्ग आंबेनळी (फिट्झगेराल्ड) घाटातून जातो. वरंधा घाटाच्या दक्षिणेस तीन आणि उत्तरेस तेरा खिंडी आहेत. दक्षिणेस किनेश्वरजवळ महाबळेश्वर मार्गावर आणि वाई मार्गावर ढवळा आणि कामथा खिंडी आहेत. वरंधा घाटाच्या उत्तरेकडील तेरा खिंडी माजेरी गावाजवळील खिंड, पुणे मार्गावर शिवथरजवळ गोप्या खिंड, आंबे-शिवथळजवळ आंबेनाल खिंड, वाकी बुद्रुकजवळ मढे खिंड, तोरणा किल्ल्याजवळ शेवटया खिंड, कावळे गावाजलवळ कावळया खिंड, मशिदवाडीजवळ कुंभा खिंड, जिते गावाजावळ लिंगा खिंड, उंबार्डी भागात निसणेखिंड, विळेगावच्या हद्दीत ताम्हाणी, देवस्थळी आणि थिबा खिंड आणि निजामपूरजवळ पिंपरी खिंड आहेत.

**पिके**

संपूर्ण रायगड जिल्ह्यात खरीप आणि रब्बी अशी हंगामी पिके घेतली जातात. या भागातील सर्वांत महत्त्वाचे पीक भात असले तरी तृणधान्यात रागी, वारी, कोद्र आणि इतर किरकोळ पिकांचा समावेश होतो. वाल, नाचणी, उडीद, तूर व चवळी ही कडधान्ये व सुपारी आणि मिरची ही पिकेही होतात. जलसिंचन उपलब्ध असलेल्या ठिकाणी नारळी व सुपारीच्या बागाही आहेत. अनेक ठिकाणी भुईमुग, तीळ, कारळ, करंजी, निंब या तेलबियांची पिके घेतली जातात.

**जंगल**

जिल्ह्याची पश्चिम किनारपट्टी आणि पूर्वेकडील मध्य सह्याद्री रांगा यामधील २० ते ३० किलोमीटररुंदीचा दक्षिणोत्तर पसरलेल्या या भागात खुरटी झुडपे आणि विखुरलेल्या पानझडी जंगलांचे पट्टे आहेत. रायगड जिल्ह्यात विपुल वनसंपदा आहे. रोहा आणि महाड तालुक्यांत बरीच वने विखुरलेली आहेत. अभ्यास क्षेत्रातील सह्याद्रीच्या पट्टीत पोलादपुर तालुक्याचा बराचसा भाग आणि माणगाव व महाड तालुक्यांच्या काही भागांचा समावेश होतो. सह्याद्री

पट्टीत असलेले चांगले जंगल पश्चिमेकडे विरळ होत जाऊन उजाड वनात रूपांतरीत झालेले आहे.  बाष्पयुक्त हवामान व भरपूर पावसामुळे विविध प्रकारच्या वनस्पती जाती विपुल प्रमाणात आढळतात.  पर्वत शिखरांचा भाग सोडल्यास बहुतेक भागात पानझडी वनस्पती आहेत. अशा वनस्पती मर्यादित कालावधीत हिरव्या राहतात.  नागोठणे ते माणगाव भागात सदाहरित वनस्पतींच्या जाती आढळतात.

**२.२ भूशास्त्र व खनिज संपत्ती**

संपूर्ण जिल्हयात क्रेटेशस ते पूर्व इओसीन कालखंडात निर्माण झालेले बेसाल्टी लाव्हा रसाचे थर आढळतात. जिल्हयाच्या पश्चिम भागात बेसाल्टी थरांचे जांभा खडकात (लॅटेराइट) रूपांतर झालेले आहेत. तर किनारी वाळू व नद्यांचे गाळ भूवैज्ञानिकदृष्ट्या प्रामुख्याने आधुनिक काळातील असून ते नद्यांच्या मुखाजवळ समुद्र किनाऱ्यावर आढळतात. जिल्हयातील बेसाल्टचे थर ''पाहोई होई'' आणि ''आ आ'' प्रकारचे आहेत.

**जांभा दगड (लॅटेराइट)**

रोहा, मुरूड, श्रीवर्धन तालुके व माथेरानला पठारांच्या माथ्यांवर मधल्या व किना-यांकडील पट्टयात जांभा आढळतो.संकोणाश्मी प्रकार मदगड किल्ल्याजवळच्या काही पठारांवर आढळतो.  पारगाण (मुरूड) जवळच्या कमी उंचीच्या सखल भागातही जांभ्याचे विस्तृत पट्टे आहेत.

**नद्यांचे गाळ**

पाताळगंगा, अंबा व कुंडलिका नद्यांच्या किना-यांवर गाळाचे तुटके पट्टे आढळतात.  त्यात बारीक रेतीचे दोन ते सहा मीटर जाडीचे थर आहेत.

**बॉक्साइट**

जिल्हयात मुरूड व श्रीवर्धन तालुक्यांतील किनारी भागात कमी उंचीवरील टेकडयांवर सपाट पट्टे जांभ्यात आढळतात.

**भौगोलिक सर्वेक्षण**

रायगड जिल्हा अरबी समुद्र किनाऱ्यावर १७° ५१' उत्तर ते १९° ८०' उत्तर अक्षांश आणि ७२° ५१' पूर्व ते ७३° ४०' पूर्व रेखांश असा पसरलेला आहे. जिल्हयाची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १५०

किलोमीटर असून व पूर्वपश्चिम रुंदी २४ ते ४८ किलोमीटर आहे. जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७१४८ चौरस किलोमीटर असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.३२ टक्के आहे.रायगड जिल्हयाची पूर्व सीमा सहयाद्री पर्वताच्या लहानमोठ्या रांगांमधून जात असून त्यापलीकडे पुणे जिल्हयाची हद्द सूरू होते. पश्चिमेकडील सीमा रेषा अरबी समुद्राने निश्चित केली आहे. दक्षिण सीमेपलीकडे रत्नागिरीला जिल्हयाची हद्द सुरू होते. वायव्येस मुंबई, उत्तरेस ठाणे जिल्हा व आग्नेयेस सातारा जिल्हा आहे.

**हवामान**

रायगड जिल्हयाचे हवामान भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या हवामानासारखेच वैशिष्ट्यपूर्ण आहे-पावसाळयात भरपूर व नियमित पर्जन्यवृष्टी, उन्हाळयात उष्ण हवामान आणि वर्षभर हवेत आर्द्रतेचे जास्त प्रमाण. इथे उन्हाळा हा मार्च ते मे, पावसाळा जून ते सप्टेंबर, ऑक्टोबर-नोव्हेंबर असा असतो. डिसेंबर ते फेब्रुवारी हिवाळा असतो.

**पर्जन्यमान**

नैऋत्य मोसमी वा-यांपासून पडणा-या पर्जन्याचा प्रारंभ जूनच्या पहिल्या आठवडयात होऊन पाऊस ऑक्टोबरच्या सुरूवातीपर्यंत पडतो. येथील सरासरी वार्षिक पर्जन्यमान ३०२८.९ मि.मीटर आहे. समुद्रकिना-याकडून जिल्हयाच्या पूर्व सीमेवरील पश्चिम घाट प्रदेशाकडे पर्जन्याचे प्रमाण वाढते. जिल्हयाच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे हे प्रमाण कमी कमी होत जाते.

**तापमान**

तापमान सम असते. मार्च ते मे हा काळ वाढत्या तपमानाचा असतो. मे हा सर्वाधिक तपमानाचा महिना असतो. त्यावेळी सरासरी दैनिक कमाल तापमान ३०.८० सेल्सिअस आणि सरासरी दैनिक किमान तापमान २६.४० सेल्सिअस असते. जूनच्या प्रारंभी मोसमी वारे वाहण्यास सुरूवात होते. सप्टेंबरच्या शेवटी दिवसाच्या तपमानात हळूहळू वाढ होते. डिसेंबर ते फेब्रुवारी हवामान थंड असते. हवेत वर्षभर आद्रता असते.

**२.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी**

महाराष्ट्र स्थुलमानाने उत्तरेकडे तापी आणि आग्नेयेस कृष्णा नदीचे खोरे या दरम्यान पसरलेला भूभाग आहे. तसेच आकाराने त्रिकोणाकृती असलेला महाराष्ट्र दक्षिण पठाराच्या

वायव्य भागातव्यापला आहे. पश्चिमेकडे अरबी समुद्र उत्तरेस मध्यप्रदेश, वायव्येस गुजरात राज्याची सीमा आहे.

महाराष्ट्रातील गोदावरी, भीमा, तापी, वर्धा, वैनगंगा या नद्या व त्यांच्या उपनद्या त्याचप्रमाणे कोकणातील नद्या व उपनद्यांच्या काठावर अश्मयुगीन मानवाच्या वास्तव्याचे पुरावे अश्म हत्यारांच्या रूपाने मिळतात. हे पुरावे पुराश्मयुगापासून ते नवाश्मयुगापर्यंतचे आहेत. परंतु हे पुरावे आदीमानव भटक्या स्वरूपात जगत असतानाचे आहेत. महाराष्ट्रातील कायमस्वरूपी वसाहतींचे पुरावे आपल्याला नवाश्मयुगापासून मिळू लागतात. या काळातील मानव शेती करू लागला असला तरी शिकारी, मासेमारी आणि पशुपालन देखील करत होता. अशा प्रकारच्या सुमारे ३७00 वर्षापूर्वीच्या संस्कृतीचे पुरावे धुळे जिल्ह्यातील प्रकाशे या गावी सापडतात. अशाच प्रकाराचे अवशेष दायमाबाद, चांडोली, सोनगाव, इनागगाव, नेवासे इत्यादि ठिकाणी देखील आढळले आहेत. यापैकी दायमाबाद येथील पुरावशेष वर्तमानपूर्व ३८०० ते ३६०० वर्षापूर्वीचे आहेत. या काळात तांब्याचा वापर मानवाने केलेला दिसतो. अशा प्रकारच्या संस्कृतीचे अवशेष अद्याप कोकणात सापडलेले नाहीत. मात्र सध्या दक्षिण कोकणातील काही कातळ सड्यांवर अश्मखुणा असलेली कातळ शिल्पे आढळली आहेत. याला कोकणात कातळ शिल्पे म्हटले जाते त्यांच्या कालाच्या बाबत मतभिन्नता असली तरी ही शिल्पे प्रागैतिहासिक काळातील असावीत.

यानंतर महाराष्ट्रात लोखंड वापरणा-या लोकांचे वास्तव्य झाले. टाकळघाट, खापा, माहूरझरी, जुनापाणी, नैकुंड इत्यादि ठिकाणी आधीच्या ताम्रसंस्कृतीपासून वेगळी लोहसंस्कृती आढळून येते. हे लोक लोखंडाचा वापर करणारे व त्यांच्या मृतदेह पुरण्याच्या पध्दतीवरून त्यांना महापाषाणीय संस्कृती संबोधले गेले. या संस्कृतीचा उदय साधारणपणे आजपासून २७०० वर्षापूर्वी झाला असावा.

आद्य ऐतिहासिक कालखंडाची सुरूवात महाराष्ट्रात कोकणातील सोपारा येथे सापडलेल्या मौर्य सम्राट अशोकाच्या शिलालेखाने होते. पण ख-या अर्थाने महाराष्ट्रातील पहिले राजघराणे म्हणून इसवीसनपूर्व पहिल्या शतकाच्या मध्यास उदयास आलेल्या व सुमारे सुमारे चारशे वर्षे राज्य केलेल्या सातवाहन या राजवंशाला मानले जाते. या घराण्यात गौतमीपुत्र सातकर्णी, वाशिष्ठीपुत्र पुळूमावी सारखे पराक्रमी राजे झाले. यज्ञश्री सातकर्णी हा या घराण्याचा शेवटचा राजा. सातवाहनांच्या स्थिर कारकीर्दीत महाराष्ट्रात आर्थिक सुबत्ता आली. याच काळात मान्सून वाऱ्याचा शोध लागून, रोमन साम्राज्याशी वाढलेल्या व्यापारातून

तगर उर्फ तेर सारख्या मोठमोठ्या नगरांची निर्मिती झाली. यातून पश्चिम किनारपट्टीवरील चौल सारख्या बंदर नगरांची वाढ झाली. इसवीसनाच्या सुरुवातीसच पश्चिम भारतात शक क्षत्रपांचाही उदय झाला. शक्तिशाली व बलाढ्य नहपान क्षत्रपाच्या काळात सातवाहनांचे कोकण किनारपट्टीवरील वर्चस्व संपुष्टात येऊन क्षत्रपांचा प्रभाव वाढला. मात्र पुढे सातवाहनांनी आक्रमकपणे हा भाग परत मिळवला.

सातवाहन शक-क्षत्रप या घराण्यासोबत कोकणातील व घाट माथ्यावरील तत्कालीन बौद्धलेणींमधील शिलालेखांमधून महारठी, महारठीनी, महाभोज, महाभोजी या स्थानिक प्रमुखांचे अनेक उल्लेख येतात. असे दिसते की तळा तालुक्यातील कुडे या ठिकाणी आढळणाऱ्या लेणीना राजाश्रय देणारे महाभोज हे पद धारण करणारे प्रमुख  मांदाड आणि परिसरात राज्य करत होते. विद्वानांच्या मते मांदाड म्हणजेच प्राचीन ग्रीक प्रवाश्यांनी वर्णन केलेले 'मंदगोरा' बंदर होय (Mujumdar 1960: 305). कुड्यासारख्या लयनवसाहतींच्या निर्मितीच्या कालखंडाबाबत विद्वानांमध्ये एक वाक्यता नाही. अनेक विद्वानांनी या लेणीचे स्थापत्य व पुरालिपीशास्त्रानुसार  या लेणीचा कालखंड  इसवीसन पूर्व पहिल्या शतकापासून ते अगदी तिसऱ्या ते चौथ्या शतकापर्यंतचा असा वेगवेगळा व काहीसा बुचकळ्यात टाकणारा ठरविला आहे. यामुळे कोकण किनारपट्टीवर या भागात सत्ता गाजवणाऱ्या व इतके महत्त्वपूर्ण शिलालेख व स्थापत्य यांची रचना करणाऱ्या या वंशाच्या राजकीय कारकीर्द व कालखंड यांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुळात या लेणीतील स्वतःला महाभोज म्हणवून घेणाऱ्या प्रमुखांचे आलेले उल्लेख हे कोणत्याही सार्वभौम राजाच्या उल्लेखाशिवाय आलेले असल्याने तसेच या वेळेस संपूर्ण महाराष्ट्रावर सत्ता गाजवणाऱ्या सातवाहन या राजवंशाचा अनुल्लेख असल्यानेच ही लेणी सातवाहनाच्या अस्तानंतर निर्माण झाली असावीत असा ग्रह अनेक विद्वानांचा झाला. यातूनच शेवटचा सातवाहन राजा यज्ञश्री सातकर्णीच्या राजवटीनंतर कोकणातील स्थानिक प्रमुख स्वतंत्र झाले असावे व स्वतःस महाभोज म्हणवून घेत त्यांनी या वसाहतीस राजाश्रय दिला असावा ही कल्पना पुढे आली असावी. या लेणी समूहात आलेल्या शिलालेखांमधून महाभोज व साडगेरी या दोन घराण्यांमध्ये आपापसात झालेल्या विवाहसंबंधाचे दर्शन घडते. या लेणींच्या व महाभोजांच्या कालखंडावर प्रकाश टाकणारा नाणकशास्त्रीय पुरावा उपलब्ध झाला आहे. शिलालेखांतील साडकर सुदषण व शिवम या महाभोज राजांची नाणी महाराष्ट्रातील चौल, जुन्नर, व इतर ठिकाणी सापडल्याचे उपलब्ध झालेल्या नाण्यांवरून सिद्ध झाले आहे.

सातवाहनांनंतर कोकणावर अभिर व त्रैकुटक घराणे सत्तेवर आले. अभिरांची कोकणावर असलेली सत्ता उलथून टाकत त्रैकुटानी सन ४१५ मध्ये राज्यसत्ता ताब्यात घेतली. कान्हेरी येथील बांधीव स्तुपामध्ये त्रैकुटकांचा ताम्रपट सापडला आहे. त्यांची नाणी आणि ताम्रपटावरून इंद्रदत्त,  दऱ्हसेन, व्याघ्रसेन, विक्रमसेन असे राजे ज्ञात झाले. त्यांची नाणी कऱ्हाड, दमन, कऱ्हाड, पुणे, घारापुरी येथे उपलब्ध झाली आहेत. उत्तरेतील गुप्त सम्राट व वाकाटक हे त्रैकुटकाना समकालीन होते. सहाव्या शतकात महिष्मतीच्या कलचुरींचा उदय झाला त्यांनी कोकणवर राज्य केल्याचा दावा केला आहे. या दरम्यान वाडा येथे आढळलेला सुकेतूवर्मन मौर्य या राजाच्या शिलालेखावरून तो कलचुरींचा मांडलिक असावा. या नंतर उदयास आलेल्या मौर्य घराण्याने सातव्या शतकापर्यंत राज्य केले. बदामीच्या चालुक्यांनी कोकणातील मौर्यांचा पराभव करून येथे त्यांची राजसत्ता स्थापन केली. दुसरा पुलकेशीच्या ऐहोळे येथील सन ६३४ मधील शिलालेखात यांसदर्भातील वर्णन आले आहे.

बदामीच्या चालुक्यांनतर राष्ट्रकूट वंशाने सन ७४९ मध्ये कोकणाचा ताबा घेवून तेथे अनिरूध्द या शासकाची नेमणूक केली. या नंतर राष्ट्रकुटांच्या अधिपत्याखाली संपूर्ण कोकण येऊन त्यांनी तेथे शिलाहार या राजघराण्याची नेमणूक केली. शिलाहार घराण्याच्या महाराष्ट्रात अनेक शाखा झाल्या.  त्यातील उत्तर कोकणात राष्ट्रकुट नृपती गोविंदच्या नेतृत्वाखाली शिलाहार कपर्दीन पहिला याने, तर दक्षिण कोकणात शिलाहार सण्णफुलाने राष्ट्रकूट नृपती कृष्णच्या आश्रयाखाली सत्ता स्थापन केली. शिलाहार राजघराण्याने सुमारे चारशे वर्ष राज्य केले या दरम्यान अनेक शिलाहार राजे सत्तेत आले. त्यांचे कायमच आपापसात तर कधी गोव्याचे कदंब, अरब, यादव इत्यादि राजघराण्याशी संघर्ष झाले.

तेराव्या शतकात शिलाहारांचा यादवांशी संघर्ष होऊन, शेवटी यादव महादेव याने शेवटचा शिलाहार राजा सोमेश्वर यास सन १२६५ च्या सुमारास  सागरी युद्धात वध व निर्णायक पराभव करून कोकणावर आपली निर्विवाद सत्ता स्थापन केली. यादवांनी कोकणात अच्युत नायक नावाचा शासक येथे नेमला. यादवांची इथली सत्ता सन १३१८ मध्ये देवगिरीच्या पाडावा नंतर संपुष्टात आली. चौदाव्या शतकातील या भागातील राजकीय परिस्थिती बाबत पुरेश्या साधना अभावी काहीही ठोस मत प्रदर्शन करता येत नाही. काही भागात दिल्ली सुलतानांचे, काही ठिकाणी लिंगायत राज्यकर्त्यांचे, तर काही ठिकाणी विजयनगरची सत्ता होती. पंधराव्या शतकात बहामनी राजकर्त्यांनीराज्य केले. बहामनी सत्तेचे विभाजन होऊन हा भाग सन १४९० च्या सुमारास अहमदनगरच्या निजामशाहीकडे गेला

त्यांचे या काळातील लेख सदर प्रबंधाच्या अभ्यास क्षेत्रात व इतरत्र आढळून येतात. याच काळात पोर्तुगीजांनी चौल, रेवदंडा व कोरलई किल्ला परिसर ताब्यात ठेवला होता.

पंधराव्या शतकाच्या शेवटी निजामशाहीचा पाया घालणाऱ्या मलिक अहमदने सर्वप्रथम जंजिरा किल्ल्याचा प्रमुख म्हणून अबिसिनियन म्हणजे हबशी सरदारांची नेमणूक करून या भागात नवीन राजसत्ता निर्माण केली. असे असले तरी यापूर्वीच म्हणजे बहामनी काळातच हबशी या भागात आल्याचे मानले जाते. सन १६३६ मध्ये मुघल बादशहा शाहजहानने निजामशाही नष्ट करेपर्यंत रायगड जिल्ह्याचा बराचसा भाग निजामशाहीच्या सिद्दींकडे होता. येथे मुघलांनी ताबा मिळवला. सोळाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत हा भाग शहाजी भोसलेकडे आला. सन १६३६ च्या सुमारास हा प्रदेश खंडणीच्या बदल्यात मुघलांकडून आदिलशहा कडे गेला. सतराव्या शतकाच्या मध्यास सन १६५६ मध्ये हा भाग आदिलशहाचा सरदार चंद्रराव मोरे याच्या कडून शिवाजी महाराजांनी घेतला. पुढील काळात सिद्दी व मराठे यांच्यात सतत संघर्ष होत राहिला. सन १६८९ मध्ये हा परिसर मुघल बादशाह औरंगजेबने मराठ्यांकडून जिंकून घेतला. सतराव्या शतकाच्या शेवटी रायगडचा सागरी किनारा मराठा सरदार आंग्रे घराण्याच्या प्रभावाखाली होता. महाराणी ताराबाई यांनी सागरी किनाऱ्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी कान्होजी आंग्रे यांच्यावर सोपविली. या कालावधीत मराठा राजवटीत सुंदोपसुंदी माजली होती. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत हा भाग कधी सिद्दी, मराठा, इंग्रज या सत्तांकडे जात राहिला. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव करून मराठेशाहीचा अंत केला. सन १९४७ मध्ये जंजिरा संस्थान वगळता रायगडचा इतर भाग पारतंत्र्यातून स्वतंत्र झाला, तर सन १९४८ मध्ये जंजिरा संस्थानातील मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा हे भागही स्वतंत्र भारतात विलीन झाले.

## २.४ पूर्वी झालेले संशोधन

कोकण किनारपट्टीला प्राचीन काळापासून इतिहास आहे. या विभागाचा अनेक अभ्यासक व तज्ज्ञांनी अभ्यास केला आहे. कोकणातील बंदराचा उल्लेख व त्यांचे वर्णन पेरिप्लस, प्लिनी, टॉलेमी, अलइद्रिस यांनी केले आहे. अधिक पुरावे मिळविण्यासाठी पूर्ववृत्तांत विचारात घेणे आवश्यक आहे.

'पेरिप्लस ऑफ द इरेथ्रीयन सी' हे इसवीसन पहिल्या शतकात एका अज्ञात खलाशाने लिहिलेले पुस्तक असून, यात भारताच्या पश्चिम किना-यावरील प्राचीन बंदरांचे वर्णन, व्यापारी

केंद्र व तेथीलव्यापाराचे वर्णन किना-यावरील बंदरासह केले आहे. या पुस्तकातील बंदरे व त्यांचा इतर बंदराशी असलेला संबंध व तेथील दळण-वळणांचा अभ्यास शॉप यांनी १९१२ मध्ये केला आहे.

प्राचीन काळातील भारताच्या पुरातत्त्व खात्याचे प्रमुख व या शाखेचा पाया ज्यांनी घातला ते सर कॅनिंगहॅम यांनी सन १८७१ मध्ये मुंबई इलाख्यात येणाऱ्या ऐतिहासिक स्थानांचे सर्वेक्षण केले आहे. यावरून प्राचीन व मध्ययुगीन वास्तूंचा आढावा घेता येतो.

रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ येथील धाकटी व कोटजाई नदीच्या किना-यावरील पन्हाळेकाजे या लेणींचा पुरातत्वीय दृष्टीने अभ्यास व या लेणींचा जवळच्याव्यापारी पेठांशी असलेला संबंध यांचा एम.एन. देशपांडे यांनी, १९५६ मध्ये अभ्यास केला आहे. याद्वारे या ठिकाणच्या बंदराचे महत्त्व कमी होणे अथवा नाश होणे यांचे पुरावे मिळविण्यास मदत होते.

भारत आणि रोम यांतील व्यापारी संबंधाचा सिमकिन यांनी १९६८ मध्ये अभ्यास केला आहे. व्यापारी मार्ग, तेथील सुविधा, इतर देशांबरोबर असलेला व्यापारी संबंध, दळणवळण यांचा अभ्यास केला आहे. प्राचीन काळातील बंदरे व त्यांचा इतर बंदरांशी असलेला संबंध यांच्या अभ्यासास मदत होते.

इसवीसन पहिल्या शतकातील 'पेरिप्लस ऑफ द इरीथ्रीन सी' या पुस्तकातील स्थळ वर्णनांचा उपयोग करून हंटींगफोर्ट, यांनी १९८० मध्ये पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांचा अभ्यास केला आहे. यात पश्चिम किनाऱ्यावरील स्थळांची उच्चार साधर्म्याने पुस्तकात आलेल्या ठिकाणांशी सांगड घालता येते.

२.४.१ उत्खनने

जोगळेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी केळशीचा भूशास्त्रीय व पुरातत्वीय दृष्टीकोनातून अभ्यास केला व त्यानुसार तेथील भौगोलिक परिस्थितीचा व मानवी वसाहत यांचा अभ्यास करण्यात आला. यातून तत्कालीन किना-यावरील नैसर्गिक घडामोडींचा आढावा घेता येतो (Joglekar *et al*. 1996-97; Joglekar *et al*. 2001-2002; Joglekar 2007). देव व त्यांच्या सहकाऱ्यांनी केळशी येथील वाळूच्या टेकडीचे उत्खनन करून त्यातील अवशेषांचा भौगोलिक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे (Deo *et al*. 2001; Deo *et al*. 2004-2005).

रायगड जिल्ह्यात झालेली उत्खनने

| स्थळ | वर्ष | उत्खनन संस्था | उत्खनीत अवशेष | संदर्भ | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| पाचाड | १९६९-७० | भारतीय पुरातत्व सर्वेक्षण | पुराश्मयुगीन हत्यारे | आयएआर | २३-२४ |
| पाचाड गुहा | १९७०-७१ | भारतीय पुरातत्व सर्वेक्षण | मध्याश्मयुगीन हत्यारे | आयएआर | २२-२३ |
| रायगड | १९८०-८१ | भारतीय पुरातत्व सर्वेक्षण | नाणी | आयएआर | ४३ |
| खडसांबळा लेणी | १९८१-८२ | भारतीय पुरातत्व सर्वेक्षण | चांदीची आहत नाणी | आयएआर | ९७ |
| चौल | २००६ | डेक्कन कॉलेज | खापरे, नाणी, मध्ययुगीन अवशेष | जर्नल ऑफ इंडियन ओशन अर्किओलॉजी | ६३-८० |
| चांढोरे | २०१४ | बहिशाल विभाग, मुंबई विद्यापीठ | गद्याणक, चांदीचे नाणे | अप्रसिद्ध | उपलब्ध नाही |

**२.४.२ सर्वेक्षण**

रायगड जिल्ह्यात पुरातत्त्वीय दृष्टीकोनातून झालेले सर्वेक्षण पुढील प्रमाणे आहे.

अभ्यास क्षेत्रातील बौद्धलेणींचे पुरातत्त्वीय दृष्टीकोनातून प्रथम सर्वेक्षण फर्ग्युसन आणि जेम्स बर्जेस यांनी केले असून, याची माहिती त्यांच्या केव्ह टेम्पल ऑफ इंडिया १९६९ ओरिएंटल बुक्स, दिल्ली, या पुस्तकात प्रकाशित करण्यात आली आहे.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या प्रिहिस्ट्री शाखेचेचे संशोधक बोपर्डीकर आणि इतर यांना १९६९-७० मध्ये अभ्यास क्षेत्रातील गांधारी नदीच्या काठी कोतुर्डे, महाड, राजवाडी, कांबळे (तालुका महाड) आणि पार्ले, चरई, तुर्भे आणि वाकण (तालुका पोलादपूर) केलेल्या सर्वेक्षणात आद्यपुराश्मयुगीन, तसेच मध्याश्मयुगीन हत्यारे सापडली (आयएआर १९६९-७०: २३).

भारत सरकारच्या पुरातत्व सर्वेक्षण विभागास सन १९७६-७७ मध्ये पाचाड येथे रायगड किल्ल्याच्या नामांतराचा मुघल बादशहा औरंगजेब याचा फारसी लेख आढळला. यातून किल्ले रायगडचे नाव बदलून इस्लामगड ठेवल्याचे दिसते (आयएआर १९७६-७७ :६७).

एस. नागराजू (Nagaraju 1981: 242-306) या पुरातत्त्व अभ्यासकांना तळा तालुक्यातील मांदाड बंदराजवळआद्य ऐतिहासिक कालखंडातील लेप दिलेली तेजस्वी काळी आणि लाल खापरे आढळली. यामुळे कुडा लेणीस आश्रय देणारे व महाभोजांच्या शिलालेखात उल्लेखिलेले गाव म्हणजे मांदाड होय याच पुरावा मिळाला. तसेच माणगाव जवळ नीळगुंद गावी प्राचीन लेणीचे अवशेष सापडले. यामुळे या ठिकाणी इसवीसनाच्या सुरवातीच्या कालखंडात लयन वसाहत झाल्याच्या पुरावा मिळाला (आयएआर १९७८-७९, ९८). किल्ले रायगड येथे, पुरातत्त्व विभागाकडून शिवसमाधीच्या पुनर्बांधणीचे काम सुरु असताना या ठिकाणी, गणेश मूर्ती, लोखंडी साहित्य, व एक शिलालेख सापडला (भारतीय पुरातत्व सर्वेक्षण १९६८-६९:१००). भारतीय पुरातत्व सर्वेक्षणास जंजिरा किल्ला, तालुका मुरूड येथे फारसी शिलालेख सापडले. या मध्ये या ठिकाणच्या किल्ल्याची बांधणी सिद्दी हबशीने केल्याचा उल्लेख आला आहे (आयएआर १९५९-६०: ६३).

# प्रकरण ३

# अभ्यास क्षेत्रातील पुरातत्त्वीय वृत्तांत

३.१ मुरूड तालुक्यांतील सर्वेक्षण वृत्तांत

३.२ रोहा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.३ माणगाव तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत


३.४ तळा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.५ म्हसळा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.६ श्रीवर्धन तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.७ महाड तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत

३.८ पोलादपूर तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत




नकाशा क्रमांक २ मुरूड व रोहा तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

या प्रकरणाचा मुख्य उद्देश अभ्यास क्षेत्रातील पुरातत्त्वीय स्थळांची माहिती, या स्थळांचे स्वरूप व रचना यांच्या अभ्यासाची माहिती देणे हा आहे. या दृष्टीकोनातून केलेल्या सर्वेक्षणात प्रत्यक्ष स्थानावर आढळलेल्या पुरावशेषांचे स्वरूप, त्यांचे अक्षांश व रेखांश, स्थान या आधारावरून त्यांचा सांस्कृतिक कालक्रम ठरविणे व या बाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच सर्वेक्षण कार्यात आलेल्या मर्यादांची चर्चा केलेली आहे.

## **३.१ मुरूड तालुक्याचा सर्वेक्षण वृत्तांत (**नकाशा क्रमांक २)

**तळेखार** (18° 26'52” N, 72° 59'1” E )

मुरूडच्या उत्तरेस आणि कुंडलिकानदीच्या पश्चिम तीरावरील गावात जीर्णोद्धार झालेले शिवमंदिर आहे. येथे कोणतेही विशेष पुरावशेष नाहीत, अलिकडच्या विसाव्या शतकातील नंदी आहे. मात्र पाषाणातील शिवलिंग हे शिल्पशैलीवरून सतराव्या किंवा अठराव्या शतकातील असावे. या ठिकाणी शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारायच्या मंदिराच्या काही कोरीव शिळा पाहायला मिळतात. गावात बापदेवाचेही स्थान आहे. धोपाटे व मोकाशी (२०१३) यांनी नुकताच एक शिलाहारांचा ताम्रपट प्रकाशित केला आहे. त्यांना ओळख न पटलेल्या तलैका म्हणून उल्लेखलेले हे गाव म्हणजे तळई व तळेखारचा भाग असावा. या ताम्रपटानुसार हे गाव दान दिलेल्या गावाच्या उत्तरेस आहे. हे वर्णन या गावाला जुळते.

**चोरढे** (18° 27'33” N,  72° 58'56” E )

मुरूडच्या उत्तरेस १९ किलोमीटर अंतरावर रोहा-साळाव मार्गावरील या गावात नुकतेच बांधलेले खंडोबाचे हनुमान मंदिर आहे. गावाबाहेर बापदेव स्थानाशेजारी विजेचे खांब लावण्यासाठी खोदलेल्या खड्यात मध्ययुगीन काळातील काचेचा लेप असलेली खापरे आढळून आली. गावामागील डोंगरावर धावीरदेव या स्थानिक ग्रामदेवतेची घोडेस्वार व दोन हातांची मूर्ती पाहायला मिळते.

**सावरोली** (18°  27'  21"  N , 72°  58'  52” E )

मुरूडच्या उत्तरेस १२ किलोमीटर अंतरावरील गावातील हनुमान मंदिर परिसरातील शेतात नांगरणीच्या वेळेस लाल आणि करडया रंगाची खापरे सापडतात. तसेच गावात एक जुना दर्गा असून त्याचे जांभा दगडातील कोरलेले शुष्कसांधी पद्धतीचे दगड आढळतात. गावात

धावीरदेव आणि वरदानी देवीचे जीर्णोद्धार झालेली स्थाने आहेत. जीर्णोध्दारापूर्वी असलेली घोडयावर बसलेली धावीरदेवाची दोन हातांची प्रतिमा होती. या प्रतिमेची तसबीर मंदिरात ठेवली आहे. शैलीवरून ती प्रतिमा आधुनिक काळातील वाटते.

**ताडगाव** (18° 27'58" N, 72° 58'33" E )

ताडगाव हे मुरूडच्या उत्तरेस १४ किलोमीटर अंतरावर आहे. बुध्दवाडी परिसराजवळ असलेली ताडगावची ग्रामदेवता ताडदेवीच्या मंदिराचा नुकताच जीर्णोध्दार झाला. या दरम्यान झालेल्या जोते बांधण्यासाठी केलेल्या उत्खननात प्राचीन मंदिराचे काही शिल्पावशेष सापडले आहेत. ते गावक-यांनी मंदिराच्या बाजूस एका चौथ-यावर ठेवले आहेत. या अवशेषांमध्ये काळया पाषाणात घडविलेले दोन स्तंभाचे तळखडे, भग्न योनीपीठ अवशेष, भग्न गणेश प्रतिमा की जिचा फक्त मुखभाग आणि कडेची प्रभावळ शिल्लक आहे, एका मूर्तीचा फक्त कमरेचा भाग, मूर्तीचा खालचा पायांचा अवशेष भाग आणि याशेजारीच महिष मुख कोरलेले शिल्प, भग्न झालेल्या मूर्तीच्या वाहनाचा मागचा भाग असलेला शिलाखंड आणि उल्लेखनीय म्हणजे येथे मंदिराच्या दक्षिणेस असलेले दगडी कोरीव पीठ खुर, कर्णिका, अंतरपत्र, कुंभ इ. भाग असलेले हे पीठ व इतर अवशेष यावरून येथे शिलाहार काळात मोठे मंदिर असावे असे लक्षात येते. तर खुद्द गावात हनुमानाचे अलिकडच्या काळातील मंदिर असून उजव्या हाताने स्वतःचे शेपूट पकडणा-या मारूतीची विसाव्या शतकातील मूर्ती आहे. स्त्री-पुरुष कोरलेले शिल्प, शिरोभागी चंद्र-सूर्य आहे. मूर्तीचे हात, पाय, मुकुट यांचे भग्न अवशेष आढळून येतात, शिवाय लाल रंगाची खापरे आढळून येतात. ताडगाववाडी हा या गावचाच भाग आहे. याठिकाणी हनुमानाचे आधुनिक काळातील मंदिर आहे. शिल्पशैलीवरून हे अवशेष अकराव्या शतकातील असावेत.

**सातिर्डे** (18° 28'41" N, 72° 58'27" E )

मुरूडच्या उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणी सिध्दीविनायकाचे गणेशाचे नुकतेच उभारलेले मंदिर आहे. कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष नाहीत, मात्र या गावाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता या ठिकाणचे सूक्ष्म स्तरावर परीक्षण होणे गरजेचे आहे.

**वळके** (18° 29'12" N, 72° 58'23" E )

रोहयाच्या उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर रोहा-साळाव रस्त्यावरील गावात जीर्णोध्दार झालेले हनुमान मंदिर तसेच गावात पिराचे स्थान आहे. बापदेव या धार्मिक ठिकाणी साध्या

लिंगाकार दगडांना चुना आणि त्यावर शेंदूर फासलेला दिसतो. शेतातून नांगरणीच्या वेळेस काळसर, राखाडी आणि लाल रंगाची खापरे आढळतात.

**आमली** (18° 30'29” N, 72° 57'44” E )

मुरूडच्या उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर गावात जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिरात मराठा काळातील नंदीशिल्प आहे. खोल गर्भगृहात मात्र प्राचीन पद्धतीचे शिवलिंग आहे. रस्त्यालगत बसस्थानकाशेजारी बापदेव म्हणून चुना लावलेला स्वयंभू तांदळा (स्थानिक भाषेत शेंदूर किंवा चुना लावलेला दगड) आहे. शेजारीच असलेल्या शिरगाव (18° 29'36” N, 72° 57'59” E ) या ठिकाणी बापदेव स्थान आहे. इतर कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष नाही.

**येसदे** (18° 29'59” N, 72° 57'48” E )

मुरूडच्या उत्तरेस कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावरील या गावात बापदेव या गावातही कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष नाही. सध्या गावात बंदर आहे.

**वाघुलवाडी** (18° 30'38” N, 72° 57'44” E )

या ठिकाणी मरिआईचे जीर्णोद्धार झालेली मंदिरात एकविसाव्या शतकातील पाषाणमूर्ती बसविली आहे. मूर्तीच्या मागे मूळ दगडास शेंदूर लावून पूजा केली जाते.

**मिठेखार**(18° 31'7” N, 72° 57'43” E )

गावात स्वातंत्र्योत्तर काळातील हनुमान व संतोषीमाताचे आधुनिक काळातले मंदिर आहे.

**निडी** (18° 31'48” N, 72° 56'58” E )

मुरूडच्या उत्तरेस २० किलोमीटर अंतरावर या गावात दर्गा, पिराचे स्थान व श्री राममंदिर आधुनिक काळातील बांधले आहे. गावदेव बापदेवचे स्थान असलेल्या या कुंडलिका खाडीच्या दक्षिण काठावरील गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**साळाव** (18° 32'7” N, 72° 56'45” E )

हे कुंडलिका खाडीवरील मुरूडपासून सुमारे २१ किलोमीटर अंतरावर आहे. गावातील हनुमान मंदिरात शेपूट पकडलेल्या वीरमारूतीचे शिल्प आहे. मंदिरासमोर सुमारे एक मीटर लांबीची शिलालेखासाठी गुळगुळीत केलेली शिळा हनुमान मंदिराच्या चौथ-यावर पडलेली आहे.

गावातील गावदेवीच्या भग्न मूर्ती विसर्जन करून बिर्ला कंपनीच्या आवारात मूळ ठिकाणी मंदिर बांधले आहे. देवीची मूर्ती नसून फक्त कोरलेला पीठाचा दगड आहे. मंदिरासमोर एक आयताकृती शिळा कोरून ठेवली आहे.

**कोरलई** (18° 32'16" N, 72° 54'27" E )

मुरूडच्या उत्तरेला कुंडलिका नदीच्या दक्षिण बाजूस हे गाव आहे. गावातील दक्षिणोत्तर सुमारे ९०० मीटर लांब व पूर्वपश्चिम ३० मीटर रुंद पसरलेल्या टेकडीवर कोरलई हा मध्ययुगीन किल्ला आहे. कोरलई हा जलदुर्ग आहे. उत्तम तटबंदी असलेला हा किल्ला सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी हा निजामशहाच्या परवानगीने हा किल्ला बांधला. या गडावर पोर्तुगीजांचे किल्ले उभारणी संदर्भातले शिलालेख आहेत. या किल्ल्यावरून रेवदंडा खाडीवर लक्ष ठेवले जात असे. नेर्न, द कुन्हा, द कुटो, अंतोनो बोकारो, फेरीश्ता इत्यादि इतिहासकारांनी कोरलईचे वर्णन लिहून ठेवले असून येथे ख्रिश्चन लोकांची वस्ती अधिक होती.

**बोर्ली** (18° 30'33" N, 72° 54'51" E )

मुरूडच्या उत्तरेस असलेल्या या गावात महत्त्वपूर्ण अवशेष सध्यातरी आढळत नाहीत. बापदेव मंदिरासमोर एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील अष्टकोनी चौथरा आहे.

**कोलमांडले** (18° 30'17" N,  72° 55'21" E )

मुरूडपासून उत्तरेस२० किलोमीटर अंतरावरच्या मांडला गावाचा हा एक भाग आहे. गावदेव मंदिर व ग्रामदेवता परिसरात गावातील पुरावशेष आढळतात. गावदेवाचे साधे कौलारू मंदिर आहे.येथे मध्ययुगीन काळातील नंदी, शिवलिंग, गणेश प्रतिमा आहेत. यातील गणेश प्रतिमेस शेंदूरलावलेला दिसतो. या गावचा उल्लेख शिलाहार नृपतीच्या भोईघर ताम्रपटात कोलपल्लिका म्हणून आला आहे (दिक्षित १९४७: ३२-४५). तसेच मंदिराबाहेर भग्न वीरगळाचा एकमेव तुकडा, तसेच गावदेवी मंदिर येथील छोट्या मंदिरात शेंदूर लावलेली दोन शिल्पे मराठा काळातील असावीत, परंतु शेंदूरांच्या लिंपणामुळे निश्चित सांगता येत नाही. शिवमंदिराजवळील वीरगळ शिल्पशैलीवरून बाराव्या शतकातील असावा.

**महाळंगे खुर्द व बुद्रुक** (18° 29'48" N, 72° 56'10" E )

महाळुंगे हे गाव मुरूडच्या उत्तरेस १८ किलोमीटर अंतरावर आहे. गावात जाकमाता या स्थानिक देवतेचे मंदिर आहे. गावातील शेतातून नांगरटीच्या काळात लाल लेप दिलेली,

करड्या रंगाची उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील तसेच मध्ययुगीन काळातील काळ्या रंगाची खापरे आढळतात. जाकमातेची दोन हातांची मूर्ती झिजलेली असून त्यावर कोणतेही अलंकरण मूर्तीची झीज झाल्याने शिल्लक नाही.

**काकळघर** (18° 29'51” N, 72° 56'56” E )

हे गाव मुरूडहून १९ किलोमीटर अंतरावर उत्तरेस असून गावातील जाखमाता (जाकमाता) मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**वांदेलि** (18° 29'17” N, 72° 57'3” E )

मुरूडहून १७ किलोमीटर अंतरावर उत्तरेस हे गाव आहे. गावदेव काळभैरीची झीज झालेली जेमतेम 30 सेंटीमीटर उंच व २० सेंटीमीटर रुंद प्रतिमा आहे. मंदिराबाहेर वीरगळ सदृश्य प्रतिमा दिसते. शैलीवरून हे शिल्प चौदाव्या शतकातील असावे.गावात आधुनिक काळात राधाकृष्ण मंदिर उभारण्यात आले आहे.

**डाकेली** (18° 29'14” N, 72° 56'35” E )

मुरूडपासून १७ किलोमीटर अंतरावर उत्तरेस असलेल्या या गावाच्या शेतामध्ये चिंचेखाली शिवमंदिराचे अवशेष फक्त शिवलिंग, नंदी आणि वीरगळ सदृश्य झिजलेली प्रतिमा जांभा दगडातिल शुष्कसांधी लांबीचे चार, पाच कोरीव चिरे विखुरले आहेत. शिल्पशैलीवरून शिल्लक राहिलेले शिवलिंग चौदाव्या शतकातील असावे. वरदायिनी देवीचे जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. मंदिरातील सात शिल्पे काळया दगडातील आहेत. त्यांना रंग दिलेला दिसतो.एक घोडेस्वार व चार हातांचा पुरुषदेवतेची प्रतिमा आहे. याच्या उजव्या वरच्या हातात तलवार डाव्या वरच्या हातात डमरू असावा. उरलेल्या दोन हातातील वस्तूंचा बोध होत नाही. दुसरी प्रतिमा झिजलेली, तिसरी चार हातांची स्त्रीदेवता बहुधा महिषासुरमर्दिनी असावी. नंतरची प्रतिमा नमस्कार मुद्रेतील स्थानक स्त्रीशिल्प आहे. एकंदर शिल्पशैलीवरून सतराव्या शतकातील मराठा काळातील वाटतात.

**भोइघर** (18° 28'48” N, 72° 54'59” E )

मुरूडच्या उत्तरेस २० किलोमीटर असलेल्या या गावात श्री. नातू नावाच्या गृहस्थांच्या शेतात शिलाहार नृपतिचा छित्तराजाचा सन १०२४ चा संस्कृत व देवनागरी ताम्रपट व काही नाणीही सापडली होती (दिक्षित १९४७: ३२-४५). गावात सध्या हनुमान व बापदेवाचे मंदिर आहे. येथे

कोणतेही महत्त्वपूर्ण शिल्पावशेष आढळून येत नाहीत. या ताम्रपटावरून मुरूडचा भाग पाणाड विषय या प्रशासकीय विभागात अंतर्भुत होत होता. फणसाड धरणात पूर्वी हे गाव होते. त्यातील एका टेकडीवर गणेश मंदिर होते, त्यातील गणेश प्रतिमा बाहेर काढून फणसाड मंदिरात ठेवण्यात आली आहे. सध्या ही प्रतिमा तैलरंगाने रंगविलेली आढळते. ही मूर्ती शिल्पशैलीवरून मराठा कालखंडातील वाटते.

**बेलवाडी** (18° 28'32" N, 72° 55'25" E )

भोइघर गावाच्या उत्तर दिशेस या गावाचाच भाग असलेले हे ठिकाण आहे. येथे जीर्णोध्दार झालेले शिवमंदिर असून मंदिरात आधुनिक काळातील नंदी प्रतिमा असली तरी गर्भगृहात मात्र मूळ शिवलिंग आहे. यातील लिंग आणि योनीपीठ भाग वेगवेगळा आहे. याशिवाय मंदिराशेजारील वडाच्या झाडाखाली आयताकार एक मीटर लांब, ३४ सेंटीमीटर रूंद, ३० सेंटीमीटर लांबआकाराची एक काळया दगडातील कोरीव शिळा असून, तिचा शिरोभाग अर्धवर्तुळाकृती असून त्या भागात मंगल कलश कोरला आहे. मंगल कलशावर झाकणी ठेवली असून, कलशाच्यामधील भागात एक फीत बांधली असून तिच्या फुगीर कलशाच्या दोन्ही बाजूस सोडलेल्या आहेत. त्या कलशाच्या खाली चौकट खोदली असून या चौकटीत एक जोडपे दाखविले आहे. उभ्या असलेल्या व्यक्ती पैकी डावीकडील व्यक्तीच्या उजव्या हातात एखादे शस्त्र असून ते त्याने आपल्या खांदयावर पेलले आहे. डाव्या हातात ढाल उसावी. उजवीकडील व्यक्तीने आपले हात जोडले असून ही व्यक्ती बहुदा स्त्री असावी. या चौकटी खाली लेख कोरण्यासाठी सपाट करून मोकळी जागा सोडलेली दिसते. सध्या त्यावर लेख दिसून येत नाही. एकंदर शैलीवरून हे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे. शिवमंदिरा भोवती नांगरलेल्या जागेत लाल खापरांचे अवशेष सापडतात. यात झाकण्यांचा व पाणी पिण्याच्या कपांचा समावेश आहे.

**बारशिव** (18° 29'16" N, 72° 54'13" E )

मुरूडच्या उत्तरेस १६ किलोमीटर अंतरावर अरबी समुद्र किनारी हे गाव आहे. गावात जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिरासमोर सुमारे दीड मीटर उंचीचे नैसर्गिक दगड उभे केले आहेत. या ठिकाणी पुरावशेष काहीही नाहीत.

**काशिद** (18° 26'45” N, 72° 54'16” E )

हनुमान मंदिर नवीन मुरूडच्या वायव्येस १६ किलोमीटर अंतरावर समुद्र किनारी हे गाव आहे. येथे कोणतेही पुरावशेष सापडत नाहीत.

**सर्वे** (18° 25'39” N, 72° 54'56” E )

मुरूडच्या उत्तर दिशेस गावदेवी कर्जाई या स्थानिक गावदेवीचे मंदिर आहे. गाभाऱ्यात सुमारे ६० सेंटीमीटर चार हातांची समभंग अवस्थेतील स्थानक मूर्ती पाहायला मिळते. वरच्या उजव्या हातात डमरू खालच्या उजव्या हातात खड्ग धारण केले आहे. मात्र मंदिरामागे भग्नावस्थेतील एका मूर्तीचे भाग आहेत. त्या शिल्पाचे तळाचा पायांचा भाग शिल्लक असून, त्यावरून मूर्ती स्थानक अवस्थेत असावी हे लक्षात येते, शिवाय पायांच्या बाजूस दोन सेवक दाखविले असून, एक चामर धारीणी असावी. मूर्तीच्या डाव्या हाताचा भाग शिल्लक असून त्यात डमरू दाखविला आहे. एकंदर शिल्पशैलीवरून हे शिल्पावशेष बाराव्या शतकातिल असावेत. ही मूळची मंदिरातील देवता असावी. सर्वे गावाच्या डोंगरात गाय आणि वासरू शिल्प आढळून येते. तसेच गावाबाहेरील टेकडीवर सर्वेश्वर नावाच्या शिवमंदिराचे अवशेष असून आता फक्त शिवलिंग शिल्लक आहे.

**मुरूड** (18° 19'47” N, 72° 58'6” E )

मुरूड गावाचा उल्लेख शिलाहारांच्या अनेक कोरीवलेखांमधून आला असला, तरी येथे शिलाहार कालीन अवशेष अपवादानेच आहेत. मुरूड गावाचा ऐतिहासिक उल्लेख पूर्व मध्ययुगीन काळापासूनच येऊ लागला असे दिसते. नृपती विक्रमादित्य शिलाहाराच्या सन११३९ च्या ताम्रपटात ‘मरुत्क्षेत्र’ म्हणून पहिल्यांदा येतो (मिराशी १९७४ :१५८-१७०). मुरूड जवळील एकदरा गावाजवळ राजपुरी खाडीमध्ये पद्मदुर्ग ही संरक्षक वसाहत मध्ययुगात निर्माण झाली. तटबंदी काही ठिकाणी कोसळली असली काही ठिकाणी उत्तम आहे. मूळ तटबंदीच्या बाहेर पडकोट आहे. शिवाजी महाराजांनी जंजिरा किल्ल्याला शह व राजपुरी खाडीचे संरक्षण करण्यासाठी याची निर्मिती केली. यास कास्याचा किल्ला असेही संबोधतात.

**मजगाव** (18° 22'27” N, 72° 56'23” E )

मुरूडच्या वायव्येस चार किलोमीटर अंतरावर समुद्र किनारी असलेल्या या गावातील काळभैरी मंदिरातील काळभैरी, भवानी देवतांची शिल्पे अठराव्या शतकातील आहेत. या गावाचा उल्लेख

शिलाहार नृपती अपराजिताच्या सन९९३च्या ताम्रपटात मज्जिग्राम असा आला आहे (मिराशी १९७३: २२-२३). सध्या येथे कोणतेही तत्कालीन शिल्पावशेष आढळत नाहीत.

**नांदगाव** (18° 23'14” N, 72° 55'48” E )

मुरूडच्या वायव्येस सात किलोमीटर अंतरावर समुद्र किना-यावरील या गावात सिध्दीविनायकाचे मंदिर आहे. गावातील उल्लेखनीय पुरातत्त्वीय शिल्पावशेष गावाच्या एका मोठया तळयाकाठी आहेत. येथे असलेल्या वड, नार्दुक या झाडीमध्ये प्राचीन मंदिराचे अवशेष आहेत. यात विष्णू मूर्तीचे भग्न धड, मूर्तीच्या प्रभावळीचा भाग, चतुर्हस्ता भग्न स्त्री देवतेचे अवशेष, भग्न शिवलिंग, भग्नास्थेतील अर्धा मातीत गाडला गेलेला नंदी, मूर्तीचे खाच असलेले पीठ, वीरगळ भग्न अवशेष इत्यादि आढळून येतात. त्यांच्या शिल्पशैलीवरून हे अवशेष दहाव्या किंवा अकराव्या शतकातील असावेत. तेजस्वी लाल खापरे व काळया बांगड्यांचे अवशेष तलावाच्या परिसरात आढळतात. नागेश्वर मंदिराजवळ भग्नावस्थेतला गध्देगळ आहे. गद्धेगळ शिल्पाचे तीन तुकडे झाले असून चंद्रसूर्य असलेला एक भाग व गाढव असलेला शिल्लक भाग केवळ यावरून ही गद्धेगळ असल्याचे लक्षात येते. गावातील भवानी पाखाडी येथे एक लेख असलेला गद्धेगळ आहे (छायाचित्र क्रमांक २२). ही गद्धेगळ शिळा विहीर खणत असताना सापडली म्हणतात. गद्धेगळ शिळा आयताकृती असून १.४३ मीटर लांब व ०.६३ मीटर रुंद व ०.१६ मीटर जाड आहे. शिरोभाग चौकोनी व सपाट असून यावर डावीकडे चंद्र व उजवीकडे सूर्य व मध्यभागी मंगलकलश कोरले आहे. यावर एकूण अठ्ठावीस ओळी आहे. हा लेख देवनागरी लिपीत जुन्या मराठीत असून फक्त काही शब्द संस्कृत भाषेत आहे. प्रत्येक ओळीत साधारण २८ ते ३० शब्द आहेत. लेखाच्या शेवटी गद्धेगळ शिल्प दाखविले आहे. या लेखाच्या सुरुवातीस हिजरी सनाचा व शक संवत्सराचा उल्लेख आहे. हा लेख हंबीरराव नायता याचा आहे. या प्रकारचे लेख कोकण किनारपट्टीत आढळलेले आहे. सन १४६७ चा हा लेख आहे.

**मोरेगाव** (18° 21'10” N, 72° 55'20” E )

मुरूडच्या वायव्येस समुद्र किनारी तीन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाबाहेरील गावदेवीच्या देवस्थानाच्या परिसरात काही दगडी मूर्ती शैलीवरून त्या मध्ययुगीन काळातील आहेत. नंदीचे अवशेष आहेत. गावाबाहेरील टेकडीवर शिवकालीन किल्ला असल्याचे लोक सांगतात. परंतु हा भाग बघता आला नाही.

**वेलास्ते** (18° 22'14" N, 72° 58'36" E )

गावातील जीर्णोध्दार झालेल्या शिवमंदिरात गणेश, विष्णू, नंदी आणि खोल गाभा-यातील शिवलिंग, योनीपीठ यांच्या झिजलेल्या प्रतिमा आहेत. शैलीवरून तेराव्या ते पंधराव्या शतकातील वाटतात. मंदिराभोवती शेती मध्ये नांगर करताना लाल रंगाची खापरे सापडतात.

**वावे** (18° 22'39" N, 72° 57'30" E )

गावातील प्राथमिक शाळेशेजारी असलेल्या गावदेव मंदिरात मराठा-पेशवे काळातील दोन हातांची, मराठा पध्दतीचा पायघोळ सदरा घातलेली बापदेव या स्थानिक ग्रामदेवतेची स्थानक प्रतिमा आढळते. मंदिराबाहेरील एका झाडाखाली अनेक दगड गोट्यांमध्ये वीरगळांचे भग्न अवशेष तुकड्यांच्या रूपात आढळून येतात. शेतांमधून नांगरणीच्या वेळेस लाल व करड्या रंगाची खापरे तसेच चकचकीत मुलामा दिलेली खापरे आढळतात.

**आदाड** (18° 23'32" N, 72° 57'0" E )

मुरूडच्या उत्तरेस सात किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाच्या गावदेवी, जरीमाता व अमृतेश्वर या शिवमंदिराच्या परिसरात आदाडचे पुरावशेष आहेत. गावदेवी मंदिर व शिवमंदिरांचा जीर्णोध्दार झाला आहे व येथे आधुनिक काळात नवीन शिल्पे बसविण्यात स्थापन करण्यात आली आहेत. शिवमंदिराच्या मागे एका भग्न वीरगळाचा शेवटच्या टप्प्यातील भाग आहे.

**खारदोडकुले** (18° 22'42" N, 72° 56'4" E )

मुरूडच्या वायव्येस हे गाव मुरूडपासून दोन किलोमीटर अंतरावरआहे. या गावाचा उल्लेख खोकरी येथील मठाच्या सतराव्या शतकातील शिलालेखात आला आहे. या लेखात गावाचा उल्लेख 'दोडाकल' असा आला आहे. रायगड गॅझेटिअर मध्ये या गावाची ओळख पटविलेली नाही (रायगड गॅझेटिअर १९९३: ७२९). परंतु आजचे खारदोडकुले हे गावच तेथे अभिप्रेत असावे. गावात कोणतेही महत्त्वाचे पुरावशेष आढळले नाहीत.

**मणेरपाडा** (18° 24'24" N, 72° 57'1" E )

मुरूडच्या उत्तरेस सात किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील गावदेवी मंदिरात एक नैसर्गिक शिळा पुजली जाते. या मंदिराच्या दक्षिणेस शेतात एका झाडाखाली गजलक्ष्मीची

अत्यंत झीज झालेली भग्नावस्थेतील मूर्ती आहे. डावीकडील हत्तीचा एक भाग व लक्ष्मीच्या हातातील कमळ शिल्लक आहे. गावातील ईशान्य दिशेस जंगल भागात गायरान असून येथे गायवासरू कोरलेला दगड असल्याचे सांगतात. सदर शिळा पाहता आली नाही. धोपाटे आणि मोकाशी (२०१३) यांनी प्रसिद्ध केलेल्या पण त्यांनी ओळख न पटवलेल्या कल्याण ताम्रपटात उल्लेखलेले मणेरग्राम म्हणजेच हे मणेर पाडा होय.

**खोकरी** (18° 18'6” N, 72° 58'52” E )

जंजीरा किल्ल्यासमोरील जमिनी राजापुराच्या पूर्व दिशेस असलेल्या खारशेत या ओसाड गावाजवळ पूर्वी खोकरी हे गाव होते ते सध्या अस्तित्वात नाही. येथे मोठया दगडातील इंडो-सारसेनिक पध्दतीची दर्गा आहे. त्यात सिद्दी सरदारांची थडगी आहेत. याकुतखानाच्या कबरीवर अरेबिक लिपीत शिलालेख असून खैरियतखानाच्या कबरीवरील शिलालेखात मृत्यु हिजरी ११०८ म्हणजे सन १६९६ असा उल्लेख आहे. सिरूरखानाच्या कबरीच्या देखरेखील सावली गावाच्या महसुलातून सालिना २000 रू. आणि याकुतखान आणि खैरियतखान यांच्या कबरीच्या दोडाकल गावाच्या महसुलातून सालिना काही रकमेची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक गुरूवारी रात्री कबरींजवळ नमाज पडतात व त्यांच्या मृत्युदिनी उरूस भरवितात (रायगड गॅझेटिअर १९९३: ७२९).

**सुपेगाव** (18° 25'34” N, 72° 57'2” E )

मुरूडच्या उत्तरेस ११ किलोमीटर अंतरावर मुरूड-रोहा रस्त्यावर फणसाड या अभयारण्यात समुद्रसपाटीपासून २०१ मीटर उंचीवर सुपेगाव आहे. गावाच्या खलाटी भागात गावदेवी भैरीचे मंदिर आहे. या भागात काळकाईची रहाटी असेही बोलतात. हे स्थान देवीसाठी राखून ठेवलेल्या जंगलात आहे. सध्या या ठिकाणी मराठा काळाचा प्रभाव असलेली चार हातांची एक स्थानक प्रतिमा आढळते. प्रमाणबध्द व वाहनविवेक न पाळलेली ही प्रतिमा आहे. या स्थानांच्या पश्चिम दिशेला एका अगदी साध्या मंदिरात सुमारे २०० मीटरवर आयताकृती शिळेवर झीज व भंग झालेली वीरगळ शिल्पे आहेत. दोन्ही शिल्पांवर एकटया वीराचे शिल्प कोरले आहे. याच ठिकाणी फक्त ढोपरापासून पावलापर्यंत शिल्लक असलेले भग्न शिल्पही पहायला मिळते. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बारावे ते चौदावे शतकाचा कालखंडातील असावीत. हे गाव आणि या गावातील काळकाई देवीची राहाटी म्हणजे धोपाटे आणि मोकाशी (२०१३)

यांनी प्रसिद्ध केलेल्या ताम्रपटातील परंतु ओळखलेले देईक क्षेत्र म्हणजे देवीसाठी राखून ठेवलेले जंगल असावे.

**उसरोली** (18° 23'4” N, 72° 56'29” E )

उसरोली गाव मरूडच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावर असून हनुमानाचे अलिकडच्या काळात जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. या ठिकाणी सध्यातरी कोणतेही पुरातत्त्वीय अवशेष आढळले नाहीत.

**वालवटी** (18° 22'50” N, 72° 56'56” E )

मुरूडच्या उत्तरेस असलेल्या वालवटी गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. गावात हनुमान व प्रभुरामचंद्राचे मंदिर नुकतेच उभारण्यात आले आहे.

**वावडुंगी** (18° 20'50” N, 72° 59'16” E )

मुरूडच्या ईशान्येस चार किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात आधुनिक काळात उभारलेले शिवमंदिर आहे. गावातून वहाणा-या 'वावडुंगी' नावाच्या नदीच्या पश्चिम काठावर जुन्या शिवमंदिर व गावदेवी मंदिरांच्या परिसरात गावातील पुरावशेष आहेत. बापदेव मंदिराजवळ शेंदूर लावलेली काही शिल्पे आहेत. यात आयताकृती व शीर्षाकडे अर्धवर्तुळाकृती जागेत चंद्र-सूर्य असलेली एक शिळा आहे. यावर कोणतेही अलंकरण नाही, परंतु ही शिळा शिलालेखासाठी कोरलेली असावी. दुसरे शिल्प वीरगळाचे आहे, यावर हातात खड्ग धारण करून हल्ला करण्याच्या पवित्र्यातील वीर दिसतो. या मंदिरामागे पाच ते सहा लहानमोठी शिल्पे आहेत. ही सुमारे ६० सेंटीमीटर उंच व शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असलेली शिल्पे आहेत. विशेष उल्लेखनीय शिल्पे शिवमंदिराजवळ आहेत. या ठिकाणी शुष्कसांधी बांधीव मंदिराच्या शिळा पडल्या आहेत. मंदिरामागे व समोर सतीशिळा व वीरगळ आहेत. सतीशिळा ६५ सेंटीमीटर लांब व ३५ सेंटीमीटर रूंद आकाराच्या आहेत. यात एका बाजूस स्तंभातुन प्रगटलेला हात व हाताखाली दोन व्यक्तीसोबत घोडयावर बसलेली स्त्री दिसते. एका चौकोनी शिळेवर खाचेत बसविलेला वीरगळ आहे. वीरगळांमध्ये चौकोनी खांब प्रकारचे दोन वीरगळ आहेत, यांपैकी एक जमिनीत पूर्णपणे गाडला गेला असून, त्याचा फक्त वरचा एक टप्पा दिसतो. याचा शीर्षभागी कलश आहे. दुसरा खांब प्रकाराचा वीरगळ सुस्थीतीत असून तो तीन टप्प्यात आहे. यावर नेहमीची दृश्ये आहेत. या शिवाय दोन आयताकृती शिळांवर एकाच बाजूस तीन टप्पे कोरले वीरगळ आहेत. एका भग्न वीरगळाचा तुकडा आहे. शीर्षभाग

मंगलकलशयुक्त व अर्धवर्तुळाकृती आहे. याशिवाय मुखभग्न झालेला नंदी, एक योनीपीठ, चार हातांची शिर व गुढघ्यापासून पाय भग्न झालेली स्त्री मूर्ती ही उल्लेखनीय शिल्पे आहेत. यांच्या शिल्पशैलीवरून ही शिल्पे बारावे ते चौदावे शतकांचा कालखंडातील असावीत.

**शिघ्रे** (18° 20'2” N, 72° 59'31” E )

मुरूडच्या पूर्वेस दोनकिलोमीटर अंतरावर मुरूड तांबडीमार्गे रोहा रस्त्यावरील गावात बापदेवाचे मंदिर आहे. येथे लंबगोल पाषाणांना चुना व शेंदूर लावला आहे. तांदळयाची पूजा केली जाते. गावातील टेकडीच्या भागात फणशीचे पाणी म्हणून जागा दाखविली जाते. येथे अज्ञातवासातील काळात पांडव आले होते, त्यांच्या बैठकीच्या जागा कातळात आहेत, असे म्हणतात.

**नागशेत** (18° 19'54” N, 73° 0'35” E )

नागशेत हे गाव एका नैसर्गिक ओढयाजवळ आहे. गावात नुकतेच उभारलेले हनुमान मंदिर आहे. गावात कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत.

**वाणदे** (18° 19'52” N, 72° 59'18” E )

वाणदे गावात नुकतेच उभारलेले गणेश मंदिर आहे. गावदेव म्हणून बापदेवाची पूजा होते. दगडावर शेंदूर लावला आहे.

**महालोर** (18° 21'1” N, 73° 0'57” E )

मुरूडच्या ईशान्येससात किलोमीटर अंतरावर टेकडीच्या प्रदेशात हे गाव आहे. गावाच्या आग्नेय बाजूस नैसर्गिक पाण्याचे झरे आहे. गावदेव श्री. धावीर व बापदेव या स्थानिक दैवताच्या मंदिर परिसरात या ठिकाणचे पुरावशेष आढळतात. एका पिंपळाच्या वृक्षाच्या बुंध्याजवळ एक सतीशिळा व एक भग्न आयताकृती वीरगळाचा शीर्षभाग आढळतो, यात शिवपूजा करणा-या वीराऐवजी दोन व्यक्ती दिसतात. तसेच वाघावर स्वार देवतेचे भग्न शिल्प आढळते. गावदेव मंदिरात घोडयांवर स्वार चार हातांच्या पुरुष देवतेची झीज झालेले शिल्प आहे, पण कालखंड ठरविण्याच्या दृष्टीने उपयोगी नाही. उल्लेखनीय शिल्पांमध्ये दोन स्थानक शिल्पे आहेत. एका शीर्षभाग भग्न असलेल्या गायवासरू शिल्पाचा समावेश करता येईल. हे शिल्प ३० सेंटीमीटर लांब व २०.६ सेंटीमीटर रूंद आहे (छायाचित्र क्रमांक २३). या शिवाय एका ठिकाणी अत्यंत झीज व भग्न झालेल्या शिल्पांचा ढिग रचून ठेवला आहे.

एकंदर शिल्पवैशिष्टयांचा विचार करता ही शिल्पे अकराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतची असावीत.

**बेलसई** (18° 20'5" N, 73° 0'2" E )

बेलसई हे गाव मुरूडच्या ईशान्येस नागशेत गावाचा एक भाग आहे. या ठिकाणी एका ओढयाच्या काठी गावदेवीचे स्थान असून उल्लेखनीय पुरावशेष येथे आढळतात. एका साध्या बांधकामासाठी उभारलेल्या निवा-यात काही शिल्पे ठेवलेली आढळतात. यात ६५ सेंटीमीटर लांब व ४२ सेंटीमीटर लांब व रूंदशिळेवर गजलक्ष्मीचे शिल्प कोरलेले आढळते. यात आपल्या चारही पायांवर उभे राहून लक्ष्मीला अभिषेक करणारे दोन हत्ती व पद्मासनात बसलेली देवी दिसते. शिल्प भग्न व झीज झालेले आहे. या ठिकाणी महिषासुरमर्दिनी, गजलक्ष्मी, गणेश प्रतिमा व प्रभावळ आढळते. महिषासुरमर्दिनीचे शिल्प १ मीटर लांब व ६२ सेंटीमीटर रूंद शिळेवर, चार हातांचे व स्थानक शिल्प आहे. देवीने डावा पाय महिषावर ठेवलेला आहे. हातात कटयार, खड्ग, गदा व त्रिशुळ धारण केलेल्या देवतेचे शिल्प शिल्पशैलीवरून मराठा काळातील असावे. या शिल्पामागे एक सुंदर कलात्मक प्रभावळ आहे. तिच्या दोन्ही बाजूस दोन स्तंभाच्या प्रतिकृतीत उभ्या चौकटच्या आकाराची फुले आहेत. आतल्या बाजूस पुन्हा मकरांच्या कमानी आहेत. गणेश शिल्प ही मराठा काळाचा प्रभाव दाखविणारे आहे.प्रभावळ शिल्प, गजलक्ष्मी व गणेश ही शिल्पे त्यांच्या शिल्पशैलीवरून अकराव्या अथवा बाराव्या शतकातील असावीत (छायाचित्र क्रमांक २४). मंदिरामागे भग्न चौकोनी आकाराचे योनीपीठ तसेच काही शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारायच्या शिळा पडल्या आहेत. या ठिकाणी प्राचीन काळात एखादे सुंदर मंदिर असावे.

**सावली** (18° 16'18" N, 73° 2'16" E )

मुरूडच्या आग्नेय दिशेस ११ किलोमीटर अंतरावर समुद्र किनारी हे सामान्य गाव आहे. गावात नुकतेच हनुमानाचे मंदिर मूळच्या गावदेवी मंदिराजवळ उभारले आहे. याठिकाणी जाकमाता या स्थानिक देवतेचे एका वन्य वृक्षाच्या बुंध्यात स्थान आहे. दोन हातांच्या स्थानक पण भग्न स्त्री प्रतिमा आहेत. घाग-यासारखे वस्त्र नेसलेली प्रतिमा शेंदूर लेपित आहे. या देवतेने आपले दोन्ही हात कोप-यातून वर उचलेले आहेत. अत्यंत झीज झालेली दुसरी प्रतिमा आहे. या ठिकाणी उल्लेखनीय असे आधुनिक काळातील शिल्प म्हणजे एका कमानी असलेल्या शिल्पाच्या दोन बाजूस बाजूस दोन हातांची दोन पुरुष शिल्पे आहेत. यात

एका पुरुषाने हातात फक्त बाण व दुसरा हात कमरेवर तर दुस-याने उजव्या हातात नांगर धारण केला आहे. ही प्रतिमा आधुनिक काळातील असली तरी येथे अशा प्रकारची शिल्पे होती व ही त्यांचीच प्रतिकृती आहे असे स्थानिकांचे म्हणणे आहे. हातात नांगर धरलेले शिल्प बलरामाचे असावे. मूळ गाव समुद्रात बुडाले असल्याचेही सांगतात.

**उसडी चाफेगाव** (18° 16'43" N, 73° 1'37" E )

मुरूडच्या आग्नेयेस नऊ किलोमीटर अंतरावर चाफेगाव मध्ये आधुनिक काळातील गणेश मंदिराची उभारणी केली आहे. गावाच्या गावदेवाचे स्थान गावाबाहेर उघडयावर आहे. काळभैरी म्हणून ओळखले जाते. घोडयावर स्वार झालेल्या दोन व्यक्तीची प्रतिमा येथे आहे. हे बहुधा खंडोबा व म्हाळसाची प्रतिकृती असावी. या शिल्पावर मराठा काळाचा प्रभाव जाणवतो. मात्र झीज झालेले हे शिल्प आधुनिक काळात घडविले असावे.

**राजपुरी** (18° 18'2" N, 72° 58'16" E )

मुरूडच्या दक्षिणेस राजपुरी हे गाव आहे. राजपुरी परिसरात शिलाहारांचे अनेक ताम्रपट सापडले असल्याने, यालाच अनेक अभ्यासकांनी शिलाहारांची पुरी असे संबोधले आहे. परंतु राजपुरी येथे कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. चौदाव्या शतकात घारापुरी हे एक परगण्याचे ठिकाण होते. राजपुरीचा उल्लेख पंधराव्या शतकापासून येतो. राजपुरी जवळ बेटावर मध्ययुगीन काळात प्रसिद्ध असलेल्या जंजिरा किल्ला या संरक्षक वसाहतीची स्थापना कदाचित पूर्व मध्ययुगीन काळात झाली असावी. किल्ल्यावर कोळीवाडा म्हणून असलेल्या स्थानी काही शिलाहारकालीन शिल्पावशेष होते, परंतु सध्या त्या काळातील कोणतेही पुरावशेष येथे आढळत नाहीत. सध्या शिल्लक अवशेष मात्र पंधराव्या ते अठराव्या शतकातील आहेत. बहामनी कारकिर्दीत मलिक अहमदने सन १४८२ च्या दरम्यान हा किल्ला घेतल्याचा दावा केला जातो. सन १४९० नंतर निजामशहाने हा किल्ला ताब्यात घेतला. किल्ल्याची तटबंदी फहीमखान या निजामशहाचा सरदारने केल्याचा फारशी शिलालेख गडावर आहे. नंतर हा किल्ला मुघलांनी तर त्या नंतर आदिलशहाकडे गेला. येथून पुढे सिद्दी हे कायमचा या किल्ल्याचे सरदार राहिले (रायगड गॅझेटिअर १९९३: ७७२-७८१). तीन दर्गे, पाच मशिदी, बालेकिल्ला, कमळ पाकळ्यांच्या आकाराची तटबंदी, अनेक इमारती, तलाव अशा अनेक वास्तू या किल्ल्यावर झाल्या. खोल समुद्रातील एक संरक्षक वसाहत म्हणून जंजिरा प्रत्येक राजवटीत विकसित होत गेली. या बेटावर विसाव्या शतकापर्यंत लोक राहत होते. स्वातंत्र्योत्तर

काळात जंजिरा संस्थान भारत सरकारात विलीन झाल्यावर या बेटावरची वस्ती कमी होवून ती किनारपट्टीकडे स्थलांतरित झाली. मुरूड गावात इमारतीचे पायांचे खड्डे घेताना पूर्व मध्ययुगीन अथवा पूर्व मध्ययुगीन ते मध्ययुगीन काळातील खापरे सापडतात. यात मध्ययुगीन काळातील काचेचा लेप दिलेल्या खापरांचे प्रमाण जास्त आहे. सामराजगड व पद्मदुर्ग या दोन संरक्षक वसाहती एकदरा गावाजवळ मध्ययुगात निर्माण झाल्या. पद्मदुर्ग ही वसाहत जंजिरा या संरक्षक वसाहती इतकीच प्रभावी सागरी संरक्षक वसाहत होती. हे या ठिकाणी असलेल्या पुरातत्त्वीय अवशेषांवरून सिद्ध होते.

## ३.२ रोहा **तालुक्याचा सर्वेक्षण वृत्तांत (**नकाशा क्रमांक २)

**रोहा** (18° 26'11” N, 73° 7'17” E )

रोहा हे तालुक्याचे ठिकाण असून ते कुंडलिका नदीच्या दक्षिण बाजूस वसले आहे. पूर्वी मात्र रोह्यापासून जवळ असलेल्या नदीच्या उत्तर तीरावरील अष्टमी या ठिकाणाला प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले होते. आज रोह्यामध्ये धावीर हे देवस्थान असून या देवतेची स्थापना सन १८४९ मध्ये झाली. या देवतेस ब्रिटीश राजवटीपासून पोलीस मानवंदना देण्याची प्रथा आहे. हे देवस्थान वराठी या मूळ ठिकाणचे असल्याचेही सांगण्यात येते. या ठिकाणी कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळून आले नाहीत.

**अष्टमी** (18° 26'11” N, 73° 7'17” E )

रोह्याच्या उत्तरेकडे एक किलोमीटर अंतरावर कुंडलिका नदीच्या उत्तर तीरावर अष्टमी हे ऐतिहासिक गाव आहे. गावात संपूर्ण भागात सातत्याने वसाहत झाली असल्यामुळे या ठिकाणचे प्राचीन अवशेष फार संख्येने आढळत नाहीत. नदीकाठावर हाटकेश्वराचे हेमाडपंती मंदिर होते, असे स्थानिक सांगतात. आज प्राचीन शिवमंदिराचे कोणतेही अवशेष येथे आढळत नाहीत. या ठिकाणी आता आधुनिक काळात उभारलेले कौलारू मंदिर व बापुजीवाचे स्थान आहे. मंदिरासमोर मराठा काळाच्या उतरत्या काळातील कदाचित अठराव्या शतकातील सुरूच्या खांबाच्या आकाराचा दीपवत म्हणजे दीपस्तंभ आहे. या शिवमंदिरशेजारी एका घुमटीत एक फणा असलेल्या नागांची दोन सुटी शिल्पे आहेत. या गावाचा उल्लेख मराठा काळात आलेला दिसतो.सतराव्याशतकात रायगड किल्ल्याकडे जाणारा अष्टमी, पानोसे, निजामपूर, घरोशी आणि पाचाड असा मार्ग होता. सन १६७४ मध्ये रायगडावर झालेल्या

राज्याभिषेकाला उपस्थित असलेला गागाभट हा पुरोहित अष्टमीचा अंतर्गत बंदर म्हणून उल्लेख करतो (रायगड गॅझेटिअर १९९३: ८६२).

**वराठी** (18° 21'38” N, 73° 6'34” E )

रोह्याच्या नैऋत्येस ३ किलोमीटर अंतरावरील हे सामान्य गाव आहे. रोहा येथील धावीरदेव हे स्थान या गावातील असल्याचे मानले जाते. कोणतेही पुरावशेष या गावात आढळून आले नाहीत.

**तारेघर** (18° 26'38” N, 73° 6'11” E )

रोहयाच्या पश्चिमेकडे तीन किलोमीटर अंतरावरील गावात तारामती देवीच्या मंदिरात तारादेवी या घोडयावर स्वार स्त्री देवतेचे शिल्प आहे. शैलीवरून हे शिल्प अठराव्या शतकातील वाटते.

**अवचितगड** (18° 28'39” N, 73° 7'5” E )

रोहा व नागोठणे यांमधील डोंगररांगेतील एका टेकडीवर, रोह्याच्या उत्तरेला सुमारे चार किलोमीटरअंतरावर हा गड आहे. अहमदनगरच्या निजामशाहीत अवचितगडावर सुभ्याचे मुख्यालय होते. हा गड शिलाहारांनी बांधला असावा. मात्र बाहय जंगीवरून हा किल्ला मुळात निजामशाहीत बांधला असावा (रायगड गॅझेटिअर १९९३: ६७२). कुंडलिका नदीच्या किनारी निडी व अवचितगडाच्या पायथ्याशी आहे. अवचित म्हणजे अगदी सहजच मिळालेला किल्ला. मराठ्यांच्या ताब्यात काही काळ किल्ला होता. गावात जाताना बाहेर एक काळ बहिरी–जोगेश्वरी या स्थानिक गावदेवीचे मंदिर लागते, ह्या मंदिरात काळबहिरी आणि जोगेश्वरीदेवीच्या शैलीवरून या मूर्ती मध्ययुगीन काळातील असाव्यात. किल्ल्यावर आता उध्वस्त अवशेष आहेत. सन १८१८ साली इंग्रजांनी हा किल्ला ताब्यात घेतला. गावाकडून किल्ल्यावर जाण्याच्या मार्गावर आयताकृती शिळेवर, एकच बाजू कोरलेले नऊ वीरगळ पाहायला मिळतात. शैलीवरून हे बाराव्या शतकातील असावेत. किल्ल्यामध्ये आठ पाण्याच्या टाक्या आणि एकद्वादशकोनी विहीर आहे. गडावर मध्ययुगातील दोनदेवनागरी शिलालेख आहेत.

**वरसे** (18° 26'9” N, 73° 7'55” E )

रोहयाच्या पूर्वेकडे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या वरसे गावातील काळभैरव मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. भग्नावशेष विसर्जन करण्यात आले असून, कोणतेही पुरावशेष या गावात आढळून आले नाहीत.

**तळाघर** (18° 26'8" N, 73° 7'05" E )

रोहयाच्या आग्नेयेस चार किलोमीटर अंतरावर तळाघर येथील पुरावशेष गावातील जीर्णोध्दार झालेल्या शिवमंदिर परिसरात आढळून येतात. शिवमंदिरातील शिवलिंग वैशिष्ट्यपूर्ण आहे. एका बाजूस चौकोनी व एका बाजूस पाण्याचा निचरा होण्यासाठी पन्हळ कोरलेले दोन भागात बनलेले योनीपीठ आहे. आतील भागात गोलाकार व पन्हळयुक्त दुसरे योनीपीठ आहे. गोल भागात खोल खाच असून त्यावर चार दिशेस चार लिंग प्रतिकांचे उंचवटे व मध्ये पंचकोनी आकाराचा भाग असून त्याला खाच आहे. या खाचेवर सुटे लिंग ठेवले जाते. या परिसरात हनुमानाचे मंदिरात शेंदूर लावलेली चपेटमुद्रेतील प्रतिमा व गणेश प्रतिमा आहे. दोन्ही मूर्ती शैलीवरून मराठा काळातील असाव्यात. शेजारील भग्नावस्थेतील शिवलिंग व दगडी स्तंभाचे भाग आहेत. या स्तंभावर लामण दिव्यासारखी आकुती आहे. ही शिल्पे पंधराव्या व सोळाव्या शतकातील वाटतात. निळया रंगाच्या व बहुरंगी चकतीच्या आकाराच्या बांगडयांचे तुकडे या परिसरात आढळले.

**भुवनेश्वर** (18° 25'45" N, 73° 7'37" E )

रोहयाच्या दक्षिणेस जेमतेम एक किलोमीटरअंतरावर भुवनेश्वर गावाच्या पूर्वेस शिवमंदिर आहे. या शिवमंदिर कौलारू असून त्याची उभारणी जुन्या जोत्यावर झालेली आहे. गर्भगृह खोल असून वर्तुळाकार भागात आरपार खाच असलेले योनीपीठ व त्यात सुटे लिंग आहे. मंदिरात विष्णू व गणेशाची झीज झालेली दोन सुटी शिल्पे आहेत. मंदिरासमोरील दीपवत स्तंभाला (दीपवत स्तंभ म्हणजे दिवा ठेवण्याच्या खांब. या स्तंभावर पोकळ भोपळयात तेल घालून वात लावून तो दिवा रात्रभर पेटता ठेवतात) लागून ५० सेंटीमीटर उंच एक आयताकृती व एकाच टप्प्यात कोरलेले वीरगळ आहे. वीरगळाचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती आहे. याशेजारी दुसरे भग्न शिल्प आहे. यात डावीकडे स्त्री व उजवीकडे हातात शस्त्र घेतलेला पुरूष यांची जोडी असलेले शिल्प आहे. या शिल्पाची धाटणी वेगळी आहे. शेताच्या बांधात अर्धे गाडलेल्या अवस्थेत नंदी शिल्प आहे. ही सर्व शिल्पे शैलीवरून बाराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंत असावीत.

**बोरघर** (18° 25'45" N, 73° 7'37" E )

रोहयाच्या वायव्येस पाच किलोमीटर अंतरावर बोरघर या गावातील काळभैरव मंदिराचा जीर्णोध्दार झाला असून मंदिरातील भग्न मूर्तीचे विसर्जन, तर काहींना वज्रलेप करण्यात आला आहे. मंदिरासमोर मराठा काळातील समाध्या आहेत.

**लांढर** (18° 23'57" N, 73° 8'43" E )

लांढर हे गाव रोहयाच्या आग्नेयेस सहा किलोमीटर अंतरावर कारीवणे गावाकडून येणाऱ्या एका ओढयाच्या काठावर वसले आहे. गावातील शिवमंदिराचा नुकताच जीर्णोध्दार झाला असून या मंदिराच्या जीर्णोध्दाराच्या वेळी अनेक प्राचीन मूर्ती-शिल्पे आढळली आहेत. यापूर्वीही गावातील परिसरात अनेक मूर्तीचे अवशेष आढळले होते. यातील काही शिल्पे महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालय रत्नागिरी येथे प्रदर्शित केले आहेत. यातील सूर्यमूर्ती विशेष उल्लेखनीय आहे.

सध्या गावातील शिवमंदिराजवळील चौथऱ्यावर वैशिष्ट्यपूर्ण शिल्पे ठेवली आहेत. यात डोक्यावर केसांचा मोठा आंबाडा बांधलेल्या चामरधारीणीचे सुंदर, रेखीव शिल्प आहे. नाक व चेहऱ्याचे इतर तपशील झिजले असले तरी चेहरा मोहक आहे. अर्ध पद्मासनातील पुरुष शिल्प उल्लेखनीय आहे. त्याच्या गळयात जानवे असून डोक्यावर केसांच्या जटा दिसतात. कानात कर्णफुले, गळयात एक हार व मनगटात आभूषणे आहेत. ही प्रतिमा तप करणाऱ्या राजपुरूषाची प्रतिमा असावी. दुसऱ्या शिळेवर डाव्या हातात दोन फण्यांचा नाग वा अशाच प्रकारची वस्तू धारण करणाऱ्या पुरुषाची स्थानक प्रतिमा आहे. एका भग्न स्त्रीशिल्पाची झीज झालेली असली तरी या स्त्रीने केलेली केशरचनेचे आणि वेरूळ येथील स्त्रीशिल्पातील केशरचनेत साम्य आहे. दंडात व कानात आभूषणे आहेत. या शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे दहाव्या शतकातील वाटतात. यासोबत शुष्कसांधी बांधीव पध्दतीने उभारल्या जाणाऱ्याकोरीव दगडीशिळा येथे पडलेल्या आहे. याशिवाय गावातील तलावाशेजारी असेलेल्या भवानी मंदिरासमोर शंखावटी कोरलेला शिलाखंड व चामरधारीणीचे एक शिल्प व दुसरी दोन भग्न शिल्पे पडली आहेत. चौथऱ्यावर एका बाजूस सुमारे एक मीटर उंच असलेल्या शिलाखंडावर चामरधारणीचे सुस्थीतीतील शिल्प आहे. काही शिल्पे जमिनीत गाडलेली आहेत तर काही शिल्पे गावकऱ्यानी हरिहरेश्वर येथे जीर्णोध्दाराच्या वेळेस समुद्रात विसर्जन केली आहेत. भवानी मंदिरात चार हातांच्या महिषासुरमर्दिनी प्रकारचे शिल्प आहे. शैलीवरून हे शिल्प

मराठा काळातील आहे. या शिवाय गावातील जंगलभागात दगडी मोठी चुना भरडायाची दोन जाती पडली आहेत. शिवाची स्थानक स्थितीतील व दोन हातांची प्रतिमा, वैशिष्टपूर्ण शैलीतील आहे. गावाच्या परिसरात पावसाळ्यात ओढ्यातून वाहून आलेली आद्य ऐतिहासिक काळातील जड पोताची लाल, काळया रंगाची खापरे आढळतात. गावकऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे या गावाचे पूर्वीचे नाव शांतापूरनगर होते.

**धाटाव** (18° 23'67" N, 73° 8'33" E )

या शिवाय मंदिराबाहेर भग्नावस्थेतील महिषासुरमर्दिनीचे मुखभग्न झालेले शिल्प आहे. शैलीवरून हे शिल्प चौदाव्या शतकातील वाटते. गावातील शेतात शिवमंदिर आहे. हे मंदिर जुन्या मंदिराच्या अधिष्ठानावर उभारले गेले आहे. अर्धा जमिनीत गाडला गेलेल्या चौथऱ्याचा बाहय भाग अलंकृत आहे. खुर, अंतरपत्र व अर्धपाकळया कोरलेला असा आहे. या प्रकारची रचना माणगाव, म्हसळा (भापट) या ठिकाणीही आढळून आली आहे. मंदिराबाहेर भग्न नंदी शिल्प व गर्भगृह खोल आहे. मंदिर परिसरात लाल, काळी खापरेव लाल रंगातील एक सेंटीमीटर रुंद व दहा ते १५ सेमी लांब आकाराच्या पसरट कौलाचे तुकडे आढळतात. हे बाराव्या व तेराव्या शतकातील अवशेष असावेत. वरसोलीवाडीच्या ग्रामदेवता मंदिर परिसरात मराठा काळानंतरचे शिल्पावशेष आहेत.

**किल्ला** (18° 21'57" N, 73° 9'43" E )

किल्ला हे गाव रोह्यापासून आग्नेय दिशेस ११ किलोमीटर अंतरावर आहे. गावाबाहेरील जुन्या स्मशानभूमीत काही पुरावशेष आढळतात. येथील वाकेश्वर या शिवमंदिरात गर्भगृह खोल आहे. मंदिरात नंदीशिल्प पीठावर ठेवले आहे. चपेट मुद्रेतील मारूती, गाभाऱ्यातील पार्वतीची स्थानक प्रतिमा व दगडी बांधणीचे पिरॅमीड आकाराचे पाच थराचे कळस असलेले गर्भगृह यांच्या स्थापत्यशैलीवरून ही शिल्पे व वास्तू मराठा काळातील आहेत. मंदिराबाहेर भग्न व झीज झालेल्या ओळखू न येणाऱ्या अनेक छोटया मूर्ती आहेत. आसनस्थ व नमस्कार मुद्रेतील पुरुष प्रतिमा, एक भग्न वीरगळ व आयताकृती शिळेवर कोरलेली सतीशिळा आहे. सतीशिळा व वीरगळ यांच्या शिल्पशैलीवरून ही शिल्पे तेराव्या शतकातील असावीत. स्मशानात मराठा काळातील समाध्या आहेत.

**वाशि** (18° 24'45" N, 73° 8'16" E )

वाशि हे गाव साधे असून गावातील पुरावशेष ग्रामदेवतेच्या व शिवमंदिराच्या परिसरात आढळून येतात. ग्रामदेवतेच्या साध्या कौलारू मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारची चार हातांची स्थानक प्रतिमा असून शिल्पशैलीनुसार ही मूर्ती मराठा कालखंडाच्या शेवटच्या काळातील असावी.

**कारिवणे** (18° 12'53" N, 73° 8'01" E )

रोहा शहराच्या पूर्वेस असलेल्या लांढर गावाच्या दक्षिण बाजूस कारिवणे गाव डोंगराळ भागात असून, गावच्या ओढयाजवळील भागात एक चौकोनी शिळा झाडाच्या बुंध्यात एका सिमेंट मध्ये बसविली असून त्यावर मुख भग्न झालेल्या चार हातांची स्थानक मूर्ती आहे. परंतु झीज झाल्याने व अर्धाभाग झाकला गेल्याने तिची मूर्तीशास्त्रीय ओळख पटवता येत नाही. याच ठिकाणी एक गायवासरू शिल्प देखील आढळून आले आहे. या शिल्पाला बहुळागाय असे म्हणतात. शैलीवरून दोन्ही झीज झालेले शिल्पे अकराव्या अथवा बाराव्या शतकातील असावीत.

**वाली** (18° 12'43" N, 73° 6'19" E )

रोहयाच्या दक्षिणेस नऊ किलोमीटर अंतरावर मूळगाव येथे गावात सोमजाई या गावदेवीचे मंदिर आहे. ही सोमजाई हार्डी या गावातील सोमजाईची धाकटी बहीणी मानली जाते. या ठिकाणी सासाईदेवी, धाकसुददेव या स्थानिक देवतांची झीज झालेली शिल्पे तसेच लिंग व योनीपीठ पाहायला मिळते. शिल्पशैली वरून हे योनीपीठ चौदाव्या शतकातील असावी तर इतर शिल्पेमागील शतकातील असावीत. या गावाजवळच लोकवस्ती नसलेले शिपोखोल हे जुने गावठाण होते आता येथे पांडवकालीन भैरीचे स्थान असल्याचे लोक सांगतात.

**बारशेत** (18° 32'43" N, 73° 8'11" E )

रोहयाच्या नैऋत्येस १२ किलोमीटरअंतरावर बारशेत गाव आहे. गावातील काळभैरव मंदिरात अठराव्याशतकातील शिल्प आहे. येथे कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळून आले नाहीत.

**घोसाळे** (18° 21'51" N, 73° 5'26" E )

घोसाळे हे गाव रोह्याच्या दक्षिणेला आहे. हे गाव येथे असलेल्या मध्ययुगीन किल्ल्यासाठी प्रसिद्ध आहे. गावात एक मोठे तळे आहे. याच्या काठावर गावदेव व शिवमंदिर आहे. शिवमंदिर मूळ चौथऱ्यावर उभारले गेल्याचे दिसते. मूळ जोत्याची रचना माणगाव व अभ्यास क्षेत्रात आढळून आलेल्या अशाच प्रकारच्या चौथऱ्याप्रमाणे आहे. शिव मंदिराच्या बाहेर आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले तीन वीरगळ आहेत. ते एकाच तसेच तीन टप्यात आहेत. त्यांच्या शैलीवरून बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत. गावातील काळभैरवाच्या मंदिरात भैरवाचे एक उल्लेखनीय शिल्प आहे. अत्यंत झीज झाली असली तरी दोन स्तंभांमध्ये उभी असलेली त्रिभंग अवस्थेतील ही मूर्ती तिच्या शिल्पशैलीवरून अकराव्या शतकातील असावी. घोसाळगड हा उंचीने कमी आहे. राजपुरी खाडीवर लक्ष ठेवणे व परिसराचे संरक्षण करणे यातून या किल्ल्याची निर्मिती झाली असावी. गडावरील शिलाहार शैलीचा घटकक्रम असलेल्या कातळात कोरीव टाक्या व काही कातळात कोरलेल्या गुहा यांवरून या किल्ल्याची निर्मितीएक संरक्षक वसाहत म्हणून उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात झाली असावी (छायाचित्र क्रमांक ३). गावाच्या परिसरात पावसाळ्याच्या दिवसात वाहून आलेली आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील खापरे आढळतात.

**भालगाव** (18° 19'3" N, 73° 3'7" E )

रोह्याच्या दक्षिणेस राजपुरी खाडीजवळ हे गाव आहे. गावाच्या शाळेजवळ धावीरदेव या गावदेवाचे स्थान आहे. या परिसरात पावसाळ्यात बहुरंगी चकतीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडे आढळतात. त्यांच्या शैलीवरून हे अवशेष पंधराव्या शतकातील असावेत.

**खाजणी** (18° 18'28" N, 73° 3'49" E )

हे ठिकाण भालगावचाच एक भाग असून येथे काळकाई देवीचे स्थान आहे. मंदिरात एका कोपऱ्यात ४० सेंटीमीटर लांबीचे लहान स्तूपाच्या आकाराचे दगड ठेवले आहेत. अशा प्रकारचे कोरीव स्तूप पन्हाळे काजी लेणी समूहात आढळले आहेत. ही काळकाई देवी आणि तिच्या पाच बहिणी मानल्या जातात. यात खाजाणीची काळकाई, महागाव ची काळकाई, कडापूरची काळकाई, वावे दिवाळीची काळकाई आणि एक अद्यात अशी काळकाई या पाच बहिणी आहेत. असे दिसते की ही काळकाई देवीची स्थाने एकाच मार्गावर आहेत. हा घाटावर जाण्याचा व्यापारी मार्ग असावा.

**चिकणी** (18° 31'59" N, 73° 8'49" E )

मुंबई-गोवा महामार्गावर हे गाव आहे.गावात देवलाई नावाचे देवस्थान आहे. येथे एक आयताकृती वीरगळ व एक महिषासुरमर्दिनी प्रकारची प्रतिमा आहे. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत. याशिवाय गावात महामार्गालगत एका बाजूने आत उतरण्यासाठी पायऱ्यांची सोय असलेली घोड बाव म्हणजे विहीर आहे. शैलीवरून ही बाव किंवा विहीर मराठा काळातील असावी. हे गाव मध्ययुगीन व्यापारी मार्गावर आहे.

**नागोठणे** (18° 32'43" N, 73° 8'11" E )

नागोठणे हे रोहा तालुक्यातील एक अंतर्गत बंदर होते. धरमतर खाडीपासून नागोठणेपर्यंत जल वाहतूक होत असे. आज खाडी गाळाने भरली आहे. अंबा नदीवर नागोठण्याच्या नैऋत्येस अदमासे एक किलोमीटरअंतरावर सन १५८० मध्ये चौलच्या काझी अलाउद्दीनने बांधलेला १४६.३० मीटर लांब व ३.२७ मीटर रुंद असा दुहेरी कमानीचा पूल आहे, त्यास गोटयाचा पूल असेही म्हणतात. हा पूल आजही सुरु आहे.

**बालसई** (18° 34'5" N, 73° 7'29" E )

बालसई हे रोहयाच्या उत्तरेला नऊ किलोमीटरअंतरावर अंबा नदीच्या दक्षिण तीरावरील गाव आहे. गावातील पुरावशेष बेलजाई या स्थानिक गावदेवी व शिवमंदिर परिसरात आढळून येतात. मंदिराचा जीर्णोध्दार नुकताच सन २०१४ मध्ये झाला आहे. मंदिराबाहेर महिषासुरमर्दिनी पध्द्तीच्या मूर्तीचे भग्न अवशेष पडले आहेत. या मूर्तीचे कमरेपासून ते पायापर्यंतचे भाग आहे. यात उजवीकडे तोंड केलेल्या महिषरूपी असुराचा जबडा देवीने पकडलेला दिसतो. डावा पाय महिषासुरावर ठेवला आहे. गाभाऱ्यातील मूर्तीस गावकऱ्यांनी जीर्णोध्दाराच्या वेळेस वज्रलेप केला आहे. एकंदर शैलीवरून ही मूर्ती मराठा काळातील असावी. या मंदिरापासून दक्षीणेस १०० मीटर अंतरावर शिवमंदिर आहे. कौलारू बांधणीचे साधे मंदिर आहे. येथे मंदिराबाहेर नंदी, गणेश व एका स्त्रीदेवतेच्या धडाचा भाग शिल्लक आहे. या सर्व शिल्पांची शैलीवरून मराठा काळातील हे अवशेष असल्याचे निश्चित होते. बालजाई व शिवमंदिर परिसरात समाधी दगड उभारले आहेत. यावरून हे ठिकाण पूर्वी स्मशानभूमी असावी.

**गोडसई** (18° 34'5" N, 73° 6'26" E )

गोडसई हे गाव अंबानदीच्या दशिणोत्तर काहीसे टेकडयांच्या भागात रोहयापासून नऊ किलोमीटर अंतरावर उत्तरेस वसले आहे. येथे कोयना धरणामधील धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. लोकांनी येथे आपल्या मूळगावातील देवतांच्या मूर्ती येथे आणून त्यांची पुर्नप्रतिष्ठापना केली आहे. येथे नवशीरीदेवीचे देवस्थान आहे. तसेचशेजारीच शिवमंदिरही आहे. मंदिरातील चार शिल्पांच्या स्वरूपावरून ही शिल्पे मराठा काळातील असल्याचे लक्षात येते.

**पाटणसई** (18° 28'39" N, 73° 7'5" E )

अंबानदीच्या उत्तर तीरावर पाटणसई हे गाव मुंबई-गोवा हायवे महामार्गालगत वसले आहे. या गावाला महामार्गाशी जोडणाऱ्या रस्त्यालगत दगडी कुंभाचे अवशेष पडले आहेत. सुमारे एक मीटर लांब व ६० सेंटीमीटर व्यास असलेल्या दंडगोलाकार भांड्याचा पाणी किंवा काहीतरी साठवण्यासाठी याचा उपयोग होत असावा. मुखाकडील भाग जास्त व्यासाचा, तर तळाकडे निमूळता होत गेलेला आहे. अशा प्रकारची दगडी पात्रे सातवाहन काळातील मार्गावर आढळली आहेत. खासकरून व्यापारी मार्गाशी निगडीत आहेत. या गावाच्या तळयाकाठी गावदेवाचे मंदिर आहे. या मंदिरात शेंदूर लावलेली दोन शिल्पे आहेत. चार हातांच्या व समभंग अवस्थेतेतील मूर्तीचे तपशील, शेंदुरांमुळे करणे अशक्य आहे. मात्र एकंदर शैलीवरून मराठापूर्व काळातील ही शिल्पे असावीत. मंदिराबाहेर आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकन असलेल्या वीरगळाचे दोन तुकडे आहेत की दोन वीरगळाचे वेगवेगळे भग्न आहेत हे समजायला मार्ग नाही. यांना चुना व शेंदूर लावण्यात आला आहे. वीरगळ व भग्न मूर्तीचे काही अवशेषही पहायला मिळतात. शिल्पशैलीवरून हे बारावे शतक ते चौदावे शतकापर्यंतचे असावेत.

**वांगणी** (18° 24'29" N, 73° 7'15" E )

हे गाव रोहयाच्या उत्तरेस१३किलोमीटर अंतरावर आहे. गावाच्या पूर्वेस असलेल्या शिवमंदिरात व लगतच्या शेतात येथील पुरावशेष आढळून येतात. येथील कौलारू मंदिरात अतिशय दुरावस्थेत असलेल्या सुमारे ४० सेंटीमीटर उंचीची लहान मोठी शिल्पे ओळीत मांडली आहेत. यातील दोन शिल्पे एकटा वीर असलेले वीरगळ आहेत. तर दोन शिल्पे पद्मासन व नमस्कार मुद्रेतील आहेत. या शिल्पांना शेंदूर लावून बेढब केले आहे. मात्र यांसारखी शिल्पे रायगड जिल्याच्या इतर भागातही आढळून आली आहेत. यांच्या शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील किंवा नंतरची असावीत. मंदिराबाहेर शुष्कसांधी बांधीव तंत्राने

उभारायच्या मंदिराचे दगड पडले आहेत. यात दाराच्या उंबऱ्याचा भाग आहे. याशिवाय श्री. दगडू शिर्के यांच्या शेतात गावाच्या उत्तरेस गध्देगळ शिळा आढळून येते. शैलीवरून हे शिल्प अकराव्या अथवा बाराव्या शतकातील असावे.

**ऐनघर** (18° 23'49" N, 73° 7'45" E )

रोहयाच्या ईशान्येस १४ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावातील पुरावशेष वाघेश्वर या गावदेवाच्या परिसरात आढळून येतात. वाघेश्वर मंदिरात पाच शिल्पे आहेत. यातील चार शिल्पे भग्नाअवस्थेत व झीज झालेली आहेत. यातील दोन शिल्पे म्हणजे वीरगळांचे भाग आहेत. वाघेश्वर म्हणून पुजले जाणारे शिल्प म्हणजे एक १० सेंटीमीटर उंच व ३५ सेंटीमीटर रूंद आयताकृती शिळेवर कोरलेला वीरगळच आहे. वीरगळ झिजलेला असला, तरी शिळेच्या वरच्या भागात चौकटीत वाघ या वन्यप्राण्याशी लढणाऱ्या वीराचे शिल्प स्पष्ट दिसते. हातात खड्ग व ढाल घेवून हा वीर या पशुवर हल्ला करताना दिसतो. या चौकटीखालील भाग मोकळा सोडला असून तेथे कोणतेही शिल्पांकन नाही. या भागावर बहुधा लेख कोरलेला असावा. या शिळेचा शीर्षभाग त्रिकोणाकृती आहे. त्यावर शेंदूर लावलेला असल्याने, त्यावर मंगल कलश व इतर शुभचिन्हे आहेत किंवा नाही हे सांगता येत नाही. चौथे शिल्प भग्न व जमिनीत गाडले गेलेले आहे. ही भैरवाची मूर्ती असावी. पाचवे शिल्प म्हणजे आधुनिक काळात बसविलेले शिवलिंग आहे.

**हेदवली** (18° 30'27" N, 73° 11'10" E )

हे गाव रोहयाच्या ईशान्येस १५ किलोमीटर अंतरावर आहे. गावातील पुरावशेष शिवमंदिर व काळबहिरी या परिसरात आढळून येतात. शिवमंदिर हे मूळ दगडी चौथऱ्यावर उभारले गेले होते. सध्या कौलारू मंदिराच्या गर्भगृह खोल असून त्यात जायला पायऱ्या आहेत. येथे नंदी, विष्णू, गणेश यांची शिल्पे आहेत. ही शिल्पे त्यांच्या शैलीवरून शिलाहार काळाचा प्रभाव दाखविणारी असली तरी त्या नंतरच्या म्हणजे चौदाव्या शतकातील असावीत. गर्भगृहात स्वतंत्र योनीपीठ पाहायला मिळते. मंदिराबाहेर एका बांधीव खड्यात ५५ सेंटीमीटर लांबीचे एक सुटे लिंग असून त्यास तळास चौकोनी ब्रम्हभाग, वर अष्टकोनी विष्णूभाग, व वर दंडगोलाकार रुद्रभाग आहे. या शिल्पाची शैली बाराव्या शतकाचा काळ दर्शविते. याशिवाय काळभैरी व जोगेश्वरी नावाची दोन सुटी शिल्पेही आहेत. पण शैलीवरून ती अलीकडच्या

काळातील असावीत. वाघदेव या ठिकाणी वाघाशी दोन हात करणाऱ्या एका वीराचा वीरगळ उभारला आहे.

**कानसई** (18° 30'15” N, 73° 10'40” E )

रोह्याच्या ईशान्येस असलेल्या या गावात काळभैरी मंदिर परिसरात एकाच बाजूस कोरलेले दोन वीरगळ आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या अथवा तेराव्या शतकातील असावेत.

**सुकेळी** (18° 29'8” N, 73° 10'53” E )

रोह्याच्या ईशान्येस मुंबई-गोवा महामार्गावर रोह्यापासून नऊ किलोमीटर अंतरावर सुकेळी गाव आहे. रोहा तालुक्यात प्रवेश करण्यासाठी या गावात लागणारी खिंड ओलांडावी लागते. गावातील मंदिरात वागजाई देवीचे चार हातांचे आधुनिक काळातील शिल्प आहे. गावाच्या पश्चिमेस गावदेव मंदिर परिसरात भग्न शिवमंदिराचे अवशेष आहेत. गर्भगृह खोल असून शुष्कसांधी बांधणीच्या मूळ मंदिराचे तीन स्तर शिल्लक आहेत. येथे एक सतीशिळा, दोन भग्न नंदी, गणेश शिल्प, योनीपीठ, तसेच समाधीचे अनेक कोरीव दगड आहेत. या शिल्पांवरून बाराव्या शतकापासून ते मराठा काळापर्यंत या भागात वसाहती झाल्या असाव्यात.

**तामसोली** (18° 31'5” N, 73° 11'35” E )

हे गाव कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर व रोहा-तामसोली-पाली मार्गावर, रोह्याच्या ईशान्येस १६ किलोमीटर अंतरावर आहे. गाव हाथीकडा या डोंगरांच्या पायथ्याशी आहे. या डोंगरावर तुर्काडी नावाच्या ठिकाणी एक पाण्याचे टाके व एक कातळात कोरलेली गुहा आणि वरदायिनी देवतेचे कौलारू मंदिर आहे.या ठिकाणी मंदिराजवळ पुष्करणी व अनेक शिल्पे आहेत. गावाच्या जंगल भागात नवरा आणि नवरी यांचे वऱ्हाड अचानक बुडाल्याचे किंवा गायब झाल्याचे सांगितले जाते. गावातील काळकाई देवतेच्या ठिकाणी एका ९० सेंटीमीटर लांब, ५७ सेंटीमीटर उंच व १० सेमी रुंद शिळेवर गजलक्ष्मी हे काहीसे झीज झालेले उल्लेखनीय शिल्प आहे. यातील विशेष बाब म्हणजे देवीच्या दोन्ही बाजूस पद्मासनातील व नमस्कार मुद्रेतील पुरुष शिल्पे आहेत. काळकाई चे शिल्प तुकडे झालेल्या अवस्थेत आहे. भुंडी देवी नावाने ओळखली जाणारी मूर्ती सव्यललीत आसनातील व पुरुष वाहनावर बसलेली आहे. हे शिल्प मुळात खूप सुंदर असावे. गावातील शिवमंदिराबाहेर नंदी, विष्णू यांची भग्न शिल्पे आहेत. याशिवाय दोन आयताकृती वीरगळ आहेत. गायवासरू यांचे सुटे शिल्पही येथे

बघायला मिळते. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकराव्या ते बाराव्या शतकातील असावीत. एकूण समृद्ध शिल्पावषेशांवरून हे ठिकाणी पूर्वीपासूनच महत्त्वपूर्ण गाव असावे.

**वरवटणे** (18° 32'4" N, 73° 7'46" E )

हे गाव रोहयाच्या उत्तरेस १७ किलोमीटर असून या ठिकाणी एका मोठ्या नैसर्गिक तलावाच्या काठी चौंडेश्वरी या स्थानिक गावदेवीच्या मंदिराचा पूर्ण जीर्णोद्धार झाला आहे. येथे मंदिराबाहेर भग्न शिवलिंग व कोरीव समाधीचे दगड आढळून येतात. समाधी दगड मराठा किंवा नंतरच्या काळातील असावेत.

**आमडोशी** (18°30'40''N 73°07'57''E)

रोहयाच्या उत्तरेस आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील स्थानिक ग्रामदेव माणकेश्वर मंदिर हे एका मोठया तळयाकाठी आहे. याची मूर्ती घोडयावर बसलेली दोन हातांची आहे. उजव्याहातात वाकडी तलवार व डाव्या हातात बहुधा ढाल असावी. हे शिल्प मराठा काळात घडविले असावे. मंदिराबाहेर वीरगळ सदृश्य शिल्प आहे. याचा शीर्षभाग त्रिकोणीकृती, त्यावर मंगलकलश कोरला आहे. त्यावर चंद्र-सूर्य कोरले आहेत. खालील चौकटीत घोडयावर बसलेला वीर दिसतो. या खालचा भाग मातीत गाडला गेला आहे. शैलीवरून चौदाव्या शतक अथवा नंतरच्या काळातील शिल्प असावे.

**कडसुरे** (18° 37'59" N, 73° 3'11" E )

रोहयाच्या वायव्येस २३ किलोमीटर अंतरावर गावाबाहेर शेतात स्थानिक ग्रामदैवत चौंडेश्वरी मरीआई मंदिर परिसरात गावातील शिल्पावशेष आहेत. या मंदिरात महिषासुरमर्दिनी पध्दतीच्याझीज झालेल्या दोन मूर्ती आहेत. शैलीवरून या मराठा कालखंडातील वाटतात.या ठिकाणी सुमारे एक मीटर उंचीच्या सात सतीशिळा आहेत. यातील चार सतीशिळा चांगल्या अवस्थेत, तर तीन सतीशिळा भग्नावस्थेत आहेत. यातील एका सतीशिळेवर दोन हात कोरलेले आहेत. तसेच खालच्या टप्प्यात सती गेलेल्या स्त्रिया घोडयावर बसून जाताना दिसतात. या ठिकाणी झाडांच्या बुंध्यात महिषासुरमर्दिनीच्या मूर्तीचा फक्त महिषाचा भाग आढळून येतो. हा महिष देवीने पाय दिल्याने चक्क खाली बसलेला दिसतो. या शिल्लक भागावरून देखील भग्न असलेले हे शिल्प मुळात किती सुंदर असावे याची कल्पना करता येते. अशा प्रकारचे शिल्प सध्या छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय मध्ये ठेवले आहे मात्र हे शिल्प त्या शिल्पाच्या तुलनेत खूपच लहान आहे. या शिल्पाची शैलीवरून दहाव्या अथवा

अकराव्या शतकातील असावी. सतीशिळा मात्र बाराव्याअथवा तेराव्या शतकातील असाव्यात. येथे मरीआई, बापदेव हे स्थानिक गावदेवता आहेत. याठिकाणी मात्र कोणतेही पुरावशेष आढळून आले नाहीत.

**उडदवणे** (18° 26'39” N, 73° 8'55” E )

रोह्याच्या पूर्वेस या गावात एका बाजूने आत उतरता येईल अशी पायऱ्या असलेली विहीर आहे. विहिरीच्या एका बाजूस एक देवनागरी लिपीतील लेख कोरला आहे. झीज झाल्याने तो वाचता येत नाही. परंतु मराठा काळातील हा लेख असावा. अष्टमी याअंतर्गत बंदराकडून रायगड या ठिकाणी जाणारा मध्ययुगातील व्यापारीमार्गा वरील उडदवणे हे एक महत्त्वाचे गाव असावे.

**पिंगळसई** (18° 27'35” N, 73° 7'27” E )

रोह्याच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर असलेले पिंगळसई हे गाव अवचित गडाच्या पायथ्याला वसले आहे. स्थानिकांच्या मते येथे तळ्याकाठी ग्रामदैवत महालक्ष्मी, सरस्वती, चंडिका, कालिकामाता, काळभैरव, सोमेश्वर व योगेश्वरीदेवी यांचे स्थान असलेले हेमाडपंथी बांधकामाचे दगडी मंदिर होते. मंदिर परिसरात मराठा काळातील समाधीचे दगड आहेत. योगेश्वरी मंदिरासमोर शेंदूर लावलेली गजलक्ष्मीची प्रतिमा आहे. एका ८५ सेंटीमीटर लांब व ३७ सेंटीमीटर उंच असलेल्या शिळेचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती केला आहे. पद्मासनात कमळावर बसलेल्या लक्ष्मीच्या दुतर्फा दोन हत्ती आहेत. हत्ती आणि लक्ष्मी एकाच पातळीत कोरले आहेत. हत्तींच्या बाजूस गंधर्व व दोन पुरुष दाखविले आहेत. या शिल्पाचे काळभैरव मंदिर चिपळूण, तळा तालुक्यातील तळेगाव येथे आढळणाऱ्या गजलक्ष्मी शिल्पांशी साम्य आहे. या शिल्पाखाली मूर्ती बसविण्यासाठी चौकोनी असलेले कोरीव पीठ आहे.शेजारील झाडांच्या बुंध्यात अनेक शिल्पावशेष ठेवले आहेत (छायाचित्र क्रमांक १). यात ५५ सेंटीमीटर उंच व २५ सेंटीमीटर आयताकृती शिळेवर एकाच बाजूस तीन टप्प्यात खोदलेला वीरगळ आहे. चंडिकेचे म्हणून दाखविल्या जाणा-या मंदिरात एक प्रमाणबध्द नसलेली महिषासुरमर्दिनीची मूर्ती आहे. शैलीवरून मराठा कालखंडातील असावी. एका ५० सेंटीमीटर लांबीच्या भग्न शिळाखंडावर हातात त्रिशूळ धारण केलेला भाग कोरला आहे.

झाडाला बांधलेल्या पारावर व झाडाच्या बुंध्यात भग्न शिल्पे आहेत. यात दोन वीरगळ, ८५ सेंटीमीटर लांब कोरीव शिळेवर एक सेवक कोरला आहे. चार हातांची समभंग

अवस्थेतील, स्थानक स्त्री प्रतिमा, एक सतीशिळा, एक भैरवाची मूर्ती, भग्न शिवलिंग व इतर भग्न नंदीशिल्प तसेच भग्नावस्थेमुळे न ओळखता येणारी मूर्ती शिल्पे आहेत. शुष्कसांधी मंदिराचे कक्षासनाचे, द्वारशाखेचे, शंखावटी, चंद्रशिला प्रवेशद्वाराजवळचे अनेक भग्न कोरीव काम केलेले शिलाखंडही येथे पडलेले आहेत. या सर्वावरून येथे दोन अथवा तीन मंदिरे असावीत असे लक्षात येते. मंदिरा परिसरात लागून असलेल्या शेतात लाल रंगाची व काळया रंगाची खापरे नांगरणीच्या वेळेस आढळून येतात. हे सर्व पुरावशेष त्यांच्या शैलीवरून दहाव्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंत असे विविध कालखंडातील असावेत. या शिवाय या भागात पेशवेकाळातील दगडी बांधणीची आणखी दोन मंदिरे आहेत.

**वांदेली** (18° 28'7” N, 73° 7'38” E )

वांदेली हे गाव रोह्यापासून तीन किलोमीटर अंतरावर उत्तरेस आहे. गावातील काळभैरी, शिवमंदिर व काळकाई मंदिराजवळ गावातील पुरावशेष आढळून येतात. काळभैरी मंदिराजवळ दीपवत स्तंभाजवळ एक छातीपर्यतचा भाग शिल्लक असलेले दहा सेंटीमीटर उंच स्त्री शिल्प आहे. तिच्या उजव्या हातात दंड आहे. मंदिरासमोर भग्न व झीज झालेल्या अवस्थेतील गजलक्ष्मी शिल्प आहे. काळकाई मंदिराजवळ ७० सेंटीमीटर उंच व २५ सेंटीमीटर रूंद तीन वीरगळ आहेत. हे आयताकृती एका बाजूस तीन टप्यात कोरले आहेत. एका वीरगळावरील वीर वाघाशी दोन हात करताना बळी गेलेला दिसतो. शैलीवरून हे विरगळ बाराव्या शतकातील असावेत. याशिवाय चार हातांच्या समभंग, स्थानक अवस्थेतील दोन प्रतिमा पुरुष प्रतिमा शिल्पशैलीवरून मराठा काळातील असाव्यात. येथील वीरगळ व गजलक्ष्मी यांच्या शैलीवरून त्यांचा कालखंड बारावे शतक अथवा तेराव्या शतकाचा असावा. गावातील आदिवासी वाडीवर मराठा काळातील दोन दगडी स्मृती समाध्या आहेत. एका समाधीवर हातात ढाल व वाकडी तलवार घेतलेला सरदार दाखविला आहे.

**बिरवाडी** (18° 25'25” N, 73° 2'28” E )

बिरवाडी हे गाव रोह्याच्या नैऋत्येस दहा किलोमीटर अंतरावरील असलेले गाव या ठिकाणी समुद्रसपाटीपासून १८५ मीटर उंच असलेल्या मध्ययुगीन किल्ल्यामुळे प्रसिद्ध आहे. या गावाचा व किल्ल्याचा उल्लेख अनेक मराठा काळातील ऐतिहासिक कागदपत्रामध्ये आला आहे. पश्चिमभाग उंच असलेल्या गडाच्या पूर्व बाजूस तटबंदी आहे. गडाच्या पूर्व बाजूस उत्तराभिमुख दरवाजा असून त्याच्या जवळ चार बुरुज आहेत. या दरवाज्या जवळ प्राचीन

मंदिरांच्या कर्णिकांचा भग्न तुकडे आढळले आहेत. त्याप्रमाणे खडकात खोदलेल्या पायऱ्या व पूर्वेकडे खालच्या बाजूस कातळात कोरीव पाण्याची गाळाने भरलेली चार टाकी आहेत. टाक्यांच्या स्वरूपावरून हा किल्ला उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगात निर्माण झाला असावा. किल्ल्याच्या पश्चिम बाजूस भवानी देवीचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. मंदिरात देवीचा पितळेचा मुखवटा असलेली मूर्ती आहे. मंदिरासमोर लोखंडी तोफ पडलेली दिसते. गावात गणेश व शिवमंदिर असून या ठिकाणी आधुनिक काळातील संगमरवरी शिल्पे आहेत.

**गायचोळे** (18° 25'12" N, 73° 2'35" E )

गायचोळे हे गाव बिरवाडी गावाच्या दक्षिणेस एक किलोमीटर अंतरावर आहे. या भागात एका कोरीव दगडावर गाय आणि वासराचे शिल्प कोरले असल्याचे लोक सांगतात. सर्वेक्षणात हे शिल्प पहाता आले नाही.

**खांबेरे** (18° 24'41" N, 73° 2'59" E )

गावात एकवीरा देवीचे आधुनिक काळातील मंदिर आहे. पुरावशेष गावातील शिवमंदिर व काळभैरी मंदिराजवळ आढळतात. मंदिरासमोर एका बाजूने आता उतरण्यास पायऱ्या असलेली चौकोनी पुष्करणी होती, तिचा जीर्णोद्धार केला गेला आहे. शिवमंदिराचा गाभारा खोल आहे. येथे गोलाकार योनीपीठ व लिंग आढळते. गाभारा चौकोनी तलविन्यासाचा आहे. त्यावर साध्या भिंती व फांसना पद्धतीचे शिखर आहे. मंदिरात विष्णू, गणेश व पार्वतीची शिल्पेमागील शतकात घडविली असावीत. शैलीवरून मराठा काळानंतर याचा जीर्णोद्धार झाला असावा. शेजारी काळभैरी मंदिरात स्थानक, समभंग व चार हातांची पण वाहनविवेक नसलेली दोन शिल्पे आहेत. शैलीवरूनमागील शतकात कैंव्हा तरी घडविली असावीत. मंदिराच्या आवारात दोन भग्न वीरगळ आहेत. हे आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले आहेत. तसेच येथे एका दाढीधारी पुरुषाचे मुख असलेले शिल्प आहे. शैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. या ठिकाणी लाल खापरे सापडतात. तसेच चौकोनी पसरट एक सेंटीमीटर जाडीच्या कौलांचे तुकडे सापडतात.

**खारगाव** (18° 27'10" N, 73° 5'24" E )

खारगाव हे रोहयाच्या पश्चिमेस चार किलोमीटर अंतरावरील गाव आहे. गावदेवी मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून येथे दगडी बांधणीचे मंदिर असल्याचे पुरावशेष आढळतात. चार हातांचे महिषासुरमर्दिनीचे त्रिभंग अवस्थेतील शिल्प येथे भग्नावस्थेत पहायला मिळते.

अत्यंत झीज झालेल्या या शिल्पाचा ६० सेंटीमीटर उंच आणि ४० सेंटीमीटर रूंद भाग शिल्लक आहे. मूर्तीस शेंदूर लावल्याने त्या शिल्पाची समीक्षा करता येत नाही. शैलीवरून ते उत्तर चालुक्य काळातील अकरावे शतकाचे असावे. या शिवाय शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या स्तंभ, स्तंभशीर्ष सारख्या कोरीव शिळांचे अवशेष आहेत.

**शेडसई** (18° 28'0" N, 73° 2'3" E )

रोहयाच्या वायव्येस शेडसई हे गाव कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर आहे. शेडसई गावाच्या शिवमंदिर आणि गावदेवी मंदिराचा जीर्णोध्दार सन २०१० मध्ये झाला आहे. या मंदिराच्या परिसरात उल्लेखनीय पुरावशेष आहेत. शिवमंदिरात तैलरंगात रंगविलेले आधुनिक काळातील नंदी, गणेश व शिवलिंग आहे. मंदिरासमोर चौकोनी खांबाच्या आकाराचे चारही बाजू पाच टप्यात शिल्पांकित केलेला सुमारे एक मीटर उंचीचा वीरगळ आहे. या वीरगळाच्या शीर्षभागी पिरॅमीड आकाराची सुटी शिळा आहे. वीरगळावर युध्दप्रसंग दाखविले आहेत. एका बाजूवर खालून दुसऱ्या टप्यात लढणाऱ्या वीराच्या डोक्यावर छत्र धरलेली व्यक्ती आहे. हा वीरगळ इथल्या स्थानिक प्रमुखाचा असावा. या वीरगळावर सर्वात खालच्या टप्यात वीराचे मृत शरीर, त्या वरच्या दोन टप्यात युध्द प्रसंग आणि सर्वात वरच्या टप्यात वीर शिवपूजा करताना दिसतो.

या मंदिराच्या समोर एका ओढयालगत चौकोनी विहीर आहे. विहीरी जवळ एक गजलक्ष्मीचे भग्न झालेले शिल्प आहे. मंचकावर उभे असलेले दोन हत्ती, लक्ष्मीला अभिषेक घालताना दिसतात. लक्ष्मी पद्मासनात बसली आहे. लक्ष्मीचे दोन्ही हात भग्न आहेत (छायाचित्र क्रमांक २). गावाच्या पूर्वेकडील भागात गावदेवाचे मंदिर आहे. येथे मंदिरात शेंदूर लावलेल्या दोन मूर्ती आहेत. चार हातांची बहुधा घोडा वाहन असलेली एक व दुसरी महिषासुरमर्दिनीची आहे. या मूर्ती सुमारे ५० सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद आहेत. त्यांच्या शैलीवरून या मूर्ती मराठा कालखंडातील असाव्यात. गावात पूर्वी नदीलगत होडी लावण्याचा धक्का (jetti) होता. या ठिकाणी बंदर असण्याची शक्यता आहे.

**महाळुंगे** (18° 27'24" N, 73° 1'52" E )

महाळुंगे अथवा म्हाळुंगे हे गाव कुंडलिका नदीच्या दक्षिणकाठावर बंदर असलेले ठिकाण आहे. गावात जाखमाता मंदिराजवळ गावातील पुरावशेष काही शिल्पांच्या रूपाने पाहायला मिळतात. दोन मुर्तीपैकी एक जुनी मूर्ती पूर्णपणे शेंदूराने लिंपलेली तर दुसरी तिची प्रतिकृती दोन

हातांची, स्थानक स्वरुपाची स्त्री प्रतिमा आहे. उजवा हात अभयमुद्रेत तर दुसऱ्या डाव्या हातात दंडासारखी वस्तू आहे.शिल्पशैलीवरून हे शिल्प आधुनिक काळातील वाटते. या गावातून होडीतून नदीच्या पैल तीरावर चोर्ढे, सानेगाव व यशवंतखार या ठिकाणी जायची सोय आहे.

**न्हावे** (18° 26'25” N, 73° 0'31” E )

हे गाव रोहयाच्या काहीसे पश्चिम दिशेला नदीच्या काठावर वसलेले आहे. गावात टेकडीवर दत्तमंदिर आहे.या टेकडीवर पांडवांनी काही खोदकामे केल्याचे सांगतात. पावसाळ्यात ओढ्याच्या पात्रात वाहून आलेली आद्य ऐतिहासिक काळातील व उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगातील खापरे आढळून येतात.

**सारसोली** (18° 25'26” N, 73° 0'55” E )

हे गाव रोहयाच्या काहीसे नैऋत्य दिशेला १० किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. गावात सोमनाथ हे शिवमंदिर असून त्याचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला आहे. या ठिकाणी आता आधुनिक काळातील शिवलिंग, नंदी व इतर शिल्पे पाहायला मिळतात.

**सुडकोली** (18° 24'54” N, 73° 1'30” E )

हे गाव रोहयाच्या नैऋत्य दिशेला ११ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. गावाच्या दुर्गामाता मंदिरात संगमरवरी दगडात घडविलेल्या दुर्गा, श्रीकृष्ण, गणेश यांच्या प्रतिमा आहेत. मात्र गावाच्या जंगल भागात काही पांडवकालीन जुन्या भग्न मूर्ती असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

**खैराळे** (18° 25'2” N, 73° 0'27” E )

खैराळे गावात मैलाई माता व धावीरदेव या स्थानिक देवतांचे आधुनिक काळात जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. या ठिकाणी कोणतेही मूर्तीशिल्प नसून फक्त शिळेच्या स्वरुपात स्वयंभू तांदळा पुजला जातो.

**टेंबघर** (18° 24'31” N, 73° 3'9” E )

हे गाव रोहयाच्या नैऋत्य दिशेला १२ किलोमीटर अंतरावर आहे. गावाच्या बाहेर शेतात वरदानी माता व गावदेवाचे स्थान आहे. मंदिराचा जीर्णोद्धार सुरु असून जुन्या मूर्ती मंदिरात

पाहता येतात. वाघावर बसलेली चार हातांची स्त्री देवता व दुसरी स्थानक व समभंग अवस्थेतील चार हातांची पुरुष प्रतिमा येथे पाहायला मिळते. या मूर्तीच्या शिल्पशैलीवरून या मराठा कालखंडाच्या असाव्यात.

**खंदार** (18° 24'37” N, 73° 1'27” E )

खंदार हे गाव रोहयाच्या नैऋत्येस ११ किलोमीटर अंतरावर, कुंडलिका नदीला दक्षिणेकडून मिळणाऱ्या एका छोट्या उपनदीच्या काठावर आहे. या गावात वैशिष्ट्यपूर्ण पुरावशेष आढळून येतात. तसेच गावाच्या आजूबाजूच्या परिसरातील ठिकाणांबाबत लोक अनेक गूढ गोष्टी बोलतात. गावाच्या पश्चिम बाजूस करवलीचा टेप म्हणून एका डोंगर रांगेचा भाग आहे. या ठिकाणी एक वऱ्हाड अचानक गायब झालेचे लोक सांगतात. याला लागूनच मंडप कडा म्हणून डोंगर आहे. या ठिकाणी काही गुहा आहेत. व शेजारून जायला पायऱ्या असल्याचेही म्हणतात. हा डोंगर रांगेचा भाग मुरूड तालुक्याच्या हद्दीत येतो. पूर्वी या ठिकाणाहून मुरुडला जाण्यास पायी मार्ग असावा.

एका मोठ्या तळ्याच्या काठी भग्नावस्थेतील गद्धेगळशिल्पाचे अवशेस आहेत. ही शिळा सुमारे एक मीटर इतकी लांब व ०.४५ मीटर रुंद असावी. याच दोन तुकडे झाले असून, शीर्षभाग चौकोनी सपाट आहे. त्यावर चंद्र-सूर्य व मध्ये मंगलकलश कोरला आहे. खाली शिळा सपाट आहे. पण झीज झाल्याने यावर कोणताही लेख आढळून येत नाही. दुसरा भाग सपाट असून तळाला असलेल्या चौकटीत उजवीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ होणाऱ्या गाढवाचे शिल्प कोरलेले आहे.

गावातील नायशेत भागात काही भंग झालेल्या शिल्पांचे अवशेष तर इठ्ठलादेवी व बोलन देवस्थानाजवळ दोन वीरगळ व एक सतीशिळा आहेत. वीरगळ आयताकृती शिलेवर एकाच बाजूस तीन टप्यात कोरलेली पण झिझलेल्या अवस्थेत आहे. सतीशिळेचीही तीच परिस्थिती आहे. या ठिकाणी शुष्क संधी बांधीव तंत्राने उभारलेली वास्तू असावी तिच्या काही शिळा व स्तंभ शीर्ष येथे पाहायला मिळतात. काही सूक्ष्म शिल्पे, किमान १५ ते २० सेंटीमीटर लांब व १० सेंटीमीटर रुंद आकाराच्या, या ठिकाणी पाहता येतात. झीज झालेल्या या शिल्पांमध्ये एक शिल्प घोड्यावर स्वार झालेल्या जोडप्याचे व दुसरे एक स्त्री शिल्प आहे. स्त्री शिल्पातील देवतेने डाव्या हातात दंड व उजवा हात कमरेवर आहे. शैलीवरून ही शिल्पे तेराव्या व चौदाव्या शतकातील असावीत.

**कोकबन** (18° 25'8" N, 72° 58'46" E )

रोहा-साळाव मार्गावरील कोकबन हे एक बऱ्यापैकी मोठे गाव रोहयाच्या पश्चिमेला १५ किलोमीटर अंतरावर कुंडलिका खाडी लगत वसले आहे. गावाच्या दक्षिणेकडील टेकडीवर श्री. धावीर महाराज या स्थानिक देवतेचे आधुनिक काळात जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. समुद्रसपाटीपासून १७६ मीटर उंचीवर हे मंदिर आहे. मंदिराचा जीर्णोध्दार झाला असला तरी गाभाऱ्यातील मूर्ती जुनीच असल्याचे सांगितले जाते. या मूर्तीला शेंदूर लावलेला असल्याने तिची सौंदर्य समिक्षा करता येत नाही. परंतु ८० सेंटीमीटर उंचीची व ३0 सेंटीमीटर रूंदीच्या आयताकृती शिळेवर घोडयावर बसलेली झालेली दोन हातांची ही प्रतिमा आहे. एका हातात खड्ग व एका हातात ढाल ही यामध्ये आहेत. शिळेचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असून त्यावर चंद्र-सूर्य कोरले आहेत. हे वीरगळ सदृश्य शिल्प आहे. मंदिरापासून जवळच १५ सेंटीमीटर लांब व १० सेंटीमीटर रूंद दगडावर तीन पुरुषांच्या आकृती काढल्या आहेत. धावीर देवतेचे शिल्प शैलीवरून मराठापूर्व कालखंडातील वाटते. धोपाटे आणि मोकाशी (२०१३) यांनी प्रसिद्ध केलेल्या कल्याण ताम्रपटात दान दिलेले ककुंबदभुग्राम म्हणजे कोकबन असावे.

**शिळोशी** (18° 25'20" N, 72° 59'25" E )

रोह्याच्या पश्चिमेस असलेल्या शिळोशी गावातील ग्रामदेवतेच्या मंदिरासमोर जांभ्या दगडातील सहा स्तरांचा दीपवत स्तंभ आहे. कौलारू मंदिरामध्ये गर्भगृहावर फासना पध्दतीने पिरॅमीड आकाराचे उत्तरोत्तर लहान होत जाणारे शिखर आहे. यात एकूण आठ स्तर आहेत. प्रत्येक कोपऱ्यावर अर्धपाकळी व मध्यावर अर्धवर्तुळाकार घटक कोरले आहेत. गाभाऱ्यात चार हातांची स्थानक अशी सुमारे ८० सेंटीमीटर उंच तीन शिल्पे आहेत. डावीकडून पहिल्या शिल्पाचे वाहन घोडा, तर दुसऱ्या दोन शिल्पांचे वाहन वाघ सदृश्य प्राणी दाखविला आहे. अत्यंत झीज झाल्यामुळे त्यांचे सौंदर्य समीक्षाशक्य नाही. शिल्पशैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील असावीत. धोपाटे आणि मोकाशी (२०१३) यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या कल्याण ताम्रपटात सिलावलीग्राम या गावाचा उल्लेख आला आहे हे गाव म्हणजे शिळोशी असावे.

**दिव** (18° 26'44" N, 72° 59'44" E )

या ठिकाणी काहीही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळले नाहीत. परंतु खाडीला अगदी खेटूनच असल्याने, पूर्वी या गावास एका बेटासारखे स्वरूप प्राप्त झाले होते. आजही भरतीच्या वेळेस

गावाच्या चहुबाजूस पाणी असते. गावातील शेतावरील कातळावर पाण्यामुळे, लाटांमुळे झिजलेले कातळ पहाता येतो. आज मात्र खाडीचे पाणी या ठिकाणी येत नाही. पाण्याची पातळी पूर्वी केव्हातरी जास्त असावी.

**यशवंतखार** (18° 29'37" N, 73° 1'24" E )

हा सानेगावचाच उपभाग आहे. गावच्या उत्तरेस एका छोटया तळयाकाठी भैरवाचे जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. येथे काही शुष्कसांधी बांधीव पध्दतीने उभारल्या जाणाऱ्यामंदिराच्या कोरीव शिळा येथे आढळतात. परंतु उल्लेखनीय शिल्पे येथील शिवमंदिराजवळ आहेत. विशेष बाब म्हणजे येथील शिवमंदिर परिसरात गरम पाण्याची कुंडे आहेत. परंतु यांस प्रसिध्दी न मिळाल्याने यातील काही कुंडे मातीत बुजली आहेत. यातील आकाराने मोठे असलेले कुंड सुमारे सहा मीटर लांब व रुंद असावे. तीन लहान आकाराची कुंडे एक मीटर लांब व रुंद असलेली आहेत. यातील पाणी गरम व गंधकयुक्त आहे. त्वचारोग झालेले लोक येथे स्नानासाठी येतात. येथील कौलारू व अत्यंत साध्या मंदिरासमोर शुष्कसांधी बांधीव पध्दतीने उभारण्यात येणाऱ्या कोरीव शिळा पडल्या आहेत. मंदिरात नंदी शिल्प, खोलगर्भगृह आहे. मंदिरात नंदी शिल्प, खोलगर्भगृह आहे. शिल्पे शैलीवरून मराठा काळातील आहेत. मंदिराच्या बांधणीत काही जुने वास्तूघटक वापरले गेले आहेत. यामध्ये उभ्या चौकटया आकाराची फुले असलेले घटक प्रामुख्याने आहेत. मंदिरासमोर मराठा काळातील दीपमाळ आहे. मंदिराच्या आवारात ५३ सेंटीमीटर लांब व २५ सेंटीमीटर रूंद आकाराच्या शिळेवर गायवासरू कोरलेले आहे. त्याची अत्यंत झीज झालेली आहे. एका भग्नावस्थेतील वीरगळ, मुखभग्न झालेले नंदीशिल्प व काही नक्षीदार दगड ही आहेत. या परिसरात झाकणी व तोटींच्या आकारातील लाल खापरे आढळतात. शैलीवरून हे वास्तूघटक व शिल्पे बाराव्या व तेराव्या शतकातील असावेत.

**भातसई** (18° 28'57" N, 73° 5'57" E )

भातसई हे रोहयाच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर असलेले एक साधेसुधे गाव आहे. गावात महादेवी व धावीर महाराज या स्थानिक लोकदेवतांचे स्थान आहे. या ठिकाणी होणाऱ्या यात्रेतभाविक देवाच्या नावाने आपल्या शरीरात गळ टोचून बगाडावर गोल फिरवण्याची आगळी प्रथा येथे पाळली जाते. मंदिरासमोर दगडी दीपवत आहे. उल्लेखनीय असे पुरावशेष 'वऱ्हाड बुडाले' या ठिकाणी आहेत. गावाच्या सुरूवातीस हे ठिकाण असून येथे

वीरगळांचे अवशेष पहायला मिळतात. काही वीरगळ जमिनीत गाडले गेलेल्या अवस्थेत आहेत. या ठिकाणी रानटी झाडे-झुडपे वाढल्यामुळे या अवशेषांचे स्वरूप समजत नाही. याशिवाय शुष्कसांधी बांधीव मंदिराचे दगडी घटकही येथे आढळतात. येथे वीरगळांचे भग्न अवशेष आहेत. हे वीरगळ आकाराने ६० सेंटीमीटर रूंद व १.१५ सेंटीमीटर लांब आकाराचे आहेत. असे सात ते आठ वीरगळ येथे असावेत आणि हे वीरगळ चांगल्या खोदीव पीठावर चौकोनी खाच करून बसविलेले असावेत कारण या वीरगळांना खुंटे आहेत. तसेच पीठांनाही चौकोनी खाच असलेल्या दिसतात. या पैकी दोन वीरगळांवर युध्दामध्ये हत्तीदळ समाविष्ट असल्याचे दिसते. हे वीरगळ आयताकृती शिळेवर एका बाजूस पाच ते सहा टप्प्यात खोदले असावेत. शीर्षभागी वैशिष्ट्यपूर्ण कुंभ कोरले गेले होते. या शिवाय रूंदीने लहान आकाराचे वीरगळ ही अनेक असावेत. परंतु जमिनीत अर्धे गाडले गेल्याने त्यांची लांबी आणि त्यावरील शिल्पांकना बाबत काही सांगता येत नाही. हा परिसर कुंडलिका खाडीलगत व अवचितगडापासून जवळच असल्याने येथे प्राचीनकाळी घनघोर युध्द झाले असावे व त्यात हत्तीचाही समावेश असावा. काही वीरगळांचा काळ शैलीवरून बाराव्या शतकातील तर काही तेराव्या शतकातील असावा असे म्हणता येते.

**शेणवई** (18° 28'58” N,  73° 4'13” E )

शेणवई हे गाव रोहयाच्या वायव्येस आठ किलोमीटरअंतरावर, कुंडलिका नदीच्या उत्तर तीरावरील अंतर्गत बंदर आहे. गावात सोमजाई व दोन शिवमंदिर आहेत. सोमजाई मंदिरात तीन शिल्पे आहेत. यातील एक शिल्प घोडयावर स्वार झालेल्या पुरुष देवतेचे आहे. यास येथे धावीर देव म्हटले जाते. कोणतेही प्रमाणबद्धता नसलेले हे शिल्प शैलीनुसार मराठा काळातील असावे. शिल्पशैलीनुसार मराठा काळातील असावे.याच पद्धतीचे दुसरे स्त्री शिल्प आहे. उजव्या वरच्या हातात त्रिशुळव डाव्या खालच्या हातात कपाल या वस्तू ओळखता येतात. डाव्या पायाजवळ चेंडूसारखी गोल वस्तू आहे. येथे या देवतेस सोमजाई म्हटले जाते. देवतेने करंडक मुकूट परिधान केला आहे. शिल्पाची उंची ७० सेंटीमीटर तर रूंदी ४० सेंटीमीटर आहे. धावीर मूर्ती ही याच मापाची पण थोडी छोटी आहे. सोमजाई देवतेची ही मूर्ती देखील मराठा काळातील असावी. गावातील शिवमंदिरांचा जीर्णोध्दार झाला आहे. हे शिवमंदिर मोठया तलावाकाठी आहे. एक नंदीशिल्प सोडल्यास कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष येथे नाहीत. नदीकाठाजवळ नागेश्वराचे मंदिर आहे. येथील खडक पाण्याच्या लाटांमुळे

केव्हातरी झिजलेला दिसतो पाण्याची पातळी पूर्वी येथपर्यंत असावी असे दिसते. येथे काचेचा लेप दिलेली खापरे सापडली.

**वावेपोटगे** (18° 29'32” N, 73° 3'8” E )

शेणवईपासून दोनकिलोमीटरअंतरावरील या गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. गावातील टेकडीवर असलेल्या कालकाई या देवस्थानाचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला आहे. झोळांबेवाडी जवळील कमळादेवी मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. भग्नमूर्तीचे विसर्जन करण्यात येवून नवीन मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. मंदिराच्या बाहेर गजलक्ष्मीचा एक भग्न तुकडा आढळून येतो. हा अभिषेक करणारा भग्न हत्तीचा एवढाच भाग शिल्लक आहे. शैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील असावे.

**आंबेवाडी (18° 24'16” N, 73° 12'25” E )**

रोहयाच्या पूर्वेकडे आंबेवाडी हे गाव १२ किलोमीटर अंतरावर एका मोठया डोंगराच्या पायथ्याला वसले आहे. गावात हनुमानाचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष येथे आढळले नाहीत.

**कोलाड** (18° 24'28” N, 73° 13'20” E )

कोलाड हे मुंबई-गोवा महामार्गावर आणि कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर रोहयापासून १२ किलोमीटर अंतरावर पूर्वेस वसले आहे. गावातील महादेववाडी परिसरात गावातील पुरावशेष आहेत. हे अवशेष गावातील हनुमान, काळभैरी, सोमजाई, कोलाई व बापदेव यांची मूळ मंदिरे पूर्वी गावातील मोहल्ला भागात होती. आज त्यांची स्थापना नवीन ठिकाणी केलेली आहे. हनुमान मंदिरातील हनुमानाची मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. मूर्ती सुमारे एक मीटर पेक्षा उंच आहे. ही मूर्ती चपेट मुद्रेतील आहे. हनुमानाने पायाखाली तुडविलेला दैत्य सुबक आहे. करंडक मुकूट परिधान केलेल्या या दैत्याने हनुमानाचा डावा पाय पकडलेला आहे. ही मूर्ती शेंदूराने लेपलेली असल्याने तिचा कालखंड ठरविणे कठिण आहे. या मंदिरामागे एका आयताकृती वीरगळाचे भग्न अवशेष आहेत. या शिवाय महिषासुरमर्दिनी शिल्पाचेही भग्न अवशेष आहेत. काळभैरव मंदिरात तीन भग्न आणि झीज झालेली शिल्पे आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील असावीत. तर वीरगळ व महिषासुरमर्दिनी शिल्प शैलीवरून बाराव्या शतकातील असावेत. गावातील दक्षिणेकडे खंडेरायाची डुंगी या टेकडीवर शिवलिंग आहे. गावातील शिवमंदिराचाही जीर्णोध्दार झाला आहे. येथे आधुनिक काळात शिवलिंग, नंदी, विष्णू व गणेश

यांच्या प्रतिमा स्थापन करण्यात आल्या आहेत. गावाच्या पाणडुंगी या टेकडीवर पाण्याचे हौद होते. परंतु त्या टेकडीवर इमारतींच्या बांधकामाच्या भरावासाठी उत्खनन झाल्याने ते नष्ट झाले आहेत.

**पाले बुद्रुक** (18° 24'11” N,  73° 12'10” E )

रोहयाच्या पूर्वेस रोहा-कोलाड या रस्त्यालगत हे गाव आहे. गावातील गावदेवी मंदिरात शेंदूर लावलेली गणेश प्रतिमा व चार हातांच्या स्थानक देवतेचे प्रमाणबध्द नसलेले शिल्प आहे. यांची शैली मराठा काळातील शिल्प शैलीशी जुळते. या शिवाय गावदेवी मंदिरात अत्यंत झिजलेला व भग्नावस्थेतील दोन हातांच्या व वाघासारखे वाहन असणाऱ्या देवतेचे शिल्प आहे. या शिल्पाची झीज झाल्याने कालखंडाबाबत काहीही अंदाज करणे शक्य नाही.

**पाले खुर्द** (18° 24'59” N,  73° 11'23” E )

हे गाव रोह्यापासून आग्नेयेस सात किलोमीटर अंतरावर आहे. गावातील काळभैरव, जोगेश्वरी, काळकाई व धाकसुत बाबा या स्थानिक गावदेवतांच्या जुन्या मूर्ती विसर्जन करण्यात येवून नवीन मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. गावातील शिवमंदिराचाही जीर्णोध्दार झाला असून येथे मंदिरासमोर मराठा काळातील दगडी दीपवत स्तंभ, गोलाकार भागात सुटे लिंग ठेवण्यसाठी खाच व पाण्याचा निचरा करण्यासाठी पन्हळ असलेले योनीपीठ असे (दोन) आढळले आहेत. मराठा काळातील नंदीशिल्प व गणेश शिल्प ही आढळून येते.

**संभे** (18° 24'29” N,  73° 11'48” E )

संभे हे गाव रोहयाच्या पूर्वेस सात किलोमीटर अंतरावर आहे. गावातील पुरावशेष मूर्ती शिल्पाच्या रूपाने गावातील धाकसुतबाबा या देवस्थानाजवळ आहे. धाकसुतबाबा हे दैवत रोहा तालुक्यात आढळून येते. परंतु कोणतेही मूर्तीशिल्प असण्यापेक्षा त्या ठिकाणी शेंदूर लावलेला स्वयंभू तांदळाचा दिसून येतो. येथेही तसाच प्रकार असून, मंदिराबाहेर मात्र एक मीटर उंच व ०.३५ मीटर रुंद आयताकृती शिळेवर एकाच बाजूस शिल्पांकित केलेला चांगल्या अवस्थेतील वीरगळ आहे. याचे कदाचित पाच टप्पे असावेत. सर्वात खालचे दोन टप्पे जमिनीत गाडले गेले आहेत. मात्र सध्या एकूण चार टप्पे दिसतात. खालुन पहिल्या टप्प्यात काही गुरांची (बैल) डोकी दिसतात. यावरून गावातील गोधनाच्या रक्षणासाठी ‘वीर ’मृत्यूमुखी पडलेला दिसतो. त्यावरच्या टप्प्यात एकटा वीर तीन शत्रूशी लढताना दिसतो. त्यावरचे दोन टप्पे नेहमीचेच ईश्वरपूजा हे भाग आहेत. या वीरगळाच्या शीर्षभागी ठसठशीत कोरीव मंगलकलश

असून त्यावर झाकणी ठेवलेली दिसते. या मंगलकलशास मध्यभागी फीत बांधलेली असून तिच्या गाठी कलशाच्या दोन्ही बाजूस सोडलेल्या आहेत. हा कलश त्रिकोणाकृती एका पीठावर ठेवलेला दिसतो. शिल्पशैलीवरून हा वीरगळ बाराव्या शतकातील असावा.

**पुई** (18° 26'5" N, 73° 12'29" E )

रोहयाच्या पूर्वेला हे गाव १३ किलोमीटर अंतरावर कुंडलिका नंदीच्या उत्तर तीरावर आहे. पुई गावाच्या पश्चिमेस क्षेत्रपाल तर पूर्वेस शिवमंदिर व काळभैरी मंदिर परिसर गावातील पुरावशेष दिसून येतात. क्षेत्रपाल येथे घोडयावर स्वार झालेल्या दोन हातांच्या पुरुषदेवतेची प्रमाणबद्ध नसलेली प्रतिमा आहे. गावातील काळभैरी मंदिराजवळ स्थानक, चार हातांच्या दोन पुरुष प्रतिमा व दोन हातांची एक स्त्री प्रतिमा आहेत. मूर्तीशैलीवरून मराठा कालखंडात केव्हातरी यांची निर्मिती झाली असावी. एका झाडाखाली दगडी काही दगडी वास्तूचे अवशेष व मराठा कालखंडातील काही भग्न शिल्पे आहेत. गावातील शिवमंदिर हे कुंडलिका नदीस जवळच आहे. येथील मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. मंदिरात शिलाहार शैलीतील गणेश प्रतिमा व मराठा काळातील विष्णू प्रतिमा, नंदी व शिवलिंग दिसून येते. मंदिराबाहेर १५० सेंटीमीटर उंच व ३५ सेंटीमीटर रूंदीच्या आयताकृती शिळेवर एकाच बाजूस कोरलेला वीरगळ आहे. हा वीरगळ चार टप्यात कोरला असून, यात खालून मृत वीरांचे शरीर, त्यावरील टप्यात युध्दप्रसंग, वरच्या टप्यात अप्सरांकडून स्वागत व त्यावर ईशपुजन करताना दिसतो. शिळेचा अर्धवर्तुळाकृती शीर्षभागी मंगलकलश व चंद्र, सूर्य काढले आहेत. शैलीवरून गणेश प्रतिमा व वीरगळाचा कालखंड बारावे शतक असा ठरवता येतो.

**पुगाव** (18° 26'27" N, 73° 12'46" E )

मुंबई-गोवा महामार्गावर पुगाव गावाशेजारीच मढाली बुद्रुक आहे. एका मोठ्या तलावाच्या काठावर पुगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर गावदेवाचे मंदिर आहे. येथे आयताकृती व एकच बाजू शिल्पांकित केलेले आठ ते नऊ वीरगळ आहेत. ते दोन ते चार टप्यात कोरले आहेत. तर तीन वीरगळ चौकोनी खांबासारखे चारही बाजू शिल्पांकित केलेले आहेत. एका भग्न वीरगळावर वीर वाघा सोबत लढताना दाखविला आहे. येथे शुष्कसांधी पद्धतीने उभारायच्या कोरीव शिळांचे अवशेष आहेत. हे अवशेष बाराव्या ते सतराव्या शतकापर्यंतचे असावेत.

**गोवे** (18° 25'41” N,  73° 11'46” E )

रोहयाच्या पूर्वेस आठ किलोमीटर अंतरावर असलेले हे गाव दक्षिणेकडे कुंडलिका व उत्तरेकडे म्हैसदरा या नदयांच्या बेचक्यात वसले आहे. गावातील सोमजाई, काळभैरी व शिवमंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. काही मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे. गावाच्या पश्चिमेकडील माळावर स्मशाना जवळ उल्लेखनीय असे गायवासरू शिल्प सापडते. याची लांबी १२० सेंटीमीटर तर रूंदी ४८ सेंटीमीटर आहे. शिल्पाचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असून त्यावर मध्ये मंगलकलश व बाजूस चंद्र-सूर्य दाखविले आहेत. त्या खालील चौकटीत गायवासराचे शिल्प कोरले आहे. या खालचा भाग मोकळा सोडला आहे. यावर काहीतरी अक्षरे होतीअसे सांगतात. मात्र सध्यातरी यावर काही खुणा नाहीत.

**चिंचवली तर्फे दिवाळी** (18° 23'23” N,  73° 14'3” E )

हे गाव रोहयाच्या आग्नेय दिशेस १५ किलोमीटर अंतरावर आहे. गावातील महादेव (शिवमंदिर) गावदेव मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून मंदिरात अत्यंत झीज झालेल्या चार हातांची समभंग अवस्थेतील महिषासुरमर्दिनीची स्थानक प्रतिमा, तसेच दोन प्रतिमा वाघावर आरूढ झालेल्या पण या चार हातांच्या पुरुष प्रतिमा आहेत. शैलीवरून त्या मराठा कालखंडातील वाटतात. मंदिरासमोर शुष्कसांधी तंत्राने उभारलेला दीपवत हा दीपस्तंभ आहे. मंदिरासमोर मराठा काळातील आयताकृती कोरीव दगडांच्या स्मृती समाध्या आहेत.

**हेटवणे** (18° 24'7” N,  73° 14'13” E )

हेटवणे हे गाव रोहयापासून १७ किलोमीटर अंतरावर आग्नेय दिशेस आहे. गावातील हेरजाई, बारजाई, हेटकरीबुवा या स्थानिक देवतेच्या मंदिराजवळ गावातील पुरावशेष आहेत. मंदिरात सुमारे ५० सेंटीमीटर उंच, ४० सेंटीमीटर रूंद झीज झालेली चार शिल्पे आहेत. यात चार हातांची, त्रिभंग अवस्थेतील महिषासुरमर्दिनीची वगणेश शिल्प आहे. यातील महिषासुरमर्दिनीचा शिल्पशैलीनुसार कालखंड चौदावे शतक असा तर बाकीच्या शिल्पांचा कालखंड शैलीनुसार मराठा काळातील असावा. या गावात दर तीन वर्षानी ‘गावपळण’ नावाची परंपरा पाळली जाते. ‘गावपळण’ म्हणजे दर तीन वर्षानी माघ पौर्णिमेस गावातील सर्व स्त्री पुरुष, लहानमुले, घरातील कोंबडया, बकरे, मांजर कुत्रे यांसारखे पाळीव प्राणी यांच्या सोबत घरात कोणतेही सामान न ठेवता घर व गाव सोडून सामुहिकरित्या गावाबाहेर रहायला जातात. या दिवसात गावात कोणतेही कारण झालेतरी परत जात नाहीत. असे न केल्यास

गावावर संकट येईल अशी गावकऱ्याची समजूत आहे. पूर्वी गावातील लोक वंश वाढ होत नसल्याने गाव बदलत. गाव वसवण्यासाठी योग्य जागा शोधायला रेडा सोडत. हा रेडा जिथे थांबतअसे तिथे नवे गाव वसवले जात असे.

**वाळंजवाडी** (18° 24'16" N, 73° 15'5" E )

हेटवणे गावाचाच एक भाग असलेल्या वाळंजवाडी येथे गणेशाचे मंदिर आहे. येथील मूर्ती प्राचीन असल्याचे सांगितले जाते. ही मूर्ती सुमारे ३० सेंटीमीटर लांब व तितकीच रुंद आहे. मूर्ती शेंदूर लावलेली आहे. मात्र हे शिल्प आगळेवेगळे आहे. हे वर्तुळे, अर्धवर्तुळे, त्रिकोण, बिंदु अशा भौमितीक आकारांचे बनले आहे. या शिल्पात 'ओं गं गणपतये" या बिजक्षरांची बनविली आहे. कदाचित तांत्रिक उपासकांनी निर्मिती केली असावी. कालखंड दहावे ते अकरावे शतकातील असावा.

**पहूर** (18° 22'57" N, 73° 16'6" E )

रोहयाच्या आग्नेयेकडील १८ किलोमीटर अंतरावरील गावात उल्लेखनीय पुरावशेष आहेत. गावातील शिवमंदिर व रहाटीतील भैरी, जननी या ग्रामदेवतांचा जीर्णोध्दार झाला आहे. पुरावशेष मूर्ती- शिल्पांच्या रूपाने या परिसरात आहेत. शिवमंदिराच्या बाजूस सतीशिळा, वीरगळ व शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारल्या जाणाऱ्या कोरीव दगडांचे अवशेष येथे आहेत. वीरगळ व सतीशीळा एकत्र असलेली आयताकृती शिळेवर एकाच बाजूस तीन टप्प्यात पायी लढणारा वीर घोडयावर स्वार शत्रूशी लढताना दिसतो. वरच्या टप्प्यात सती जाणारी स्त्री घोडयावर स्वार झालेली व आपल्या दोन हाताने कडेला उभ्या असलेल्या पुरुषांच्या डोक्यावरील भांडयात हात ठेवले आहेत किंवा ती त्यांना आशिर्वाद देत आहे. सर्वात वरच्या म्हणजे तिसऱ्या टप्प्यात सतीच्या बांगडया भरलेला हात आशिर्वाद देताना दिसतो व त्याच्या वरच्या जागेत ते जोडपे पूजा करताना दिसतो. या शिळेच्या अर्धवर्तुळाकृती शीर्षभागी मंगलकलश दाखविला आहे. या ठिकाणी दोन सुस्थितीतील व एक भग्नावस्थेतील वीरगळ आहेत. यांवर नेहमीची दृश्ये कोरली आहेत. आकाराने लहान एकच टप्प्यातील वीरगळ आहे. यात वीर एकाच शत्रूशी दोन हात करताना दिसतो. या ठिकाणी पद्मासन अवस्थेतील व नमस्कार मुद्रेतील पुरुष प्रतिमा ३० सेंटीमीटर उंच व २५ सेंटीमीटर रूंद या शिवाय दोन हातांच्या अनेक सुमारे २५ सेंटीमीटर उंचीच्या व १५ सेंटीमीटर रूंदीच्या स्थानक व त्रिभंग अवस्थेतील पुरुष व स्त्री शिल्पे आहेत. कडेवर मूल घेतलेल्या स्त्रीचे भग्न शिल्प ही पहायला

मिळते. सुमारे ७५ सेंटीमीटर व्यासाचे, खुर व कुंभ थर असलेले गोलाकार भग्न पीठ आढळते. यावर सुटे लिंग ठेवले जात असावे. शिवाय चंद्रशिलेचा, शंखावटीचा भग्न तुकडा दिसून येतो. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ पायऱ्याच्या दुतर्फा असणाऱ्या कठडयाचे भागही येथे अवशेष रूपाने शिल्लक आहेत. मंदिरात गणेशाची चार हातांची शिलाहार शैलीतील सुबक मूर्ती, तसेच झीज झालेली विष्णू व नंदीची प्रतिमाआहे. या सर्व शिल्पावषेशांच्या शैलीवरून हे अवशेष अकराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंतचे असावेत असे दिसते. गावाच्या रहाटीत भैरी या स्थानिक देवतेच्या मंदिरासमोर सुमारे १० सेंटीमीटर लांबी व ४० सेंटीमीटर रूंद अशी तीन देवतांची शिल्पे आहेत. रहाटी परिसरात लाल रंगाची व तोटी असलेली खापरे आढळून येतात. पहूर गावच्या हद्दीत असलेल्या जननी दुर्गाच्या पश्चिमेकडील भागात एक नैसर्गिक गुहा आहे. या गुहेचा वापर वास्तव्यासाठी केल्याच्या खोदीव कामाच्या खुणा येथे दिसून येतात.

पहूर गावाच्या पश्चिमेस असलेल्या या गुहेस "गोसाव्याचा मठ" या नावाने ओळखले जाते. ही गुहा सुमारे १५ मीटर पूर्व-पश्चिम पसरली आहे. मुखाशी ४.८० मीटर तर यातील शेवटाकडील भागात २.५० मीटर इतकी रूंद आहे. तळाचा भाग गाळाने भरला असूनही गुहेची उंची सुमारे दोन मीटर आहे. गुहेच्या दर्शनी भागावर छिन्नीच्या खुणा आहेत. शिवाय गुहेच्या दक्षिण बाजूस सुमारे सहामीटर लांब व एकमीटर रूंदीचे शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेला एक दगडी कठडा केलेला दिसतो. हा भाग सध्या उखडला गेला असून त्याचे दगड अस्ताव्यस्त पसरले आहेत. या गुहेच्या दक्षिण दिशेला सुमारे २० मीटर अंतर चालत गेल्यावर कातळात खोदीव पाण्याचे दोन टाक आहेत. पण सध्या ते मातीने भरून गेले आहेत.

**तळवली** (18° 23'3" N, 73° 13'29" E )

हे गाव मुंबई-गोवा महामार्गावर रोहयाच्या आग्नेयेस १४ किलोमीटर अंतरावर वसले आहे. तळवली गावाजवळून रोहा ताम्हाणे मार्गे पुणे हा मार्ग ही जातो. या ठिकाणी वाणी समाजाची जास्त लोकसंख्या असल्यामुळे या गावाला वाण्याची तळवली असेही म्हटले जाते. रोहा तालुक्यात तळवली नावाची दोन गावे आहेत. एकमेकांपासून फरक लक्षात यावा म्हणून वाण्याची तळवली हे या गावात बैलावरून वाहतुक करणारे वाणी तळ देवून राहतात यांची पुढे वस्तीत रूपांतर झाल्याने या गावात तळवली म्हटले जाते असे स्थानिकांचे म्हणणे आहे. या गावात महत्त्वपूर्ण पुरावशेष आहेत. गावातील हनुमान मंदिरातील चपेट मुद्रेतील हनुमान मूर्ती

जरी अलिकडच्या काळातील असली तरी मंदिरासमोर ‘दीपवत ’ हा दगडी दीपस्तंभ आहे. गावाच्या मुंबई-गोवा महामार्गालगत दत्तमंदिर भागात कातळात कोरलेली पाण्याची टाकी आहे. या टाकीचे लांबी ७० मीटर रूंदी १.२० मीटर खोली आहे. जमिनीच्या पातळीवर या टाकीस चार मुखे खोदली आहेत. या मुखाचे माप सुमारे ०.७० मीटर आहे (छायाचित्र क्रमांक ६). अशा प्रकारच्या पाण्याच्या कातळात कोरीव टाक्या रायगड जिल्हयाच्या महाड, श्रीवर्धन,रोहा या तालुक्यांत आढळून आल्या आहेत. या प्रकारची रचना इसवीसनाच्या सुरूवातीच्या कालखंडात खोदल्या गेलेल्या नाणेघाट , महाड इत्यादि कातळात कोरीव लेणींच्या सानिध्यात आढळणाऱ्या पाण्याच्या टाक्यांप्रमाणेच आहे. या साम्यावरून ही पाण्याची टाकी ही इसवीसनाच्या सुरूवातीच्या काळातील म्हणजे पहिल्या शतकापासून ते सहाव्या शतकापर्यंत असावी.

**वरसगाव** (18° 23'25” N, 73° 12'47” E )

मुंबई-गोवा या महामार्गावर वरसगाव हे दक्षिणोत्तर पसरलेल्या डोंगर रांगेच्या पूर्वउतारावर वसले गावातील श्री सापया या स्थानिक देवतेच्या मंदिर परिसरात गावातील पुरावशेष आढळून येतात. मंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार होवून तेथे आधुनिक काळातील गणेश, नंदी व शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे. वीरगळांचे दोन भग्न व झीज झालेले दीपवत स्तंभाचे अवशेष व गजलक्ष्मी शिल्पाचा अत्यंत झीज झालेला भाग एवढेच अवशेष या मंदिर परिसरात शिल्लक आहेत. गावातील भैरवाचे स्थान असलेल्या ठिकाणी घोडयावर आरूढदेवतेच्या चार हातांपैकी हातामध्ये कपाल, त्रिशूळ, डमरू व घोडयाचा लगाम धरलेली एक मूर्ती तर दुसरी तशीच परंतु आकाराने लहान ७० सेंटीमीटर उंच व ४० सेंटीमीटर रूंद अशी आहे. या दोन शिल्पांच्या मागे भग्न व अत्यंत झीज झालेल्या तेवढयाच उंचीच्या दोन मूर्ती ठेवण्यात आल्या आहेत. या ठिकाणी एका रात्रीत निगडीच्या काठयांचे मंदिर उभारावे नाहीतर ते बंधूच नये अशी अख्यायिका सांगितली जाते.

सापया देवाच्या दाराजवळ पूर्वाश्रमीच्या ‘महार’ जातीचे देवस्थान असल्याचे सांगितले जाते. हे देव म्हणजे वीरगळ शिल्पे आहेत. मंदिर परिसरात जुनी स्मशानभूमी आहे. मंदिरासमोर मराठा कालखंडातील अत्यंत झीज झालेल्या आयताकृती दगडी स्मृती समाध्या आहेत. गावाच्या पूर्वेकडे भवानी देवीचे स्थान आहे. येथे एक महिषासुरमर्दिनी प्रकारची मूर्ती आहे. तर दुसऱ्या स्त्री देवतेचे वाहन वाघ आहे. या सर्व शिल्पांच्या शैलीवरून बाराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या काळातील हे अवशेष असावेत.

**पाथरशेत** (18° 23'24” N, 73° 16'53” E )

रोह्यापासून हे गाव १८ किलोमीटर आग्नेय दिशेस आहे. येथील छोट्या धरणात एका शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेल्या मंदिराचा चौथरा आहे. येथे नंदी, भग्न गजलक्ष्मी, एक सुमारे दीड मीटर उंचीचा वीरगळ, स्मृती समाधी शिळा इत्यादि अवशेष आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष अकराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत. अत्यंत झिजलेली दोन उल्लेखनीय शिल्पे मात्र आठव्या शतकातील असावीत. येथून उत्तरेस सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या जामगाव येथील शिवमंदिराजवळच एक चौकोनी आकाराचा खांब प्रकारचा वीरगळ आहे. शिल्पशैलीवरून बाराव्या तो शतकातील असावा.

**कुडली** (18° 24'47” N, 73° 18'57” E )

कुडली हे गाव रोहापासून २३ किलोमीटर अंतरावर पूर्वेस आहे. येथील भैरवाच्या मंदिराबाहेर वराहाची किंवा अस्वलासारख्या प्राण्याची शिकार करताना वीरगतीस प्राप्त झालेल्या व्यक्तीचा वीरगळ पाहायला मिळतो. येथे एक शेंदूर व चुना लावलेली गद्धेगळ शिळा पाहायला मिळते.

**कामथ** (18° 26'38” N, 73° 16'25” E )

रोह्याच्या काहीसे पूर्वेस १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या कामथ, येरळ, धगडवाडी या गावांचे एकच देवस्थान कामथ गावाच्या हद्दीत कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर आहे. येथे शिवमंदिराचे अवशेष आहेत. याशिवाय येथे भैरवनाथाचे मंदिर आहे. मंदिरासमोर दीपवत आहे. शिवमंदिराचे अवशेष एकत्र ठेवले आहेत. येथे एक गणेश प्रतिमा, नंदी, विष्णू मूर्ती पाहायला मिळते. यांची शिल्पशैली चौदाव्या शतकातील काळ दर्शविते. आयताकृती आकाराचे व एकाच बाजूवर शिल्पांकित केलेले दोन वीरगळ येथे आहेत. या मंदिराचा काही भाग धरणात बुडाला असल्याचे लोक सांगतात.

**तिसे** (18° 23'1” N, 73° 14'5” E )

रोहयाच्या आग्नेयदिशेस १६ किलोमीटर अंतरावर तिसे हे गाव मुंबई-गोवा महामार्गावरील एका मोठया टेकडीच्या पश्चिम पायथ्याशी वसले आहे. गावात आणि गावामधील टेकडीवर महत्त्वपूर्ण पुरावशेष आहेत. गावात सोमजाई, काळभैरी, चेडोबा, मरिआई, गारमाता, धाकसुतदेव या देवतांचे स्थान आहे. टेकडीवर जननी, केदारेश्वर, पद्मावती या स्थानिक ग्रामदैवतांची

स्थाने आहेत. गावातील गावदेवी मंदिरात आधुनिक काळातील शिल्पे व काही झीज झालेली मराठा काळातील शिल्पे आहेत. मंदिरासमोर सुमारे ३ मीटर उंचीचा दीपस्तंभ आहे. गावातील टेकडीस जननीचा दुर्ग असे म्हटले जाते. ही टेकडी समुद्रसपाटीपासून ३८६ मीटर उंच, तर तळापासून २८४ मीटर इतकी उंच आहे. टेकडीवर पद्मावती, केदार जननी व शिवाची दोन मंदिरे आहेत. या सर्वोच्च ठिकाणी फक्त तिसे गावाकडूनच चढता येते.

या संरक्षक वसाहत असलेल्या टेकडीवर जाण्यासाठी काही ठिकाणी कातळात पायऱ्या खोदल्या आहेत. टेकडीच्या वायव्येस समुद्रसपाटीपासून ३४६ मीटर उंचीवर कातळात खोदीव आयताकृती मुखाच्या पाण्याच्या टाक्या आहेत (छायाचित्र क्रमांक ४). या सुमारे चार ते पाच मीटर लांब, एक ते दीड मीटर रूंद, तर दोन ते अडीच मीटर खोल आहेत. यानंतर पुढे सुमारे ५० मीटर अंतरावर चौथ्या टाकीजवळ कातळात एका योध्द्याची फक्त बाहयकृती खोदली आहे. त्याच्या हातातील तलवार व ढाल स्पष्ट दिसते. येथे पाण्याच्या टाक्यांचे अवशेष आहेत. किल्याच्या सर्वोच्च ठिकाणी म्हणजे समुद्रसपाटीपासून ३९० मीटर उंचीवर पद्मावती, केदार, जननीची मंदिरे आहेत. यातील सर्वमंदिरांचा जीर्णोध्दार झाला आहे. मूळ मंदिराचे शुष्कसांधी बांधीव अवशेष व मूर्ती शिल्पे मंदिर परिसरात पहायला मिळतात. पद्मावती व जननीदेवीचे मंदिर उत्तराभिमुख आहे. हे मंदिर अंतराळ व गर्भगृह एवढयाच तलविन्यासाचे बनले आहे. मंदिर एका दगडी चौथऱ्यावर उभारले गेले आहे. मंदिराचे पीठ हे खुर, कुंभ, अंतरपत्र, कर्णीका व त्यावर साधी, कोणतेही शिल्प नसलेली जंघा आहे (छायाचित्र क्रमांक ५). यास शुध्द जंघा असे म्हणता येईल. अंतराळात दोन देवकोष्ठ आहेत. सध्या ती रिकामी आहेत. गर्भगृहाचे द्वार अलंकृत असून ठळक स्तंभशाखेवर उत्तरांग आधारलेले आहे. उत्तरांगावर घंटेच्या आकाराचे कळस आहेत. अंतराळ व गर्भगृहात चार अर्धस्तंभ आहेत. त्यांचा घटकक्रम चौकोन तळखडा, चौकोनीखांब वर अष्टकोन, त्यावर गोलाकार खांब आहे. अंतराळावर शुकनास आहे. व गर्भगृहावर नागर शैलीतील शिखर आहे. मूळ शिखरास सिमेंटचा थर दिला असल्याने त्या नेमके स्वरूप आज समजत नाही. पंचरथ पध्दतीच्या या गर्भगृहाच्यामागील बाजूस देवकोष्ठ असून यात महिषासुरमर्दिनी प्रकारची त्रिभंग, स्थानक, चार हातांची मूर्ती आहे. देवीच्या खालच्या उजव्याहातातील त्रिशुळाने महिषरूपी रेडयावर हल्ला चढवला आहे.तर वरच्या उजव्या हातात खड्ग, वरच्या डाव्या हातात खेटक, डाव्या खालच्या हाताने महिषाच्या तुटलेल्या धडातून प्रकट झालेल्या दैत्याचे डोके धरले आहे. देवीचे वाहन सिंहाने रेडयावर देवीच्या उजव्या बाजूने हल्ला चढविला आहे. शिल्प झीज झालेले असले तरी डौलदार व आवेशयुक्त आहे. मंदिराच्या पूर्वेकडील बाजूला मकरप्रणाल आहे. सध्या मंदिराच्या

गर्भगृहात आधुनिक काळात बसविलेली दोन शिल्पे आहेत. येथील मूळ मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे. दुर्गावर नैऋत्यदिशेला ३३७ मीटर उंचीवर चौथी, तर दुर्गाच्या ईशान्येस आयताकृती मुखाची सुमारे चार मीटर लांब व १.५० मीटर आकाराची पाचवी टाकी आहे.

दुर्गावरील इतर शिल्पे व वास्तू

केदारेश्वर या शिवमंदिराच्या मागे प्रमाणबध्द् नसलेल्या चार हातांची व दोन हातांची अशी दोन शिल्पे आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील असावीत. केदारेश्वराचे मंदिरही शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारले आहेत. आज त्याचा काही भाग सिमेंट मध्ये बांधून त्यावर प्लॅस्टरचा केला आहे. वर्तुळाकार भागात लिंग ठेवण्यासाठी आरपार छिद्र असलेले व पन्हळयुक्त भग्न योनीपीठ येथे पहायला मिळते. याशिवाय खाली चौकोन, वर अष्टकोनाकृती त्यावर गोल व शीर्षभाग निमूळता असलेले लिंग ही आढळते. एका ६० सेंटीमीटर लांबी व ३० सेंटीमीटर रूंद कोरीव शिळेवर चार मुखे कोरली आहेत. भग्ननंदी दोन शिल्पे, त्रिभंग अवस्थेतील ४० सेंटीमीटर उंचीचे स्त्रीचे भग्न शिल्प, याशिवाय झाडाझुडपात व मातीत गाडलेली इतर शिल्पे दिसतात.

तटबंदीचे अवशेष

दुर्गाच्या पश्चिम बाजूस काही ठिकाणी मोठया आकाराचे नैसर्गिक खडक रचून तर काही ठिकाणी शुष्कसांधी बांधीव तंत्राने बेसाल्ट तसेच जांभ्या दगडात बांधलेल्या तटबंदीचे अवशेष पहायला मिळतात. तसेच आज ढासळलेल्या तीन ते चार थरांचे बांधकाम असलेले चौथरे, मंदिर परिसरात व दुर्गाच्या दक्षिण बाजूसही दृष्टीस पडतात, मात्र झुडुपांमुळे त्यांचे नेमके स्वरूप लक्षात येत नाही. दुर्गाच्या पश्चिम बाजूस एक गुहा असून तिचा उपयोग टेहळणीसाठी केला जात असावा. याचे वर्णन पहूर गावाच्या सर्वेक्षणात केले आहे.

**भिसे** (18° 29'46” N, 73° 6'43” E )

रोह्याच्या उत्तर दिशेस सात किलोमीटर अंतरावर भिसे हे गाव आहे. गावातील शिवमंदिर व काळभैरी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. आधुनिक काळात येथे नंदी, पार्वती विष्णू, गणेश प्रतिमांची स्थापना करण्यात आली आहे. स्थानिक भिसाई देवीची प्रतिमा महिषासुरमर्दिनी पद्धतीची आहे. गावातील भग्न मूर्ती मेढा गावातील तळयात विसर्जन करण्यात आल्या. भिसाई मंदिराजवळ जुन्या मूर्तीचा महिषाचा असलेला भाग असलेला तुकडा आढळला आहे. तसेच शिवमंदिराजवळ शुष्कसांधी बांधीव मंदिराच्या दगडी शिळा व भग्न नंदीचे अवशेष

आढळून येतात. शिल्पशैलीवरून हे अवशेषबाराव्या शतकातील असावेत. भिसेगावापासून उत्तरेस एक किलोमीटर अंतरावर असलेल्या राजवाडी गावाशेजारील टेकडीवर ‘महारकड्यात’ पूर्वी किल्ला बनविणार असल्याची वदंता या परिसरात आहे.

**मेढा** (18° 29'9” N, 73° 6'43” E )

हे महत्त्वपूर्ण गाव एका मोठया तलावाकाठी वसले आहे. रोहा-भिसेखिंड-नागोठणे या मार्गावरील हे मोठे गाव आहे. गावातील वाकेश्वर मंदिर परिसरात व तलावाकाठी गावातील पुरावशेष आढळून येतात. वाकेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, मंदिराचे मराठा काळात उभारलेल्या दगडी गर्भगृहास आता संगमरवरी फरश्या बसविण्यात आल्या आहेत. तलावाशेजारी अठराव्या शतकातील, दगड व विटाच्या सहाय्याने उभारलेली दोन समाधी मंदिरे आहेत. वाकेश्वर मंदिरासमोर एक उध्वस्त अवस्थेतील चौथरा आहे. यावर कोणतेही धार्मिक बांधकाम नाही तलावाच्या काठी असलेल्या पिंपळवृक्षाच्या जवळ शिलाहार पध्दतीच्या गणेश, महिषासुरमर्दिनी, विष्णू प्रतिमा भग्नावस्थेत आढळून येतात.

**निडी तर्फे अष्टमी** (18° 27'22” N, 73° 6'29” E )

रोहयाच्या वायव्येस चार किलोमीटर अंतरावर व कुंडलिका नदीच्या उत्तर काठावरील या गावात ‘मरूआई व जाकमाता’ या स्थानिक देवतांच्या मंदिर परिसरात येथील पुरावशेष येथील मूर्ती व शिल्पांच्या रूपाने आढळून येतात. जाकमाता मंदिराच्या मागे सुमारे एकमीटर उंचीच्या दोन प्रतिमा आहेत. सध्या भग्नावस्थेतील व अत्यंत झीज झालेली असली तरी ही शिल्पे वेगळया धाटणीची आहेत. एका आयताकृती शिळेवर आजानबाहू हात असलेली दोन हातांची एक पुरूष प्रतिमा या शिवाय मोठे तोंड असलेली दोन हातांची गुडघ्यावर बसलेली व या दोन हातांमध्ये कुंभासारखी वस्तू धारण करणारी दुसरी उल्लेखनीय प्रतिमा आहे. या बहुदा प्राचीन यक्ष परंपरेतील प्रतिमा शैलीवरून इसवीसनाच्या सुरवातीच्या शतकांतील असाव्यात. या यक्षांचे स्वरूप नाशिक येथील लेणीच्या तळाशी भारवाहकांसाखे आहे. गावच्या भौगोलिक स्थितीवरून येथे पूर्वी बंदर असावे.

**पाले तर्फे अष्टमी** (18° 29'21” N, 73° 5'55” E )-

गावातील भवानी स्थानिक देवतेच्या परिसरात शिवमंदिर आहे. येथील शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिरासमोर मराठा काळातील दीपवत व मंदिरात नंदी, विष्णू, गणेशयांच्या प्रतिमा आहेत. शैलीवरून त्या मराठा काळातील वाटतात. या शिवाय

मंदिराशेजारील आंब्याच्या बुंध्यात दोन भग्नावस्थेतील विरगळ तुकडयांच्या स्वरूपात आढळून आले.

**वरवडे** (18° 29'16” N, 73° 5'53” E )


गावातील काळभैरव या टेकडीवरील गावदेवाचा जीर्णोद्धार झाला असून भग्न मूर्ती शिल्पांचे विसर्जन करण्यात आले व काळया संगमरवरातील शिल्पांचे स्थापना करण्यात आली आहे. येथील महत्त्वपूर्ण पुरावशेष विसर्जित झाले आहेत.

**मढाली खुर्द** (18° 28'2” N, 73° 7'30” E )

रोहयाच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावरील अवचित गडाच्या दक्षिण उतारावर हे गाव आहे. गावाबाहेरील तपस्विनी या स्थानिक देवतेचे चार हातांची स्थानिक प्रतिमा आहे. शैलीवरून ही प्रतिमा मराठा कालखंडातील वाटते पूर्वी या गावातून अवचित गडावर जाणारा एक मार्ग अस्तित्वात होता. ही ग्रामदेवता पिंगळसईच्या योगेश्वरी देवतेची बहीण मानली जाते.

**वैजनाथ** (18° 27'15” N, 73° 13'36” E )

रोहयाच्या ईशान्येस वैजनाथ हे गाव आहे. गावात एका तळ्याकाठी शिव व भैरवाचे स्थान आहे. या भागात येथील पुरावशेष आहेत. इथे आयताकृती व तीन टप्यातील दोन वीरगळ मंदिरासमोर व दोन वीरगळ शिवमंदिराच्या भिंतीत बसविले आहेत. गावाच्या पूर्वेस सुरगड नावाची संरक्षक वसाहत आहे. येथे मध्ययुगातील अरबी व मराठी भाषेतील लेख आहे. याशिवाय चांगल्या अवस्थेतील तटबंदी व बुरुज आहेत. येथे काही उध्वस्त इमारती व शिल्पे आहेत. या संरक्षक वसाहतीच्या परिसरात आढळणारे अवशेष व कातळात कोरलेले पाण्याची टाकी पाहता ही संरक्षक वसाहत उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील असावी पुढे तिचा वापर आधुनिक काळापर्यंत चालू होता.




तालुका :तळा व माणगाव

१:२७५०००

**संकेत सुची**

| | |
|---|---|
| किल्ला | ⌘ |
| गद्धेगळ | ▪ |
| गायवासरू | ◆ |
| तालुक्याचे ठिकाण | × |
| आद्यऐतिहासिक अवशेष | ∘ |
| पुर्वमध्ययुगीन अवशेष | ▫ |
| मध्ययुगीन अवशेष | ◇ |

Created using GADM data in QGIS. Projection : EPSG 24343.

नकाशा क्रमांक ३ तळा व माणगाव तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

## ३.३ माणगाव तालुक्याचा सर्वेक्षण वृत्तांत (नकाशा क्रमांक ३)

**भादाव** (18° 14'11” N, 73° 17'43” E )

जुन्या माणगावपासूनदोन किलोमीटर अंतरावर पूर्वेस काळनदीच्या दक्षिण तीरावर भादाव गावाच्या जुन्या स्मशान भूमीत काळभैरी आणि सोमेश्वर नावाच्या स्थानिक देवतांच्या मंदिरात दोन शिल्पे आहेत. त्यांच्या शिल्पशैलीवरून ती सतराव्या किंवा अठराव्या शतकातील असावीत. मंदिराबाहेर याच काळातील दीपवत पाहायला मिळते.

**विचवली** (18° 13'54” N, 73° 19'25” E )

माणगावपासूनदोन किलोमीटर अंतरावर पूर्वेस हे गाव आहे. गावाच्या कोकमीचा डोंगराच्या जवळच विचवली गावातील जुने अवशेष पहायला मिळतात. सोमजाई या स्थानिक देवतेच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असला तरी महिषासुरमर्दिनी स्वरूपातील दोन भग्न शिल्पे आहेत. चार हातांच्या मूर्तीचे स्वरूप प्राचीन पद्धतीचे असले तरी हे शिल्पशैलीवरून मराठा काळातील असल्याचे दिसते. भग्न शिवलिंग व रेखीव नंदीचे शिल्प आहे. मंदिरासमोर अठराव्या शतकातील दीपवत म्हणजे दीपमाळ आहे.

**ढालघर** (18° 13'17” N, 73° 17'34” E )

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगावच्या दक्षिणेस दोन किलोमीटर अंतरावरील गावात आधुनिक काळात बांधलेल्या नवनाथ मंदिरासमोर असलेल्या पारावर मारुतीची प्राचीन शैलीतील चपेट मुद्रेतील व डाव्या पायाखाली राक्षसास दडपणारी मूर्ती, शेंदूर आणि तेल चोपडलेली पाहायला मिळते. शिल्पशैलीवरून तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील वाटते. या शिवाय गावातील शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून पूर्वी येथे गणेश, नंदी, विष्णू यांची झीज झालेली शिल्पे होती गावकऱ्यांनी जुन्या मूर्ती विसर्जन करून नवीन स्थापल्या आहेत.

**लोणशी** (18° 12’54’’ N, 73° 17’14’’ E)

माणगावपासून दक्षिणेस हे गाव असून येथे चौंडाई देवी व बापुजी या स्थानिक देवतेचे स्थान आहे. हे मंदिर पूर्वी मोहल्ला भागात होते. आता त्याचे स्थलांतर झाले आहे. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत.

**माणगाव** (18° 13'24” N, 73° 16'51” E )

माणगाव हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. काळ नदीच्या पूर्व तीरावर जुने माणगाव आहे.येथे काळ व घोड नद्यांचा संगम होतो. येथे संगमेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथे दोन वीरगळ व एक सतीशिळा आहे. गावदेव काळभैरी या ठिकाणी एक नंदी व दोन शिल्पे आहेत शैलीवरूनहे वीरगळ बाराव्या शतकातील, तर इतर शिल्पे मराठा कालखंडातील वाटतात.

**उतेखोल** (18° 14'35” N, 73° 17'43” E )

माणगावच्या उत्तरेस जेमतेम एक किलोमीटर अंतरावर काळनदी काठावर गाव आहे. या गावात वाकडाई या गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार झाला. मराठा काळातील भग्न शिल्पे मंदिर परिसरात रचलेली पहायला मिळतात. त्यांच्या शैलीवरून ती मराठा काळातील असावीत.

**बामनोली** (18° 14'19” N, 73° 15'39” E )

माणगावच्या वायव्येस दोन किलोमीटर अंतरावर बामनोली गावामागील टेकडीच्या उतारावर एक पूर्वाभिमूख अशी कातळात कोरलेली बाक नसलेली लेणी आहे. तिची लांबी ३.३० मीटर, रूंदी २.६० मीटर व उंची २.४० मीटर आहे. हा एक सपाट भिंती असलेला, एक खोली पद्धतीचा विहार आहे. याचा तलविन्यास व साध्या स्वरूपावरून हा इसवीसनाच्या पहिल्या अथवा दुस-या शतकातील असावा. गावात काळभैरव या स्थानिक देवाचे कौलारू मंदिर आहे. मंदिर परिसरात दगडी दीपवत, भग्ननंदी, योनीपीठ व शुष्कसांधी बांधीव मंदिराचे अवशेष आहेत. यात एक मीटर लांबीचा कक्षासनाचा भाग, एक त्रिकोणी तळखडा असलेला भग्न स्तंभ आहे. चांगल्या अवस्थेतील आयताकृती दोन वीरगळ, एक सतीशिळा, काही नक्षीदार शिलाखंड व स्तंभशीर्ष असे अवशेष आहेत. दोन्ही वीरगळाच्या अर्धवर्तुळाकृती शीर्षभागात वर झाकणी असलेले व मध्यभागी फीत गुंडाळलेला कलश दाखविला आहे. एक वीर घोडयावर बसलेल्या शत्रूशी लढताना दिसतो. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत. याशिवाय काळभैरव मंदिरात मराठा काळातील चार शिल्पे आहेत. मंदिरात खोल गर्भगृहात गोलाकार पन्हाळयुक्त लिंग व नंदी आहेत. मंदिराबाहेर जुनी स्मशानभुमी असून मराठा काळातील समाध्या म्हणजे स्मृतीशिळा आहेत.

**कळमजे** (18° 14'52" N, 73° 15'38" E )

हे गाव बामणोली ग्रामपंचायत समुहातील काळ नदीच्या काठावरील छोटेसे गाव आहे. गावातील सोमजाई व काळभैरव या स्थानिक देवतेच्या मंदिर परिसरात गावातील पुरावशेष आहेत. यामध्ये झीज झालेल्या अवस्थेतील नंदी, भग्न शिवकालीन चार हातांचे प्रमाणबध्द नसलेले एक शिल्प शिवमंदिरात आहेत. मंदिराच्या मागच्या बाजूला सुमारे ७० सेंटीमीटर उंची आणि ३५ सेंटीमीटर रूंदीच्या चार हातांचा स्थानक व समभंग अवस्थेतील दोन पुरुष व एक स्त्री शिल्पे आहेत. या मूर्तीच्या डाव्या पायाजवळ त्याचे वाहन कुत्रा फक्त खोदीव रेघेने दाखविला आहे. दुसऱ्या भग्न स्त्री शिल्पाच्या खालच्या उजव्या हातात कमडंलु सारखी वस्तू, वरच्या उजव्या हातात धान्याची तुरमी, वरच्या डाव्या हातात कमळ, खालच्या डाव्या हातातील वस्तू कळत नाही या मूर्तीच्या पायाच्या भागात फणा काढलेला लांबसडक नाग दिसतो. गळयात गळसरी व कटीवस्त्र परिधान केलेल्या या मूर्तीच्या कानात वलये, मुकुट काहीसा टोपी सारखा आहे. या तिन्ही मूर्ती शैलीवरून पंधराव्या किंवा सोळाव्या शतकातील वाटतात. मंदिराजवळ सहा थरांची दगडी दीपवत आहे. गावातील 'घाटना आणि परडनी' या भागात काळया व लाल रंगाची खापरे पावसाळयात सापडतात.

**खांदाड** (18° 14'9" N, 73° 16'51" E )

माणगावच्या दक्षिणेस जेमतेम सुमारे एककिलोमीटर अंतरावर घोड आणि काळ नद्यांच्या संगमावर खांदाड हे गाव आहे. येथील गावदेव भैरवमंदिराचाजीर्णोध्दार झाला असून येथे चार हातांची स्थानक व समभंग अवस्थेतील दोन शिल्पे आहेत. सुमारे ७० सेंटीमीटर उंच आणि ४०सेंटीमीटर रूंद दोन्ही शिलाच्या पाठशिळेचा भाग नक्षीने अलंकारीक बनविला आहे. दोन्ही देवतांना झग्यासारखे वस्त्र दाखविले असून शिल्पशैलीवरून या मूर्ती मराठा काळातील असाव्यात. या शिवाय येथे भग्नावस्थेतील गणेशशिल्प व नमस्कार मुद्रेतील व पद्मारूनातील ३० सेंटीमीटर उंच व २५ सेंटीमीटर रूंद पुरुष शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून ती चौदाव्या शतकातील असावीत. या मंदिराच्या परिसरात राखाडी व लाल रंगाच्या मृदभांडयाचे अवशेष आढळतात.

**नाणोरे** (18° 15'14" N, 73° 16'26" E )

माणगावच्या उत्तरेस दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात शिवमंदिराचा १२ x ८ मीटर आकाराचा शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेला चौथरा पाहायला मिळतो. हा चौथरा

उध्वस्त अवस्थेत आहे. शेजारीअसलेल्या बापदेव मंदिराजवळ आयताकृती आकाराचे दोन वीरगळ, भग्न दुर्गादेवी शिल्प, नंदी, आणि इतर भग्न अवशेष आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

**होडगाव** (18° 13'54” N, 73° 19'25” E )

माणगावच्या आग्नेय दिशेस चार किलोमीटर अंतरावर हे सामान्य गाव आहे. गावा बाहेर गावदेवांचे मंदिर जीर्णोद्धार झालेले पाहायला मिळते. तेथे एक ४० सेंटीमीटर उंचीचे गणेशाचे शिल्प आहे. हे शिल्प तेलाने माखलेले असले तरी याची शैली अकराव्या शतकातील शिलाहार गणेश शिल्पासारखी आहे. एका नक्षीदार पीठावर झिजलेली तीन शैव शिल्पे पाहायला मिळतात. मंदिराच्या मागच्या बाजूस चार हातांची भग्न झालेली समभंग व स्थानक स्वरूपातील भैरवमूर्ती पाहायला मिळते. शैलीवरून मराठा व पेशवे काळातील जीर्णोद्धाराच्या वेळच्या या मूर्ती असाव्यात. मंदिराजवळ स्मशान भूमी आहे. काही मराठा व नंतरच्या काळातील कोरीव समाध्यांचे अवशेष आढळतात.

**जावळी** (18° 13'5” N, 73° 18'40” E )

माणगावच्या आग्नेयेस तीन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून मंदिरातील गाभाऱ्यात काही झिजलेली आणि भग्न सुटी शिल्पे आहेत. या शिवाय पूर्णपणे भग्न असलेली परंतु वैशिष्ट्यपूर्ण अशी शिलाहारकालीन गणेश प्रतिमा आहे. शिवाय मंदिराबाहेर महिषासुरमर्दिनीचे कमरेपासून शिल्लक असलेले भग्न शिल्प आहे. ही शिल्पे त्यांच्या धाटणीवरून तेराव्या ते चौदाव्या शतकातील वाटतात.

**खर्डी खुर्द** (18° 14'3” N, 73° 20'43” E )

माणगावच्या पूर्वेस साडेचार किलोमीटर अंतरावर गाव आहे. गावाचे ग्रामदैवत वाघजाई हे आहे. येथे काही अनोळखी भग्न शिल्पे आहेत. त्यांच्या स्वरूपावरून ते सतराव्या किंवा अठराव्या शतकातील असावेत.

**मुगवली** (18° 12'48” N, 73° 19'2” E )

हे गाव माणगावच्या आग्नेय दिशेस साडेचार किलोमीटर अंतरावर येथे असलेल्या स्वयंभू गणपतीसाठी प्रसिद्ध आहे. या मंदिराचा पूर्ण जीर्णोद्धार झाला असून मंदिराजवळ कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. गावातील एका शेतात मराठा काळातील पश्चिम बाजूने आत

उतरण्यास पायऱ्या असलेल्या विहिर किंवा आड आहे. सुमारे ३.५० मीटर भागात पायऱ्या आहेत, तर पुढचा चौकोनी आकाराचे क्षेत्र ४.४० मीटर वर्ग आहे. विहिरीत २.५० मीटर खोलीवर गाळ साठला आहे. ही विहीर सतराव्या शतकातील असावी.

**हातकेली** (18° 13'2” N, 73° 19'29” E )

माणगावच्या आग्नेय दिशेस पाच किलोमीटर अंतरावर गाव आहे. गावदेव बहिरी मंदिराजवळ व परिसरात कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष आढळले नाहीत.

**साई** (18° 11'36” N, 73° 11'27” E )

माणगावच्या पश्चिमेस पाच किलोमीटरअंतरावर गाव आहे.परिसरात कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागे असलेल्या टेकडीवर शिवकालीन किल्ला होता असे लोक सांगतात. सध्या टेकडीवर काही अवशेष पाहायला मिळत नाहीत.

**पन्हाळघर** (18° 10'10” N, 73° 21'12” E )

माणगावच्या दक्षिणेसलोणेरे गावाजवळ असलेली ही संरक्षक वसाहत एका छोट्या टेकडीवर वसली आहे. येथे इमारतीचे अथवा तटबंदीचे फारसे अवशेष नाहीत. येथे काही कातळ कोरीव टाक्या आहेत. एकंदर रचणे वरून हा किल्ला उत्तर ऐतिहासिक अथवा मध्ययुगीन काळात निर्माण झाला असावा (जोशी २०११).

**विहुळे** (18° 12'17” N, 73° 12'1” E )

विहुळे हे गाव माणगावच्या नैऋत्येस नऊ किलोमीटर अंतरावर आहे. या गावाचा उल्लेख शिलाहार नृपती अपराजितच्या सन ९९३ च्या जंजिरा ताम्रपटात आला आहे मिराशी (१९७४: २१-३३). या ठिकाणी गावदेव मंदिराजवळ एक चौकोनी खांबाच्या आकाराचा वीरगळ व मरीआई मंदिराजवळ एका तेलाच्या घाण्याचे अवशेष आहेत. वीरगळाच्या शैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील असावे. गावामागील टेकडी वर एक पूर्वाभिमुख लेणी आहे. शैलीवरून ती सातव्या अथवा आठव्या शतकातील असावी (छायाचित्र क्रमांक १३). टेकडीवर माथ्याला नैसर्गिक व तासलेले दगड तटबंदी सारखे रचले आहेत. याच्या स्वरूपावरून हा एक पूर्व मध्ययुगीन काळातला किल्ला असावा. गावातील शेतात आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील काळ्या व लाल रंगाचा लेप दिलेल्या मृदभांड्यांचे अवशेष सापडतात.

**उसर बुद्रुक** (18° 11'21” N, 73° 11'1” E )

माणगावच्या पश्चिमेस सहा किलोमीटर अंतरावर गाव आहे.काळभैरी मंदिर परिसरात काही शुष्कसांधी बांधीव मंदिराचे अवशेष आहेत. दोन आयताकृती प्रकारचे वीरगळ देखील आहेत. परिसरात इतर कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत.

**मोर्बा** (18° 12'34” N, 73° 15'0” E )

माणगावच्या नैऋत्येस सहा किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावातील सोमजाई गावदेवी परिसरात पुरावशेष आढळतात. या ठिकाणी शिवमंदिराचे अवशेषही आहेत. शिवमंदिरात एक सुटे ६० सेंटीमीटर लांबीचे व तळाचा भाग अष्टकोनी असलेले लिंग, आरपार छिद्र असलेले योनीपीठ, महिषासुरमर्दिनीचे एक भग्न शिल्प व नंदीशिल्प येथे आढळते. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत. गावातील विठ्ठल मंदिराजवळ एक हेमाडपंती चौथरा होता असे लोक सांगतात.

**सूरव तर्फे तळे** (18° 13'59” N, 73° 14'12” E )

माणगावपासून सात किलोमीटर अंतरावरील या गावातील बौद्धवाडी जवळ असलेल्या गावदेवी काळभैरी मंदिर परिसरात गावातील पुरावशेष आढळतात. मंदिरासमोर अठराव्या शतकातील दीपवत आहे. मंदिराजवळ विष्णूची, गणेश व एक महिषासुरमर्दिनीची भग्न प्रतिमा आढळते. शैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकपासून ते अठराव्या शतकातील असावीत.

**बोर्ले** (18° 13'14” N, 73° 13'58” E )

माणगावपासून सहा किलोमीटर अंतरावरील या गावातील बौद्धवाडी जवळ असलेल्या गावदेवी बोरजाई व भैरी मंदिर परिसरात गावातील पुरावशेष आढळतात. हे अवशेष भग्न शिल्पे व जवळील स्मशानभूमीतील स्मृतीशिळा स्वरुपात आहेत. कालखंड ठरवण्यासाठी या शिल्पांचा फारसा उपयोग नाही, तरीही एकूण स्वरूपावरून सतराव्या शतकापूर्वीपासूनचे अवशेष असावेत.

**राजिवली** (18° 13'49” N, 73° 14'21” E )

या गावात सोमजाई गावदेवीचे स्थान आहे. गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. जवळच असलेल्या नाईटणे गावातही कुठलेही पुरावशेष आढळत नाही.

**निळगुण** (18° 13'52" N, 73° 15'38" E )

माणगावच्या पश्चिमेस सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील या गावात काळभैरी या ग्रामदेवतेचे मंदिर आहे. येथे नागराजू यांना एक कातळ कोरीव लेणी सापडली होती. तिचे स्वरूप इसवीसनाच्या सुरुवातीस खोदल्या गेलेल्या एक गर्भ लेणी सारखे होते (नागराजू १९८१). सर्वेक्षणात ही लेणी आढळली नाही. या गावात आद्य ऐतिहासिक काळातील खापरे आढळतात. येवून येथे त्या काळात वसाहत झाली असावी.

**डोंगरोली** (18° 12'27" N, 73° 12'46" E )

माणगावच्या पश्चिमेस चार किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. या गावाच्या उत्तरेस साल्येर नावाची एक टेकडी असून या टेकडीवर पूर्वाभिमुख कोरीव लेणी आहे.

**महादपोली** (18° 11'41" N, 73° 13'55" E )

माणगावच्या नैऋत्येस तीन किलोमीटर अंतरावरील या गावात सोमजाई या ग्रामदेवतेचे मंदिर आहे. या ठिकाणी व परिसरात कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष आढळले नाहीत. गावातील बौद्धवाडीतील एका शेतात कातळावर पांडवांची मरगळा नावाची म्हैस लोळली, अशी जागा येथे दाखवितात. होळीच्या दिवसात खांद्यावर नदीच्या पात्रातला एक फुटव्यासाचा गोळा खांद्यावर घेऊन होळीभोवती फिरण्याची प्रथा या गावात आहे.

**पाचोळे** (18° 12'18" N, 73° 16'24" E )

हे गाव काळ आणि घोड नद्यांच्या बेचक्यात वसले आहे. गावात काळकाई मंदिराजवळ छोटा दगडी समई सारखा दिवा, काही समाधींचे दगड व काही पीठांचे भग्न अवशेष आहेत. गावात पाच पीरांच्या कबरी आहेत. आता या ठिकाणाचाही जीर्णोद्धार झाला आहे. पण इथल्या स्थानिकांच्या मते हे ठिकाण शिवाजी महाराजांच्या आधीचे आहे. एकंदर शिल्पावशेषांवरून हे अवशेष अठराव्या शतकातील असावेत. एका दगडी दिव्यावर शेलार शब्द लिहिलेला आढळून येतो.

**रिळा** (18° 13'12" N, 73° 16'30" E )

माणगावच्या दक्षिणेस गावात कालभैरी या स्थानिक देवतेचे मंदिर आहे. मंदिराबाहेर दीपमाळ आहे. शिल्पशैलीवरून हे अवशेष मराठा अथवा पेशवे काळातील असावेत. येथील शिवमंदिराचा

जीर्णोद्धार झाला असून गर्भगृह खोल व जोत्याचे बांधकाम चुना न वापरता केलेले होते, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. गर्भगृह खोल असून शिवलिंग प्राचीन पद्धतीचे आहे. गर्भगृहातील देवळीत महिषासुरमर्दिनीची चार हातांची मूर्ती आहे. शिल्पशैलीवरून कालखंड अठराव्या शतकातील असावा.

**देगाव** (18° 11'49” N, 73° 15'16” E )

या ठिकाणी स्थानिक गावदेव खेमदेव व मरीआई आहे. गावातील आंब्रेश्वर नावाच्या शिवमंदिराच्या मूळ चौथ-यावर उभारलेले जीर्णोध्दारीत मंदिर उभे आहे. येथे सभोवताली सुमारे १.२० मीटर आकाराचे अनेक वीरगळ आणि काही सतीशिळा ठेवल्या आहेत. काही वीरगळ हे अयताकृती शिळेवर एकाच बाजूस कोरलेले असून काही वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराचे असूलन त्याच्या चारही बाजूस कोरलेल्या आहेत (छायाचित्र क्रमांक १४). एकूण वीरगळांची संख्या २७ असून, पाच सतीशिळा आहेत. वीरगळांमध्ये आयताकृती उभ्या व एकच बाजू कोरलेले जास्त वीरगळ आहेत, मंदिराच्या उत्तर बाजूस असलेल्या एका चौकोनी खांबाच्या आकाराच्या वीरगळावर एका बाजूस खालच्या टप्यात छत्रधारी व्यक्ती, तर दुसऱ्या खालच्या बाजूस दहा तोंडाची व वीस हातांची व्यक्ती धनुष्य बाण घेऊन युद्ध करताना दाखविली आहे. यातील तीन वीरगळांवर छत्रधारी वीर कोरला आहे. वीरगळांच्या एवढ्या मोठ्या संखेवरून येथे घनघोर युद्ध झाले असावे. तसेच एकाच वेळेस तीन स्थानिक प्रमुख यात मारले गेले असावेत.

**घरोशी** (18° 14'46” N, 73° 22'45” E )

माणगावपासून दहा किलोमीटर पूर्वेकडे असलेल्या या गावातआधुनिक काळात बांधलेले हनुमान मंदिर आहे. गावातील तळ्याकाठी जीर्णोद्धार झालेले शिवमंदिर आहे. येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**कडापूर** (18° 15'17” N, 73° 21'17” E )

माणगावच्या पूर्वेस दहा किलोमीटरअंतरावर कडापूर हे गाव आहे. गावाच्या मागे धनवी डोंगराच्या पायथ्याशी आहे खिंडीच्या मुखाशी काळकाई देवस्थान येथे कातळात खोदलेले देवळी होती. काही पिढ्यांपूर्वी ती कोसळली होती पुंन्हा नंतर तिचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे. या मंदिराच्या मागे कालिका देवीचे दाखवले जाणारे भग्न शिल्प आहे. शैलीवरून ते तेराव्या शतकातील वाटते.

**पळसगाव खुर्द** (18° 15'1" N, 73° 21'19" E )

माणगावच्या ईशान्येस १२ किलोमीटर अंतरावर गाव आहे. धनवी या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या पळसगाव खुर्द गावात स्थानिक गावदेवी वाघजाई मंदिरात झिजलेली, शेंदूर लेपलेली असलेली चार शिल्पे आहेत. यातील एका शिल्पाच्या हातात डमरू, त्रिशूळ, नाग असल्यामुळे ही मूर्ती भैरवाची असावी. या मूर्ती मराठा काळातील असाव्यात. मंदिराबाहेर जुनी स्मशानभुमी असून येथे अठराव्या शतकातील पादुका असलेल्या समाध्या आणि त्यांवर असलेले लेख पहायला मिळतात. या गावाच्यावर चेडयाची रहाटी म्हणूनचा भाग असून तेथे झाडी आहे. तेथे एक शिळेमध्ये २.६० मी लांब व १ मीटर रुंद आकाराचे टेकायला पाठ असलेले सिंहासन कोरले आहे. पाठ टेकता येईल अशा भागात दिवा किंवा काही वस्तू ठेवता येईल अशी लहानशी खोबण आहे. शिळेला जमीन पातळीवर तळपाय ठेवायलाही चौकोनी जागा ठेवलेली आहे. स्थानिक परंपरेनुसार हे शिवाजीमहाराजांचे सिंहासन मानले जाते. या शिळेवर कोणत्याही प्रकारचे विशेष अलंकरण नाही. त्यामुळे त्याचा निश्चित कालखंड ठरविणे कठीण आहे. या परिसराचं खांब रोवण्याचे (post hole) दगडही आढळून आले आहेत. जवळच कातळात सहा मीटर रुंद, सहा मीटर लांब व दोन मीटर खोल आकाराचा खोदलेला हौद आहे.स्थानिक लोक यास थोरला हौद म्हणतात. हा सर्व भाग सपाटमैदाना सारखा पसरला असून येथे सध्या शेती होते. या परिसरात लोकांना शिवकाळातील काही तांब्याची नाणी सापडली आहेत.

**पळसगाव बुद्रुक** (18° 14'27" N, 73° 21'53" E )

काळनदीच्या मिळणाऱ्या एका ओढयाच्या काठावर हे गाव माणगावच्या पूर्व दिशेस आठ किलोमीटर अंतरावर वसले आहे. गावाच्या बाहेर असलेल्या गावदेव मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून मंदिरात आता आधुनिक काळात स्थापना केलेली भैरवनाथ, जोगेश्वरी, वागजाई व इतर स्थानिक देवतांची शिल्पे आहेत. सुदैवाने जुनी शिल्पे मंदिराच्या बाहेर जपुन ठेवलेली आहेत. मराठा काळातील प्रभावळीचे दोन स्तंभ, झिजलेली व भग्नावस्थेत वाघावर आरूढ झालेली शैव शिल्प आहेत. यातील एक बहुधा भैरव असावा. गणेश शिल्प, भग्न शिवलिंग, भग्न वीरगळाचा अर्धा भाग, इत्यादिही आहेत. एकाच दगडात योनीपीठ व लिंग घडविलेले पाहायला मिळते. शैलीवरून ही सर्व शिल्पे मराठा कालखंडातील असावीत येथे पाहायला मिळतो.

**कोस्ते बु.** (18° 17'20" N, 73° 18'26" E )

माणगावपासून सात किलोमीटर अंतरावर ईशान्येस असलेल्या या गावातील बसस्थानकाशेजारीच हनुमान मंदिर आहे. गावाच्या सार्वजनिक विहिरीलगत छोट्या टेकडीवर गावदेवाचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. मंदिराचा मूळ दगडी चौथरा तसाच ठेवून त्यावरच बांधकाम करण्यात आले आहे. गर्भगृह खोल असून शिवलिंग व नंदी आधुनिक काळात घडविलेले आहेत. मंदिराच्या मागे जुने शिवलिंग वीरगळ नंदी व चार हातच्या देवतेची शिल्पे आहेत. शिवलिंग, गणेश शिल्प, आयताकृती असलेले व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले भग्न सात वीरगळ आहेत. हे तीन ते चार टप्यात कोरलेले आहेत. याच ठिकाणी एक मोठ्या शिळेततीन देवकोष्ठे कोरलेली आहेत. सध्या ही देवकोष्ठे रिकामी आहेत व अर्धी मातीत गेलेली आहेत. भग्न विष्णूचे असावे. येथुन काही मीटर अंतरावर कोसमाई देवीचे स्थान आहे. मंदिराबाहेर वीरगळ आहेत.एका भग्न वीरगळाच्या तुकडयावर ललित आसनात बसलेली एक व्यक्ती व तिच्या डाव्या बाजूस असलेल्या व्यक्तीने तिच्यावर छत्र धरलेले आहे. उजवीकडील एक व्यक्ती पायाजवळ बसलेली. तर तिसरी व्यक्ती उभी आहे. ही चौकट भग्न आहे. या शिल्लक खंडावरून हा वीरगळ एखादया छत्रधारी नृपतिचा असावा. या शिल्पांच्या शैलीवरून हे अवशेष अकरा ते तेराव्या शतकातील असावेत.एका वीरगळांवरील दृश्यावरून गोधनावरून तेथे युद्ध झाले असावे. गावाचे नाव पूर्वी कुसुंब वा कोसबी असावे.

**कोस्ते खु.** (18° 18'14" N, 73° 18'0" E )

माणगावाच्या ईशान्य दिशेस सात किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात, एका तलावाशेजारी शिवाचे मंदिर आहे. इथेच गावाचे स्मशान देखील आहे. शिवमंदिर कौलारु आहे. पण मूळ शुष्कसांधी बांधीव तंत्राने बनवलेल्या चौथऱ्यावर उभारलेले आहे. गर्भगृह खोल आहे पाच पायऱ्या उतरून प्रवेश करता येतो. जमिनीला फरश्या बसविल्या आहेत. गर्भगृहाच्या उजव्या बाजूस एक दगडी फरशी आहे. त्यावर पूजेच्या वस्तू ठेवण्याची योजना असावी अशी रचना शिलाहार मंदिरात आढळते. गर्भगृहाच्या डाव्या बाजूस एक चौकोनी, छोटी टाकी आहे. गर्भगृहाच्या पाठच्या भिंतीत झिजलेली चार हातांची पार्वतीची प्रतिमा आहे. डाव्या पायाशी अनुचर तिच्या वरच्या उजव्या हातात त्रिशूल तर डाव्या वरच्या हातात नाग आहे. या गर्भगृहात गणेश, विष्णू, नाग व न ओळखता येणारी झिजलेली तीन शिल्पे आहेत. या मंदिराशेजारी असलेला तलाव हा एकेकाळी घडीव दगडांनी बांधलेला असावा. याची दक्षिणेकडची बाजू आजही सुरक्षित असून तलावात उतरण्यासाठी आजही ८ ते ९ पायऱ्या

शिल्लक आहेत. पिरॅमिडच्या पद्धतीने बांधकामाची वैशिष्ट्यपूर्ण रचनेने उभारलेले हे बांधकाम मोडकळीस आले आहे (छायाचित्र क्रमांक १५). काही उघडया पडलेल्या शिळांवर गवंड्यांच्या खुणा ही दिसून येतात. कोपऱ्यावर अर्धवर्तुळाकृती फुलांची नक्षी असलेले कोरीव दगड या परिसरात विखुरले आहेत. हे सर्व तळ्याच्या बांधकामाचेच दगड असल्याचे दिसते. या एका उदाह्रावरून शिलाहार काळातील मंदिराच्या सानिध्यातील तळ्यानाही एकेकाळी अशा प्रकारची बांधकामे असावीत हे लक्षात येते.

**कुंभार्ते** (18° 20'0” N, 73° 18'21” E )

माणगावाच्या उत्तरेस दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात हनुमान मंदिर वगळता काही उल्लेखनीय आढळले नाही. या मंदिराची उभारणी अलीकडच्या काळातलीच असावी.

**निजामपुर** (18° 19'7” N, 73° 18'12” E )

माणगावच्या उत्तरेस आठ किलोमीटर अंतरावर माणगाव ताम्हिणी मार्गे पुणे रस्त्यावरील हे एक ऐतिहासिक महत्त्वपूर्ण गाव आहे. निजामपुरचा विस्तार मोठा आहे. गावात अनेक तळी आहेत निजामपूर ग्रामपंचायत कार्यालया समोरील तळ्याच्या एका बाजूस गणेश, चार हातांची दोन शिल्पे, तर शिर नसलेले एक शिल्प अशी शिल्पे रांगेत ठेवली आहेत. शैलीवरून मराठा-पेशवा कालखंडातील आहेत. तलावाशेजारी असलेल्या झाडाच्या बुंध्याजवळ सुमारे मीटर भर उंचीचा आयताकृती व चार टप्प्यांतील एकच बाजू शिल्पांकित केलेला एक वीरगळ आहे. वीरगळाचा शीर्षभाग भग्न आहे.या शिवाय ग्रामपंचात कार्यालयासमोर झाडांच्या बुंध्याजवळही दोन आयताकृती वीरगळ आहेत. तीन टप्यातील वीरगळावर स्वागत करणाऱ्या अप्सरा नाहीत की सर्वात वरील टप्यांत पूजा करणारा वीरही दाखवलेला नाही. निजामपुरातील मांडवकरवाडी येथे ओढया काठी एक अठराव्या शतकात उभारलेले गणेशाचे मंदिर आहे.मंदिरावर फांसना पद्धतीचे शिखर आहे. ललाट बिंबावर गणेश प्रतिमा आणि मोर कोरलेले आहेत. द्वार शाखा साधी आहे.

गावातील सोमजाई मंदिर परिसरात असलेल्या सोमजाई व शिवमंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झालेला आहे. शिवमंदिर मूळच्या जुन्या मंदिराच्या पायावरच उभारले गेले आहे जुने मंदिर कुठल्याही प्रकारचे सिमेंट न वापरता दगडाचे बनविले आहे. असे लोकांचे म्हणणे आहे. गाभारा खोल असून, शिवलिंग जुने आहे.मंदिरासमोर एका बाजूने आत उतरायला पायऱ्या असलेली पुष्करणी आता पूर्णपणे सिमेंटने बांधून काढली आहे. तेथे एक वीरगळ

जमिनीत गाडला गेलेला आढळून येतो. या शिवाय नंदीची दोन भग्न शिल्पे ही आढळतात. सोमजाई या स्थानिक देवतेच्या म्हणून दाखवल्या जाणाऱ्या दोन मूर्ती, चार हातांच्या महिषासुरमर्दिनी प्रकारच्या आहेत. तलावाशेजारील शिल्पांचा काळशिल्पशैलीवरून बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावा. तर सोमजाई मंदिर शिल्पाचा कालखंड मराठा काळातील असावा.

**पानस्पे** (18° 19'13” N, 73° 17'27” E )

निजामपूरहून दोन किलोमीटर अंतरावरील या पानस्पे गावात कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळत नाहीत.

**पाणोसे** (18° 15'35” N, 73° 19'3” E )

माणगांवच्या ईशान्येस चार किलोमीटर अंतरावर पाणोसे गाव आहे. गावाच्या रहाटीत गावदेवीचे मंदिर आहे. मंदिरात तीन शिल्पे आहेत. यात वैशिष्ट्यपूर्ण अशी चार हातांची महिषासुरमर्दिनी प्रकारचे शिल्प उल्लेखनीय आहे.हे शिल्प मराठाकालीन वाटते.

**साळवे** (18° 16'8” N, 73° 19'34” E )

माणगावच्या ईशान्येस पाच किलोमीटर अंतरावर साळवे गावातील शिवमंदिराचा मूळ पाया तसाच दगडी बांधकामाचा असून, या परिसरात आढळणाऱ्या इतर शिवमंदिराच्या तलविन्यासाप्रमाणेच हा पाया आहे. गर्भगृहाचे बांधकाम शुष्कसांधी बांधीव तंत्राने केलेले दिसते. हे गर्भगृह खोल असून चार पायऱ्या उतरून या ठिकाणी पोहचता येते. गर्भगृहातील योनीपीठ, केवळ लिंगाचा खुंट बसवण्याइतपत खाच ठेवली आहे. मंदिरात सध्या असलेली दोन शिल्पे भग्न व झिजलेली असून त्यांची सौंदर्य समीक्षा अशक्य आहे. मंदिराचा तलविन्यास व शिल्पांच्या शैलीवरून हे अवशेष चौदाव्याशतकापासून ते सतराव्या शतकातील असावेत.

**रवाळजे** (18° 26'33” N, 73° 20'31” E )

माणगावच्या ईशान्य दिशेस २४ किलोमीटर अंतरावर रवाळजे आहे. गावातील छोट्या उंचवट्यावर आणि ओढ्याच्या काठावर सोमजाई आणि शिवमंदिर आहे.मंदिराबाहेर मराठा आणि नंतरच्या काळातील काही समाध्या आहेत मंदिरासमोरील कातळावर काही खांब रोवायचे खड्डे आढळले आहेत. त्यांना सातीआसरा म्हणून पूजले जाते, एक दगड पूर्णपणे

कोरून त्यात देवळी बनविली आहेत. यात भग्न अवस्थेतील दोन शिल्पे आहेत. यातील एका शिल्प दोन हातांचे द्विभंग अवस्थेत असून आपला डावा पाय एका उंच बैठकीवर ठेवला आहे. गावातील हनुमान मंदिरात डाव्या हाताने शेपटी पकडलेला मारुती आहे तसेच काळ्या संगमरवरातील जुन्या शैलीचे महिषासुरमर्दिनीचे शिल्प आहे. या दोन्ही शिल्पांची रचना येथे आधी असलेल्या मूळ शिल्पाप्रमाणे केली असल्याचे लोक सांगतात.

**बेडगाव** (18° 25'4" N, 73° 22'36" E )

विळयाच्या गावाच्या पूर्वेस बेडगाव आहे. गावातील अडभंगनाथाच्या मंदिरात आधुनिक काळातील शिल्पे आहेत.

**पाटणूस** (18° 26'44" N, 73° 22'23" E )

पाटणूस माणगावच्या ईशान्येस २४ किलोमीटर कुंडलिकाच्या पूर्व किनाऱ्यावर वसले आहे. या गावातून पुणे जिल्ह्यात सावत्या हा पायरस्त्याचा घाटमार्ग जातो. बहिरीचे स्थानाजवळ दोन वीरगळ व एक सतीशिळा आहे. शिल्पशैलीवरून तिचा काळ बारावे शतक व तेरावे शतकाचा असावा.

**विळे** (18° 25'9" N, 73° 21'44" E )

माणगावच्या ईशान्येकडे २२ किलोमीटर अंतरावरील गाव आहे. गावातील पुरावशेष श्री भैरीबुवा, भैरीभवानी व जोगेश्वरी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मंदिर परिसरात आहेत. या ठिकाणी दगडी शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेले मंदिर असावे, असे येथे आढळणाऱ्या दगडी शिळावरून लक्षात येते. मंदिरातील मूळ जीर्ण भग्न झालेल्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले असून येथे आता काळ्या संगमवरातील मूर्तीची नुकतीच स्थापना करण्यात आली आहे. गावातील शिवमंदिराकडे जाताना एक ठिकाणी चौकोनी खांबाच्या आकाराच्या वीरगळाचे भग्न अवशेष आढळतात हे एकाच व वीरगळाचे तीन भाग आहेत की वेगवेगळ्या वीरगळाचे भाग आहेत ते समजत नाही. याच ठिकाणी उभारलेल्या एका चौथऱ्यावरील देवळीत चार हातांची महिषासुर मार्दीनींची ५० सेंटीमीटर उंच, ३० सेंटीमीटर रुंद तैलरंग लावलेली दगडी मूर्ती आहे.शेजारीच एका ३५ सेंटीमीटर रुंद आणि ४० सेंटीमीटर उंच चौकोनी शिळेवर गायवासरू शिल्प कोरले आहे. यालाही रंग लावल्याने व अर्धा भाग खाली जमिनीत गाड्ल्याने यावर लेख होता की नाही कळत नाही. गावातील शिवमंदिर परिसरातही शुष्कसांधी बांधकामासाठी

वापरण्यात आलेल्या शिळा आहेत. या शिल्पावशेषांवरून हे अवशेष अकराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकातील असावेत.पावसाळ्यात लाल, करडया रंगाची खापरे शेतांमधून आढळतात.

**भागाड** (18° 23'31” N, 73° 20'27” E )

भागाड हे माणगावच्या ईशान्येस २०किलोमीटर अंतरावर आहे. भागाड गावातील पद्मावती देवी व सोनभौरवनाथ मंदिर या स्थानिक गावादेवाच्या, तळ्याकाठी असलेल्या शिवमंदिराजवळ मूर्तीशिल्पांच्या रूपाने पुरातत्त्वीय अवशेष आढळतात. या शिवाय शेतातून पावसाळ्यात नांगरणी करताना वाहून आलेल्या तेजस्वी लाल रंगाची, तसेच काळ्या रंगाची उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन खापरे मोठ्याप्रमाणावर सापडतात. भैरवनाथ मंदिरात भैरी आणि जोगेश्वरी देवतेची,चांदीचे मुखवटे बसविलेली दगडी शिल्पे आहेत. झीज झाल्याने त्यांचा नेमका काळ ठरवता येत नाही.शैलीवरून मराठा किंवा पेशवे काळातील ही शिल्पे असावीत. मंदिरासमोर तुळशी वृंदावनात त्रिभंग अवस्थेतील एक शिल्प आहे. डाव्या पायाजवळ त्याचे वाहन कुत्रा दाखविला आहे. यावरून ही मूर्ती भैरवाची असावी. या शिवाय चार हातांच्या आणि झीज झालेल्या, अर्धी सिमेंट मध्ये गाडल्या गेलेल्या स्त्री शिल्पाचा भाग बघायला मिळतो. या दोन्ही मूर्तींच्या शैलीवरून या प्रतिमा बाराव्या अथवा तेराव्या शतकातील असाव्यात. या शिवाय एका मसाला वाटायच्या पाटयाचे अवशेष ही पाहायला मिळतात. त्याच्या पाठच्या भागात उभ्या चौकटच्या आकारातील फुलाची नक्षी काढली आहे. या शिवाय शिवमंदिरात अनेक भग्न मूर्ती असून, त्यात शिलाहार शैलीतील शिल्पे आहेत. या गावाच्या भागातील बाजूस असलेल्या संगोबाचा डोंगर नावाच्या टेकडीवर अज्ञातवासकाळात पांडवानी येथे खोदकाम केल्याचे म्हंटले जाते.

**कडापे** (18° 21'22” N, 73° 21'11” E )

माणगावपासून ईशान्येस १३ किलोमीटर अंतरावरील कडापे या गावातील महत्त्वपूर्ण पुरावशेष गावातील बापूजीबुवा व काळकाई या स्थानिक देवस्थान परिसरात आढळून येतात. येथील रामेश्वर या शिवमंदिराजवळ आयताकृती आकाराचा चार टप्यात ७० सेंटीमीटर उंची आणि ३० सेंटीमीटर रुंदी शिलेच्या एकाच भागावर कोरलेला एक वीरगळ आहे. या वीरगळाशेजारी अजून एक भग्न सतीशिळा आहे. या शिवमंदिराची जोत्याची रचना उंबार्डी येथील शिवमंदिरा प्रमाणे आहे. मंदिराच्या प्रवेश बाजूकडील पायऱ्या असलेला भाग जोत्यापासून बऱ्यापैकी पुढे आलेला आहे. आज त्यास तीन पायऱ्या आहेत. या परिसरात मराठा काळातील समाधीचे

आठ कोरीव दगड पहायला मिळतात. कालिका देवीच्या मंदिराच्यामागील बाजूस तीन आयताकृती भग्न वीरगळ पडले आहेत. यांवर घोड्यावर स्वार झालेल्या शत्रूशी लढताना वीर दाखविला आहे. एका ७० सेंटीमीटर उंच आणि ३५ सेंटीमीटर रुंद दगडावर चंद्र-सूर्य व शीर्षभाग आयताकृती असलेल्या कोरीव दगडावर मंगलकलश व खाली गायवासरु शिल्प आहे. खालचा ३० सेंटीमीटरचा भाग लेखासाठी मोकळा ठेवलेला दिसतो.आज या शिलेवर कोणताही लेख आढळलेला नाही. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकरावे शतक ते तेराव्या शतकातील असावीत.

**सांगी** (18° 22'24” N, 73° 22'8” E )

माणगावच्या ईशान्यदिशेस १७ किलोमीटर अंतरावर सांगी हे गाव आहे. या गावी छोटे धरण असून एका टेकडीवर गावदेवीचे मंदिर आहे. येथे भग्नावस्थेतील चार मूर्ती आहेत. झीज आणि भग्न झाल्यामुळे त्यांची ओळख पटत नाही. परंतु येथे असलेल्या महिषासुरमर्दिनी शिल्पशैलीवरून बारावे शतक असावे.

**तासगाव** (18° 23'7” N, 73° 20'15” E )

माणगाव-पुणे रस्त्यावरील तासगाव हे गाव येथे असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रामुळे नावारूपाला आले आहे. तासगाव हे माणगावच्या ईशान्येस १७ किलोमीटर अंतरावर असून, गावातील गावदेव व शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथे शुष्कसांधी बांधीव मंदिराच्या सुमारे एक मीटर लांबीच्या शिळा आढळून येतात. या शिवाय मंदिरासमोर तीन सुस्थितीतील, तर भग्नावस्थेतील दोन वीरगळ पडले आहेत. वीरगळ सुमारे एक मीटर लांबीचे आहेत. त्यावर पाच टप्पे दाखविले आहेत.

**येलवडे** (18° 22'44” N, 73° 21'37” E )

शिरवलीपासून केवळ दोन किलोमीटर अंतरावर गावातील कालभैरी या गावदेवला व शिवमंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला आहे. जवळ असलेल्या दगडी दीपमाळा व नंदी शिल्प हे मराठा कालखंडातील असावेत.

**भाले** (18° 21'15” N, 73° 17'4” E )

माणगावहून १३ किलोमीटर उत्तरेस गावातील रहाटी भागात देवीचे स्थान आहे. येथे भैरव, महिषासुरमर्दिनीची शिल्पे आहेत. गावातील शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असला तरी

मंदिराची उभारणी मूळ मंदिराच्या दगडी पायावरच झालेली दिसते.उंबार्डी आणि या भागात आढळणाऱ्या इतर मंदिराप्रमाणे खोल गर्भगृह आहे. मंदिराच्या पुढील भागात पायऱ्याची योजना आहे. मंदिरासमोर पाच वीरगळ आहेत. यातील एक सतीशिल्प युक्त वीरगळ तीन टप्प्यांत कोरलेला आहे. गावातील मंदिरातील पुजारी यांच्या घरी चांदी, तांब्या व पितळेचे अठराव्या शतकातील मुखवटे आहेत.

**जिता** (18° 21'28” N, 73° 24'8” E )

माणगावच्या ईशान्येस १९ किलोमीटर अंतरावर जिता हे गाव कुर्डु उर्फ विश्रामगड किल्याच्या पायथ्याशी वसले आहे. काळनदीचे एक प्रवाह जिते गावाजवळून वाहतो. जितेगावात हनुमान मंदिराजवळ चांगल्या अवस्थेतील सहा वीरगळ व एक सती व वीरगळ एकत्रित दाखवलेली शिळा आहे. सुमारे एक मीटर उंचीचे हे वीरगळ आयताकृती व तीन ते चार टप्यात कोरले गेलेले आहेत. सर्व वीरगळ भालाधारी आहेत. दोन वीरगळांच्यावरील वीर घोडे स्वराशी युद्ध करताना दिसतो. याशिवाय येथे वीरगळांचे आठ भग्न तुकडे आहेत. याशिवाय एका स्त्रीमूर्तीचा भग्न तुकडा, मुख व उजवा हात भग्न झालेली व डावा हात छातीवर असलेली दोन हातांची मूर्ती ही बहुधा हनुमानाची असावी असे इतर ही अवशेष आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील किंवा तेराव्या शतकातील असावीत.

**मालुस्ते** (18° 21'7” N,  73° 22'3” E )

माणगावच्या ईशान्येस १५ किलोमीटर अंतरावर या गावातील मालजाई आणि शिवमंदिर परिसरात गावातील पुरावशेष मूर्तीशिल्पांच्या रूपाने आढळतात. मालजाई मंदिरामागे शिर तुटलेली छाती आणि कमरेपर्यंतचा भाग शिल्लक असलेली स्त्री मूर्ती पाहायला मिळते. तीन वीरगळ, या वीरगळावर सतीचा हात देखील असावा. पण तो भग्न आहे. मंदिर जुन्या जोत्यावर बांधलेले दिसते. आज जोत्याच्या सर्वभाग सिमेंट मध्ये बांधून काढल्या असल्या तरी प्रवेशाकडीलभागात पायऱ्या असाव्यात व त्याची रचना या परिसरात आढळणाऱ्या उंबार्डी व बोरीवली येथील मंदिरासारखीच असावी. खोल गर्भगृह मंदिरात नंदी, गणेश, विष्णू यांच्या झीज झालेल्या परंतु डौल दाखविणाऱ्या मूर्ती आहेत. शैलीवरून तेराव्या व चौदाव्या शतकातील असाव्यात. या जोत्यावर कोणतीही कलाकुसर नाही.

**उंबार्डी** (18° 22'31” N, 73° 24'18” E )

माणगाव या तालुक्याच्या मुख्य ठिकाणापासून ईशान्य दिशेस सुमारे २० किलोमीटर अंतरावर उंबार्डी हे छोटेसे गाव सहयाद्रीच्या पायथ्याला असून जवळच कुर्डु उर्फ विश्रामगड हा किल्ला आहे. गावाच्या पूर्वेला जंगल असून ते वनखात्याच्या ताब्यात आहे. येथे काळनदीचा उगम होतो व ती पुढे दासगाव खाडीत सावित्री नदीस मिळते. काळनदीच्या उगम स्थानास 'सातनाल' असे म्हटले जाते. गावाच्या दक्षीण दिशेला कुर्डु किल्ल्याची डोंगर रांग पुढे आलेली आहे, तर उत्तरेला ताम्हिणी घाटाची डोंगर रांग आहे. या मुळे येथे इंग्रजी अक्षर 'U' आकाराचे खोरे तयार होते. सह्याद्रीच्या पायथ्या लगतचा हा भाग घनदाट झाडीने व्यापलेला आहे. या राखीव जंगलामधील विविध भागांना स्थानिक लोकांनी वेगवेगळी नावे दिली आहेत. उंबार्डी गावाच्या पूर्वेकडील डोंगररांगांवरून अनेक प्रवाह एकत्र येऊन त्यांनी काळनदीचे रूप धारण केले आहे. यातील ईशान्येकडून येणारा प्रवाह व पूर्वेकडून येणारा प्रवाह हे मुख्य प्रवाह आहेत.

शिव आणि काळभैरी मंदिर

उंबार्डी गावाच्या बौद्धवाडी परिसरात शिवमंदिर, काळभैरव मंदिर आणि हनुमान मंदिर अशा मंदिरांचा समूह आहे. या भागाजवळच ब्राम्हणपाडा म्हणून एक भाग आहे तेथे सध्या महत्त्वपूर्णअवशेष सापडत नाहीत, मात्र शिवमंदिर जवळील परिसराजवळील घरांजवळ काही घडीव दगडांची जोती, जाती आणि चौकटच्या फुलांची नक्षी असलेले दगड आढळतात यावरून येथे पूर्वी वसाहत झाली असावी.येथे पूर्वाभिमुख शिवमंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम शुष्कसांधी बांधीव पद्धतीने केलेले आहे. मंदिराच्या गर्भगृह खोल आहे. मंदिरासमोर आयताकृती व चौकोनी खांब प्रकारचे मिळून ३७ वीरगळ आहेत. या मंदिराला प्राकार भिंत आहे. या अवशेषांहून अधिक उल्लेखनीय असे अवशेष उंबार्डी गावाच्या पूर्वेस असलेल्या रहाटी या भागात आढळतात हे अवशेष घनदाट जंगलात असून त्यावर रानटी झाडे-झुडपे वाढली आहेत. हा भाग उपरोल्लेखित मंदिर समुहापासून सुमारे १०० मीटर उंचीवर आहे.

तटबंदीचे अवशेष

बौद्धवाडी परिसरात असलेल्या शिवमंदिरापासून पूर्वेकडे रहाटीकडे जाताना सुमारे ४०० मीटर अंतरावर दगडी तटबंदीचे अवशेष सापडतात (छायाचित्र क्रमांक ११). सुमारे एक किलोमीटर अशी दक्षिणोत्तर पसरलेली ही दगडी भिंत शुष्कसांधी पद्धतीने पाषाणाची बनविलेली असून हे

बांधकाम पिरॅमीडच्या आकाराचे म्हणजे पायथ्याला मोठे तर वर निमूळते होत जाणारे आहे. नालाकार पसरलेल्या दरीच्या दोन टोकास जोडणारी ही तटबंदी काही ठिकाणी सलग तर काही ठिकाणी उध्वस्त अवस्थेत आहे. भिंतीची रचना दोन्ही डोंगर उतारावरून उंचभागापासून ते मधल्या सखल भागापर्यंत झाली आहे. या भिंतीची उंची सर्वत्र समान नाही. शिवाय अनेक ठिकाणी किल्ल्यांच्या तटबंदीला असते तशी अधून-मधुन चौकोनी बुरूजांची रचना केली आहे. याचा अर्थ ही दगडी भिंत तटबंदी असून पूर्वेकडील भागातील नगराचे रक्षण करणसाठी तिची निर्मिती झाली आहे. या तटबंदीची सुरवात उत्तरे कडील डोंगरात समुद्रसपाटीपासून १८० मीटर वर, तर दक्षिणेकडील कुर्डु किल्याच्या डोंगरालगत समुद्रसपाटीपासून १५२ मीटर वर झाली आहे. या क्षेत्राच्या पूर्वेकडील भागातून पावसाळयामध्ये काळ नदीच्या पाण्याचे जोरदार प्रवाह वहात असतात. या प्रवाहामुळे मधल्या भागातील तटबंदीची भिंत ढासळली आहे. प्रत्यक्ष नदीपात्रात ९० मीटर अंतरावर तटबंदीचे कोणतेही अवशेष सध्यातरी आढळत नाहीत अशी परिस्थिती पूर्वीही पावसाळयात असल्याने कदाचित या ठिकाणी कायम स्वरूपाची तटबंदी नसावी किंवा यासाठी काही तरी इतर तांत्रिक सोय असावी.

या तटबंदीमध्ये एकूण चार प्रवेशद्वारे असावीत. पहिले प्रवेशद्वार उत्तरेकडून सुमारे २८४ मीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून १४८ मीटर उंचीवर आहे. याची रचना Z या इंग्रजी अक्षरासारखी आहे. याची पश्चिमेकडील बाजू वरून थर कोसळल्यामुळे बंद झाली आहे. या ठिकाणी तटबंदीचे नऊ ते दहा थर शिल्लक आहेत. पुढे नदीपात्रापर्यंत काही ठिकाणी चांगली तर काही ठिकाणी ढासळलेली तटबंदी आहे. नदी पात्रालगत सातआसरा या ठिकाणी किमान दहा थरांची तटबंदी शिल्लक आहे. येथेच या तटबंदी मध्ये असलेले सर्वात मोठे प्रवेशद्वार आहे याच्या उत्तर व दक्षिण या दोन्ही बाजूस चौकोनी आकाराचे बुरूज आहेत. येथील प्रवेशाची रूंदी २४ मीटर लांब व२५ मीटर रुंद इतकी आहे. येथील तटबंदीमध्ये सात ते आठ थर आहेत. या मुख्य दरवाजापासून सुमारे ९३ मीटर अंतरावर तिसरा दरवाजा असल्याचे अवशेष आहेत. येथेही दोन्ही बाजूस चौकोनी आकाराचे बुरूज असावेत. त्या पैकी उत्तरे कडील बुरूजाच्या उत्तरेकडील बाजूचे पाच थर शिल्लक आहेत, तर दक्षिणेकडील बुरूजाचे सहा थर शिल्लक आहेत. या दरवाजापासून १२९ मीटर अंतरावर पुढे चौथा दरवाजा समुद्रसपाटीपासून १५१ मीटर उंचीवर आहे. या दरवाजाच्या आधी चौकोनी आकाराचा एक बुरूज शिल्लक असून त्याचे आठ थर शिल्लक आहेत तर तटबंदीच्या उत्तरेकडील भागात एक भैरवाचा चौथरा असून त्यावर भैरवाची दक्षिणाभिमुख मूर्ती आहे.

तटबंदी शुष्कसांधी बांधणी पद्धतीने काळया पाषाणात बनविलेली असून तळाजवळ रूंद आणि वर निमूळती होत गेली आहे. ही रचना भुकंपासारख्या दुर्घटनेलाही तोंड देईल अशी आहे.तटबंदीच्या भिंती सर्वसाधारणपणे चार मीटरपासून ते पंधरा मीटर इतक्या रूंद आहेत. त्याची काही ठिकाणी उंची चार मीटर ते दीड मीटरपर्यंत सध्या पहायला मिळते. ही तटबंदी मजबूत करण्यासाठी तटबंदीच्या रूंदीमध्ये नदीपात्रातील दगड-गोट्यांची भर घातली आहे. तटबंदीच्या शिल्लक अवशेषांवरून असे लक्षात येते की ही तटबंदी पूर्वी चांगलीच उंच असावी. तटबंदीच्या पूर्वेकडील भागाचे रक्षण करणे हा मुख्य उद्देशाबरोबरच या भागातून जाणा-या लिंगा व देव घाटाचे रक्षण करणे हा मुख्य उद्देश तटबंदी उभारणा-याचा असावा. घाटमार्गांचे अथवा व्यापारी मार्गांचे आर्थिक महत्त्व सातवाहन काळापासूनच ओळखले गेले होते, परंतु अशा प्रकारे घाटमार्गांच्या रक्षणासाठी केलेला हा प्रयत्न मात्र एकमेव व अनोखा दिसतो.

तटबंदीच्या उत्तरेकडील डोंगररांगांच्या उतारावरील भागाला 'देवाचा सर्वा' असे म्हणतात. येथे घडीव दगडांचे काही उध्वस्त चौथरे आढळून येतात. या भागात वसाहती झाल्याचे येथे आढळणा-या लाल व करडया खापरांच्या तुकडयांवरून लक्षात येते. काळनदीच्या ईशान्येकडून येणा-या भागास 'सातनाल' असे म्हटले जाते. येथून पुढे दक्षिणोत्तर सपाट पसरलेला 'कळकीचा गवंड' हा भाग लागतो. तर या पुढील भागास 'घोडधुम' असे म्हणतात.

तळई येथील अवशेष

पुढे 'तळई' म्हणून भाग असून येथे मे महिन्यातही काही प्रमाणात पाणी आढळते. या प्रवाहात पुढे लिंगाच्या आकाराचा सुळका डोंगर असल्यामुळे यास 'लिंगाघाट' असे म्हटले जाते. या लिंगा शिखराच्या अलिकडे डोंगरकड्यातून एक कशेडी नावाची नाल आहे. या नालेने तेथील डोंगराचे दोन भाग केले आहे. दोन्ही डोंगरमाथ्यावर सपाटी आहे. एका डोंगर माथ्यास 'लहान चवरा' तर दुस-या डोंगरमाथ्यास 'मोठा चवरा' म्हटले जाते. पायथ्याला रूंद तर वर अरूंद होत जाणा-या नालेतून दोन्ही चव-यांवर जाता येते. दाट झाडीतून मार्ग काढत समुद्रसपाटीपासून ५०० मीटर उंचीवर असलेल्या मोठा चवरा या भागात दोन कातळात कोरलेल्या पाण्याच्या टाक्या असून त्यांची रचना इसवीसनाच्या सुरवातीच्या काळात आढळणा-या लेणींच्या सानिध्यातील पाण्याच्या टाक्यांसारखी आहे. चौकोनी मुखे असणारी आणि आत खोल पसरलेली अशी ही रचना आहे. या सपाटीवर ३०० मीटर उंचीवर सहयाद्रीचा माथा आहे. कशेडी नालेच्या पायथ्यालासुरुवातीस सपाटीवर एक चौथरा ६ × ३ मीटरचा

असून त्यास दक्षिण भागात पाय-या आहेत. चौथ-यावरील भिंतीनष्टझाल्या आहेत.चौथ-याचे जमिनीच्या पृष्ठभागावर तीन थर दिसून येतात. या चौथऱ्यास गोसाव्याचा मठ असे म्हटले जाते.

उपरोल्लेखीत तळईच्या पात्रात साकवाचे खांब रोवण्यासाठी खड्डे केलेले आढळतात. तळईच्या परिसरात महत्त्वपूर्ण अशा बांधकामामध्ये शिवमंदिराचा पश्चिमाभिमुख चौथरा २० मीटर × १२ मीटर आकाराचा आढळून येतो. त्याची उंची १.७० मीटरआहे. समुद्रसपाटीपासून हा भाग २०० मीटर उंचीवर आहे. या मंदिराचा तलविन्यास हा बौध्दवाडी परिसरात असलेल्या शिवमंदिरा सारखाच आहे. मंदिराच्यामागील बाजूस एका सुबक पीठावर ठेवलेले एक नंदी शिल्प होते, त्यास कोणी तरी गुप्तधनापोटी सुरूंग लावला असल्याचे स्थानिक सांगतात. यामुळे त्याचे अनेक तुकडे झाले आहेत. गुप्तधनासाठी सुरूंग लावलेल्या लोकांनी इतर भागातही खोदकाम केलेले दिसते. या चौथ-यावर गणेश प्रतिमा, भग्न शिवलिंग,भैरव व नंदी यांची सुटी शिल्पे आढळतात. मंदिराभोवती फरसबंदी केलेली आजही पाहण्यास मिळते. मंदिराच्या उत्तरेकडे तळईचा प्रवाह वहात असल्यामुळे, तेथील माती ढासळू लागली आहे. मंदिराच्या दक्षिणेस तीन चौथरे आहेत. त्यातील दोन समोरासमोर प्रवेश असलेली आहेत.पूर्वेकडे पाय-या असलेला चौथरा ३.६० मीटर× ४.१० मीटर मापाचा असून त्यास तीन थर शिल्लक आहेत, तर पश्चिमेकडे तोंड असलेल्या चौथरा ३.८० मीटर× ५.३० मीटर लांबीचा आहे. या दोन्ही चौथ-यांच्या मागे पूर्व दिशेस सुमारे ५० मीटर अंतरावर एक दगडी तटबंदी सुरू होते.हा भाग रहाटीच्या वरच्या टप्प्यास जोडलेला आहे. या शिवाय शिवमंदिर आणि हे दोन चौथरे या दरम्यान आणखी दोन चौथरे आहेत. मात्र त्यांवर बरीच झाडी वाढली आहे. या चौथ-याना लागून एक ओढा लागतो. सध्या या कोरडया ओढयामध्ये वीरगळ व सतीशीळांचे अवशेष आढळतात. येथे एकूण १७ वीरगळ आहेत.

विशेष बाब म्हणजे या शिवमंदिराजवळ भुमिगत गटार योजना केली आहे. शिळा अंतर्वक्र पोखरून त्यांची पन्हाळ केली आहे, हे पन्हाळ दगडी फरशीची झाकणे लावून बंद केले आहेत. खराब पाण्याचा निचरा होण्यासाठी, या पन्हाळीचे तोंड जवळून जाणा-या ओढयात सोडले आहे. या ओढयाच्या दोन्ही बाजू पावसाळ्यात माती ढासळू नये म्हणून साध्या दगडी रचून संरक्षक भिंती म्हणून बांधून काढल्या आहेत. या तळईपासून सुमारे १५० मीटर पश्चिमेकडे समुद्रसपाटीपासून सुमारे १७० मीटर उंचीवर एक सपाटी असलेला भाग आहे. तेथे अनेक उंबराची झाडे आहेत. येथे झाडीमध्ये अर्धवट कोरीव काम केलेली

महिषासुरमर्दिनीची मूर्ती आणि ४० सेंटीमीटर लांबीचे एक शिर असलेले शिल्प, तर ३० सेंटीमीटर आकाराच्या पावलाखाली चिरडल्या जाणा-या दैत्याचे शिल्प अशी भग्न अवस्थेतील शिल्पे आहेत. याशिवाय काही अनघड दगडांचे चौथरे असून, एक भग्न द्वारशाखाही आढळून येते.

रहाटीतील महत्त्वपूर्ण अवशेष

रहाटीतील सगळयात उंच टप्पा समुद्रसपाटीपासून २३० मीटर ते २५० मीटर उंचीवर आहे. येथे काही प्रमाणात सुस्थितीत असलेल्या दगडांचे सुमारे २५ इमारतींचे चौथरे आहेत. यातील १३ इमारती कलात्मकरित्या कापलेल्या सुघड दगडांच्या आहेत. डोंगर उतारावरील जागा सपाट करून येथे वसाहती केल्यामुळे पावसाळयातील पाण्याच्या प्रवाहाने येथील अवशेषांची सरमिसळ झालेली आहे.यांवर वन्य झाडे, झुडुपे वाढली असून या वास्तूंची रचना समजून घेणे अशक्य होते. हा भाग पूर्व-पश्चिम पसरला असून, त्याचे क्षेत्रफळ सुमारे सात ते आठ एकर असावे. या समुहातील मुख्य इमारत ही पश्चिमाभिमुख असून ते एखाद्या राजवाडयाचे किंवा प्रशासकीय मुख्याधिका-याचे घराचे अवशेष असावे. सुमारे दीड मीटर उंचीच्या या इमारतीची लांबी व रुंदी २१ मीटरअसून तिच्या पश्चिमेकडील भागात पाय-यांची योजना असल्यामुळे तिची रचना तारकाकृती झाली आहे (छायाचित्र क्रमांक १२). ही इमारत कलात्मक करण्यासाठी शिल्पकाराने जास्त कष्ट केले असावे. या चौथ-यावर बांधकामाचे कोणतेच अवशेष आढळत नाहीत. सहा थरांचा दीड मीटर उंचअसलेल्या चौथ-याचा तलविन्यास या भागात आढळणा-या दोन्ही शिवमंदिरांच्या तलविन्यासाशी (ground plan) मापांच्या फरकाने जुळणारा आहे.या इमारती भोवती इतर काही इमारतींचे चौथरे आहेत. हे सर्वच चौथरे पश्चिमेकडे तोंड केलेले आहेत. या इमारतींच्या दरम्यान असलेल्या जमिनीवर दगडी फरसबंदी केलेली असावी,सध्या मात्र येथे साठलेला झाडाझडोरा यामुळे त्याचा निश्चित अंदाज येत नाही. या मुख्य इमारतीसमोर सुमारे २० मीटर अंतरावर दक्षिणोत्तर जाणारी तटबंदी असावी असे अवशेष आहेत. तसेच या तटबंदीत प्रवेशद्वार असावे असे दिसते कारण या तटबंदीतून खाली उतरत जाणारा अंदाजे वीस पायऱ्यांचा एक जिना दिसतो. त्यावर मोठ-मोठ्या वेलींचे आच्छादन असून आतमध्ये जराही शिरकाव करता येत नाही. त्यामुळे त्यात निश्चित किती पाय-या असाव्यात हे लक्षात येत नाही. हा जिना पुढे पाच-सहा मीटर खाली एका सपाटीवर उतरतो. येथे शार्दुलांच्या दोन भग्न प्रतिमा आढळतात. हे शार्दुल शिल्प पूर्वी निश्चितच वरील प्रवेशद्वार भूषवित असणार. या सपाटीवर चार लहानमोठ्या अनघड दगडांचे

चौथरे आढळून येतात. येथुन पुढे खोल दरी आहे मात्र झाडीतूनही समोरील उंबार्डी गावाचे विहंगम दृश्य दिसते. या सपाटीवरून दक्षिण दिशेस जाता येते. सुमारे ५० मीटरअंतरावर वरच्या दिशेने येणारा ओढा लागतो. या ओढयात पावसाळयातील साकव अथवा पुलासाठी चौकोनी आकाराचे खड्डे केलेले दिसतात. त्याच्यापुढे गेल्यास एक लांबट आकाराचा चौथरा असून तेथे चौकटच्या फुलांची नक्षी व अर्धस्तंभाची प्रतिकृती असलेले पीठाचे दगड दिसून येतात. या सपाटीवरून तीव्र उतार असलेल्या जागेतून झाडीतून वाट काढत खाली तळई येथे उतरता येते. तेथील शिवमंदिरात जाण्यासाठी पूर्वी येथून मार्ग असावा, त्यामुळे कातळात खोदलेल्या पाय-यांची योजना काही ठिकाणी केलेली आढळते. राजवाडयाच्या चौथ-याच्या उत्तर बाजूस किमान चार ते पाच इमारतींचे चौथरे आहेत. हे राहत्या घरांचे अवशेष असावेत. राजवाडयाच्या मागच्या बाजूस सुमारे बारा मीटर अंतरावर एक पाय-यांचा जिना आहे. तो वरील टप्प्यात सपाटीवर जातो पण तेथे कोणतेही अवशेष सध्या आढळत नाही. तेथे डोंगराचे कडे कोसळल्यामुळे तेथे विशाल आकाराच्या शिळा पडलेल्या आहेत. राजवाड्याच्या दक्षिणेकडील भागात पाच ते सात घरांचे अवशेष असून येथील घरांना पन्हाळ काढलेल्या मोऱ्याअसाव्यात. आजुबाजूच्या झाडीत जाती, पाटा, वरवंटा, तेलाच्या घाण्यांचे अवशेषमोठ्या प्रमाणावर आढळतात. रहाटीच्या शेवटच्या चिंचोळया भागात शेवटच्या इमारतीचे अवशेष आहेत. ती इमारत ११ मीटर× १७ मीटर मापाच्या चौथ-यावर उभारली असावी. येथे किमान तीन ते चार इमारती असाव्यात.

इतर पुरातत्त्वीय अवशेष

रहाटीतील सर्व भागात भूपृष्ठावर करड्या व लाल रंगाची खापरे मोठया प्रमाणावर आढळतात. मसाला वाटायचा पाटा वरवंटा, दळणाची जाती, तेलाचे घाणे इत्यादि रोजच्या वापरातील अनेक वस्तू मोठया प्रमाणावर सापडतात, शिवाय वेगवेगळया आकाराचे कुंभाकृती दगडी वस्तू देखील सापडतात. अनेक ठिकाणी वेलबुट्टी असलेले नक्षीदार दगड आहेत. या भागातएक ते दीडसेंटीमीटरलांबी व रूंदीची चौकोनी आकाराची पसरट खापरे विपुल प्रमाणावर सापडतात. आज जरी चौथ-यांवर इमारतीच्या बांधकामाचे अवशेष नसले तरी चौथ-यांवर बसविण्यासाठी ठेवलेल्या खांबाचे दगडी तळखडे आहेत. यावर लाकडी खांबबसविले जात असावेत. काही प्रमाणात विटांचे तुकडे ही आढळतात. पण बहुतेक भिंती मात्र मातीसारख्या न भाजलेल्या कच्या मालाच्या असाव्यात. आजही कोकणात या पद्धतीने भिंती उभारल्या जातात. या शिवाय कुर्डु किल्ला या संरक्षक वसाहतीवर कुर्डाई देवीच्या मंदिराजवळ सहा वीरगळ,एक

झीज झालेले गजलक्ष्मी शिल्प, चंद्र-सूर्य कोरलेली व शिरोभाग अर्धवर्तुळाकार असलेली शिलालेखासाठी सपाट जागा केलेली आयताकृती शिळा आढळते. या किल्ल्यावर प्रवेश करताना कातळात खोदलेला मार्ग व पाय-या आहेत.या मार्गावर लाकडी आच्छादन टाकण्यासाठी पाडलेली खोदीव छिद्रे दोन्ही बाजूस केलेली दिसतात. गडावरील वीरगळ आणि पायथ्याशी असलेल्या रहाटी परिसरातील वीरगळ यांमध्ये कमालीचे साधर्म्य आहे. या संरक्षक वसाहतीवर सुळक्याच्या भागात कातळात कोरलेल्या पाण्याच्या तीन टाक्या व दोन खोदीव गुहा आढळून आल्या आहेत. या गुहांना गुप्त खण आहेत. संरक्षक वसाहतीतील महत्वाच्या वस्तू ठेवण्यासाठी या खणांचा वापर होत असावा.

प्राचीन व मध्ययुगीन व्यापारी मार्ग असल्यामुळेच या नगराची निर्मिती झाली असावी. नंतर नगराच्या आणि घाटमार्गाच्या रक्षणासाठी संरक्षक वसाहतींची निर्मिती झाली.

या परिसरात असलेल्या जिता, हरवंडी, बोरीवली, टिटवे, मालुस्ते, शिरवली व कडापा या गावातून गावदेवी मंदिर परिसरात अनेक भग्न मूर्ती व मोठया प्रमाणावर वीरगळांचे अवशेष आहेत. या परिसरात आढळणारे वीरगळांचे प्रचंड प्रमाण पाहून येथे मोठी युद्धे झाली असावीत. ही युद्धे होण्यामागे मुख्य कारण म्हणजे कुंभ, देव, लिंग्या हेव्यापारी घाटमार्ग ताब्यात घेणे हाच असावा. येथे आढळलेल्या फक्त एकाच वीरगळावर गोरक्षणासाठी मृत्यु पावलेलावीर दिसतो. या वरून देखील हे वीर युद्धात मृत झाल्याचे दिसते. या सर्व पुरातत्त्वीय अवशेषांवरून डोंगर उतारावरील झाडे तोडून, जमीन सपाट करून एक सर्व सोयीसुविधायुक्त नगर वसविले गेले होते. नगराच्या रचनांवर वैशिष्ट भौगोलिक परिस्थिती बरोबर सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक प्रभाव पडलेला दिसतो. समाजामध्ये असलेल्या वर्गीय स्तराचे प्रतिबींब नगर-रचनेवर पडलेले दिसते. नगराच्या तटबंदीच्या आत सहसा समाजातील प्रभावशील असणा-या वर्गाचे वास्तव्य असते. येथे सर्वोच्च भागात बनविल्या गेलेल्या इमारती राजा किंवा इतर महत्त्वपूर्ण अधिकारी वर्गाच्या असाव्यात. हे ठिकाण सुरक्षेच्या दृष्टीने मोक्याच्या ठिकाणी आहे. या सर्वोच्च टप्प्यातील वसाहतीस अजून एक तटबंदी असल्याचेअवशेष आहेत. यावरून देखील येथे महत्त्वपूर्ण लोक रहात असल्याचे सुचित होते. घडीव दगडांच्या सुबक बांधणीच्या वास्तू या प्रशासकीय अधिका-यांच्या असाव्यात, तर अनघड दगडांच्या फारशा सुबक नसलेल्या इमारती सैनिक, सेवक, नोकर अथवा गुलाम वर्ग यांच्यासाठी केली असावीत.

या भागात सापडलेली मंदिरांचे अवशेष, शिल्पे यांच्या रचना व शैली यावरून हे भूपृष्ठावर दिसणारे अवशेष अकराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंतचे असावेत. कदाचित यापूर्वीच व्यापारी घाट मार्गामुळे येथे वसाहती झाल्या असाव्यात, येथील घाटमार्ग पुढे पुणे जिल्हयातील धामणव्हाळ गावात पोहचतो.

**शिरसाड** (18° 19'10” N, 73° 19'57” E )

माणगावच्या ईशान्येस १० किलोमीटर अंतरावर शिरसाड गाव आहे. गावाच्या बौद्धवाडी जवळील काळभैरव व शिवमंदिर परिसरात येथील पुरावशेष आहेत. गावदेव मंदिरात अनेक झीज झालेली व भग्नावस्थेतील लहानमोठी शिल्पे ठेवली आहेत. त्यांच्या शैलीवरून ही शिल्पे सतराव्या ते अठराव्या शतकातील असावीत. मंदिरासमोर आयताकृती आकाराचा व दोन टप्पे शिल्लक असलेला एक वीरगळ पाहायला मिळतो. काळभैरव मंदिर व बाणेश्वर नावाचे शिवमंदिर या दरम्यान असलेल्या मैदानावर काही स्मृतीशिळा व आयताकृती आकाराच्या समाध्या आहेत. त्यांच्या स्वरूपावरून या मराठा काळातील असाव्यात. येथे खिळ्याच्या आकाराचे ४० सेंटीमीटर उंच व ३० सेंटीमीटर व्यासाचे पाच कोरीव दगडही पाहायला मिळतात. बाणेश्वर मंदिरात अठराव्या शतकातील नंदी, शिवलिंग, पार्वती, गणेश यांची शिल्पे आहेत. मंदिरासमोर एक योनीपीठ, दीपमाळ व एका बाजूने आत उतरण्यास पायऱ्या असलेली विहीर अथवा आड आहे. बौद्धवाडीतील एका शेतात एक गद्धेगळ सदृश्य ९० सेंटीमीटर लांब व २८ सेंटीमीटर रुंद आकाराचे शिल्प पडले आहे. शिळेचा शीर्षभाग त्रिकोणाकृती असून चौकटीत उजवीकडे तोंड केलेले गाढव सदृश्य दोन प्राणी आहेत. या चौकटी खालील भाग शिलालेखासाठी सपाट केलेला दिसतो (छायाचित्र क्रमांक १६). सध्या यावर कोणताही लेख आढळत नाही. जवळील माळावर सहा मीटर लांब व चार मीटर रुंद आकाराचे विखुरलेले दोन चौथरे असून येथे कोणतेही शिल्पे नाहीत. गावातील घोडशेतवाडीत एका दगडावर घोड्याचे शिल्प होते असे सांगतात पण सर्वेक्षणात आढळले नाही. ही शिलादेखील गद्धेगळ असण्याची शक्यता आहे. बोरवाडी जवळील छोट्या पुलाजवळील ओढ्यात दोन शिलाहार शैलीची गणेशाची शिल्पे आहेत. या सर्व शिल्पांच्या धाटणी व बौद्धवाडीमंदिर परिसरात मिळणाऱ्या मृदभांड्यावरून येथे उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात वसाहत झाली असावी. बामणगाव (18° 19'59” N, 73° 19'45” E ) हा शिरसाड गावाचाच भाग आहे. याठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत.

**मशिदवाडी** (18° 18'33" N, 73° 21'2" E )

मशिदवाडी हे गाव माणगावच्या ईशान्येस ११ किलोमीटर अंतरावर आहे. मशिदवाडी गावात माणगड ही एक संरक्षक वसाहत अथवा किल्ला आहे. सह्याद्रीच्या मुख्यरांगेपासून काहीसा वेगळ्या झालेल्या एका लहान टेकडीवर मराठा काळात प्रसिद्धीस आलेला किल्ला आहे. गडावरील व परिसरातील पुरावशेष पहाता या ठिकाणी उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात किंवा त्यापूर्वी वसाहत झाली असावी. या गावाजवळून पुणे जिल्ह्यात जाणारा कुंभ हा घाटमार्ग आहे. या व्यापारी घाटमार्गाच्या संरक्षणासाठी या टेकडीला संरक्षक वसाहतीचे स्वरूप प्राप्त झाले असावे. गडावर १२ कोरीव पाण्याच्या टाक्या आहेत. यातील यातील काही वरच्या पातळीत तर काही खालच्या टप्प्यात आहेत. वरच्या टाक्यांमध्ये कोणतेही अलंकरण नसलेले खांब आहेत. या टाक्या भुपृष्ठावर आयताकृती मुख असलेल्या व आत कातळात जमिनीला समांतर खोदलेल्या आहेत. गडाच्या खालच्या टप्प्यात विंझाई देवीचे मंदिर असून सध्या मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारचे आधुनिक काळातील शिल्प आहे. मंदिराभोवती शुष्कसांधी बांधीव पद्धतीच्या शिळा पडल्या आहेत. गडाच्या पूर्वबाजूस पूर्वाभिमुख कातळ कोरीव लेणी आहे. लेणीचे स्वरूप कुर्डु किल्ल्यावर आढळलेल्या लेणीसारखे आहे. या लेणीचे स्वरूप धार्मिक नसून लौकिक अर्थाने याची निर्मिती झाली असावी. आतील पश्चिम बाजूस जमीन पातळीवर आयताकृती मुख असलेला एक मीटर लांबी व ५० सेंटीमीटर रुंद दोन गुप्त खण आहेत. यावर लाकडी पातळ तावदान टाकून झाकता येईल अशी सोय आहे. यात गडावरीलची मौल्यवान वस्तू ठेवत असावेत. लेणीचा पूर्व भाग कोरीव शिळांनी बांधून काढला आहे.समोरच दोन कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आहेत. लेणीच्या बाहेरील बाजूस ठेंगणा कट्टा ठेवला आहे. स्थापत्य शैलीवरून या लेणीची निर्मिती दहाव्या शतकानंतर केंव्हातरी झाली असावी. किल्ल्यावरील लेणी व पाण्याच्या टाक्या यांची सफाई एका संस्थेने केली असून, या टाक्यातील गाळात उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन तसेच मध्ययुगीन काळातील काळ्या रंगाची व लाल रंगाचा लेप असलेली जाड पोताची, तसेच करडया रंगाच्या खापरांचे अवशेष सापडले आहेत. यात झाकणी, थाळ्या व तोटीचे अवशेष आहेत. या सोबत काळ्या आणि बहुरंगी व चकतीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडेही सापडतात.

गडाच्या पायथ्याला पूर्वाभिमुख शिवमंदिराचे अवशेष आहेत. या ठिकाणी फक्त चौथरा असून याचे स्वरूप कुर्डु किल्याच्या परिसरात आढळलेल्या मंदिरा प्रमाणे आहे. मंदिराची भिंत आज

अस्तित्वात नाही. चौथ्यावर एक मोठा नंदी, भग्न विष्णू प्रतिमा, भग्न योनीपीठ पाहायला मिळते. गर्भगृह खोल असून त्यात सुमारे एक मीटर आकाराचे शिवलिंग आहे. या मंदिराच्या भोवताली आयताकृती तसेच चौकोनी खांब प्रकारचे चौदा वीरगळ आढळतात. एकंदर शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत.

**कुंभे** (18° 19'23” N,  73° 23'13” E )

कुंभ गाव माणगावच्या ईशान्येस १४ किलोमीटर अंतरावर पुणे जिल्ह्यात जाणाऱ्या घाटमार्गावर आहे. येथील काळ व कुंभ जलविद्युत प्रकल्पामुळे मूळ गाव व गावदेवीचे इतर ठिकाणी स्थलांतर झाले असून. आता गावातील वीर मारुतीची मूर्तीच फक्त पाहता येते.

**मांजुरणे** (18° 18'38” N, 73° 21'40” E )

माणगावच्या ईशान्येस १३ किलोमीटर अंतरावर गाव आहे.गावदेव काळभैरी मंदिराजवळ एका भग्न वीरगळाचे अवशेष आहेत.

**केळगण** (18° 19'29” N, 73° 21'48” E )

केळगण व कुंभ दोन्ही गावे माणगावच्या ईशान्येस १२ किलोमीटर अंतरावर पुणे जिल्ह्यास घाटमार्गाने जोडली आहेत. केळजाई या स्थानिक गावदेवीच्या मंदिरात ५० ते ६० सेंटीमीटरची किमान दहा शिल्पे आहेत. त्यांवर तेल व अबिराचा लेप असल्याने त्यांचे मूळ स्वरूप कळत नाही. एकंदर स्वरूपावरून याची निर्मिती अठराव्या शतकात किंवा नंतर झाली असावी.

**धामणी** (18° 18'7” N, 73° 20'29” E )

माणगावच्या ईशान्येस १० किलोमीटर अंतरावर धामणी गाव आहे. गावात नदीकिनारी शिवमंदिर व गावदेवाचे मंदिर आहे. शिवमंदिराचे केवळ जोते शिल्लक असून, येथे नंदी, गणेश, भग्न योनीपीठ व शिवलिंग पाहायला मिळते. मंदिरासमोरील झाडीत आयताकृती व तीन ते चार टप्प्यातील पाच वीरगळ व एक सतीशिळा आहे. यावरील वीर घोडेस्वाराशी लढताना दिसतो. सुमारे १.२० मीटर लांबीचे योनीपीठ येथे पाहायला मिळते. शिलाहारशैलीतील स्तंभाचा तळखडा येथे आहे. मंदिर परिसरात सुमारे एक मीटर लांबीच्या शुष्कसांधी बांधणीच्या कोरीव शिळा आढळतात. शैलीवरून हे अवशेष बाराव्या ते तेराव्या शतकातील असावेत. जवळच चाच नावाचे गाव असून येथे कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष आढळले नाहीत.

**चन्नाट** (18° 17'37" N, 73° 21'12" E )

धामणी गाव माणगावच्या ईशान्येस ११ किलोमीटर अंतरावर आहे.काळकाई देवी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. देवीचे दोन हातांचे शिल्प असून, त्यावर तांब्याचा पत्रा लावला आहे. या ठिकाणी काळभैरी मंदिराबाहेर आयताकृती तीन टप्यातील दोन वीरगळ आढळले.

**गांगवली** (18° 15'10" N, 73° 19'31" E )

माणगावच्या ईशान्येस सहा किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. नदीच्या काठावरील हे गाव छत्रपती संभाजींचा पुत्र शाहू यांच्या जन्मस्थानासाठी प्रसिद्ध आहे. येथे पेशवेकाळात नदीला घाट बांधला गेला किंवा मुळात असलेल्या घाटाचा व प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे. जीर्णोद्धार झाला असला तरी मंदिराचे मूळ अधिष्ठान त्याच ठिकाणी आहे. मंदिराचा तलविन्यास प्रवेश भागात पुढे आलेल्या पायऱ्या, मंडप व खोल गर्भगृह, असा या परिसरात आढळलेल्या अशाच प्रकारच्या मंदिराशी साम्य असलेला आढळतो. या मंदिरावर आधुनिक काळात बांधकाम केले आहे. मंदिराच्या खोल गर्भगृहाच्या कोपऱ्यातील अर्धस्तंभ उत्तर शिलाहारकालीन स्तंभाशी साधर्म्य दाखवितात किंवा त्यांवर शिलाहार स्तंभ शैलीची छाप आहे. गर्भगृहातील देवळी आणि देवळीतही पार्वतीची मूर्ती, नागशिल्प, पादुका शिल्प पाहायला मिळते. गर्भगृहाच्या डाव्या बाजूस भांडी ठेवण्यासाठी आधारपट्टी आहे. हिरण्यकश्यपूचा वध करत असलेली नृसिंहाची ३० सेंटीमीटर उंचीची सुटी प्रतिमा उल्लेखनीय आहे. जवळच भैरव मंदिरालगत चौथऱ्यावर ठेवलेले सुमारे एक मीटर उंचीचे चार टप्यात दाखवलेली आयताकृती आणि एकाच बाजूस शिल्पांकन असलेले दोन वीरगळ, व मंदिराच्यामागील बाजूस झाडीत सहा वीरगळ आहेत. तसेच भग्न भैरव मूर्ती या शैली यावरून तेथे बाराव्या शतकापासून ते अगदी अठराव्या शतकापर्यंतचे अवशेष आहेत. मंदिर परिसरात खापरांचे खापराचे अवशेष, तसेच शिशाचे गोळे देखील सापडतात.

**हरवंडी** (18° 17'32" N, 73° 20'15" E )

माणगावच्या ईशान्येस साडेचार किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. हरवंडी गावाच्या पश्चिमेस गावदेवाचे मंदिर आहे. तेथे मंदिरात मराठा व पेशवे काळातील काळभैरीची म्हणून दाखविली जाणारी जाणारी दोन शिल्पे आहेत. चार हातांची समभंग अवस्थेतील मूर्ती मराठा शैलीची आहे. जोगेश्वरीची म्हणून दाखविली जाणारी मूर्ती दोन हातांपैकी उजव्या हातात खड्ग वा दंड व डाव्या हातात कमंडलु धारण केलेली दिसते. इतर चार सुटे शिल्पांमध्ये एक झिजलेली

मूर्ती चार हातांची व पद्मासनात असून तिने करंडक मुकुट परिधान केला आहे. मंदिरामागे भैरवाची भग्न मूर्ती ठेवलेली आढळते. डोके नसलेली एक मूर्ती भग्नावस्थेतील आहे.शैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत या मंदिरासमोर झाडाखाली एका चौथाऱ्यावर एक मीटरहून थोडी अधिक आकाराची मारुतीची चपेट मुद्रेतील प्रतिमा आहे. या मूर्तीच्या बाजूसच भग्न अवस्थेतील गजलक्ष्मीचे एक शिल्प आहे. मंदिर परिसरात शुष्कसांधी पद्धतीने बांधले जाणारे दगड अस्ताव्यस्त पडले आहेत. यावरून येथे चांगले मंदिर असावे असा अंदाज करता येतो. तसेच काही मोठ्या शिळांवर दगड फोडीचेही काम चालले होते.

मंदिराभोवती काही अंतरावर अशा शिळा दिसतात. या मोठ्या शिळा नक्कीच दूरवरून आणल्या असाव्यात. गावातील जुन्या स्मशानभूमी जवळ एक शिवमंदिराचा फक्त चौथरा आहे. मंदिराबाहेर चौकोनी खांब प्रकारचा वीरगळ आहे. या वीरगळावर गुरे चोरी, तसेच एका व्यक्तीचे शीर कापुन हातात त्याची शेंडी धरलेला वीर दिसतो.एकंदर शैलीवरून ही शिल्पे अकराव्या ते बाराव्या शतकातील असावीत. हरवंडीकोंड येथे जननी देवतेचे मंदिर आहे. येथे एका पडीक शिवमंदिराचे अवशेष आहेत. हे अवशेष चौदाव्या वा पंधराव्या शतकातील असावेत. खरबाची वाडी हा हरवंडी गावाचाच एक भाग आहे. येथे नव्यानेच दत्त मंदिराची स्थापना झाली आहे.

**करंबेळी** (18° 17'32” N, 73° 20'15” E )

हरवंडी गावाच्या दक्षिणेस दोन किलोमीटर दूर व नदीच्या काठावरील करंबेळी गावाच्या गावदेव मंदिर परिसरातझीज झालेली शिल्पे आहेत. गावदेवाची मूर्ती घोड्यावर आरूढ झालेली आहे. दोन्ही शिल्पे शैलीवरून मराठा काळातील आहेत. मंदिराजवळ चौथाऱ्यावर उल्लेखनीय अशी मारुतीची चपेट मुद्रेतील स्थापक मूर्ती आहे एक हात कमरेवर असून त्यात गदा आहे. पायाखाली राक्षस दाखविला आहे हे शिल्प मूर्तीशैलीवरून अठराव्या शतकातील वाटते. या परिसरात बहुरंगी व चकतीच्या चपट्या आकाराच्या बांगड्याचे तुकडे आढळतात.

**गोरेगाव** (18° 9'19” N, 73° 17'32” E )

माणगावच्या दक्षिणेला नऊ किलोमीटरअंतरावर प्राचीन काळी घोडेगाव म्हणून प्रसिद्ध असलेले हे अंतर्गत बंदर दासगावच्या वायव्येस ३ किलोमीटर अंतरावर घोड आणि काळ नदीच्या संगमावर आहे. प्राचीन काळी हे एकव्यापारी बंदर होते, मात्र कालांतराने येथील सागरी वाहतुक कमी झाली. टॉलेमीने गोरेगावचा उल्लेख हिप्पोकुरा घोडेकुला असा केला

असून बालीपाटणा व हिप्पोकुरा हे सैमुल्ला म्हणजे चौलच्या दक्षिणेस असल्याचे नमूद केले आहे. गोरेगावला म्हणजे पूर्वीच्या घोडेगावला नौकानयनाच्या सोयीवरून ते आताचे गोरेगाव असावे (रायगड गॅझेटियर १९९३: ७३१). गावात अनेक तळी आहेत. गावाच्या मागे असलेल्या मल्लिकार्जुनच्या टेकडीवर शिवमंदिर असून येथील हे मंदिर आठशे वर्षापासूनचे असल्याचे सांगितले जाते. या टेकडीवर टेकडीच्या पश्चिमेकडे पोलीस स्थानकाच्यामागील बाजूस गायवासरू हे सुटे शिल्प आहेत. त्याचा खालचा भाग मातीत आहे. शीर्षभाग भग्न व अर्धवर्तुळाकृती असलेली ही शिळा ६५ सेंटीमीटर लांब आणि ३५ सेंटीमीटर रुंद आहे. त्यावर मंगल कलश दाखवला आहे. खाली चौकटीत गायवासरू कोरले आहेत. त्या खाली शिळा सपाट केलेली रिकामी सोडली आहे, बहुधा यावर एखादा लेख असावा. आज पावसामुळे तो झिजलेला आहे.

मल्लिकार्जुन मंदिराचा अंतर्भाग व गाभारा मराठा-पेशवेकालीन दगडी बांधणीचा आहे. त्यावर फांसना पद्धतीचे शिखर आहे. मंदिराबाहेर एक सतीशिळा तर तीन आयताकृती वीरगळापैकी दोन भग्नआहेत. काही सुटी शिल्पेही आढळून येतात. अठराव्या व एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातीलसमाधी म्हणजे स्मृती स्मारके आहेत. दगडी दीपमाळ आता उध्वस्त झालेली आहे. या टेकडीच्या पूर्वेकडील भागात एक ३.८० x २.६० x १.५० मीटरआकाराचे, तर पश्चिमेकडील भागात यापेक्षा मोठ्या आकाराची दुसरी कातळात कोरलेली पाण्याची टाकी आहे. टेकडीच्या पश्चिम टोकाकडे एक जुना दर्गा असून उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या दर्ग्यास गावातील कालभैरीचा मोठा भाऊ मानतात. दर्ग्याच्या बाहेर एक दगडी शिळा असून त्यावर फारसी भाषेतील खोदीव लेणी लेख कोरला आहे. तो आता दुर्बोध झाला आहे. गावातील भैरवनाथ मंदिराला जीर्णोद्धार झाला असून, या मंदिरात एक पोर्तुगीज बनावटीची घंटा टांगली आहे त्यावर पवित्र क्रॉस चे चिन्ह आहे.

**वडघर** (18° 9'53” N, 73° 17'50” E )

माणगावच्या दक्षिणेला सात किलोमीटरअंतरावर असलेले हे गाव साने गुरुजींच्या स्मारकासाठी प्रसिद्ध आहे. या गावातील टेकडीत एक लेणे खोदलेले असून, ते वायव्य दिशेस तोंड करून आहे. त्याची लांबी सुमारे सहा मीटर, उंची एक मीटर तर रुंदी देखील एक मीटर असून, त्यात फक्त बसून प्रवेश करता येतो. त्यात दोन दालने खोदली आहेत.सर्वात आतील दालनात दरवाजासाठी खोबणी केल्या आहेत (छायाचित्र क्रमांक १०). या लेणीच्या स्वरूपावरून याचा उपयोग ध्यान धारणेसाठी वा मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी करत

असावेत. त्याच्या तलविन्यासावरून ही लेणी सहाव्या वसातव्या शतकात खोदलेली लेणी असावी.

**वडगाव** (18° 10'19" N, 73° 17'14" E )

माणगावच्या दक्षिणेला आठ किलोमीटर अंतरावरील गावात शिवमंदिर आहे. या मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झालेला आहे. येथे पूर्वी दगडी बांधणीचे शिवमंदिर होते असे सांगतात. शुष्कसांधी बांधीव प्रकारे उभारलेला मंदिराचा गाभारा खोल असून, त्यात शिवलिंग आहे. मंदिराबाहेर भग्नावस्थेतील गजलक्ष्मी शिल्प आहे. हत्ती आणि लक्ष्मी एकाच पातळीत असून, शिल्प झीज झालेले आहे. शैलीवरून ही शिल्पे अकराव्या अथवा बाराव्या शतकातील असावीत.

**हुर्डी** (18° 8'56" N, 73° 16'31" E )

हे गाव माणगावच्या दक्षिणेला नऊ किलोमीटर अंतरावर आहे. हुर्डी गावाच्या गावदेवीचा मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला. मंदिरात अलिकडील काळातील शिल्पे आहेत, मंदिराबाहेर शिवलिंग, नंदी शिल्प तसेच वीरगळाचा भग्नावशेष आढळतो. शैलीवरून वीरगळ बाराव्या शतकातील असावा.

**वाकी तर्फे गोवेले** (18° 8'47" N, 73° 16'45" E )

हे गाव माणगावच्या दक्षिणेला नऊ किलोमीटर अंतरावर आहे. काळनदीच्या पश्चिम तीरावर गोरेगाव-म्हसळा रस्त्यालगत या गावात शीतळाई देवीच्या मंदिराच्या परिसरात, दोन हातांच्या उभ्या मूर्ती आहेत. शिल्पशैलीवरून त्या अठराव्या किंवा एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळातील असाव्यात. मराठा काळात वाकी आणि हुर्डी गावात सैन्याचे तळ पडत.

**हरकोल** (18° 8'21" N, 73° 15'9" E )

माणगावच्या काहीसे दक्षिणेस ११ किलोमीटरअंतरावर हरकोल गावाच्या मोहल्ला गावात गावातील पुरावशेष आहेत. खोल गर्भगृह असलेले शिवमंदिर जीर्णोद्धार झालेला आहे. हे मंदिर दगडी बांधवीचे होते असे लोक सांगतात गर्भगृहात प्राचीन शिवलिंग म्हणजे योनीपीठ,लिंग शिल्प आहेत. गणेशाची झिजलेली प्रतिमा, तसेच एका मूर्तीच्या पायाचे भाग शिल्लक आहेत. या शिवाय मंदिरासमोरील गावदेवी मंदिरात आयताकृती आणि एकाच बाजूस

शिल्पांकित केलेले दोन टप्प्यांतील दोन वीरगळ आहेत. एका वीरगळावर खालच्या टप्प्यात या चार पायांचा प्राणी दाखवलेला आहे. शिल्प वैशिष्ट्यावरून वीरगळ बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

**काचले** (18° 8'11" N, 73° 17'4" E )

माणगावपासून११ किलोमीटर अंतरावर काचले गाव आहे. गावाच्या रहाटी भागात पदमावती देवीचे मंदिर आहे. देवीचे शिल्प दोन हातांचे आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प आधुनिक काळातील वाटते.

**पुरार** (18° 7'35" N, 73° 17'4" E )

पुरार हे माणगावच्या दक्षिणेस काळ नदीच्या पश्चिम तीरावर १२ किलोमीटर अंतरावर आहे. पूर्वी गावात पांडवकालीन मंदिर असल्याचे लोक सांगतात. या ठिकाणी पूर्ण जीर्णोद्धार झालेले एक शिवमंदिर आहे. शुष्कसांधी बांधीवतंत्राने उभारल्या गेलेल्या या मंदिराच्या काही शिळा येथे पाहायला मिळतात. मंदिराच्या उत्तर बाजूस एक छोटे मंदिर आहे.यात ७० सेंटीमीटर उंच व ४५ सेंटीमीटर रुंदीचे महिषासुरमर्दिनी प्रकारचे शिल्प असून काहीसे झीज झालेले आहे. हातातील त्रिशूळ महिषरुपी दैत्यावर रोवला आहे. देवी डाव्या पायावर उभी असून उजवा पाय दैत्याच्या पाठीवर रोवलेला दिसतो. शीर तुटलेल्या दैत्याच्या शरीरातून प्रकट झालेल्या दैत्याची शेंडी डाव्या खालच्या हाताने पकडली आहे. शिल्पकाराने हे शिल्प कोरताना आपल्या बुद्धीचा कल्पकतेने वापर केला आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे.

**भिंताडं** (18° 8'0" N, 73° 18'4" E )

हे गाव माणगांव-देवळी रस्त्यावर, माणगावच्या दक्षिणेस १३ किलोमीटर अंतरावर आहे. गावात मराठा काळात सुप्रसिद्ध असलेल्या सुर्वे कुटुंबियांचा वाडा आहे. सध्या तो खराब अवस्थेत झाला आहे. या शिवाय गावातील शिवमंदिराचे भग्न अवशेष आहेत. योनीपीठ, भग्न नंदी यांचे अवशेष पहायला मिळतात. शिल्पशैलीवरून ते पंधराव्या शतकातील वाटतात. मंदिरासमोर दोन टप्पे असलेले वीरगळ आहेत. यातील वीर हा वाघाची शिकार करताना मृत्यूमुखी पडल्याचे खालच्या चौकटीत दिसते. यासाठी चार शिकारी कुत्र्यांचाही वापर केल्याचे दिसते. या शिवाय गावाबाहेर रस्त्यालगत कालभैरीचे मंदिर असून त्यातील चार हातांची भैरव प्रतिमा अठराव्या शतकातील असावी.

**चिंचवली** (18° 9'12” N, 73° 18'12” E )

माणगावच्या दक्षिणेला १० किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील सोमजाई मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. शिवमंदिरात शिवलिंग आणि नंदी, गणेश, विष्णूही चार शिल्पे आहेत. शैलीच्या दृष्टिकोनातून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील असावेत.

**देवळी** (18° 7'3” N, 73° 18'28” E )

माणगावच्या दक्षिणेला १४ किलोमीटर अंतरावर प्राचीन काळी प्रसिध्दअसलेल्या घोडेगाव या गावाजवळ असल्याने याला महत्त्व प्राप्त झाले असावे. दोन्ही बाजूंनी काळनदीचे पात्र असल्याने गाव एखाद्या बेटासारखे भासते. गावएका टेकडीसभोवती वसले आहे. गावातील सोमजाई देवतेच्या मंदिराला पूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून येथे चार हातांचा आणि दोन हातांचा पाच देवतांची शिल्पे आधुनिक काळात स्थापली आहेत. देवतांना बसवण्यात येणारी मुखवटे तांब्या आणि पितळेची आहेत. ही एकोणिसाव्या शतकातील असल्याचे सांगितले जाते.

**मुर** (18° 7'32” N, 73° 18'30” E )

माणगावच्या दक्षिणेला १२ किलोमीटर अंतरावर मुर या गावात प्राथमिक शाळेच्या जवळ उल्लेखनीय पुरावशेष सापडतात. गावाच्या शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या मंदिराचा मूळ पाया तसाच ठेवण्यात आला आहे. खोल गर्भगृहातील भग्न शिवलिंग, देवळी आणि त्यावरील कळस ही शिल्पे पाहायला मिळतात. संमभंग व स्थानक अवस्थेतील व झीज झालेली विष्णूप्रतिमा, चार शिर असलेली आयताकृती दगडी शिळा,मंदिरा बाहेरील आयताकृती व एकच बाजू शिल्पांकित केलेला तीन टप्यांतील वीरगळ, खाली चौकोनी वर दंडगोलाकार असलेला शिवलिंगाचा भाग हे सर्व वैशिष्ट्यावरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. प्राथमिक शाळेच्या वरच्या बाजूस असलेल्या भवानी मंदिराला जीर्णोद्धार झाला आहे. मंदिराबाहेरील झाडाच्या बुंध्यात एक मीटर आकाराचा वीरगळ आहे. शिवाय भग्न व खाच असलेले प्राचीन पद्धतीच्या मूर्तीचे पीठ आहे. या जीर्णोद्धारीत मंदिराच्या देवतेचे शिल्प या भागातील अशा प्रकारचे सर्वात प्राचीन असण्याची शक्यता आहे. ही प्रतिमा महिषासुरमर्दिनी प्रकारची अष्टभुजा व अतिभंग अवस्थेतील आहे. पाठमोऱ्या देवीने कमरेतून वळून दैत्यावर आवेशाने हल्ला चढवला आहे. हे शिल्प झिजलेले असले तरी महिषासुराचा वध करताना देवीचा आवेश व गतिमानता,त्याचे पायव शेंडी पकडून त्याला ठार

करण्याचा घेतलेला पवित्रा, शब्दात वर्णन करता येण्यासारखा नाही. देवीने आपल्या वरच्या डाव्या हाताने महिषासुराची शेंडी पकडली आहे. त्या नंतरच्या हातात घंटा आहे. त्या खालच्या हातात धनुष्य आहे. सर्वात खालच्या डाव्या हाताने तिने दैत्याचे वाहन महिष याला त्याचा मागचे दोन पाय अगदी लीलया पकडून उचलून धरले आहे. तो अगदी लोंबकळताना दिसतो. उजव्या वरच्या हातात खड्ग व खालच्या हातात एखादी वस्तू, त्या खालच्या हाताने महिषासुराचा डावा पाय पकडला आहे. आपल्या उजव्या पहिल्या हातातील त्रिशूळ त्याच्या कमरेवर रोवला आहे. शिल्पकाराने हे शिल्प कोरताना आपल्या बुद्धीचा कल्पकतेने वापर केला आहे. देवी उजव्या पायावर उभी असून डावा पाय दैत्याच्या पाठीवर रोवलेला दिसतो. दैत्याच्या हातात खेटक आणि खड्ग धारण केले आहे. अंबरनाथ मंदिरावर असलेल्या याच प्रकारच्या शिल्पाशी याचे प्रचंड साम्य आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प अकराव्या शतकातील असावे.

**नागाव** (18° 9'0” N, 73° 18'16” E )

माणगावच्या दक्षिणेस १० किलोमीटर अंतरावर नागांव येथे जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिराभोवती वीरगळ व शिल्प यांचे भग्नावशेष दिसून येतात. मंदिरात गणेश, नंदी, शिवलिंग यांचीशिल्पशैली या मंदिराचाजीर्णोद्धार मराठा अथवा पेशवे काळात झाला असे सुचवितात. मंदिराबाहेर विशाल काही वास्तू घटक, तीन भग्न वीरगळाचे अवशेष आणि भग्न नंदीशिल्पआहे. यांच्या शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकापासून ते सतराव्याशतकापर्यंतचे असावेत. बाळजाई या गावदेवी मंदिराजवळही काही भग्नमूर्तींचे अवशेष एकत्र ठेवले आहेत. अवशेषांवरून महिषासुरमर्दिनीचेशिल्प असावे असे वाटते. शैलीवरून अवशेष बाराव्या शतकातील असावेत. सध्या मंदिरातील शिल्प म्हणजे आधुनिक काळातील असलेली मूर्ती वाघावर आरुढ झालेली आहे. शिलाहार नृपती प्रथम अनंतदेव याच्या सन १०९५ मधील खारेपाटण ताम्रपटात चौल, शूर्पारक या बंदरांबरोबर नागाव या बंदराचाही उल्लेख आला आहे (मिराशी १९७३: १३५-१३६). मिराशीच्या मते नागाव म्हणजे अलिबाग जवळील नागाव असावे, पण आजच्या नागावला असलेली भौगोलिक परिस्थिती व पुरातत्त्वीय पुराव्यामुळे नागाव हेच ते बंदर असण्याची शक्यता आहे.

**चांढोरे (18° 9'49" N, 73° 11'9" E )**

हे गाव म्हसळा खाडीच्या पट्टयात समुद्रसपाटीपासून सुमारे २०० मीटर उंचीवर आहे. माणगांव- म्हसळा या रस्त्यावरील हे एक प्रमुख गाव आहे. गावात प्राचीन मंदिरांचे, पुष्करणी व इतर भग्नावशेष आहेत. चार पूर्ण तर दोन अपूर्ण आकाराचे 'वीरगळ' आहेत. यामध्ये उल्लेखनीय असे एका छत्रधारी राजाचे शिल्प आहे. यासोबत तीनसती शिळा आहेत. उल्लेखनीय अशी अनंतशयनी विष्णूची मूर्ती आहे. तसेच नंदीशिल्प, गणेश प्रतिमा, गजलक्ष्मी व काही अनोळखी भग्न शिल्पे आहेत. शिल्पांच्या वैशिष्ट्यावरून ही सर्व शिल्पे बाराव्या किंवा तेराव्या शतकातील आहेत. हा कालखंड शिलाहार यादवांचा आहे. येथे सापडलेल्या खापरांवरून चांढोरे एक उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात उदयाला आले असावे. येथे 'गदयाणक' नाणे मिळाल्याचे असून ते मध्ययुगीन काळातील असावे. येथे एका बाजूने आत उतरण्यास पायऱ्या असलेल्या घोडे बाव या विहिरीत देवकोष्ट असून त्यातील प्रतिमा उमा-महेश्वर गटातील असून,शंकराच्या डाव्या मांडीवर पार्वती विराजमान झाली आहे. यामध्ये तिचे वाहन सिंह न दाखवता गोधा म्हणजे घोरपड दाखविली आहे. या ठिकाणी वीरगळावर छत्रधारी राजाचे अप्रतिम शिल्प आहे. चांढोरेगावाच्या जंगलातील इंदवन भागात जांभ्या दगडात कोरलेली एक मीटर लांब व दीड मीटर रुंदीची काही अंशी मातीत बुजलेली लेणी आढळली आहे. त्याच्याशेजारीच एका शिवमंदिराचे अवशेष आहेत या भागातदोन सतीशिळा व एक वीरगळ पडलेले आहेत. याठिकाणी काचेचा लेप दिलेली खापरे आढळतात. चांदोरे गावातील एक रहिवासी रामभाऊ रणदिवे यांच्याकडे नरसिंहाचे पितळी शिल्प आहे, सर्वेक्षणाचे वेळेस पाहायला मिळाले नाही.

**वडघर** (18° 10'13" N, 73° 13'17" E )

माणगावच्या नैऋत्येस १० किलोमीटर अंतरावर वडघर गाव आहे. या गावातील एका शेतात गायवासरू शिल्प आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील असावे. गावचे काळभैरी मंदिरात मराठा काळातील शिल्पे आहेत.

**मुद्रे** (18° 10'8" N, 73° 12'27" E )

माणगावच्या नैऋत्येस ११ किलोमीटर अंतरावर वडघर गाव आहे. गावातील शिवमंदिर उध्वस्त झाले आहे. येथे भग्न योनीपीठ, दोन भग्न शिल्पे आहेत. ही शिल्पे शिल्पशैलीवरून बाराव्या शतकानंतरची असावीत.

**शिळीम** (18° 9'31” N,  73° 14'21” E )

माणगावच्या दक्षिणेस १० किलोमीटर अंतरावर शिळीम गाव आहे. गावदेवी सोमजाई परिसरात एक महिषासुरमर्दिनी शिल्प आहे. शिल्पशैलीवरून हा बाराव्या शतकानंतरचा काळ असावा.

**नळेफोडी** (18° 10'51” N,  73° 10'36” E )

माणगावच्या नैऋत्येस १२ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात गावदेवाचे मंदिर आहे. या परिसरात उल्लेखनीय पुरावशेष आढळतात. या ठिकाणी गावाच्या वेगवेगळ्या भागात पाच गायवासरू शिल्पे आहेत. ही शिल्पे एक मीटरपासून ते ४० सेंटीमीटर उंच आहेत. त्यांच्या शैलीवरून ही शिल्पे अकराव्या अथवा बाराव्या शतकातील असावीत.

**गोवेले** (18° 8'26” N,  73° 12'23” E )

माणगावच्या नैऋत्येस १४ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात गणेशाचेमंदिर आहे. या परिसरात एक आयताकृती वीरगळ व एक भग्न गद्धेगळ यासारखी उल्लेखनीय शिल्पे आहेत. याशिवाय गावामागील टेकडीत एका कातळात कोरीव जांभ्या दगडातील लेणीचे पुरावशेष असल्याचे समजले.

**मांजरोणे** (18° 10'25” N,  73° 12'57” E )

माणगावच्या नैऋत्येस १० किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात काळभैरी व पद्मावतीचे स्थान आहे. गावदेवाचे मंदिर आहे. कालभैरव परिसरात उल्लेखनीय पुरावशेष आढळतात. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकानंतरचे असावेत.

**नांदवी** (18° 6'59” N, 73° 17'10” E )

हे गाव एका मोठया तलावाच्या सभोवती वसले आहे. तलावाच्या काठावर मराठा-पेशवे काळात जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिरात, दोन नंदी व एक शिवलिंग चांगल्या अवस्थेत आहेत. गाभाऱ्याच्या पश्चिम भिंतीतील देवकोष्ठात पद्मसनातील, चार हातांच्या झिजलेल्या देवतेचे शिल्प आहे. तिच्या दोन हातांपैकी खालचा उजवा हात भग्न अवस्थेत आहे. वरच्या उजव्या हातात डमरू तर डाव्या वरच्या हातात नाग धारण केला आहे. बहुतेक खालचे दोन्ही हात मांडीवर तप करताना असतात तसे आहेत. मूर्तीची झीज झालेली असली तरी तिची

शैली अकराव्या व बाराव्या शतकातील आहे. या देवतेच्या मूर्तीवरूनच या मंदिराला योगेश्वरीचे मंदिर असे संबोधले जाते. देवीचेपीठ ही प्राचीन पद्धतीचे आहे. खुर, कुंभ, कणी अशा पद्धतीचे आहे. मंदिराच्या परिसरात अनेक वीरगळ, तर काही सतीशिळा आहेत. यातील मंदिरा बाहेरील नंदी चौदाव्या किंवापंधराव्या शतकातील वाटतो. परिसरातील सहा वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराचे आणि चार ही बाजू कोरीव असलेले आहेत. यांवरील शिल्पे तीन ते चार टप्प्यांत कोरलेली आहेत. दोन वीरगळ आयताकृती व एकच बाजू कोरलेले, तीन टप्प्यांत आहेत. तीन सतीशिळा आहेत. या शिवाय योगेश्वरी मंदिर परिसरात विष्णू, गरुड, गणेश,पादुका जोडी अशी शिल्पे आहेत. ही शिल्पे मराठा काळातील असावीत.

गावातील कुंभारवाडा परिसरातील बापुजी महाराज मंदिरात अठराव्या किंवा एकोणिसाव्या शतकातील नक्षीकाम केलेले लाकडी खांब आहेत. या मंदिरात चुन्याचा लेप दिलेले एक दगडी वैशिष्ट्यपूर्ण त्रिकोणी तळखडा असलेले पीठ आहे, हे शैलीनुसार अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे. शिवाय वराह शिकारीच्या वेळेस मृत्युमुखी पडलेल्या वीराच्या छोटा वीरगळ आहे. या वीराच्या हातात धनुष्य आहे. सोबत त्याच्या त्याचा सहाय्यकही दाखवला आहे. घोडयावर बसलेले बापूजी या स्थानिक देवाचे शिल्प हे एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळातील वाटते.

**नवशी** (18° 7'48” N, 73° 14'55” E )

माणगावच्या नैऋत्येस नऊ किलोमीटर अंतरावर, डोंगराच्या उतारावरील हे गाव आहे. मोठणेश्वर या मंदिराचाजीर्णोद्धार झाला असून,येथे दुध देणाऱ्या कपिला गाईची आख्याईका सांगितली जाते.

**टोळखुर्द** (18° 6'13” N, 73° 18'26” E )

माणगावच्या दक्षिणेला १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावी आधुनिक काळात उभारलेले गणेशाचे मंदिर आहे, तसेच बौद्धवाडीजवळ शिवमंदिर असून, शिवलिंग आणि नंदी शिल्प पाहायला मिळते. मंदिरातच भग्न अवस्थेत एक वीरगळाचा एक भाग ठेवला आहे.

**मढेगाव** (18° 7'2” N, 73° 16'15” E )

माणगावच्या नैऋत्येस१२ किलोमीटरअंतरावर मढेगाव आहे. येथे शिवनदीकाठी फार पूर्वी एक मठ असल्याचे सांगतात. सर्वेक्षणात त्याची निश्चित जागा सापडली नाही. आता नदीत फक्त

झेंडे लावले जातात. सोमजाई ही गावदेवी असून भग्नावस्थेत असलेली काही शिल्पे येथे आहेत. या ठिकाणाहून म्हसळा येथे जाणारा घाटमार्ग सुरु होतो.

**भांडीवली (18° 6'21” N, 73° 17'46” E )**

माणगावच्या दक्षिणेला १३ किलोमीटरअंतरावर असलेल्या या गावी एका शेतात काळभैरीचेमंदिर आहे. काही झिजलेल्या मूर्ती आणि शिल्पे आहेत. कालखंड ठरवण्यासाठी उपयोग नाही.

**शिरवली** (18° 10'30” N, 73° 15'47” E )

माणगावच्या नैऋत्येस सात किलोमीटर अंतरावर पश्चिम किनारी काळनदीच्या या गावातील काळभैरी व शिवमंदिर या ग्रामदैवताचा नुकताच जीर्णोध्दार झाला असून मंदिराच्या बाहेरील बाजूस एका चौथ-यावर सुटी शिल्पे रचून ठेवली आहेत. यामधील सर्वच शिल्पे झिजलेली आहेत, यांमध्ये दोन वीरगळ , एक सतीशिळा, एक गणेशशिल्प, एक भग्न योनीपीठ व दंडगोलाकार लिंग आहे. सुमारे एक मीटर लांबी असलेल्या, दोन वीरगळांपैकी एक चौकोनी खांबाच्या आकाराचा आणि शीर्षभाग पिरॅमीडच्या आकाराचा आहे, त्यावर तीन टप्पे आहेत. शिवलिंग सुमारे मीटर भर लांबीचे असून, लिंग ठेवायची गोलाकार खाच एकूणपीठाच्या मानाने बरीच मोठी आहे. एकंदर शिल्पशैलीवरून सदर शिल्पे ही मूळ शिल्पांची भ्रष्ट नक्कल असावी. मराठा काळातील जीर्णोध्दाराच्या वेळेस या शिल्पांचीही नक्कल बनविण्यात आली असावी. गणेश शिल्प हे शिलाहार कालीन गणेश शिल्पांसोबत जुळणारे आहे. मंदिर परिसरात सतराव्या ते अठराव्या शतकातील समाधीचे कोरीव दगड आहेत.

**तारणे** (18° 10'14” N, 73° 16'9” E )

हे गाव माणगाव नैऋत्येस८ किलोमीटर अंतरावर काळनदीच्या पश्चिम काठावर आणि शिरवली आणि वडवली गावाच्या मध्ये आहे. गावाच्या बौध्दवाडी जवळ गावदेवीचे मूळस्थान होते, आता सन १९६५ नंतर मूळ ठिकाणी असलेल्या मूर्तीचे स्थलांतर गावक-यांनी कुणबीवाडी येथे केले आहे. या ठिकाणी आता चार हातांच्या दोन भग्न महिषासुर मर्दिनीची शिल्पे आहेत. एका ६० सेंटीमीटरउंच व २५ सेंटीमीटर रुंदशिलेवर कोरलेली मूर्ती झिजलेली आहे. दुसरी महिषासुर मर्दिनीची मूर्ती कमरेपासून भग्न झालेली असली तरी ही आधी वर्णन केलेल्या मूर्तीहून भिन्न आहे. महिषावर देवीचे वाहन सिंहाने ही हल्ला चढवलेला दिसतो.

शिल्पशैलीनुसार हे शिल्प आधीच्या शिल्पापेक्षा जास्त प्राचीन वाटते. शिलाहारशैली असलेली ही शिल्पे बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावीत.

**वडवली** (18° 9'38” N, 73° 16'15” E )

वडवली हे माणगावच्या दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावर घोड नदीच्या पश्चिम काठावर वसले आहे. गावाच्या वडवलीकोंड भागात कालकाई, हनुमान व शिवमंदिर आहेत. मंदिरातील सर्व शिल्पे आधुनिक काळातील आहेत. मंदिराबाहेर फक्त एक सतीशिळा व भग्नावस्थेतील गायवासरू शिल्प आढळून येते. शैलीवरून शिल्पे बाराव्या ते तेराव्या शतकातील असावीत.

**दहीवली** (18° 11'17” N, 73° 15'50” E )

माणगावच्या दक्षिणेस १० किलोमीटरवर घोड नदीच्या पश्चिम काठावर हे गाव वसले आहे. गावाच्या काळभैरव मंदिर व शिवमंदिर परिसरात गावातील पुरावशेष आहेत. दोन्ही मंदिरांचा जीर्णोद्धार झाला असून, येथे विष्णू, गणेश व पार्वती यांची शिल्पे आढळतात. शिवमंदिरात असलेल्या विष्णू, गणेश व पार्वती यांच्या मूळ शिल्पांची आधुनिक काळात भ्रष्ट नक्कल करण्याचा प्रयत्न केला आहे. या ठिकाणी नमस्कार मुद्रेतील पुरुष प्रतिमा, भैरव शिल्प, एक सतीशिळा व दोन वीरगळाचे अवशेष पाहायला मिळतात. मंदिराजवळ शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेल्या मंदिराचे काही भाग शिल्लक आहेत. शैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत. तर सतीशिळा मात्र मराठा काळातील नक्कल असावी.

**ढाकशेली** (18° 11'9” N, 73° 15'22” E )

ढाकशेली हे माणगावच्या दक्षिणेस सहा किलोमीटरवर डोंगरांच्या आड असलेले छोटे गाव आहे. गावात कोणतेही पुरावशेष आढळून येत नाहीत.

**कुमशेत** (18° 10'48” N, 73° 14'29” E )

माणगावच्या दक्षिणेस कुमशेत हे गाव सात किलोमीटर वर वसले आहे. या गावाच्या परिसरात कोणतेही पुरावशेष आढळून आले नाहीत.

**इंदापूर** (18° 18'17” N, 73° 14'12” E )

माणगावच्या उत्तरेस आठ किलोमीटर अंतरावर इंदापूर हे एक महत्त्वपूर्ण गाव आहे. आज हे गाव बसस्थानकाभोवती वसलेले आहे. परंतु येथील मूळगाव म्हणजे तळाशेत येथील परिसर

होय. इंदापूर बसस्थानकामागे 'आकार पॉटरी' या ठिकाणी मंदिराच्या द्वारशाखेचे अवशेष पडलेले आहे. शिल्प शैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकातील असावेत. तळाशेत म्हणजे इंदापूरचाच एक भाग आहे. एका टेकडीच्या पूर्वबाजूकडून त्याचा विस्तार गावाच्या पश्चिम दिशेस असलेल्या एका तलावापर्यंत झालेला आहे. गावातील काळभैरव मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून मंदिरासमोरील दीपमाळेच्या टेकून दोन वीरगळ ठेवले आहेत. एकंदर शिलीवरून हे वीरगळ बाराव्या शतकातील ते तेराव्या शतकातील असावी. गावाजवळ पश्चिमेस एका शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, येथेही दोन भग्न वीरगळांचे अवशेष आहेत व बांधीव दगडी मंदिराचे घडीव चिरे पडले आहेत.

**कोल्हाण** (18° 17'34" N, 73° 13'33" E )

माणगावच्या वायव्येस आठ किलोमीटर आणि इंदापूरहून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील गावदेव काळभैरी मंदिराबाहेर भैरवाची व भवानी देवीची म्हणून दाखवली जाणारी झिजलेली दोन सुटी शिल्पे आहेत. शैलीवरून शिल्पे सतराव्या शतकातील वाटतात. गणेश शिल्प, दोन भग्ननंदी शिल्प, तसेच भग्नावस्थेतील योनीपीठ व लिंग पहायला मिळतात.

**मुठवली तर्फे तळे** (18° 17'59" N, 73° 12'13" E )

माणगावच्या वायव्य दिशेस नऊ किलोमीटर अंतरावरील हे गाव आहे. येथील गावदेव मंदिराचा जीर्णोद्धार होत असून, येथील मूर्ती शिल्पे गावातील एका सार्वजनिक सभागृहात ठेवली आहेत. यातील सर्वच शिल्पे भग्न व झीज झालेली असली तरी उल्लेखनीय एक गणेश शिल्प शिलाहार पद्धतीचे आहे. इतर शिल्पे सतराव्या शतकातील आहेत. बाजूला सोमजाई मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथे सोमजाई या स्थानिक देवतेची मूर्ती चार हातांची महिषासुरमर्दिनी प्रकारची आहे.

**भिंनाड** (18° 19'12" N, 73° 16'32" E )

माणगावच्या उत्तरेस नऊ किलोमीटर असलेल्या या गावातील भैरव डुंगी नावाच्या टेकडीवरमहत्त्वपूर्ण अवशेष आहेत. ही टेकडी पायथ्यापासून १०० मीटर उंच आहे (छायाचित्र क्रमांक ८). टेकडीच्या पश्चिम व उत्तर भागात पाण्याच्या चार कातळात कोरीव टाक्या खोदल्या आहेत. तसेच टेकडीच्या पश्चिम बाजूस देखील कातळात कोरीव टाक्या आहेत. या टाक्या दक्षिणोत्तर पसरल्या आहेत. यातील पश्चिम बाजूकडील एका टाकीचा वास्तव्यासाठी उपयोग केलेला दिसून येतो. या टाकीत एक दगडी बाक आहे. या बाकावर काही सुटी शिल्पे

झिजलेली ठेवलेली दिसतात. यास भैरवटाके असे म्हटले जाते. तसेच उरलेल्या भागाच्याबाजूस एक बैठा ओटा ही खोदलेला दिसतो. एकंदर या लेणीच्या तलविन्यावरून असे दिसते की मुळात पाण्यासाठी खोदलेल्या टाकीचा वापर पुढे वास्तव्यासाठी केला असावा (छायाचित्र क्रमांक ७). यातील पुढे असलेल्या खोदीव बाजूचा उपयोग पुढे असलेल्या खोल असलेल्या दरीत पडू नये म्हणून झाला. टेकडीच्या माथ्यावर लाल रंगाची तसेच काळ्या, करडया रंगाची खापरे पावसाळ्यात दिवसात सापडतात.एकंदर स्वरूपावरून ही वसाहत संरक्षक स्वरुपाची असावी. या टेकडीचा उपयोग उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात टेहेळणीसाठी किल्यासारखा असावा. या टाक्यांच्या शैलीवरून याची निर्मिती दहाव्या शतकानंतर केव्हातरी झालेली असावी. हे गाव तळाखाडी मांदाड व चौलहून उंबार्डी घाटाने पुढे देशावर जाणाऱ्याव्यापारी मार्गावर आहे. सदर लेणीत लाकडी वस्तुंचा वापर करून आत उतरण्यास जिना वा इतरसोईसाठी देलेल्या खोबणी दिसतात. साठलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी खोदलेला चर दिसतो. या ठिकाणाहून उत्तरेस असलेला कोलाड येथील जननीचा दुर्ग अगदी स्पष्ट दिसतो.

**उमरोली तर्फे दिवाळी** (18° 18'5” N, 73° 13'11” E )

उमरोली तर्फे दिवाळी हे एका टेकडीच्या उतारावर पसरलेले हे असून टेकडीच्या माथ्यावर सिध्देश्वर नावाचे मंदिर आहे. या परिसराचा नुकताच जीर्णोद्धार झाला आहे. तेथे कातळात कोरलेलेदोन मीटर लांबीअसलेले शिवलिंग आहे. या शिवाय काही आधुनिक काळात बनविलेला इतर मूर्ती शिल्पे आहेत. गावातील गोसावी बुवा व हनुमान मंदिर येथे दोन छोटीशी चौकोनी आणि फंसनाशिखर असलेली समाधी मंदिरे आहेत या मंदिरासमोर अनेक देवतांची शिल्पे होती आता गावकऱ्यांनी जीर्णोद्धाराच्या वेळेस त्याचे विसर्जन केले. विसर्जन केलेल्या शिल्पांची नक्कल शिल्पेबनवून घेतली आहेत.यात गणेश विष्णू,लक्ष्मी यांसोबत एका गद्धेगळ शिल्पाचाही समावेश आहे. शिल्पे सध्या तैल रंगात रंगवलेली आहेत गावातील काळभैरी मंदिराजवळ काही दगडी शिला पडल्या आहे. या सर्वांवरून येथे अकराव्या ते बाराव्या शतकादरम्यान बांधीव मंदिरे असावीत. त्याच काळातील ही काही शिल्पे होती असे म्हणता येते.

**कशेणे** (18° 17'26” N, 73° 14'35” E )

माणगावच्या वायव्येस मुंबई-गोवा महामार्गालगत सात किलोमीटर अंतरावर हे छोटे गाव वसले आहे. गावाच्या पश्चिमेकडील भागात एक टेकडी असून या टेकडीवर गावातील

पुरावशेष सापडतात. टेकडीवर कौलारू गावदेवीचे मंदिर तर शिवमंदिराचा फक्त दगडी चौथरा शिल्लक आहे. गर्भगृह खोल आहे. चौथरा शुष्कसांधीतंत्रानेबांधलेलाहोता तो आता सिमेंटने बांधून काढला आहे. चौथाऱ्याचे तीन थर शिल्लक आहेत. चौथाऱ्यावर चौथाऱ्यावर भग्न नंदी, गणेशशिल्प, विष्णू प्रतिमा, गजलक्ष्मीयांची शिल्पे आहेत. याशिवाय आयताकृती व शीर्षभाग अर्धवर्तुळाकुती असलेल्या ९० सेंटीमीटर उंच वर ३५ सेंटीमीटर शिळेवर एकाच बाजूस तीन टप्प्यांत वीरगळ कोरला आहे. शीर्षभागी मंगलकलश, डाव्या बाजूस चंद्र तर उजव्या बाजूस सूर्य कोरले आहेत. एका झाडाखाली गजलक्ष्मी भग्न मूर्ती सापडते. फक्त हत्तीचा भाग व लक्ष्मीचा डावा भाग शिल्लक आहे या शिवाय सुमारे दोन मीटर उंचीचा दीपवत स्तंभ व मराठा काळातील चार भग्न शिल्पे मंदिराबाहेर इकडे तिकडे ठेवली आहेत. टेकडीच्या दक्षिण भागात १.३० मीटर लांब व ७० मीटर रुंद आणि ०.४० सेंटीमीटर खोल पाण्याचे टाके आहे. महामार्गालगत काही मराठा काळातील कोरीव शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून या ठिकाणची शिल्पे बाराव्या शतकातील ते सतराव्या शतकापर्यंतची आहेत.

**वावेदिवाळी** (18° 20'21” N, 73° 13'34” E )

माणगावच्या वायव्येस मुंबई-गोवा महामार्गालगत १२ किलोमीटर निकडांग टेकडीच्या पायथ्याशी हे गाव वसले आहे. या गावची काळकाई खाजणी गावातील काळकाई या देवतेची धाकटी बहीणी मानली जाते गावातील काळकाई मंदिराचापूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून, आज या ठिकाणी नवीन मंदिर उभारले आहे. या ठिकाणी पूर्वी शुष्कसांधी बांधणीचे मंदिर असावे असे दाखवणारे मंदिराचे अवशेष शिल्लक आहेत स्तंभ, फुलांची नक्षी असलेले अवशेष पहायला मिळतात. तेथील भैरवाच्या मंदिरात दोन शिल्पे मराठा काळातील भग्न व झिजलेली आहेत. काळकाई मंदिरासमोर एक दगडी दीपमाळ आहे. तेथील जीर्णोद्धार झालेल्या काळकाई आणि इतर मूर्ती शिल्पे ही मूळ शिल्पांप्रमाणेच बनविली आहेत. असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

**घोटवळ** (18° 21'56” N, 73° 14'17” E )

माणगावच्या वायव्येस १५ किलोमीटर अंतरावर काहीश्या टेकडाळ भागातील हे गाव आहे. गावात काहीही महत्त्वाचे पुरावशेष आढळून आले नाहीत.

**निळज** (18° 20'48" N,  73° 14'21" E )

मुंबई-गोवा महामार्गावरील निळज हे गाव माणगावच्या उत्तरेस एककिलोमीटरअंतरावर आहे. गावातील पडक्या शिवमंदिराच्या व वाकडाईदेवी परिसरात पुरावशेष आढळतात. येथील उध्वस्त शिवमंदिर अठराव्या शतकातील असावे. खोल गाभारा, गाभाऱ्यात भग्न शिवलिंग आहे. बाहेर मुख भग्न झालेला नंदी आहे. नंदीच्या गळ्यात घंटा आणि गोंड्याची माळ आणि पोटाभोवती आवळ पट्टा आहे. येथे आढळलेल्या विटेचा आकार २१ x ७ x १० सेंटीमीटरइतका आहे. या मंदिरासमोरच एक दगडी चौथरा आहे. या चौथऱ्यावर गजलक्ष्मीचे झीज झालेले शिल्प आहे. तिच्या दोन्ही बाजूस चौकटच्या उभ्या आकाराची फुले आहेत. देवीच्या खांद्या इतक्या उंचीच्या चौकोनी घटकावर हत्ती उभे असून ते देवीस अभिषेक करत आहेत. एकंदर शिल्पांची धाटणी बघता त्याचा अकराव्या अथवा बाराव्या शतकाचा असा कालखंड ठरवता येतो. शिवलिंग आणि नंदी मात्र नंतरच्या शतकातील असावेत. या ठिकाणी काही समाधींचे दगड स्मृती शिळा देखील आहेत. गावच्या परंपरेनुसार या महादेवाची जत्तर काठी (जत्रेत फिरवायची काठी किंवा शासन काठी) लांढर येथील महादेवाच्या लग्नासाठी नेली जाते. याच ठिकाणी एका शेतात एका ६० सेंटीमीटर उंच आणि ३० सेंटीमीटर रुंद व २० सेंटीमीटर जाड शिळेवर गद्धेगळ आहे. अत्यंत झीज झालेल्या या शिल्पावर खालील चौकटीत उजवीकडे डोके केलेल्या स्त्रीवर आरूढ झालेल्या गाढवाचे शिल्प आहे. त्यानंतर शिळा मोकळी सोडली आहे. यावर लेख असल्यास आज तो खराब झालेला आहे. शिवमंदिराशेजारी शुष्कसांधी बांधीव मंदिराचे दगड पडले आहेत. या शिवाय या चौथाऱ्यावर अस्ताव्यस्त ठेवलेले भग्न वीरगल व सतीशिळा आहेत. हे सर्व वीरगळ आयाताकृती शिलेवर एकाच बाजूस दोन ते तीन टप्प्यांत कोरलेले आहेत. एका सतीशिळेवरील खालच्या चौकटीत वीर युद्धात मृत्यूमुखी पडलेला दिसतो हा वीर दुसऱ्या वीराबरोबर हातातील भाल्याने हल्ला करताना दिसतो विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या वीराने आपल्या भाला दोन हातात पकडला असून त्याच्या हाताच्या कोपऱ्यावर बांधलेली आहे.

**भुवन** (18° 21'59" N,  73° 13'17" E )

एका मोठ्या टेकडीच्या पायथ्याशी हे गाव आहे. गावातील गावदेवाचे मंदिर बौद्धवाडी जवळ आहेत या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिरात गाभाऱ्यात आठ ते दहा शिल्पे अस्ताव्यस्त ठेवलेली आहेत. शिल्पांच्या वैशिष्ट्यावरून ही मराठा काळातील असल्याचा

अंदाज करता येतो. याशिवाय जमिनीत गाडलेला वीरगळ ही येथे पाहायला मिळतो. हातात खड्ग आणि खेटक घेऊन युद्धाच्या पवित्र्यातील एकच वीर दाखवला आहे. या सोबतच आज झीज झालेली, शिवलिंग अर्ध वर्तुळाकार असलेले सपाट शिळा आहे. त्यावर चंद्र-सुर्याच्या खुणा दिसतात. या शिवाय शेजारीच स्त्री व पुरुष असलेले जोडपे शिल्पांकित केलेले आहे. तेल अभिषेक यांमुळे शिल्पांची अतोनात हानी झाली आहे.

पुढे एका मोठया तलावाच्या पश्चिम काठावर कौलारू शिवमंदिर आहे. मंदिर आधुनिक काळात बांधले आहे. पण गाभारा मूळचाच दगडी बांधणीचा खोल आहे. दीपमाळेशेजारीच एक भग्न सतीशिळा आहे. या शिळेचा वरचा भाग तुटलेला आहे. खालच्या भागात मृत वीरासोबत सतीजाणाऱ्या दोन स्त्रिया वर सतीचा कोपरापासूनचा हात आणि त्यावर तीन व्यक्ती दिसतात. मधल्या व्यक्तीने शेजारच्या दोन व्यक्तींच्या खांद्यावर हात टाकले आहेत यावरून वीर आणि त्याच्या दोन पत्नी असाव्यात. या शिवाय तळ्याच्या उत्तरकाठावर महिषासुर मर्दिनी शिल्प मंदिरात ठेवले आहे. या परिसरात काळ्या रंगाची पातळ काठाची शिवाय, जाडी भरडी अशी अनेक खापरे आढळतात. या शिवाय गावामागील टेकडीवर मोठा दिव्याच्या आकाराचा भाग खोदलेला आहे, म्हणून त्यास लोक दिव्याचे टोक म्हणतात. या शिवाय गावातील सवतसडा भागातही पांडवकालीन खोदकाम केले असल्याचे लोक सांगतात.

**रातवड** (18° 21'36” N, 73° 14'0” E )

मुंबई-गोवा महामार्गावर माणगावच्या उत्तरेस १४ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाच्या रातुआई नावाच्या स्थानिक देवतेच्या मंदिर परिसरात सुमारे एक मीटर उंचीचे सात वीरगळांचेअवशेष आहेत. यांपैकी सर्वच वीरगळ दुरावस्थेत आहेत. हे वीरगळ विशेष उल्लेखनीय आहेत. यापैकी बहुतेक सर्व वीरगळ तीन ते चार टप्प्यात असावेत. मात्र भग्नावस्थेत असल्यामुळे त्यांचे नेमके स्वरूप सांगता येत नाही. पाच वीरगळ अंशतः जमिनीत गाडले गेले असून त्यांवरील शिल्पे झीजली आहेत. त्या पैकी एक वीरगळ एखाद्या राजाचा असावा असे दिसते. एका व्यक्तीने राजाच्या डोक्यावर छत्र धरले आहे. या युद्धात राजा पराभूत झाल्याचे सूचीत करणारे शिल्प आहे. तो गुडघ्यात वाकला असून शत्रूतील योद्ध्यांनी त्याच्या कंठावर, तसेच दुसऱ्याने राज्याच्या मर्मस्थानी कटीप्रदेशावर भाला रोवला आहे. या राजाच्या हातात वक्राकृती खड्ग आहे. या शिल्पांची धाटणी अकराव्या-बाराव्या शतकातील आहे असे दिसते. मंदिरातील रातुआईदेवीचे शिल्प सुमारे एक मीटर उंच व ४० सेंटीमीटरआकाराचे महिषासुरमर्दिनी प्रकारचे व चार हातांचे आहे. गावातीलरेल्वे फाटक व

महामार्गालगत शेजारच्या झाडीत एक गजलक्ष्मी शिल्प भग्नावस्थेत आढळून येते. या परिसरात फार पूर्वी एक वऱ्हाड बुडाले होते, त्यांचे दगडी पुतळे बनले ते म्हणजे सध्याचे वीरगळ आहेत असे सांगतात. गावातील या मंदिर परिसरात अनेक काळ्या व लाल रंगाची जाड पोताची खापरे आढळतात.

**खरवली** (18° 14'47" N, 73° 14'7" E )

माणगावच्या वायव्येस पाच किलोमीटर अंतरावर एका तळ्याच्या काठावर वसलेले हे गाव आहे. उत्तर पेशवाईत कामाला असलेल्या खंडोजी माणकर नावाच्या कलाकाराचे हे गाव. गावात त्याचा वाडा व तळ्याच्या काठावर समाधी आहे. या तलावाजवळ काळभैरवनाथ, जोगेश्वरी, बापुजी व एक शिवमंदिर आहे. जीर्णोद्धार झाल्यामुळे मूळ मुर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. मंदिराबाहेर दोन वीरगळ व एक सतीशिळा आहे. आयताकृती प्रकारचे वीरगळ भग्नावस्थेत आहेत. शिवमंदिर म्हणजे केवळ शुष्कसांधी बांधीव मंदिराचा चौथरा आहे. येथेही एक १.६० मीटर लांब व ०.४३ मीटर रुंद आयताकृती आकाराचा चार टप्यातील वीरगळ आहे. एक ०.८९ लांब व ०.२८ मीटर रुंदीची कोरीव शिळा असून त्यावर चार पुरुष मुखे कोरली आहेत. नंदी, योनीपीठ यांची भग्न शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष अकराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

**चेरवली** (18° 14'55" N, 73° 13'27" E )

माणगावच्या वायव्येस सहा किलोमीटर अंतरावर डोंगराच्या पायथ्याशी वसलेले गाव आहे. प्राथमिक शाळेजवळ कौलारू मंदिराबाहेर एक आयताकृती वीरगळ, मंदिरात शिवलिंग गणेश शिल्प आहे. ही शिल्पे मराठकाळातील असावीत. येथे बाराव्या शतकातला एक भग्न वीरगळ पाहायला मिळतो.

**आमडोशी** (18° 13'58" N, 73° 12'29" E )

माणगावच्या वायव्येस माणगाव-खरवली-तळे या मार्गावर आठ किलोमीटर अंतरावर आहे. गावाच्या काळभैरी मंदिराच्या मागे चौकोनी खांबाच्या आकाराचा एक वीरगळ, दुसरा आयताकृती प्रकारचा पण भग्न आहे. याशिवाय तेलाच्या घाण्याचा एक भाग आहे. दोन्ही शिल्पांची पूजा होते. या ठिकाणी एका रात्रीत निगडीच्या खांबापासून मंदिर बांधून हवे अशी तिथल्या दैवताची मागणी असल्याचे सांगतात.

**पेण तर्फे तळे** (18° 14'28” N, 73° 12'57” E )

माणगावच्या वायव्येस सात किलोमीटर अंतरावर वसलेल्या या गावात पेणजाई व बहिरीदेवाचे स्थान आहे. पेणजाई देवीची महिषासुरमर्दिनी प्रकारची जुनी मूर्ती मंदिराच्या मागे ठेवली आहे. या ठिकाणी बहिरीदेव मंदिराजवळ दोन कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्यांची चौकोनी सुमारे ७० सेंटीमीटर लांबी व रुंदीची मुखे कातळाच्या उतारावर जमीन पातळीला समांतर असून आत दीड ते दोन मीटर खोल आहेत. या टाक्यांच्या स्वरूपावरून त्यांचा काळ आद्य ऐतिहासिक काळातील असावा. या परिसरात नांगरटीच्या वेळेस आद्य ऐतिहासिक काळातील खापरे आढळतात. यात सातवाहन काळातील पिण्याचे कप हा प्रकार जास्त आहे.

**उमरोली तर्फे खरवली** (18° 15'18” N, 73° 15'6” E )

माणगावच्या वायव्येस पाच किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात एका छोट्या तळ्याजवळ शिवमंदिर आहे. येथे दोन वीरगळ व तेलघाण्याचेही अवशेष आहेत.

**तिलोरे** (18° 16'2” N, 73° 15'12” E )

मुंबई-गोवा महामार्गालगत माणगावच्या वायव्येस तिलोरे गाव असून गावाच्यामागील टेकडीवरगावदेव खंडोबाचे स्थान आहे. टेकडी पायथ्यापासून १५० मीटर उंच आहे. या ठिकाणी गावातील महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळतात. कौलारू असलेल्या या मंदिरास उत्तर यादवकालीन शैलीतील दगडी सहा खांब आहे. काहीसा त्रिकोणाकृती घटक असलेच तळखडा,त्यावर चौकोनी भाग, त्यावर अष्टकोनी त्यावर चौकोनी ठोकळा, त्यावर पुंन्हा अष्टकोनी घटक व वर स्तंभशीर्ष असा घटकक्रम असलेले चार खांब मंदिराच्या सिमेंट व विटांच्या बांधकामात चिणले आहेत स्तंभ शीर्षवर उलटे नागशीर्ष नाहीत.

मंदिरात चौकोनी आकाराचे योनीपीठ असून, त्यावर सुटे लिंग ठेवले आहे. मंदिराबाहेर भग्न व झीज झालेला नंदी आहे. येथे एक दीपमाळ आहे. जवळच हनुमानाची चार ते पाच तुकडे झालेली मूर्ती आहे. देवीच्या मंदिरात चार हातांची महिषासुरमर्दिनी पद्धतीची मूर्ती आहे. टेकडीच्या उत्तर भागात सुमारे ३ मीटर लांबी व रुंद असलेले, पाण्याचे कोरीव टाके आहे. या टेकडीवरून आजुबाजूचा पूर्ण परिसर दृष्टीपथात येतो. ही एक उत्तर शिलाहार काळातील एक संरक्षक वसाहत असावी. ही सर्व शिल्पे शैलीवरून पंधराव्या ते सतराव्या शतकातील असावीत.

**साले** (18° 15'29” N, 73° 15'16” E )

माणगावच्या काहीसे उत्तरेस चार किलोमीटर अंतरावर एका तळ्याच्या काठावर वसलेले हे गाव आहे. तळ्याचा काठावर गणपतीचे जीर्णोद्धार झालेले मंदिरआहे. शैलीवरून ही मराठा काळातील शिल्पे आहेत.

**कोशिंबले तर्फे तळे** (18° 16'29” N, 73° 14'59” E )

माणगावच्या वायव्येस पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात येथे विघवली फाट्यावर फक्त भैरीमंदिर आहे. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**दाखणे** (18° 16'53” N, 73° 16'3” E )

माणगावच्या उत्तरेदिशेस पाच किलोमीटर अंतरावरील गावातील एका तळ्याच्या काठावर कौलारू कोकणी पद्धतीचे शिवमंदिर आहे.मंदिराबाहेर एक वीरगळ व एक सतीशिळा आहे. वीरगळ आयताकृती आणि एकच बाजू, चार टप्प्यात कोरलेली वीरगळ आहे. विशेष म्हणजे खालच्या टप्प्यात वीर ढोपरावर बसून दोन व्यक्तींबरोबर युद्ध करताना दाखविला आहे. दुसरीशिळा ही वीरगळ व सतीशिळा अशी एकत्र पाच टप्प्यातील आहे. तिच्या उंचावलेल्या दोन्ही हातात काहीतरी वस्तू दाखवलेली आहे. याशिवाय येथील प्राचीन मंदिराच्या पीठाचे अवशेष देखील आढळून येतात. शिल्पशैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील असावीत.

**कालवन** (18° 17'28” N, 73° 15'47” E )

माणगावच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावर कालवन गावात भग्न शिवमंदिराचा चौथरा शिल्लक आहे. हे मंदिर शुष्कसांधी बांधीव पद्धतीचे आहे. गर्भगृह जमिनीच्या पातळीपेक्षा खोल आहे.परिसरात भग्न शिवलिंग, नंदी, गणेश आणि तीन वीरगळ व एक सतीशिळा आहेत. वीरगळावरील वीर, घोडेस्वार शत्रूशी युद्ध करताना दिसतो. शैलीवरून हे अवशेष बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

**मुठवली तर्फे निजामपुर** (18° 17'53” N, 73° 14'50” E )

माणगावच्या उत्तरेस सात किलोमीटर अंतरावर काळनदीच्या काठावर हे गाव वसले आहे. गावदेवी मंदिर परिसरात प्राचीन पद्धतीचे मूर्ती ठेवायचे पीठ आहे. त्यावर फुलांची नक्षी आहे. जीर्णोद्धार कामाच्या वेळेस उत्खननात आढळलेल्या शुष्कसांधी मंदिराचे दगड तेथे

रचून ठेवले आहेत. मंदिरातील शिल्पे झीज झालेली आहेत. एका स्त्री देवतेचे शिल्प झीज झालेले असले तरी ते शैलीवरून चौदाव्याशतकातील वाटते.

**पानसई** (18° 17'26” N, 73° 15'52” E )

माणगावच्या उत्तरेस काळनदीच्या काठावर नऊ किलोमीटर अंतरावर पानसई हे गाव आहे. गावात उल्लेखनीय अवशेषांमध्ये मध्ये एका कौलारू भिंती नसलेल्या शिवमंदिर आहे. यात शिवमंदिराचा चौथरा उंबार्डी, माणगड-मशीदवाडी या ठिकाणी आढळणाऱ्या चौथऱ्याप्रमाणेच आहे. गर्भगृह खोल असून आत प्राचीन पद्धतीचे शिवलिंग आहे. दक्षिण बाजूस भागात एका कोपऱ्यात १५ सेंटीमीटर उंच आठ हातांचे भैरवाचे शिल्प आहे. मंदिराच्या बाहेर दोन वीरगळ, एक सतीशिळा, भग्न शिवलिंग, भग्न विष्णू मूर्ती तसेच भग्न नंदी शिल्पाचे अवशेष आहेत (छायाचित्र क्रमांक ९). शैलीवरून हे अवशेष बाराव्या शतक ते चौदाव्या शतकातील असावेत.

**वाढवन** (18° 18'50” N, 73° 14'49” E )

माणगावच्या बाजूस नऊ अंतरावरील या गावातील जीर्णोद्धारित गावदेव मंदिरासमोर दगडी दीपमाळेचे भग्न अवशेष तर मंदिरात मराठा-पेशवे काळातील तीन सुटी शिल्पे आढळून येतात.

**खर्डी बुद्रुक** (18° 16'9” N, 73° 17'10” E )

माणगाव-निजामपुर-पुणे मार्गावरील बऱ्यापैकी मोठे असलेले हे गाव माणगावपासून चार किलोमीटर उत्तर दिशेस आहे. गावामागे तिकटोबाची टेकडी आहे. टेकडीवर काही पांडवकालीन अवशेष अवशेष असल्याचे लोक सांगतात. गावात शिवमंदिर असून तेथे जमिनीच्या पातळीपेक्षा खोल गाभारा असून त्यात भग्न शिवलिंग तसेचसमोर नंदी शिल्प आहे.या मंदिराच्या पश्चिमेस गावदेवाचे मंदिर असून या ठिकाणीही झीज झालेल्या व भग्न अवस्थेतील मूर्ती आहेत. गावातील श्री. जाधव यांच्या शेतात ०.८० सेंटीमीटर लांब आणि ०.३७ सेंटीमीटर रुंद शिळा आहे. त्यावर गायवासरू कोरलेले शिल्प आहे.शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असून, या अर्धवर्तुळाकृती भागातच चंद्र व सूर्य व गायवासरू कोरलेले आहेत. खालचा भाग सपाट करून ठेवलेला दिसतो यावर बऱ्याचदा लेख असतात परंतु सध्या येथे कोणताही लेख आढळत नाहीत. एकंदर शिल्पशैलीवरून हे सर्व अवशेष अकराव्या शतकापासून ते सतराव्या शतकातील आहेत.

**माकटी** (18° 19'20” N, 73° 13'35” E )

माणगावच्या उत्तरेस दहा किलोमीटर अंतरावर माकटी गावात येथील कालभैरव मंदिराजवळील अवशेष हे गावातील सर्वात जुन्या पुरावशेषापैकी आहेत. येथील शिल्पे एका जुन्या पीठावर ठेवली आहेत. मंदिरात नंदी शिल्प, शिवलिंग, गणेश शिल्प आढळून येतात. शैलीवरून ही शिल्पे अठराव्या शतकातील असावीत. गावातील बौद्धवाडी जवळ काटीगाव असून तेथे श्री. कोटेश्वर देवस्थान आहे.

**पोटनेर** (18° 19'37” N, 73° 13'54” E )

गावाबाहेरील शेतात पूर्णपणे जीर्णोद्धार झालेले शिवमंदिर आहे. मंदिराबाहेर नंदीशिल्प, गणेश प्रतिमा, आणि समाधीचे कोरीव दगड आहेत. या मंदिराबाहेर काही शिल्पांचे झीज झालेले भग्न अवशेष ठेवले आहेत. शिल्पशैलीवरून ते अकराव्या ते बाराव्या शतकातील असाव्यात. मंदिराशेजारी शुष्कसांधी बांधणी पद्धतीचेकाही दगड आहेत. या गावामागील पश्चिम टेकडीवर दोन ठिकाणी कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आहे. टेकडीची उंची जेमतेम १०० मीटर आहे. या टेकडीस निकडांग टेकडी म्हणतात. टेकडीची उंची व कातळात कोरीव पाण्याच्या टाक्यांच्या रचनेवरून ही टेकडी टेहेळणीची जागा असावी. या जागेचा वापर संरक्षक वसाहत म्हणून झाला असावा. गावाशेजारील रुद्रवली वाडीत मारुतीचे मंदिर आहे. तेथील गदाधारी आणि कमरेवर डावा हात ठेवलेली अशी दोन हातांची प्रतिमा अलीकडच्या काळातील असावी.

**लोणेरे** (18° 9'29” N, 73° 19'5” E )

मुंबई-गोवा महामार्गावर दक्षिणेकडे नऊ किलोमीटर अंतरावर या गावात सोनभैरव या स्थानिक देवतेचा जीर्णोद्धार झाला आहे. तेथील जुनी मूर्तीव शिल्पेहरेश्वर येथील समुद्रात विसर्जन करण्यात आली आहेत. सोमजाई ग्रामदेवतेची मूर्तीझिजलेली आहे. शिल्पशैलीवरून मात्र ती मराठा-पेशवे काळातील असावीत. याशिवाय लोणेरे स्मशानभूमीतील शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे.मंदिरा भोवती जुन्या मंदिराचे घडीव दगड तसेच ठेवले आहेत हे दगड यांवर असलेला खाचा व खुर यांवरून येथे शुष्कसांधी बांधीव मंदरात होते हे दर्शवतात. त्यांचा कालखंड बारावे शतकाचा असावा.

**उसरघर (18° 10'25” N, 73° 18'45” E )**

मुंबई-गोवा राज्य महामार्गशेजारील या गावातील कालभैरी मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून मंदिरातील भैरीची आणि जोगेश्वरी या स्थानिक देवतांच्या मूर्तीशैलीवरून ती मराठा-पेशवे

काळातील असावीत. येथे पाठ असलेला दगडी आयताकृती चौरंग असून यावर चार देवतांची मुखे कोरली आहेत. अशी शिल्पे तालुक्यातील इतर भागातही सापडली आहेत. सध्या त्यांना पितळेचे पुरुष देवतांचे मुखवटे बसवले आहेत.शेजारील काही मीटर अंतरावर शिवमंदिराचा नुकताच जीर्णोद्धार झाला आहे. प्राचीन पद्धतीतले शिवलिंग तर इतर मूर्ती झीजल्या आहेत. मंदिराबाहेर दीपवत आहे. नंदीशिल्प शैलीवरून बाराव्या शतकातील अवशेष असावेत. गावाच्या पश्चिम भागातील टेकडीत वाघबिळ असल्याचे समजते.

**वडपाले** (18° 7'33” N, 73° 19'31” E )

माणगावच्या दक्षिणेस १२ किलोमीटर अंतरावर मुंबई-गोवा महामार्गावर हे गाव आहे. गावदेव मंदिरासमोर मराठा काळातील शिवमंदिर आहे. येथील महत्त्वपूर्ण अवशेष म्हणजेच येथे एका शेतात गद्धेगळ आढळळा. ही शिळा सुमारे १.५०मीटर लांब व ३०सेंटीमीटर रुंदी आणि १५ सेंटीमीटर जाड आहे. शीर्षभाग काहीसा त्रिकोणाकृती आहे. त्यावर चंद्र व सूर्य कोरलेले आहेत. खाली चौकट असून त्यावर दोन ओळी लेख दिसतो. झीज झाल्याने वाचता येत नाही. त्या खाली फक्त उजवीकडे तोंड केलेले गाढव शिल्पांकित केले आहे. येथे स्त्री दाखवलेली नाही. खालील शिळा पुन्हा मोकळी ठेवलेली आहे. गावामागील टेकडीत जुन्या काळातील लोकांची जाती आणि जोती असल्याचे सांगतात.

**लाखपाले** (18° 8'8” N, 73° 19'12” E )

माणगावच्या दक्षिणेस ११ किलोमीटर अंतरावर लाखपाले गाव आहे. गावातील पुरावशेषएका मोठ्या तळ्याकाठी असलेल्या शिवमंदिर व गावदेवाच्या मंदिराजवळ आहेत. मंदिरात नंदी, विष्णू, पार्वती यांच्या आधुनिक काळातील प्रतिमा आहेत. मंदिराबाहेर दुसरे भग्न नंदीशिल्प व एक आयताकृती दोन टप्प्यातील वीरगळ आढळतो. त्याच्या शैलीवरून चौदाव्या शतकातील असावा.

**आंबर्ले** (18° 9'4” N, 73° 22'22” E )

माणगावच्या ईशान्येस डोंगराळ ११ किलोमीटर अंतरावरील उंची भागातील या ठिकाणी गद्धेगळ शिल्प आहे. यास स्थानिक लोक कुत्तरदेव असे संबोधतात. हा अर्धा कुत्रा आणि अर्धा मानव आहे असे लोकांचे म्हणणे आहे.

**खांडपाले** (18° 8'29" N, 73° 19'49" E )

खांडपाले गावाच्या पश्चिमेस सोमजाई या स्थानिक देवतेचे मंदिर असून येथे तीन टप्प्यात आयताकृती, फक्त एकच बाजू शिल्पांकित केलेला एक वीरगळ आहे. खांडपले गावदेव कालभैरी या स्थानाचा पूर्णपणे जीर्णोद्धार करण्यात आला असून येथील मूळ मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे.

**पहेल** (18° 8'53" N, 73° 19'58" E )

मुंबई-गोवा महामार्गावरील खांडपले गावानजीकचे हे गाव होय. या गावात प्राचीन व मध्ययुगीन काळातील खापरे मोठ्या प्रमाणावर सापडतात. गावातील जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिरासमोर काही भग्न शिल्पे आहेत. आयताकृती आणि एकच बाजू शिल्पकिंत केलेले १३ वीरगळ व चौकोनी खांबाच्या आकाराचे दोन वीरगळ आहेत.या शिल्पांमध्ये भग्न नंदी, गणेश प्रतिमा, भग्न योनीपीठ, पद्मासनात व नमस्कार मुद्रेतील एक पुरुष प्रतिमा या शिवाय शिलाहार शैलीचे त्रिकोणाकृती तळखडा असलेले पीठ असे काही महत्त्वपूर्ण अवशेष आहेत. या परिसरातील शेतामध्ये नांगरणीच्या वेळेसलाल व करडया रंगाची खापरे आढळतात. या शिवाय मंदिर परिसरात मराठा-पेशवे काळातील समाधी चौथरे ही आहेत. तसेच गावातील कालभैरव व चौन्डाई या स्थानिक देवतांच्या मंदिरातील शिल्पे ही शैलीच्या दृष्टीने मराठा कालखंडातील आहेत. या भागातील खापरे सातवाहन काळातील खापरांप्रमाणे आढळली आहेत. त्यात पिण्याचे पेले, थाळ्या, झाकणींचे अवशेष आहेत.

**भांदरे** (18° 11'22" N, 73° 20'5" E )

माणगावच्या वायव्येस सात किलोमीटर अंतरावरील या गावात काळभैरीचे मंदिर आहे. भांदरे गावाच्या मागे समुद्रसपाटीपासून १५० मीटर उंचीची टेकडी आहे. या टेकडीवर बऱ्यापैकी सपाटी आहे. टेकडीच्या सभोवताली दगडी तटबंदी होती, असे दाखवणारे अवशेष आहेत. पद्धतशीरपणे दगड कापून कोरून रचलेली दिसतात. मात्र या ठिकाणची तटबंदी पूर्णपणे कोसळली असून फक्त मातीत जमिनीतील तिच्या शिल्लक भागावरून तिच्या रुंदीची कल्पना करता येते. या ठिकाणी काही बांधकामे होती तसेच एक कातळात कोरीव हौद असल्याचेही गावकरी सांगतात. सध्या या ठिकाणी माती भरली आहे. सपाटीच्या पूर्व बाजूस काही चौथरे दृष्टीस पडतात तर एक ठिकाणी मोरीच्या पन्हाळीचा दगड शिल्लक राहिला आहे. तसेच पादुका कोरलेली एक दगडी समाधी ही आहे. भांदरे गावात कालभैरी या देवतेचे मंदिर आहे.

मंदिराच्या आवारात काही भग्न मूर्ती शिल्पे ठेवली आहेत. यात कमरेचा वरचा भाग कमरेपासून दोन तुकडे झाले आहेत. झीज झालेली भैरवप्रतिमा, शिवलिंग व आयताकृती एकच भाग शिल्पांकित केलेला वीरगळ पाहायला मिळतो. या वीरगळावरील वीराला वाघ वा अस्वल सारख्या प्राण्यांपासून गुरांचे रक्षण करताना मृत्यू प्राप्त झालेला दिसतो. शिल्प रचनेवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील वाटतात. मंदिरात आणि मंदिराबाहेर मराठा काळातील तीन शिल्पे आढळतात. या टेकडीवर पूर्वी शिवाजी महाराजांच्या काळात किल्ल्याचे बांधकाम होणार होते, मात्र काही कारणामुळे हे काम अर्धवट राहीले अशी इथली लोक सांगतात. टेकडीच्या पश्चिम बाजूस एक खोदीव लेणी व पाण्याचे खोदीव टाके आहे. यावरून या ठिकाणी शिवपूर्वकालीन दुर्ग अथवा संरक्षक वसाहत होती असे दिसते.

**खडकोळ** (18° 10'55” N,  73° 21'9” E )

माणगावच्या आग्नेयेस दिशेस दहा किलोमीटर अंतरावर खडकोळ गावात गायरान भागात गायवासरू शिल्प असल्याचे स्थानिक सांगतात. पण आज ते आढळून येत नाहीत. गावदेव शिवाचे मंदिर जंगलभागात असून त्याचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला आहे.मंदिराबाहेर चार हातांचा विष्णू, गणेश प्रतिमा, कालभैरव यांच्या भग्न झीज झालेल्या प्रतिमा आहेत. तसेच एका झाडाखाली आयताकृती व चार टप्प्यांत दगडाची एकच बाजू कोरलेला वीरगळ आढळून येतो. शिल्पावरील वीर घोडयावर स्वार झालेल्या शत्रूशी लढताना दिसतो. गावकऱ्यांच्या परंपरेने याच गावदेवाच्या उत्सवाच्या वेळी येथे कोंबड्याच्या बळी दिला जातो. मंदिरात जुने भग्न शिवलिंग तर नवीन बसवलेले नंदी शिल्प आढळते.

**मांगरूळ** (18° 10'57” N,  73° 20'35” E )

माणगावच्या आग्नेयेस नऊ किलोमीटर अंतरावरील या गावाच्या टेकडीच्या उतारावर ग्रामदेव परिसरात गावातील पुरावशेष ठेवले आहेत. तेथे सोनभैरी, जोगेश्वरी आणि पद्मावती या स्थानिक देवतांचे अलीकडच्या काळात घडवलेल्या मूर्ती आहेत. मांगरूळ गावाच्या दक्षिणेस बेलेश्वर नावाचे शिवमंदिर असून,मंदिराचे दगडी बांधकाम शैली मराठा अथवा पेशवे काळातील आहे. मंदिरासमोर दोन आयताकृती आणि त्रिकोणी शीर्षभाग असलेल्या सतीशिळा आहेत. सतीशिळा चार टप्प्यांत दाखविली आहे. शिल्पशैलीवरून ती चौदावे अथवा पंधरावे शतकातील असावी. मंदिरात भग्न नंदी, विष्णू, नाग, गणेश प्रतिमा आहेत. शिल्पशैलीवरून ही

शिल्पे मागच्या शतकातील असाव्यात. कदाचित आधी असलेल्या सतीशिळा व वीरगळ यांची आधुनिक काळात केलेली भ्रष्ट ही नक्कल असावी.

**रेपोली** (18° 10'53” N, 73° 19'19” E )

माणगावच्या दक्षिणेस सहा किलोमीटर अंतरावरील या गावात जखमातेचे मंदिर आहे. गावाच्या पूर्वेकडील टेकडीवर पांडवकालीन काही खोदकामे असल्याचे लोक सांगतात.

**न्हावे** (18° 10'39” N, 73° 19'31” E )

माणगावच्या दक्षिणेस सात किलोमीटर अंतरावरील या गावात काळभैरीचे मंदिर आहे. कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष येथे आढळले नाहीत.

**तळेगाव तर्फे गोरेगाव** (18° 11'57” N, 73° 18'50” E )

माणगावच्या दक्षिणेस पाच किलोमीटर अंतरावरील या ठिकाणी उल्लेखनीय वास्तू व शिल्पावशेष आहेत.या गावात पाच मंदिरे आहेत. गावातील एका मोठ्या तळ्याकाठी, शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेल्या पूर्वाभिमुख दोन मंदिरांचे अवशेष आहेत. यातील एक शिवमंदिर व दुसरे स्थानिक परंपरे नुसार कलावंतीचे आहे. आहे. शिवमंदिराचा चौथरा १०. ६० मीटर लांब व ६.३४ मीटर रुंद व ०.९० मीटर उंच आहे. मंदिराच्या पश्चिम बाजूत आत प्रवेश करायच्या पायऱ्यांचा भाग खुर, कुंभ व कर्णिका पद्धतीचा आहे. बाकी इतर जोता किंवा पीठाचा भाग सपाट म्हणजे कोणतेही थर नसलेला आहे. ज्योत्यावरील सर्व जंघा भाग पडला आहे. मंदिराचा गाभारा काहीसा खोल आहे. गाभाऱ्याच्या चारही कोपऱ्यात खांब रोवण्यासाठी खड्डे असलेले त्रिकोणाकृती घटकयुक्त शिलाहारशैलीचे तळखडे आहेत. शिवलिंग १.१० मीटर लांब आहे. हे मंदिर कलावंतीणीचे असून येथे शिवलिंग अपोआप उत्पन झाल्याचे मानतात. मंदिराच्यामागील भागात झाडे वाढली असून त्यामुळे मंदिर पडले असावे. दुसरे मंदिर याच तलविन्यासाचे असून आकाराने लहान आहे. येथेही झाडे वाढली आहेत. दोन्ही मंदिरांचे ज्योत्याचे चार थर भुपृष्ठावर दिसतात. मंदिरासमोर गणेशपट्टी व द्वारशाखेचे अवशेष पडले आहेत. पडलेल्या जंघाभागावर विष्णूप्रतिमा आहे. नंदी शिल्प, स्तंभशीर्ष व इतर वस्तू घटक आजूबाजूस पडले आहेत.

तिसरे मंदिर हे देखील शिवमंदिरच आहे. प्रत्यक्ष गावात असलेले हे मंदिर कौलारू असून, मूळ शुष्कसांधी बांधणी असलेल्या पायावरच उभारले गेले आहे. या मंदिराभोवती १७

वीरगळ आढळून आले. हे आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले, तसेच चौकोनी खांब प्रकारचे असे आहेत. एका खांब प्रकारच्या वीरगळाच्या वरच्या टप्प्यात वीर शिवलिंग पूजा करताना, तसेच दुसऱ्या बाजूस गणेश प्रतिमा, तर तिसऱ्या बाजूस गायवासरू शिल्प कोरलेले आहे. या ठिकाणी मुस्लीम थडग्याला लावतात अशा दगडाचे कोरीव अवशेषही आढळून आले.

गावाबाहेर पश्चिमेस टेकडीवर कालभैरवाचे मंदिर आहे. या ठिकाणी मसाला वाटायचा दगडी पाटा व तेलाच्या घाण्याचे अवशेष आढळले. येथील देवतांची शिल्पे आधुनिक काळात घडविली असावीत. या मंदिरापासून दक्षिणेस मंदिराच्या पायासाठी कातळात खोदलेले, खणलेले खड्डे आहेत. येथे दोन आयताकृती वीरगळ आढळतात. असे दिसते की तळेगावची ही सर्व शुष्कसांधी मंदिरे उभारण्यास लागणारा दगड काढण्याची खाण या भागात असावी, असे या ठिकाणी केलेल्या उत्खनना वरून वाटते. अशा पद्धतीचा पुरावा अभ्यास क्षेत्रात पहिल्यांदाच मिळत आहे.

गावातील खांदजाई टेकडीच्या पायथ्याशी खांदजाई या स्थानिक देवीचे मंदिर आहे. हे मंदिर देखील शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारले गेले होते. या मंदिराचा आता जीर्णोद्धार झाला असून, मंदिराचा मूळ चौथरा आजही पाहता येतो. मंदिरामागे सुमारे एक मीटर उंच महिषासुरमर्दिनी पद्धतीचे भग्न शिल्प आहे.या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एका कातळात कोरीव पाण्याच्या टाकीचे अवशेष आढळून येतात. जमीन पातळीवर चौकोनी मुख व दीड मीटर खोल आकार असलेली ही पाण्याची टाकी तिच्या स्वरूपावरून आद्य ऐतिहासिक काळातील असावी. खांद म्हणजे खिंड त्यामुळे या देवीस खांदजाई असे म्हटले जात असावे. या परिसरातील शिल्प व वास्तू यांच्या शैलीवरून त्यांचा काळ अकरावे शतकापासून ते चौदाव्या शतकातील असावा. या अवशेषांवरून तळेगाव हे व्यापारी मार्गावरील हे एक महत्त्वपूर्ण व्यापारी स्थळ असावे.

**आडघर** (18° 12'9” N, 73° 17'55” E )

माणगावच्या दक्षिणेस चार किलोमीटर अंतरावरील या गावातील एका मोठ्या तळ्याकाठी स्मशानभूमी जवळ कौलारू, साधे शिवमंदिर आहे. लोकांनी मूळ दगडी पाया असलेल्या चौथऱ्यावरच हे विटांचे मंदिर उभारले आहे. शिवमंदिरात वशिंडाला वळसा घेऊन गळयापर्यंत आलेली घंटी, घुंगरू वा गोंड्याची माळ पाठीवर असलेला नंदी आहे. पाठीवर निरगाठ बांधून

पाठीवरून शेपटाखालून गेलेली घुंगरांची माळ असलेला मराठा काळातील दगडी नंदी आहे.त्याच्या पोटाभोवती बांधलेला पट्टा ही दिसते. गर्भगृह खोल असून त्यात बदल केलेला नाही. गर्भगृहाच्या जोत्याच्या मागच्या देवळीत दोन हातांचे एक स्त्री शिल्प आहे. ते पार्वतीचे म्हणून ओळखले जाते. शिल्पशैलीवरून ही सर्व शिल्पे मराठा आणि नंतरच्या काळातील असावीत. शिवमंदिराबाहेर एक चौकोनी खांबाच्या आकाराचा चारही बाजू तीन टप्यात शिल्पांकित केलेला वीरगळ आहे. शीर्षभाग सुट्या दगडाच्या फांसना शिखाराच्या प्रतीकृतीसारखा आहे. या वीरगळाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व बाजूस नेहमीची दृश्ये असून वरच्या टप्यात तीन बाजूस शिवलिंगाची पूजा करताना वीर दिसतो. मात्र चवथ्या बाजूस गणेश प्रतिमेचे पूजन करताना वीर दाखविला आहे. वीर दोन व्यक्तींशी पायी युद्ध करताना दिसतो. याशिवाय दोन भग्न वीरगळ अथवा वीरगळाचे तुकडे येथे आहेत. या शिल्पाव्यतिरिक्त पद्मासनात व नमस्कार मुद्रेतील स्त्री प्रतिमा येथे पाहायला मिळते. याशिवाय ४० सेंटीमीटर उंच व ३० सेंटीमीटर रुंद शिळेवर एक बुचाडाधारी पुरुष भाल्याच्या साह्याने वराह किंवा अस्वलासारख्या प्राण्याची शिकार करताना दिसतो. या परिसरात शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारायच्या दगडी बांधकामाचे मंदिर असावे.

**चापडी** (18° 11'35" N, 73° 17'43" E )

माणगावच्या दक्षिणेससहा किलोमीटर अंतरावर एका मोठया टेकडीच्या पायथ्याला हे एक गाव आहे. गावातील पुरावशेष गावदेव मंदिरासमोरील जागेत ठेवले आहेत. यांमध्ये झीज झालेले व भग्नावस्थेतील योनीपीठ आहे. मुख व उजवा पाय भग्न असलेले नंदीशिल्प, गणेश शिल्प, दोन समभंग, स्थानक वचार हातांची शिल्पे आहेत. यांच्या खालच्या उजव्या हातात वाकडी एकधारी तलवार, वरच्या उजव्या हातात डमरू, डाव्या वरच्या हातात त्रिशूळ व डाव्या खालच्या हातात ढाल ही आयुधे आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील व मराठापूर्व काळातील असावीत.

**उणेगाव** (18° 11'30" N, 73° 17'2" E )

माणगावच्या दक्षिणेस पाच किलोमीटर अंतरावर व घोड नदीच्या पूर्व तीरावर हे गाव आहे. गावातील भैरी मंदिराजवळ सुमारे एक मीटर उंच व तीससेंटीमीटर रुंद आयताकृती आकाराचे व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले तीन वीरगळ आहेत. हे तीन ते चार टप्यात आहेत. ही लढाई गोधनासाठी झाली असावी. येथे गणेशाचे शिलाहार शैलीचे भग्न शिल्प आहे.

वीरगळाच्या पट्टीवर उभी चौकटची फुले कोरली आहेत. शैलीवरून ही शिल्पे बाराव्या व तेराव्या शतकातील असावीत.गावाच्या तलावाजवळील शिवमंदिराजवळही सात वीरगळ आहेत. पण ते जमिनीत अर्धेअधिक गाडले गेले आहेत. शिवमंदिर मूळ चौथऱ्यावर उभारले आहे.

**वावे तर्फे निजामपूर** (18° 12'4” N, 73° 17'13” E )

उणेगावाचाच एक भाग असलेल्या या गावात चार हातांच्या महिषासुरमर्दिनी प्रकारच्या देवीची मूर्ती आहे. शैलीवरून अठराव्या शतकाच्या शेवटी किंवा एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या शतकातील हे शिल्प असावे. शिवलिंग व नंदी शिल्पही त्याच काळातील असावे.

## **३.४ तळा तालुक्याचा सर्वेक्षण वृत्तांत (**नकाशा क्रमांक ३)

**तळा (18° 17'28” N, 73° 8'23” E )**

तळा हे तालुक्याचे प्रशासकीय ठिकाण आहे. हे ठिकाण मध्ययुगातील तळागड या संरक्षक वसाहतीसाठी प्रसिद्ध आहे. येथे अनेक चांगल्या अवस्थेतले भक्कम बुरुज व तटबंदी आहे. गडावरील क्षेत्र कमी असले, तरी या भागावर नियंत्रण व लक्ष ठेवण्यासाठी ही एक मोक्याची जागा आहे (छायाचित्र क्रमांक १७). राजपुरी व म्हसळा खाडी पट्ट्यातील व्यापार या संरक्षक वसाहतीतून नियंत्रित केला जात होता. तळागड हे पूर्वीपासूनच एक प्रशासकीय केंद्र राहिले असावे. गडावर सात टाक्या व एक कोरीव गुहा आहे. सातपैकी एक टाके खांब टाके आहे. या गावात पूर्वी पुश्ती, मोदी, महादेव, ब्रम्हाळी, नंद व रामेश्वरी नावाची तळी होती. त्या पैकी पुश्ती हे जुने तळे होते (रायगड गॅझेटिअर १९९३ :७९१). या ठिकाणाहून पूर्वेकडे दोन किलोमीटर अंतरावर वैतागवाडी हे गाव आहे. येथे गाढवशेत म्हणून एका शेतात एक गद्धेगळ शिल्प आहे. हे शिल्प ५५ सेंटीमीटर लांब आणि ०.२५ सेंटीमीटर रूंद आणि ०.२० सेंटीमीटर जाड आहे. या शिळेचा शीर्षभाग चौकोनी व सपाट आहे. त्यासाठी सूर्य-चंद्र यांच्या प्रतिमा तर डावीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ होणा-या गाढवाचे शिल्प आहे (छायाचित्र क्रमांक १९). या शिल्पावर कोणताही लेख आढळलेला नाही.

तळ्याच्या पश्चिमेस दोन किलोमीटर अंतरावर पूर्वाभिमुख रामेश्वराचे मंदिर आहे. मंदिरासमोर एक पाण्याचे तळे आहे.समोरच दगडी दीपमाळ आहे. मंदिराचे गर्भगृह दगडी

बांधणीचे आहे. साधे चौकोनी तलविन्यासाचे आहे. त्यावर फंसना पध्दतीचे थरांचे शिखर आहे. प्रत्येक थरांच्या कोप-यावर आणि थराच्या मध्यभागी अर्धवर्तुळाकृती पाकळ्या कोरल्या आहेत. गर्भगृह खोल आहे. मंदिराच्या खोदीव तळ्याशेजारी दगडी द्रोणाकार भांडे आहे. रचनेवरून हे मंदिर मराठा काळातील असावे.

किल्ल्यावर पूर्वी ग्रामदैवत चंडीकादेवीचे हेमाडपंती मंदिर असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. देवीचे आजचे स्थान गडाखाली पायथ्याशी आहे. आज मात्र तेथे काही मोजकेच अवशेष आहेत. हे मंदिर मुघल राजवटीत गडाखाली नेण्यात आले. स्थानिकांकडून देवीच्या गडावरून खाली येण्याच्यास्थलांतराची रंजककथा सांगितली जाते. कुठल्यातरी खानाच्या आक्रमणाच्या वेळेस देवीने गडावरून खाली उडी मारल्याचे सांगतात. घोड्याच्या टपाच्या खुणा कातळावर उमटलेल्या, तर देवीची पाउले सध्याच्या गडाखाली चंडिकादेवी मंदिरापासून जवळच असलेल्या एका ओढ्यात उमटलेली दाखविली जातात. या ठिकाणी ओढ्याच्या पात्रातील खडकावर एका ०.२७ मीटर व्यासाच्या खोदीव वर्तुळात दोन पदबिंबे खोदलेली आहेत.

**महागाव** (18° 21'39” N, 73° 11'22” E )

महागाव हे तालुक्याच्या ठिकाणापासून सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर ईशान्य दिशेस आहे. गावाच्या पश्चिमेस गावाची देवरहाटी आहे.या ठिकाणी एका मोठया तळयाभोवती वैशिष्ट्यपूर्ण पुरावशेष आढळून येतात. यात प्रामुख्याने वाघजाई स्थानाजवळ वाघावर आरूढ झालेल्या स्त्रीदेवतेची झिजलेली प्रतिमा आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प आधुनिक काळातील दिसते. दोन लहान प्रतिमांची ओळख पटत नाही. पुढे काळया दगडातील एक शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या सध्या तीन ते चार थरांचा चौथरा आहे. त्याच्यासमोरच काही थडग्याचे अवशेष आहेत. याच ठिकाणी आयताकृती तीन भग्न वीरगळ आढळून येतात. त्यापासून काही मीटर अंतरावर वरदायिनी देवीचे आणि काळभैरीचे साधे कौलारू कोकणी पध्दतीचे मंदिर आहे. वरदायिनी या स्थानिक देवतेचे स्वरूप अष्टभुजा महिषासुरमर्दिनी असे आहे. ती सुमारे एक मीटर उंचीची आहे. उंच करंडक मुकुट परिधान केलेल्या देवीने महिषरूपी रेडयाला मुख्य उजव्या हातातील त्रिशुळाने वार केला आहे. मुख्य डाव्या हातातील रेडयाची जीभ धरली आहे. तिच्या उजव्या वरील हातात नाग आहे. इतर आयुधांचा बोध होत नाही. शैलीवरून ही मूर्ती उत्तर यादवकालीन चौदाव्या शतकातील वाटते. एक शिलाहार शैलीची भग्न व झीज झालेली गणेशाची प्रतिमा आहे. मंदिरात मराठा काळातील नंदी व काळभैरीची मूर्ती आहे. मंदिरात चार दगडीस्तंभ आहेत. त्यांच्या स्तंभशीर्षावर उलटया नागाच्या प्रतिमा असल्या तरी

यादवकालीन स्तंभाची ती भ्रष्ट नक्कल आहे. मंदिरासमोर कोकणी पध्दतीची एक पडलेली दीपमाळ आहे. या परिसरात काळ्या व लाल मृद भांड्यांचे व काळ्या रंगाच्या बांगड्यांचे अवशेष आढळतात.

**महुरे** (18° 22'17" N, 73° 10'8" E )

तळयाच्या उत्तरेस नऊ किलोमीटर अंतरावरील या गावातील काळभैरी, पद्मावती, व भवानीमंदिरात आधुनिक तसेच मराठा काळातील तीन मूर्ती आहेत. दोन मूर्ती चार हातांच्या, समभंग, स्थानक स्वरूपाच्या आहेत. वाहनाचा तपशील नाही. गावात भवानी देवीच्या स्थानी काही भग्न मूर्ती आहेत. दोन टप्यातील व आयताकृती वीरगळ शिल्पशैलीवरून चौदाव्या शतकातील आहे. त्रिकोणी शिरोभागी मंगलकलश आहे. गावात पूर्वी 'गावपळण' म्हणजे गाव सोडून गावाबाहेर दर तीन वर्षांनी एक आठवड्यासाठी राहण्याची प्रथा होती.

**निगुडशेत** (18° 19'31" N, 73° 10'58" E )

तळयापासून पाच किलोमीटर अंतरावर ईशान्येस असलेल्या गावात भैरी या गावदेवीच्या साध्या कौलारू मंदिराजवळ चार हाताच्या दोन झिजलेल्या मूर्ती आहेत. या मंदिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर सोमजाईचे साधे कौलारू मंदिर आहे.समोर एक वैशिष्ट्यपूर्ण जमिनीत खालचा भाग अंशतः गाडली गेलेली कोरीव शिळा आहे. तिची उंची सुमारे एक मीटर तर रुंदी ३५ सेंटीमीटर आहे. शिळेचा वरचा भाग अर्धवर्तुळाकृती आहे. वरच्या भागात पूर्णकलश दाखवला आहे. त्यातून बाहेर येणारी पाने दाखविली आहेत. त्याखाली डावीकडे चंद्र, उजवीकडे सूर्य दाखविले आहेत. त्यानंतर एक २० सेंटीमीटरची चौकट खोदली आहे. त्याखाली लेखासाठी खालील सर्व भाग सपाट केलेला दिसतो. मात्र आज या ठिकाणी हा भाग झीज झालेला आहे. पूर्वी यावर लेख कोरलेला असावा. अशा प्रकारची शिळा या भागात किंवा इतर ठिकाणी आढळल्याची नोंद नाही.

**साळशेत** (18° 20'35" N, 73° 11'53" E )

तळापासून ईशान्येसआठ किलोमीटर अंतरावर सोनभैरी या गावदेवाच्या भिंती नसलेल्या मंदिरात केवळ चार दगडी खांबावर कौलारू छत आहे. हे दगडी खांब काहीसे वेगळे, साधे सपाट पध्दतीचे आहेत. मंदिरात लिंग ठेवण्यासाठी खाच असलेले योनीपीठ, गणेश प्रतिमा, नंदी ही शिल्पे आढळून येतात. स्तंभावर गोल फुले काढली आहेत. काही स्तंभशीर्षावर उलटया नागाच्या प्रतिमा आहेत. शैलीवरून स्तंभ उत्तर यादवकालीन कदाचित पंधराव्या

शतकातील असावेत. गावाच्या नावावरून या ठिकाणी साळीचे म्हणजे भाताच्या एक प्रकारचे पीक येणारे गाव हे लक्षात येते. आजही येथे भाताचे चांगले पीक येते.

**विनवली** (18° 20'54” N, 73° 11 '45” E )

तळ्याच्या ईशान्येस आठ किलोमीटर अंतरावरील या गावातील हनुमान मंदिरात आधुनिक काळातील हनुमान, गणेश, लक्ष्मी व विष्णू यांच्या प्रतिमा आहेत. येथील मूळ प्रतिमा भग्न झाल्याकारणाने विसर्जन करण्यात आल्या. लोकांच्या म्हणण्याप्रमाणे येथे महिषासुरमर्दिनी, गणेश, विष्णू यांच्या मूळ प्रतिमा असाव्यात.

**ताम्हाने तर्फे तळे** (18° 12'46” N, 73° 4'59” E )

राजपुरी तळकट खाडीचा एक फाटा म्हसळ्याकडे जातो. या म्हसळाखाडीलगत तळ्याच्या नैऋत्येस दहा किलोमीटर अंतरावर हे एक छोटेसे गाव आहे. या गावाच्या दक्षिणेकडील टेकडीवरील ग्रामदेवतेच्या मंदिरात एकूण दहा शिल्पे आहेत. यातील एक ३५ सेंटीमीटर उंचीचे शिल्प चौथऱ्याखाली आहे. चार हात असलेली धोतर परिधान केलेली देवतेची मूर्ती झीज झालेली आहे. त्यातील श्री. धावीरदेव या स्थानिक देवाचे वीराचे म्हणून दाखविल्या जाणाऱ्या, मुख्य देवतेच्या दोन प्रतिमा आहेत. यात एक प्रतिमा फारच वेगळी म्हणजे लाकडाची बनविलेली आहे. ही प्रतिमा घोडयावर बसलेली, दोन हातांची उजव्या हातात वाकडी तलवार व डाव्या हातात ढाल धारण करणारी डोक्यावर बसका मुकुट, मिशी असलेली, कान सुटे कोरलेल्या स्वरूपात आहे. या मूर्तीचीच नक्कल दगडात बनविलेली आहे. शेजारी एक स्त्रीदेवतेची प्रतिमा आहे. तिने करंडक मुकुट परिधान केला आहे. ती चार हातांची समभंग अवस्थेत कोणतेही वाहन नसलेली स्थानक मूर्ती आहे. दक्षिण अग्रक्रमाने खालच्या उजव्या हातात तलवारी सारखे हत्यार, वरच्या हातात कटयार तर वरच्या डाव्या हातात ढाल, खालच्या डाव्या हातात गोल वस्तू आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे सतराव्या ते अठराव्या शतकातील असावीत.

**वारळ** (18° तेरा'19” N, 73° 5'36” E )

वारळ हे गाव कुडा मार्गे म्हसळा रस्त्यावर तळयाच्या नैऋत्य दिशेला आठ किलोमीटर अंतरावर आहे. गावात महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळून येतात. गाव डोंगराच्या एका दांडावर वसले आहे. गावाच्या पूर्वेस सवतकडा डोंगरातून उगम पावणारी कोंडी नदी दक्षिण तीरावर जेथे समुद्रास मिळते, तिथे तिने छोट्या खाडीसारखे रूप धारण केले आहे. गावात

'गोलाईदेवी' या ठिकाणी ७५ सेंटीमीटर उंच, ४० सेंटीमीटर रूंद, १५ सेंटीमीटर जाड आकाराच्या सुटया शिळेवर गायवासरू हे शिल्प कोरलेले शिल्प आढळते. शिळेचा २५ सेंटीमीटर शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती कोरला आहे. त्यावर मंगलकलश व चंद्र-सूर्य कोरले आहेत. त्या खाली चौकटीमध्ये गायवासरू कोरलेले आहेत. चौथऱ्याखाली ३० सेंटीमीटर शिळा लेखासाठी कोरून गुळगुळीत केलेली दिसते. पण आज यावर लेख आढळून येत नाही.

गावाच्या उत्तर बाजूस भाजगाई देवस्थानजवळ अनेक लहान मोठया नवसपूर्तीच्या मूर्ती ठेवलेल्या दिसतात. येथे भाजगाई म्हणून पुजली जाणारी देवतेचे स्वरूप गजलक्ष्मी प्रकारचे आहे. ही शिळा ७५ सेंटीमीटर लांब, २५ सेंटीमीटर रूंद, ५० सेंटीमीटर उंच आहे. दोन हाताच्या देवीने आपल्या हातात कमळ धारण केले आहे. हत्ती व देवी एकाच पातळीत कोरले आहेत. शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती कोरला आहे.

या परिसरात सहा भग्न आयताकृती व एकच बाजू शिल्पांकित केलेले वीरगळ नेहमीच्या पध्दतीने तीन टप्यात चौकटीत दाखविले आहेत. शिवलिंग, गणेश, भग्न नंदीप्रतिमा ही शिल्पे अर्धी मातीत गाडली गेली आहेत. गावाच्या पूर्वेस नदीकाठावर शिवमंदिर होते असे सांगतात. येथे ओबडधोबड दगडांचा गडगा वर्तुळाकार पद्धतीने रचला आहे. यात प्राचीन पध्दतीने शिवलिंग, गणेश प्रतिमा, तसेच बाहेर देखील एक मोठे भग्न शिवलिंग आढळून येते. शैलीवरून हे सर्व अवशेष अकराव्या ते तेराव्या शतकातील असल्याचे लक्षात येते. सवत सडयाच्या पूर्वेकडील डोंगर परिसरात काही पांडवकालीन खोदकामे असल्याचे वृध्द गावकरी सांगतात.

**वाशी हवेली** (18° 13'57" N, 73° 4'44" E )

तळयाच्या नैऋत्यदिशेस नऊ किलोमीटर अंतरावर खाडी फाटयावर हे गाव वसले आहे. सध्या गावाच्या बाहेर खाडीमध्ये आधुनिक काळात पकटी म्हणजे बंदराचा धक्का (jE)tti) आहे. या ठिकाणी एक छोटेसे टेकाड आहे. त्यावर मराठा काळातील अनेक स्मृतीशिळाव स्मृतीस्तंभ आहेत. या ठिकाणी काचेचा लेप दिलेली खापरे सापडतात. याच ठिकाणी एक झाडाखाली चुन्याच्या घाण्याचा दगडी अवशेष आढळतात. गावात डोनोबा नावाचे दैवत आहे. चार हातांची घोडयावर स्वार दगडी मूर्ती आहे. मराठा शैलीची ही मूर्ती असल्याचे लक्षात येते. याशिवाय चार शिल्पे येथे ठेवली आहेत. ही शिल्पे त्यांच्या शैलीवरून मराठा काळातील असल्याचे दिसते.

**चोरवली** (18° 12′44.5″ N 73° 06′50.1″ E)

हे गाव तळ्याच्या नैऋत्येस सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर टेकडीवर आहे. गावात कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष आढळत नाहीत.

**गणेशनगर** (18° 12'7" N, 73° 6'6" E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे ११ किलोमीटर अंतरावर असलेले हे ठिकाण कासेखोल गावाचाच एक भाग आहे. गावातील पुरावशेष गणेशनगर येथील गावदेवी मंदिर परिसरात आहेत. ही देवता घोड्यावर स्वार आहे. शैलीवरून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकातील असावी.

**कासेखोल** (18° 11'58" N, 73° 6'35" E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे दहा किलोमीटर अंतरावर टेकडीवर हे गाव वसले आहे. गावातील पुरावशेष गणेशनगर येथील गावदेवी मंदिर परिसरात आहेत. या ठिकाणी घोड्यावर स्वार देवता असलेले शिल्प आहे. शिल्प शैलीवरून हे शिल्प मराठा काळातील असावे.

**मजगाव** (18° 12'46" N, 73° 5'27" E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस खाडीलगत सुमारे तेरा किलोमीटर अंतरावर टेकडीच्या उतारावर हे गाव वसले आहे. गावात कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष नाहीत. गावाच्या उत्तरेस असलेल्या एका बागेत गायवासरू शिल्प असल्याचे समजते, परंतु ते पाहता आले नाही.

**कोंडेथर** (18° 20'35" N, 73° 7'58" E )

समुद्रसपाटीपासून सोळा मीटर उंचीवर तळयाच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर असलेले हे गाव खाडीलगत आहे. भरतीच्या वेळेस नदीत पाणी असते. गावातील काळभैरी मंदिराचा जीर्णोध्दार नुकताच झाला आहे. गावदेवी जाकमाता मंदिर परिसरातील शेतात लाल, काळी, पूर्व मध्ययुगीन खापरे सापडतात. काचेचा लेप असलेली भांडयाचे तुकडेही आढळले.

**मालाठे** (18° 19'4" N, 73° 6'53" E )

तळ्याच्या वायव्येस तीन किलोमीटर अंतरावर खाडीकाठी मेढे गावाकडून येणाऱ्या आणि राजपूरखाडीस अथवा तळखाडीस मिळणाऱ्या एका छोटया ओढयाच्या दक्षिण तीरावरील या

गावात काहीही महत्त्वपूर्ण पुरावशेष नाहीत. परंतु गावाच्यामागील टेकडीवर समुद्रसपाटीपासून २०० मीटर उंचीवर द्रोणगिरी टेकडी वर डोनोबा किंवा द्रोणोबाचे देवस्थान आहे.

**गिरणे (18° 19'14" N, 73° 6'14" E )**

तळयाच्या वायव्येस चार किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून नऊ मीटर उंच अंतरावरील या गावात पश्चिम बाजूने आत उतरण्यास पायऱ्याअसलेली घोडे बाव होती. आता गावकऱ्यानी तिचा जीर्णोध्दार केला आहे. शेजारीच तलाव ग्रामदेवतेचे मंदिर होते. त्याचाही जीर्णोध्दार झाला आहे. मंदिराबाहेर तीन भग्न वीरगळांचे अवशेष आहेत. पैकी दोन वीरगळ जमीन अर्धेअधीक गाडले गेले आहेत.

**मेढा** (18° 18'54" N, 73° 8'25" E )

समुद्रसपाटीपासून २४ मीटरउंचीवर, तळयाच्या वायव्येस दोन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. तळा किल्ल्याच्या वायव्येस स्मशानभूमी जवळच काळभैरीचे मंदिर आहे. मंदिराबाहेर जुन्या मूर्ती काढून ठेवल्या आहेत. शिल्पशैलीनुसार मराठा काळातील आहेत. या मूर्ती देखील येथे असलेल्या मूळ मूर्त्यांची नक्कल असाव्यात यात चार हातांच्या महिषासुरमर्दिनी आणि वाघावर आरूढ झालेल्या देवता आहेत. जवळील स्मशानामध्ये अनेक मराठाकालीन समाध्या म्हणजे स्मृतीशिळा पाहायला मिळतात. शैलीवरून ही शिल्पे सतराव्या किंवा अठराव्या शतकातील असावीत.

**फळशेत कर्नाळा** (18° 19'14" N, 73° 9'37" E )

तळयाच्या ईशान्येस तीन किलोमीटर अंतरावर गाव आहे. तळा -रोहा मार्गावरील या गावात कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळले नाहीत.

**पढवन** (18° 20'37" N, 73° 8'26" E )

तळयाच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर निगुडशेत कडून येणाऱ्या एका नदीच्या काठावर समुद्रसपाटीपासून २५ मीटर उंचीवर गाव वसले आहे. गावाच्या बाहेर पूर्वेस काळभैरी आणि जीर्णोद्धार झालेले शिवमंदिर आहे. काळभैरी मंदिर दुरावस्थेत आहे.समोरच दीपमाळेचे अवशेष विखुरलेले पडले आहेत. मंदिराच्याशेजारी दुसऱ्या एका खोलीत सात सुटी शिल्पे एका सिमेंटच्या कठडयावर बसविली आहेत. शिल्पाची प्रचंड झीज झालेली आहे. डावीकडील पहिल्या शिल्पावर नमस्कार मुद्रेतील व्यक्तीचे चित्रण आहे. शिळेच्या वर मंगलकलश कोरला

आहे. डावीकडील तीन नंबरचे शिल्प ही एका वीराचे आहे. परंतु त्याचा अर्धा भाग सिमेंटमध्ये गाडला गेला आहे. तर सर्वात उजवीकडील सातवे शिल्प विशेष आहे. याचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती आहे, त्यावर चंद्र-सूर्य कोरलेले आहेत. त्याखाली लेखासाठी भाग कोरलेल्या आहे. हे शिल्प सिमेंटमध्ये अर्धे गाडले गेले असल्याने त्यावर गद्धेगळ शिल्प होते की नाही सांगता येत नाही.. येथून सुमारे १०० मीटर पुढे शिवमंदिर आहे. मंदिराबाहेर अनेक सुटी शिल्पे ठेवलेली आहेत. यात भग्न असे दोन नंदी, गणेश प्रतिमा, चार वीरगळ दोन टप्यात आहेत. आयताकृती एकच बाजूने कोरलेले आणखी दोन वीरगळ आहेत. दगडांवर फक्त एकटा वीर दाखविला आहेत. तीन शिल्पांवर मांडी घालून बसलेले जोडपे शिल्पांकित केले आहे. एका शिळेवर दोन हातांचा त्रिभंग अवस्थेतील पुरूष दाखविला आहे. त्याच्या डाव्या हातात इक्षुदंड (उसाचा दांडा) सारखी वस्तू आहे. ही मदनाची शिल्पाकृती असावी. मंदिराचा गाभार खोल आहे. शिवलिंग प्राचीन पध्द्तीचे म्हणजे लिंग आणि शाळूंका वेगवेगळी असलेले आहे. मंदिरातील नंदीव गणेश शिल्प मात्र अठराव्या शतकातील वाटते. हे सर्व वीरगळ आणि इतर शिल्पे शैलीनुसार तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील वाटतात.

**शेनाटे** (18° 15'56” N, 73° 7'10” E )

शेनाटे गावात तळयापासून चार किलोमीटर पश्चिमेस चांद नदीच्या दक्षिण काठावर काळभैरी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. येथे कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष नाहीत. गावात मराठा काळातील एक समाधी आणि आधुनिक काळात उभारलेली दीपमाळ आहे. गावाच्या बाहेर नदीकिनारी गणेश मंदिर आहे. ही प्रतिमा तिथल्या नदीत सापडल्याचे सांगितले जाते. ही प्रतिमा शिलाहार काळातील गणेश प्रतिमांशी जुळणारी आहे. शैलीवरून हा कालखंड अकरावे शतक ते बारावे शतक ठरवता येतो.

**वनास्ते** (18° 16'9” N, 73° 7'56” E )

गावातील कालकाई परिसरात उल्लेखनीय अशी सात सुटी शिल्पे आहेत. यातील झीज झालेली पाच शिल्पे दोन हातांची आहे. त्यातील एक शिल्प त्रिभंग अवस्थेतील उजव्या हातात दंड घेतलेल्या स्त्रीचे आहे. तर दुसरे शिल्प नमस्कार मुद्रेतील पद्मासनातील पुरूषदेवतेचे आहे. ही दोन शिल्पे शैलीच्या दृष्टीकोनातून चौदाव्या किंवा पंधराव्या शतकातील वाटतात. इतर शिल्पे मराठा -पेशवे कालखंडातील आहेत.

**मालुक** (18° 14'56” N, 73° 7'3” E )

समुद्रसपाटीपासून १९० मीटर उंचीवर आणि तळयाच्या नैऋत्येकडे सात किलोमीटर अंतरावरील डोंगरभागातील गावात सोमजाई या ग्रामदेवतेचे कौलारू मंदिर आहे. मंदिरासमोर मराठा काळातील दीपमाळ आहे. सुमारे ७० सेंटीमीटर उंचीची महिषासुरमर्दिनी स्वरूपाची, चार हातांची मूर्ती आहे. एकूण सहा शिल्पे आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा पेशवे काळातील आहेत. मंदिराबाहेर महिषासुरमर्दिनीचे भग्न शिल्प ठेवले आहे. शैलीवरून ते बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावे.

**पिटसई** (18° 16'9” N, 73° 5'55” E )

हे गाव चांद नावाची नदी तळकट खाडीस जिथे मिळते तिथे वसले आहे. तिच्या दक्षिण तीरावर तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे चार किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. पिटसईत काळकाई आणि धावीरदेव या ग्रामदेवतांच्या परिसरात अकरा सुटी शिल्पे आहेत. ही सर्व त्यांच्या शिल्पशैलीवरून मराठा आणि नंतरच्या काळातील आहेत. मंदिर परिसरात पावसाळयात काचेचा लेप असलेली खापरे सापडतात.

**मूळगाव** (18° 16'9” N, 73° 5'55” E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे चार किलोमीटर अंतरावर हे गाव पिटसईचे मूळगाव मानले जाते या ठिकाणी गावदेवी कालकाईचे देवस्थान आहे. येथे पूर्वी अनेक शिल्पांचे अवशेष होते. आता या ठिकाणी समाज मंदिर बांधण्यात आले आहे. येथे गायवासरू शिल्प असल्याचे ही सांगितले जाते. या ठिकाणी पूर्वी मोठे मंदिर असावे असे वाटते. येथे आजही प्राचीन मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्याना लागून जे कठडे असतात, अशा कठडयांचे अवशेष आहेत. काही मूर्ती मध्ये एक भग्न मूर्ती कुबेराची असल्याचे ओळखता येते. ही भग्नावस्थेतील मूर्ती चार हातांची असावी असे दिसते. तिने आपल्या मागच्या दोन हातात नकुल म्हणजे मुंगसाच्या कातडयाची पिशवी धारण केलेली दिसते. शैलीवरून सदर शिल्प अकराव्या शतकातील वाटते. तसेच येथे करजाई, कालकाई देवीचे म्हणून दाखविले जाणारे शिल्प ही शैलीवरून मराठा काळातील वाटते.

**खांबिवली** (18° 17'16” N,  73° 7'32” E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात गावदेव स्थानाजवळ अठराव्या शतकातील काही झीज झालेली शिल्पे आहेत.

**शेणवली** (18° 16'53” N, 73° 6'32” E )

तळ्याच्या नैऋत्य दिशेस सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात अठराव्या शतकातील स्मृतीशिळा आहेत.

**बोरघर हवेली** (18° 18'2” N, 73° 10'43” E )

गावदेवी मंदिर परिसरात मराठा काळातील स्मृतीशिळा म्हणजेच समाधी दगड तसेच झीज झालेली मराठा काळातील भैरवाचे शिल्प आहे.

**काकडशेत** (18° 16'35” N, 73° 12'12” E )

तळ्याच्या पूर्वेस सहा किलोमीटर अंतरावरील या गावातील ग्रामदेवतेच्या मंदिराचा नुकताच जीर्णोध्दार झाला आहे. देवतेच्या झिजलेल्या दोन मूर्ती सध्या मंदिराजवळील एका तात्पुरत्या निवाऱ्यात ठेवल्या आहेत. काळया दगडातील या मूर्ती सतराव्या किंवा अठराव्या शतकातील वाटतात.

**कळसांबडे (18° 16'29” N, 73° 12'49” E )**

तळ्याच्या पश्चिम दिशेस आठ किलोमीटर अंतरावरील गावात काळभैरीचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. एका कौलारू मंदिराभोवती अनेक मराठा काळातील समाधीचे कोरीव म्हणजे स्मृतीशिळा दगड आहेत. गावातील एका शेतात गाय आणि तिचे दूधपिणाऱ्या वासराचे ६० सेंटीमीटर उंच आणि ३० सेंटीमीटर लांब व २५ सेंटीमीटर रूंद शिल्प आढळून येते. शीर्षभाग थोडा भग्न झाला आहे. त्याखाली चंद्र-सूर्याच्या आकृती आहेत. गायवासरू एका चौकटीत कोरले आहे. त्याखाली कोणताही लेख नाही. येथून जवळच सती चौथऱ्याचे स्थान दाखवितात तेथे कोरीव जोते आहे. या ठिकाणी उभ्या चौकटच्या नक्षीमधील फुले असलेला दगड आढळून येतो. शिल्पशैलीवरून हे अवशेष अकराव्या ते तेराव्या शतकातील असावेत.

**सोनसडे** (18° 17'53” N, 73° 11'18” E )

तळ्याच्या पश्चिम दिशेस पाच किलोमीटर अंतरावरील गावात काळभैरवाचे व शिवाचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. मंदिराच्या मागे ठेवलेली, शिल्पशैलीनुसार अठराव्या शतकातील भग्न शिल्पे, वगळता या ठिकाणी कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळले नाहीत.

**कळमशेत** (18° 16'34” N, 73° 10'31” E )

कळमशेत हे गाव तळयाच्या आग्नेयेस चारकिलोमीटर अंतरावर वसले आहे. अठराव्या शतकातील स्मृती शिळा आहेत. इतर कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळले नाहीत.

**आडनळे** (18° 15'58” N, 73° 10'43” E )

आडनळे हे गाव तळयाच्या आग्नेयेस पाच किलोमीटर अंतरावर वसले आहे. या ठिकाणी कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळले नाहीत.

**मांदाड** (18° 17'45” N, 73° 3'35” E )

मांदाड हे गाव तळयाच्या पश्चिमेस नऊकिलोमीटर अंतरावर वसले आहे. हे सुप्रसिध्द् राजपुरी खाडीच्या मुखाशी आहे. कुडयाच्या महोबा डोंगराकडून येणारी एक टेकडी किंवा खाडीत शिरलेली आहे. तिच्या उतारावर सभोवताली हे गाव वसले आहे. या गावात काही प्राचीन खापरांचे तुकडे आणि काही विटांच्या चौथऱ्यांचे अवशेष संशोधक एस. नाराराजून १९८१ यांना आढळले. आज हा भाग पाण्याखाली गेला आहे. त्यांच्या मते मांदाड हे बंदर म्हणजे कुडा लेणीत ‘मंडव’ नावाने वर्णन केलेले मंदगोर हे बंदर होय (Nagaraju 1981:306). याठिकाणी असलेले हे बंदर अठराव्या शतकात देखील प्रसिद्ध होते (रायगड गॅझेटिअर १९९३: ८३४) .

**रहाटाड** (18° 17'58” N, 73° 5'12” E )

खाडी मुखाशी असलेल्या गावात महत्त्वपूर्ण अवशेष नाहीत. पेशवे काळातील चपेट मुद्रेतील, मिशा असलेली मारूती मूर्ती राधाकृष्ण मंदिराशेजारी पहायला मिळते. रहाटाड गावातील नदीलगत एक कातळात कोरलेली सुमारे एक मीटर लांबीची पाण्याची टाकी आहे.

**कुडे** (18° 16'55” N, 73° 4'5” E )

राजापुर खाडीस तळकट या स्थानिक नावाने ओळखले जाते. या खाडीमुखाशी कुडे हे गाव तळयाच्या पश्चिमेस सात किलोमीटर अंतरावर वसले आहे. हे गाव महोबा टेकडीवर असलेल्या बौध्द लयन वसाहतीमुळे प्रसिध्द आहे. महोबा डोंगराच्या पश्चिम उतारावर समुद्रसपाटीपासून ५० ते ६० मीटर उंचीवर २६ बौध्दलेणी आहेत (छायाचित्र क्रमांक १८). अकरा पाण्याच्या टाक्यांचा समूह आणि लहान कुंडे आहेत. लेणींचा विस्तार २०० मीटरआहे. त्या नैऋत्य-पश्चिमाभिमुख आहेत. लेणी क्रमांक १ ते १५ खालच्या रांगेत, लेणेक्रमांक १६ ते

२६ वरच्या रांगेत अशा या लेणी द्विस्तरीय आहेत. वर्षानुवर्षेजोरदार वारे व पावसाच्या तडाख्यांना तोंड देत असल्यामुळे येथील काही शिलालेख व प्रतिमा झिजल्या व अस्पष्ट झाल्या आहेत.

या लेणी समुहात ३१ शिलालेख आढळले आहेत. हे लेख ब्राम्हीलिपीत व प्राकृत भाषेत आहेत. काही लेख ब्राम्ही लिपीत व संस्कृत भाषेत आहेत. या लेखांवरून या लेंण्यांस येथील स्थानिक राज्यकर्ते, व्यापारी वर्ग व सामान्य माणसांचा पाठिंबा होता. त्यांची निर्मिती या लोकांनी दिलेल्या देणगीतून झाली आहे. या लेखांवरून महाभोज व साडगेरी या दोन राजघराण्यांची माहिती होते. तसेच त्यांमधे वैवाहिक संबंधही होते. या लेणींपैकी काही भोजन मंडपे, तसेच मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी येथील दगडी बाकांना गुप्त खोबण्याही आहेत. या समुहातील लेणे क्रमांक ९ मध्ये आढळलेल्या शिलालेखा वरून, हे लेणे या समुहातील सर्वात प्राचीन लेणे असावे. या लेणींची निर्मिती विद्या देहेजीयांच्या मते पहिल्या शतकात (Dehejiya 1972: 182-183), तर नागराजूच्या मते तिसऱ्या शतकात किंवा चौथ्या शतकातील असावी झाली असावी (Nagaraju 1981: 242-306). या ठिकाणी बौध्दधर्मातील हीनयान व महायान पंथाचे प्राबल्य होते.

कुडे गावात गावदेवाचे मंदिर आहे. या ठिकाणी जीर्णोध्दाराच्या वेळेस नवीन मूर्ती शिल्पांची स्थापना करण्यात आली आहे. लेणी परिसरात व गावात काळया व तेजस्वी लाल रंगाच्या मृदभांड खापरांचे अवशेष पावसाळयांच्या दिवसात सापडतात. यात थाळया, झाकण्या, पिण्याचे पेले व हंडी यांचे अवशेष आहेत. रोवळा हे गाव तळा कुडा मार्गे म्हसळा या रस्त्यावर सात किलोमीटर अंतरावर काहीसे नैऋत्य दिशेस आहे. गावदेवी मंदिर परिसरात गावातील पुरावशेष आढळतात.येथील जुन्या मूर्तीचे विसर्जन केले आहे. मंदिराबाहेर मागच्या बाजूस दोन हातांचे स्थानक व समभंग अवस्थेतील स्त्री शिल्प आढळून येते. तिच्या उजव्या हातात दंड किंवा आयुध आहेत. झीज झालेली ही मूर्ती शैलींनुसारएकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकातील असावी.

**बेलघर** (18° 15'35” N, 73° 8'26” E )

तळयाच्या दक्षिणेस तीन किलोमीटर अंतरावर या गावात काळबहिरी या गावदेव मंदिरात चार हातांची भैरवाची आणि दुसऱ्या एका स्थानिक देवतेची मूर्ती आहे. मूर्तीची झीज झालेली

असली तरी शैलीवरून ही अठराव्या शतकातील असावी. गावाच्या पश्चिमेकडील व टेकडीकडील डोंगराळ भागात पांडवांनी काही खोदकामे केल्याचे लोकांचे म्हणणे आहे.

**भानंग** (18° 15'34" N, 73° 10'11" E )

तळाच्या आग्नेयेस पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गावाच्या रहाटीत सोमजाई मंदिर परिसरात दोन भग्न वीरगळांचे अवशेष किंवा एकाच वीरगळाचे दोन तुकडे आढळतात. एक शिलाहार शैलीची गणेशाची आणि ते शिल्प ठेवायचे पीठ यांच्या झिजलेल्या प्रतिमा आहेत. भग्न गजलक्ष्मी, चार हातांचा भैरव आणि दोन हातांच्या एका स्थानिक देवतेच्या बैठका झिजलेल्या प्रतिमा आहेत. एकंदर शिल्पशैलीवरून या बाराव्या शतकापासून ते आधुनिक काळातील असाव्यात. या भागात लाल तसेच काळ्या रंगाचे खापराचे तुकडे आढळतात. या ठिकाणच्या बहुला माळावर गायवासरू शिल्प आढळते. हे निम्याहून अधिक जमिनीत गाडले गेले आहे याच अर्धवर्तुळाकृती शीर्षभाग दिसतो. सभोवती करवंदीची जाळी वाढली आहे. यावरील अर्धवर्तुळाकृती शीर्ष भागावरील सूर्य व चंद्र पाहता येतात पण गायवासरू शिल्प दिसत नाही, परंतु स्थानिकांनी ते पाहिले आहे.

**भानंगकोंड** (18° 14'45" N, 73° 9'54" E )

भानंग गावापासून दक्षिणेस एक किलोमीटर अंतरावर भानंगकोंड आहे. येथे भैरीचा माळावर काही भग्नावस्थेतील शिल्पे आहेत. ही शिल्पे त्यांच्या शैलीवरून चौदाव्या व पंधराव्या शतकातील असावीत.

**चरई खुर्द** (18° 14'33" N, 73° 8'55" E )

तळा-तळेगाव मार्गावर तळ्याच्या दक्षिणेस पाच किलोमीटर अंतरावर या गावात शेतामध्ये मंदिरात छोटी-छोटी शिल्पे आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे पूर्व मध्ययुगीन काळातील असावीत. मात्र या मंदिरात प्राचीन मंदिराच्या अवशेषांपैकी एका भग्न आमलकाचे अवशेष आहे. त्याच्या आकारावरून येथे एक मोठे मंदिर असावे हे लक्षात येते. शिल्पशैलीवरून हे अवशेष अकराव्या ते बाराव्या शतकातील वाटतात.

**काकळ** (18° 12'15" N, 73° 10'17" E )

हे गाव तळयापासून आग्नेयेस सात किलोमीटर दूर अंतरावर एका छोट्या नदीच्या काठावर वसलेले आहे. गावदेव मंदिराजवळ पुरावशेष आढळतात. गावात शिवमंदिर व धावीर देव या

स्थानिक देवतांचे स्थान आहे. जीर्णोध्दार झालेल्या शिवमंदिराबाहेर सुस्थितील सुमारे एक मीटर उंचीचे आयताकृती व एकच बाजू शिल्पांकित केलेले दोन वीरगळ व एका भग्न वीरगळाचा फक्त वरचा टप्पा शिल्लक आहे. येथे एक सतीशिळा आहे. वीरगळ व सतीशिळा तीन टप्प्यात कोरली आहेत. त्यांचा तळाचा भाग रूंद आहे. त्रिकोणाकृती शीर्षभागाकडे निमूळता होत गेलेला दिसतो. या वीरगळांपैकी एका वीरगळांवरील वीर घोड्यावर स्वार होवुन युध्द करताना दिसतो. वरील टप्प्यात मृतदेहास पालखीत बसून स्वर्गाकडे नेत असल्याचे दृश्य कोरले आहेत. शिवमंदिरात मुखभग्न झालेल्या नंदीचे शिल्प आहे. गळयात घंटा अडकवलेली माळ तर पाठीवरून गळयाकडे व शेपटाच्यामागील भागाकडे पाठीवर विशिष्ट पध्दतीने गाठ बांधलेली आणि एक झुबकेदार गोंड्यांची माळ वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेच नंदीच्या या माळेस आधार देणारा पट्टा पोटाभोवती बांधला आहे. मंदिरातील शिवलिंग आणि शाळुंका पीठ वेगवेळया आहे. शाळुंकेची गोलाकार खाच आरपार न खोदता फक्त लिंगाचा दगड ठेवता येईल इतपत खोल आहे. गर्भगृहात झिजलेली तीन सुटी शिल्पे आहेत. यातील एक त्रिभंग अवस्थेतील भैरव तर एक समभंग अवस्थेत दोन हातांनी उजव्या हातात दंडासारखे आयुध धारण केलेली स्थानक मूर्ती आहे. ही मूर्ती पार्वतीची असल्याचे गावक-यांनी सांगितले.

गावात धावीरदेवाचे स्थान आहे. या देवालय परिसरात तपकिरी करडया रंगाच्या मृद भांडयांचे तुकडे मोठ्या प्रमाणात आढळून आले. तसेच एक ते दीड सेंटीमीटर जाड व १२ सेंटीमीटर रुंद पसरट चौकोनी आकाराचे कौलाचे तुकडेही मोठ्या प्रमाणात आढळतात. मंदिराच्या बाजूस स्थानिक ग्रामदेवी कालकाई मंदिराचा जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधकाम पध्दतीने बनवलेला चौथरा आहे. एकंदर शिल्पशैली येथेआढळलेल्या जांभ्या चौथ-यावरून येथील पुरावशेष बाराव्या ते तेराव्या शतकापासून ते अगदी मराठा कालखंडापर्यंतचे असावेत.

**तळेगाव तर्फे तळा** (18° 14'1” N, 73° 8'48” E )

तळेगाव हे तळापासून दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावर आहे. डोंगराळ भागातून वाहणा-या एका ओढ्याच्या काठावर हे गाव वसले आहे. तळा तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचे शिल्पावशेष या गावात सापडतात. गावात तीन तळी होती यापैकी एक बुजलेले आहे. गावाच्या स्थानिक ग्रामदेवता मानाईदेवी, कालकाईदेवी, सोमजाई आणि कोंडजाई यांच्या मंदिराच्या परिसरात हे अवशेष आढळतात.

मानाई मंदिर परिसरात मैथुन शिल्पांच्या दोन आयताकृती शिळा, द्‌वारशाखेचे अवशेष, भग्नस्तंभ अवशेष, वराहमुख शिल्प, किर्तीमुख शिल्प इत्यादि शिल्पे आढळून येतात.

प्राथमिक शाळेच्या आवारात प्रेतावर नाचणा-या चंडीकेचे शिल्प, चामरधारीणी, तसेच द्‌वारशाखेचे अवशेष, आमलक इत्यादि भग्नशिल्पे पडली आहेत. गावदेवी मंदिराच्या भिंतीसही जंघेचे दगड लावले आहेत.

साळूंकी तलाव या बुजलेल्या तलावाच्या पश्चिम काठावर पूर्वाभिमुख शिवमंदिराचे अवशेष आहेत (छायाचित्र क्रमांक २१). या मंदिरावर दाट रानटी झुडुपे तसेच भलेमोठे चिंचेचे झाड त्यातून उगवल्यामुळे या प्राचीन अवशेषांची सरमिसळ झालेली दिसते. खुर, कुंभ, कर्णिका यांनी बनलेल्या मंदिराचे अधिष्ठान व त्यावर दक्षिण बाजूच्या भग्न अवस्थेतील देवकोष्ट असलेल्या जंघेचे अवशेष, प्रतिहार असलेली द्‌वारशाखा, शैव आचार्यांचे शिल्प, भग्न अनंतशयनी विष्णूमूर्ती, मुखभग्न नंदी, स्तंभ, आमलक, निॠती या अष्टदिक्पालांपैकी एक असलेल्या शैव देवतेचे शिल्प इत्यादि उल्लेखनीय शिल्पे आढळतात. तसेच बौध्दवाडी परिसरात श्री. जाधव यांच्या घरासमोर आयताकृती गद्‌धेगळ शिळा, गजलक्ष्मी शिल्प व तेलघाण्याचे दगडी शिल्प आढळून येतात. वर उल्लेख केलेल्या शिवमंदिरापासून दक्षिणेस सुमारे २५ मीटर अंतरावर उत्तराभिमुख कालकाई मंदिराचे अवशेष आहेत. तेथे स्तंभाचे भग्न अवशेष व वैशिष्ट्यपूर्ण मकरप्रणाल, द्‌वारशाखा व कळसाचे विविध भाग आढळून येतात. हे अवशेष रानटी झाडाझुडपांखाली गेले आहेत. या ठिकाणाहून गावक-यांनी अनेक शिल्पावशेष हलवले आहेत. ते गावातील हनुमान मंदिर, मरीआई आणि विठ्‌ठल-रूक्मिणी मंदिर परिसरात ठेवले आहेत. दोन वीरगळ, एक सतीशिळा व काही पीठाचे दगड तर मरीआई मंदिराजवळ लिंग प्रदर्शन करणारा पुरुष व योनी प्रदर्शन करणा-या स्त्रीचे शिल्प तसेच काही स्तंभ आहेत. गावकऱ्यांनी या ठिकाणाची शिल्पे हलवून गावातील हनुमान मंदिरास अखंड द्‌वारशाखा व प्राचीन पीठाचा कर्णिका भाग देखील मंदिराच्या जोत्याला बसवलेला दिसतो.

गावातील सोमजाई व कोंडजाई मंदिर परिसरात शवावर नाच करणा-या कालिका, विष्णूचे स्थानक व भग्न शिल्प तसेच दोन वैशिष्ट्यपूर्ण स्तंभांचे अवशेष पडून आहेत. या शिवाय या सर्व परिसरात शेतीसाठी नांगरणी करीत असताना अनेक आद्‌य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील लाल, काळ्या रंगाची लेपाची खापरे सापडतात. पूर्व मध्ययुगीन काळातील काळ्या काचेच्या बांगड्‌यांचे अवशेष व द्‌विरंगी तर मध्ययुगीन काळातील अनेक रंगी चपट्‌या बांगड्‌यांचे अवशेष आढळतात. तसेच दगडी पाटा-वरवंटा यांचे अवशेष

आढळतात. साळुंकी तलावाच्या उत्तर बाजूस झाडीमध्ये जुन्या थडग्याचे अवशेष आहेत. या परिसरात बहुरंगी चकतीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडे सापडतात. येथे झाडीत उल्लेखनीय अशा एका आसनावर बसलेल्या सहा मानवी आकृत्यांचा ७० सेंटीमीटर लांबीचा शिल्पपट्ट आढळून येतो. येथे आढळणा-या खापरे, व शिल्पावरून येथे आद्य ऐतिहासिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत वसाहती झाल्याचा पुरावा मिळतो. परंतु अकराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंत येथे सातत्याने वसाहती झाल्या.

**चरई बुद्रुक** (18° 13'35” N, 73° 9'53” E )

तळेगावच्या दक्षिणेस सुमारे दहा किलोमीटर अंतरावर चरई बुद्रुक हे गाव आहे. गावाच्या पश्चिम दिशेस असलेल्या टेकडीच्या पाणथळ जागेत रहाटीच्या भागात अनेक शिल्पावशेष व राहत्या घरांची जोती आढळतात. येथे मंदिरांचे उध्वस्त चौथरे व यामध्ये सुमारे ७० सेंटीमीटर उंचीची गणेश प्रतिमा व तिचे पीठ, उमा-महेश्वर व नंदी ही उल्लेखनीय शिल्पे आढळतात (छायाचित्र क्रमांक २०). येथे १४ लहान-मोठ्या आकाराचे वीरगळ आहेत. या ठिकाणी दोन जांभ्या दगडातील जोत्याचे अवशेष आहेत. या शिवाय सभोवताली असलेल्या दाट जंगलामध्ये शुष्कसांधी बांधीव पध्दतीने अभारलेल्या राहत्या घरांचे किमान तेरा चौथऱ्यांचे अवशेष आहेत. या ठिकाणी प्राचीन काळापासून वसाहती झाल्याचा पुरावा म्हणता येईल. बेसाल्ट दगडात घडवलेले शिलाहारकालीन स्तंभाचे तळखडे या भागात विखुरलेले आढळतात. या ठिकाणी उत्तर ऐतिहासिक काळातील, तसेच मध्ययुगीन काळातील मृदभांड खापरे विपूल प्रमाणात आढळतात. तसेच पाणी भरण्यासाठीच्या एका दगडी रांजणाचे अवशेष सापडले आहेत. हे शिल्पावशेष व मृदभांड खापरे अवशेषांवरून येथे उत्तर ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडात वस्ती झाली असावी.

**गायमुख पन्हेळी** (18° 13'15” N, 73° 8'6” E )

हे गाव तळयाच्या दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावर डोंगराळ भागात वसलेले आहे. गावाच्या गावदेवी मंदिर परिसरात वैशिष्ट्यपूर्ण चौरसाकृती शिवलिंग आहे. फक्त एका भागाचा वीरगळ आणि काही मराठा काळातील शिल्पावशेष आहेत. गायमुख या भागात बारमाही वहात असलेले पाणी गायीच्या आकाराच्या पन्हाळीतून मुखावाटे सोडले आहे. या ठिकाणी शिवाची सुमारे मीटरभर उंचीची झिजलेली मूर्ती आहे. मकरप्रणाल, ग्रासमुख शिल्पांच्या मुखभागात छिद्रे असलेले आढळून आले. बहुधा पूर्वी मकरप्रणाल व ग्रासमुखया

शिल्पांचा उपयोग पन्हळ म्हणून गायमुखासारिखा करत असावे. या परिसरात पूर्व मध्ययुगीन व मध्ययुगीन कालखंडातील मृदभांड खापरे आढळतात. यात झाकाण्यांचे तुकडे जास्त आहेत. या ठिकाणी उत्तर ऐतिहासिक ते मध्ययुगात वसाहत झाली असावी.

**अंबेळी** (18° 16'17” N, 73° 8'14” E )

हे गाव तळ्याच्या दक्षिणेस जेमतेम दोन किलोमीटर अंतरावर आहे. चांद नदीच्या उत्तर किना-यावर वसले आहे. गावाच्या कालकाई या ग्रामदेवतेच्या स्वयंभु तांदळा असलेल्या ठिकाणी एका भग्न दीपमाळेचे काही भाग, तर एका शिलाहार कालीन स्तंभाचा तळखडा पाहायला मिळतो. काही देवतांच्या झीज झालेल्या भग्नावस्थेतील मूर्ती व एक शिवलिंग आहे. शैलीवरून त्या अठराव्या शतकातील वाटतात. गावाच्या बौध्दवाडी जवळ एक गजलक्ष्मीचे उल्लेखनीय पण झिजलेले शिल्प आहे. यात विशेष म्हणजे लक्ष्मी आणि हत्ती हे एकाच पातळीत नसून, हत्तीना एका स्तंभावर दाखविले आहे. तसेच बौध्दवाडीतील पाण्याच्या टाकीजवळ दोन वीरगळांचे भग्न अवशेष आहेत.

**खैराट** (18° 16'7” N, 73° 8'45” E )

तळ्याच्या आग्नेय दिशेस तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या, या गावात तांबडीवाडी भागात गावदेवी मानाई मंदिरात महिषासुर मर्दिनी, काळभैरी आणि इतर दोन स्थानिक देवतांची शिल्पे आहेत. मंदिराचा जीर्णोध्दार नुकताच झाला असला तरी मूर्ती जुन्याच असल्याचे गावक-यांचे म्हणणे आहे. या ठिकाणी कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष आढळले नाही. शिल्पशैलीवरून ही प्रतिमा अठराव्या शतकातील असावी. गावात कोणतेही इतर उल्लेखनीय पुरावशेष आढळत नाहीत.

**राणेचीवाडी** (18° 16'44” N, 73° 8'27” E )

तळ्याच्या दक्षिणेस दोन किलोमीटर अंतरावरील या गावात आणि परिसरात कोणतेही मूर्तीशिल्पे आढळली नाहीत. गावातील शेतात नांगरणीच्या वेळेस मध्ययुगीन काळातील तांबड्या, काळया रंगाची मृदभांड खापरे आढळतात.

**तारणे** (18° 17'16” N, 73° 7'32” E )

तळ्याच्या पश्चिमेस दोन किलोमीटर अंतरावरील या गावात कालकाईदेवी मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे, येथील जुन्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी नवीन मूर्ती बसविलेल्या आहेत.

**वावे मांद्रज** (18° 12'38” N, 73° 11'22” E )

तळ्याच्या आग्नेयेस दिशेस दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात फक्त दोन वाड्या आहेत. गावात गावदेवमंदिराजवळ एक चौकोनी खांबाच्या आकाराचा व दुसरा आयताकृती तीन टप्यातील वीरगळ आढळून येतो. शैलीवरून बाराव्या शतकातील असावा. गावात कोणतेही इतर उल्लेखनीय पुरावशेष आढळत नाहीत.

**उसर खुर्द** (18° 14'25” N, 73° 10'31” E )

तळ्याच्या आग्नेय दिशेस सात किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात भैरवनाथाचे मंदिर आहे. गावाच्या पूर्वेकडील टेकडीवर चीरेगाणी येथे पांडवकालीन पाण्याचे टाके असल्याचे लोक सांगतात. प्रत्यक्षात तिथे कातळात कोरीव व बांधीव पद्धतीचे एक टाके आहे.

**दहिवली तर्फे तळे** (18° 13'36” N, 73° 10'46” E )

तळ्याच्या आग्नेयेस ११ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष आढळत नाहीत.

**वांजळोशी** (18° 12'27” N, 73° 9'36” E )

तळ्याच्या वायव्येस तीन किलोमीटर अंतरावरील गावात कालभैरीचे मंदिर आहे. गावात झालेल्या धरणात गावातील पांडवकालीन मंदिर बुडाल्याचे वयोवृद्ध सांगतात. येथील गावदेव मंदिर परिसरात असलेली शिल्पे अठराव्या किंवा एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकातील असावीत. गावात कोणतेही इतर उल्लेखनीय पुरावशेष आढळत नाहीत.

## ३.५ म्हसळा तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत (नकाशा क्रमांक ४)

**आंबेत** (18° 4'33” N, 73° 16'32” E )

म्हसळयाच्या आग्नेयदिशेस १९ किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या उत्तर तीरावरील हे गाव अनेक वाडयांचे मिळून बनले आहे. एका तळयाच्या काठावर गावदेवी मंदिराचे अवशेष आहेत. मंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला असून, गावदेवीच्या चार मूर्ती पहायला मिळतात. एक मूर्ती घोडयावर स्वार झालेली दोन हातांची आहे. दुसरी महिषासुरमर्दिनीची चार हातांची मूर्ती आहे. चार हातांच्या मूर्तीच्या स्वरुपावरुन इतर मूर्तीची कल्पना येते. यावरून या मूर्ती मराठा काळातील असाव्यात. शेजारीच शिवमंदिर जीर्णोध्दार झाला असला तरी त्याचे शुष्कसांधी मंदिराचे काही अवशेष पहायला मिळतात. आंबेतच्या मठवाडीत देखील जाखमातेच्या मंदिरात चार दगडी मूर्ती आधुनिक काळात स्थापन केल्या आहेत. गावात आधुनिक काळात उभारलेला एक धक्का आहे.

**गडदाव** (18° 4'0” N, 73° 14'23” E )

म्हसळयाच्या आग्नेय दिशेस १५ किलोमीटर अंतरावर या गावात जाखमातेचे मंदिर स्थान आहे. गावात आधुनिक काळातील धक्का आहे. गावातील पांडवकाळातील अवशेष सावित्री नदीच्या पात्रात बुडाले असल्याचे सांगतात. सध्या येथे कोणतेही पुरावशेष नाहीत.

**फळसप** (18° 3'43” N, 73° 13'37” E )

म्हसळयाच्या आग्नेय दिशेस १२ किलोमीटर अंतरावर गावातील सोमेश्वर-जाखमाता मंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला आहे. कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. गावक-यांच्या म्हणण्यानुसार उत्तरेकडील जंगल भागात अनेक जुनी जोती आहेत.

**संदेरी** (18° 4'47” N, 73° 14'37” E )

म्हसळयाहून आग्नेय दिशेस १४ किलोमीटर अंतरावर संदेरी हे गाव आंबेत-हरिहरेश्वर रस्त्यावरील महत्त्वाचे गाव आहे. गावातील बेलाचीवाडी येथे शिवमंदिराचा सन १९७७ मध्ये जीर्णोध्दार झाला आहे. मंदिराबाहेर भग्न वीरगळाचे अवशेष आहेत. दोन वीरगळांचा फक्त खालचा भाग शिल्लक आहे. यातील वरच्या टप्प्यात घोडयावर बसून दोन व्यक्तींशी युध्द

करणा-या वीराचे दश्य दिसते, तिसरा वीरगळ हा चौकोनी खांबाच्या आकाराचा व चारही बाजू कोरलेला आहे. याची बरीच झीज झाली आहे. या शिवाय एक भग्न सतीशिळा आणि गणेशाची भग्न प्रतिमा आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या व तेराव्या शतकातील वाटतात. गावाजवळील समुद्रसपाटीपासून २४१ मीटर उंचीची टेकडी आहे. ही टेकडी इतर डोंगररांगेपासून सुटी आहे. या टेकडीस अगीनदुर्ग असे म्हटले जाते. या टेकडीच्या पश्चिम बाजूस दोन पाण्याच्या टाक्या खोदल्या आहेत. त्यांचा आकार सुमारे तीन मीटर लांब व एक मीटर रुंद असावा. टाक्या गाळाने भरून गेल्यामुळे त्यांची खोली समजू शकत नाही. सावित्री नदीचा परिसर येथून दृष्टीक्षेपात येतो. या टेकडीचा विस्तार व स्वरूपावरून ही एक संरक्षक वसाहत असावी. गावाच्या बौध्दवाडी जवळ गावदेवी जाखमातेचे कौलारू मंदिर आहे. पीठावर दोन सुटया स्थानक मूर्ती ठेवल्या आहेत. चार हातांची एक पुरुष मूर्ती, दुसरी दोन हातांची स्त्री मूर्ती आहे. स्त्री मूर्तीच्या उजव्या हातात दंड आहे. ही मूर्ती जाखमातेची म्हणून ओळखली जाते. मूर्तीच्या शैलीवरुन या मूर्ती मराठा काळातील वाटतात.

**घोणसे** (18° 9'4” N, 73° 9'36” E )

हे गाव म्हसळयापासून ईशान्येस सहा किलोमीटर अंतरावर म्हसळा-माणगांव या मार्गावर आहे. या गावातून महाड व माणगांव यासारख्या ठिकाणी जाणारा घोणसे हा घाटमार्ग आहे. हे गाव एका मोठ्या ओढयाभोवती वसले असून गावाच्या सात वाडया आहेत. गावाबाहेरील जंगल परिसरात रेमाई देवीचे जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. गर्भगृहात चार ते पाच झीज झालेल्या मराठा काळातील मूर्ती आहेत. रेमाईदेवी मंदिर परिसरात उत्तर ऐतिहासिक व मध्ययुगीन काळातील मृदभांडयांचे अवशेष सापडतात.

**देवघर** (18° 9'32” N, 73° 8'38” E )

देवघर हे म्हसळयाच्या ईशान्य दिशेस चार किलोमीटर अंतरावर आहे. गाव एका टेकडीच्या पायथ्याशी वसले असून, समुद्रसपाटीपासून १५२ मीटर उंच टेकडीवर आधुनिक काळातील बांधलेले दत्त मंदिर आहे. टेकडीवरील क्षेत्र कमी असले, तरी त्याच्या सभोवताली सुटे दगड तटबंदीसारखे रचले आहेत. दत्त मंदिराच्या निर्मिती दरम्यान या दगडांची सरमिसळ झालेली आहे. टेकडीच्या पायथ्यालाच गाव पसरलेले असून, गावाच्या एका ओढयाच्या काठावर अमृतेश्वर महादेवाचे मराठा काळात प्रसिध्द असलेले कौलारू मंदिर आहे. मंदिराबाहेर अनेक भग्न मूर्ती शिल्पे ठेवली असून यामध्ये सुमारे एक मीटर उंचीचे चार वीरगळ, सात

वीरगळांचे भग्नावस्थेतील अवशेष आहेत. पद्मासन व नमस्कार मुद्रेतली दोन पुरुष शिल्पे आहेत. ही शिल्पे सुमारे ३० सेंटीमीटर उंचीची व १५ सेंटीमीटर रुंद शिळेवर कोरली आहे. दोन भग्न नंदीच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमाही दिसतात. अत्यंत झीज झालेली समभंग अवस्थेतील चार हातांची एक पुरुष देवतेची प्रतिमा गावदेव म्हणून पुजली जाते. मंदिरामध्ये मराठा काळात दिव्ये केली जात. मंदिर परिसरात व गावात, टेकडीवर उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन काळातील व मध्ययुगीन काळातील मृदभांड खापरे सापडतात. मोठे वीरगळ व मूर्ती त्यांच्या शिल्पशैलीवरुन ही शिल्पे बाराव्या ते तेराव्या शतकातील असावीत. एका वीराची प्रतिमा असलेले वीरगळ त्यांच्या शैलीवरून चौदाव्या शतकातील असावेत.

**चिखलप** (18° 8'20” N, 73° 9'20” E )

म्हसळ्याच्या पूर्वेस तीन किलोमीटर अंतरावर चिखलप हे गाव आहे. गाव डोंगर उतारावर वसले असून सध्या नदीपर्यंत वस्ती आहे. गावात गायचोळी या ठिकाणी एका चौथ-यावर भग्न अवस्थेतील सुमारे ५० सेंटीमीटर उंचीचे आयताकृती गायवासरु शिल्प व शिरोभागी चंद्र सूर्य असलेली चौकानी शिळा आहे. गावातून वाहणा-या नदीजवळ कर्जाईदेवीचे मंदिर असून येथे जीर्णोध्दार झालेल्या मंदिरात शिवलिंग, गणेश व नंदीच्या आधुनिक काळात बसवलेल्या मूर्ती आहेत. अत्यंत झीज झालेला ७० सेंटीमीटर उंचीचा एक वीरगळ आढळतो. गावातील हनुमान मंदिरात शेंदूर लावलेली मूर्ती ठेवलेली असून, ही बहुधा स्त्री देवता असावी. गावात व परिसरातील शेतातून नांगरताना उत्तर ऐतिहासिक काळातील लाल रंगाची जाड पोताची व मध्ययुगीन काळातील राखाडी व काळ्या रंगाची खापरे आढळतात.

**सरवर** (18° 8'34” N, 73° 8'33” E )

सरवर या गावात फक्त एकच वाडी असून गाव म्हसळ्याच्या पूर्वेस तीन किलोमीटर अंतरावर आहे. गाव एका छोटया टेकडीवर वसलेले असून या गावात मध्ययुगीन काळातील खापरे पावसाळ्यात वाहून आलेली पहायला मिळतात.

**ढोरजे** (18° 8'53” N, 73° 7'59” E )

हे गाव डोंगरउतारावर आहे. गावात बापदेवाचे देवस्थान असून, तिथे नदीतील नैसर्गिक दगड गोटयांसोबत सुमारे ५० सेंटीमीटर लांब व २० सेंटीमीटर रुंद आकाराच्या एका शिळेवर तीन पुरुषाची मध्ययुगीन काळातील शिल्पे कोरलेली आहेत.

**भेक-याचा कोंड** (18° 7'38" N, 73° 8'42" E )

चिरगावाचाच एक भाग असलेल्या आणि म्हसळयाच्या दिशेस समुद्रसपाटीपासून १५२ मीटर उंचीवर असलेल्या या ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण पुरावशेष आहेत. येथील रहाटीमध्ये धरणकरीन देवीचे स्थान आहे. येथे उन्हाळयातही पाणी असलेल्या पाणथळ जागी गोसाव्याचा मठ नावाने ओळखली जाणारी जागा आहे. या ठिकाणी दाट झाडीत पूर्वाभिमुख असलेल्या एका मोठया जोत्याचे अवशेष आहेत. हा जोता जांभ्या दगडातील शुष्कसांधी बांधीव पध्दतीने बांधला आहे. रानटी झुडपांमुळे याचे मोजमाप घेता येत नाही. येथे मूर्ती बसविण्यासाठी खाच असलेले पीठ पडलेले आहे. या चौथ-यास पूर्वबाजूस अनेक पाय-या असून त्यावरही झुडपे वाढलेली आहेत. या पाय-या जांभा खडकातून कोरल्या आहेत. या पाय-यांची सुरूवात जिथे होते तिथे एक जांभ्या दगडात खोदलेली पूर्वाभिमुख अशी कोरीव लेणी आहे. तिची लांबी १.३० व रूंदी १.४० असून सध्या त्यात गाळ साठल्याने उंचीचा अंदाज येत नाही. प्रवेशदाराची उंची ०.७० मीटर व रुंदी ०.७५ मीटर आहे. या लेणीचे माणगांव तालुक्यात आढळलेल्या चांढोरे गावातील इंदवन भागातील अशाच प्रकारच्या लेणीशी साम्य आहे. तसेच म्हसळा तालुक्यातील घुम गावातील घुमेश्वर परिसरातील देखील अशाच प्रकारची लेणी आढळून आली आहेत. या शिवाय ओढयाच्या पलीकडे ओढ्याला लागूनच एक बांधीव चौथरा होता. परंतु आता त्याचे भाग विखुरल्यामुळे आकाराचा अंदाज येत नाही. या चौथ-यास ही ओढयात जाणा-या पाय-या होत्या. लेणीची एकंदर शैलीवरून दहाव्या शतकानंतर यांची निर्मिती झाली असावी. अशा प्रकारच्या एकपाषाणी लेणी दक्षिण कोकणात (धनावडे २०१५:१५-२३) व गोव्यातदेखील आढळल्या आहेत (Mitragotri 1999:230-2).

**चिरगाव** (18° 8'17" N, 73° 7'56" E )

हे गाव म्हसळा-महाड मार्गावर पूर्वेस चार किलोमीटर अंतरावर डोंगराळ भागात आहे. गावात गावदेवी मंदिर परिसरात सुमारे ७५ सेंटीमीटर उंच आणि ३० सेंटीमीटर रुंद चौकोनी स्तंभाच्या आकाराचे गद्धेगळ शिल्प आढळते (छायाचित्र क्रमांक ३३). शिळेचा वरचा भाग चौकोनी सपाट असून, वरील भागात चंद्र व सूर्य, तर त्याच्या खालील भागात चौकटीत गद्धेगळ शिल्प कोरले आहे. या चौकानाखालील भाग लेखासाठी सोडलेला दिसतो. सध्या यावरील लेख झिजला असल्याचे दिसून येते. मंदिर परिसर व गावात उत्तर ऐतिहासिक मध्ययुगीन काळातील खापरे सापडतात. दोन हाताची समभंग व स्थानक अवस्थेतील ३० सेंटीमीटर उंचीचीपुरुष प्रतिमा आहे. शिल्पशैलीवरून शिल्पाचा काळ सतरावे शतक असावा. गावदेवी मंदिराच्या पश्चिमेस सुमारे २५ मीटर अंतरावर गावाकडे जाणाऱ्या

मार्गालगत,कातळात कोरीव जांभ्या खडकातील चौकोनी टाकी आहे. मंदिराच्या दक्षिणेस गजलक्ष्मी शिल्प आहे. हा भाग डोंगराळ व टेकड्यांच्या असून येथे भातशेती फार कमी प्रमाणात होते. परिसरात ऐन, किंजळ, आंबा व असाना सारखे वृक्ष आहेत. या शिल्पावशेषावरून या ठिकाणी दहाव्या शतकापासून ते आजपर्यंत वसाहत झाली असावी.

**केल्टे** (18° 5'17" N, 73° 6'9" E )

केल्टे हे गाव म्हसळयाच्या दक्षिणेस सहा किलोमीटरवर वसलेले आहे. या गावाच्या सभोवताली डोंगर रांगा असून, त्यांचा उतार दक्षिणेकडे आहे. गावामधून बारमाही वाहणारा नैसर्गिक पाण्याचा ओढा आहे. गावाच्या मधून वाहणा-या या नैसर्गिक ओढयावर येथे नारळ पोफळीच्या बागा फुलल्या आहेत. हा ओढा पुढे सावित्री नदीस जावून मिळतो. गावाच्या आग्नेय दिशेस वन खात्याच्या ताब्यात असलेल्या जमिनीत रहाटीचा सपाट, चांभारपाडा व महारपाडा या भागात काळया पाषाणात कोरलेली शिल्पे विखुरलेली आढळतात. गावदेवव शिवमंदिरच्या ठिकाणी जांभ्या दगडातील चौथ-यांचे अवशेष आहेत. त्यावर झाडे-झुडपे उगवली आहेत. शिवमंदिरात एक दगडी नंदी, तर मंदिराबाहेर शीर तुटलेल्या भग्न नंदीची मूर्ती, गजलक्ष्मीचे शिल्प, एका आयताकृतीशिळेवर शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती करुन त्यावर मंगलकलश कोरला आहे. त्याखाली चंद्र वसूर्य कोरले आहेत. तसेच ७० सेंटीमीटर लांबीच्या आयताकृतीदगडांवर गायवासरू शिल्प कोरलेल आहे (छायाचित्र क्रमांक ३४). या कलशाच्या मध्यभागी एक फीत बांधलेली कोरली आहे. फितीच्या गाठी कलशाच्या दोन्ही बाजूस सोडलेल्या आहेत. ग्रामदेवत मंदिराच्या आवारात एक सतीशिळा, एक वीरगळ व गणेश प्रतिमा आढळून येते. याशिवाय जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेले राहत्या घरांचे विखुरलेले अवशेष आढळून येतात. सुमारे २-३ मीटर रुंदीचा जांभ्या दगडात बनवलेला फरसबंदी मार्ग देखील काही ठिकाणी आढळून येतो. या सर्व भागावर वन खात्याचा ताबा आहे. गावाच्या रहाटीत फिरताना लाल, काळ्या रंगाच्या खापरांचे अवशेष मोठया प्रमाणात सापडतात. या ठिकाणी असलेल्या शिल्पांवरून येथे दहाव्या शतकापासून वसाहती झाल्या असाव्यात. या गावाचा उल्लेख शिलाहार नृपती मुंम्मुणीराजाच्या सन १०४९ मधील ताम्रपटात आला आहे. त्यात गावाचा उल्लेख 'किईच्छीत' असा आला आहे (मिराशी १९७४: ११७).

**नेवरुळ** (18° 6'27" N, 73° 6'5" E )

म्हसळाहून नैॠत्येस चार किलोमीटर अंतरावर हे गाव उर्धुली नावाच्या नदीच्या दोन्ही काठावर वसले आहे. नेवरुळ गावाच्या रहाटीत काळभैरी मंदिरात झीज झालेली शिल्पे टिकून

राहिली आहेत. भैरवाची मुख्य मूर्ती त्रिभंग, स्थानक व चार हातांची आहे. हे शिल्प ४५ सेंटीमीटर उंच आणि २० सेंटीमीटर रूंद आहे. या शिवाय चार हातांच्या समभंग, स्थानक अवस्थेतील देवतेची प्रतिमा आहे. या देवतेने उत्तर चालुक्य शैलीचा करंडक मुकुट परिधान केला आहे. खालच्या हातात दुधारी खड्ग ओळखता येते. याशिवाय मंदिरात एक आणि मंदिराबाहेर पाच पद्मासनातील व नमस्कार मुद्रेतील जोडप्यांची व काही पुरुष शिल्पे आढळून येतात. ही शिल्पे शैलीवरून चौदाव्या शतकातील असावीत. या परिसरात महारपाडा भागात काळ्या अथवा करडया रंगाची खापरे आढळली आहेत. गावाच्या वर जांभूळ गावाच्या सीमेवरील टेकडीवर पांडवकालीन दगड रचले आहेत असे गावकरी सांगतात. या गावाचा उल्लेख शिलाहार नृपती मुंम्मुणीराजाच्या सन १०४९ च्या ताम्रपटात आला आहे. गावाचे नाव यात 'निम्वाग्राम' असा आला आहे (मिराशी १९७४: ११७). या ताम्रपटातील गावाच्या नावाची ओळख प्रस्तुत नेवरूळ या गावाशी करण्यात आली आहे. याच उच्चार निम्बाग्राम असा करावा अशी तळटीप दिलेली आहे

**घुम** (18° 5'12" N, 73° 7'14" E )

म्हसळयापासून दक्षिणेस पाच किलोमीटर अंतरावर घुम हे गाव आहे. गावाच्या पश्चिमेस देवरहाट आहे. या बारमाही पाणी असणाऱ्या पाणथळ जागी घुमेश्वर हे शिवाचे नुकतेच जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. कायमस्वरुपी नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत असलेल्या या ठिकाणी जांभ्या कातळात खोदलेली एक मीटर लांब ९० सेंटीमीटर रुंद आणि १.२० मीटर उंच असलेली लेणी आहे. हे म्हणजे अखंड कातळात खोदलेले छोटेसे मंदिरच आहे. छत सपाट आहे. शिखराचा भाग ओबडधोबड असला तरी बराचसा भाग त्रिकोणाकृती केल्यासारखा वाटतो. या गर्भगृहात बेसाल्ट दगडातील उमामहेश्वराची काहीशी झिजलेली मूर्ती आहे. ही मूर्ती आसनस्थ असून शिव सव्य ललितासनात असून उमा त्याच्या डाव्या मांडीवर वाम ललितासनात आहे. शिव चतुर्भुज असून, उमा द्विभुज आहे. शिवाच्या खालच्या उजव्या हातात बिजपुरक असून वरच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे. डाव्या वरच्या हाताने नाग धरला असून, खालच्या डाव्या हाताने उमेस आलिंगन दिले आहे. उमेने आपल्या उजव्या हाताने शिवास अलिंगन दिले असून डाव्या हातात आहे. दोघांच्याही मस्तकावर मुकुट आहेत. कानात कर्ण कुंडले आहेत. दोघ्यांच्याही मस्तकात प्रभमंडल आहे. पायात तोडे, नुपूर आहेत. इतरही आभूषणे असावीत पण झीज झाल्याने समजून येत नाही. उमा महेश्वर सिंहासनावर बसले आहेत. आसनाच्या खाली शिवाच्या उजव्या बाजूस गणेश आपल्या मुषक या वाहनासोबत तसेच कार्तिकेयही आपल्या मयूर वहानासोबत पार्वतीच्या डाव्या पायाजवळ दाखविला आहे.

आसनाच्या मधल्या भागात शिवाचे वाहन नंदी आणि त्याचे वेसण पकडलेला एक शिवगण दाखविला आहे. ही मूर्ती शिलाहार काळातील असावी. शिलाहारकालीन मूर्ती ठेवण्यासाठी खाच असलेले पीठही येथे आढळून येते.

**पानवे** (18° 3'35” N, 73° 7'2” E )

म्हसळयाच्या दक्षिण दिशेस म्हसळा डोंगर उतारावरील गावाच्या रहाटीत काही शिल्पे आहेत. परंतु जंगल दाट असल्याने तिथे जाता आले नाही. गावाच्या रहाटीत क्षेत्रपाल या स्थानिक देवतेच्या ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण शिवलिंग आढळून येते. योनीपीठ सामान्य असून, लिंगभाग चरइची रहाटी या ठिकाणी आढळलेल्या लिंगासारखाच कळसाकार आहे. शैलीवरून ही शिल्पे तेराव्या अथवा चौदाव्या शतकातील असावीत. या परिसरात काळ्या व लाल रंगाच्या खापरांचे अवशेष आढळतात.

**जांभूळ** (18° 6'18” N, 73° 4'45” E )

जांभूळ हे गाव म्हसळयाच्या पश्चिमेस सहा किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. या गावाच्या मंदिर परिसरात या ठिकाणचे पुरावशेष आहेत. यात चार झिजलेली शिल्पे आहेत. ही सर्व स्थानक, समभंग चार हातांची आहेत. यातील काळभैरीची मूर्ती शिल्पशैलीवरून अठराव्या शतकातील असावी.

**खामगाव** (18° 6'45” N, 73° 14'28” E )

म्हसळा-खामगाव-गोरेगाव या मार्गावरील खामगांव हे एक महत्त्वाचे गाव आहे. गोरेगावकडून येणारा घाट चढून आल्यावर लागणारे पहिलेच गाव म्हणजे खामगाव होय. सतराव्या शतकात या गावाशेजारील डोंगरावर एका खांबावर दिवा पेटवून इशारत दिली जायची असे मानले जाते, म्हणून या गावाचे नाव खामगावं पडले असे लोक सांगतात. गावातील पुरावशेष खामगाव देवरहाटीत व गावाजवळील टेकडीवर आहेत. खामगावच्या रहाटीतील गावदेवाच्या मंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला आहे. गंमतीची बाब म्हणजे लोकांनी, तेथे असलेल्या शिल्पांची नक्कल करून नव्या मूर्ती घडविल्या आहेत. यात एक वीरगळ, गणेश प्रतिमा व दोन हाताची स्थानक मूर्ती आहे. भग्न मूर्तीचे हरिहरेश्वरला विसर्जन करण्यात आले. काळभैरी, जोगेश्वरी, पदमावती, कालिका या देवतांची चार शिल्पे ही नव्याने घडविली आहेत. या नकलेमुळे मूळ शिल्पे मराठा काळातील असावीत असे म्हणता येते. सुदैवाने मंदिरासमोरील एका छोटया चौथ-यावर एका टप्यात दाखविलेला एक वीरगळ पहायला

मिळतो. जेमतेम ३० सेंटीमीटर उंच व ४० सेंटीमीटर रूंद शिळेवर भाल्याने युध्द करणारा वीर दाखवला आहे. मंदिराबाहेर विहीर असून त्या भोवतालचा कठडा जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधीव तंत्राने बांधलेला दिसतो. गावातील बौध्दवाडी परिसराजवळ 'चक्रान' म्हणून दैवीस्थान आहे. गावातील गुरे आजारी असल्यास या ठिकाणी नवस केले जातात. येथे वन्य झाडी खुप वाढली असून, एका झाडाच्या बुंध्यात सुमारे ३० ते ४० सेंटीमीटर उंच अशी पाच शिल्पे आहेत. यातील तीन शिल्पे एकाच टप्प्यातील वीरगळ आहेत. वीरगळांचे शिरोभाग त्रिकोणाकृती असून, फक्त एका वीरगळावर मंगलकलश कोरला आहे. हातात दुधारी खड्ग आणि ढाल घेतलेले एकेरी वीर तीनही वीरगळांवर दाखविले आहेत. याशिवाय स्थानक, समभंग अवस्थेतील दोन हातांच्या पाच पुरुषांचे शिल्प देखील आढळून येते.

याशिवाय गावाच्या टेकडीवर 'गौरी-शंकराचे' मंदिर आहे. या मंदिर परिसरातच शिवकाळात खांब असल्याचे लोक सांगतात. या ठिकाणी एक वीर असलेला वीरगळ, नंदीचे भग्न शिल्प, दोन भग्न गोलाकार योनीपीठ आहेत. नंदीच्या पुढील भागात त्याच्या नाकातील वेसण धरून, त्यास नेणारा शिवगणही दाखविला आहे. याशिवाय एका शिळेवर उजव्या हातात दंड धरणाऱ्या आणि डाव्या हातात गोलाकार वस्तू धारण करणाऱ्या अशा दोन हाताच्या स्त्रीदेवतेचे शिल्प आहे. तिने गोलाकार कुंडले घातली आहेत. मंदिरातील शिवलिंग हे स्थानिकांच्या मते 'हरगौरी' किंवा मल्लिकार्जुन प्रकारचे शिवलिंग असावे.

**लेप** (18° 7'40" N, 73° 12'56" E )

लेप हे म्हसळयाच्या पूर्वेस असलेले गाव आहे. गावातील पुरावशेष गावदेवी मंदिर परिसरात आहेत. येथील वाघजाई या स्थानिक देवतेच्या मंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे. मंदिर परिसरात मराठा काळातील समाध्या आहेत. तसेच मंदिराचे बांधकाम शुष्कसांधी बांधीव पध्दतीचे असल्याचे, येथे शिल्लक असलेल्या एक मीटर लांबीचा दगडी शिळेवरून वाटते. मंदिराबाहेर समभंग, स्थानक वचार हातांच्या स्त्रीदेवतेची मूर्ती आहे. शिल्पाची उंची सुमारे ४० सेंटीमीटर, रुंदी ३० सेंटीमीटर आहे. या देवतेच्या खालच्या उजव्या भग्न हातात गोलाकार वस्तू आहे. वरच्या उजव्या हातात दुधारी खड्ग, तर डाव्या वरच्या हातात खेटक आहे. या देवतेचे वाहन वाघ दाखविला आहे. मूर्ती झिजलेली आहे. मंदिर परिसरात करडया अथवा काळया रंगाची खापरे आढळून येतात.

**कृष्णनगर** (18° 6'21" N, 73° 15'33" E )

म्हसळ्याच्या पूर्वेस आणि खामगावच्या पुढे दोन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. हे नव्यानेच निर्माण झालेले गाव आहे. येथे राधाकृष्णाचे मंदिर असून राधा-कृष्णाची पांढ्या

संगमरवराची मूर्ती स्थापना नव्यानेच बांधलेल्या मंदिरात आढळते. या ठिकाणी कोणत्याहि प्रकारचे पुरावशेष आढळून येत नाहीत.

**सोनघर** (18° 7'4” N, 73° 14'38” E )

म्हसळ्याच्या पूर्वेस १४ किलोमीटर अंतरावर आणि खामगावच्या पुढे एक किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. सोनघर हे गाव येथे असलेल्या देवरहाटीसाठी प्रसिध्द आहे. येथे पूर्वीपासूनच परंपरेने राखलेले जंगल आहे. या गावातील पुरावशेष याच भागात आढळतात. येथील ग्रामदेवतेच्या मंदिरात झालेल्या समभंग, स्थानक व चार हातांच्या दोन प्रतिमा आहेत. या मंदिरापासून पुढे जंगलात १५० मीटर अंतरावर पश्चिमेस एका बाजूकडून आत उतरण्यास पाय-या असलेली जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेली बाव म्हणजे विहीर आहे. तिचे चिरे ढासळले आहेत. येथे हिरव्या ग्रॅनाईट दगडात कोरलेले एका देवतेचे शिल्प होते. आज त्याचे अवशेष विखुरले आहेतया शिल्पाच्या मुखाचा भाग भग्न आहे व त्यावर वैशिष्ट्यपूर्ण करंडक मुकुट परिधान केला आहे. मुकुटाच्या तिन्ही बाजूस मोरपिसासारखा भाग असून त्यावर मुकुटातून कपाळावर येणाऱ्या केसांच्या बटाही नाजूकपणे दाखविल्या आहेत. कानात गोल कुंडले घातली आहेत. शिराच्या डाव्या बाजूस आयताकृती पताका ध्वज असावी, पण सध्या ती भग्न आहे. शैलीवरुन ती दहाव्या किंवा अकराव्या शतकातील असावीत. याशिवाय सोनगावच्या जुन्या स्मशानभुमीत सतरा जांभ्या दगडातील समाध्या आहेत. त्यांची शैली तेराव्या शतकातील वाटते. पादुका कोरलेले काही चौकोनी कोरीव ठोकळे ही येथे आढळले आहेत.

**वाघाव** (18° 8'1” N, 73° 14'33” E )

वाघाव हे गावाच्या रहाटीत गावदेवी मंदिराजवळ काही झीज झालेली शिल्पे आहेत. शैलीवरुन ती मराठा काळातील वाटतात.

**आडी-महाडखाडी** (18° 0'8” N, 73° 6'54” E )

म्हसळा तालुक्यात दोन आडी नावाची गावे असल्याने, म्हसळ्यापासून १४ किलोमीटर दक्षिणेस असलेल्या महाड खाडी जवळचे आडी गाव म्हणून यास आडी-महाडखाडी असे संबोधले जाते. आडी हे गाव महाड-आंबेत-हरिहरेश्वर या रस्त्यावर सावित्री नदीच्या उत्तर तीरावर डोंगर उतारावर आहे. गावाच्या दक्षिण बाजूकडून वाहत येणाऱ्या ओढयाच्या काठाने ही वस्ती नदीच्या काठापर्यंत झाली आहे. येथे आधुनिक काळात धक्का उभारलेला आहे. या

गावात रामवरदायिनी देवीच्या मंदिर परिसरात या भागातील पुरावशेष आढळतात. या मंदिराचा जीर्णोध्दार सन २००९ मध्ये झाला. या मंदिराच्या आवारात भग्न वीरगळ, सतीशिळा व शिल्पे झीज झालेल्या अवस्थेत पडून असलेली आढळून येतात. यात आयताकृती, तीन टप्यात खोदलेले आणि शीर्षभाग भग्न झालेले भग्नावस्थेतील सहा व एक चांगल्या अवस्थेतील वीरगळ आहेत. अनेक आयताकृती शिळांवर स्त्री आणि पुरुष यांची जोडपी कोरली आहेत. एकटा वीर असलेलीसात वीरगळ येथे दिसून येतात. या सर्व शिल्पांची चांगलीच झीज झालेली आहे. दोन हातांचे पदमासन असलेले एक स्त्री शिल्प आहे. योगमुद्रेतील अथवा तप करताना दाखवलेल्या या शिल्पाच्या खाली तिचे वाहन बैल दाखविला असून, देवतेच्या दोन्ही बाजूस उजवीकडे डमरू आणि डावीकडे त्रिशूळ त्यांच्या दंडासहीत दाखविला आहे. हे शिल्प माहेश्वरीचे असावे. त्रिशूळावर एक फण्याचा नागही कोरलेला आढळतो. अशाच प्रकारची मूर्ती नांदगांव शिवमंदिरात आढळून येते. या शिल्पाच्याशेजारीच चांगल्या अवस्थेतील सतीशिळा आहे. सभा मंडपात अनेक शिल्पे भिंतीकडे तोंड करून ठेवली आहेत आणि त्यांच्या पाठशिळेला टेकून दुस-या दोन मूर्ती ठेवल्या आहेत. उल्लेखनीय शिल्पामध्ये स्थानक, समभंग अवस्थेतील चार हातांची, नऊ शिरांची स्त्रीदेवता आहे.या शिल्पाची झीज झाल्याने हातातील वस्तू आणि वाहन ओळखू येत नाही. याशिवाय महिषासुरमर्दिनी प्रकारच्या दोनप्रतिमा, वाघ वाहन असलेल्या तीन आणि न ओळखता येणा-या अनेक मूर्ती तेथे आहेत. याशिवाय मंदिर जीर्णोध्दाराच्या वेळेस मूळ चौथरा जमिनीत ठेवून आताचे बांधकाम करण्यात आले आहे. या सर्व पुरावशेषांवरून येथील मूर्ती शिल्पे बाराव्या व चौदाव्या शतकातील असाव्यात. नदीच्या काठालगत व ओढ्यात पावसाळ्याच्या दिवसात वाहून आलेली लाल व काळा लेप दिलेली, लाल व काळी पातळ पोताची, आद्य ऐतिहासिक काळातील खापरे सापडतात. तसेच काळ्या व करड्या रंगाची खापरे व काचेचा लेप दिलेली हिरव्या, निळ्या रंगाची खापरेही आढळून आली. या ठिकाणी आद्य ऐतिहासिक ते आधुनिक काळापर्यंत सलग वस्ती झाल्याचे दिसते.

**कोले** (18° 0'59" N, 73° 7'19" E )

म्हसळयाच्या दक्षिणेस ११ किलोमीटर अंतरावर हे गाव समुद्रसपाटीहून १५० मीटर उंचीवर आहे. सावित्री नदीच्या उत्तरेवरील डोंगराच्या उतारावर हे गाव वसले आहे. गावातील शिवमंदिर परिसरात आणि ग्रामपंचायत कार्यालयाच्या पश्चिमेस गावदेवी मंदिर परिसरात या गावातील पुरावशेष आढळतात. शिवमंदिराजवळ मुख भग्न झालेला नंदी आहे. मंदिर परिसरात

शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या मंदिरासाठी वापरलेल्या जांभ्या दगडातील ताशीव शिळा आढळतात. काही कोरीव समाध्याही येथे आहेत. गावदेवी मंदिर परिसरात मराठा काळातील शिल्पांचे अवशेष आहेत. येथे असलेली, फक्त शंख धारण करणारा एक हात आणि छातीचा काही भाग असलेली मूर्ती बहुधा विष्णू असावी. एकच बाजू कोरलेले आणि आयताकृती असलेले शीर्ष त्रिकोणाकृती, चार टप्यातील असे दोन वीरगळ , तीनटप्पे असलेले दोन असे चार वीरगळ आहेत. दोन वीरगळांवरील वीर घोडयावरील शत्रूशी युध्द करताना दिसतो. याशिवाय नमस्कार मुद्रेतील, पदमासनातील स्त्रीआणि पुरुष शिल्पांकित केलेल्या दोन पूर्णावस्थेतील तर तीन भग्न आयताकृती शिल्पे आहेत. मंदिरातही सुमारे ५० सेंटीमीटर उंचीची आणि ३० सेंटीमीटर रुंदीची भग्न, झीज झालेली चार शिल्पे आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील वाटतात. यातील उजव्या हातात दंड धारण करणारी, दोन हाताच्या स्त्रीदेवतेचे शिल्प आढळते. तिच्या उजव्या हातात माशासारखा आकार आहे.

**कोंझरी** (18° 2'50” N, 73° 8'16” E )

कोंझरी गावाचेग्रामदेवता कर्जाईदेवी व भैरव मंदिराच्या परिसरात या ठिकाणचे पुरावशेष आहेत. गावाच्या रहाटीत भैरीचे मंदिर असून तेथेही काही शिल्पे आहेत. उत्तरेकडून वाहत येणाऱ्या एका ओढ्याच्या पश्चिम काठावर कर्जाई देवीचे कौलारू मंदिर असून मंदिरातील देवता चार हाताची, स्थानक, समभंग अवस्थेतील आहे. शैलीवरुन ही अठराव्या शतकातील शिल्प वाटते. भैरवनाथाच्या रहाटीतील मंदिरास दाट जंगलामुळे भेट देता आली नाही. गावकऱ्यांच्या वर्णनानुसार मूर्ती अठराव्या शतकात जीर्णोध्दाराच्या काळात बनविल्या असाव्यात. कर्जाईदेवी मंदिर परिसरात लाल रंगाचीव काळी रंगाची मध्यायुगातील खापरे सापडतात. गावातील ठाकरोली गावाकडे पायी जाणाऱ्या मार्गावर जखणीची गाणी या ठिकाणी गायवासरू शिल्प आढळते याला लोक वनगाय असे म्हणतात. शैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील वाटते.

**तळवडे** (18° 1'41” N, 73° 8'15” E )

म्हसळयाच्या दक्षिणेस १२ किलोमीटरअंतरावरील आणि महाड-आंबेत-हरिहरेश्वर मार्गावरील हे गाव आहे. या गावातील पुरावशेष गावाचे ग्रामदैवत खामदेश्वर येथे आढळून येतात. भग्न वीरगळाचे तीन तुकडे आहेत.एका ५० सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद शिळेवर, हातात ढाल व खड्ग धारण केलेला पायदळातील फक्त एकटा वीर दाखविलेला दिसतो.

शिल्पशैलीवरून हे शिल्प चौदाव्या किंवा पंधराव्या शतकातील वाटते. मंदिरात खामदेश्वराची मूर्ती आहे. हे शिल्प पुढील दोन्ही पाय उचलेल्या घोडयावर स्वार झालेल्या दोन हातांच्या देवतेचे आहे. ही मूर्ती म्हणजे कदाचित वीरगळ असावा. उजव्या हातात वक्राकृती तलवार व डाव्या हातात लगाम असलेया या मूर्तीच्या शैलीवरून ही मूर्ती मराठा काळातील असावी.

**कुंभळे** (18° 2'18" N, 73° 8'35" E )

हे गांव उत्तरेकडून वाहत येणाऱ्या ओढ्याच्या पूर्व काठावर आणि सावित्री नदीस मिळणा-या एका ओढयाच्या उत्तर काठावर म्हसळ्याच्या आग्नेयेस ११ किलोमीटर अंतरावर आहे. गावात कुंभळजाईचे जीर्णोध्दारीत मंदिर आहे. मूळ चौथऱ्याच्या ठिकाणी रचलेले घडीव दगडशुष्कसांधी पद्धतीचे आहेत. कुंभळजाईची चार हात, समभंग, स्थानक ववाहन नसलेली मूर्ती आहे. शैलीवरून आधुनिक काळातील वाटते. हातात कोणतेही लांछने नाहीत. मूर्तीशास्त्राचे सर्व संकेत धुडकावून केलेल्या या मूर्ती आहेत.

**गोंडघर** (18° 11'57" N, 73° 0'45" E )

गोंडघर हे म्हसाळ्याच्या वायव्येस १२ किलोमीटर अंतरावर म्हसळा-खरसई-दिघी रस्त्यावर एका मोठया तळयाभोवती वसले आहे. तळयाशेजारी शिवमंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला असून एका भग्न शिल्पाशिवाय कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष नाहीत. हे भग्न शिल्प म्हणजे ५३ सेंटीमीटर लांब आणि ४० सेंटीमीटर रुंद असे महिषासुरमर्दिनी प्रकारचे शिल्प आहे. यात देवीचा कमरेपासूनचा भाग आहे हे शिल्प गावकऱ्यांनी सध्या एका चौथऱ्यावर ठेवले आहे. या शिवाय गावदेवी मंदिरामागे शेतात गजलक्ष्मीचे एक भग्न शिल्पही आढळून येते. यामध्ये हत्तीचा डावीकडचा भाग आणि लक्ष्मीचा काही भाग दिसून येतो. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावीत.

**खरसई** (18° 10'38" N, 73° 3'28" E )

म्हसळयाहून पाच किलोमीटर वायव्येस म्हसळा-दिघी रोडवर खाडीलगत राजपुरी खाडीचा एक फाटा म्हसळयाकडे येतो. या उपखाडीच्या दक्षिण तीरावर हे छोटेसे गाव सध्या आहे. पूर्वी हे गाव खरसई धरणाच्या क्षेत्रात होते. आता गाव विस्थापित झाले आहे. गावातील सोमजाई मंदिराचा पूर्णपणे जीर्णोध्दार झाला आहे. मंदिराबाहेर शेंदूर लावलेली सुमारे ३० सेंटीमीटर उंचीची पाच शिल्पे आहेत. यात तीन छोटे वीरगळ आहेत. यात ढाल आणि तलवार घेतलेला एकटा वीर आहे. एक शिल्प पद्मासनात बसलेल्या पुरुषाचे आहे. शेंदूर लावल्याने ओळख

पटत नाही. शिल्पशैलीवरुन ही शिल्पे तेराव्या व चौदाव्या शतकातील असावीत. गावाच्या पश्चिमेस दिघी रोडवर मेंदडी गावानजिक पश्चिमेस जमीन पातळीवर एक कातळात कोरीव पाण्याचे खांब टाके आहे. यास स्थानास लोक टाकेकरीन 'सातआसरा' म्हणून पुजतात. येथे हिरव्या बांगडया आणि हिरवे खण वाहिले जातात. प्रवास करताना ठिकाणी नारळ, सुपारी वाहिले जाते. कायम पाणी असलेल्या या टाक्याची अंतर्गत लांबी चार मीटर व रुंदी पाच मीटर व खोली दोन मीटर असावी. टाक्यात पूर्व बाजूस एक चौकोनी आकाराचा खांबही कोरलेला आहे. टाकीच्या एका बाजूस पाणी काढण्यासाठी आयताकृती अथवा चौरसाकृती मुखभाग असावा. आज हा भाग पूर्णपणे पडून गेला आहे. या टाक्याचे स्वरुप दहाव्या शतकातील आढळणा-या पाण्याचा टाक्याशी मिळते जुळते आहे. कातळ टाक्यांना खांब कोरणे हे प्रयोजन कातळात कोरीव टाक्यांचे छत पाण्यात तुटून पडू नये, या भितीतून निर्माण झाले आहे. आजही खांब असलेला छताचा भाग शिल्लक आहे. या टाक्यालगत खाडीभाग आहे. येथे काचेचा लेप दिलेली, चिनीमातीची खापरे मिळाली.

गावाच्या खाडी किना-यालगत एक भैरीदेवीचे स्थान असून, रचलेल्या लहान मोठया सुटया दगडांचा सुमारे १५ ते २० मीटर लांब लंबगोलाकार आकाराचा चौथरा खाडीकिनाऱ्याला काटकोनात खाडीत गेला आहे. येथे कोणतेही मूर्तीशिल्प नाही. यातील एका घडीव दगडालाच शेंदूर लावून पूजा करतात. या ठिकाणी आता गळ साठला असून खाडी भरली आहे. हे दगडी अवशेष पूर्वी कधीतरी येथे असलेल्या बंदराच्या धक्याचे अवशेष असावेत.

**मेंदडी कोंड** (18° 10'58" N, 73° 2'39" E )

मेंदडी गावातगावदेवधावीर व बापदेवाचे मंदिर आहे. येथे भावाई नावचे ठिकाण आहे, काळकाई म्हणून या ठिकाणी गजलक्ष्मी चे शेंदूर लावलेले शिल्प आहे. हे शिल्प एकंदर शैलीवरून अकराव्या किंवा बाराव्या शतकाचा काळ दर्शविते.

**खारगाव बुद्रुक** (18° 8'8" N, 73° 6'1" E )

म्हसळयाच्या उत्तरेस म्हसळा-कुडा-तळा रस्त्यावर पाच किलोमीटर अंतरावर खारगाव बुद्रुक हे म्हसळा खाडीलगत हे गाव आहे. गावातील वाघदेव आणि गावदेवी जाखमाता शिवमंदिर परिसरात या ठिकाणचे पुरावशेष पहायला मिळतात. गावाच्या पश्चिमेकडील शेतात जीर्णोध्दार झालेले वाघेश्वर नावाचे शिवमंदिर आहे. याचे मूळस्थान पूर्वी जंगलात असल्याचे सांगितले जाते. आताच्या मंदिराजवळ मूळ मंदिराचे जांभ्या दगडात कोरीव काम केलेले सुटे

अवशेष आहेत. एकाच जांभ्या दगडातील कळसाचा भाग कोरला आहे. एखाद्या जांभ्या दगडात गुहेसारखे कोरलेले हे मंदिर लेणी सारखे असावे, कालांतराने त्याचे उध्वस्त अवशेष फार पूर्वी कधीतरी गावक-यांनी सध्याच्या ठिकाणी आणले असावेत. या सारख्या गुहा अथवा लेणी भेकराचा कोंड (म्हसळा), चांदोरे (माणगांव), घुम (म्हसळा) या ठिकाणी देखील आढळल्या आहेत. गावाच्या दक्षिणेस जाखमातेचे मंदिर असून या ठिकाणी मंदिराबाहेर सुमारे १५ ते २० सेंटीमीटर उंचीची सुटी शिल्पे आहेत. यातील सर्व शिल्पे दोन हातांची समभंग वा द्विभंग अवस्थेतील स्त्रीशिल्पे आहेत. उजव्या हातात दंडासारखे आयुध, तर डाव्या हातातील वस्तू समजत नाही. ही शिल्पे नवसपुर्तीची असावीत. शिल्प शैलीवरून या चौदाव्या शतकातील वाटतात. याशिवाय या गावातील खाडीलगत म्हसोबा नावाचे स्थान आहे. हे स्थान म्हणजे मोठमोठया विखुरलेल्या आकाराच्या शिळांची एक ओळ समुद्रात गेलेली आहे. या ठिकाणास शेंदूर लावून देव म्हणून पुजले जाते. याच्या रचनेवरून कदाचित ही येथील पूर्वीचा बंदराचा धक्का असावा.

**सुरई** (18° 8'20” N, 73° 6'41” E )

म्हसळयाच्या उत्तरेस जेमतेम एक किलोमीटर अंतरावर देवघरकडून वाहत येऊन, झांसी नदीच्या उत्तरेस हे गाव असून सुरई येथील कुणबीवाडी भागात राधाकृष्ण मंदिराची स्थापना झाली आहे. या ठिकाणी शेतात गायवासरू शिल्पाचा एक भग्न तुकडा आढळून येतो. चंद्र सूर्य नसलेल्या शिळेचे माप ३० सेंटीमीटर उंच व ३५ सेंटीमीटर रूंद आहे.

**सावर** (18° 7'54” N, 73° 7'38” E )

म्हसळयाच्या पूर्वेस दोन किलोमीटरवर गावाच्या दक्षिणेकडील भागातून वाहत येणा-या मोठया ओढयाच्या पश्चिम तीरावर हे गाव आहे. गावाच्या दक्षिण बाजूस गावाबाहेर शिवमंदिराचे अवशेष आहेत. हे अवशेष बेसाल्ट खडक प्रकारातील आहेत. यावरुन येथे शुष्कसांधी बांधीव मंदिर होते असे दिसते. या ठिकाणी दाट झाडी असून त्याखाली अवशेष झाकले गेले आहेत. यामध्ये भग्न नंदी, एका बाजूस पाण्याचा निचरा होणारी पन्हळ व गोलाकार असलेले भग्न योनीपीठ, शिवलिंग, सुमारे दीड मीटर लांबीचा उंब-याचा भग्नावशेष, शिलाहार शैलीचा त्रिकोणी भाग असलेला स्तंभाचा तळखडा, दाराच्या चौकटीचा तुळईचा भाग, सुमारे एक मीटर लांबीचे आयताकृती कोरीव दगड अस्ताव्यस्त पसरले आहेत. याठिकाणी लाल, करडया रंगाच्या मृदभांड खापरे व एक सेंटीमीटर जाड व पसरट असलेल्या चौकोनी

कौलांचे तुकडे आढळून येतात. हे अवशेष शिल्पशैलीनुसार बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावेत (छायाचित्र क्रमांक ३८).

**म्हसळा** (18° 8'0” N, 73° 6'40” E )

म्हसळा हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून, हे राजपुरी उर्फ तलकट खाडीच्या आग्नेय फाटयावर वसले आहे. या ठिकाणी अनेक प्रवाह व उपप्रवाहांनी बनविलेले झांसी अथवा जांसी नदीचे पात्र म्हसळयाजवळ खाडीत प्रवेश करते. पूर्वी हे व्यापारी केंद्र होते. सातवाहन काळात हे एक महत्त्वाचे बंदर होते. टॉलेमीने (इ.स. १५०) मुसोपल्ली म्हणून ज्या बंदर स्थानाचा उल्लेख केला ते हेच असावे (रायगड गॅझेटियर १९९३: ८३६). म्हसळयाच्या पूर्वेस एककिलोमीटर या नदीच्या काठावर करकरनी देवीचे स्थान आहे. येथे वैशिष्ट्यपूर्ण पुरावशेष आहेत (छायाचित्र क्रमांक ४०).

या ठिकाणी ६५ सेंटीमीटर लांब आणि २७ सेंटीमीटर रुंद आकाराच्या सपाट शिळेवर एका बाजूस पाच मुखे कोरली आहेत. यातील पाचही मुखे झिजली आहेत. मधले मुख पुरुषाचे असावे असे दिसते, त्याच्या डोक्याचा केसांचा भाग सुटा केलेला दिसतो. यास मिशा दाढी असल्याचे शिल्लक भागावरून वाटते. सर्व व्यक्तींच्या कानात जाड गोलाकार वलये व गळयात जाड दागिना आहे. अशा प्रकारच्या शिळा महाड, माणगांव तालुक्यातही आढळून आल्या आहेत. याशिवाय येथे वीरगळाचा भग्न तुकडा आढळून आला आहे. हा एकाच बाजूस शिल्पांकित केलेला दोन टप्यातील आयताकृती वरचा भाग तुटला आहे. याशिवाय येथे गणेशाची ७० सेंटीमीटर उंच आणि ५० सेंटीमीटर रुंद अर्धपदमासनातील, चार हातांची सोंड, भग्न झालेली मूर्ती आहे. मूर्तीला लाल तैलरंग लावला आहे. या सर्व शिल्पाची शैली तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील शिल्पांसारखी आहे. या ठिकाणापासून ५० मीटर अंतरावर आमराईत जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधीव बांधकाम असलेले सुमारे १२ ते १० मीटर लांब व रुंद तसेच एक मीटर उंचीचे दोन चौथरे आहेत. यावर झाडे वाढल्याने उध्वस्त झाले आहेत. म्हसळयातील जीर्णोध्दार झालेल्या मशिदीच्या जागी महेश्वराचे शिवमंदिर होते (रायगड गॅझेटियर १९९३: ८३६). सध्या तरी तेथे काहीही अवशेष नाहीत.

म्हसळयातील लखमेश्वर आणि काळभैरव मंदिर परिसरात काही शिल्पे आहेत. यातील काळभैरव आणि लखमेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोध्दार झाला असला, तरी येथे काळया दगडात घडविलेल्या शिल्पांचे अवशेष आहेत (छायाचित्र क्रमांक ३९). यातील भैरव

आणि नागपुरुषाच्या शिल्पांचा वज्रलेप केला आहे. यातील भैरवाची मूर्ती चार हातांची, समभंग, स्थानक प्रकारची ४५ सेंटीमीटर उंचीची आहे. एकंदरीत शैलीवरुन ही अठराव्या शतकातील असावी. दोन हातांच्या आणि अर्धे शरीर मानवी आणि अर्धे नागाच्या वेटोळयांचे असलेल्या एका नागपुरुषाचे शिल्प येथे आढळले आहे. त्याला पाच फणांचा नाग आहे. याशिवाय एका अर्धवर्तुळाकृतीआकाराच्या सपाट शिळेवर मध्यभागी कीर्तिमुख व दोन्ही बाजूस कोरलेल्या लघुमंदिरात चौकटच्या आकाराचे उभे फुल कोरले आहे. याशिवाय मधल्या जागेत कमळकळया आणि त्यांचा वेलींचा नक्षी कोरली आहे. ही बहुधा एखाद्या मूर्तीची पाठशिळा असावी तिचा अर्धाभाग जमिनीत सिमेंट मध्ये गाडला गेला असल्याने या बाबत नक्की सांगता येत नाही. याशिवाय मंदिराच्या पीठाचे नक्षीदार दगड, तसेच उंब-याचा शंखावटीचा भागही याठिकाणी पडलेला आढळतो. या वरुन या ठिकाणी शुष्कसांधीबांधीव तंत्राने उभारलेले दगडी बांधणीचे मंदिर होते असे म्हणता येते. शिल्पशैलीवरुन हे अवशेष अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावेत. गावातील धावीर या ग्रामदेवतेचा जीर्णोध्दार झाला आहे. मूळ देवतेच्या शिल्पाप्रमाणे ही मूर्ती घडविली असल्याचे लोकांचे म्हणणे आहे. वाकड्या व एकधारी तलवारीमुळे मूळची मूर्ती किमान मराठा काळातील असावी असे वाटते. दाढी, मिशा, घोडयावर बसलेली अशी ही मूर्ती आहे.

**आडी ठाकूर** (18° 14'27” N, 73° 0'26” E )

म्हसळा खाडीलगत असलेले म्हसळयाच्या वायव्य दिशेस म्हसळा-कुडगाव रस्त्यावर १४ किलोमीटर अंतरावर हे आडी गाव आहे. गावाच्या बाहेर पारेश्वरी या स्थानिक गावदेवीचे दगडी बांधकाम असलेल्या देवालयाचा सन १९८६ रोजी जीर्णोध्दार झाला असून, या ठिकाणी गावातील शिल्पावशेष आढळून येतात. मंदिरात तीन शिल्पे आहेत. ही सुमारे ६० सेंटीमीटर उंचीच्या, चार हातांच्या व समभंग अवस्थेतील स्थानक मूर्ती असून तीनही मूर्तीच्या हातातील आयुधांचा कसलाही विवेक ठेवलेला नाही. तिन्ही मूर्तीचे वाहन बैलासारखा प्राणी असावा. एकूण शिल्पशैलीवरून या मूर्ती अठराव्या शतकात घडविल्या असाव्यात.

**वारळ** (18° 12'25” N, 73° 2'57” E )

म्हसळयाच्या वायव्येस नऊ किलोमीटर अंतरावर खाडीलगत हे गावा आहे. गावातील गावदैवत भैरव काळचा जीर्णोध्दार झाला असून सिमेंटमध्ये मंदिर बांधले आहे. गावाच्या

मागील टेकडीत स्वयंभू दत्तमंदिराचे स्थान आहे. येथील गावक-यांच्या म्हणण्याप्रमाणे हे स्थान पांडवकालीन असून येथील गुहेत दत्ताचे स्थान होते.

**तुरुंबाडी** (18° 14'19” N, 73° 1'17” E )

तुरुंबाडी गाव म्हसळयाच्या आग्नेयेस १४ किलोमीटर अंतरावर खाडी किना-यावर वसले आहे. गावातील ढालकाठीचा चौथरावर आहे. चौथ-याजवळच दगडी दीपवत अथवा दीपमाळेचा शिल्लक अवशेषांपैकी एक सुटा दगड राहिलेला आहे. गावातील खाडीलगत जुनी स्मशानभूमी आहे.येथेच बापदेव या देवस्थानाजवळ काही शिल्पावशेष आहेत. झीजझालेली भग्नावस्थेतील १० सेंटीमीटरपासून ते ३० सेंटीमीटरपर्यंत लहानमोठी असलेली अनेक शिल्पे येथे एका झाडाच्या बुंध्याशी रचून ठेवलेली आहेत. यातील उजव्या हातात दंड आणि डाव्या हातात शंखासारखी वस्तू धारण करणा-या दोन हातांची,कडेवर छोटे मूल घेतलेली त्रिभंग प्रतिमा अशी उल्लेखनीय शिल्पे आहेत. या शिल्पांच्या शैलीवरून हे शिल्पावशेष चौदाव्या ते सतराव्या शतकातील असावेत.

**रोहीणी** (18° 14'9” N, 73° 0'49” E )

म्हसळ्याच्या १२ किलोमीटर वायव्येस असलेले हे गाव महाभारतातील रोहीणी देवीचे माहेर असल्याचे सांगितले जाते. गावात सध्या आधुनिक काळातील गणेश प्रतिमा असलेले मंदिर व हनुमान मंदिर आहेत. गावात प्राथमिक शाळेच्या परिसरात शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या बांधकामातील दोन शिळा पडल्या आहेत.

**आगरवाडा** (18° 9'4” N, 73° 4'46” E )

आगरवाडा गावातील गावदेवी मंदिराजवळ आणि मंदिराम मध्ययुगीन कालखंडातील पुरावशेष देवतांच्या मूर्तीच्या रुपाने शिल्लक आहेत. शैलीवरून या मूर्ती मराठा काळातील वाटतात. गावातील बौध्दवाडी परिसरात गावाचे जुने स्मशान आहे. येथे शुष्कसांधी दगड वापरून केलेल्या कबरी आहेत. येथे जांभ्या दगडातील शुष्कसांधी, बांधीव दगडाचे अवशेष आहेत. याशिवाय काही काळया पाषाणातील नक्षीदार कमानी देखील आहेत. असे दगड कोंडवीचा किल्ला येथेही आढळले आहेत. हे ठिकाण आगरवाडा गावातील मुस्लीम समाजाचे जुने कब्रस्तान असावे. या गावात बेने इस्त्रायल लोकांची स्मशानभूमी असून एकोणिसाव्या शतकातील सुरुवातीच्या दशकातील लोकांचे शिलालेख असलेल्या कबरी येथे आहेत.

**पेढांबे** (18° 8'19" N, 73° 4'25" E )

पेढांबे गाव म्हसळयाच्या वायव्येसचार किलोमीटरअंतरावर डोंगर उतारावर वसले आहे. गावात हनुमान मंदिर आहे. गावामागील टेकडीवर रहाटीत वाघेश्वरी व कालकाई या स्थानिक देवतांचे मंदिर आहे. या ठिकाणी सुमारे १ मीटर उंचीच्या नैसर्गिक दगडाला कालकाई व वाघेश्वरीचे रुप मानले जाते. या मंदिरात सुमारे ५० सेंटीमीटर उंचीच्या लहानमोठया काळया पाषाणातील अनेक मूर्ती आहेत. ही शिल्पे नवसपूर्ती साठी ठेवली जात असावीत. यांच्या शैलीवरुन या मूर्ती सतराव्या ते अठराव्या शतकातील असाव्यात.

**तोंडसुरे** (18° 8'17" N, 73° 5'28" E )

तोंडसुरे गावात हनुमान मंदिराचा जीर्णोध्दार करून, नवीन हनुमान मूर्ती प्रतिष्ठापित केली आहे. याशिवाय जंगमवाडी जवळ गावदेवाचे मंदिर आहे. येथे गोलाकार शिवलिंग आणि नंदी व गणेश प्रतिमा आहे. ही शिल्पे शैलीवरून अठराव्या शतकातील असावीत.

**कणघर (18° 6'18" N, 73° 12'37" E )**

म्हसळयाच्या पूर्वेस ११ किलोमीटरअंतरावर म्हसळा-खामगाव मार्गे गोरेगांव रस्त्यालगत कणघर हे गाव आहे. गावातील ओढयाकाठी असलेल्या शिवमंदिरात खाच असलेले गोलाकार योनीपीठ आणि अखंड योनीपीठ येथे पहायला मिळते. भग्नावस्थेतील आणि झीज झालेली एक सतीशिळा येथे आढळून येते. याशिवाय गावाबाहेरील काळभैरव या स्थानिक देवतेच्या मंदिराचाही कायापालट झाला असून गावक-यांनी या मंदिरातील सर्व मूर्ती भग्न झाल्या कारणाने विसर्जन करण्यात आल्या आहेत. या ठिकाणी आता फक्त एक वीरगळाचा तुकडा आढळून येतो. या ठिकाणाहून वावे या सावित्री नदी जवळील गावाकडे जाण्याचा पायमार्ग आहे.

**लिपणी** (18° 5'19" N, 73° 12'9" E )

हे गाव म्हसळयाच्या आग्नेयेस ११ किलोमीटर अंतरावर सावित्री नदीस भेटणा-या ओढयाच्या पश्मिम बाजूस डोंगर उतारालगत वसलेले आहे. गावातील पुरावशेष गावाच्या उत्तरेकडून वाहत येत असलेल्या कोंडी नावाच्या नदीच्या पूर्वकाठावर आहेत. येथे या भागास बिदरी किंवा बेदरी असे म्हटले जाते. पांडवांनी हे मंदिर त्यांच्या अज्ञातवासाच्या काळात एका रात्रीत उभारायचे ठरविले होते. आणि मग कोंबडा आरवल्यानंतर मंदिर उभारणी त्यांनी थांबविली व ते संदेरी

व पंदेरीया गावी गेले, अशी आख्यायिका येथे सांगितली जाते. या ठिकाणी झाडी झुडपात दडलेल्या एका पश्चिमाभिमुख शिवमंदिराचा चौथरा दृष्टीस पडतो. चौथऱ्याची लांबी ६.७० मी, रुंदी ४.६० मीटर आणि उंची ७० सेंटीमीटर आहे. काही भाग जमिनीत आहे (छायाचित्र क्रमांक ३७). जमिनीवर तीन दगडाचे थर आहेत. हे काळया पाषाणातील शुष्कसांधी बांधी तंत्राने उभारलेले मंदिर होते. त्याच्याअवशेषांचा उपयोग गावक-यांनी शेतीचे बांध वापरायला केला आहे. येथे पाच वीरगळ आहेत. आयताकृतीआकाराचा आणि एकच बाजूस शिल्पांकित केलेला, तीन टप्यात दाखविलेला एक वीरगळ आहे. त्याचा शिरोभाग त्रिकोणाकृती असून त्यावर मंगलकलश कोरले आहेत. वीरगळावर चंद्र-सूर्य, वीरगळाला तळ भागात खाचेत बसविण्यासाठी खुंटा आहे. याचा अर्थ हा वीरगळ कुठल्या तरी जागी बसविला असावा. या वीरगळाची उंची १.२० मीटर, रुंदी ०.४१ मीटर आहे. यावर खालच्या भागात युध्दात खड्ग घेवून शत्रूशी लढणारा वीर दाखविला आहे. त्याच्या डोक्यावर छत्र धरलेली व्यक्ती दाखविली आहे. यावरून हा वीरगळ एखाद्या स्थानिक प्रमुख अथवा राजाला असावा. वरच्या टप्यात राजाचे स्वागत करणाऱ्या तीन स्त्रिया दाखविल्या आहेत. तीन भग्न वीरगळ हे चौकोनी खांबाच्या आकाराचे आहेत. ते एकाच वीरगळाचे भाग आहेत की तीन वेगवेगळे वीरगळ असावेत ते नक्की समजत नाही. अखंड अवस्थेतील चौकोनी खांबाच्या आकारात चारही बाजू शिल्पांकित केलेला, तीन टप्यात कोरलेला वीरगळ आहे. एका बाजूस घोडयावर स्वार होवून लढणारा वीर भालाधारी व्यक्तीशी लढताना दिसतो. चौकटीत एकूण पाच व्यक्ती दाखविल्या असून एका भग्न वीरगळाच्या तुकडयावर एका व्यक्तीच्या डोक्यावर छत्र दाखविले आहे. याशिवाय येथे एक नंदी शिल्प सापडले आहे.नंदीचे मुख, पाय पूर्णपणे भग्न आहेत. मात्र त्याचे कोरीव काम सुरेख आहे. गळयात तीन सरींची गळसरी, आणि पाठीवर वाशिंडाला वळसा घालणारी एक माळा, मागच्या भागातून गळयाकडे आलेली घुंगरांची किंवा गोंडयाची माळ आहे. दोन नक्षीदार खाच असलेले पीठाचे अवशेषही मिळले आहेत. गोलाकार पन्हळयुक्त लिंग ठेवण्यासाठी असलेले भग्न योनीपीठ गर्भगृहात आहे.

या मंदिराजवळून वाहणाऱ्या कोंडी नदीपात्रात एक चर खणला असून त्याचा आकारावरून येथे पाणी अडवले जात असावे असे वाटते. कोंडी नदी सावित्री नदीला ज्या भागात भेटते तेथे ‘डुमसुरा’ नावाचा उंच टेकडीसारखा भूभाग नदीपात्रात गेला असून येथे अनेक अनियमित आकाराचे दगड या ठिकाणी रचले आहेत. यास लोक सातीआसरा म्हणून पुजतात. हे अवशेष कदाचित म्हणजे बंदराचा धक्का असावा. गावात आढळणाऱ्या या

पुरावशेषावरून वावे गाव उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात एक महत्त्वाचे बंदर असावे, येथून कणघरकडे जाणारा मार्ग असावा.

**आमशेत** (18° 4'23” N, 73° 12'47” E )

महमदखनीखार हा आमशेत गावाच एक भाग आहे. सावित्री नदीच्या उत्तर काठावरील या गावात शिवमंदिराचा जीर्णोध्दार झाला असला तरी दोन वीरगळ हे पुरावशेष येथे शिल्लक आहेत. शिवलिंग, नंदीचा पाठीचा भाग शिल्लक आहेत. वीरगळांचा स्वरुपावरून ते चौदाव्या शतकातील वाटतात.

**मरीयमखार** (18° 4'54” N, 73° 12'5” E )

मरीयमखार हे गाव वावे गावाचाच एक भाग आहे. या गावाची गावदेवी कालिका मोकाशीन या स्थानिक देवतेच्या परिसरात मराठा काळातील चार हातांची दोन भग्न शिल्पे मंदिरामागे झाडाजवळ ठेवली आहेत. गावाकडून मंदिराकडे जाताना वाटेत एक मोडी लिपीतील शिलालेख आहे. या शिळेची लांबी ६० सेंटीमीटर व रुंदी ३५ सेंटीमीटर आहे. यावर आठ ओळी आहेत. लेखाची भाषा मराठी वाटते. लेख अत्यंत झीज झालेला असल्याने वाचता येत नाही. या आयताकृतीशिळेचा भाग शीर्षाकडे त्रिकोणी झालेला आहे. या गावाच्या पुढे राजबंदर नावाचे बंदर धक्का असून येथे जुन्या पध्दतीचा दर्गा आणि मराठा काळातील आयताकृती समाधी आहे.

**भापट** (18° 6'20” N, 73° 8'21” E )

भापट हे गाव चार किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून १५३ मीटर उंचीवर म्हसळयाच्या आग्नेयेस डोंगराळ भागात वसले आहे. गावाच्या पश्चिम दिशेस दक्षिणोत्तर वाहणाऱ्या ओढयाच्या पूर्व काठावर पुरावशेष आढळून येतात.या ठिकाणी एक छोटे पूर्वाभिमुख गणेश मंदिर आहे. स्थानिक लोक यास मोरया गणेश म्हणतात. या मंदिरातील गणेश मूर्ती शेंदूर लावलेली आहे. गणेश मूर्ती व गणेश मूर्ती ठेवलेले पीठ हे शिलाहार शैलीचे आहे. या मंदिराचा चौथरा जांभ्या दगडात शुष्कसांधी बांधीव तंत्राने बांधला असून त्याची लांबी ६.२५ मीटर व रुंदी ७.८५ मीटर तर उंची ०.७० मीटर आहे. जांभ्या दगडाच्या कोरलेल्या दगडी तोडी सुमारे एकमीटर लांबीची आहेत. जोत्याचे तीन ते चार थर शिल्लक आहेत. सर्वात वरच्या थरात सर्व बाजूस सुमारे एक मीटर अंतर सोडून खालच्या दिशेस अर्ध पाकळया कोरल्या आहेत. मंदिराबाहेर शिलाहार शैलीतील एका पीठावर गजलक्ष्मीचे शिल्प ठेवले आहे. पीठावर

खुर, कुंभ, कर्णिका तसेच समोरील भागात शिलाहार शैलीचा त्रिकोणाकृती घटक दाखविला आहे (छायाचित्र क्रमांक ४१). त्यावर एक बारीक रेषाकृती नक्षी आहे. वरच्या पट्टीतील कोप-यावर अर्ध वर्तुळाकृती घटकाच्या प्रतिकृती दाखविल्या आहेत. हे पीठ म्हणजे गणेश मंदिराच्या जोत्याची लघुआकृती आहे. या जांभ्या दगडी जोत्याजवळ जांभ्या दगडातील खोदीव पाण्याचा पाट काढला आहे. जंगलात मानाई देवी मंदिराजवळ दोन झीज झालेली मराठा काळातील शिल्पे आहेत. तसेच जंगलातील एके ठिकाणी पांडवकालीन अवशेष असल्याचे गावक-यांनी सांगितले. मंदिराजवळील ओढ्यात झिजलेली काळ्या रंगाची खापरे आढळतात.

**कोळवट** (18° 6'16” N, 73° 9'13” E )

कोळवट गाव म्हसळयाच्या आग्नेयेस डोंगराळ भागात चार किलोमीटर अंतरावर वसले आहे.गावात सध्या कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष नाहीत. जंगलाच्या रहाटी भागात काही पांडवकालीन अवशेष असल्याचे लोक सांगतात.

**पाणदरे** (18° 5'13” N, 73° 9'28” E )

म्हसळयापासूनसात किलोमीटर अंतरावर आग्नेयेस असलेल्या या गावाच्या रहाटी भागात ओढयाच्या काठावरील शिवमंदिर परिसरात तीन चौकोनी खांबाच्या आकाराचे वीरगळ आहेत. त्यांच्या तीनही बाजू तीन ते चार टप्प्यात शिल्पांकित केल्या आहेत. त्याच्या शीर्षभागावर सुटया दगडात घडविलेले पिरॅमिडच्या आकाराचे शीर्ष आहे. याशिवाय चौकोनी आकार असलेले भग्न योनीपीठ, स्त्री आणि पुरुष जोडपे दाखविलेली सुटी शिल्पे आहेत. एकच टप्प्यात कोरलेली एक वीर पायदळी असलेली ३०सेंटीमीटर उंचीची किमान सात वीरगळ, आयताकृती व एकच बाजू कोरलेली परंतु भग्न असलेली चार वीरगळ आढळून आले. याशिवाय एक ४० सेंटीमीटर व्यास असलेले कोरीव दगडी भांडे आढळते. त्याच्या कडांवर बाहेरील बाजूस बहिवक्र पट्टी कोरली आहे.या ठिकाणी होळीच्या माळावर सुमारे एकमीटर उंच, ३० सेंटीमीटर रूंद व शीर्षभाग चौकोनी असलेली खांबाच्या आकाराची शिळा आहे. त्यावर चंद्र व सूर्य कोरले आहेत. त्याखाली सुमारे ४० सेंटीमीटर भाग सपाट केला असून, त्यावर नऊ ओळींचा देवनागरी लिपीतील लेख कोरला आहे. लेख अत्यंत झीज झालेला आहे. परंतु काही अक्षरांचे वळण लेख अकराव्या, बाराव्या शतकातील असल्याचे सुचविते. त्याखालील चौकटीत गदधेगळ शिल्प कोरले आहे. स्त्रीवर आरूढ झालेल्या गाढवाच्या गळयात पट्टा बांधलेला दिसतो. या चौकटी खाली पुन्हा 30 सेंटीमीटर. जागा मोकळी सोडली आहे. त्यावर मात्र कोणतीही अक्षरे

कोरलेली दिसत नाहीत. या प्रकारचे गदधेगळ या परिसरात अनेक ठिकाणी आढळून आले आहेत.

**रातिवणे** (18° 6'23” N, 73° 8'53” E )

रातिवणे गावातील सोनभैरी मंदिरासमोर पूर्णपणे भग्न झालेली काही शिल्पे आहेत. यात एक वीरगळाचा तुकडा आहे.

**ताम्हाणे करंबे** (18° 6'56” N, 73° 8'24” E )

ताम्हाणे-करंबे गावातील सोनभैरी मंदिरात पाच शिल्पे अत्यंत झिजलेल्या अवस्थेत आहेत. शैलीनुसार ती मराठा काळातील असावीत. येथे भग्नावस्थेतील नंदी, भैरव शिल्पाचे काही तुकडे आढळतात. यांची शैली बारावे शतक दाखविणारी आहे. हे सोनभैरी गावदेवाचे मंदिर उन्हाळयातही पाणी असणाऱ्या ठिकाणी उभारले आहे. मंदिराच्या मागील बाजूस चंद्र-सूर्य असलेला गायवासरू शिल्पासारखा दगड आहे.

**ठाकरोली** (18° 4'41” N, 73° 8'36” E )

म्हसळ्याच्या दक्षिणेस सहा किलोमीटर अंतरावर या गावातील डुंगी या टेकडीवर एका वनदेवतेचे स्थान असल्याचे मानले जाते. या ठिकाणी गावातील कोणाच्या घरी समारंभ असल्यास येथील देवतेस आधी मागणी केल्यास, दुस-या दिवशी भांडी मिळायची. मग समारंभ आटोपल्यावर ती परत करावी लागत, पण कुणा दुष्टाने भांडे लपविले त्यापासून भांडी मिळणे बंद झाले. अशी अख्यायिका येथे सांगितली जाते. गावातील गावपांढर या स्थानिक देवतेच्या मंदिरात असलेली शिल्पे त्यांच्या शैलीवरून आधुनिक काळात एकोणीसाव्या शतकात घडविलेली शिल्पे आहेत.

**निगडी** (18° 1'54” N, 73° 4'16” E )

निगडी हे गाव म्हसळयाच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावर म्हसळा खाडीवर म्हसळा-मांदाड रस्त्यावर आहे. गावात महत्त्वपूर्ण अवशेष आढळले नाहीत.

**पाभरे** (18° 9'46” N, 73° 5'57” E )

म्हसाळ्याहून पाच किलोमीटर अंतरावर उत्तरेस पाभरे गाव आहे. गावातील गावदेवाच्या मंदिरात ५० सेंटीमीटर उंचीची व ४0 सेंटीमीटर रुंदीची चार हातांची, घोडयावर स्वार झालेली

भैरवनाथाची स्थानिक देवताची दगडी मूर्ती आहे. याशिवाय स्थानक, चार हातांच्या दोन प्रतिमा आहेत. त्यांच्या शिल्पशैलीवरून त्या मराठा काळातील असाव्यात. मंदिराबाहेर शिलाहार शैलीचे त्रिकोण घटक असलेले मूर्ती बसविण्यासाठी खाच असलेले पीठ पडले आहे. याशिवाय उभ्या चौकटच्या आकारामध्ये कमळाची फुले कोरलेली दोन दगडी आयताकृती शिळा आहेत. यांच्या शिल्प वैशिष्टयानुसार त्यांच्या काळ बारावे शतक ठरतो. काही शिल्पे अठराव्या शतकातील असावीत.

**चिंचोडे** (18° 9'43" N, 73° 7'22" E )

चिंचोडे हे गाव डोंगर रांगेत म्हसळयाच्या उत्तरेस एका धरणालगत आहे. हे गाव पूर्वी धरणातील पाणलोट क्षेत्रात येत होते, आता अनेक घरे विस्थापित होवून नव्या ठिकाणी गाव वसले आहे. या गावातील पुरावशेष गावाबाहेरील काळभैरव, कर्जाईदेवी, चेरोबा या स्थानिक गावदेवी मंदिराभोवती ठेवले आहेत. या ठिकाणी मंदिरात पाच दगडी मूर्ती असून त्यांना कसलीही कलात्मकता नाही. नंदी, शिवलिंग यांच्या शिल्पशैलीवरून या मूर्ती अठराव्या किंवा नंतरच्या काळात घडविल्या असाव्यात. मंदिराबाहेरील कठडयावर भग्नावस्थेतील गजलक्ष्मीचे शिल्प आढळून आले. शिल्पाचा डावा भाग पूर्णपणे तुटला असला तरी उजवा भाग शाबूत आहे. लक्ष्मीला दोन हत्ती आपल्या मागच्या पायावर उभे राहून अभिषेक करतानाचे दृश्य आहे. देवीने आपला डावा हात मांडीवर ठेवला आहे. बहुधा उजवा ही याच स्थितीत असावा. याशिवाय पद्मासनातील नमस्कार मुद्रेतील तीन ते चार झिजलेली पुरुष शिल्पे आहेत. शैलीवरुन ही शिल्पे अकराव्या शतकापासून ते सतराव्या शतकांपर्यंतची वाटतात.

**कुडतोडी** (18° 10'51" N, 73° 8'49" E )

म्हसाळ्याच्या ईशान्येस आठ किलोमीटर डोंगराळ भागात असलेल्या या गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**गायरोने** (18° 10'17" N, 73° 7'54" E )

म्हसाळ्याच्या ईशान्येस पाच किलोमीटरअंतरावर डोंगराळ भागात असलेल्या या गावात भग्नावस्थेतील गायवासरू शिल्प आढळले. चंद्र-सूर्य असलेला व गाय असलेला भाग शिल्लक आहे. शिल्पशैलीवरून हा काळ बाराव्या शतकातील वाटतो.

**कुडगाव** (18° 4'1" N, 73° 11'22" E )

कुडगाव हे ठिकाण म्हसळयाच्या वायव्येस १० किलोमीटर अंतरावर डोंगराळ भागात समुद्रसपाटीपासून २०० मीटर उंचीवर आहे. या गावाच्या कालकाई मंदिर परिसरात या


भागातील जुने अवशेष आढळतात. येथील जुनी मूर्ती शिल्पे काढून तेथे नवीन स्थापन केले आहेत व त्यांना तैलरंगात रंगविले आहे. मंदिराबाहेर दोन भग्न वीरगळांचे अवशेष आहेत. या भागाला इथे घोडेघुमही म्हटले जाते. या शिवाय या ठिकाणा पासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरही महमदगणीखार येथे आहे त्या प्रकारचा शिलालेख आहे. त्याचे माप ४८ सेंटीमीटर उंच, ३० सेंटीमीटर रुंद आणि १३ सेंटीमीटर जाड आहे (छायाचित्र क्रमांक ३६). यावर मोडी लिपीतील आठ ओळी आहेत. याचा शीर्षभाग टोकाकडे त्रिकोणाकृती आहे. या लेखाचीही झीज झाली आहे.

**पांगळोली** (18° 4'5" N, 73° 9'54" E )

सावित्री नदीच्या उत्तर तीरावर व पाणदरे या गावातून येणाऱ्या एका मोठ्या ओढ्याच्या काठावर असलेल्या या गावाच्या पश्चिमेस दाट जंगल असून येथेच गावाची रहाटी आहे. उंच वाढलेल्या दाट जंगलापुढे येथे गूढ वातावरण बनले आहे. या ठिकाणी मुख्य मूर्ती कालिका या स्थानिक देवतेची आहे. कायम वस्त्रालंकारात असल्यामुळे या देवतेचे मूर्तीशास्त्रीय स्वरुप समजू शकले नाही. याच पध्दतीच्या दुस-या देवतेचे शिल्प मंदिरासमोरील घुमटीमध्ये ठेवले आहे. हे शिल्प चार हातांच्या आणि वाघावर बसलेल्या स्त्रीदेवतेचे आहे. एकंदर शिल्पशैलीवरुन हे शिल्प अठराव्या शतकातील असावे. पांगळोली गावावरुन मांदाटणे मार्गे देहेन येथे जाता येते.

**तोराडी** (18° 3'15" N,  73° 9'21")

म्हसळ्याच्या दक्षिणेला दहा किलोमीटर अंतरावर गाव आहे. गावातील गावदेवीचे मंदिर भूस्खलनात गाडले गेले असल्यामुळे लोकांनी नवीन मंदिर उभारले आहे. येथील अवशेष मूळ मंदिर परिसरात ठेवले आहेत. यात दोन वीरगळ, एक सतीशीळा, चार हातांच्या चार प्रतिमांपैकी दोन अत्यंत झिजल्या आहेत. एक वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराचा व चारही बाजू शिल्पांकित केलेला आहे, त्यावर तीन टप्पे खोदले आहेत. वीरगळाचा शीर्षभाग फांसनाकार शिखर प्रकारासारखा तीन स्तरात निमुळता केला आहे. एका बाजूस मधल्या टप्प्यात वीर घोडयावर स्वार होवून शत्रूशी लढताना दिसतो. खालच्या टप्प्यात तो डोक्यावर आच्छादन घेवून अर्धपदमासनात बसलेला आहे. त्याच्या दोन्ही बाजूस नारळाची किंवा केळीची झाडे लावलेली दिसतात. दुसऱ्या आयताकृती शिळेवर एकाच बाजूस शिल्पांकित केलेला वीरगळ फक्त दोन टप्प्यात कोरला आहे. खालचा टप्पा कोरायचा राहिला असावा. येथील सतीशिळा वैशिष्ट्यपूर्ण असून सती घोडयावर बसून जाताना दिसते (छायाचित्र क्रमांक ३५).




तालुका :श्रीवर्धन व म्हसळा
१:२७५०००

**संकेत सुची**

| | |
|---|---|
| किल्ला | ⌘ |
| गद्धेगळ | ▪ |
| गायपासरू | ◆ |
| तालुक्याचे ठिकाण | × |
| आद्यऐतिहासिक अवशेष | ∘ |
| पुर्वमध्ययुगीन अवशेष | ▫ |
| मध्ययुगीन अवशेष | ◇ |

Created using GADM data in QGIS. Projection : EPSG 24343.

नकाशा क्रमांक ४ श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

**देहेन** (18° 7'43” N, 73° 10'7” E )

म्हसळयाच्या पूर्वेला सात किलोमीटर अंतरावर म्हसळा गोरेगाव रस्त्यावर समुद्रसपाटीपासून १९७ मीटर उंचीवर देहेन हे डोंगर उतारावरील गाव आहे. ग्रामदैवत कालभैरव या मंदिर परिसरात पुरावशेष आढळून येतात. मंदिरात अत्यंत झीज झालेली शिल्पे आहेत. मंदिराच्या ईशान्य बाजूस जांभ्या दगडात बांधलेले तीन मोठ्या चौथऱ्याचे अवशेष आहेत. येथे काही बांधकामे होती असे दिसते. परिसरात काळ्या व करडया रंगाच्या खापरांचे अवशेष आढळतात. तसेच पंधराव्या शतकातील द्विरंगी बांगड्याचेही अवशेष सापडतात. मध्ययुगात येथे वसाहत असावी.

## ३.६ श्रीवर्धन तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत (नकाशा क्रमांक ४)

**श्रीवर्धन** (18° 2'57” N, 73° 1'1” E )

श्रीवर्धन हे तालुक्याचे मुख्य ठिकाण समुद्र किनारी असून ते सागरी पर्यटनासाठी प्रसिध्द् आहे. श्रीवर्धनच्या पश्चिमेला समुद्र व दक्षिणेला खाडी आहे. महाभारताचा नायक, तिसरा पांडव अर्जुन याने श्रीवर्धनला भेट दिली होती असे मानतात. श्रीवर्धनच्या उत्तरेला तांबडी नावाची टेकडी आहे. या ठिकाणी खडकात पांडवाच्या ढोपरांचे ठसे उमटले आहेत असे सांगितले जाते. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचे हे जन्मगाव. श्रीवर्धनचे जुने बंदर आजच्या मोहल्ला भागात भोईवाडा येथे दक्षिण टोकाला होते. या ठिकाणी दक्षिणेकडील कुरवडे गाव व श्रीवर्धन दरम्यान समुद्राचे पाणी घुसून एका मोठया तळयाच्या आकाराचा खाडीभाग बनला आहे. आतल्या बाजूस बंदर असल्यामुळे त्याला आपोआपच नैसर्गिक संरक्षण मिळत होते. जहाजांना वा नावांना पूर्ण वळसा घालून आतमध्ये यावे लागल्यामुळे समुद्रातील वादळ, लाटा यांचा धोका आतील बंदरास व जहाजांस पोहचत नसे. हा भाग आता गाळाने भरत चालला आहे. या ठिकाणी आधुनिक काळातील धक्का उभारला आहे.

सोळाव्या व सतराव्या शतकात अहमदनगरच्या निजामशाहीत व नंतर विजापूरच्या अदिलशाहीत व्यापाराच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे बंदर होते. निरनिराळया युरोपियन प्रवाशांनी श्रीवर्धनचा उल्लेख ‘झिफरदन’ म्हणून केला आहे (रायगड गॅझेटिअर १९९३: ८६७). गावात सोमजाई, कालभैरव, जीवनेश्वर, लक्ष्मीनारायण, श्रीराम मंदिर ही देवस्थाने आहेत. या शिवाय

गावात कंकाली, भद्रकाली, कात्यायनी व चामुंडायनी या चार देवता चार दिशांना असल्याचे मानले जाते.

आजच्या श्रीवर्धन शहरात अकराव्या ते तेराव्या शतकातील पुरावशेष आढळतात. यामध्ये नारायण पाखाडीतील लक्ष्मी नारायणाची म्हणून प्रसिध्द असलेली विष्णूमूर्ती आहे. करंडक मुकुट परिधान केलेली विष्णूमूर्ती समभंग अवस्थेत, चर्तुहस्ता असून आयुधे क्रमाने खालच्या उजव्या हातात पद्म, वरच्या उजव्या हातात चक्र, वरच्या डाव्या हातात शंख आहे. यावरून ही मूर्ती श्रीधराची आहे. विष्णूच्या प्रभावळीवर दशावतार कोरले आहेत. यामध्ये कृष्णावताराऐवजी हलधारी बलराम दाखविलेला दिसतो. या मंदिरातील लाकडी भालावर सन १७६४ चा मराठी भाषेतील काष्ठलेख आहे. याचे वाचन पुढीलप्रमाणे आहे.

श्री नारायण चरणिततपर

घोड जोसि श्रीवर्धनपूरनिर

तरस १ ६ ९ ६ जय नामा सवस फा।।

लगुन वा १३ मेसतरी ला ल

श्रीवर्धन मधील चौकरपाखाडी येथे श्री. संजय भगत यांच्या बागेत एका भग्न विष्णू मूर्तीचे अवशेष पाहायला मिळतात (छायाचित्र क्रमांक २५). यात अप्रतिम कोरीवकाम असलेले शीर, दशावतार दाखविलेल्या प्रभावळीचा काही भाग, भग्न पायाजवळचे वाहन गरूड, एक सेवक व लक्ष्मी असा परिवार आहे. अप्रतिम कलाकुसर असलेली ही प्रतिमा हिरव्या दगडात, बहुधा ग्रॅनाईटमध्ये घडवलेली आहे. कानात कुंडले, खांदयावर दागिने, गळयातील हार, करंडक मुकुटातील कीर्तिमुख अशी अत्यंत देखणी असलेल्या या मूर्तीचे दिवे आगरच्या रूपनारायण मूर्तीशी कमालीचे साधर्म्य आहे. या परिसरात पुष्करणी होती, पण आज तिचे अस्तित्व दिसेनासे झाले आहे.

श्री. बाळा वाणी यांच्या वाडीतील 'गायगोठण' शेतात गायवासरू शिल्प आहे. येथे कातळात कोरीव पाण्याच्या दोन टाक्या देखील आहेत. काळकाई या गावदेवी मंदिरात पेशवे काळातील घोडेस्वार देवतेची चार हातांची प्रतिमा आहे. सोमजाई मंदिरासमोरील एका चौथऱ्यात गणेशाच्या प्रतिमा ठेवल्या आहेत.

श्रीवर्धनच्या आतखोल भागात एका झाडाखाली गायवासराचे ४५ सेंटीमीटर लांब व ४० सेंटीमीटर रुंद शिल्प आहे. या भागात पावसाळ्यात व नांगरटीच्या काळात तेजस्वी लाल रंगाची आद्य ऐतिहासिक काळातील व काचेचा लेप दिलेली मध्ययुगीन काळातील खापरे आढळतात.

श्रीवर्धन येथील जीवनेश्वर मंदिरासमोर एक मोठा तलाव आहे. अगदी मंदिराला लागून जांभ्या दगडातील पायऱ्या असलेली पुष्करणी आहे. मंदिर परिसरात भग्न सतीशिळा, तसेच स्तंभ व भारवाहकाचे शिल्प आढळते. गाभाऱ्यातील शिवलिंग वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेच काळभैरव मंदिरासमोर दगडी दीपमाळ आहेत. श्रीवर्धनमध्ये दोन गद्धेगळ आढळले असून एक जीवनेश्वर मंदिराच्या आवारात भग्नावस्थेत आहे (छायाचित्र क्रमांक २६). याचे माप ५६ सेंटीमीटर लांब व ३७ सेंटीमीटर रुंद आहे. हा गद्धेगळ जीवनेश्वर तलाव साफ करताना सापडला आहे. दुसरा गद्धेगळ प्रभू आळीत जमिनीत गाडला गेला आहे. ह्याचा शिरोभाग चौकोनी असून, शिळेची खूप झीज झाली आहे. एकूण शिल्पशैलीवरून गायवासरू शिल्पे व गद्धेगळ शिल्पे एकाच कालखंडातील म्हणजे अकराव्या किंवा बाराव्या शतकातील म्हणजे शिलाहार कालखंडातील असावीत. जीवनेश्वर येथे आधुनिक काळात समुद्री वाहतुकीसाठी एक धक्का बांधलेला आहे. भौगोलिक परिस्थिती आणि उपलब्ध शिल्पावशेष, खापरांचे पुंरावे इत्यादि पुरावशेषांवरून श्रीवर्धन हे समुद्र किनाऱ्यावरील आद्य ऐतिहासिक काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत कायम वसाहत असलेले एक समृद्ध बंदर नगर होते हे लक्षात येते.

**भरडखोल** (18° 8'24” N, 72° 58'59” E )

श्रीवर्धनच्या उत्तरेकडे दहा किलोमीटर असलेल्या या ठिकाणी पिंपळादेवी व डिंगळादेवी या स्थानिक देवतांचे शेंदूर लावलेल्या स्वरूपातले स्थान आहे. येथे कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष आढळले नाहीत.

**कार्ले** (18° 9'1” N,  72° 59'51” E )

श्रीवर्धन गावाच्या उत्तरेकडे बारा किलोमीटर व दिवे आगर पासून दोन किलोमीटर अंतरावरील या गावाचा उल्लेख दिवे आगर येथे मिळालेला सन १०५३ चा ताम्रपटात या गावाचा दिवे आगरची एक वाडी म्हणून उल्लेख आला आहे (मिराशी १९७४: १२७-१३०). गावात असलेल्या कालकाई देवस्थानाजवळ कोणतेही अवशेष आढळत नाहीत.

**वावे तर्फे श्रीवर्धन** (18° 2'10" N, 73° 5'51" E )

श्रीवर्धनच्या आग्नेयेस हे गाव आठ किलोमीटर अंतरावर आहे. श्रीवर्धन-आडी मार्गावर असलेल्या वडशेत येथील गावदेवी मंदिर परिसरात उल्लेखनीय असे शिल्पावशेष आहेत. वडशेत गावाच्या नदीच्या काठावर खामदेश्वराचे मंदिर असून, सध्या मंदिराचे जीर्णोध्दाराचे काम सुरू आहे. मंदिर परिसरात अनेक वीरगळ, सतीशिळा व इतर भग्न मूर्ती मंदिराभोवती ठेवल्या आहेत. पूर्वी हेमाडपंती दगडी बांधकामाप्रमाणे हे मंदिर असल्याचे सांगितले जाते. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ वीरगळ व एक सतीशिळा आहे. मंदिराच्या डाव्या बाजूस दगडाचा कठडा असून, या कठडयावर व लगत अनेक वीरगळ अर्धे मातीत गेलेले, तर काही मोकळे अशा स्वरूपात ठेवलेले आहे. हे जेमतेम ४० ते ५० सेंटीमीटर उंचीचे असावेत. आयताकृती व एकच बाजू कोरलेले आणि एक ते दोन वीर युध्दात गुंतलेले दाखविले आहेत. फक्त एका वीरगळावरील वीर वाघाजवळ दोन हात करताना दाखविला आहे. वाघाच्या हल्यात तो मृत्यूमुखी पडला असावा. दहा ते पंधरा सेंटीमीटर उंचीच्या शिल्पांवर दोन व्यक्ती दाखविल्या आहेत. अशी एकूण सात शिल्पे आहेत. मुख्यमंदिरात ठेवलेली प्रतिमा म्हणजे घोडयावर स्वार झालेल्या दोन व्यक्ती दाखविल्या असून त्यांच्या हातात खड्ग आहे. अशीच एक प्रतिमा तुळशी वृंदावनासमोर ठेवली आहे. अत्यंत झीज झालेली, परंतु घोडयावर स्वार होवून हातात खड्ग धारण करणा-या दोन व्यक्ती यात आहेत. एकंदर या भागात आढणाऱ्या शिल्पांची धाटणीवरून ही शिल्पे बाराव्या शतकापासून ते अठराव्या शतकातील असावीत.

**साखरोने** (18° 2'7" N, 73° 6'40" E )

साखरोने गाव श्रीवर्धनपासून वायव्येस दहा किलोमीटर अंतरावर व समुद्रसपाटीपासून १४२ मीटर उंचीवर वसलेले असून येथून उगम पावणारी नदी श्रीवर्धन खाडीस मिळते. गावातील जाकमाता मंदिर परिसरात सतराव्या शतकातील दोन प्रतिमा आहेत. मंदिरासमोर एक समाधीचा जांभ्या दगडातील स्मृती चौथरा असून त्याची रचना उंबार्डी, तसेच इतर ठिकाणी आढळणाऱ्या मंदिरावरील चौथऱ्याप्रमाणे प्राचीन पध्द्तीची आहे. या गावाहून जाणारा घाटमार्ग वर आडी गावाकडे जातो. हा मार्ग पूर्व मध्ययुगीन व्यापारी मार्ग असावा.

**कोंढे तर्फे श्रीवर्धन** (18° 3'25" N, 73° 6'30" E )

गाव समुद्रसपाटीपासून २३० मीटर उंचीवर व श्रीवर्धनच्या पूर्वेस नऊ किलोमीटर अंतरावर डोंगराळ भागात वसले आहे. नुकत्याच जीर्णोध्दार झालेल्या श्री कालभैरव मंदिराच्या

जीर्णोध्दार प्रसंगी ग्रामस्थांना काही जुन्या मूर्ती आढळल्या, त्या मंदिरासमोर ओळीने ठेवल्या आहेत. या एकूण सोळा असून काही भग्न झालेल्या, तर काही उत्तम स्वरूपात आहेत. यात चार वीरगळ उत्तम स्थितीत आहेत. एकच वीर योध्दा हातात ढाल व खड्ग धारण केलेला दाखविला आहे. ही शिल्पे ५० ते ३० सेंटीमीटर उंच आहेत. दोन टप्प्यातील एक सतीशिळाआहे.सतीच्या तळहातावर एक गोल वस्तू आहे. एका ३० सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रूंद शिळेवर आठ व्यक्ती दाखविल्या असून या शिल्पाचे नेमके प्रयोजन कळत नाही.

**गणी** (18° 4'17" N, 73° 5'45" E )

हे गाव श्रीवर्धनच्या ईशान्येस डोंगराळ भागात वसले आहे. येथील केल्टे गावाकडे पायी जायच्या मार्गात एका खिंडीमध्ये एक भग्न वीरगळ व एक झीज झालेले, त्रिभंग अवस्थेतील शिल्प आहे.

**धारवली** (18° 1'27" N, 73° 6'20" E )

धारवली हे श्रीवर्धनच्या आग्नेयेस नऊ किलोमीटर अंतरावर, डोंगर उतारावरील गाव आहे. गावातील पुरावशेष धारेश्वर शिवमंदिर, काळेश्वरी देवी, भवानी देवी या स्थानिक देवतांच्या मंदिर परिसरात आहेत. मंदिरातील सर्व शिल्पे आधुनिक काळातील व तैलरंगात रंगवलेली आहेत. या मंदिराच्या मागच्या बाजूस भग्न व झीज झालेल्या जुन्या मूर्ती व शिल्पे आहेत. यामध्ये महिषासुरमर्दिनी प्रकारची तीन स्त्री शिल्पे आहेत. शिल्पे शैलीनुसार अठराव्या शतकातील असाव्यात. एक भग्न अवस्थेतील वीरगळ आहे. या शिवाय एका ३० सेंटीमीटर शिळेवर उभ्या चौकटच्या फुलांची नक्षीकाम केलेली पहावयास मिळते. यांच्या शिल्पशैलीवरून ही दोन शिल्पे तेराव्या शतकातील असावीत.

**कोलमांडला** (18° 0'9" N, 73° 4'53" E )

श्रीवर्धनच्या आग्नेय दिशेस आठकिलोमीटर अंतरावर बाणकोट नदीच्या मुखाशी वसलेले हे गाव आहे. याचे वर्णन अनेक परकीय प्रवाशांनी करून ठेवले आहे. येथून सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील बागमांडला हेव्यापाराचे मोठे केंद्र होते. तसेच कोलमांडला येथे पूर्वी नारळ, सुपारी तांबे व मसाल्यांच्या खरेदीसाठी जहाजे थांबत असत. जेव्हा बागमांडला असुरक्षित वाटे तेव्हा व्यापारासाठी व्यापारी कोलमांडला येथे येत असत (रायगड गॅझेटिअर १९९३: ७१३)

कोलमांडला गावदेवाचे मंदिर गावाच्या बाहेर एका बाजूस आहे. कौलारू मंदिरातील चौथऱ्यावर पाच झीज झालेली शिल्पे आहेत. यातील एक महिषासुरमर्दिनी प्रकारचे, एक वाघावर आरूढ देवतेचे तिसरे चार हातांच्या, स्थानक व समभंग अवस्थेतेतील कुत्रा वाहन असलेल्या देवतेचे शिल्प आहे. ही उल्लेखनीय शिल्पे त्यांच्या शिल्पशैलीवरून तेराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकातील असावीत. मंदिराबाहेर जोत्याला टेकून दोन सतीशिळा ठेवलेल्या आहेत. सतीचा हात स्तंभातून प्रगटलेला आहे. शिल्पांची शैली चौदाव्या व पंधराव्या शतकाचा काळ दर्शविते. नदीकिनारी खाडीलगत वाहून आलेली काचेचा लेप दिलेली व चिनीमातीची खापरे आढळत.

**बागमांडला** (17°59'58" N, 73° 2'39" E )

श्रीवर्धनच्या आग्नेयेस सात किलोमीटर अंतरावर बागमांडला हे गाव सावित्री नदीच्या उत्तर काठावर बाणकोट खाडीच्या मुखाशी थोडया आतील बाजूस आहे. बागमांडल्याच्या भैरीबुवा या स्थानिक गावदेवाचे मंदिर रहाटीत आहे. या ठिकाणी गावातील पुरावशेष शिल्परूपाने पाहता येतात. मंदिरातील चौथऱ्यावर भैरीदेव, वाघजाई, अंबिकादेवी आणि कालंबा या देवतांच्या स्थानिक परंपरेनुसार घडविलेल्या मूर्ती आहेत. सर्व शिल्पांपैकी वाघजाई देवतेचे वाहन वाघ दाखविला असून, ती त्यावर दोन्ही बाजूस पाय टाकून बसली आहे. इतर शिल्पे स्थानक व समभंग आहेत. प्रमाणबध्द नसलेल्या या शिल्पांवरून सदर शिल्पे गेल्या ५० वर्षातील असावीत. शेजारीच अत्यंत झीज झालेली व भग्नावस्थेतील शिल्पे आहेत, काळ ठरविण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग नाही. मंदिराबाहेर एक सतीशिळा आहे. तिच्या धाटणीवरून ही सतीशिळा चौदाव्या शतकातील असावी.

**कारीवणे** (17°59'48" N, 73° 6'4" E )

कारीवणे हे गाव श्रीवर्धनच्या आग्नेयेस ११ किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या उत्तर तीरावर अगदी खेटून असलेले गाव आहे. हे दोन टेकडयांच्या उतारावरील भागात वसले आहे. दोन टेकडयांच्या मधून येणाऱ्या एका छोटया ओहोळावर प्राथमिक शाळेजवळ जाखमाता या देवतेचे मंदिर आहे. हे देवस्थान उघडयावर असून त्यास छप्पर नाही. त्यामुळे शिल्पांची झीज झाली आहे. या ठिकाणी प्रत्यक्षात दोन कोरीव शिल्पे आहेत. स्वयंभू तांदळा स्वरूपात तीन शिळांची पूजा केली जाते. यातील दर्शकाच्या उजवीकडून म्हादोबा, काळंबा, जाखमाता, भरकुंबा, केदारबाजी अशी स्थानिक दैवते आहेत. यातील मुख्य दैवत जाखमाता असून हे चार हातांचे

खालच्या उजव्या हातात दंड, वरच्या उजव्या हातात खड्ग, तर डावा हात बहुधा अभय मुद्रेत आहे. हे शिल्पमागील शतकातील असावे याची झीज झालेली आहे. यातील भारकुंबा म्हणून पुजली जाणारी मूर्ती म्हणजे दुसरे तिसरी काही नसून एक सतीशिळा आहे. घोडयावर स्वार झालेली सती शैलीवरून चौदाव्या शतकातील असावी. सतीशिळांच्या शिलालेखीय नोंदीत भडकुंबा असा शब्दप्रयोग मठगाव येथील वीरगळ व सतीशिळांवर आला आहे. आजही पंरपरेने लोक याच शिल्पाला भारकुंबा म्हणजे भडकुंबाच संबोधतात हे विशेष आहे. या ठिकाणी जाखमाता देवीबाबत अशी आख्यायिका सांगितली जाते की कुरवडे, उमरोली, शिपोळे, रानवली, कारीवणे व एक अज्ञात ठिकाणची जाखमाता या पाच बहिणी आहेत. यातील कारीवणे गावची जाखमाता सर्वात धाकटी आहे. या जाखमातांसाठी मंदिरे बांधत नाहीत. गावातील नदीकाठाला दोन टेकड्या आहेत. मोठया टेकडीला मोठी दिवी, तर लहान टेकडीला लहान दिवी म्हटले जाते. या ठिकाणी काही नैसर्गिक दगड मुद्दाम रचल्यासारखे आहेत. पण सध्या ते विखुरले आहेत. छोटया दिवीजवळ आज आधुनिक काळातील बंदर आहे. दिवी हे नाव अभ्यास क्षेत्रात अनेक ठिकाणी नदी वा समुद्र किनाऱ्यालगतच्या भागात आढळून येते. याठिकाणी उत्तर ऐतिहासिक अथवा मध्ययुगीन काळात देखील बंदर अथवा धक्का असावा.

**भरडोली** (18° 5'21” N, 73° 1'53” E )

भरडोली हे गाव श्रीवर्धनच्या उत्तर दिशेस पाच किलोमीटर अंतरावर आहे. भरडोलीहून मेघरे गावाकडे जाताना रस्त्याच्या बाजूला एक दर्गा आहे. जवळच प्राचीन पध्दतीच्या भूपृष्ठावर चौकोनी मुख असलेल्या कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या, मामवली गावाकडून वाहत येणाऱ्या नदीच्या उत्तर किनाऱ्यावर आहेत. सुमारे ५मीटर लांबी आणि १.५० मीटर रूंदीच्या क्षेत्रात सुमारे ७० ते ८०सेंटीमीटर लांबी रूंदीच्या तीन चौकोनी मुखे असलेली पाण्याची एक टाकी कातळात खोदलेली दिसते. तिची खोली सुमारे १.५०मीटर इतकी आहे. टाकीत गाळ साठलेला आहे. या तीन स्वतंत्र टाक्या नसून आतून त्या जोडलेल्या आहेत (छायाचित्र क्रमांक ३१). अशा प्रकारची रचनाअसलेल्या टाक्या सुधागड तालुक्यातील गणेशमंदिर, रोहयातील तळवली, माणगावातील पेणया ठिकाणी देखील आढळून आल्या आहेत. यांची रचना सातवाहन काळातील लेणीच्या सानिध्यात आढळणाऱ्या पाण्याच्या टाक्यांसारखी आहे. त्यांच्या स्वरूपावरून सदर कातळात कोरीव पाण्याची टाकी सुरवातीच्या शतकातील असाव्यात.

**मामवली** (18° 6'16” N, 73° 3'15” E )

हे गाव श्रीवर्धनच्या ईशान्य बाजूस सात किलोमीटर अंतरावर आहे. गावात कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष नाहीत मात्र आधुनिक काळातील ग्रामदैवतांची व बापदेव या स्थानिक

दैवतांच्या दोन हातांच्या स्थानक मूर्ती आहेत. नदीच्या ओढयात सातआसरा म्हणून ठिकाण आहे. तसेच गावाच्या उत्तरेकडील टेकडीतील कपारीत गावदेवीचे स्थान आहे.

**मेघरे** (18° 5'44” N, 73° 2'15” E )

हे गाव श्रीवर्धनच्या ईशान्य बाजूस आहे. येथील बापदेव हे मंदिर मेघरे गावाच्या बाहेर उत्तर दिशेस आहे. मंदिरासमोरील एका वडाच्या झाडाला टेकून काही शिल्पे ठेवली आहेत. यात चांगल्या अवस्थेतेतील तीन, भग्नावस्थेतील पाच असे एकूण आठ वीरगळ आहेत. एक सतीशिळा या शिवाय एक गणेश प्रतिमा दिसून येते. वीरगळ तीन टप्यात आहे. शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असून त्यात मंगलकलश कोरलेला दाखविला आहे. डावीकडून दुसरा वीरगळाच्या चौकटीच्या मधल्या भागात उभ्या चौकटच्या फुलांची नक्षी काढली आहे. तर तिसऱ्या वीरगळाचा शिरोभाग त्रिकोणाकृती असून या भागात मंगलकलश दाखविला असून त्याच्या मध्यभागी एक फीत बांधून त्याच्यागाठी कलशाच्या दोन्ही बाजूस सोडल्या आहेत. सतीशिळेवर नेहमी उजवा हात दिसतो, मात्र येथे डावा हात दर्शविलेला आहे.काही वीरगळ फक्त एकाच टप्यातील एकटा वीर दाखविणारी आहेत. यात ढाल तलवार घेतलेला व युध्दाच्या पवित्र्यातील वीर दिसतो. या शिल्पांची झीज झालेली आहे. शैलीच्या दृष्टीकोनातून दोन्ही शिल्पे भिन्न आहेत. दोन वीरगळ भग्न असून वडाच्या झाडाने गिळले आहेत.

**चिखलप** (18° 5'41” N, 73° 1'11” E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावरील या गावात देवी चंडीकामाता मंदिरात चंडीका देवीची म्हणून पुजली जाणारी सुमारे एक मीटर उंच प्रतिमा पुरुष देवतेचेची झीज झालेली प्रतिमा आहे. ही मूर्ती दोन हातांची आहे. डाव्या हातात बहुधा शंख असून, तो हात या देवतेने कमरेवर पालथा ठेवला आहे. उजवा हात भग्न असून तो कदाचित अभय मुद्रेत असावा. मूर्तीवर शेंदूर आणि तेलाचा राब बसल्यामुळे अलंकारांचे तपशील सांगता येत नाहीत. धोतर, मुकुट, कुंडले, वैजयंतीमाळा तसेच डाव्या अंगास, अनुचर आहे. शिल्पाच्या एकंदर स्वरूपावरून हे विष्णूचे शिल्प पाचव्या किंवा सहाव्या शतकातील असावे. मंदिरामागे मागील शतकात केलेली एका पुरुषदेवतेची, दोन हातांची प्रतिमा असून, ती बहुधा मूळ मूर्तीची भ्रष्ट नक्कल असावी.

**खर्डी** (18° 3'59” N, 73° 1'49” E )

हे गाव श्रीवर्धनच्या उत्तरेस चार किलोमीटर आहे. येथे जीर्णोध्दार झालेल्या ग्रामदेवतेच्या मंदिरात दोन हातांची, पायघोळ झगा परिधान केलेली स्थानक मूर्ती आहे. ही मूर्ती शैलीवरून

अठराव्या शतकातील असावी. जवळ एक छोटी देवळी असून त्यात हनुमानाच्या डाव्या हातात पर्वत उचलणाऱ्या व उजव्या हातात गदा असणाऱ्या प्रतिमा आहेत.

**मारळ** (18° 0'13” N, 73° 1'21” E )

श्रीवर्धनच्या दक्षिणेला सुमारे तीन किलोमीटर समुद्राच्या काठाला असलेल्या या गावात कोणतेही महत्त्वपूर्ण पुरावशेष आढळलेले नाहीत. काळेश्वरी या गावदेवीचे जीर्णोध्दार झालेले मंदिर आहे. ही देवीची मूर्ती एका कोळयाला जाळयात सापडली, नंतर तिथे मंदिर उभारले आहे.

**कुरावडे** (18° 1'0” N, 73° 1'23” E )

भौगोलिकदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण स्थानी असणा-या या गावात जाखमातेचे स्थान आहे. जाखमाते सोबत इतर दोन झीज झालेल्या काळया पाषाणातील मूर्ती आहेत. जाखमातेची म्हणून दाखविल्या जाणा-या मूर्तीच्या उजव्या हातात दंड व डावा हात खाली सोडलेला आहे. शैलीवरून या मूर्ती आधुनिक काळात घडविलेल्या असाव्यात. गावाच्या वरील अंगास टेकडीवर हाजी वली नावाचा दर्गा आहे.

**देवघर (**17°59'41” N, 73° 1'24” E )

भौगोलिकदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण स्थानी असणारे, देवघर हे स्थान श्रीवर्धनपासून दक्षिणेस आहे. हे ठिकाण हरिहरेश्वर म्हणूनही प्रसिध्द आहे. पेशव्यांचे कुलदैवत असलेल्या या ठिकाणास या परिसरात दक्षिण काशी म्हटले जाते. सहयाद्रीखंड व इतर ग्रंथात या स्थानाचे वर्णन येते. येथील काळभैरवाच्या मंदिराच्या भिंतीवर पेशवे काळातील शिलालेख आहे (रायगड गॅझेटिअर १९९३: ८७५) समुद्रात अनेक मूर्तीचे विसर्जन केलेले अवशेष आढळतात. एका चौथऱ्यावर एक तोफ व एका भग्न वीरगळाचे दोन तुकडे ठेवलेले दिसतात. वीरगळाच्या शैलीवरून हा वीरगळ बाराव्या शतकातील असावा. गावामागील टेकडीवर साक्षी भैरी मंदिराच्या आवारात मराठा काळातील वर्जलेप केलेल्या तीन छोटया मूर्ती आहेत.

**दिघी** (18° 15'52” N, 72° 58' 11 “ E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस २४ किलोमीटर अंतरावर आणि राजपुरी अथवा तळकट खाडीच्या दक्षिण बाजूस हे गाव वसले आहे. गावात आधुनिक काळातील राममंदिर, शिवमंदिर व साई मंदिर आहेत. दिघीच्या खाडीकिनाऱ्यावर धूप होऊन आलेली मध्ययुगीन काळातील काचेचा लेप दिलेली हिरवी व निळी खापरे आढळतात.

**हरवीत** (18° 14'17" N, 72° 59'9" E )

हरवीत हे गावातील शिवमंदिराचा जीर्णोध्दार या राजपुरी खाडी परिसरातील लोकांनी केला असून येथे चौकोनी आकाराचे मूळ योनीपीठ तसेच आहे. याशिवाय आधुनिक काळातील दोन शिल्पे आहेत. या गावातील कब्रस्तान भागात शनिवार तेली म्हणून प्रसिध्द असलेल्या बेने इस्त्राईल लोकांच्या स्मशानभूमी आहेत. यापैकी काही जांभा दगडाच्या कबरी मोठया असून, त्यांना शुष्कसांधी तंत्राने बनविले गेलेले दिसते. या ठिकाणी एक दगडी हौद आहे. तसेच पिंपळपानाच्या दगडी आकृत्या या कबरींवर केलेल्या आहेत. यातील काहींवर फारसी शिलालेख आहेत. या पानांच्यामध्ये कमानीची नक्षी असून कमानीच्या बाजूस वर्तुळांमध्ये नक्षी काढली आहे. शेजारी पाण्याचे कुंभही काढले आहेत. स्थानिकांच्या मते या कबरी येथे शेकडो वर्षे येथे आहेत. हरवीत गावालगत असलेल्या राजपुरी खाडीत एक बेट असून त्याचे नाव दिव बेट आहे. यालाच कांसाबेट ही म्हणतात. या ठिकाणी टेकडीवर घोडयाचे पाय उठले आहेत असे म्हणतात.

**कुडगाव** (18° 14'26" N, 72° 58'22" E )

कुडगाव हे साधेसुधे गाव आहे. गावाच्या रहाटीत बापदेवाचे स्थान आहे. या ठिकाणी एका छोटया टेकाडावर दाट झाडीत हे स्थान आहे. झाडाखाली मोठमोठी दगडे गोलाकार रचून ठेवले आहेत. या ठिकाणी आयताकृती आकाराच्या ६० ते ७० सेंटीमीटर लांब व २५ ते ३० सेंटीमीटर रूंद शिळांच्या एका बाजूस कोरलेले वीरगळ आहेत. एका हातात दुधारी खड्ग व दुस-या हातात खेटक धारण केलेला एकटा वीर असे शिल्पांकन यांवर आहे. झीज व भग्न झालेले असे एकूण नऊ वीरगळ आहेत. याशिवाय पद्मासन व नमस्कार मुद्रेतील दोन शिल्पेही आहेत. एकंदर शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत. ही रहाटी पूर्वाश्रमीच्या 'महार' लोकांची होती असा समज आहे. गावाच्या बाहेर म्हसोबाचे स्थान आहे. मात्र येथे कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत.

**करलास** (18° 15'7" N, 72° 57'49" E )

करलास या गावी रहाटीमध्ये धेनबाई देवी व बापोजी देव या स्थानिक देवतांचे मंदिर आहे. मंदिरात चार शिल्पे आहेत. देवीवर दागिने घातलेले असल्यामुळे या दोन हात व स्थानक शिल्पांचे परीक्षण करणे कठीण आहे. शिवाय शिल्पांचीही झीज झालेली आहे. याशिवाय जवळच सावर्डे गाव असून येथे कालकाई देवस्थान आहे, पण कोणतेही पुरावशेष नाहीत.

**गालसुरे** (18° 3'24” N, 73° 4'43” E )

श्रीवर्धनच्या पूर्वेस सहा किलोमीटर अंतरावर गालसुरे हे गाव असून या गावी जाकमाता या स्थानिक देवतेचे साधे मंदिर आहे. मंदिरास लागून पुढे खाजण भाग आहे. मंदिरातील शिल्पे अत्यंत खराब अवस्थेतील व झीज झालेली दिसतात. कालखंड ठरवण्यासाठी या शिल्पांचा काही उपयोग नाही. या मंदिरापुढे शेतीभागात नांगरटीच्या वेळेस काचेचा लेप दिलेल्या हिरव्या खापरांचे तुकडे आढळतात. गावाच्या बसस्थानकाजवळ काही मराठा काळातील कोरीव स्मृती शिळा आहेत.

**बापवन** (18° 3'44” N, 73° 3'41” E )

श्रीवर्धनच्या पूर्व दिशेस पाच किलोमीटर अंतरावर बापवन हे गाव आहे. गावातील कालकाई हे गावदेवीचे मंदिर गावाच्या पूर्वेस असलेल्या टेकडीवर आहे. या ठिकाणी असलेली शिल्पे झीज झालेली आहेत. गावाच्या पश्चिमेकडील शेतात गायवासरू शिल्प असल्याचे समजते. प्रत्यक्ष भेटीत ते पहायला मिळाले नाही.

**जावेळ** (18° 2'40” N, 73° 5'24” E )

श्रीवर्धनच्या आग्नेयेस सात किलोमीटर अंतरावर वसले आहे. गावातील शिवमंदिराचा जीर्णोध्दार झाला असून, मंदिर परिसरात गावातील पुरावशेष शिल्परूपाने पाहता येतात. मंदिरात झीज झालेला नंदी, योनीपीठ पाहता येते. मंदिराजवळ आयताकृती व भग्नावस्थेतील तीन टप्यातील वीरगळ आहे. यावर नेहमीचीच दृश्ये आहेत. शिल्पशैलीवरून हा बाराव्या शतकातील कालाचा असावा.

**कांडणे** (18° 04′20″N, 73° 04′11″ E)

श्रीवर्धनच्या पूर्वेस असलेल्या ठिकाणी कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष सापडले नाहीत.

**साखरी** (18° 2'53” N, 73° 4'5” E )

हे गाव श्रीवर्धनच्या पूर्वेस सहा किलोमीटर अंतरावर आहे. येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**कोंडविल** (18° 6'0" N, 72° 59'32" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेला सहा किलोमीटर अंतरावर समुद्र किनारी हे गाव आहे. खुद्द गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. आरावी गावाच्या मागील टेकडीवर व आरावी गावातील गणेश मंदिराजवळ मूर्तीशिल्पे व खापरे यांच्या अवशेषरूपाने पहायला मिळतात. कोंडविलपासून अगदी जवळच असलेल्या आरावी गावाच्या टेकडीवर एका जुन्या जांभ्या दगडी जोत्यावर नारायणाचे मंदिर आहे. मंदिरातील नारायणाची मूर्ती सुमारे १ मीटर उंच व ४५ सेंटीमीटररुंद आहे. ही मूर्ती चार हातांची स्थानक समभंग स्वरूपाची आहे. उजव्या खालच्या हातात पद्म, उजव्या वरच्या हातात शंख व वरच्या डाव्या हातात चक्र तर खालच्या डाव्या हातात गदा असा आयुधक्रम आहे. या नुसार ही मूर्ती केशवाची ठरते. याच्या उजव्या पायाजवळ गरूड, डाव्या पायाजवळ लक्ष्मी आहे. डोक्यावर किरीट आहे. पाठशिळेवर वेलबुट्टीची नक्षी आहे.

याच ठिकाणी गणेशाची भग्न मूर्ती आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प अकराव्या अथवा बाराव्या शतकातील वाटते. या मंदिराचा जोता जांभ्या दगडात, कातळ सडयावर शुष्कसांधी पध्दतीने उभारला आहे. उंची सुमारे ७० सेंटीमीटर व भूपृष्ठावर चार थर आहेत. याच्या वरच्या थराच्या चार कोप-यांवर व अधेमधे अर्धवर्तुळाकृती पाकळीच्या आकाराचे भाग खालच्या दिशेने दाखविले आहेत. या मंदिरासमोर काही भग्न शिल्पे दिसतात. यात झाडाखाली एका भंग पावलेल्या मूर्तीचे भाग जोडून ठेवले आहेत. शिल्लक भागावरून हे शिल्प देखील पद्म, शंख, चक्र, गदाधारी केशवाचेच असावे. कदाचित हे मूळ शिल्प भंग झाल्यावर सध्याच्या मंदिरातील मूर्ती घडविली असावे. या भग्न शिल्पाची शैली अकराव्या शतकातील वाटते. या ठिकाणी त्रिकोणी घटक असलेला, खांबाचा चौकोनी तळखडा आहे. कदाचित येथे विष्णूचे शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेले मंदिर असावे. या टेकडीवर पूर्व बाजूस बहिरी या गावदेवाचे मंदिर आहे. या सोबत येथे क्षेत्रपाल, भैरवनाथ, जोगेश्वरी, काळभैरव व काळेश्वरी या देवतांची यात्रा चैत्र पौर्णिमेस भरते. या मंदिरातील कट्टयावर पाच शिल्पे ठेवली आहेत. ही शिल्पेत्यांच्या शैलीवरून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्यादशकातील असावीत. या ठिकाणी झाडाखाली बापदेव व पोटदुखी नावाच्या देवता ही आहेत. यातील पोटदुखी देवी म्हणजे पद्मासनातील, नमस्कार मुद्रेतील पुरुष प्रतिमा आहे. कदाचित तिचे हात नमस्कार मुद्रेत पोटावर असल्याने ही देवी पोटाचे विकार दूर करते असा समज बळावला असावा. अशी दोन शिल्पे या ठिकाणी आहेत. ढालकाठीला एक वीरगळ टेकवून ठेवला आहे. हा हातात दुधारी तलवार व ढाल घेतलेला एकटा वीर हल्याच्या पवित्रा

घेतलेला दिसतो. हे अत्यंत झीज झालेले शिल्प आहे. या शिल्पांची शैली बाराव्या शतकातील असावी. या ठिकाणी काही लिंगाच्या आकाराचे दगड ही आढळून येतात. पण ते नैसर्गिकरित्या तसे आहेत की आज झीज झाल्यामुळे तसे आहेत हे कळायला मार्ग नाही. नारायण मंदिराजवळ सोमजाई देवतेचे स्थान आहे. मंदिरासमोर तेलाच्या घाण्याचे अवशेष आहेत.

नारायण मंदिराजवळ आरावी गावात उतरणारा दगडात बनविलेला मार्ग आहे. आरावी गावात गणेशाचे मंदिर आहे. या ठिकाणी आधुनिक काळातील मूर्ती आहे. परंतु मंदिर परिसरात विशेष पुरावशेष आहेत. यात जमिनीत अर्ध्या गाडल्या गेलेल्या दोन गध्देगळ शिळा, गजलक्ष्मी व गायवासरू ही शिल्पे व पुष्करणी आहेत. मंदिरासमोरील पुष्करणी शुष्कसांधी पध्दतीने घडवली असावी. गाळ साठल्याने व इतर बाजू ढासळल्याने तिचा विस्तार व खोली समजत नाही. पुष्करणीत एक भग्न, पण रेखीव शिल्प आढळते.

मंदिराच्यासमोर असलेल्या गायवासरू शिल्पाचे माप ८० सेंटीमीटर लांब व ३५ सेंटीमीटर रूंद असे आहे. शिळेचा शीर्षभाग चौकोनी आहे. वरील भागात चंद्र व सूर्य, तर शिळेच्या तळभागातील चौकटीत गाय व वासराचे शिल्प दिसते. खाली हे शिल्प भंग पावले आहे. मधला भाग शिलालेखासाठी गुळगुळीत केला होता. आज येथे लेख आढळून येत नाहीत. कुंपणाजवळ असलेले गजलक्ष्मीचे शिल्प झीज व भग्न झालेले आहे. आपल्या मागच्या दोन पायांवर उभे राहून लक्ष्मीला अभिषेक करणारे हत्ती व मध्ये लक्ष्मी दोन हातांची आहे. या देवीला स्थानिक लोक कमलादेवी म्हणतात.

मंदिरासमोरील डांबरी रस्त्यालगत आयताकार एकमीटर लांबी व ३५ सेंटीमीटर रूंदीची गदधेगळ शिळा पडली आहे. रस्त्याचे डांबरीकरण करत असताना तिच्यावर देखील डांबर फासले गेले आहे. पण या दगडांना जागचे हलवले तर जगबुडी व भयंकर आपत्ती येणार या भयाने कोणीही या शिल्पांना हात लावत नाहीत. शिळेचा वरचा भाग चौकोनी असून त्यावर कुंभ व बाजूला चंद्र व सूर्याच्या प्रतिमा आहेत. खालचा भाग लेखासाठी मोकळा सोडला आहे. शिळेच्या तळभागातील चौकटीत उजवीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ झालेला गाढव दाखविला आहे. या परिसरात तेजस्वी लाल, काळया अथवा करडया रंगाची खापरे विपुल प्रमाणावर सापडतात. यात झाकणी, पिण्याचे पेले, थाळी, तोटी असलेली भांडी यांचे अवशेष मुख्यत्वे आहेत. या ठिकाणी आद्य ऐतिहासिक ते आधुनिक काळापर्यंत वसाहत झाली असावी.

**शेखाडी** (18° 6'29" N, 72° 58'53" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस समुद्र किनारी हे गाव आहे. येथे धावीर देव या स्थानिक देवतेचे स्थान आहे. हे स्थान वडाच्या झाडाखाली असून कोणतेही शिल्प येथे आढळत नाही. या गावातून दिवे आगरकडे जाताना समुद्रात पांडवांची 'झुगार धोंड' म्हणून दाखविला जाणारा कातळाचा भाग आहे. येथे आता झीज झाल्यामुळे जमिनीला समांतर असणारा हा भाग आता खाली झुकला आहे. येथे काही कोरीवकाम करून दगड काढल्याच्या खुणा आहेत किंवा येथील कातळात कोरीव खोल्या असाव्यात. आता त्यातील दोन खोल्यांच्या तळाचा भाग राहीला आहे. पण कोणतेही अलंकरण नसल्यामुळे या ठिकाणचा कालखंड निश्चीत करता येत नाही.

**खारगाव** (18° 5'35" N, 73° 0'7" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर समुद्राकाठी असलेल्या खारगाव येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. पूर्वी कधीतरी प्लेगची किंवा साथीचा ताप आल्याने लोक जंगलात रहायला गेले होते. त्या ठिकाणी विहीर व काही जोती असल्याचे सांगतात.

**निगडी** (18° 2'20" N, 73° 4'9" E )

हे गाव डोंगररांगेतून येणाऱ्या ओढयाच्या दक्षिण तीरावर व श्रीवर्धनच्या अंतर्गत खाडीच्या पश्चिम काठावर श्रीवर्धनच्या आग्नेयेस सहा किलोमीटर अंतरावर आहे. गावदेव काळभैरी मंदिराच्या बाहेर झाडाखाली चार हातांची स्थानक अवस्थेतेतील वाहन नसलेली मूर्ती आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प मागच्या पन्नास वर्षातील असावे. येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**सायगाव** (18° 1'54" N, 73° 3'31" E )

सायगाव हे श्रीवर्धनच्या आग्नेयेस साडेचार किलोमीटर अंतरावर आहे. येथे श्री कालभैरव व कालिकादेवी यांचे जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. मंदिरात अलिकडच्या काळात घडवलेली शिल्पे आहेत. मंदिर परिसरातील एका निवाऱ्यामध्ये वाघावर आरूढ झालेल्या वाघजाई या स्थानिक देवतेचे शिल्प आहे. दोन हातांच्या या देवतेच्या शैलीवरून हे शिल्प अठराव्या शतकातील असावे.

**आदगाव** (18° 13'12" N, 72° 57'7" E )

श्रीवर्धनच्या वायव्येस १९ किलोमीटर अंतरावर समुद्र व समुद्रालगतचा टेकडीचा भाग या दरम्यान आदगाव वसले आहे. गावातील शिवमंदिरात नंदी, पार्वती, गणेश व शिवलिंग यांच्या

आधुनिक काळातील मूर्ती स्थापन केल्या आहेत. मंदिरासमोर भग्नावस्थेतील वीरगळाचा खालच्या टप्यातील एक भाग पडला आहे. शैलीवरून बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावा. गावाच्या कुंभळणादेवी मंदिर परिसर व बोडणकरीत माता देवस्थान परिसरात कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. गावाच्या दक्षिण दिशेला टेकडीच्या पायथ्यालगत सातीआसरा नावाचे देवस्थान आहे. या ठिकाणी जमीन पातळीवर चौकोनी मुख असलेल्या कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आढळून येतात यांचे स्वरूप या भागात इतर ठिकाणी सापडलेल्या लेणींच्या परिसरातील पाणपोयांसारखे आहे. या स्वरूपावरून त्या आद्य ऐतिहासिक काळातील असाव्यात.

**मणेरी** (18° 16'22" N, 72° 56'52" E )

मणेरी हे गाव राजपुरी खाडीच्या मुखाजवळ आहे. मिराशी यांच्या मते छित्तराजाच्या सन १०२७ मधील ताम्रपटात उल्लेखलेले मंदरज गाव म्हणजे मणेरी होय (मिराशी १९७४: ७२). परंतु मणेरी गावात या कालखंडातील अवशेष नाहीत. मणेरी व नानवली या गावांचे एकच देवस्थान आहे. मणेरी येथील जीर्णोद्धार झालेल्या काळभैरी मंदिराबाहेर कातळाची पूजा केली जाते, या शिळेजवळ दोन वीरगळ सदृश्य शिल्पे आहेत. हातात तलवारीसारखे शस्त्र व ढाल घेतलेला वीर पुरुष व वर चंद्र-सूर्य कोरले आहेत. ही शिल्पे बहुधा या ठिकाणी असलेल्या अशाच प्रकारच्या वीरगळांची अलिकडच्या काळातील नक्कल असावी असे प्रतिकृती करण्याचे काम जीर्णोद्धार काळात स्थानिक लोकांनी इतर ठिकाणीही केले आहेत. मूळ शिल्पे चौदाव्या शतकापेक्षा जास्त जुनी नसावीत.

**नानवली** (18° 16'22" N, 72° 56'52" E )

मणेरी-नानवली ही जोड गावे आहेत किंवा एकाच गावचे नाव आहे. या गावाच्या टेकडीच्या माथ्यावर शिवमंदिर आहे. परंतु जंगल भाग असल्याने येथे जाता आले नाही.

**सर्वे** (18° 15'15" N, 72° 56'39" E )

हे गाव श्रीवर्धनच्या उत्तरेस २४ किलोमीटर अंतरावर आहे. गावातील पुरावशेष म्हणजे काळभैरी या स्थानिक देवतेच्या जीर्णोद्धार केलेल्या मंदिरातील चार शिल्पे होय. यांना शेंदूर व तेल लावलेला असून, त्यांची बऱ्यापैकी झीज झालेली आहे. त्यामुळे या शिल्पांचा शैली अंदाजे काळ ठरविण्यासाठी कोणताही उपयोग नाही.

**नागलोली** (18° 7'35" N, 73° 2'22" E )

श्रीवर्धनच्या अगदी उत्तरेस सात किलोमीटर अंतरावर नागलोली गाव आहे. गावातील पुरावशेष गावातील काळभैरी मंदिर परिसरात आहे. या ठिकाणी दोन आयताकृती वीरगळांचे भग्न अवशेष आहेत. शैलीवरून ते बाराव्या शतकातील असावेत.

**वाकळघर** (18° 7'32" N, 72° 59'59" E )

श्रीवर्धनच्या अगदी उत्तरेस आठ किलोमीटर अंतरावर गाव आहे. वाकळघर या गावाच्या दक्षिणेस गंगादेवी म्हणून देवस्थान आहे. या ठिकाणी पाच पाण्याची कुंडे आहेत. राजापूर, जिल्हा रत्नागिरी येथील कुंडातून ज्यावेळेस गंगा अवतरते. त्या वेळेस येथे पाणी येते असे म्हणतात. या कुंडाचे बांधकाम जांभ्या दगडातील चिरांचे केलेले आहे. ही कुंडे फार खोल नाहीत हे स्थान पूर्वीपासूनच धार्मिक महत्त्वाचे असावे कारण या ठिकाणी खापरांसोबत, मसाला वाटायचा पाटा-वरवंटा व इतर शिल्पावशेष देखील सापडतात.

गंगादेवी मंदिरात चार स्त्री शिल्पे आहेत. त्यातील दोन शिल्पे आधुनिक काळातील आहेत. दोन मोठी शिल्पे भग्न व तैलरंगात रंगविली आहेत. ही शिल्पे चार हातांची समभंग, अवस्थेतील स्थानक स्वरूपाची आहेत. किरीट मुकुट परिधान केलेली ही शिल्पे सुबक आहेत. दर्शकाच्या डावीकडील शिल्प बऱ्यापैकी सुस्थित आहे. मुकुटाभोवती प्रभावलय आहे. चार हातांपैकी खालच्या उजव्या हातातील वस्तू समजत नाही, तर वरच्या उजव्या हातात पद्म असावे. वरच्या डाव्या हातात त्रिशूळ असून त्यांचा दांडा तुटलेला आहे. डाव्या खालच्या हातात कुंभ आहे. कानात कर्णफुले व गळयात गळसरीसारखे दागिने, कमरेत व हातातही दागिने आहेत. डाव्या व उजव्या पायाजवळ दोन चामरधारीणी आहेत. डाव्या पायाजवळ मयूरासारखे वाहन असावे. यावरून ही सरस्वती मूर्ती असावी. ही शिल्पे शैलीवरून अकराव्या शतकातील असावीत. मंदिराच्या समोरील भागात शुष्कसांधी पद्धतीने उभारायच्या कोरीव शिळा पडल्या आहेत. यात त्रिकोणाकृती घटक असलेले, कुंभ व कणीयुक्त वास्तू घटक पाहायला मिळतो. याशिवाय चार पाय असलेल्या मसाला वाटायच्या पाटयाचा फक्त दोन पाय असलेला तुकडा मिळाला आहे.

**देवखोल** (18° 7'29” N, 73° 1'58” E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस साडेसात किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून १०० मीटर उंचावर एका ओढयाच्या काठावर हे गाव आहे. या ठिकाणी उल्लेखनीय वैशिष्ट्ये असलेले पुरावशेष सापडतात. गावाच्या रानातील रहाटीमध्ये कुसुमेश्वर नावाचे जीर्णोद्धार झालेले देवस्थान आहे. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात व सभामंडपातदेखीलप्रत्येकी एक शिवलिंग आहे. या ठिकाणी शुष्कसांधी बांधीव मंदिराच्या अनेक कोरीव शिळा सापडतात. जुन्या मंदिराचे भाग जसेच्या तसे नवीन मंदिरास वापरलेले पहायला मिळतात. सभामंडपात त्रिकोणाकृती घटक असलेली मूर्ती ठेवण्याची शिळा वा पीठ आहे. मंदिराबाहेरील अनेक शिल्पे मंदिराच्या कुंपणाच्या भिंतीला टेकवून ठेवली आहेत. यात १० सेंटीमीटरपासून ते एक मीटर पर्यंतची अनेक शिल्पे आहेत. यातील वैशिष्ट्यपूर्ण शिल्पांमध्ये गद्धेगळ, सतीशिळा, वीरगळ, गणेशशिल्प, जोडपे असलेले शिल्प, फुलांची वेलबुट्टी व एका शिल्पाच्या पाठशिळेचा भाग आहेत (छायाचित्र क्रमांक २८). गद्धेगळशिल्प एका७० सेंटीमीटर लांब व ३२ सेंटीमीटर रूंद असलेल्या आयताकृती शिळेवर कोरले आहे. शिळेचा शीर्षभाग भग्न आहे. त्यावर चौकटीत मंगलकलश व चंद्र सूर्य कोरले आहेत. खाली लेखासाठी चौकट सोडली आहे. त्याखाली चौकटीत उजवीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर गाढव आरूढ झालेला दाखविला आहे. या शिल्पाच्याशेजारीच याच आकाराची सतीशिळा आहे. यावर स्तंभातून प्रगटलेले कोपऱ्यापासूनचा हात, त्यावरील भागात वीरासनात मंचकावर बसलेले व शिवपूजा करण्यात गुंतलेले पती, पत्नी दिसतात. हाताखालच्या भागात घोडयावर बसून जाणारी सती वशेजारी उभ्या असलेल्या व्यक्तींच्या डोक्यावरील टोपलीतून धन वाटणारी सती, व सर्वात खालच्या चौकटीत मृत पतीसोबत ज्वाळेत बसलेली स्त्री दिसते. या शेजारच्या शिल्पाचा शीर्षभाग त्रिकोणाकृती व चंद्र-सूर्य आहे. त्याखाली चौकटीत जोडपे दाखविले आहे व त्याखालचा भाग लेखासाठी मोकळा सोडला आहे. आधीच्या दोन्ही शिल्पांच्या तुलनेत जोडप्याचे हे शिल्प शैलीनुसार नंतरच्या काळातील वाटते. गद्धेगळ शिल्प अकराव्या व बाराव्या शतकातील, तर सतीशिळा तेराव्या अथवा चौदाव्या शतकातील वाटते.

या ठिकाणी आढळणारे वीरगळ आयताकृती व एका बाजूस कोरलेले व मुख्यतः एकाच टप्प्यातील आहेत. यातील काही भग्नावस्थेत आहेत. एक टप्प्यातील वीरगळ हातात खड्ग व ढाल घेवून हल्ला करण्याच्या पवित्र्यातला एकटा वीराचे असून, तो कोणाशीही युध्द करताना दिसत नाही. एका वीरगळावरील वीर महिष वर्गातील बहुधा गवा या प्राण्याशी दोन

हात करताना मृत्यूमुखी पडलेला दिसतो. शिल्पशैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकाच्या नंतरचे असावे. कदाचित या काळात या भागात गवा प्रकारचे वन्यप्राणी असावेत. या तालुक्याचे म्हसळा हे नावहीअर्थपूर्ण आहे. येथे जोडपी असलेली अनेक शिल्पे आहेत. ही शिल्पे झीज झालेली व काहीशी भंग पावलेली आहेत. कठडयाजवळची एकूण सर्व लहान मोठी शिल्पे मिळून ८२ आहेत.

या मंदिरासमोर एक दुसरे मंदिर आहे. येथे उमामहेश्वर, विष्णू व पार्वती यांच्या सोबत काही भग्न शिल्पे ठेवलेली आहेत. उमा महेश्वर शिल्प अत्यंत मोहक पण काहीसे झीज झालेल्या प्रकारचे आहे (छायाचित्र क्रमांक २९). शिव व पार्वती स्थानक व त्रिभंग अवस्थेत असून त्यांच्या चेहऱ्याचे तपशील नष्ट झालेत. शिवाच्या डाव्या बाजूस दोन हातांची पार्वती आहे. तिच्या डाव्या हातात बहुधा आरसा व उजवा हात भग्न झालेला आहे. तिची केशरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. दोघांनीही पायात नुपूरे, कानात, गळयात अलंकार घातले आहेत. तिच्या डाव्या पायाशी चामरधारीणी व नृत्य करणारा चार हातांचा गणेश आहे. शिवाचे चार हात असून खालच्या उजव्या हाताचा पंजा तुटला आहे. वरच्या हातात त्रिशूळ, डाव्या हातात एक फणाचा नाग आहे. डाव्या खालच्या हाताने त्याने पार्वतीस अलिंगन दिले आहे. दोघांच्याही कमरेला कटीवस्त्र आहे. शिवाच्या उजव्या पायाजवळ त्याचे वाहन नंदी व एक चामरधारीणी आहे. शिवाच्या गळयातील यज्ञोपवपित त्याच्या गुढघ्यापर्यत आलेले दिसते. शिवाने किरीट प्रकारचे शिरोभूषण घातले असून, त्याचे तपशील नष्ट झाले आहेत. या शिल्पाची पाठशिळा रेखीव व फुलांच्या वेलबुटीने बनली आहे. तिच्या शीर्षभागी कीर्तिमुख दिसून येते. या वेलबुट्टीची नक्षी दोन्ही बाजूच्या स्तंभावर आधारलेली आहे.

स्तंभाच्या शीर्षभागी दोन देवळया असून शिवाच्या बाजूच्या देवळीत बहुधा ब्रम्हाची सूक्ष्म मूर्ती असावी तर पार्वतीच्या बाजूस स्त्री देवतेचे शिल्प असावे. स्तंभाच्या वरच्या बाजूस व्याल आहेत. याशिवाय या ठिकाणी भग्नावस्थेतील विष्णू प्रतिमा आहे. विष्णू समभंग, स्थानक व चार हातांचा आहे. याचे चारही हात भग्न आहेत. चेहरा, पाठशिळेचा काही भाग, मुखभाग व पायापर्यंतचा भाग चांगल्या अवस्थेत आहे. विष्णूच्या पायालगत डावीकडे पद्मधारी लक्ष्मी व हातात फळ घेतलेला गण, उजव्या पायाशी गरूड व दुसरा गण आहे. अत्यंत रेखीव असलेली ही मूर्ती काळाच्या ओघात भंग व झीज झालेली आहे. शिल्पशैलीवरून उमामहेश्वर व विष्णू मूर्ती अकराव्या शतकातील असावी.

या मूर्तीला टेकवून ठेवलेली व काही प्रमाणात भग्न झालेली एक स्त्री मूर्ती आहे. चार हातांची, समभंग अवस्थेतील ही स्त्री प्रतिमा तिच्या वरच्या हातात असलेल्या नागावरून पार्वतीची असावी. या शिल्पाच्या दोन्ही बाजूस सेवक दाखविले आहेत. शिल्पशैलीवरून मात्र हे शिल्प नंतरच्या काळातील असावे.या मंदिराबाहेर एक सुंदर व नक्षीदार पायाचा दगड पडला आहे. हा त्रिकोणी घटकयुक्त, कुंभ, कर्णिका असलेला आहे. त्याच्या अंतर्पत्र भागात उभ्या चौकटच्या प्रतिमा आहेत. याचा कालखंड बाराव्या शतकाचा असावा.

मंदिराला लागून जांभ्या दगडातील पुष्करणी होती. ही लोकांनी पुन्हा बांधून काढली आहे. या मंदिराजवळ बागेत एक त्रिभंगावस्थेतील स्थानक शिल्प आहे. कमरेपासून भंग झालेल्या या शिल्पाची अत्यंत झीज झाल्यामुळे या शिल्पाची ओळख पटत नाही. परंतु मुक्तजटा व डोक्यामागे असलेला तीन फणांचा नाग यामुळे ही मूर्ती शिवाचे रूप असलेल्या भैरवाची असावी.

या ठिकाणी परिसरात लाल व काळया खापरांचे अवशेष सापडतात. तसेच काळया बांगडया व एकसेंटीमीटर जाडीच्या व दहा ते बारासेंटीमीटर रूंदीच्या पसरट कौलांचे तुकडे आढळतात.

मंदिराच्या काहीसे उत्तरेस धावीर या देवतेचे स्थान आहे. घोडयावर बसलेली व दोन हातांची ही प्रतिमा, ढाल व तलवार धारण केलेली आहे. शिल्पावर मराठा काळाचा प्रभाव आहे. या गावाच्याशेजारी वावे पंचतन नावाचे गाव आहे. येथे पंचायतन म्हणजे पाच देवतांच्या मंदिराचा समूह वा एकाच मंदिरात पाच देवता स्थापिल्या असाव्यात.

**दांड्गुरी** (18° 7'54” N, 73° 0'52” E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस नऊ किलोमीटर अंतरावरील या गावातून वाकळघरकडे जाताना रस्त्याच्या डाव्या बाजूस जाळी व झाडीमध्ये अनेक लहानमोठी शिल्पे आहेत. यात आयताकार व एक टप्यातील वीरगळही पहायला मिळतात. अत्यंत खराब अवस्थेतील हे तीन वीरगळ हातात दुधारी खड्ग व ढाल घेवून वार करण्याच्या पवित्रात उभा असलेल्या एकटया वीराचे आहेत. पद्मासनात व नमस्कार मुद्रेतील दोन पुरुष शिल्पे, तसेच एका शिळेवर एक जोडपे दाखविले आहे. एकंदर शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत.

**खुजारे** (18° 9'1" N, 73° 0'34" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस १२ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. खुजारे गावातील पुरावशेष गायवासरू या शिल्परूपाने पहायला मिळतात. हा आयताकृती शिळेचा शीर्षभाग व तळभाग भग्न झालेला आहे. चंद्र व सूर्य यापैकी सूर्याची आकृती दिसते. डावीकडे तोंड केलेल्या गाईचे शिल्प चौकटीत कोरले आहे. तळभाग भग्न असून शिल्लक भागावर लेखाचे अवशेष नाहीत. शैलीवरून हे शिल्प अकराव्या व तेराव्या शतकातील असावे.

**वांजळे** (18° 9'4" N, 73° 2'8" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस १२ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाच्यामागील टेकडीवर संरक्षक वसाहत आहे. ही वसाहत मदगडकिल्ला या नावाने ओळखली जाते. उत्तर मध्ययुगीन काळातला हा किल्ला आहे. या गडावर शहाजीराजे वास्तव्यास होते (रायगड गॅझेटिअर १९९३: ८१७). गडाचे ऐतिहासिक उल्लेख अठराव्या शतकातील कागदपत्रात येतात. गावात वांजळाई देवीचे स्वयंभू स्थान आहे. किल्ल्यावरील तटबंदी व इतर बांधकामे जांभ्या दगडात केली आहेत. अनेक इमारतीचे चांगले चौथरे आहेत (छायाचित्र क्रमांक ३२). परंतु झाडी झुडुपे वाढली असल्यामुळे या अवशेषांचे स्वरूप लक्षात येत नाही.

**वडघर (18° 4'48" N, 73° 4'28" E )**

श्रीवर्धनच्या ईशान्येकडे सहा किलोमीटर वडघर गावातील टेकडीवर गायरान भागात गाय आणि वासराचे शिल्प आहे. शिल्पशैलीवरून याचा काळ अकरावे किंवा बाराव्या शतकाचा असावा.

**वाळवटी बुद्रुक** (18° 4'32" N, 73° 0'12" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस समुद्र किनारी चार किलोमीटर अंतरावर पूर्वेकडून वाहत येणाऱ्या नदीच्या काठावर हे गाव वसले आहे. या गावातील महालक्ष्मी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. येथे महालक्ष्मीची मूर्ती म्हणजे एक गजलक्ष्मीचे वैशिष्ट्यपूर्ण पण झीज झालेलेशिल्प आहे. हे शिल्प सुमारे एक मीटर आहे.शिळेच्या शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती आहे. पद्मासनातबसलेल्या लक्ष्मीला दोन हत्ती आपल्या चारही पायांवर उभे राहून देवीला अभिषेक करत आहेत. हे हत्ती एका स्तंभावर उभे आहेत. स्तंभाच्या बाहय अंगास दोन्ही बाजूस मकरमुखे आहेत. स्तंभाच्या बाजूस दोन ते तीन गण कोरले आहेत. शिल्पशैलीवरून हे शिल्प अकराव्या शतकातील

असावे. पावसाळ्याच्या दिवसात ओढ्यालगत आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील खापरे आढळून येतात.

**पुनीर** (18° 5'3” N, 73° 1'1” E )

पुनीर या गावाच्या बाहेर एक दर्गा, माळेश्वरी व पुनाई या गावदेवीचे मंदिर आहे. अत्यंत झीज झालेली दोन शिल्पे असून पुरातत्त्वीय दृष्टीने महत्वाचे काहीहीअवशेषआढळले नाहीत.

**बोर्ली पंचतन** (18° 10'14” N, 73° 0'35” E )

येथे पाच पीरांच्या कबरी आहेत म्हणून याला पंचतन म्हणतात. हे ठिकाण श्रीवर्धनच्या उत्तरेस १३किलोमीटर अंतरावरआहे.येथील गावदेवी चीचबादेवीच्यामंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, मंदिराच्या बांधकामासाठी घेतलेल्या खड्यामध्ये व साफसफाई दरम्यान अनेक पुरावशेष उजेडात आले. हे अवशेष मंदिरा शेजारच्या कठड्यावर ठेवलेले आहेत. सुमारे १५ ते ४० सेंटीमीटर लांबी व रूंदीची ही लहान मोठी शिल्पे आहेत. या ठिकाणी वीरगळ, जोडप्याचेशिल्प, पद्मासन व नमस्कार मुद्रेतील पुरूष शिल्पे अशी मानवी शिल्पे आहेत. जुन्या मंदिराच्या शिखराचे आमलक व त्यावर ठेवलेला कलशासारखे वास्तू घटकही आहेत. शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारण्याच्या शिळा येथे आढळतात.काही वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस कोरलेले एकाच टप्प्यातील अशा प्रकारचे आहेत. हातात खड्ग व गोल ढाल घेतलेला वीर वार करतानादिसतो. असे सहा ते सात वीरगळ आहेत. याशिवाय उजव्या हातात दंड घेतलेली व डावा हात मोकळा सोडलेली दोन हातांची फारशी रेखीव नसलेली स्त्री प्रतिमा येथेही आढळते. मंदिराच्या सज्जाचे भाग, अर्धवर्तुळाकृती कोरीव भाग देखील पाहायला मिळतात. गावातील चीचबादेवीचे माहेर असलेल्या मंदिराजवळ गायवासरू शिल्प येथे भग्नावस्थेत व भिंतीत चिणले गेलेले दिसते (छायाचित्र क्रमांक २७). शिल्प शैलीवरून गायवासराचे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे. या गावाचा उल्लेख दिवे आगर येथे मिळालेला सन १०५३ चा ताम्रपटात ‘वोरीतली’ या नावाने आला आहे. त्यात या गावाचा दिवे आगरची एक वाडी म्हणून उल्लेख आहे (मिराशी १९७४: १२७-१३०).

**दिवे आगर (**18° 11'0” N, 72° 59'4” E )

दिवे आगर हे श्रीवर्धनच्या उत्तरेस समुद्र किनारी वसलेले गाव आहे. सुमारे ३ किलोमीटर दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम ५०० मीटर रूंदीच्या या चिंचोळया भूभागात वैशिष्ट्यपूर्ण शिल्पावशेष विखुरले आहेत. या ठिकाणी प्राचीन काळापासूनच वसाहत झाल्याचे पुरावे

मिळतात. गावाचे नाव अकराव्या शतकातील ताम्रपटातून येते. या भागात एकूण पाच ताम्रपट व एक शिलालेख सापडला आहे. ताम्रपटाची भाषा संस्कृत व लिपी जुनी देवनागरी आहे. सर्वात प्राचीन ताम्रपट सन ७२७-७२८ चा असून गुजरात चालुक्य नृपती जयाश्रय मंगलरस याच्या काळातील संस्कृत ताम्रपट आहे. दुसरा संस्कृत ताम्रपट गंगनृपती दुर्विनित याचा व बहुधा पाचव्या शतकातील असावा. तिसरा ताम्रपट शिलाहार नृपती छित्तराजचा देवनागरी लिपीतील सन १०२७ चा आहे. चौथा ताम्रपट शिलाहार नृपती मुम्मुणिराजाचा सन १०५७ चा आहे. पाचवा ताम्रपट सन १०६० चा असून यात कोणत्याही राजवंशाचा उल्लेख नसून तत्कालीन ग्रामव्यवस्थेने दिलेले शासन आहे. येथील शिलालेख म्हणजे सन १२५४ मधील शिलाहार अनंतदेव याचा आहे. हा शिलालेख म्हणजे सध्या श्री. बाळ जोशी यांच्या जागेत असलेला गद्धेगळ लेख होय (रायगड गॅझेटिअर १९९३: ७९३, मिराशी १९७४ ३०६ – ३०८).

या ठिकाणी एका वाडीत गणपतीचा सोन्याचा मुखवटा सापडला आहे. हा मुखवटा ज्या पेटीत होता, ती तांब्याची पेटीही सापडली आहे. या पेटीवर एक लेख आहे. देवनागरी लिपीतील या लेखाचा काळ अकराव्या शतकाचा ठरला.या सुवर्ण गणेशाचा काळही अकराव्या शतकाचा ठरतो (कानिटकर २०१४: ६२-६३). सध्या हा सोन्याचा मुखवटा चोरीला गेला आहे. दिवे आगरमध्ये बसस्थानकाजवळील शिवाजी पुतळयाजवळ गजलक्ष्मीचे सुमारे एक मीटरपर्यंत लांब व रूंद परंतु भग्न शिल्प आढळून येते. या ठिकाणी शुष्कसांधी तंत्र वापरून केलेल्या मंदिराचा भग्नावस्थेतील चौथरा आहे. शैलीवरून हे शिल्प दहाव्या अथवा अकराव्या शतकातील असावे. या मंदिराच्या ४० मीटर उत्तरेस दिव्याचीवाडी येथे पूर्वी दीपस्तंभ होता. या ठिकाणी आपोआप दिवा लागत असे किंवा देव उत्तरेश्वर दिवा लावत असल्याची आख्यायिका सांगितली जाते. 'व्याडेश्वर महात्' सारख्या स्थानपोथीत या बाबत उल्लेख आल्याचे सांगतात. कोण्या कनोजी ब्राम्हणाने पंधराव्या शतकात या गावाचे पुनर्वसन केल्याचेही यात दावा आहे. या ठिकाणच्या पेटणाऱ्या दिव्यावरून या गावास दिवे आगर हे नाव पडले असे मानले जाते. या ठिकाणी एक चौकोनी खांबाच्या आकाराची व शीर्षभाग सपाट असलेली ७५सेमी उंच व ३५ सेंटीमीटर रुंद वीरगळ सदृश्य कोरीव शिळा आहे. या शिल्पाच्या दोन बाजू शिल्पांकित आहेत. यात चौकटीत एका बाजूवर चार हातांच्या महिषासुरमर्दिनी प्रकारचे शिल्प, तर त्याच्या डाव्या बाजूच्याचौकटीत गणेश प्रतिमा आहे. दोन्ही शिल्पे झीज झालेली असली, तरी शैलीवरून अकराव्या शतकातील वाटतात. महिषासुरमर्दिनी शिल्पाच्या खाली अजून एक

चौकट असावी, पण हा भाग सध्या सिमेंटमध्ये बसविला गेल्याने या बाबत निश्चितभाष्य करता येत नाही. हा एखाद्या वास्तूचा सुटा भाग असावा.

या ठिकाणाहून सुमारे ४०० मीटर वायव्येस समुद्र किनारी उत्तरेश्वर हे शिवमंदिर व काळभैरव या स्थानिक देवतांच्या मंदिरांचा समूह आहे. हा भाग सध्या पूर्णपणे जीर्णोध्दार झालेल्या अवस्थेत आहे. मंदिरातील गाभारा खोल असून चौकोनी तलाविन्यात असलेल्या गाभा-याच्या भिंतीव साध्या सपाट आहेत. गाभाऱ्यावर फासना पध्दतीचे दहा थर असून प्रत्येक थराच्या कोप-यातव मध्यभागी वरील बाजूस पाकळी प्रकाराचे तीन अर्धवर्तुळे आहेत. याचे बांधकाम अठराव्या शतकात झाले असावे. मंदिरातील नंदी व इतर शिल्पे अलिकडच्या काळातील आहेत. आज येथे जांभ्या दगडातील कलात्मक मंदिरे आधुनिक काळात उभारण्यात आली आहेत. या जीर्णोध्दाराच्या काळात येथे घेतलेल्या खडयांमध्ये प्राचीन शिल्पावशेष आढळले आहेत: यातील उल्लेखनीय अवशेष पुढीलप्रमाणे आहेत. मंदिराच्या शिखराचे वास्तू घटक, गणेश प्रतिमा, दोन भग्न शैव प्रतिमा, स्तंभशीर्ष, ७५ सेंटीमीटर उंच व ४० सेंटीमीटर रूंद शिळेवर कोरलेले शैव दांपत्य या आयुधांची झीज झाल्यामुळे हे कोणत्या देवतेचे आहे ते लक्षात येत नाही. स्थानक व त्रिभंग अवस्थेतील एक शिल्प आहे. दुसऱ्या ८० सेंटीमीटर उंच व ५५ सेंटीमीटर रूंद शिळेवर शैव प्रतिमा आहे. हे शिल्प स्थानक अर्धसमभंग अवस्थेत चार हातांचे पुरुषशिल्प आहे. त्यांच्या पायाजवळ दोन्ही बाजूस सेवक उभे आहेत. यातील वरच्या उजवीकडील भाग भग्न आहे. उजवी कडील सेवकाजवळ नंदी प्रतिमा दिसते. यावरून हे शिवाचे एक रूप असावे. या शिल्पशैलीवरून ही शिल्पे दहाव्या शतकातील नक्कीच असावीत.

या गावाच्या सावित्रीवड पाखाडी येथे गौठणेश्वर हे शिवमंदिर आहे. या ठिकाणाचा जीर्णोध्दार झाला असून मंदिरातील भग्न शिल्पे मंदिराबाहेर ठेवली आहेत. येथे जांभ्या दगडात बांधलेली पुष्करणी पाहायला मिळकते. पुष्करणीचे बांधकामावरून बाराव्या शतकापूर्वीचे वाटते. येथील भग्न शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील असावीत.

गौतमेश्वर मंदिराच्या पुढे उत्तरेकडे पंचमुखी महादेवाचे मंदिर आहे. आधुनिक बांधणीच्या मंदिरात शिवलिंग व नंदी आहे. परंतु एक वैशिष्ट्यपूर्ण व अनोखे असे, ७५ सेंटीमीटर लांब व ३७ सेंटीमीटर रूंद शिल्प या ठिकाणी आहे. हे सर्वतोभद्र प्रकारचे शिल्प असून, या शिल्पाच्या चारही बाजूस स्थानक मूर्ती कोरल्या आहेत. या शिल्पावरून या मंदिराला पंचमुखी महादेव म्हटले जाते. एका बाजूस दोन हातांची स्थानक व समभंग अवस्थेतील, काहीशी तुंदिलतनू दाढी-मिशी असलेली, धोतर परिधान केलेल्या पुरुषाची प्रतिमा

आहे. याने आपल्या उजवा हात व्याख्यान मुद्रेत धरला असून, यात बहुधा रूद्राक्षमाळ किंवा दोरीसारखे काहीतरी असावे. डावा हात कोपऱ्यात वाकवून बोटाने त्या दोरीचा एक भाग पकडला आहे. दुस-या बाजूस चार हातांचे स्थानक व समभंग अवस्थेतेतील स्त्री शिल्प आहे. हिच्या चार हातांमध्ये खालच्या उजव्या हातात कपाल, वरच्या उजव्या हातात खड्ग, वरच्या हातात खेटक तर खालचा डाव्या हात अभय मुद्रेत आहे. देवीच्या उजव्या पायाशी तिचे वाहन सिंह बसले आहे. यावरून ही दुर्गेची मूर्ती असावी. तिस-या बाजूस स्त्री आणि पुरुष यांची जोडी आहे. हे जोडपे दोन हातांचे स्थानक व त्रिभंग अवस्थेत आहेत. पुरुषाच्या उजव्या हातात बाणासारखे आयुध, तर डाव्या हातात धनुष्य आहे. पुरुषाच्या उजव्या पायाजवळ त्याचा सेवक बसला आहे. चौथ्या बाजूस दोन हातांच्या पुरुषाची स्थानक अर्धसमभंग अवस्थेतेतील प्रतिमा आहे. त्याच्या उजव्या हातात अनोळखी वस्तू तर डाव्या हातात दंड धारण केला आहे. शिल्पाची झीज झालेली असली तरी हे शिल्प मंदिराच्या महत्वाच्या वास्तूघटकाचा भाग असावा. तो शैलीवरून दहावे किंवा अकरावे शतकातील असावा. दिवे आगर ग्रामपंचायत कार्यालयासमोर निजामशहाच्या काळातील एक शिलालेख आहे.याच्या काही ओळी फारसी व काही ओळी मराठीतील असून या जागेला ध्वजाचा दगड असेही म्हणतात (छायाचित्र क्रमांक ३०).

याशिवाय गावातील सिध्दनाथभैरव व केदारनाथ भैरव मंदिराजवळील काहीशिल्पेआहेत, पण शिल्पशैलीवरूनमागील शतकातील असावीत. या ठिकाणास भानुकादेवीचे स्थान असेही म्हटले जाते. येथे चैत्र शुध्द चतुर्दशी पौर्णिमेस यात्रा भरते. या यात्रेत भक्ताला बगाडावर गळ टोचण्याची पारंपारिक प्रथा येथे आहे.

**वडवली** (18° अकरा'58" N, 73° 0'24" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस १६ किलोमीटरअंतरावर वडवली गाव आहे. वडवलीची जांभूळकरीन हिच्या स्थानाजवळ अलिकडच्या काळातील शिल्पे आहेत. अनेक पांडवकालीन शिल्पे वडवली धरणात बुडाली असल्याचे गावकरी सांगतात.

**शिस्ते** (18° १०'51" N, 73° 0'32" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस १६ किलोमीटर अंतरावरशिस्ते गाव आहे. गावात आधुनिक काळातील गणेश मंदिर आहे. गावाच्या मागे जाखमातेचा डोंगर आहे. लोक याला डुंग किंवा जखमातेचा गड असे म्हणतात. याच्या उत्तर बाजूस जाकमातेचे तांदळा असलेले नैसर्गिक स्थान आहे.

टेकडीच्या सपाटीवर दोन साधे चौथरे आहेत. पण येथे कोणतेही महत्त्वपूर्ण अवशेष आढळत नाहीत. टेकडीच्या पश्चिम बाजूस कड्यामध्ये कातळ कोरीव पाण्याच्या टाक्या खोदलेल्या आहेत. त्यांच्या स्वरूपावरून त्या इसवीसनाच्या सुरुवातीच्या शतकातील असाव्यात. या टेकडीचा उपयोग पूर्व मध्ययुगीन काळात टेहेळणीसाठी झाला असावा. एकंदर स्वरूपावरून ही एक उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील संरक्षक वसाहत असावी. या गावाचा उल्लेख दिवे आगर येथे सापडलेल्या अकराव्या शतकातील ताम्रपटात स्थितीपुरी म्हणून आला आहे (देव १९८४ :१९२-१९३)

**वेळास** (18° 12'20" N, 72° 59'10" E )

श्रीवर्धनच्या उत्तरेस १८ किलोमीटर अंतरावर वेळास आहे. वेळास गावात एक दर्गा असून येथे जांभ्या दगडातील जुना चौथरा होता. तो आता बांधून काढला आहे. या चौथ-याचा वरचा थराला कोप-यावर व अधे मधे अर्धवर्तुळाकृती भाग होते. या ठिकाणी असलेल्या दर्ग्याचे अवशेष शुष्कसांधी बांधणी तंत्र वापरून उभारलेले दिसतात. परंतु कोणतेही अलंकरण शिळांवर नाही. शेजारी करवंदाच्या जाळीत पिंपळपानाच्या आकाराचे तीन ते चार दगड आहेत. या आकाराचे दगड, बेने इस्त्रायली लोकांच्या कबरीजवळ आढळून आले आहेत. या ठिकाणाहून गौरी गणपतीच्या सणात, परंपरेप्रमाणे गौरींना येथून घरी पूजेसाठी नेण्याची प्रथा आहे.

**वेळास आगर** (18° 12'9" N, 72° 58'42" E )

दिवे आगर येथे सापडलेल्या शिलाहार नृपती छित्तराजचा सन १०२७ च्या ताम्रपटात या गावाचा उल्लेख वेलासीवागर म्हणून येतो (मिराशी : १९७१-७६). या गावात पुरावशेष मोठयासंख्येने आढळतात. गावात गाढवशेत नावाचे शेत असून या ठिकाणी वैशिष्ट्यपूर्ण गध्येगळ शिल्प आढळते. शिल्प भग्नावस्थेत असून, दोन तुकडयांच्या स्वरूपात आहे. एक तुकडा ७१ सेंटीमीटर लांब व ३२ सेंटीमीटर रूंद आहे. या तुकडयावर उजवीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ झालेला गाढव दाखविला आहे. या शिल्पाची विशेष बाब म्हणजे येथे या गाढवाच्या मागच्या बाजूस कुत्र्यासारखा प्राणी,बहुधा कुत्राच दाखविला आहे. एक पुरुष त्या स्त्रीस मुखमैथुन करण्यास लावत आहे. वरचा भाग सपाट असून डावीकडून उजवीकडे तिरपा तुटला आहे. दुसऱ्या भग्न तुकडयाच्या शीर्षभागी पीठावरील मंगलकलश आहे. या शिल्पाची एकूण लांबी सुमारे एक मीटर इतकी असावी.

गावातील आणखी उल्लेखनीय शिल्पेगावातील शिवमंदिर व काळभैरी मंदिर परिसरात सापडतात. येथे गजलक्ष्मी, दोन भग्न नंदी, तीन आयताकृती वीरगळ योनीपीठ आढळून येतात. गजलक्ष्मी शिल्प हे ७२ सेंटीमीटर लांब व ५० सेंटीमीटर रूंद शिळेवर कोरले आहे.या शिळेचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकुती असलेला आहे. या शिल्पास सिमेंट लावून ते सांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शिल्पाशेजारी दोन भग्नावस्थेतील वीरगळ आहेत. या चौथ-यासमोर तिसरा वीरगळ तीन टप्यात आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकराव्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंतची असावीत. या गावाच्या मागे टेकडीवर खडकात लेणी कोरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. हे काम अर्धवट सोडलेले पहायला मिळते. लोकांच्या मते हे काम पांडवकाळात भीमाने केले आहे. या गावात आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील खापरे आढळून येतात.

## ३.७ महाड तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत (नकाशा क्रमांक ५)

**महाड** (18° 4'N, 73° 25'E)

महाड हे तालुक्याचे ठिकाण असून वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थितीमुळे या ठिकाणाला कायमच प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. सावित्री व गांधारी या नद्याच्या संगमावर हे गाव वसले आहे. सावित्री नदी महाबळेश्वरला उगम पावून समुद्राला बाणकोट याठिकाणी मिळते. भरतीचे पाणी अगदी महाडपर्यंत येते या भागाला बाणकोटची खाडी म्हणतात. खाडीमार्गे समुद्र किनारा सुमारे ५० किलोमीटर अंतरावर आहे. आज खुद्द महाड शहरात महत्त्वपूर्ण पुरावशेष मोठ्या प्रमाणावर आढळत नसले, तरी आजूबाजूच्या परिसरात सापडतात. महाडजवळचे पाले गाव आद्य ऐतिहासिक काळात एक अंतर्गत बंदर म्हणून प्रसिद्ध होते. पाले व कोल या गावातील इसवीसनाच्या सुरुवातीच्या शतकातील लयन समूह महाडचे ऐतिहासिक महत्त्व पटून देतात. या दोन्ही लयन समूहांना आश्रय देणारे नगर म्हणून महाड प्रसिद्ध असावे. याचे पुरावे महाड शहराच्या जुनी बाजारपेठ, गवळ आळी, कोट आळी, काजळपुरा आणि खालचा मोहल्ला या ठिकाणी इमारतींच्या बांधकामासाठी होणाऱ्या खोदकामामध्ये आद्य ऐतिहासिक काळातील खापरांच्या रूपाने सापडतो. यामध्ये विविध प्रकारच्या थाळ्याचे तुकडे, पिण्याचे कप, हस्तीदंती व शंखांच्या बांगड्याचे तुकडे यांचा समावेश होतो. महाड मधील कोट आळीतील जाखमाता मंदिर परिसरात व गवळ आळी परिसरात मोठ्या संखेने काळ्या व चकतीच्या आकाराच्या द्विरंगी तसेच अनेक रंगी बांगड्याचे तुकडे सापडतात. याशिवाय महिकावती देवी मंदिराजवळील मोहल्ल्यातील एका

घराचे काम चालू असताना आद्य ऐतिहासिक मृदभांड्यांची खापरे, भग्न हस्तिदंती फणी व काही भाजलेल्या मातीचा चौकोनी शिक्का व एका खेळण्याचा पाय इत्यादि उल्लेखनीय अवशेष सापडले आहेत.

महाड शहरातील कोट आळीतील कोर्टाचे काम खुद्द सोळाव्या शतकातील आहे. या ठिकाणी असलेल्या दत्त मंदिराच्याशेजारी आयताकृती व तीन टप्यात कोरलेले तसेच एक बाजू शिल्पांकित केलेल्या, दोन वीरगळाचे झीज झालेले अवशेष आहेत. याशिवाय भीमनगर बौद्धवाडी येथे झीज झालेले दोन वीरगळ तर नवेनगर येथील हनुमान मंदिराजवळ आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेला एक वीरगळ आहे. या सर्व वीरगळांच्या एकंदर रचनेवरून व शिल्पशैलीवरून त्यांचा काळ बाराव्या शतकाचा ठरवता येतो. श्री वीरेश्वर हे महाड शहराचे ग्रामदैवत मानले जाते. वीरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार जरी मराठा काळाच्या उतरत्या काळात झाला असला तरी येथे शिलाहार काळातील शुष्कसांधी बांधीव तंत्राने दगडात उभारलेले मंदिर असावे. मूळ मंदिराची द्वारशाखा आजच्या मंदिराला उपयोगात आणलेली दिसते. ही द्वारशाखा बहुशाखी असून, मुख्य स्तंभ शाखेच्या तळाशी गजलक्ष्मी व उमामहेश्वर याची सूक्ष्म शिल्पे आहेत. या मंदिरा बाहेरील ढालकाठीची जागा या ठिकाणी आयताकृती शिळेवर तीन टप्पे कोरलेला एक वीरगळ व फक्त वरचा एकच भाग शिल्लक राहिलेला वीरगळाचा भग्न तुकडा बघायला मिळतो. त्यांच्या शिल्पशैलीवरून ते चौदाव्या शतकातील असावेत. या शिवाय एका आयताकृती फरशीवर गळयापर्यंत चारमुखे कोरलेली पाहायला मिळतात. वीरेश्वर मंदिराचा भाग पूर्वी महाडची स्मशानभूमी होती (छायाचित्र क्रमांक ४३). या ठिकाणी देवी महालक्ष्मी कोटेश्वरी मंदिराचे जीर्णोद्धाराचे कामाचे वेळेस मानवी हाडांचे व चकतीच्या आकाराच्या बहुरंगी बांगड्यांचे तुकडे आढळले, काही तांब्याची नाणी देखील सापडली. कोटेश्वरी महालक्ष्मी देवीचे काळ्या पाषाणातील झीज झालेले हे शिल्प गजलक्ष्मी प्रकाराचे आहे. मंदिराच्या समोरील मोठ्या तलावाच्या पश्चिम बाजूस वेताळ आळीजवळ एका स्तंभाचा सुमारे एक मीटर लांबीचा भाग पडला आहे. त्याचा घटकक्रम शिलाहारशैलीचा म्हणजे खाली चौकोनी त्रिकोणयुक्त तळखडा वर चौकोनी खांब त्यावर अष्टकोनी खांब, वर गोलाकार भाग व कर्णिका असा आहे. येथेच प्राचीन पद्धतीच्या आमलकाचे अवशेष देखील पडले आहेत.

बाजारपेठेतील साठे वखारीजवळ एक मीटर लांबीचे योनीपीठ व बालाजी मंदिर येथील सावतबुवा ठिकाणी बहुतांश जमिनीत गाडले गेलेले तीन वीरगळ आहेत. चौदारतळ्या जवळील शहाबहीरीच्या दर्ग्यामागे प्राचीन पद्धतीच्या मंदिराची दगडात कोरलेले लहान प्रतिकृती पडली

आहे. याचे शिखर व जंघा भाग वेगवेगळे आहेत. हे मोठ्या मंदिराचे लघुरूप असले, तरी याचे खुर, कुंभ, कर्णिका, जंघा असे थर आहेत. गर्भगृहाच्या तीनही जंघेत देवकोष्ठ आहे. मकरप्रणाल दाखवले आहे. मंदिराचा कळस हा नागर शिखर शैलीचा आहे. हे एक प्रकारचे सुटे शिल्प आहे.

महाडच्या उत्तरेकडील साहिलनगर या टेकडीत काही कातळात कोरलेली लेणी पाहायला मिळतात (छायाचित्र क्रमांक ४५). ही लेणी फक्त मंडप खोदून पुढील खोदकाम अर्धवट सोडलेले आहे. स्थापत्य शैलीवरून ही लेणी दुसऱ्या शतकातील असावीत.

**महिकावती मंदिर** (18° 04′41.1″ N,73° 24′41″ E)

महाडच्या पश्चिमेस मोहल्ल्यातील बंदरावर महिकावती या महाडच्या एका गावदेवीचे मंदिर आहे. हे मंदिर शिलाहारांच्या काळात उभारले असावे. मंदिर मूळात एका दीड मीटर उंच चौथऱ्यावर उभारले होते, असे दिसते. मंदिराचा आकार बारा मीटर लांब व बारा मीटर रुंद असावा. कळस पडलेल्या या मंदिराचे उध्वस्त रूप पाहता येते. मंदिराच्या भिंती शिल्लक आहेत. त्यावर कोणतीही शिल्पे नाहीत अथवा अलंकरण नाही. मंदिराची द्वारशाखा काहीशी अलंकारिक म्हणजे त्रिशाखीय आहे. यात पहिली पत्रशाखा दुसरी ठळक अशी स्तंभशाखा व तिसरी मणीशाखा. या स्तंभशाखेची रचना शिलाहार काळातील शैली सारखी आहे. उंबऱ्यावरील कीर्तीमुख गायब आहे. सिद्दीच्या काळात हे मंदिर उध्वस्त केले गेले असावे. मंदिर सध्या एकगर्भ पद्धतीचे दिसते. आयताकृती तलविन्यास असलेल्या मंदिराच्या आतील भागातील कोपऱ्यात लाकडी खांब असावेत कारण कोपऱ्यात खांबांसाठी खोबणी ठेवल्या होत्या त्या आज रिकाम्या आहेत. या मंदिराशेजारी नुकत्याच झालेल्या एका वास्तूच्या खोदकामात अनेक खापरे आढळून आली. या मंदिर परिसरात शुष्कसांधी बांधीव मंदिराच्या शिळांचे तुकडे आढळतात. असे मानले जाते की कुठल्यातरी खानाच्या हल्ल्यात बाटले जाण्याच्या भीतीने महिकावती देवीने सावित्री नदीत उडी मारली व ती पोहत राजघाटापर्यंत आली. आज या ठिकाणी महिकावती म्हणून एका शिल्पाची पूजा केली जाते. हे शिल्प म्हणजे एका वीरगळाचा भग्न तुकडा आहे.

बंदर (18° 4'39” N, 73° 24'38” E )

महिकावती मंदिराजवळ बंदर होते. अजूनही अगदी एकोणिसाव्या शतकात देखील भरतीच्या वेळेस मंगलोरी कौलांचा व्यापार येथे चालत होता. या ठिकाणी नदीस लागून मोठा धक्का

आहे (छायाचित्र क्रमांक ४२). दोन बुरुज असलेला हा धक्का जांभ्या दगडात १७ मीटर लांबीचा बांधलेला आहे. या दोन बुरुजा मधून पाण्यात उतरायला पायऱ्या आहेत. पश्चिम बुरुजाचे पाण्यावर दहा थर शिल्लक राहिलेले पाहायला मिळतात. याच बुरुजापासून गांधारी नदीच्या पूर्व किनाऱ्याला समांतर उत्तरेकडे एक तटबंदीसारखा धक्का सुमारे दहा मीटरपर्यंत जाऊन पुढे मातीत गायब झालेला दिसतो. तसेच पूर्व बुरुजाला लागून एक धक्का सावित्री नदीच्या उत्तर किनाऱ्याला समांतर घुसलेला दिसतो. या बुरुजाच्या पातळीत या भागात सगळीकडे जांभ्या दगडात फरसबंदी होती, ही फरसबंदी आता वारंवार येणाऱ्या पुराच्या गाळात मातीत गाडली गेली आहे.

महाडचा कोट

महाड शहराच्या पश्चिम भागात राजघाट येथील नवी महिकावती मंदिरापासून ते महिकावती मंदिरापर्यंत सावित्री नदीच्या बाजूने तटबंदी होती. आजही या भागाला कोटआळी असे म्हणतात. या तटबंदीला जीभीचा बुरुज, दर्याबुरुज, माडीचा बुरुज, हैदरी बुरुज, जाखमाता बुरुज, हुलमुखीचा बुरुज, दिंडीचा बुरुज, मदारी बुरुज, सूर्यबुरुज अशी नावे असलेले नऊ बुरुज होते. अगदी अठराव्या शतकापर्यंत अस्तित्वात असलेल्या या तटबंदीचे, बुरुजांच्या या संख्येवरून कोटाची विस्तीर्णता लक्षात येते (महाड नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथ, महाड १९६६). आज या परिसरात झालेल्या इमारतींच्या बांधकामामुळे कसलेही अवशेष शिल्लक नाहीत. कोटआळी भागात नदीपात्रात व घाटाच्या बांधणीसाठी वापरण्यात आलेल्या शुष्कसांधी बांधकामाच्या कोरीव शिळा पाहायला मिळतात. या शिळा मूळच्या तटबंदीच्या बांधकामाच्या असाव्यात. बुरुजांचे उल्लेख आणि येथे आढळणाऱ्या अवशेषांवरून या तटबंदीची लांबी सुमारे ९० मीटर लांब असावी. कोटआळीत झालेल्या इमारतीच्या बांधकामासाठी घेतलेल्या खड्यात विटांची बांधकामे केलेल्या इमारतींचे अवशेष आढळले. या परिसरात दगडी तेलघाण्याचे अवशेष, मसाला वाटायची जाती, इत्यादि अवशेष मिळतात.

**करंजखोल** (18° 5'39” N, 73° 25'5” E ))

हे ठिकाण महाडच्या उत्तरबाजूस एक किलोमीटर अंतरावर असून याठिकाणी गांधारपाले येथे विटीदांडू खेळताना पांडवानी मारलेली विटी पडली होती असे मानतात. या विटीचा अर्धा भाग त्या लेणींच्या पायथ्याशी असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. गावकरी ज्या 'विटी' बद्दल बोलतात, तो पाले लेणींच्या पायथ्याशी असलेला वज्रयान स्तूप आहे. याचा अर्थ अशाच

प्रकारचा दुसरा स्तूप या गावात कोठेतरी असावा. पण तो आज आढळत नाही. गावाजवळील शेतात लाल रंगाची खापरे आढळतात. येथील नातेखिंड जवळील भागात एक भग्न अवस्थेतील उल्लेखनीय शिल्प आहे. हे शिल्प महिषासुरमर्दिनीचे असावे एकंदर स्वरूपावरून वाटते. शिल्पाचे शीर व ढोपरपासूनचा भाग तुटला आहे. शिल्पशैलीवरून हे शिल्प दहाव्या ते अकराव्या शतकातील असावे.

**चांभारखिंड** (18° 5'N, 73° 25'E)

महाडच्या उत्तरेकडे दोन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. या गावाच्या सोमजाई या स्थानिक गावदेवी मंदिरातील शिल्पे अत्यंत झीज झालेली असल्यामुळे त्यांचे समीक्षण करता येत नाही. गावाच्या उत्तर बाजूस टेकडीवर चांभारगड किल्ला ही संरक्षक वसाहत आहे. आज किल्ल्यावर तटबंदी फारशी शिल्लक नसली तरी हा एक ऐतिहासिक काळातील महत्त्वपूर्ण किल्ला असावा. या गडाची उंची व क्षेत्र फारच कमी असले, तरी गडावर कातळात कोरीव पाण्याच्या नऊ टाक्या आहेत. यातील काही खांब टाक्या आहेत (छायाचित्र क्रमांक ४४).

गडाच्या पश्चिम बाजूस नैसर्गिक खिंड आहे. गडाची पश्चिम बाजू छिन्नीने तासून सपाट केली आहे. गडाची पूर्व बाजू म्हणजे खिंडीचा भाग छिन्नीने तासून मार्ग बनवला आहे. येथून गोंडाळा गावात जाता येते. या खिंडीसच पूर्वी चांभारखिंड म्हणत असावे व मग केंव्हातरी या नावाचे गाव गडाच्या दक्षिण उतारावर वसले असावे. या भागात गडाच्या उत्तर बाजूस जाण्यासाठी पायऱ्याचा मार्ग केला आहे. गडावरील सपाटीवर व गावात पावसाळ्याच्या दिवसात काळ्या रंगाच्या बांगड्यांचे तुकडे आढळतात. चौदाव्या ते पंधराव्या शतकातील बहुरंगी व द्विरंगी चकतीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडे सापडतात. अनेक मृदभांड्यांचे अवशेष येथे सापडतात. गडावरील खांब टाक्याचे स्वरूपावरून हा काळदहाव्या शतकानंतरचा केंव्हातरी असावा. चौदाव्या व पंधराव्या शतकात ही संरक्षक वसाहत विकसित झाली असावी. चांभारगडाचा उल्लेख कोणत्याच ऐतिहासिक कागदपत्रात आलेला नाही. काहींच्या मते पेशवेकालीन महेंद्रगड म्हणून महाड जवळील एका किल्ल्याचा उल्लेख येतो, तो उल्लेख चांभारगडाचा असावा.

**नडगाव तर्फे बिरवाडी** (18° 05'44” N, 73° 27'50” E )

हे गाव सावित्री नदीच्या उत्तर तीरावर महाडपासून तीन किलोमीटर अंतरावर वसले आहे. महाड तालुक्यातील नडगाव तर्फे बिरवाडी या गावातील काळभैरी मंदिराजवळ भग्न शिवलिंग,

नंदी शिल्प तसेच दोन वीरगळ आहेत. गावाच्या दक्षिणेस नदीजवळ एक शिवमंदिर असून येथे मराठा काळातील दगडी समाध्या आहेत. या मंदिरासमोर पूर्वेस आधुनिक काळातील पाण्याच्या टाक्यांच्या परिसरात, जमीन पातळीवर चौकोनी मुखे असलेल्या कातळात कोरलेल्या पाण्याच्या सात टाक्या होत्या. येथील औद्योगीकरणाच्या काळात यांपैकी काही टाक्या उध्वस्त झाल्याचे गावकरी सांगतात. आता यांपैकी दोन टाक्या शिल्लक आहेत (छायाचित्र क्रमांक ४८). यांच्या मुखाचे माप ७० सेंटीमीटर रुंद व ८० सेंटीमीटर लांब आहे. आजही टाक्यांचे सातीआसरा म्हणून पूजन होते. प्रवासाला जाणारे लोक येथे नारळ व खण ठेवून प्रवासाला जातात. लोकांच्या वर्णनावरून काही टाक्यांना आत उतरायला पायऱ्या होत्या. शिल्लक टाकीच्या शैलीवरून या टाक्या आद्य ऐतिहासिक काळातील असाव्यात. अशा प्रकारच्या टाक्या प्राचीन लेणींच्या सानिध्यात तसेच मार्गालगत आढळून आल्या आहेत.

**दासगाव** (18° 05'31" N, 73° 21'57" E )

दासगाव हे सावित्री नदीच्या उत्तर तीरावर खाडीलगत एका मोठ्या टेकडीच्या उतारावरील पायथ्याशी वसलेले आहे. ही टेकडी व गाव मुंबई-गोवा महामार्गावर महाडच्या पश्चिमेस ७ किलोमीटर अंतरावर आहे. या गावातून दासगाव खिंडी मार्गे माणगाव व नागोठणेकडे जाणारा मध्ययुगीन मार्ग होता, आज त्याचे महामार्गात रुपांतर झाले आहे. या गावाजवळ सावित्री नदी व माणगाव काळनदी यांचा संगम होतो. याशिवाय विन्हेरा भागातून येणारी नागेश्वरी ही नदीही येथेच मिळते.

दासगावात उल्लेखनीय पुरावशेष आहेत. या गावामागील टेकडीवर समुद्रसपाटीपासून जेमतेम १०० मीटर उंचीवर मराठकाळानंतर उभारलेली संरक्षक वसाहत दासगावचा किल्ला आहे. याला स्थानिक लोक दौलतगड असे बोलतात. याच उल्लेख ब्रिटीशांच्या कागदपत्रातून दासगावचा किल्ला म्हणून येतो (सचिन जोशी २०११: ९४-९५). गडावरील तटबंदीचे फक्त पायाचे अवशेष असून काही ठिकाणी बुरुजांचे ढासळलेले बांधकामही आहे. सन १७७१ ते १७७५ या कालावधीत दासगाव व कुंबळे हे ब्रिटीशांकडे होते. काही इंग्रज अधिकाऱ्यांचे वाडे या गडावर होते त्यांचे अवशेष पाहता येतात. गडाच्या पश्चिमबाजूस खांब नसलेले एक कातळात कोरीव टाके आहे. त्याला उत्तर बाजूकडून आत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. याशिवाय गडाच्या पायथ्याशी खाली पूर्व बाजूस काही कातळात कोरीव फार खोल नसलेली चौकोनी टाकी आहेत. गावाच्या पूर्वेस एक किलोमीटर अंतरावर महामार्गाला खेटून 'टाकेकरीन' म्हणून सातआसरा (18° 05′32.1″N, 73° 21′57.2″E) या देवींचे ठिकाण आहे. हे ठिकाण म्हणजे

दोन कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आहेत. त्यातील एकाची लांबी २.३० मीटर तर रुंदी १.२० मीटर आहे. हे गाळाने भरून गेले आहे. याठिकाणी अशी सात पाण्याची कुंडे असल्याचे लोक सांगतात. सध्या मात्र येथे अजून दोन कोरीव टाक्यांचे मातीने भरलेले अवशेष आहेत. या टाक्यांची रचना पाले येथील लेणींजवळ आढळनाऱ्या पाण्याच्या पोढीसारखी आहे. यांच्या रचनेवरून या टाक्या इसवीसनाच्या सुरुवातीच्या शतकातील असाव्यात. गावात एका तलावाकाठी कालभैरव, मरीआई, सोमजी, भवानी, केदारनाथ, भार्कती आई आणि रवळनाथ या देवतांचे मंदिर आहे. येथील जीर्णोद्धाराच्या काळात आधुनिक काळातील शिल्पे बसविली आहेत.याशिवाय गावाच्या पश्चिमेस घानेकारीन या स्थानिक देवतेचे स्थान आहे. या ठिकाणी असलेली ही देवी म्हणजे चक्क एक चुन्याचा घाणा आहे. येथे एका बाजूने आत उतरण्यास पायऱ्या असलेली विहीर आहे. या विहिरीचा दक्षिणेकडील भाग गोल आहे या ठिकाणी तिला कमान बसवली आहे. शैलीवरून ही विहीर मराठा काळातील असावी.

**डोंगरोली** (18° 7'15" N, 73° 22'22" E )

महाडच्या वायव्येस असलेल्या आठ किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून १५० मीटर उंचीवर आहे. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. लोकांच्या मते याठिकाणी एका आयताकृती शिळेवर अर्धा कुत्रा व अर्धा माणसाचे शिल्प होते. याला लोक कुतरदेव म्हणतात. एकंदर वर्णनावरून ही एखादी गद्धेगळ असावी.

**वीर** (18° 7'35" N, 73° 19'37" E )

महाडच्या पश्चिमेस असलेल्या आठ किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणी काळभैरी व सोमजी मंदिराजवळ एक भग्न अवस्थेतील महिषासुरमर्दिनी प्रकारची दोन व भैरवाची खंडित मूर्ती व योनीपीठ इत्यादि शिल्पे आढळली. शैलीवरून चौदाव्या शतकानंतरचा काळ असावा.

**वहूर (18° 5'39" N, 73° 22'41" E )**

वहूर हे महाडच्या पश्चिमेस चार किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या दक्षिण तीरावर, पण सोनगड किल्ल्याच्या पश्चिम पायथ्याशी वसले आहे. गावातील पुरावशेष गावदेव काळभैरी मंदिराजवळ पाहायला मिळतात. यामध्ये तीन वीरगळाचा समावेश होतो. यांपैकी एक चांगल्या अवस्थेत तर इतर दोन भग्नावस्थेत आहेत. हे वीरगळ आयताकृती शिळेवर एकाच बाजूस शिल्पांकित केले आहेत. चांगल्या वीरगळावर तीन टप्पे दाखविले आहेत. यावरील पायदळातील वीर हे घोड्यावर स्वार झालेल्या शत्रूशी युद्ध करताना दिसतो. अर्धवर्तुळाकृती

शीर्ष असलेल्या जागेवर मध्ये फीत बांधलेला मंगलकलश व त्याच्या दोन्ही बाजूस लांब देठ असलेली फुले दाखविली आहेत. त्यांच्या चौकटींच्या मधील पट्टीवर चौकटच्या आडव्या फुलांची नक्षी काढली आहे. काळभैरी मंदिरातील झीज झालेली शिल्पे शैलीच्या दृष्टीकोनातून मराठा काळातील वाटतात, तर वीरगळाचा काळ बारावे ते तेरावे शतक असा ठरवता येतो.

गावाच्या पूर्व बाजूस सोनगड हा ऐतिहासिक किल्ला आहे. सोनगड हा किल्ला शिवकाळात प्रसिद्धीस आला असला तरी तो शिवपूर्वकाळातील असल्याचे त्यावरील कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आणि त्याच्या पूर्व बाजूस कोरल्या गेलेल्या लेणींवरून लक्षात येते. सोनगडावर शिवाजी महाराजांनी सन १६६१ मध्ये राजापूरच्या वखारीतून पकडून आणलेले रेव्हीग्टनसारखे इंग्रज अधिकारी तीन वर्षे कैदेत ठेवले होते.

पायथ्यापासून २०० मीटर उंचीवर असलेल्या किल्ल्यच्या पश्चिम बाजूतील कड्यात कातळात कोरीव पाण्याच्या नऊ टाक्या आहेत. यांपैकी एक खांब टाके आहे. आयताकृती मुखभाग असललेल्या खांबटाक्यात गाळ  साठला असून खांबाचा खालचा भाग दिसत नाही पण या खांबाचा छताला आधार देणारा शीर्षभाग चौकोनी आहे. या टाक्यांचा तलाविन्यास (ground plan) काहीसा अर्धवर्तुळाकृती आहे. या प्रकारची पाण्याच्या टाक्यांची रचना अभ्यास क्षेत्रात येणाऱ्या अनेक संरक्षक अथवा किल्ल्यांवर आढळून आली आहे. या टाक्यांशिवाय इतर टाक्या आयताकृती व कातळात उभ्या खोदल्या आहेत. गडाच्या उत्तर बाजूस ‘वहुरकरीन’ नावाच्या देवीचे स्थान आहे. येथील जवळच्या माळावर महिषासुरमर्दिनी प्रकारच्या भग्न शिल्पाचे दर्शन घडते. गडमाथ्यावर काही जोती व एक बुरुज आहेत. गडावरील सपाटीत पावसाळ्यात काळ्या व लाल रंगाची खापरे आणि शिशाचे छोटे गोळे सापडतात. गडाच्या पूर्व बाजूस असलेल्या लेणीसमूह शिल्पशैली आणि स्थापत्यशैलीवरून दुसऱ्या ते सहाव्या शतकातील आहे, तर पश्चिमेकडील कातळात कोरीव पाण्याची खांब टाकी व इतर टाकी मात्र दहाव्या शतकानंतरची असावीत.

**पाले** (18° 5'40” N, 73° 24'8” E )

महाडच्या पश्चिमेस गांधारी नदीच्या पश्चिम काठावर तीन किलोमीटर अंतरावर पाले हे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण गाव आहे. पालेगावाचे बौद्धवाडी, गांधारपाले आणि चिंचपाले असे तीन भाग आहेत. बौद्धवाडीजवळ काळकाई या गावदेवीचे स्थान आहे येथे आधुनिक काळात स्थापन केलेल्या मूर्ती आहेत. या गावात म्हणजे सोनगड किल्ल्याच्या पूर्व बाजूच्या

उतारावर इसवीसनाच्या सुरवातीच्या शतकातील २८ बौद्धधर्मीय लेणी आहेत.. या लेणी समूहातील लेणे क्रमांक ९ मधील शिलालेखावरून या लेणीची निर्मिती वेन्हुपालीत कान्हभोआ किंवा कान्हभोज या स्थानिक प्रमुखाने दिलेल्या दानातून झाली आहे. हे राजघराणे व व्यापारी वर्गाने सढळ हस्ते दिलेल्या दानातून या लयन वसाहतीची निर्मिती झाली आहे. आजचे पाले गाव म्हणजे ग्रीक प्रवासी टॉलेमी याने वर्णन केलेले पालाईपटमाई नावाचे बंदर होय. आजही सावित्री नदीचे भरतीचे पाणी गांधारी नदीतून अंतर्गत भागात येते. अभ्यासकांनी स्थापत्यशास्त्र आणि पुंरालिपीशास्त्र यावरून लेणींचा कालखंड इसवीसनपूर्व पहिले शतक ते इसवीसनाचे सहावे शतक असा मानला जातो. काही अभ्यासक या लेणींच्या निर्मितीचा कालखंड इसवीसनाचे तिसरे शतक किंवा चौथ्या शतकाची सुरुवात ते सहावे शतक असा निश्चित केला आहे.

गांधारपाले गावाच्या परिसरात विहिरी खणताना व घरांचे पायाचे जोते खणताना अनेक आद्य ऐतिहासिक काळातील मृदभांड्यांचे अवशेष सापडतात. यात तेजस्वी लाल रंगाची व काळी जाड पोताची असलेली आहेत. यात साठवणुकीची खापरे तर आहेतच पण सातवाहन काळातील पिण्याचे कप देखील आहेत.

**मोहोप्रे** (18° 5'58” N, 73° 23'34” E )

हे गाव महाडच्या वायव्येस तीन किलोमीटर अंतरावर सोनगडाच्या ईशान्य पायथ्याला वसले आहे. गावातील पुरावशेष गावाच्या गावदेवी मंदिरात भग्न शिल्पावशेषाच्या रूपाने पहला मिळतात. या ठिकाणी अनेक तुकड्यांच्या स्वरुपात काहीचे शीर व धड वेगवेगळे आहेत, काहींचा कमरेपासूनचा भाग वेगळा झाला आहे. त्यामुळे या सर्वांची समीक्षा करणे अवघड आहे. तीन शिल्पे अखंड स्वरुपात आहेत आणि शिल्पशैलीवरून त्यां मराठा कालखंड असावा. या ठिकाणी एका आयताकृती शिळेवर गळ्यापर्यंत चार मुखे कोरली आहेत, येथील उल्लेखनीय शिल्प म्हणजे गजलक्ष्मीचे होय, अभिषेक घालणारे फक्त हत्ती शिल्लक आहेत तर मधल्या भागातील लक्ष्मीची खूप झीज झाली आहे. या शिल्पांची शैली बाराव्या शतकातील आहे.

**भोगाव** (18° 7'16” N, 73° 28'14” E )

महाडच्या ईशान्येस सुमारे सहा किलोमीटर अंतरावर भोगाव हे साधे गाव आहे. गावातील सिध्दभैरी या स्थानिक मंदिराच्या परिसरात पुरावशेष आढळून येतात. मंदिरात ७० सेंटीमीटर

उंच व ३५ सेंटीमीटर रुंदीची चार हातांची, स्थानक अवस्थेतील एक पुरुष शिल्प व दुसरे याच पद्धतीचे पण आकाराने थोडे लहान स्त्री शिल्प आहे. यांस गावात सिद्धभैरी व जोगेश्वरी म्हटले जाते. या गाभाऱ्यातील शिल्पाला दगडी देवळी बनवली आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे मराठा कालखंडातील वाटतात. या शिवाय मंदिरात गणेश शिल्प, गोलाकार भागात छिद्र व पन्हाळयुक्त शिवलिंग व हनुमान यांची सुटी शिल्पे आहेत. हनुमान शिल्प हे चपेट मुद्रेतील व मिशी असलेले शिल्प मराठा-पेशवे काळातील असावे. या मंदिरासमोर ३ मीटर x ३ मीटर चौकोनी आकाराची मराठा काळातील समाधी आहे. या समाधीच्या केंद्रभागी वर्तुळाकार शिवलिंग कोरलेली शिळा आहे. या शिळे खालील भागात तळघर असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. खूप वर्ष जगलेल्या मृत व्यक्तीस या तळघरात पुरले जाते. अशी प्रथा येथे आहे. मंदिरासमोरील मैदानात सुमारे ४० सेंटीमीटर व्यासाचे दगडी गोळे आहेत. हे गोळे खांद्यावर घेऊन होळी भोवती फेरी मारण्याची पदधत आहे.

**कांबळे तर्फे बिरवाडी** (18° 5'1” N, 73° 28'22” E )

महाड तालुक्यात कांबळे नावाची दोन गावे असल्यामुळे, पूर्वीचे बिरवाडीतील तरफा या विभागामध्ये समाविष्ट होत असल्याने या कांबळे गावास कांबळे तर्फे बिरवाडी आहे म्हणतात. कांबळे तर्फे बिरवाडी हे गाव महाडच्या पूर्वेस दक्षिणोत्तर पसरलेला डोंगररांगेच्या पूर्व भागात वसले आहे. गावातील पुरावशेष महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या कंपनीच्या उभारणीच्या काळात येथील काही शिल्पे व मूर्ती हे पुरावशेष जमिनीत गाडल्या गेल्याचे सांगतात. गावदेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, मंदिरात चार हातांच्या, स्थानक एक स्त्री व एक पुरुष प्रतिमा आहे. प्रमाणशीर, वाहन विवेक नसलेल्या, शरीराच्या मानाने मोठे कान असलेल्या मूर्तीशिल्पाचा काळ अठराव्या शतकातील असावा. देवतांचे पीठ व प्रभावळ मराठा काळाचा प्रभाव दाखवणारे आहे.

**कुसगाव** (18° 8'35” N, 73° 28'44” E )

महाडच्या ईशान्येस सहा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या गावातील सोमजाई या स्थानिक देवतेच्या कौलारू मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारची चार हातांची, स्थानक प्रतिमा आहे. पावसाळ्यातील शेती नांगरणीच्या काळात परिसरातील शेतात, खापरांचे अवशेष आढळतात. यात लाल रंगाच्या, जाड पोत्याच्या पिण्याच्या वाडग्यांचा समावेश आहे.

**साकडी** (18° 4'26" N, 73° 19'15" E )

साकडी हे गाव महाड-कुसगाव मार्गावर एक गाव आहे. महाडच्या ईशान्येस सात किलोमीटर अंतरावर आहे. गावदेव भैरव मंदिर परिसरात गावातील पुरावशेष प्रामुख्याने आढळतात. भैरव मंदिरात मराठा काळातील शिल्प आहे. मंदिराबाहेर स्थानक व समभंग अवस्थेतील फक्त पायांचा भाग शिल्लक असलेली एक भग्न प्रतिमा आहे. मंदिरामध्ये पिंपळाच्या झाडामध्ये तीन शिल्पे अडकलेली दिसतात. भग्न व झीज झालेली शिल्पे चार हातांची स्थानक स्वरुपाची व पुरुष देवतांची आहेत. शिल्प वैशिष्ट्यावरून ती मराठा कालखंडाच्या थोडी आधीची असावीत.

या मंदिरापासून दक्षिणेकडे एक पूर्वाभिमुख शिवमंदिर असून येथे शुष्कसांधी बांधीव पद्धतीने उभारलेल्या मंदिराचे अवशेष आहेत. या ठिकाणी शिवलिंग, नंदी, नक्षीदार पीठ यांचे भग्न अवशेष आहेत. येथे ९१ सेंटीमीटर लांब व ३१ सेंटीमीटर रुंदी अशा आयताकृती शिळेवर एकाच बाजूस चार टप्प्याच्या झीज झालेला वीरगळ आहे शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती असून त्या वर मंगलकलश व चंद्र- सूर्य यांच्या आकृती आहेत. मंदिरात व बाहेर भग्न अवस्थेतील नंदी, गणेश शिल्प झीज झालेले विष्णू गोलाकार भागात खाच व पन्हळ युक्त शिवलिंग आहे. ही शिल्पे जरी झीज झालेली असली तरी शिल्पशैलीवरून यांचा काळ बारावे ते तेरावे शतक ठरवता येतो. या परिसरातील शेतामधून लाल व काळ्या मृद भांड्यांची खापरे सापडतात. या शिवाय चकतीच्या आकाराचे द्विरंगी बांगड्यांचे तुकडे आढळून येतात.

**टेमघर** (18° 4'46" N, 73° 19'35" E )

महाडच्या ईशान्येस टेमघर आहे. गावाच्या उत्तरबाजूस असलेल्या टेंभ म्हणजे एका छोट्या टेकडीमुळे गावाचे नाव टेंमघर पडले आहे. गावात सोमजी देवीचे मंदिर आहे मंदिराचा जीर्णोद्धार चालू आहे, या ठिकाणी कोणतेही पुरावशेष सापडले नाहीत.

**शेल** (18° 4'46" N, 73° 19'35" E )

महाडपासून ईशान्येस सात किलोमीटर अंतरावर पूर्वेस टेकडीच्या भागात शेल हे गाव आहे. गावाच्या उत्तर व पश्चिम बाजूस मोठ्या टेकड्या तर पूर्व बाजूस छोटी नदी आहे. गावात सुखदरेकोंड येथे आधुनिक काळात उभारलेले शिवमंदिर आहे. पण देऊळकोंड या भागात गावातील जुन्या मंदिराचे अवशेष आहेत. हे मंदिर शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारले होते या मंदिराच्या फक्त पायाचा भाग इथे पायाला मिळतो. याच दगड विखुरलेल्या अवस्थेत आहे.

याची लांबी ६.६० मीटर व रुंदी ६.५० मीटर आहे. ज्योत्याचा वरचा भाग जमिनीवर दिसतो, तर खालचा भाग जमिनीत गाडला गेला आहे. याच्या वरच्या थराच्या खालच्या बाजूस अर्धवर्तुळाकृती पाकळ्या आहेत. ठराविक अंतराने त्यांची पुनरावृत्ती झालेली आहे. मंदिराचे गर्भगृह खोल असून, आतमध्ये माती साठली आहे. या ज्योत्या वरील भिंतीचा भाग आज शिल्लक नाही. येथे भग्नावस्थेतील पाच सहा शिल्पे बाहेर पडली आहेत. आयताकृती शिळेवर एकाच बाजूस शिल्पांकित केलेळे दोन वीरगळ येथे आहेत. पण ते अर्धे मातीत गाडले गेले आहेत. तिसरा वीरगळ चौकोनी खांबासारखा चारही बाजू तीन टप्यात शिल्पांकित केलेला परंतु खराब अवस्थेत आहे. या ठिकाणी गाभाऱ्यात शिवलिंग, दोन गणेश प्रतिमा व नंदी शिल्प शैलीच्या दृष्टीने चौदाव्याशतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतची ही शिल्पे आहेत. या मंदिराच्याशेजारी काळभैरी जोगेश्वरी या गाव देवीचे मंदिर आहे. या मंदिरात देखील शैलीच्या दृष्टने मराठा काळातील शिल्पे आहेत. यामध्ये एका आयताकृती शिळेवर चार मुखे कोरलेली पाहायला मिळतात यांच्या एकंदर रचनेवरून हे शिल्प चौदाव्या शतकातील असावे.

**दाभोळ** (18° 4'46" N, 73° 19'35" E )

दाभोळ हे महाडच्या पश्चिमेस १० किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या उत्तर तीरावरील एक गाव आहे. गावातील मोहल्ला भागात करजादेवी व भैरी या स्थानिक गावदेवांच्या मंदिर परिसरात गावचे पुरावशेष आढळतात. शिवलिंग व शिल्पे त्यांच्या शैलीनुसार मराठा काळातील आहेत. पण येथे आढळून येणारी गणेश प्रतिमा मात्र शिलाहारशैलीची आहे. मंदिराबाहेर आयताकृती शिळेवर एका बाजूस शिल्पांकित केलेल्या वीरगळाचे भग्न अवशेष आहेत. एक सतीशिळा देखील आहे. शैलीवरून वीरगळ व गणेश प्रतिमा बाराव्या तर सतीशिळा चौदाव्या व नंतरच्या काळातील असावी.

**टोळ बुद्रुक** (18° 6'3" N, 73° 19'26" E )

टोळ बुद्रुक हे माणगावातून येणाऱ्या काळनदीच्या पश्चिम तीरावरील महाडच्या पश्चिमेस ११ किलोमीटर अंतरावर गाव आहे. गावातील टोळजाई या स्थानिक गावदेवी मंदिर परिसरात टोळ नांदवी मार्गालगतच्या तलावाकाठी आहे. मंदिरात अलीकडच्या काळातील काही शिल्पे आहेत, बाहेर मात्र झीज झालेली परंतु उल्लेखनीय शिल्पे आढळतात. यात पद्मासनातील एका पुरुषाची प्रतिमा, एका शिळेवर खड्ग व खेटक धारण केलेला वीर व गजलक्ष्मीचे भग्न

शिल्प यांचा समावेश आहे. गजलक्ष्मीचा डावीकडील भाग शिल्लक आहे. शिल्पशैलीवरून ये अवशेष बाराव्या वा तेराव्या शतकातील असावेत.

**काचले** (18° 7'53" N, 73° 24'54" E )

महाडच्या उत्तरेकडे पाच किलोमीटर अंतरावर काचले गाव वसले आहे. गावातील पुरावशेष गावदेव मंदिर परिसरात पाहायला मिळतात. येथे फक्त चौकोनी खांबाच्या आकाराचा व चारही बाजू शिल्पांकित केलेला एक वीरगळ पाहायला मिळतो. वीरगळाचे वरचे दोन भाग दिसतात तर खालचे भाग जमिनीत मातीत गाडले गेले आहेत. या टप्प्यांना विभागणाऱ्या चौकटीच्या भागात उभ्या चौकटच्या आकारातील फुले काढली आहेत. हे वैशिष्ट्य वहूर व कोकरे या गावातील वीरगळावर आणि देगाव तालुका माणगाव येथे आढळून येते. शिल्पशैलीवरून हे शिल्प बाराव्या शतकातील असावे. येथे एक वैशिष्ट्यपूर्ण दगडी द्रोण पाहायला मिळतो. मंदिरातील भैरीची मूर्ती शिल्पशैलीवरून मराठा किंवा त्या नंतरच्या काळातील असावी. या ठिकाणी नंदीमाळावर एका नंदीचे शिल्प आहे. आजूबाजूस शिवमंदिराचे अवशेष नाहीत. शैलीवरून हा मराठा काळातला असावा.

**लाडवली** (18° 6'34" N, 73° 25'5" E )

लाडवली हे गाव महाडच्या उत्तरेस चार किलोमीटर अंतरावर, मांडला गावाकडून येणाऱ्या सावित्री नदीच्या  एका उपनदीच्या पश्चिम बाजूस आहे. गावातील बौद्धवाडीजवळ गावदेवी मंदिर आहे, या ठिकाणी काळभैरी व भवानी या स्थानिक देवतांचे मंदिर आहे. मंदिरातील शिल्पे शिल्पशैलीवरून मराठा व नंतरच्या काळातील असावीत. बौद्धवाडीजवळ एका खाजगी कंपनीच्या आवारात एक गजलक्ष्मी शिल्प आहे. हे शिल्प भग्नावस्थेत आहे. त्याचा डावा भाग सुरक्षित आहे, तर उजवा भग्न आहे. देवीचे शिल्प झिजले असले तरी त्यातला सुबकपणा लक्षात येतो. पद्मासनात असलेल्या लक्ष्मीला हत्ती आपल्यामागील दोन पायावर उभे राहून अभिषेक करताना दिसतो. देवीच्या हातातील कमळ स्पष्ट दिसते. शिल्पशैलीवरून हे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे.

**तेटघर** (18° 7'18" N, 73° 24'29" E )

महाडच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. काळकाई व भैरव या स्थानिक ग्रामदैवतांच्या स्थानाचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला असून येथे कोणत्याही प्रकारचे पुरावशेष आढळून येत नाहीत.

**तुडील खुर्द** (18° 4'8" N, 73° 21'30" E )

महाडच्या पश्चिमेस सात किलोमीटर अंतरावर नागेश्वरी नदीच्या पश्चिम तीरावरील या गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. तुडील फाट्यावर काळकाई देवीचे स्थान आहे. येथे काही कोरीव शिळा आढळतात. पण यावरून काहीही अंदाज बांधता येत नाही.

**तुडील** (18° 3'28" N, 73° 21'42" E )

महाडच्या पश्चिमेस सात किलोमीटर अंतरावरील नागेश्वरी नदीच्या पश्चिम तीरावरील या गावाला तुडील बुद्रुक तसेच वरचे तुडील (अप्पर तुडील) असे म्हणतात. तुडीलचा गावदेव असलेला कालभैरी मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथील मूर्ती शिल्परूपी पुरावशेष शेजारील हनुमान मंदिरात ठेवले आहेत. परंतु काही महत्त्वपूर्ण अवशेष मंदिराबाहेर देखील पाहायला मिळतात. हनुमान मंदिरात ठेवलेली चार हातांची, अर्ध समभंग अवस्थेतील मूर्ती शैव आहे. तिच्या हातात डमरू, नाग, त्रिशूळ आणि कपाल आहे. वाहन न दाखवणे हे अलीकडच्या काळाचे वैशिष्ट्य आहे त्यामुळे वाहन दाखविले गेले नाही, तरी ही मूर्ती भैरवाची असावी. या पद्धतीच्या लहान मोठी शिल्पे येथे आहेत. शैलीवरून मराठा काळा नंतरची असावीत. मंदिराबाहेर चार हातांची पण झीज झालेली एक मूर्ती आहे. तसेच आयताकृती शिळेवर एकाच बाजूस शिल्पांकित केलेले तीन टप्यातील एक व भग्नावस्थेतील एक असे दोन वीरगळ आहेत. या शिवाय एक सतीशिळा देखील पाहायला मिळते. शैलीच्या दृष्टीने वीरगळ हे बाराव्या व तेराव्या शतकातील असावेत तर सतीशिळा चौदा किंवा पंधराव्या शतकातील असावी. या भागातील शेतातून नांगरटीच्या वेळेस काळ्या व लाल तसेच काळ्या अथवा करडया रंगाच्या खापरांचे अवशेष आढळतात.

**कुंबळे** (18° 4'12" N, 73° 20'49" E )

महाडच्या पश्चिमेस आठ किलोमीटर अंतरावरील सावित्री नदीच्या दक्षिण तीरावरील या गावाला इंग्रजांच्या काळात फार महत्त्व होते. पेशव्यांच्या बरोबर बाणकोट किल्ला ते दासगाव आणि कुंबळे ही गावे ब्रिटीशांनी ताब्यात घेतली होती. या गावात कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**जुई बुद्रुक** (18° 4'12” N,  73° 20'49” E )

महाडच्या पश्चिमेस आठ किलोमीटर अंतरावरील सावित्री नदीच्या दक्षिण तीरावरील या गावातील मनाई देवीच्या मंदिरात दोन तर मंदिरामागे दोन शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून अठराव्या शतकातील असावीत.

**शिरगाव** (18° 4'9” N,  73° 25'4” E )

शिरगाव हे महाडच्या दक्षिणेस दोन किलोमीटर अंतरावर अंबा या सावित्री नदीच्या दक्षिणोत्तर वाहणाऱ्या उपनदीच्या पश्चिम काठावरील गाव आहे. गावाच्या काळभैरी मंदिराजवळ काही भग्न अवशेष आहेत, यात भैरवाची ५० सेंटीमीटर लांब आणि ३० सेंटीमीटर रुंद, पण भग्न अशी त्रिभंग अवस्थेतील मूर्ती आहे. एकंदर शैलीवरून तिचा काळ तेरावे शतक किंवा चौदावे शतक असावा. जीर्णोद्धार केलेल्या मंदिरातील शिल्पाच्या शैलीवरून ही शिल्पे अगदीच अलीकडच्या काळातील असावीत.

**चोचींदे** (18° 3'38” N,  73° 24'38” E )

चोचींदे हे म्हाप्रळ-पंढरपूर या मार्गावरील महाडच्या पश्चिमेकडील ३ किलोमीटर अंतरावरील लहान गाव आहे. गावातील गावदेवी पद्मावती मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथे व गावात आता कोणतेही पुरावशेष शिल्लक नाहीत.

**दादली** (18° 4'24” N,  73° 25'10” E )

महाडच्या दक्षिणेस एक किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या दक्षिण काठावर हे गाव आहे. गावातील शिवमंदिर हे वीरेश्वर मंदिराइतकेच प्राचीन मानले जात असले तरी येथे व गावदेवी मंदिराजवळ कोणतेही पुरावशेष आढळत नाहीत. या शिवमंदिरात चौकोनी आकाराच्या कोरीव शिळेवर एकशे आठ अंगठ्याच्या आकाराइतकी लिंगे कोरली आहेत, पण त्याचा कालखंड ठरवण्याच्या दृष्टीने काहीही उपयोग नाही.

**मुठवली** (18° 3'39” N,  73° 24'7” E )

मुठवली हे म्हाप्रळ-पंढरपूर या मार्गावर पूर्व-पश्चिम पसरलेल्या डोंगररांगेच्या उत्तर उतारावरील व सावित्री नदीच्या दक्षिण काठावर वसले आहे. या मार्गावर मुठवलीहून पश्चिमेकडे सुमारे दीड किलोमीटर अंतरावर उल्लेखनीय अवशेष आहेत. हे अवशेष कोरीव पाण्याच्या टाक्यांच्या स्वरुपात आहेत (छायाचित्र क्रमांक ४६). लोक सध्या यांस सातिआसरा म्हणून पूजतात. या

अवशेषांची मार्ग रुंदीकरण मध्ये खूप हानी झाली आहे. काही टाक्या बुजल्या अथवा उध्वस्त झाल्या आहेत. नदी व रस्त्यालगतच्या डोंगर उताराच्या बाजूचा कातळ खोदून या टाक्या बनवल्या आहेत. आज जरी यांची पडझड झाली असली, तरी या चौकोनाकृती मुख असलेल्या व आत कातळात आडवे खोदलेल्या होत्या. त्यांचा मुखभाग कोसळलेला असला तरी त्याच्या एकंदर स्वरूपाची कल्पना येते. यातील मुख्य टाकीची लांबी ३.६० मीटर व २.५० मीटर, तर खोली २ मीटर इतकी आहे. आज येथे एकूण किती टाक्या होत्या याचा अंदाज येत नसला, तरी किमान तीन टाक्या असाव्यात असे शिल्लक अवशेषवरून लक्षात येते. येथे खांब रोवण्यासाठी खड्डे ही केले आहेत. तसेच बाहेर पाण्याचा साठा करण्यासाठी कातळात द्रोण खोदला आहे. मार्गालगत अशा प्रकारच्या पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न दिसतो. त्याच्या इसवीसनाच्या सुरुवातीच्या लेणी समूहांच्या सानिध्यात असलेल्या कोरीव पाण्याच्या टाक्याशी साधर्म्य आहे. यावरून या टाक्यादेखील याच कालखंडातील निर्मिती असावी. नदी तीरावर अशा प्रकारचे अवशेष दासगाव ते वहूर मार्गावरील कातळात देखील आढळले आहेत. गावातील मनाई या स्थानिक देवतेच्या मंदिर परिसरात काही विशेष शिल्पावशेष आहेत. यात नंदी शिल्पे, गोलाकार लिंगपीठ, सुमारे ५० सेंटीमीटर लांबीचे खाली चौकोन वर अष्टकोनाकृती आणि वर लंबगोल असे लिंग दिसून येते. लिंगाच्या शैलीवरून त्याचा कालखंड बाराव्या ते तेराव्या शतकातील असा ठरवता येतो.

**सव** (18° 4'46” N, 73° 22'56” E )

सव हे महाडच्या पश्चिमेस तीन किलोमीटर अंतरावरील गाव आहे. सावित्री नदीला अगदी खेटून असलेल्या, सव येथे गरम पाण्याचे झरे असलेली कुंडे आहेत. हे ठिकाण प्राचीन व्यापारी मार्गावर वसले आहे त्यामुळे या ठिकाणास पूर्वीही खूप महत्त्व असावे, परंतु तसे पुरातत्त्वीय पुरावे येथे फारसे आढळत नाहीत. या ठिकाणी चौकोनी आकाराची दोन कुंडे आहेत. या कुंडाभोवती दगडी बांधकामाच्या कमानी होत्या आता त्या पुन्हा बांधल्या आहेत. येथे एका दर्ग्याची वास्तू होती तिचा जीर्णोद्धार झाला आहे. गावात गावदेवाचे मंदिर असून मंदिराजवळ एक भग्नावस्थेतील वीरगळ आहे त्याचा काळ शैलीवरून चौदावे शतकाचा असावा, व येथील महिषासुरमर्दिनीची मूर्ती व इतर काही भग्न शिल्पेशैलीवरून मराठा व पेशवे काळातील अवशेष आहेत. यावरून गावाची वसाहत या कालखंडाच्या पूर्वीच झाली असावी हे निश्चित होते.

**गोमेंडी** (18° 4'4" N, 73° 17'30" E )

म्हाप्रळ-पंढरपूर मार्गावरील हे ठिकाण सावित्री नदीला अगदी खेटून महाडपासून १४ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. गावात मावळा या स्थानिक गावदेवीचे स्थान आहे, परंतु या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**तेलंगे** (18° 3'22" N, 73° 19'21" E )

हे ठिकाण महाडच्या पश्चिमेस ११ किलोमीटर अंतरावर म्हाप्रळ-पंढरपूर मार्गावर डोंगर उतारावर आहे. भैरी या स्थानिक देवतेच्या मंदिराचा पूर्णपणे जीर्णोद्धार झाला आहे. या ठिकाणी मंदिरात पाच स्थानका व समभंग अवस्थेतील वाहन नसलेली शिल्पे असून त्यांच्या शैलीवरून ती एकोणिसाव्या शतकातील असावीत. मंदिराबाहेर आयताकृती आकाराचे एकाच बाजूवर शिल्पांकित केलेले दोन वीरगळ आहेत. हे वीरगळ तीन टप्यात कोरले आहेत. या शिल्पांची झीज झालेली असून ते नेहमीच्या पद्धतीने दाखविले आहेत. शैलीवरून त्यांचा काळ बाराव्या शतकाचा असावा. मंदिरासमोर एका तेलाच्या घाण्याच्या खालच्या भागाचे अवशेष आहेत. या ठिकाणी कोणतेही इतर पुरावशेष आढळले नाहीत. तेलंगे गावात मोहल्ला हा एक भाग असून, गावात एकोणिसाव्या शतकात बांधलेला चौसोपी वाडा आहे. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत.

**वराठी** (18° 3'31" N, 73° 18'10" E )

हे ठिकाण म्हाप्रळ-पंढरपूर मार्गावर सावित्री नदीच्या दक्षिण काठावर एकदम खेटून वसले आहे. या गावालगत असलेल्या नदी पात्रातील एका बेटावर पांडवांच्या काळातील एक कातळात खोदीव विहीर असल्याचे लोक सांगतात. या विहिरीला आत उतरण्यासाठी एका बाजूकडून पायऱ्या होत्या, नुकत्याच झालेल्या येथील बांधकामात ही विहीर नष्ट झाली आहे. गावदेवी मंदिरात आधुनिक काळातील दोन शिल्पे आहेत. ठिकाणी कोणतेही विशेष पुरावशेष आढळले नाहीत.

**वलंग** (18° 3'25" N, 73° 20'12" E )

महाडच्या पश्चिमेस नऊ किलोमीटर अंतरावर वलंग हे विनोला नदीच्या पश्चिमकिनाऱ्या वरील छोटेसे गाव आहे. गावात उल्लेखनीय शिल्पे आढळतात. श्री.धाडवे यांच्या शेतातील गाढवपट्टी भागातील एका चिंचेच्या झाडाखाली भग्न गजलक्ष्मी शिल्प आढळले आहे. ते

अर्धे जमिनीत गाडले गेले आहे. गावातील काळभैरी मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथील शिल्पे मराठा काळातील व थोडी नंतरच्या काळातील असावीत. गावातील कोळ्याचे मंदिराचे स्थान असलेल्या ठिकाणी तीन वीरगळ आढळतात. या पैकी एक वीरगळ चौकोनी खांब प्रकारचा चांगल्या अवस्थेतला असून त्याच्या चारही बाजू चार टप्प्यात शिल्पांकित केलेल्या आहेत. याच्या एका बाजूस वीराच्या डोक्यावर छत्र धरलेले दिसते. यावरून मृत्यू पावलेला हा वीर राजा किंवा इथला स्थानिक प्रमुख या पदाला पोहचला असावा. एका बाजूवर अप्सरा त्याचे स्वागत चामरे घेऊन व एक यक्ष किंवा गंधर्व त्याची पालखी वा विमान आपल्या दोन हातानी डोक्यावर घेऊन चालला आहे असे दिसते. दुसऱ्या  बाजूस दोन पुरुष त्याला पालखीत घेऊन जाताना दिसतात. याच बाजूवरील खालच्या टप्प्यात दोन स्त्रिया त्यास हातात हार घेऊन सोबत बसल्या आहेत. या कदाचित सती जात असाव्यात मात्र येथे सतीचा आशीर्वाद देणारा हात कुठेही शिल्पांकित केला नाही. या शिवाय अजून दोन वीरगळ येथे पाहायला मिळतात हे आयताकृती शिळेवरील एकाच बाजूस कोरलेले वीरगळ प्रकारचे एकाच टप्प्यातील वीरगळ आहेत. एका शिळेवर वीर घोड्यावर स्वार झालेला असून त्याचा घोडा मागच्या दोन पायांवर उभा राहिलेला दिसतो. या शिल्पांच्या धाटणीवरून ही शिल्पे बारावे शतक ते चौदावे शतकातील असावीत. वलंग गावाच्या तलावाच्या काठावरील रहाटीत काही शिल्पावशेष आहेत. यात भग्न गणेश शिल्प, भैरवाची सूक्ष्ममूर्ती, एक वीरगळ असे आहेत. त्यांचा काळखंडही वरील प्रमाणेच आहे.

**रोहन** (18° 3'51” N, 73° 20'18” E )

हे गाव महाडच्या पश्चिमेस १३ किलोमीटर अंतरावर विनोला नावाच्या सावित्री नदीच्या उपनदीच्या पश्चिम काठावर वसले आहे. ही नदी आदिस्तेच्या डोंगरात दक्षिणेकडे उगम पाऊन सावित्रीला रोहन गावाजवळ भेटते. रोहन गावात जाखमाता ही गावदेवी आहे. येथे जाखमाता म्हणून एका दगडाला शेंदूर लाऊन पूजा केली जाते. हा दगड म्हणजे एक आयताकृती कोरीव शिळा आहे. गावामागील टेकडीवर असलेल्या विश्वेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. येथे सध्या उल्लेखनीय पुरावशेष आढळतात. यात गद्धेगळ (छायाचित्र क्रमांक ५२), एक भग्न वीरगळ, काही शुष्कसांधी बांधणीच्या कोरीव शिळा व एक शीर्षभागी मंगलकलश असलेली शिळा आहेत. येथील गद्धेगळ ९० सेंटीमीटर उंच व ४० सेंटीमीटर रुंद आहे. त्याच्या शीर्षभागावर अर्धवर्तुळाकृती त्यावर चंद्र, सूर्य आणि एक गोल वस्तू काढली आहे. ही गोल वस्तू बहुतेक ग्रहांचे व ताऱ्याचे प्रतिक असावी. त्या खाली एक

चौकट असून त्यात डावीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ होणाऱ्या गाढवाची व घोड्याची आकृती काढली आहे. या चौकटी खाली शिलालेख लिहिण्यासाठी मोकळा भाग ठेवला आहे. शिळेची झीज झाल्यामुळे सध्या यावर कोणताही लेख दिसून येत नाही. या शिवाय येथे सुमारे १५ ते २५ सेंटीमीटर उंचीच्या लहान मोठ्या साधी शिल्पे कोरली आहेत. यांवर जोडपी, एकटा पुरुष अशा प्रकारची शिल्पे आहेत. ही छोटी छोटी शिल्पे नवसपुर्ती साठी केलेली असावीत. याशिवाय आपल्या दोन हातांपैकी डावा हात मोकळा खाली सोडलेला व उजव्या हाती दंड धारण करणाऱ्या स्त्रीचे शिल्पाही येथे आहे. एकंदर शिल्पशैलीवरून त्यांचा काळ अकराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकाचा असावा.या ठिकाणी कोपजाई देवतेचे स्थान कुठल्या तरी शेतात होते. या ठिकाणी देवी फिरत असताना तिला शेतातील एक खेकडा चावला त्यामुळे देवीने चिडून आपले स्थान डोंगरावर नेले तिथून तिने जोर जोरात तार स्वरात किंचाळायला सुरवात केली, त्यामुळे या भागातील खेकडी पळून गेली किंवा नष्ट झाली असे येथे मानले जाते.

**रावढळ** (18° 4'23” N, 73° 21'56” E )

हे गाव महाडच्या पश्चिमेस सहा किलोमीटर म्हाप्रळ-पंढरपूर या मार्गावरील सावित्री व नागेश्वरी नद्यांच्या संगमावरील छोटेसे गाव आहे. या गावातील पुरावशेष गावाच्या कालभैरी, जोगेश्वरी व रवळनाथ या देवतांच्या मंदिर परिसरात आहेत. या मंदिरात सुमारे ६० सेंटीमीटर उंच व ४० सेंटीमीटर रुंद काळ्या पाषाणातील पाच शिल्पे आहेत सर्व शिल्पे चार हातांची, स्थानक व समभंग अवस्थेतील आहेत. शैलीवरून ही शिल्पे मराठा काळातील आहेत. शिवमंदिरात आधुनिक काळातील शिवलिंग व नंदी शिल्प आहे. मंदिराबाहेर आयताकृती शिळेवर एकाच बाजूस दोन टप्यात कोरलेले ४० सेंटीमीटर रुंद व २५ सेंटीमीटर लांब दोन भग्न वीरगळ व एक सतीशिळा आहे. गावाच्या उच्च माध्यमिक शाळेजवळ महिषासुरमर्दिनी प्रकारचे झीज झालेले शिल्प आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत.

**सापे तर्फे तुडील** (18° 2'43” N, 73° 22'33” E )

महाड तालुक्यात सापे नावाची दोन गावे असल्याने पूर्वीच्या ‘तुडील तर्फ’ या प्रशासकीय विभागातील सापे गाव म्हणून या गावास सापे तर्फे तुडील असे म्हटले जाते. गावातील भवानी या स्थानिक देवतेच्या मंदिर परिसरात येथील पुरावशेष आढळतात. भवानी मंदिरात आधुनिक संगमरवराची मूर्ती बसवली असली तरी मंदिरामागे महिषासुरमर्दिनी प्रकारचे भग्न

मूर्ती आढळून येते. या शिवाय येथे तेलाच्या दगडी घाण्याचा वरचा भाग जपून ठेवलेला दिसतो. याचे उंबार्डी येथे आढळणाऱ्या तेलाच्या घाण्याशी कमालीचे साम्य आहे. शैलीवरून हे शिल्पे चौदाव्या व पंधराव्या शतकातील वाटतात.

**वामने (18° 3'30" N, 73° 22'21" E )**

महाडच्या पश्चिमेला ९ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात भैरी या स्थानिक गावदेवाचे मंदिर आहे, मंदिरात चार हातांची स्थानक व समभंग अवस्थेतील पाच शिल्पे आहेत यांपैकी दोन मुख्य शिल्पे त्यांच्या शैलीवरून मराठा काळातील आहे. ही शिल्पे भैरी आणि जोगेश्वरी म्हणून येथे ओळखली जातात. मंदिराबाहेर सध्या घुमटीखाली एक चार हातांचे त्रिभंग अवशेतील भैरवाचे शिल्प आहे. येथील एका आयताकृती शिळेवर चार मुखे कोरलेली होती. तिची तशीच प्रतिकृती बनवण्यात आली आहे. तसेच एक तेलाच्या घाण्याचेही अवशेष आहेत त्यांची झीज झालेली असून देखील गावकरी पूजा करतात. शिल्पशैलीवरून यांचा कालखंड चौदाव्या शतक किंवा थोडा त्यानंतरचा ठरवता येतो.

**गोठे बुद्रुक** (18° 4'59" N, 73° 21'56" E )

हे गाव सावित्री नदीच्या दक्षिण काठावर व पूर्व पश्चिम असलेल्या डोंगर रांगेच्या उतारावर वसले आहे. गावातील पुरावशेष शिवमंदिर व जाखमाता मंदिराराजवळ आढळून येतात. गोठेश्वर या शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून या मंदिरामागे भैरवाची ४५ सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद चार हातांची समभंग मूर्ती आहे. शैलीवरून ते चौदाव्या शतकातील वाटते. या शिवाय बस स्थानकाजवळ मशिदीचे अवशेष आहेत सदर बांधकाम शुष्कसांधी बांधीव तंत्राने केले आहे मशिदीचे फक्त पायाचे अवशेष आहेत. नदीलगत गावदेवी जाखमातेचे मंदिर आहे. या ठिकाणी मंदिराबाहेर भग्नावस्थेतील गजलक्ष्मीचे ४५ सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद शिल्प आहे या देवीस कलकी म्हणतात. शेतात नांगरणीच्या वेळेस इस्लामिक काचेचा लेप दिलेल्या हिरव्या व निळ्या रंगाची तसेच पांढऱ्यावर निळ्या रंगात वेलबुट्टीची नक्षी असलेले मध्ययुगीन काळातील खापरांचे तुकडे आढळून येतात.

**आदे** (18° 1'41" N, 73° 22'53" E )

आदे हे गाव महाडच्या नैऋत्येस १४ किलोमीटर अंतरावर आहे. गाव नागेश्वरी नदीच्या पश्चिम काठावर एका टेकडीवर वसले आहे. टेकडीच्या पायथ्याला नुकतेच जीर्णोद्धार झालेले शिवमंदिर आहे. मंदिरात आधुनिक काळात घडविलेली दोन शिवलिंगे, दोन नंदीशिल्पे आणि

पार्वतीचे म्हणून दाखविले जाणारे एक शिल्प आहे. मंदिराबाहेर काही शिल्पे ठेवली आहेत. यामध्ये उजव्या सोंडेचा आसनस्थ (४० सेंटीमीटर लांब आणि २५ रुंद) गणेशाचे शिल्प, मुख भग्न झालेला नंदी आणि एक सतीशिळा आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत.

**भेलोशी** (18° 2'0" N, 73° 21'25" E )

भेलोशी या महाडच्या नैऋत्येस १५ असलेल्या गावातील पुरावशेष गावातील सोमजाई या ग्रामदेवतेच्या मंदिर परिसरात आहेत. मंदिरात गोलाकार भागात खाच व पन्हाळ असलेले शिवलिंग, मंदिराबाहेर भग्न गोलाकार लिंगपीठ व समाधीचे दगड आहेत. मंदिरासमोर एक वीरगळ आहे. हा वीरगळ ७५ सेंटीमीटर लांब आणि ३० सेंटीमीटर रुंद आयताकृती शिळेवर तीन टप्प्यात कोरला आहे. वीर घोड्यावर स्वार होऊन युद्ध करताना दिसतो. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील आहेत.

**खुटील** (18° 1'6" N, 73° 21'58" E )

भेलोशी हे गाव महाडच्या नैऋत्येस १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या बहुळाचा माळ नावाच्या डोंगराच्या पूर्व पायथ्याशी वसले आहे. गावातील पुरावशेष गावातील जननी-सोमजाई या ग्रामदेवतेच्या मंदिर परिसरात आहेत. मंदिरातील मूर्ती त्यांच्या शैलीवरून आधुनिक काळात घडवलेल्या आहेत. या मूर्ती येथे असलेल्या मूळ शिल्पांच्या प्रतिकृती असाव्यात. मंदिराच्यामागील बाजूस काही भग्न शिल्पे आहेत. यांमध्ये महिषासुरमर्दिनीचे दोन हातांचे शिल्प उल्लेखनीय आहे. हे शिल्प कमरेपासून खाली तुटले असून त्याच्या मुखाचा भागही काही प्रमाणात खराब झाला आहे. देवीने करंडक प्रकारचा उंच मुकुट परिधान केला असून त्यावर उत्तर चालुक्य प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. देवीच्या कानात जड व गोल वलये आहेत. आपला उजवा पाय महिषासुरावर रोवला आहे व उजव्या हातातील त्रिशुळाने महिषासुरावर प्रहार केला आहे. या शिवाय भैरवाची झीज झालेली भग्न मूर्तीही पाहायला मिळते. मूर्तीशैलीवरून ही शिल्पे दहाव्या व अकराव्या शतकातील असावीत.

**नरवण** (18° 2'24" N, 73° 22'1" E )

नागेश्वरी नदीच्या पश्चिम तीरावर हे गाव वसले आहे. येथे गावदेवाचे मंदिर असून गावातील पुरावशेष येथे ठेवलेले पाहायला मिळतात. महाडच्या दिशेस हे गाव किलोमीटर अंतरावर आहे. मंदिरात तीस ते चाळीस सेंटीमीटर उंचीच्या चार हातांची दोन शिल्पे आहेत. त्यांच्या

पैकी एक स्त्री शिल्प असून त्रिभंग अवस्थेतील या शिल्पाचे वाहन कुत्रा दाखविलेला दिसतो. ही मूर्ती भैरवीची असावी. तिच्या हातात त्रिशूळ, नाग व डमरू आहेत. हे शिल्प त्याच्या शैलीवरून चौदाव्या शतकातील असावे. दुसरे समभंग अवस्थेतील शिल्प काळभैरीचे म्हणून सांगितले जाते ते शैलीवरून मराठा काळातील असावे. मंदिराबाहेर भीतीला टेकवून ठेवलेली अनेक लहान मोठी भग्नावस्थेतील शिल्पे आहेत. यात दोन सतीशिळा, वीरगळाचा भग्न तुकडा हे आहेत. एका ४५ सेंटीमीटर उंच आणि ३५ सेंटीमीटर रुंद शिळेवर एक स्त्रीशिल्प असून ते दोन हाताचे आहे. तिने आपल्या उजव्या हातात दंड धारण केला आहे व डावा हात खाली मोकळा सोडला आहे. तिच्या केसाची एक बट किवा शिखा तिच्या डोक्याच्या उजव्या बाजूस सोडली आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावीत.

**बिरवाडी** (18° 6'7” N, 73° 30'14” E )

बिरवाडी हे महाडच्या पूर्व दिशेस सहा किलोमीटर अंतरावरील काळ नदीच्या उत्तरकाठावरील महत्वाचे गाव असून गावाच्या पश्चिमेस मल्लिकार्जुन नावाचे शिवमंदिर आहे. या ठिकाणाच्या जीर्णोद्धार काळात येथे असलेल्या मंदिर व पुष्कर्णीमध्ये बदल झाला आहे. मंदिर कौलारू असले तरी आतले गर्भगृह चौकोनी आकाराचे व त्यावर फांसना म्हणजे पिरॅमीडच्या आकाराचे पायऱ्या असलेले शिखर आहे. मंदिराच्या समोरील भिंतीत दोन देवळ्या आहेत. यात अलीकडच्या काळातील विष्णू व गणेश प्रतिमा आहेत. मंदिराचा हा भाग मराठा काळाच्या शेवटच्या काळातील असावा. मंदिरासमोर तीन भग्न वीरगळ, भग्न नंदी, भग्न स्तंभाचे अवशेष, योनीपीठ इत्यादि शिल्पे आहेत. येथील वीरगळ हे चौकोनी खांब प्रकारचे व चारही बाजू शिल्पांकित केलेले आहेत. त्यावर तीन ते चार टप्पे कोरले आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. गावाच्या बाजारपेठ भागात एका बाजूस आत उतरून पाणी घेता येईल अशी पाय-विहीर आहे. स्थानिक लोक याला घोडेबाव असे म्हणतात. आतील बाजूस जिथे पायऱ्या संपतात तिथे कमान आहे. एकंदर रचनेवरून ही विहीर मराठा काळातील असावी. गावदेव भैरी मंदिराजवळ मंदिर बांधकामाच्या वेळेस मृदभांड्यांचे अवशेष सापडले. इथला भैरीदेव महाडच्या विरेश्वराचा लहान भाऊ मानला जातो. या देवाला महाडच्या यात्रेत खास मान दिला जातो.

**काळीज** (18° 6'7” N, 73° 30'14” E )

महाडच्या पूर्व दिशेस काळनदीच्या उत्तरकाठावरील बिरवाडी गावाचाच हा एक भाग आहे. गावच्या दक्षिणेस काळीश्री नावाचे गावदेवी मंदिर आहे. हे काळनदीच्या उत्तर काठावर असून

काळनदीचे प्रतिक मानले जाते. या मंदिर परिसरात भग्न नंदी व काही झीज झालेले पुरावशेष आढळतात. या ठिकाणाचा जीर्णोद्धार काळात यथे खूप बदल झाला आहे. नदीच्या पलीकडे म्हाप्रळ-पंढरपूर मार्गालगत असलेल्या सातआसरा या ठिकाणी कोरीव टाक्या होत्या आज त्या नष्ट झाल्या असून प्रवासी लोक प्रवास सुखरूप व्हावा म्हणून लाकडी बैलगाड्या ठेवतात. या बैलगाड्यात बसलेले लोकही दाखविले जातात.

**आसनपोई** (18° 5'50” N, 73° 29'12” E )

महाडच्या पूर्वेस आठ किलोमीटर अंतरावर काळनदीच्या उत्तर काठावर हे गाव आहे. गावच्या पश्चिमेस सोमजाई गावदेवीचे मंदिर आहे. या ठिकाणी फक्त भग्न योनीपीठ आढळते.

**जिते** (18° 7'9” N, 73° 29'17” E )

महाडच्या ईशान्य दिशेस सात किलोमीटर अंतरावर जिते हे साधे गाव आहे. गावात शिवमंदिर व गावदेव काळभैरी या मंदिराच्या परिसरात उल्लेखनीय शिल्पे पुरावशेषरूपाने पाहायला मिळतात. या ठिकाणी गावकऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे हेमाडपंथी मंदिर होते. आता कौलारू मंदिर बांधलेले आहे.

या ठिकाणी वीरगळ, सतीशिळा, नंदी, योनीपीठ, शिवलिंग, असे अनेक शिल्पे आहेत. मंदिराचा गाभारा खोल असून त्यावर फरश्या बसविल्या आहेत. मंदिराभोवती संरक्षक भिंत असून जीर्णोद्धाराच्या वेळेस गावकऱ्यानी यात आजूबाजूस पडलेले वीरगळ व सतीशिळा बसविले आहेत. हे वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराचे व आयताकृती एकाच बाजूस शिल्पांकित केलेले अशा दोन्ही प्रकारचे आहेत. आयताकृती वीरगळ संख्येने १९ आहेत. हे तीन ते चार टप्प्यांचे व भग्नावस्थेत आहेत. दोन सतीशिळा आहेत. यातील एका सतीशिळेवर वराह शिकारीच्या वेळेस मृत्यू पावलेल्या वीराचे शिल्प आहे. भिंतीत बसविलेल्या या वीरगळावर छत्रधारी राजाचे शिल्पांकन आहे. दुसऱ्या सतीशिळेवर व एका वीरगळावर मधल्या पट्टीवर चौकटच्या आकाराची फुले कोरली आहेत. चौकोनी खांबाच्या आकाराचे सात वीरगळ आहेत. हे वीरगळ मंदिराला खेटून भिंतीजवळ जमिनीत अंशतः बसविले आहेत. एका वीरगळाच्या खालच्या टप्प्यात छत्रधारी वीर दाखविला आहे. या ठिकाणचे विशेष शिल्प म्हणजे एका आयताकृती शिळेवर सात मुखे दाखविली आहेत (छायाचित्र क्रमांक ४९). त्याच्या शेंड्या डोक्याच्यामागील बाजूस सोडलेल्या दाखविल्या आहेत. झीज झालेले असले तरी कानातील कुंडले व गळया पर्यंतचा भाग दिसतो. या शिळेच्या एका बाजूस पाणी वाहून

जाण्यासाठी पन्हाळ केली आहे. याशिवाय चार हाताचे एक भग्न शिल्प आहे. या सर्व शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे अकरावे शतक ते चौदाव्या शतकाच्या काळातील असावीत.

**दहीवड** (18° 8'37" N, 73° 31'44" E )

हे गाव महाडच्या ईशान्य दिशेस १४ किलोमीटर अंतरावर रायगडकडून येणाऱ्या काळ नदीच्या पश्चिम काठावर वसले आहे. या ठिकाणी मानाई या स्थानिक गावदेवी मंदिरात आधुनिक काळात स्थापन केलेली शिल्पे आहेत. मंदिराबाहेर एक आयताकृती शिळेवर एकाच बाजूस तीन टप्प्यात शिल्पांकित केलेले तीन वीरगळ आहेत. यातील एक काहीसा भग्नावस्थेतील वीरगळ आहे. यावरील वीर हातात धनुष्य घेऊन लढताना दिसतो. वीरगळावर नेहमीचीच दृश्ये आहेत. यांचा शिरोभाग अर्धवर्तुळाकृती आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत.

**रानवडी खुर्द** (18° 8'37" N, 73° 31'44" E )

महाडच्या ईशान्येस १२ किलोमीटर अंतरावर खरक नदीच्या उत्तर काठावर व सह्याद्रीच्या पायथ्याशी वसले आहे. या गावातून मढेघाटाने व उपांडयाच्या नाळेने पुणे जिल्ह्यातील वेल्हा तालुक्यात जाता येते. गावाच्या पडवळकोंड या ठिकाणी म्हणजे मढेघाटाच्या पायथ्याशी एका बाजूने आत प्रवेश करता येईल अशी विहीर आहे. पायऱ्या संपताच आतमध्ये एक कमान आहे. या विहिरीच्या उजव्या बाजूस एक संस्कृत शिलालेख आहे. हा देवनागरीतील सहा ओळींचा लेख असून, अत्यंत झीज झालेला आहे. याच्या शेवटच्या ओळीत कालोल्लेख आहे. याचे वाचन असे आहे:

श्री..... १
श्री गणेशाय नमः श्रीमधर्म २
परायणोनिसुज श्री गदेस...स्योर ३
घुनाथसात्मज सह्य.. व विज र पा ४
..तिहत मुद्रा......सप्तदप..जेहि.. त ५
ना नापी श्रम प्रां श्रु भा कपू; मंगल वाम ६
...वशसी सप्तेदुसंखे गतो शके १७.. ७

या शिवाय येथे इतर पुरावशेष आढळले नाहीत. मढेघाटाने सिंहगडावर धारातीर्थी पडलेला शिवाजी महाराजांचे एक सरदार तानाजी मालुसरे यांचे पार्थिव शरीर नेले असे मानले जाते,

त्यामुळेच या घाटाला मढेघाट नाव पडले असावे असे म्हणतात. परंतु यात सत्यता फार कमी असावी. वास्तविक या परीसरातील हे घाटमार्ग प्राचीन काळापासून सुरु आहेत. कदाचित या ठिकाणी एखादा धर्मार्थ मठ असावा, जुन्या मराठीत मठाला मढ़ू किंवा मढऊ म्हणतात.

**शेवते** (18° 11'2" N, 73° 32'25" E )

महाडच्या ईशान्येस १५ किलोमीटर अंतरावर सह्याद्रीच्या दक्षिण उतारावर समुद्रसपाटीपासून ३०० मीटर उंचीवर वसले आहे. गावाच्यामागील बाजूस एक टेकडीचा उतार आहे. यावरून एक घाटवाट पुणे जिल्ह्यातील गुगुळशी गावी जाते. याला शेवत्या घाट असे सांगतात. ही वाट अवघड आहे. सह्याद्रीतील या कड्यात काही वैशिष्ट्यपूर्ण कातळात कोरीव खोदकामे केलेली आढळतात. घाटात २०० मीटर उंचीवर कातळ कडा खोदून दक्षिणोत्तर जाणारा मार्ग बनवलेला पाहायला मिळतो. हा भाग मुखाशी म्हणजे दक्षिण बाजूस ८.४० मीटर रुंद कातळात खोदला आहे. याला लाकडी छत बसवत असावेत असे या ठिकाणी कातळ भिंतीवर केलेल्या खोबणीवरून वाटते. येथून पुढचा भाग पडलेला व ढासळलेला आहे. या मार्गाच्या टोकाशी २४.५० मीटर लांब व २१.५० मीटर लांब व ३.१० मीटर रुंद कातळात खोदीव भाग आहे. हा भाग साफ केल्यास याचे स्वरूप जास्त स्पष्ट होईल. या खोदीव भागातील खुणांवरून येथे कातळात काही खोल्या देखील असाव्या असे वाटते. या भागाला येथील स्थानिक लोक 'पेठ' असे म्हणतात. याशिवाय सपाटीवर कातळात कोरलेली आयताकृती मुख असलेली एक पाण्याची टाकी हि आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर घाटमार्गासाठी खोदकाम केल्याचे संपूर्ण पश्चिम किनारपट्टीतील हे अनोखे उदाहरण आहे. कदाचित हे काम इसवीसनाच्या सुरवातीच्या शतकातील काम असावे.

**वाळण बुद्रुक** (18° 10'23" N,  73° 29'38" E )

हे गाव महाडच्या ईशान्येस १६ किलोमीटर अंतरावर रायगडजवळ उगम पावणाऱ्या काळ नदीच्या पश्चिम तीरावर आहे. गावाच्या शीतभैरी या गावदेवाच्या मंदिर परिसरात पुरावशेष आढळतात. या ठिकाणी कौलारू मंदिरासमोर ३२ वीरगळ असून यांपैकी काही सरळ उभे आहेत तर काही मंदिरा भोवती पडले आहेत. आयताकृती व एकाच बाजूस चार, तीन व दोन टप्प्यात कोरलेल्या वीरगळांची सरासरी उंची १.२० मीटर आहे. दहा वीरगळ चांगल्या तर बाकीचे अंशतः भग्न आहेत. यातील वीरगळावर नेहमीचीच दृश्ये आहेत. फक्त एका वीरगळावर वीर घोडेस्वार शत्रूशी युद्ध करताना दिसतो. एका वीरगळावरील मधल्या टप्प्यात वीर विमानात किंवा मेण्यात बसलेला असून त्याच्या दोन्ही बाजूस केळीची किंवा नारळाची

झाडे आहेत. यातील भालाधारी वीराने आपल्या डाव्या हातास ढाल बांधलेली दिसते. याशिवाय येथे तीन सतीशिळा आहेत. शैलीवरून ही शिल्पे बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावीत. याठिकाणी एक नंदी, योनीपीठ व काही भग्न शिल्पे आहेत. या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणावर वीरगळ आढळल्याने व हा भाग पुणे या ठिकाणी जाणारा शेवत्या आणि मढेघाट मार्गाशी निगडीत असल्याने त्याच्यावर ताबा मिळवण्यासाठी ही युद्धे झाली असावीत.

**वाळण खुर्द** (18° 10'23” N, 73° 29'38” E )

हे गाव रायगड काळ नदीच्या पूर्व तीरावर आहे. गावात काळभैरीच्या मंदिराजवळ व शिवमंदिराजवळ पुरावशेष आढळले. पाच वीरगळ, एक सतीशिळा, एक मुखभग्न झालेला नंदी, कमरेपासून खालचा भाग शिल्लक असलेला विष्णू, भग्न गणेश इत्यादि शिल्पे आहेत. येथील वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस चार ते तीन टप्प्यात कोरीव काम केलेले आहेत. काही वीरगळाच्या शीर्षभागी तीन मंगलकलश दाखविले आहेत. त्यांच्या शिल्पशैलीवरून बाराव्या ते तेरावे शतकाचा कालखंड निश्चित करता येतो. गावाच्या दक्षिणेस शिवमंदिर आहे. मंदिराबाहेर चौकोनी खांबाच्या आकाराचा पण चार टप्प्यातील खराब अवस्थेतला वीरगळ पडला आहे. या मंदिरात भग्नावस्थेतील विष्णू मूर्ती, उमामहेश्वर शिल्प व गणेश शिल्प आहेत. या शिल्पांची अवस्था खराब आहे. गाभारा खोल आहे पण त्यावर नव्यानेच बांधकाम केलेले दिसते. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकरावे ते बाराव्या शतकातील असावीत.

**वाघोली** (18° 12'24” N, 73° 27'50” E )

महाडच्या ईशान्येस २४ किलोमीटर अंतरावर रायगड किल्ल्याच्यामागील गुयरी या सह्याद्रीतील डोंगर रांगेच्या ‘पांडवकडा’ नावाच्या कड्याच्या पश्चिम पायथ्याला समुद्रसपाटीपासून १०० मीटर उंचीवर हे गाव आहे. गावातील पुरावशेष गावदेव मंदिराजवळ आहेत. उल्लेखनीय अवशेष पांडवकडा नावाच्या टेकडीवर आहेत. पायथ्यपासून २०० मीटर उंच टेकडीच्या पश्चिम उतारावर कड्यावर कोरीव पाण्याचे टाक्या खोदलेल्या आहेत. या एकूण सहा टाक्या आहेत. चार टाक्या वरील भागात तर दोन टाक्या खालच्या भागात आहेत. अत्यंत तीव्र उतार असल्याने इथे पोहोचणे फारच कठीण व धोकादायक आहे. माथ्यावर अतिशय कमी जागा असलेल्या टेकडीवर एक तटबंदीसारखा भाग बघायला मिळतो. याशिवाय एक आयताकृती चौथाराही असावा त्याचे ओळीत लावलेले पायाचे दगड दिसतात.

गुयरीचा डोंगर व पांडवकडा यामध्ये कालकाईची खिंड आहे. येथेही एक पाण्याचे टाके आहे. या टाक्याची रचना मुळात आयताकृती मुखभाग व आत कातळात खोल आडवे खोदलेली अशी आहे परंतु तलविन्यास (ground plan) मात्र कुऱ्हाडीच्या पात्यासारखा तोंडाकडे रुंद व आत पात्यासारखा पसरलेला आहे. यातील मुख्य टाके ४.९० मीटर लांब, ५.७० मीटर रुंद व २.६० मीटर खोल आहे. याच्या मुख भागात आत प्रवेशासाठी दाराची रुंदी १.२० मीटर अशी आहे. या परिसरातील अनेक मध्ययुगीन किल्ल्यावर यासारख्या रचनेच्या टाक्या आहेत. यांच्या स्वरूपावरून दहाव्या शतकानंतर केंव्हातरी यांची निर्मिती झाली असावी. एकंदर स्वरूपावरून ही एक रायगड खोऱ्यातील संरक्षक वसाहत असावी. गावाच्या सोमजाई या गावदेवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिरातील सोमजाईची मूर्ती महिषासुरमर्दिनी आहे. ही आधुनिक काळात केंव्हा तरी घडविली असावी. या मंदिराच्या आवारात कठड्यालगत पाच वीरगळ ठेवले आहेत. यातील दोन वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराचे व चार ते तीन टप्पे असलेले आहेत. यातील चौकोनी व चार टप्याच्या वीरगळाच्या चौकटीच्या मधल्या पट्टीवर त्रिकोणी घटक कोरलेला दिसतो. हे शिलाहार शिल्पाचे वैशिष्ट्य आहे. यावरील शिल्पांवरून ही लढाई गुरे रक्षण करण्यातून झालेली दिसते.एका भग्न वीरगळाच्या खालच्या टप्यात मृत वीराबरोबर एक व्यक्ती कुशीवर झोपलेली दिसते, तर मृत वीर उताणा आहे. तिसरा वीरगळ चांगल्या अवस्थेत आहे. यावर नेहमीचीच दृश्ये आहेत. शैलीवरून हे वीरगळ बाराव्या शतकातील असावेत.

**पाने** (18° 13'56” N, 73° 29'53” E )

महाडच्या ईशान्येस २० किलोमीटर अंतरावर पाने हे गाव लिंगाणा किल्ल्याच्या पायथ्याशी वसले आहे. गावच्या गावपांढर या गावदेवाच्या मंदिराशेजारी काही भग्नावस्थेतील शिल्पे आहेत. यात योनीपीठ व लिंग, आयताकृती आकाराचे एकाच बाजूस शिल्पांकित असलेले तीन वीरगळ आहेत. हे दोन ते तीन टप्यात ओरले आहेत. शिल्पशैलीवरून यांचा कालखंड बारावे शतक ते चौदावे शतक असा ठरवता येतो.

**कडसरी लिंगाणा** (18° 13'56” N, 73° 29'53” E )

सह्याद्रीच्या मुख्य रांगेतील लिंगाणा किल्ला ही एक संरक्षक वसाहत होती. मराठा काळातील एक महत्वाचा किल्ला. ही संरक्षक वसाहत आद्य ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात असावी. या किल्ल्याच्या पायथ्याला कडसरी लिंगाणा हे ठिकाण समुद्रसपाटीपासून २०० मीटर

उंचीवर आहे. ही संरक्षक वसाहत गावाच्यामागील कड्यातील सुळक्यावर आहे. या गडावर तीन कातळात कोरीव लेणी व एक पाण्याचे टाके आहे. यातील मुख्य लेणी आयताकृती व स्तंभरहित तलविन्यासाची आहे. भिंती साध्या व कोणतेही शिल्पकाम केलेल्या नाहीत. बाकीच्या दोन लेणी कातळ कड्यात असून आकाराने लहान आहेत. यांच्याशेजारी दोन पाण्याच्या टाक्या आहेत. या संरक्षक वसाहती जवळून बोराट्याची नाळ व बोचेघोळ नाळ हा पायी मार्ग पुणे जिल्ह्यात प्रवेश करतो.

**नाते** (18° 8'21" N, 73° 23'57" E )

महाडच्या उत्तरेस सहा किलोमीटर अंतरावर गांधारी नदीच्या पश्चिमेस नाते गाव वसले आहे. आजचे नाते पेशवे काळात वसलेले आहे. गावाचे मूळ ठिकाण म्हणजे वरचे नाते होय. या ठिकाणी असलेली शिल्पे लोकांनी मूळ ठिकाणाहून आजच्या मंदिराजवळ आणली आहेत. निजामशाहीत व शिवकाळात गाव कसबे नाते म्हणून प्रसिद्द होते यास तर्फ्याचा दर्जा होता. नाते गावात मध्ययुगाच्या आधीपासूनच वसाहत झाली असावी याचे अनेक पुंरावे येथे सापडतात. रवळनाथ, सोमजाई व कुंभळजाई या स्थानिक देवतांच्या मंदिरात मराठा व नंतरच्या काळातील पाच शिल्पे आहेत. परंतु मंदिराबाहेरील कट्ट्यावर सुमारे एक मीटर उंचीचे पाच वीरगळ ठेवले आहेत. हे वीरगळ आयताकृती शिळेवर एकाच बाजूस दोन ते चार टप्यात शिल्पांकित केले आहेत. बाजूकडील पहिल्या वीरगळाचे तीन टप्पे आहेत. खालच्या पहिल्या टप्यात एक हात उंचावलेली व्यक्ती ही बहुधा स्त्री असावी दिसते तर या स्त्रीच्या खांद्यावरून खाली आलेल्या वस्त्राला दुसऱ्या व्यक्तीने हात घातला आहे. तिसरी व्यक्ती मृदुंग वाजवताना दिसते. वरील टप्यात हातात ढाल व खड्ग, धनुष्यबाण व भाला घेतलेल्या तीन व्यक्ती दिसतात. शेवटच्या तिसऱ्या टप्यात शिवलिंग पूजा करताना एक व्यक्ती दिसते. या दृश्यावरून कोणातरी स्त्रीच्या मान सन्मानासाठी हा वीर बळी गेला असावा. दुसऱ्या वीरगळावरील शिल्पेही काहीशी वेगळी आहेत. खालच्या टप्यात गोधनाच्या रक्षणासाठी युद्ध झालेले दिसते. वरील दुसऱ्या टप्यात चार वीर हातात ढाल तलवार घेवून युद्धाच्या पवित्र्यात उभ्या आहेत, तर एक व्यक्ती निश्चिंतपणे त्रिभंग अवस्थेत उभी आहे. वरच्या तिसऱ्या टप्यात युद्धात गुंतलेले पाच वीर दिसतात. चवथ्या टप्यात वीर शिवपूजा करताना दिसतो. तिसरा आणि चवथा वीरगळ अनुक्रमे तीन व दोन टप्यांचे आहेत, त्यांवर नेहमीचीच दृश्ये आहेत. या शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत.

गावात कोटबा नावाचा डोह असून येथे पूर्वी लग्नकार्यासाठी भांडी मिळत कोणा एका दुष्टाने एक भांडे लपविल्यामुळे याठिकाणी कोप होऊन भांडी मिळायची बंद झाली, अशी अख्यायिका सांगितली जाते. नाते मूळगाव या ठिकाणी कुंभारवाडा असून येथील शिवमंदिराबाहेर चार वीरगळ व एक सतीशिळा आहे. हे वीरगळ आयताकृती प्रकारचे चार टप्यातील आहेत. या चौकटी दरम्यानच्या पट्टीवर चौकटच्या आकाराची फुलांची नक्षी कोरली आहे. बाकी वीरगळावर नेहमीची दृश्ये आहेत. जुने नाते येथे एका शेतात तेलाचा घाणा भग्नावस्थेत पडला आहे. येथे फार पूर्वी तेल्यांची वस्ती असल्याचे लोक सांगतात. अशा प्रकारचे तेलाचे घाणे मंदिर परिसरात इतर भागातहि आढळले आहेत. शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे तेराव्या शतकातील असावीत. कुंभारवाड्याजवळ हनुमानची चपेट मुद्रेतील एक मीटर लांबीची प्रतिमा आहे. जुने नाते या परिसरात अनेक खापरे आढळून येतात याशिवाय आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील पिण्याचे कपाचेही तुकडे येथे आढळून आले आहेत. काचेचा लेप दिलेली हिरव्या व निळ्या रंगाची खापरेही, काळ्या आणि चकतीच्या आकाराच्या बहुरंगी बांगड्यांचे तुकडे मिळतात.

**कोकरे तर्फे नाते** (18° 4'44” N, 73° 17'46” E )

हे गाव महाडच्या उत्तरेस पाच किलोमीटर अंतरावर आहे. या गावात उल्लेखनीय अवशेष गावदेव भैरवनाथ व शिवमंदिर परिसरात आढळतात. ही दोन्ही कौलारू मंदिरे एकमेकांशेजारी आहेत. भैरवनाथ मंदिरात भैरवनाथ व जोगेश्वरी नावाने दाखवली जाणारी ही दोन शिल्पे आहेत. ही शिल्पे स्थानक व चार हातांची पण झीज झालेली अशी आहेत. शैलीवरून मराठा काळातील असावीत. मंदिराच्या मागे झाडीत भग्न शिल्पांचे अवशेष आहेत. या ठिकाणी नंदी, योनीपीठ, आयताकृती आकाराचा व एकाच बाजू शिल्पांकित केलेला दोन टप्यातील एक वीरगळ आहे. याशिवाय नागांच्या दोन प्रतिमा व सतीचा हात दर्शविणाऱ्या दोन शिळा देखील आहेत. शिवमंदिराच्या समोर काही समाध्या आहेत, तसेच शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या बांधकामाच्या काही कोरीव शिळा पडलेल्या आहेत. चौथऱ्यावर एका तेलाच्या घाण्याचा वरचा भाग भग्नावस्थेत पडला आहे. याच बाजूस दोन सतीशिळा अंशतः जमिनीत गाडल्या गेलेल्या आहेत. एक भग्न गणेश प्रतिमा आहे. ही शिल्पे तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील असावीत. मंदिराचा गाभारा खोल आहे, मात्र आतील सर्व शिल्पे त्यांच्या शैलीवरून आधुनिक काळातील वाटतात.

**किंजलोळी खुर्द** (18° 7'18” N, 73° 25'9” E )

हे गाव महाडच्या उत्तर दिशेस चार किलोमीटर अंतरावर एका ओढ्याच्या काठावर वसले आहे. इतिहास प्रसिद्ध सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे हे गाव होते. या ठिकाणी त्यांची मरणोत्तर समाधी असल्याचे सांगितले जाते. या ठिकाणी गावाबाहेर एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीस जीर्णोद्धार झालेल्या शिवमंदिराचा व गावदेवाचा जीर्णोद्धार पुन्हा झाला आहे. येथे उल्लेखनीय शिल्पावशेष म्हणजे वीरगळ, सतीशिळा, नंदी, लिंग, योनीपीठ इत्यादि चे भग्नावशेष आहेत. या ठिकाणी परिसरातील सर्वात जास्त म्हणजे ९ सतीशिळा आढळून आल्या आहेत. सतीशिळा अतिशय सुबक व कलापूर्ण आहेत. यावर कलश व चंद्र सूर्य दाखवले आहेत यांच्या शीर्षभाग काहीसा त्रिकोणाकृती आहे. वीर व सती दोघेही काही शिळांवर पद्मासनात तर काहींवर वीरासनात बसलेले आहेत. सतीचा शिळेच्या एका बाजूस खांब दाखविला असून त्यातूनच सतीचा कोपऱ्यापासूनचा हात प्रगटलेला दिसतो. एका चौकोनी खांबाच्या आकाराच्या वीरगळावरील एकाबाजूस सर्वात खालच्या टप्प्यात वीराच्या डोक्यावर एका सेवकाने छत्र धरलेले आढळून येते. याच वीरगळाच्या दुसऱ्या बाजूस तोच वीर दोन धनुर्धर घोडेस्वाराशी युद्ध करताना दिसतो. येथे ६० सेंटीमीटर लांबीचे दंडगोलाकार असे भग्न लिंग आढळते. दोन मीटर लांब व ४० सेंटीमीटर रुंद अशा भग्न झालेल्या आयताकृती शिळेवर फक्त गळ्यापर्यंत अकरा पुरुष मुखे कोरली आहेत. त्यांनी कानात जड गोल वलये घातली आहेत. या शिल्पाची जरी झीज झाली आहे अशा प्रकारची शिल्पे इतरत्रही आढळून आली आहेत. या परिसरात लाल व काळ्या रंगाची व चमकदार खापरे तसेच १ ते २ सेंटीमीटर जाडीची व १२ सेंटीमीटर रुंद पसरट आकाराच्या कौलांचे तुकडे आढळून आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे अकराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकातील असावी.

**मांडला** (18° 9'43” N, 73° 26'32” E )

हे गाव महाडच्या उत्तरेस १३ किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून एका ओढ्याच्या काठावर वसले आहे. मांडला गावच्या सभोवती सह्याद्री पर्वताची रांग आहे. येथे गावदेवाच्या मंदिराबाहेर एक सतीशिळा आहे. या शिळेवर सतीचे दोन हात कोरले आहेत. कदाचित दोन स्त्रिया सती गेल्या असाव्यात. शिळेचा शीर्षभाग अर्धवर्तुळाकृती आहे. शिळेच्या चौकटीच्या पट्टीवर चौकटच्या आकाराच्या फुलांची नक्षी काढली आहे. सतीशिळेच्या शैलीवरून ही शिळा तेराव्या शतकातील असावी. गावदेव मंदिरातील शिल्पांवर मराठा शैलीचा प्रभाव असला, तरी ही शिल्पे त्यानंतरच्या काळात घडवली असावीत.

कोळोसे (18° 9'43" N, 73° 16'12" E )

महाडच्या उत्तरेकडे सात किलोमीटर अंतरावर गांधारी नदीच्या पूर्व तीरावरील महत्त्वपूर्ण पुरावशेष असलेले गाव आहे. गावातील एका ओढ्याच्याकाठी कोळसेश्वर हे शिवमंदिर आहे. याच ठिकाणी गावदेवाचे मंदिर देखील पहायला मिळते. गावदेव मंदिरासमोर अनेक छोटी मोठी भग्नावस्थेतील शिल्पे एका कट्ट्यावर रचून ठेवली आहेत. या शिल्पांमध्ये गजलक्ष्मी, सहा सतीशिळा, तीन वीरगळ व नंदी यांचा समावेश आहे. सतीशिळांचे वैशिष्ट्य म्हणजे यांच्या एका बाजूस सतीचा हात तर मुख्य बाजूस वीरगतीस प्राप्त झालेला वीर व त्याचा युद्धप्रसंग दाखविला आहे. गजलक्ष्मी ही एका ६० सेंटीमीटर लांब व ५० सेंटीमीटर रुंद आकाराच्या शिळेवर कोरली आहे. या शिल्पाची जरी झीज झाली असली, तरी आपल्या मागच्या पायावर उभे राहून अभिषेक घालणारे हत्ती, कानात गोलाकार व जड वलये घातलेली व दोन हातात कमळे धारण करणारी आसनस्थ लक्ष्मी दिसतात. येथील वीरगळ आयताकृती शिळेवर एकाच बाजूस दोन ते तीन टप्प्यात कोरलेले आहेत. त्यांच्यावर नेहमीचीच दृश्ये आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पें अकराव्या ते तेराव्या शतकातील असावीत. जवळच काळभैरी या गावदेवाच्या मंदिरात असलेली तीन शिल्पे त्यांच्या शैलीवरून मराठा कालखंडातील वाटतात.

गावाच्या मागे ईशान्य व नैऋत्य दिशेस पसरलेल्या एका टेकडीत समुद्रसपाटीपासून १८२ मीटर उंचीवर, उत्तराभिमुख असलेल्या काही कोरीव लेणीचे अवशेष आढळले आहेत. या ठिकाणी एकूण सहा लेण्यांचा समूह आहे, या ठिकाणी मोठा कडा कोसळलेला असून त्या लेणींच्या समोरचा भाग कोसळला आहे. लेणी गाळाने भरलेली असल्यामुळे या लेणीपैकी एका लेणीत सध्या फक्त बसून प्रवेश करता येतो. येथील खडक ठिसूळ असल्यामुळे या भागाची सतत झीज होऊन दरवर्षी लेणींचे प्रचंड नुकसान होत आहे. या सपाट छत असलेल्या विहार प्रकारच्या लेणी आहेत. गाळामुळे उंचीचा अंदाज येत नाही. त्यांच्या स्थापत्य वैशिष्ट्यावरून या लेणी दुसऱ्या ते तिसऱ्या शतकातील असाव्यात.

**खर्डी** (18° 11'29" N, 73° 24'57" E )

महाडच्या उत्तरेकडे ११ किलोमीटर अंतरावर असलेले हे गाव शिवकाळातील सरदार हरजीराजे महाडिक यांचे मूळगाव असल्याचे मानले जाते. या गावात शिवमंदिर व गावदेवी मंदिर परिसरात येथील पुरावशेष आढळतात. गावदेव मंदिराच्या बाहेर सुमारे एक मीटर लांबीचे

भग्न योनीपीठ पाहायला मिळते. आयताकृती आकाराचे आणि एकाच बाजूस शिल्पांकित केलेले तीन ते चार टप्यात कोरलेले सात वीरगळ येथे आहेत. यापैकी चार भग्न आहेत. एका वीरगळाच्या खालच्या टप्यातील वीर घोडेस्वाराशी लढताना दिसतो. तर दुसऱ्या चांगल्या अवस्थेतील वीरगळाच्या तळभागात सती आपल्या पतीच्या मृत शरीरासोबत हार घेवून बसलेली दिसते. या शिल्पांच्या शैलीवरून यांचा कालखंड बारावे ते चौदावे शतक असा ठरवता येतो. गावदेवाच्या मंदिरात तीन ते चार भग्न व झीज झालेली शिल्पे आहेत. यातील एक शिल्प दोन हातांच्या स्त्रीचे आहे, तिच्या उजव्या हातात दंड असून डावा हात तिने खाली मोकळा सोडला आहे. या शिल्पांची धाटणी मराठा व थोडी नंतरच्या काळातील वाटते.

**चापगाव** (18° 10'42" N, 73° 24'25" E )

गावाच्या उत्तरेस महाड-रायगड मार्गालगत रायगडेश्वर नावाचे एक शिवमंदिर आहे. या मंदिराच्या समोरील बाजूस तीन वीरगळाचे अवशेष आहेत. हे वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस कोरलेले असून दोन ते तीन टप्यांचे आहेत. यांच्या शैलीवरून बाराव्या शतकातील वाटतात. याशिवाय गावातील गावदेव मंदिरातही मराठा व आधुनिक काळातील शिल्पे आहेत.

**नांदगाव खुर्द** (18° 9'11" N, 73° 24'28" E )

नांदगावखुर्द या महाड-रायगड मार्गालगत गांधारी नदीच्या पूर्व काठावरील गावातील पुरावशेष गावदेव व शिवमंदिराच्या आवारात आहेत. या ठिकाणच्या गावदेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिरासमोर चौकोनी खांबाच्या आकाराचा चार टप्यांचा एक वीरगळ आहे. या वीरगळावरील वीर भालाधरी असून, त्याने युद्धात लढताना स्वरक्षणासाठी आपल्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला ढाल बांधलेली स्पष्ट दिसते. याच्या एका बाजूस खालून तिसऱ्या टप्यात सतीचा हात दाखविला आहे. दुसरा वीरगळ आयताकृती आकाराचा व एकाच बाजूस तीन टप्यात शिल्पांकित केलेला आहे. याशिवाय भग्न शिवलिंग, नंदी, शुष्कसांधी बांधकामातील कोरीव शिळा पडल्या आहेत. भैरी या स्थानिक मंदिराच्या मागे एका किंवा दोन भग्न वीरगळ आहेत. शिल्प शैलीवरून ही शिल्पे बाराव्या व तेराव्या शतकातील असावीत. याच ठिकाणी भैरवाची स्थानक व अर्ध समभंग अवस्थेतील झीज झालेली मूर्ती आहे. ही चार हातांची असून तिने खालच्या उजव्या हातात खंजीर व नाग, वरच्या उजव्या हातात डमरू, तर डाव्या वरच्या त्रिशूळ व खालच्या डाव्या हातात नरमुंड धरले आहे. तिच्या डाव्या पायांशी वाहन कुत्रा तर उजव्या पायाशी सेवक दाखविला आहे. शिल्पशैलीवरून हे

शिल्प पंधराव्या शतकातील किंवा नंतरच्या काळातील असावे. मंदिरात चार शिल्पे असून शैलीवरून ती आधुनिक काळातील वाटतात.

**कोथूर्डे** (18° 13'07” N, 73° 22'52” E )

महाडच्या उत्तरेस गांधारी नदीच्या पश्चिम काठावर नाणेमाची या टेकडीच्या पायथ्यास हे गाव वसले आहे. गावातील काळभैरी मंदिर परिसरात तीन वीरगळ व एक सतीशिळा पाहायला मिळते. दोन वीरगळ चौकोनी खांबाच्या आकाराच्या शिळेवर पाच टप्प्यात शिल्पांकित केले आहेत. हे वीरगळ सतीशिळायुक्त आहेत. गावातील डोलकणा नावाच्या टेकडीवर पांडव लेणी खोदायला आले होते असे लोक मानतात.

**पाचाड** (18° 14'10” N, 73° 25'14” E )

पाचाड हे गाव रायगडाच्या आगदी पायथ्याला वसलेले गाव आहे. या गावात शिवाजी महाराजांच्या आई एका किल्लेवजा गढीत राहत होत्या. पाचाड गावात पाच आड म्हणजे पाच विहिरी होत्या, त्यामुळे त्यास पाच आड असे म्हणतात असे मानले जाते. ही एक पद्धतशीर तटबंदी व बुरुजयुक्त संरक्षक वसाहत होती. दुसऱ्या शब्दात हा एक प्रकारचा भुईकोट आहे. याच्या अंतर्भागात अनेक इमारतींची बांधकामे आहेत. यापूर्वीच या संरक्षक वसाहतीच्या पुरातत्त्वीय दृष्टीने अनेकांनी नोंदी घेतल्या आहेत (जोशी २०१४). पाचाड गावात या पेक्षा वेगळ्या महत्त्वपूर्ण वास्तू व शिल्पे येथे आहेत. गावातील एका पिंपळाच्या पारावर एक भग्न नंदी, उत्तरेकडे असणाऱ्या एका मोठ्या तलावानजीक एका पडक्या चौथऱ्यासारखे एका मंदिराचे अवशेष दिसतात. या ठिकाणी शिवलिंग, योनीपीठ, जमिनीत गाडला गेलेला नंदी, एका शिळेवर कोरलेला एक फणा असलेला नाग, भग्न गणेश प्रतिमा इत्यादि अवशेष आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. काही स्थानिक लोकांच्या म्हणण्याप्रमाणे गावाची वस्ती फार पूर्वी डोंगर कड्याला लागून होती, पण तिथे कडा कोसळल्यानंतर ती आजच्या ठिकाणी आली.

**रायगडवाडी** (18° 13'10” N, 73° 25'10” E )

रायगड किल्याच्यापायथ्याला असलेले रायगडवाडी हे ठिकाण मराठाकालात रायगडाची उतारपेठ असल्याचा उल्लेख मिळतो. रायगडवाडीमध्ये झोलाई या स्थानिक गावदेवीचे स्थान आहे. ही झोलाई देवी विन्हेऱ्याच्या झोलाई देवीची बहीणी मानली जाते. या ठिकाणी जीर्णोद्धार करताना मंदिरात अनेक शिल्पे एकत्र ठेवली आहेत. त्यांच्या आकारावरून फक्त

महिषासुरमर्दिनी प्रकारच्या दोन मूर्ती ओळखता येतात. या ठिकाणी एक लहान ६० सेंटीमीटर उंचीचा सुरेख कोरीवकाम केलेला दगडी दिवा आहे. या दिव्याच्या शिल्पशैलीवरून तो मराठा काळातील असावा हे ठामपणे सांगता येते. मंदिराच्या बाहेर शेंडी असलेल्या व पायाखाली शनीला तुडवणाऱ्या हनुमानाची चपेट मुद्रेतील एक प्रतिमा, आयताकृती आकाराचा व एक बाजू कोरलेला तसेच शीर्षभाग भग्न असलेला एक टप्यातील वीरगळ, गणेश शिल्प, भग्न नंदी अशी शिल्पे आहेत. वीरगळाच्या शैलीवरून तो बाराव्या शतकातील असावा असे दिसते.

या परिसरात लाल व करडया रंगाची खापरे, बहुरंगी चकतीच्या आकाराच्या व काळ्या एक रंगी बांगड्याचे तुकडे सापडतात. गावदेव भैरी मंदिराजवळ एका तुटक्या तोफेचा भाग, तसेच दोन कुलपी गोळे पडले आहेत.

हरेश्वर या शिवमंदिराजवळ भग्न चौथऱ्याचे अवशेष व भग्न नंदीचे एक शिल्प आहे. खांबाचा त्रिकोणी घटक असलेला तळखडा इत्यादि उल्लेखनीय अवशेष येथे आहेत. हे अवशेष शिल्पशैलीवरून तेराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

नरसिंहदेव या ठिकाणी चार हातांची, शैव आयुधे धारण केलेली व अर्ध समभंग अवस्थेतील स्थानक मूर्ती, वीरगळाचा भग्न तुकडा, चार हातांची दुसरी भग्न मूर्ती इत्यादि शिल्पे आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लाल, काळ्या व करडया रंगाची थाळी, पेले, झाकणी या खापारांचे तुकडे आढळतात.

याशिवाय श्री. वाडीकर यांच्या घरी तुळशी वृंदावनाला टेकून अत्यंत खराब व झीज झालेल्या अवस्थेतील एक फारसी लेख असून त्याची लांबी ४० सेंटीमीटर व रुंदी ४२ सेंटीमीटर आहे. हा लेख वाचण्याजोगा अवस्थेत नाही.

**रायगड** (18° 14'03” N, 73° 26'25” E )

रायगड ही संरक्षक वसाहतीस सतराव्या शतकापासून खूप महत्त्व आले. या ठिकाणी मराठा काळात मोठमोठी बांधकामे झाली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी या संरक्षक वसाहतीस राजधानीचा दर्जा दिल्यामुळे इथे स्वराज्यातील सर्वात वैभवशाली वसाहत होती. असे असले तरी ही संरक्षक वसाहत बाराव्या शतकापासूनच वापरात होती, हे या ठिकाणी आढळणाऱ्या कातळात कोरलेल्या खांब असलेल्या व नसलेल्या टाक्या, गडाच्या उत्तर बाजूस कातळात कोरलेली खांब असलेली उत्तराभिमुख लेणी, भवानीकड्याजवळची कातळात कोरीव लेणी, गडावर आढळणारे वीरगळ त्यांच्या शैलीवरून ही संरक्षक वसाहत बाराव्या शतकापूर्वीपासूनच

वास्तव्यास आली होती. या परिसरातील कावळ्या, बोराताची नाळ, बोचेघोल घाट यांसारखे घाटमार्ग, येथून चालणारा व्यापार यामुळे या वसाहतीची निर्मिती झाली. मात्र मध्ययुगात खास करून मराठा काळात येते प्रभावी प्रशासकीय केंद्र निर्माण झाले होते. या ठिकाणी शिवकाळातील अवशेषांचा आढावा घेतलेला नाही.

**सांदोशी** (18° 16'35" N, 73° 25'25" E )

हे गाव सह्याद्रीच्या मुख्य रांगेतील कोकणदिवा या संरक्षक वसाहतीच्या पायथ्याला व काळ नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसले आहे. महाडपासून उत्तरेस २५ किलोमीटर अंतरावरील या गावात उल्लेखनीय पुरावशेष आढळले आहेत. गावाच्या हेटकर आळीतील मंदिरात विष्णू व दुर्गा यांची रेखीव काळ्या पाषाणाची दोन शिल्पे आहेत. त्यांना तेल लावले जाते त्यामुळे त्यावर जाड लेप बसला आहे. विष्णूची चार हातांची व समभंग अवस्थेतील स्थानक प्रतिमा आहे (छायाचित्र क्रमांक ५१). त्याच्या उजव्या खालच्या हातात गदा, उजव्या वरच्या हातात पद्म, डाव्या वरच्या हातात शंख तर डाव्या खालच्या हातात चक्र आहे. या आयुध क्रमावरून ही मूर्ती विष्णूचीच ठरते. विष्णूच्या डाव्या पायाशी गरुड बसला आहे. तर उजव्या पायाशी लक्ष्मी उभी आहे. मस्तकावर किरीट मुकुट धारण केला आहे. कमरेला कटीवस्त्र धोतर आहे. जे गुढग्याच्या वर व त्याचा सोगा दोन्ही पायांच्यामध्ये आहे. विष्णू मूर्ती त्रिकोणाकृती घटक असलेल्या पीठावर उभी आहे. दुर्गेची तुलनेने लहान व झीज झालेली मूर्ती आहे. चार हातांच्या दुर्गेचे दोन हात भंगलेले आहेत. तिच्या डाव्या पायाशी तिचे वाहन सिंह उभा आहे. उजव्या पायाशी तिचा सेवक दिसतो. दोन्ही शिल्पांचा काळ शिल्पशैलीवरून बाराव्या शतकाचा काळ असावा.

या मंदिरापासून पुढे काही मीटर अंतरावर शेताच्याकडेला झीज झालेले गजलक्ष्मी शिल्प आहे. मागच्या दोन्ही पायांवर उभे राहिलेले हत्ती स्पष्ट दिसतात. याच शेतात चौकोनी खांबाच्या आकाराचे चार टप्यात कोरलेले, आयताकृती व एकच बाजू कोरलेले दोन वीरगळ आहेत. येथून जवळच एका भग्न शिवमंदिराचे अवशेष असून येथे मुखभग्न झालेला नंदी, हनुमान, भग्न योनीपीठ व शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या कोरीव शिळांचे अवशेष आहेत. चौकटच्या आडव्या फुलांची नक्षी असलेल्या पीठावर भग्न नंदी आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पें अकराव्या ते तेराव्या शतकातील असावीत. या भागात लाल व काळी रंगाची खापरे नांगरटीच्या वेळेस आढळून येतात.

**सावरट** (18° 16'50" N, 73° 24'11" E )

महाड-रायगड रस्त्यावरील महाडपासून १८ किलोमीटर अंतरावरील या गावात कोणतेही महत्वाचे पुरावशेष आढळले नाहीत. गावाच्या मागे असलेल्या उंच कड्यात एक नैसर्गिक गुहा आहे. या गुहेच्या बाहेर पावसाळ्यात वाहून आलेली अश्मयुगीन मानवाची सूक्ष्मस्त्रे आढळून आली. गुहा ७० मीटर खोल व दोन मीटर उंच आहे. येथे अधिक सर्वेक्षण करणे बाकी आहे.

**करंजाडी** (17°59'30" N, 73° 24'33" E )

महाड-फाळकेवाडी रस्त्यावरील महाडपासून नऊ किलोमीटर अंतरावरील या गावातील महत्वाचे पुरावशेष गावदेव मंदिराजवळ आढळतात. या मंदिरात ८ शिल्पे आहेत. ही शिल्पे स्थानक, समभंग चार हातांची हातात शैव आयुधे धारण करणारी आहेत. यांच्यावर मराठा काळाचा प्रभाव असला तरी ही शिल्पे त्याच्या शैलीवरून नंतरच्या काळातील असावीत. एका आयताकृती शिळेवर चार मुखे कोरली आहेत. हे या शिल्पातील उल्लेखनीय शिल्प आहे. मंदिराच्यामागील कठड्यावर काही भग्न शिल्पे आहेत. यात खाच असलेले योनीपीठ, मुख भग्न असलेले दोन हातांपैकी उजव्या हातात दंड व डावा हात मोकळा सोडलेले स्त्रीचे शिल्प, उजव्या हातात दुधारी खड्ग, डाव्या वरच्या हातात खेटक धारण केलेले, पण कमरेच्या खाली भग्न असलेले स्त्री शिल्प ही उल्लेखनी आहेत. ही शिल्पे त्यांच्या शैलीवरून चौदाव्या शतकापासून ते पंधराव्या शतकातील असावीत. या शिवाय मंदिरातील शिल्पांची नक्कल केलेली काही शिल्पे बाहेर ठेवली आहेत

**राजिवली (**17°58'58" N, 73° 25'23" E )

महाडच्या दक्षिणेस महाडपासून ११ किलोमीटर अंतरावरील या गावातील पुरावशेष गावदेवी कालकाईच्या मंदिराजवळ आढळतात. मंदिरासमोर चार वीरगळ असून यात चौकोनी खांब प्रकारचा एक व आयताकृती प्रकारचे दोन, असे तीन वीरगळ आहेत. या ठिकाणी भग्न अवस्थेतील एका शिल्पाचा कालखंड त्याच्या शिल्पशैलीवरून अकराव्या ते बाराव्या शतकाचा असावा.

**नातोंडी (**17°58'51" N, 73° 25'2" E )

महाडपासून दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावरील या गावातील पुरावशेष नागेश्वरी नदीस मिळणाऱ्या एका ओढ्याच्या काठावर आहेत. हे अवशेष गावदेवी जननी, कालकाई, सोमजाई या स्थानिक देवतांच्या मंदिराजवळ आढळतात. मंदिरात दोन झीज झालेली महिषासुरमर्दिनी

प्रकारची दोन शिल्पे असून त्यांचा शैलीच्या दृष्टीने काहीही उपयोग नाही. मंदिरासमोर तीन झीज झालेले वीरगळ व दोन सतीशिळा आहेत. वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले सुमारे ७८ सेंटीमीटर उंच व ३३ सेंटीमीटर रुंद आहेत. हे तीन किंवा दोन टप्प्यांचे आहेत. येथील सतीशिळा भंगलेली असली तरी विशेष असून ५१ सेंटीमीटर लांब व ३२ सेंटीमीटर रुंद आहे. तिच्या एका बाजूस जिथे स्तंभ असतो तिथे सती जाणारी स्त्री आपल्या पती सोबत चितेवर बसलेली, नंतरच्या टप्प्यात ती दोन व्यक्तीसोबत दिसते. वरच्या टप्प्यात पती व ती शिवपूजा करताना दिसते. शिळेचा त्रिकोणाकृती शीर्षभाग भग्न झाला आहे. वीरगळावरील वीर धनुष्य घेऊन युद्ध करताना दिसतात.

**वडवली** (18° 4'12” N,  73° 26'17” E )

म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्यावरील महाडपासून तीन किलोमीटर अंतरावरील या गावात उल्लेखनीय पुरावशेष आढळले आहेत. गाव महाडच्या दक्षिणेस सावित्री नदीच्या दक्षिण तीरावर आहे. या गावातील सोमजाई या स्थानिक गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिराच्या मागे अनेक लहान मोठी सुमारे ७० सेंटीमीटर उंचीची शिल्पे ठेवली आहेत. ही शिल्पे भग्नावस्थेत आहेत.यात चार हातांच्या महिषासुरमर्दिनीची दोन शिल्पे आहेत. यातील एक अखंड असलेले शिल्प त्याच्या शैलीवरून एकोणिसाव्या शतकातील असावे, तर दुसरे भग्न असलेले महिषासुरमर्दिनीचे शिल्प चौदाव्या किंवा पंधराव्या शतकातील असावे. येथे एक गद्धेगळ शिळेवर कोरला आहे. या शिल्पाचा फक्त ७० सेंटीमीटर उंच व ३५ सेंटीमीटर आकार जमिनीवर दिसत असून बाकीच जमिनीखाली गाडला गेला आहे, शिल्पाची झीज झाली आहे. याच्या वरच्या भागात चंद्र-सूर्य दाखविले आहेत, तर खालच्या भागात डावीकडे तोंड केलेल्या स्त्रीवर आरूढ होणाऱ्या गाढवाचे शिल्प आहे. शिल्प शैलीवरून हे शिल्प अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असावे. गावच्या दक्षिणेस पूर्व-पश्चिम पसरलेल्या टेकडीवर काळकाई देवीचे स्वयंभू स्थान आहे. या ठिकाणास शिखर किंवा किनारडा असे संबोधतात. स्थानिक लोक या ठिकाणाला मंगळगड म्हणतात येथे देवीस नवस म्हणून भाजलेल्या मातीचे बैल ठेवलेले दिसतात. पूर्वी नवसासाठी बैल सोडायची प्रथा असावी..

**कोल** (18° 4'7” N, 73° 25'42” E )

महाडच्या दक्षिणेस ३ किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या दक्षिण तीरावर व अंबा नदीच्या पूर्व तीरावर हे गाव म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्यावर आहे. या गावात उल्लेखनीय पुरावशेष यापूर्वीच आढळले आहेत. गावाचा मागे असलेल्या टेकडीत दोन लेणी समूह असून हे लेणी समूहपैकी एक गावाच्या आग्नेयेस तर दुसरा गावाच्या ईशान्येस आहे. ही लेणी बौध्द धर्मीय आहेत.

गावाच्या आग्नेयेस असलेल्या लेणीत पश्चिमाभिमुख एकूण दोन लेणी आहेत. समोरील भाग पडल्यामुळे नैसर्गिक गुहेसारखे भासणाऱ्या उत्तरेकडून पहिल्या लेणीत दोन दगडी बिछाने व छताच्या अवशेषांमुळे येथे दोन खोल्या व शेजारी तिसरी खोली अशा असाव्यात असे दिसते. लेणे क्रमांक सात हे एका सभागृह भोवती चार खोल्यांचे मिळून बनलेले एक मोठे लेणे आहे. याच्या बाहेरील अंगास एक पाण्याचे टाकेही आहे.

कोल गावाच्या आग्नेय दिशेस पाच लेणी आहेत. हा लेणी समूह पुराभिलेखाच्या दृष्टीने तितकाच महत्वाचा आहे (Bugess and Indraji 1881: 3). लेणे क्रमांक ३, ४ व ५ मधील आढळलेल्या ब्राम्ही लिपी व प्राकृत भाषेतील तीन शिलालेखाच्या पुरालिपीवरून लेणीचा काळ दुसऱ्या शतकाचा पूर्वाध असा नक्की केला आहे. या लेखात काही भिक्षु व काही सार्थवाह म्हणजे व्यापारी यांनी मिळून या लेणींचे दान केले आहे (Nagaraju 1981: 232).

या लेणी समूहाच्या पायथ्याला पासल्यादेव म्हणून एक स्थान आहे. येथे एकाच बाजूस शिल्पांकित केलेला तीन टप्यातील वीरगळ आहे. याचा खालचा भाग भग्न आहे. खालच्या टप्यात एकटाच वीर खड्ग व खेटक सहित दिसतो, वरच्या टप्यात मात्र तो पद्मासनात व नमस्कार मुद्रेत दाखवला आहे. या ठिकाणी वीरगळावर जी नेहमीची दृश्ये असतात ती नाहीत. सर्वात वरच्या टप्यात मात्र तो शिवपूजा करत आहे. येथे दगडी खाणकाम करणाऱ्या लोकांना येथे काम करताना असंख्य खापरे आढळली होती. आजही याठिकाणी शेतातून खापरे सापडतात. येथे या गावातील जननी या स्थानिक गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिराच्या आवारात अनेक लहान मोठी शिल्पे ठेवली आहेत. शैलीवरून ती मराठा व त्यानंतरच्या काळातील असावीत.

**कोथेरी** (18° 2'41” N, 73° 26'0” E )

म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्यावरील महाडपासून दोन किलोमीटर अंतरावर थोडे आत एका टेकडीवर उल्लेखनीय पुरावशेष आढळले आहेत. हे सोमजाई देवतेचे स्थान अंबा या नदीच्या काठावर एका टेकडीवर असून या ठिकाणी शुष्कसांधी बांधीव मंदिराचे अवशेष सापडले आहेत. यात स्तंभ, स्तंभशीर्ष, भग्न नंदी, वीरगळ व योनीपीठ असे आहेत. या ठिकाणी एकूण पाच भग्न स्तंभ, सहा स्तंभशीर्ष व मूर्ती ठेवायचे खाच असलेले दोन पीठ आढळतात. शिल्पशैलीवरून हे अवशेष चौदाव्या शतकातील असावेत. मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारची दोन शिल्पे, एक मुख भग्न झालेला नंदी ही शिल्पे शैलीवरून चौदाव्या शतकाचा काळ दर्शवितात. मंदिरात

पूजेसाठी असलेली शिल्पे आधुनिक काळात एकोणिसाव्या शतकात केंव्हा तरी घडविली असावीत. येथे असलेला एकमेव वीरगळ एकाच टप्प्यातील असून वीराच्या हातात ढाल व खड्ग असून तो वार करण्याच्या पवित्र्यात आहे. शैलीवरून काळसारखाच म्हणजे चौदाव्या शतकाचा असावा.

**कोंडीवते** (18° 2'39" N, 73° 26'5" E )

म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्यावरील महाडपासून चार किलोमीटर अंतरावरील या गावात पुरावशेष आढळले आहेत. गाव महाडच्या दक्षिणेस सावित्री नदीच्या दक्षिण तीरावर आहे. या गावातील चांडकाई, पद्मावती, काळकाई या स्थानिक गावदेवीसमोर दोन गरम पाण्याची कुंडे आहेत. या कुंडातील पाणी गरम व काहीसे गंधकयुक्त आहे. शेजारीच फक्त मुख भाग शिल्लक असलेले धड, व महिषासुरमर्दिनी प्रकारच्या शिल्पाचा फक्त महिषाचा काही भाग शिल्लक आहे. याची शैली बाराव्या शतकातील शिल्पशैलीशी जुळणारी आहे. याशिवाय पद्मासनातील जोडपे असलेली शिळा आहे.

**आंबवली बुद्रुक** (18° 1'21" N, 73° 23'41" E )

महाडच्या नैऋत्येस असलेल्या या गावातील गावदेव मंदिरचा जीर्णोद्धार झाला आहे. मंदिरात गोलाकार पन्हाळयुक्त योनीपीठ, मराठा काळातील भैरव मूर्ती व एक तेलाचा घाण्याचे अवशेष आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष चौदाव्या किंवा त्यानंतरच्या शतकातील असावेत.

**रेवतळे** (17°58'41" N, 73° 23'19" E )

महाडच्या दक्षिणेस महाड-दापोली मार्गावर १२ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाच्या पश्चिमेस टेकडी आहे. या ठिकाणी कालकाई या स्थानिक देवतेचे स्थान आहे. येथे व परिसरात पूर्वी कातळात कोरलेले पाण्याचे हौद होते पण गुरे, माणसे यात पडून जखमी होत यामुळे गावकऱ्यानी हे हौद बुजवले. या ठिकाणी काही दगडी चौथरेही असावेत त्याचे काही दगड पाहायला मिळतात.

गावदेवी मंदिर परिसरात पुरावशेष आढळले. यातील उल्लेखनीय शिल्प म्हणजे एक सतीशिळा व महिषासुरमर्दिनी प्रकारच्या दोन भग्न मूर्ती मंदिराबाहेर आहेत. महिषासुरमर्दिनी शिल्प ५५ सेंटीमीटर लांबीचा भग्न तुकडा आहे. उजव्या बाजूला तोंड केलेला महिष गूढग्यावर खाली बसलेला दाखवून युद्धातील त्याचा पराभव सूचित केला आहे. असेच दुसरे शिल्प

मंदिराच्या मागे आहे यात कमरेच्या खालचा भाग असून देवीने महिषावर रोवलेला त्रिशूळ व पाय आणि महिष दिसतात. मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारची चार हातांची अखंड मूर्ती आहे. ही ८५ सेंटीमीटर उंच व ४२ सेंटीमीटर रुंद आहे. देवीने खालच्या उजव्या हाताने त्रिशूळ खुपसला आहे, वरच्या उजव्या हातात खड्‌ग, वरच्या डाव्या हातात खेटक (ढाल), खालच्या डाव्या हाताने महिषाची जीभ पकडली आहे. महिष आपल्या चारही पायावर उभा आहे. या शिल्पाच्या धाटणीवरून ही शिल्पे मराठा काळाच्या पूर्वीची असावीत. येथे एक वीरगळ असून यावर एक पुरुष हातात खड्‌ग व ढाल घेऊन वार करण्याच्या पवित्र्यात उभा आहे. मंदिराबाहेरची शिल्पे शिल्पशैलीवरून बाराव्या शतकातील असावीत. या मंदिरापासून काही अंतरावर दक्षिणेकडे शिवमंदिर आहे. येथे तीन वीरगळ आहेत. ते आयताकृती व दोन ते तीन टप्प्यात कोरले आहेत. मंदिराबाहेर दोन भग्न योनीपीठ व शिवलिंग ही आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावीत.

**आंबवडे** (17°58'6" N, 73° 24'44" E )

महाडच्या दक्षिणेस १५ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावाच्या मागच्या बाजूस टेकडी आहे. गावाच्या देऊळकोंड या वाडीवर काळभैरव या गावदेवाचे मंदिर आहे. या ठिकाणी मूर्तीशिल्परूपी पुरावशेष आढळले. येथे नऊ वीरगळ व चार सतीशिळा आहेत. विशेष बाब म्हणजे यातील तीन वीरगळावर सतींचे हात दाखविले आहेत. यातील एक वीरगळ चौकोनी खांब प्रकारचा एक मीटर उंच असून त्यावर चार टप्पे चारही बाजूस कोरले आहेत. याच्या एका बाजूस खालून पहिल्या टप्प्यात दोन स्त्रिया आपल्या पतीसोबत चितेवर बसलेल्या आहेत, तर दुसऱ्या टप्प्यात सतीचे दोन हात दाखविले असून एक चौकोनी आकाराचा नवीनच घटक आहे. अशा प्रकारचा घटक अंबरनाथ शिवमंदिरासमोरील सती शिळेवर देखील दाखविला आहे हा घटक पुष्कर्णीचे प्रतिक असावा (कानिटकर २०१४: २१८). दुसऱ्या बाजूस वीर घोड्यावर स्वार होऊन युद्ध करताना दिसतो. या वीरगळावरील वीर एका बाजूस ढाल व खड्‌ग, दुसऱ्या बाजूस भाला व ढाल तर तिसऱ्या बाजूस धनुष्य-बाण धारण करून लढत आहे. या टप्प्यांच्या चौकटीवर चौकटच्या फुलांची नक्षी आहे. एका वीरगळावर एक पुरुष हातात खड्‌ग व ढाल घेऊन वार करण्याच्या पवित्र्यात उभा आहे. बाकीचे वीरगळ दोन टप्प्यात आहेत. यांवर नेहमीची दृश्ये आहेत.

अंगणात एका मोठ्या तेलाच्या घाण्याचा खालचा भाग पडला आहे. याशिवाय पद्मासन अवस्थेतील व नमस्कार मुद्रेतील चार शिल्पे ३० सेंटीमीटर लांबी व २५ सेंटीमीटर

रुंद)येथे आढळून आली. शुष्कसांधी बांधाकामातील काही कोरीव शिळा येथे आढळतात. शिल्पशैलीवरून येथील अवशेष बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत. या गावाच्या पूर्व बाजूस टेकडी असून येथे बालेकिल्ला नावाचा शिवकालातील किल्ला होता तसेच या गावात कोणीही माणूस घोड्यावर स्वार होऊन प्रवेश करू शकत नाही अशी दंतकथा सांगतात.

**कावळे तर्फे विन्हेरे** (17°57'10” N, 73° 22'54” E )

महाडच्या दक्षिणेस १२ किलोमीटर अंतरावर नागेश्वरी नदीच्या पश्चिम काठावर हे गाव आहे. गावाच्या मागच्या बाजूस टेकडीवर मंदिर आहे. जननी या स्थानिक गावदेवीचे साधे मंदिर आहे, याठिकाणी एक वीरगळ व एक सतीशिळा आहे. वीरगळ हे आयताकृती शिळेवर एकाच बाजूस दोन टप्प्यात कोरले आहेत. याशिवाय लिंग ठेवण्यासाठी खाच असलेले योनीपीठ, भग्न नंदी यांची शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या ते पंधराव्या शतकातील असावीत. मंदिरात चार हातांची स्थानक अवस्थेतील झीज झालेली व वाहनविवेक नसलेली पाच शिल्पे आहेत, त्यांच्या शिल्पशैलीवरून ही शिल्पे मराठा किवा नंतरच्या काळातील असावीत.

**विन्हेरे** (17°53'40” N, 73° 23'29” E )

महाडच्या दक्षिणेस १८ किलोमीटर अंतरावर विन्हेरे हे महत्त्वपूर्ण गाव आहे. या गावातून मुंबई गोवा या राज्य महामार्गाला पर्यायी मार्ग जातो. हा मार्ग रत्नागिरी जिल्ह्यातील तुळशी खिंडीतून नातूनगर येथे बाहेर पडतो. हे गाव मल्लिकार्जुनी व नागेश्वरी नद्याच्या संगमावर वसले आहे. गावाच्या दक्षिण बाजूस देवाचा डोंगर यास मल्लिकार्जुनाचा डोंगर असेही म्हणतात. या ठिकाणाहून मल्लिकार्जुनी नदी तर जाखीणवाडी परिसरातून नागेश्वरी नदी उगम पावते. येथे मुख्य गावदेवता झोलाई, मनाई, वाघजाई व कोलजाई या स्थानिक देवतांचा मंदिरसमूह आहे. या मंदिरांचा पूर्णपणे जीर्णोद्धार होत आहे.

वाघजाई आणि कोलजाई या मंदिरांच्या पायाच्या बांधकामासाठी खोदकाम करत असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर शिल्पावशेष सापडले (छायाचित्र क्रमांक ४७). कोलजाई मंदिराचा पाया हा साफ करताना येथे शुष्कसांधी बांधकामाच्या कोरीव शिळा आढळ्या. झोलाई देवीचे मूळ मंदिरही बौद्धवाडी जवळ होते व ते नंतर येथे आणण्यात आले. वाघजाई व कोलजाई मंदिराजवळ २७ भग्न व झिजलेली शिल्पे आढळली. यात उल्लेखनीय अशी पाच शिल्पे आहेत. चार हातांची स्थानक अवस्थेतील ३० सेंटीमीटर लांब व

२० सेंटीमीटर रुंद असलेली चार स्त्री शिल्पे, पद्मासनात बसलेली, चार हातांची व नऊ मुखे असलेले स्त्री देवतेचे झीज झालेले ३० सेंटीमीटर रुंद व ५० सेंटीमीटर उंच शिल्प आहे. तिच्या उजव्या वरच्या हातात खड्ग तर डाव्या वरच्या हातात खेटक आहे. खालचे दोन्ही हात तिने आपल्या मांडीवर ठेवले आहेत. देवीने आपला मुख्य डावा हात आरामात आपल्या डाव्या गूढघ्यावर ठेवला आहे. हातातील वस्तू दिसत नाहीत. वाघावर आरूढ झालेल्या चार हातांच्या स्त्री देवतेने करंडक मुकुट परिधान केला आहे. त्यावर उत्तर चालुक्य प्रभाव दिसतो. या शिल्पांचा काळ त्यांच्या शिल्पशैलीवरून अकरावे शतक किंवा बाराव्या शतक असा काळ निश्चित करता येतो.

एका शिळेवर एका पुरुषाच्या मागे हातात छत्र धरलेल्या सेवकाचे शिल्प आहे. यावरून हा वीरगळ एखाद्या स्थानिक नृपतीचा असावा. या मंदिरापासून पुढे नागेश्वर नावाचे शिवमंदिर असून या मंदिराभोवती अनेक वीरगळ ठेवले आहेत. यातील काही चांगल्या अवस्थेत, तर काही भग्नावस्थेत आहेत. सुमारे एक मीटर लांबीचे हे चौकोनी खांब प्रकारचे नऊ व आयताकृती व एकच बाजू शिल्पांकित असलेले चार वीरगळ आहेत. सतीशिळा सहा आहेत. तीन चौकोनी खांबाच्या वीरगळांच्या तळभागात वीराच्या मागे छत्र धरणारे सेवक आहेत. एक टप्प्यातील भग्न वीरगळावर एक छत्रधारी वीर आहे. यातील वीरांना डोक्यावर पालखीत घेवून जाताताना तर काही वीरांना खांद्यावरील पालखीत नेत आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावीत. शिवमंदिरात खोल गाभाऱ्यातील शिवलिंग व नंदी आहेत. ही शिल्पे मराठा किंवा पेशवे काळातील असावीत. मंदिराच्याशेजारी शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेली चौकोनी विहीर आहे. मल्लिकार्जुनाच्या डोंगरावरील टाक्यात टाकलेले पाणी, या विहिरीतून बाहेर येते अशी येथे वदंता आहे. शिवमंदिर परिसरात खोदकाम करताना अनेक मृदभांदयाचे अवशेष सापडले. यात थाळी, झाकणी, तोट्यासोबत काळ्या व बहुरंगी चकतीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडे सापडतात.

गावातील सोमजी मंदिराजवळ शुष्कसांधी बांधीव मंदिराचा पाया दिसत होता आता तेथे नवीन पायावर मंदिर उभारले आहे. महिषासुरमर्दिनी प्रकारच्या मूर्तीचे भग्नावशेष आहेत, शैलीवरून या शिल्पांचा काळ बाराव्या शतकाचा असावा. गावाच्या बौद्धवाडीजवळ काळभैरीचे मंदिर आहे. मंदिराच्या बाहेर भग्न शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून ही शिल्पे चौदाव्या शतकातील असावी. या ठिकाणी व परिसरास कसबा भाग म्हटले जाते. येथ बहुरंगी व

चकातीच्या आकाराच्या बांगड्यांचे तुकडे सापडतात. येथे झोलाई देवीचे मूळ स्थान होते असे सांगतात. देवीच्या जत्रेच्या वेळेस देवीच्या पालख्या व शासन काठ्या येथे आणल्या जातात.

**ताम्हाणे** (17°54'1" N, 73° 22'45" E )

महाडच्या दक्षिणेस २० किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात जननी या गावदेवीचे मंदिर आहे. या ठिकाणी आधुनिक काळात गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार झालेला आहे. येथे काही उल्लेखनीय अवशेष आहेत. मंदिरात मनाई, झोलाई, पद्मावती, काळकाई या देवतांच्या चांदीच्या पत्र्याने मढविलेल्या मूर्ती आहेत. त्यामुळे त्यांचे मूळ स्वरूप कळून येत नाही. पण मंदिरा मागे येथे चार हातांचे, स्थानक अवस्थेतील एक शिल्प आहे. तसेच दोन हातांचे एक स्थानक व अर्धसमभंग अवस्थेतील ३२ सेंटीमीटर उंच व बारा सेंटीमीटर रुंद असे एक स्त्री शिल्प आहे. तिच्या उजव्या हातात दंड आहे तर डावा हात खाली मोकळा सोडला आहे. हे शिल्प चांगले ठसठशीत व उठावदार आहे. या स्त्रीच्या केसाची एक बट तिच्या डाव्या बाजूस सोडली आहे. देवीच्या गळ्यात, कानात, पायात दागिने आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष तेराव्या व चौदाव्या शतकातील असावे. याशिवाय एक योनीपीठ व एक सती शिळा आहे. त्यांची शैली चौदाव्या व पंधराव्या शतकातील वाटते.

**कातीवडे** (18° 5'14" N, 73° 30'48" E )

महाडच्या आग्नेयेस नऊ किलोमीटर अंतरावर असलेली ही वाडी खरवली गावाचाच एक भाग आहे. गावाच्या बौद्धवाडी जवळील भालूवीरा नावाच्या एका छोट्या पावसाळी ओढ्याच्या पूर्व तीरावर आहे. गावातील पुरावशेष गावदेव कांगुरमल्लच्या मंदिराच्या परिसरात आढळले. या मंदिरातील गणेशाची दोन शिल्पे अत्यंत झीज झालेल्या अवस्थेत असून शिल्पांचा काळ ठरावण्याच्या दृष्टीने त्यांचा काही उपयोग नाही. मंदिराच्या बाहेर शिवलिंग व दोन भग्न नंदीचे शिल्प आहेत. एका नंदीच्या पुढच्या भागात वेसण धरलेला शिवगण दाखविला आहे. मंदिरातील पीठावर स्थानक व चार हातांची शिल्पे भैरव प्रकारची असून शिल्पशैलीवरून ही शिल्पे मराठा काळाच्यानंतरची असावीत. मंदिराच्या मागे एका भग्न तेलाच्या घाण्याचे अवशेष आहेत. या मंदिराला संरक्षक भिंत आहे, या भिंतीत सहा वीरगळ बसविले आहेत. हे वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस कोरलेले तीन ते चार टप्प्यात कोरले आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील किंवा तेराव्या शतकातील असव्यात.

**भोराव** (18° 5'20” N, 73° 29'4” E )

रायगडकडून येणारी काळ नदी व सावित्री नदी यांच्या संगमावर महाडच्या पूर्वेस हे गाव आहे. अगदी संगमाच्या ठिकाणी एक आधुनिक काळातील जीर्णोद्धार केलेले शिवमंदिर आहे पण त्याचा गाभारा मात्र मराठा किवा थोडा नंतरच्या काळातील असावा. या दगडी मंदिराला काहीसे फंसनाकार शिखर असून त्याचे आठ थर आहेत. मंदिराच्यासमोरच्या भिंतीत दोन देवकोष्ठे असून त्यात गणेश व विष्णू यांच्या आधुनिक काळातील प्रतिमा आहेत. मंदिरासमोर मराठा काळातील वीर हनुमान शिल्प आहे. भग्नावस्थेतील कमळांवर बसलेला गणपती दिसतो. शैलीवरून मुख भग्न झालेली ही प्रतिमा आधुनिक काळातील दिसते. येथे एक चौकोनी खांबाच्या आकाराचे आणि चारही बाजू शिल्पांकित केलेला वीरगळ आहे. या वीरगळावर चार टप्पे कोरले आहेत. एका बाजूस वीर घोडेस्वाराशी युद्ध करताना दिसतो. शिल्पशैलीवरून वीरगळ बाराव्या शतकातील वाटतो. मुख भग्न झालेले दोन नंदी आहेत. शिल्पशैलीवरून यापैकी एक नंदी मराठा काळातील, तर दुसरा नंदी बाराव्या शतकातील आहे.

**पिंपळवाडी** (18° 6'25” N, 73° 31'35” E )

महाडच्या वायव्येस महाड-पिंपळवाडी रस्त्यावर पिंपळवाडी हे १७ किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून नऊशे मीटर उंचावर वसलेले गाव. हा गाव पूर्व-पश्चिम पसरलेल्या डोंगर रांगेच्या उत्तर बाजूस सपाटीवर आहे. येथे असलेल्या कांगोरी या संरक्षक वसाहतीस मंगळगड हे नाव मध्ययुगात मिळाले. गडावर असलेली खांब टाकी व काही शुष्कसांधी बांधकामे यांवरून ही संरक्षक वसाहत उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील असावी. या संरक्षक वसाहती जवळून पुणे व सातारा या प्रदेशात जाणारे व्यापारी घाटमार्ग याच भागातून जातात. त्यांचे रक्षण करणे व आजूबाजुच्या परिसरावर ताबा ठेवणे या दुहेरी उद्देशाने या वसाहतीची निर्मिती झाली असावी. येथे काही बुरुज व चांगली तटबंदी आहे (छायाचित्र क्रमांक ५६). येथील स्थानिक मात्र येथे असलेल्या कांगोरमल नावाच्या देवतेस गडाचा व आजूबाजूच्या परिसराचा राखणदार मानतात. येथे कांगोरमल देवाचे मंदिरही आहे.

या गावात प्राथमिक शाळेजवळ गावपांढर या स्थानिक देवतांचे आधुनिक काळात जीर्णोद्धार करून उभारलेले मंदिर आहे. मंदिरात असलेली शिल्पे व त्यांच्या शिल्पशैलीवरून मराठाकाळ किंवा आधुनिक काळात मागील शतकात केंव्हा तरी घडविली असावीत. मंदिरातील मूळ शिल्पे मंदिराच्या मागच्या बाजूस ठेवली आहेत. यामध्ये वीरगळ, भैरव, गजलक्ष्मी व भैरवी यांची सुमारे ७० ते ८० सेंटीमीटर लांबी आणि रुंदीची शिल्पे आहेत. वीरगळ आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेला तीन टप्प्यातील आहे. नेहमीचीच

दृश्ये असलेल्या याचा खालचा भाग तुटला आहे. मंदिराबाहेर समाधी शिळा पाहायला मिळतात. आयताकृती आकाराचे दोन वीरगळांचे दोन तुकडे येथे आहेत. शिल्प शैलीवरून ही शिल्पे अकरावे शतक ते बाराव्या शतकातील असावीत.

**रुपवली** (18° 6'25" N, 73° 31'35" E )

महाडच्या वायव्येस महाड-पिंपळवाडी रस्त्यावर रुपवली हे १४ किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून ३०० मीटर उंचीवर वसलेले गाव. या गावातील बौद्धवाडीजवळ कांगोरीमल या स्थानिक देवतांचे कौलारू मंदिर आहे. या मंदिरात लहान मोठी सुमरे ७० सेंटीमीटर ते २० सेंटीमीटर उंचीची चार हातांची तीन व दोन हातांची एक अशी स्थानक अवस्थेतील चार शिल्पे पाहायला मिळतात. कांगोरीमल म्हणून दाखविली जाणारी देवता चार हातांची, भैरव मूर्ती सारखी आहे. दुसरे स्त्री देवतेचे शिल्प महिषासुरमर्दिनी प्रकारचे आहे. तर दोन हात असलेले शिल्प स्त्रीदेवतेचे आहे. तिच्या उजव्या हातात लांब दंड असून डावा हात कमरेवर आहे. अशा प्रकारचे शिल्प अनेक ठिकाणी पाहायला मिळते. ही शिल्पे शिल्पशैलीवरून मराठा काळातील असावीत. मंदिराबाहेर भग्नावस्थेतील नंदी, योनीपीठ, समाधी शिळा  तसेच एका अत्यंत खराब अवस्थेतील वीरगळाचा तुकडा आहे. याशिवाय शुष्कसांधी बांधकामाच्या कोरीव शिळा आहेत. वीरगळ व योनीपीठ यांच्या शैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत.

**भावे** (18° 6'15" N, 73° 31'05" E )

महाडच्या पूर्वेकडे महाड-भोर मार्गे पुणे या रस्त्यालगत, दक्षिणेकडून येणाऱ्या भोना नावाच्या नदीच्या पूर्व बाजूस भावे हे उल्लेखनीय पुरावशेष असलेले गाव आहे. गावाच्या सुरुवातीलाच नदीकाठी शिवमंदिर, सोमजाई व जननी देवतांची मंदिरे आहेत. यातील शिवमंदिरात वीरभद्र या देवतेचेही मंदिर आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शिवमंदिराला काही ठिकाणी ढासळलेली असली, तरी मूळची प्राकार भिंत आजही शिल्लक राहिलेली आहे. पूर्वाभिमुख असलेल्या मंदिराच्या पूर्वेकडून प्रवेशद्वार आहे. ही प्रकार भिंत दीड मीटर उंच व तळाशी ०.९० मीटर रुंद आहे. तळात जास्त रुंद असून वर अरुंद होत गेली आहे. प्रकार भिंतीस पश्चिम व दक्षिण बाजूस ढासळलेली प्रवेशद्वारे आहेत. वीरभद्राचे उत्तराभिमुख मंदिर मुळात दक्षिणेकडील प्राकार भिंतीतील देवळीत होते व आता ते बांधून काढले आहे. यावरून प्रकार भिंतीच्या इतर भागातही अशा प्रकारच्या देवळ्या असाव्यात पण आज त्यांचे अस्तित्व नाही. या देवळीस त्रिशाखी पण साधी अशी कोणतेही अलंकरण नसलेली द्वारशाखा आहे. हीस

ठळक स्तंभ शाखा आहे. देवळीवरील कळस फांसना पद्धतीचे असून, त्याला तीन स्तर आहेत. यां स्तरांच्या वरील भागास, मध्यभागी व कोपऱ्यावर अर्धवर्तुळाकृती घटक आहेत. या देवळीत भैरवाची शेंदूरचर्चित मूर्ती आहे. ही मूर्ती चार हातांची त्रिभंग व स्थानक अवस्थेत आहे. शिल्पशैली व मंदिराचा कळस यांवरून हे काम मूळ मंदिराचे असल्याचे लक्ष्यात येते. शैलीवरून हे मंदिर व या परिसरातील इतर शिल्पावशेष एकाच कालखंडातील असल्याचे दर्शवितात. या लहानश्या देवळीभोवती आता मंदिर केले आहे. बाजूला मुख्य मंदिर हे चौकोनी तलविन्यास व फांसना पद्धतीचे शिखर असलेले साधे असून, मराठा काळात त्याची पुनर्बांधणी झाल्याचे त्याच्या बांधकामावरून लक्षात येते. या ठिकाणी नंदी, गणेश व विष्णू व खोल गाभाऱ्यातील शिवलिंग हे त्यांच्या शैलीवरून मागच्या शतकात घडविले असावेत. मुख्य शिवमंदिराच्यामागील बाजूस काही शिवलिंग आहेत. यांना मुखलिंग म्हणता येईल (छायाचित्र क्रमांक ५०). चौकोनी व गोल आकाराच्या योनीपीठावर मध्यभागी लिंगाच्या आकाराचा उंचावटा व त्याला चिकटून असलेला एका किंवा अनेक पुरुष मुखाचा भाग, तर दुसऱ्या बाजूस पाण्याचा निचरा होण्यासाठी पन्हाळ असलेला आहे. चौकोनी आकाराच्या गळयापर्यंत मुखभाग दाखविला आहे. गळ्यात गळसरी व कंठासारखे अलंकार आहेत. कानात कुंडले दिसतात. डोक्याच्या शेंड्या एका बाजूस सोडलेल्या दिसतात. एका शिल्पावर दोन मुखे दाखविली आहेत. यातील एक मुख स्त्रीचे असावे असे दिसते कारण तिच्या केसांची वेणी बांधली आहे. यातील अनेक भाग उन्हा-पावसामुळे झीज झालेले आहेत. काही प्रमाणात झीज झालेली असली, तरी ही शिल्पे सौंदर्यपूर्ण आहेत. या शिल्पांच्या शैलीवरून ही शिल्पे तेराव्या किंवा चौदाव्या शतकातील असावीत. या परिसरात पावसाळ्यात नांगरटीच्या काळात शेतातून लाल व काळ्या, तसेच काचेचा लेप दिलेल्या हिरव्या रंगाची खापरांचे अवशेष सापडतात. भावे गावाचा एक भाग डोंगराच्या सपाटीवर आहे. येथे आधुनिक काळात उभारलेले लक्ष्मी नारायणाचे मंदिर आहे. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळून आले नाहीत.

**बारसगाव** (18° 6'58” N, 73° 33'1” E )

महाडच्या पूर्वेकडे महाड-भोर रस्त्यावर गावडी हे १२ किलोमीटर अंतरावरचे गाव. या गावातील शेतात जननी, गौराई, सोमजाई, कुंभळजाई स्थानिक देवतांचे आधुनिक काळात जीर्णोद्धार झालेले मंदिर आहे. या ठिकाणी असलेली शिल्पे त्यांच्या शैलीवरून आधुनिक काळात घडविली आहेत. विशेष बाब म्हणजे या ठिकाणी मुख्य दैवत म्हणून ४० सेंटीमीटर लांबीच्या दगडाची पूजा केली जाते. हा दगड दोन्ही शिर्षांकडे निमुळता होत गेला आहे व

त्याच्या कडा काहीशा धारदार आहेत. एखाद्या अश्मयुगीन हत्यारासारखे याचे स्वरूप आहे. मंदिर परिसरात गावातील मृत लोकांच्या समाध्या आहेत. या ठिकाणी कोणतेही पुरावशेष आढळून आले नाहीत,

**पडवी (17°56'59" N, 73° 23'40" E )**

महाडच्या पूर्वेकडे महाड-शिवथर रस्त्यावर पडवी हे १४ किलोमीटर अंतरावरचे गाव. हे गाव कातळ सपाटीवर आहे. या गावात जीर्णोद्धार केलेले कालभैरी व जोगेश्वरी या स्थानिक देवतांचे आधुनिक काळात उभारलेले मंदिर आहे. गावदेवाचे हे ठिकाण गावाच्या पूर्वेकडे वरंध गावाजवळच्या पडवी पठार भागाच्या टेकडी परिसरात आहे. या ठिकाणी उल्लेखनीय अवशेष आहेत. हे ठिकाण म्हणजे स्मशानभूमी आहे. अनेक स्मृती समाध्या या ठिकाणी पाहायला मिळतात. भग्न योनीपीठ, नंदी व गजलक्ष्मीचे शिल्प येथे पाहायला मिळते. गजलक्ष्मीचे शिल्प ६६ सेंटीमीटर लांब व ७३ सेंटीमीटर रुंद आहे. शिळेचा वरचा भाग अर्धवर्तुळाकृती आहे. शिल्पाची झीज झाली असली तरी ते उठावदार आहे. मूर्ती किंवा शिल्प बसवण्यासाठी खाच असलेला पीठाचा भाग आहे यावर शिलाहार शैलीतील त्रिकोणाकृती घटक दाखवला आहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. या ठिकाणी मंदिरात असलेली शिल्पे त्यांच्या शैलीवरून आधुनिक काळातमागील शतकात कैंव्हा तरी घडविली असावीत.

**वाकी खुर्द** (18° 10'16" N, 73° 34'1" E )

महाडच्या पूर्वेकडे महाड-शिवथर रस्त्यावर वाकी खुर्द हे १६ किलोमीटर अंतरावरचे गाव. हे गाव शिवथरकडून येणाऱ्या खारक नदीच्या दक्षिण कातळ सपाटीवर आहे. या गावातील पुरावशेष गावदेवी सोमजाई आणि कालभैरी व जोगेश्वरी या स्थानिक देवतांचे मंदिराजवळ आहेत. या ठिकाणी मंदिराभोवती दगडांचा कठडा उभारला असून या कठड्यात तीन आयताकृती वीरगळ रचले आहेत. मंदिराच्या पुढे अनेक दगडी स्मुती समाध्या आहेत. येथेही एक भग्न वीरगळ आहे वीरगळ त्यांच्या शैलीवरून बाराव्या शतकात किंवा तेराव्या शतकातील असावेत. या शिवाय मंदिरात एक शिवलिंग व तीन शिल्पे आहेत. त्यांच्या शैलीवरून ती मराठा काळात कैंव्हा तरी घडविली असावीत.

**वरंध** (18° 7'57" N, 73° 34'24" E )

वरंध हे गाव महाड-पुणे या मार्गावर महत्त्वाचे गाव आहे. हाच मार्ग म्हाप्रळ-पंढरपूर या नावाने ओळखला जातो. महाड या तालुक्याच्या ठिकाणापासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर सह्याद्रीच्या पायथ्याला ते वसलेले आहे.

या गावाच्या उत्तर दिशेस कुंभारवाडा या भागात एका टेकडीवर दक्षिणाभिमुख असलेली एक नैसर्गिक गुहा अचानक सापडली आहे. पुरातत्त्वीय दृष्टीकोनातुन पाहिले असता, ही गुहा उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडातील असल्याचे लक्षात येते. सुमारे २५ मीटर लांबाची गुहा डावीकडे कातळात खोल पसरलेली असून काही ठिकाणी गुहेची रूंदी ४ मीटर ते २.५० मीटरपर्यंत कमी जास्त आहे. नैसर्गिक गुहा असल्यामुळे छत सपाट नाही. प्रवेशद्वारावर चिखल-दगडाच्या भिंतींचे बांधकाम केले असून त्यात देवळी आहेत. प्रवेश केल्यानंतर दर्शकासमोरच्या कातळात लांबट बैठ्या आकाराचा ओबडधोबड ओटा खोदला असून त्याचा उपयोग बसण्यासाठी करत असावेत. डाव्या बाजूस पसरलेल्या गुहेत माती आणि दगडाचा वापर करून तीन भिंती, सुमारे तीन मीटरच्या अंतरावर बांधून चार दालने निर्माण केली गेली असल्याचे लक्षात येते. सध्या यातील पहिल्या दालनात उपरोल्लेखीत लांबट ओटयावर रामदासांची तसबीर ठेवलेली आहे. बांधलेल्या तीन भिंतीपैकी, पहिली भिंत शाबूत असून तिचे पुन्हा बांधकाम केल्यासारखे वाटते. उरलेल्या लागोपाठच्या दोन भिंती ढासळलेल्या अवस्थेत आहेत. या भिंतीमुळे गुहेचे चार दालनात विभाजन होते. दुस-या दालनात डाव्याबाजूच्या कातळात १ मीटर लांब व १ मीटर रुंद आणि ३० सेंटीमीटर उंची असलेला ठेंगणा ओटा खोदलेला आहे. हा सध्या खराब झालेल्या अवस्थेत आहे. तिसरे आणि चौथे दालन रिकामे आहे. चौथ्या दालनात गुहा निमूळती होत जाते. गुहा अनेक ठिकाणी छिन्नीने तासलेली असून ठिकठिकाणी मध्ययुगीन किल्यांवरील गुहांमधून आढळतात, त्याप्रमाणे एखादी वस्तू बांधून अथवा टांगून ठेवण्यासाठी कातळात गोलकडे केलेले आहेत. या लेणींमध्ये अदयाप तरी कोणताही लेख आढळून आलेला नाही. कातळात नैसर्गिकरित्या निर्माण झालेल्या गुहेत नंतर आणखी खोदण्यात आले. उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्वमध्ययुगाच्या सुरवातीस केव्हातरी वास्तव्यासाठी ही गुहा वापरली केली असावी. लेणीचे प्रयोजन धार्मिक असावे असे म्हणता येते. लेणीच्या आंतरभागात दुसऱ्या दालनात आढळून आलेल्या ओट्यांचा उपयोग ध्यान धारणेसाठी केला जात असावा. विशेष म्हणजे अद्यापर्यंत अज्ञात असलेल्या या लेणीच्या जागेला स्थानिक आजही मठाचा माळ असेच म्हणतात.

त्याची सरकारी नोंद ही अशीच आहे. या गुहेचा वास्तव्यासाठी वापर समर्थ रामदासांनी केल्याचा दावा काही दासभक्तांनी केला आहे.

वरंध गावाच्या प्राथमिक उपचार केंद्राजवळ असलेल्या शिवमंदिराभोवती १७ वीरगळ असून हे वीरगळ चौकोनी खांब प्रकारचे आहेत. या वीरगळांच्या चारही बाजू कोरलेल्या आहेत. सुमारे एक मीटर उंचीच्या या वीरगळांवर तीन ते चार टप्प्यात युध्ददृश्य कोरलेले आहेत. हे वीरगळ गावक-यांनी एकमेकांशेजारी जमिनीवर आडवे ठेवले असल्याने त्यांच्या इतर बाजू दिसत नाहीत. यातील दोन वीरगळांवर खालच्या टप्प्यात छत्रधारी राजाचे शिल्पांकन केले आहे. मंदिराबाहेर शिलाहारकालीन तीन खांबांचे अवशेष आढळून येतात. यांचे खाली चौकोनी खांब वर अष्टकोन, त्यावर गोल असे भाग आहेत. तसेच शुष्कसांधी बांधीव मंदिराचे अनेक दगड मंदिराभोवती अस्ताव्यस्त पडलेले आहेत. या मंदिरापासून बसस्थानकाशेजारी पडीक मंदिराचे अवशेष असून, ही जागा नाभिक समाजाची स्मशानभूमी मानली जाते. यात त्रिभंग अवस्थेतील एका पुरुष देवतेची भग्न मूर्ती, तसेच महिषासुरमर्दिनीची भग्न मूर्ती आढळून येते. या भागात तीन वीरगळ आहेत.

गावाच्या पश्चिमभागात असलेल्या काळभैरव मंदिराजवळ महादेवाचा माळ याठिकाणी दोन प्राचीन मंदिरांचे अवशेष आढळले आहेत. यात योनीपीठ, लिंग, दोन भग्न अवस्थेतील नंदी, तसेच दोन मंदिराचे कोरीव पीठ आढळून आले आहे. दुसऱ्या शिव मंदिराचा चौथरा दीड मीटर उंच असून पूर्णपणे मातीत गाडला गेला असून, मंदिराच्या चौथऱ्यावर झाडे वाढल्यामुळे त्याचे नेमके स्वरूप समजत नाही. येथेही दोन नंदी, योनीपीठ, इतर भग्न शिल्पे व भाजलेल्या विटांचे अवशेष आढळून येतात. मंदिराशेजारी सध्या शेती करत असलेल्या जागी पूर्वी तलाव होता. आता त्याचा मागमूसही सापडत नाही. या परिसरात नांगरटीच्या काळात आद्य ऐतिहासिक ते उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील खापरे सापडतात.

**माझेरी** (18° 7'29” N, 73° 35'47” E )

महाडच्या ईशान्येकडे महाड-भोरघाट मार्गे पुणे या रस्त्यावर माझेरी हे २८ किलोमीटर अंतरावरचे गाव म्हणजे सह्याद्री पर्वताचा वरचा डोंगरकड्याचा सर्वोच्च भाग ते तळ यांचा मधला टप्पा होय. गावाच्या पूर्वेस सहयाद्रीच्या कडयात कावळादुर्ग ही संरक्षक वसाहत असून वरंध घाट मार्गावर लक्ष ठेवण्याचे काम या किल्यावरून चालत होते. पुण्याच्या दिशेने जाणा-

या या मार्गावर वाघजाई देवतेचे नवीन मंदिर बांधलेले आहे मात्र मूळ मंदिर त्यास लागून असलेल्या उंच कड्यात असून त्या कड्याच्या डोंगर उतारावर कातळात खोदलेल्या नऊ टाक्यांचा समूह आहे. शेजारी वाघजाई देवतेचे मूळ स्थान आहे. उन्हाळयात देखील पाणी असलेल्या या ठिकाणच्या काही टाक्यांची रचना इसवीसनाच्या सुरवातीस निर्माण झालेल्या या परिसरातील लयन वसाहतींच्या सानिध्यात आढळणा-या पाणपोढ्यांसारखी आहे. ही टाकी कातळात खोल खोदली असून काहींची खोली २ ते ३ मीटर इतकी रुंद व लांबी ५ ते ७ मीटर इतकी आहे. अशाच प्रकारची जमीन पातळीवर आयताकृती मुख असलेली खांबविरहित कातळात कोरलेली टाकी, पुढे दोन किलोमीटरवरील पुणे जिल्ह्यातील उंबार्डी गावच्या जवळ आहेत. या परिसरात आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडातील खापरेच्या आढळतात.

**तळीये** (18° 6'37” N,  73° 34'51” E )

महाडच्या ईशान्येकडे महाड भोरघाट मार्गे पुणे या रस्त्यावर तळीये हे काहीसे दक्षिणेकडे आत असणारे १२ किलोमीटर अंतरावरचे गाव आहे. सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या रांगेपासून टेकड्यांचा एक भाग काहीसा पूर्वेकडे पुढे आला आहे. याला स्थानिक लोक चांगमोडा असे म्हणतात. या रांगेपासून वेगळी एक टेकडी म्हणजे जननीचा दुर्ग. तळीये हे छोटेसे गाव या २०० मीटर उंचीच्या टेकडीच्या पायथ्याला आहे. या टेकडीवर गावदेवी जननी मातेचे मंदिर आहे. या मंदिरातील एका नैसर्गिक शिळेला देव मानून पूजा केली जाते. मंदिरात चार हातांचे एक व दोन हातांचे एक स्त्री शिल्प व एक पुरुष शिल्प अशी आधुनिक काळातील तीन स्थानक अवस्थेतील शिल्पे आहेत. दोन हातांच्या स्त्रीने आपल्या कमरेवर दोन्ही हात ठेवले आहेत. याशिवाय एक आयताकृती प्रकारचा एकच बाजू शिल्पांकित असलेला वीरगळ आहे. शिल्पाची झीज झालेली असली तरी त्याच्या धाटणीवरून त्याचा काळ बाराव्या शतकाचा ठरवता येतो. विशेष बाब म्हणजे आकाराने व विस्ताराने लहान असलेल्या या टेकडीच्या पूर्व व उत्तर बाजूवरील कड्याच्या उतारावर कातळात एक तर पूर्व बाजूस चार अश्या पाच पाण्याच्या चार टाक्या खोदल्या आहेत. या टाक्यांमध्ये मध्यभागी एक खांब कोरला आहे. यांपैकी दक्षिणेकडील दोन टाक्या गाळ साठून बुजल्या आहेत. तर पहिल्या एका टाकीचा वरील भाग दिसू शकतो. आयताकृती मुखे असलेल्या या टाक्यांचा तलविन्यास काहीसा अर्धवर्तुळाकृती किंवा कुऱ्हाडीच्या पात्याच्या आकारासारखा आहे. समोरील बाजू आवळ व अरुंद आणि आतमध्ये आडवे व खोल पसरलेली. स्थानिक लोकांच्या मते हे काम पांडवांनी एका रात्रीत त्यांच्या अज्ञातवासात केले आहे. या प्रकारच्या टाक्यांची रचना पूर्व

मध्ययुगीन गिरिदुर्ग प्रकारच्या संरक्षक वसाहतींवर आढळून येते. यांच्या स्वरूप व तलविन्यासावरून किंवा स्थापत्य रचनेवरून याचा काळ दहाव्या शतकाच्या आधी नेता येणार नाही.

जननी देवी मंदिराच्या मागेही एक टाके असल्याचे समजते. टेकडीच्या माथ्यावर टेकडीच्याकडेला लागून तटबंदीसारखे दगड होते ते जननी देवीच्या मंदिराच्या बांधकामासाठी वापरलेले दिसतात. काही दगडी कोरीव शिळांना पवित्र मानून मंदिरात ठेवलेलं पहायला मिळते. मंदिरासमोर मराठा काळातील दगडी दीपमाळ आहे. मराठा काळातही यास महत्त्वपूर्ण स्थान असावे असे दिसते. या ठिकाणाहून वरंध घाट, कांगोरी उर्फ मंगलगड, चांभारगड किल्ला, महाडचा व बिरवाडीचा, वरंधची लेणी इत्यादि परिसर पाहता येतो. या ठिकाणी मार्गशीर्ष पौर्णिमेस रात्री जागर असतो. देवीचा मोठा उत्सव केला जातो. दुर्गच्या पायथ्याला स्थानिक लोक माची असे संबोधतात. एकंदर रचनेवरून हा शिवपूर्व काळातील गिरिदुर्ग प्रकारचा किल्ला म्हणजेच संरक्षक वसाहत असावी. या ठिकाणाचा उपयोग वरंध आणि चिकन्या घाटाचे व परिसराची टेहळणी व रक्षण करणे यासाठी झालेला दिसतो. खुद्द तळीये गावात कोमजाई, वाघजाई, जननी माता, चेडा, जोगेश्वरी व कांगोरीमल्ल या स्थानिक देवतांचे स्थान आहे. ही शिल्पेमागील शतकात केंव्हा तरी घडवली असावीत. तळीये गावात कातळात कोरलेले आयताकृती मोठे टाके खोदलेले आहे. हे टाके देखील पांडवानी कोरल्याचे सांगतात.

**कसबे शिवथर** (18° 9'33” N, 73° 37'40” E )

महाडच्या ईशान्येकडे २४ किलोमीटर अंतरावर कसबे शिवथर हे समुद्रसपाटीपासून १३४ मीटर उंचीवर वसलेले गाव आहे. या गावाच्या परिसरात उल्लेखनीय पुरावशेष आढळतात. हे गाव सह्याद्रीच्या पायथ्याशी आहे आणि पूर्वेकडून येणाऱ्या खरक नदी प्रवाहाच्या दक्षिण बाजूस वसले आहे. रायगड जिल्ह्यातील शेवटचे गाव असल्यामुळे येथून पुणे जिल्ह्यात पायी जाणारे काही घाटमार्ग आहेत. यांचा वापर प्राचीन काळापासून होत असावा असे दाखविणारे पुरातत्त्वीय पुरावे येथे आढळतात. सह्याद्रीच्या कड्यातून अनेक पाण्याचे प्रवाह पावसाळ्यात खाली येऊन तयार झालेल्या नाळेतून हे घाटमार्ग तयार झाले आहेत. या गावाच्या ईशान्येस गोप्या नावाचा घाटमार्ग आहे. येथील सह्याद्रीच्या कड्यात समुद्रसपाटीपासून ५०० मीटर उंचीवर कातळात कोरीव उत्खनने झाली आहेत. यात एक पूर्वाभिमुख साधी लेणी आणि चार कातळात कोरलेल्या पाण्याच्या टाक्या असे त्यांचे स्वरूप आहे (छायाचित्र क्रमांक ५३). ही

लेणी २.८० मीटर लांब, २.३० मीटर रुंद व २.३० मीटर उंच अशी आहे. लेणीच्या वरच्या कड्याचा भाग तुटल्यामुळे मुख भागाची मोठी हानी झाली आहे. लेणीस पूर्वी दार असावे आज मात्र काहीही अवशेष नाहीत. लेणीचे छत व भिंती साध्या व सपाट असून त्यावर कोणतेही अलंकरण नाही. लेणीत अद्याप तरी कोणतेही धार्मिक चिन्ह व शिलालेख सापडलेला नाही. यावरून ही लेणी धार्मिक उद्देशाने खोदली गेली नसावीत. लेणीच्या दक्षिण बाजूकडील उभ्या कड्यात आयताकृती चौकटीच्या तळात चौकोनीमुख प्रकारची खोदलेली पाण्याची एक टाकी आहे. तिचे स्वरूप महाड जवळील गांधारपाले लेणे क्रमांक १ च्या समोरील टाकीसारखे आहे. ही टाकी कातळाच्या आत सुमारे तीन मीटर आडवी तर सुमारे दोन मीटर खोल खोदली आहे. यात माती व गाळ साठल्याने खोलीचा नेमका अंदाज येत नाही. लेणीच्या पोटातच एक चौकोनी मुख असलेले दुसरी टाकी आहे. तिचा अर्धा भाग लेणीच्या खाली आहे. लेणीच्या उत्तर बाजूस अशाच दोन पाण्याच्या टाक्या आहेत. त्या दरड कोसळून पूर्णतः झाकल्या गेल्या आहेत. येथून पुढे गोप्या गावाकडे चालत जाताना वाटेत कातळात खोदलेल्या पायऱ्या,  तर काही ठिकाणी सुट्या दगडांच्या रचलेल्या पायऱ्या आहेत. पुढे गेले असता दरीच्या टोकावर पुन्हा अशाच चौकोनी मुख असलेल्या पाण्याच्या टाक्या आहेत. या लेणीचे स्थापत्य आणि स्वरूपावरून या लेणी इसवीसन दुसऱ्या ते तिसऱ्या शतकातील असाव्यात.


या गावाच्या बाहेर शेतात खडकेश्वर नावाचे शिवमंदिर आहे. हे मंदिर छोटेखानी पण शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेले आहे. याचे स्वरूप उघडा मंडप,  अंतराळ व मागे गर्भगृह असा आहे. गर्भगृह पूर्वी खोल व शिवलिंग अगदी खडकाला लागून होते असे म्हणतात. या ठिकाणी अनेक शिल्पे ठेवली आहेत. यात चार पुरुष मुखे असलेली पण जास्त रेखीव नसलेली एक शिळा. वाघावर आरूढ देवता ही शिल्पे उल्लेखनीय आहेत. त्यांच्या शैलीवरून या मराठा काळात किंवा त्याच्या उतरत्या काळात बनवल्या असाव्यात. मंदिरात मंडपात चार खांब आहेत. त्यांचा घटकक्रम चौकोनी तळखडा, वर चौकोन, मग अष्टकोन, चौकोनी ठोकळा, त्यावर गोलाकार भाग, मग कर्णिका व मग चौकोनी स्तंभशीर्षावर नाग प्रतिमा असा काहीसा यादवकालीन आहे. परंतु शैलीवरून तेरावे शतकाचा उत्तरार्ध ते चौदावे असा कालखंड निश्चित करता येतो.

आंबे शिवथर हा शिवथरचाच एक भाग आहे. कसबे शिवथरहून आंबेशिवथर २ किलोमीटर आहे. पूर्वेकडून येणाऱ्या खारक नदीच्या उत्तर बाजूस आंबेशिवथर आहे. गावाच्या

व्याडेश्वर या गावदेव व शिवमंदिराजवळ गावातील पुरावशेष आहेत. या मंदिर परिसरात आयताकृती आकाराचे व एका बाजूस कोरीवकाम केलेले सात वीरगळ आहेत. यापैकी मंदिराजवळील शेतात झीज झालेल्या अवस्थेत पाच वीरगळ आहेत. ते तीन ते चार टप्यात आहेत. व्याडेश्वर मंदिरच्याजवळ एक गुरांचा गोठा आहे. या गोठ्याला खेटून एक झीज झालेला परंतु विशेष वीरगळ आहे. हा एकाच टप्यातील किंवा टप्पे नसलेला असा आहे. याची लांबी ७० सेंटीमीटर व रुंदी ६२ सेंटीमीटर आहे. हा डुकराची शिकार करताना दिसतो. डुक्कर त्याच्या डाव्या पायाशी असून त्याच्यावर हल्ला करताना दिसतो. यातील विशेष बाब म्हणजे या डुकराच्या डोक्यावर तुरा व अंगावर झूल किंवा चिलखत घातल्यासारखे वाटते. या वीराच्या मागे एक व्यक्ती हातात धनुष्य घेऊन हल्ल्याच्या पवित्र्यात आहे. या वीरगळाच्या जाडीवर जागा कमी असली, तरी दोन्ही पाय वर करून चौखूर उधळलेला घोडा तसेच त्यावर एक माणूस हातातकाठी किंवा भाला किवा तुतारी घेतलेला दाखविला आहे. या प्राण्यावर कुत्र्यांनी देखील हल्ला केलेला दिसतो.

**पारमाची** (18° 8'41” N, 73° 36'15” E )

महाडच्या पूर्वेकडे १८ किलोमीटर अंतरावर पारमाची हे समुद्रसपाटीपासून ३०० मीटर उंचीवर वसलेले गाव आहे. या गावाच्या पश्चिमेस वरंधगावच्या मार्गावर आयताकृती मुख असलेली पाण्याची कोरीव टाकी आहे.




नकाशा क्रमांक ५  महाड व पोलादपूर तालुक्यातील पुरातत्त्वीय स्थळे

## ३.८ पोलादपूर तालुक्यातील सर्वेक्षण वृत्तांत (नकाशा क्रमांक ५)

**चांभारगणी बुद्रुक (**17° 56'42” N,  73°  30'32” E )

पोलादपूरच्या आग्नेयेस सात किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात मावळा या गावदेवीचे मंदिर आहे. पण या ठिकाणी कोणतेही पुरातत्त्वीय पुरावशेष आढळून आले नाहीत.

**कापडे खुर्द** 17° 57'45” N,  73°  30'21” E )

पोलादपूरच्या आग्नेय दिशेस पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात सिद्धभैरवनाथ या गावदेवाचे मंदिर आहे. या ठिकाणी विशेष पुरावशेष आढळून आले आहेत. येथे एक गद्धेगळ  (छायाचित्र क्रमांक ५४) भग्नावस्थेतील दोन व चांगल्या अवस्थेत असलेला एक असे तीन वीरगळ शाळेजवळील शेतात आहेत. भग्न वीरगळ हे चौकोनी खांब प्रकारचे सर्व बाजू शिल्पांकित केलेले आहेत. चांगला वीरगळ १.२० मीटर लांब व ०.३४ मीटर रुंद असा आयताकृती प्रकारचा व चार टप्यात कोरलेला आहे. भग्न वीरगळ हे गोधनाच्या रक्षणात बळी पडलेल्या वीरांचे आहेत. उल्लेखनीय शिल्प मंदिराबाहेरील भिंतीलगत ठेवले आहेत. यात एक त्रिभंगावस्थेतील, चार हातांचे सुबक, पण भंग झालेले स्त्री शिल्प आहे. दुसरेही असेच किरीट मुकुट असलेले शिल्प आहे ही शिल्पे झीज झालेली असल्याने त्यांचे इतर तपशील देता येत नाहीत.  एकंदर शिल्प शैलीवरून ही शिल्पे अकराव्या शतकातील असावीत, तर वीरगळ बाराव्या शतकातील असावेत.

**किनेश्वर** (17° 55'19” N,  73°  32'35” E )

पोलादपूरच्या आग्नेयेस नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातून सातारा जिल्ह्यात जाणारा घाटमार्ग आहे. किनेश्वर हा प्राचीन घाटमार्ग असून येथून आपल्याला महाबळेश्वर येथील पार गावाजवळ जाता येते, हा मार्ग घोडवली नदीच्या काठाने जाणारा होता. मध्ययुगात जास्त प्रसिध्द होता. आजही या घाटमार्गाची मराठा काळात केलेली फरसबंदी बांधणी पहावयास मिळते. गावातील जननी, कुंभळजाई,  काळकाई व चेडाबा राखाणदार या स्थानिक दैवतांचे गावाच्या राहटीत स्थान आहे. गावाच्यामागील टेकडीस माणगा टेकडी, तर देवइरा या ओढ्याजवळ जननीचे स्थान आहे. या ठिकाणी गावाचे जुने स्मशान असून येथे पूर्वी गावातील मृत माणसे पुरायची पद्धत होती. मंदिरासमोर एक लाकडी उंच खांब असून

त्याला वेताळ असे म्हणतात. गावाच्या दक्षिण बाजूस असलेल्या पांडवदरा या भागातून घाटमार्गे सातारा जिल्ह्यातील कुमटे व पारया गावी जाता येते. या ठिकाणी कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या आहेत. शैलीवरून त्या आद्य ऐतिहासिक काळातील असाव्यात. एकंदर इथली वसाहत आद्य ऐतिहासिक काळापासून झाली असावी.

**निवी** (17° 55'49" N, 73° 31'30" E )

पोलादपूरच्या आग्नेयेस आठ किलोमीटर असलेल्या या गावात भराडीदेवीचे मंदिर आहे. या ठिकाणी नैसर्गिक पाषाणरुपी देवीची उपासना केली जाते.

**ताम्हाणे (**17° 55'22" N, 73° 32'8" E )

पोलादपूरच्या आग्नेयेस सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात महादेवाचे मंदिर व जननी देवीचे मंदिर आहे. महादेवाच्या मंदिराजवळ योनीपीठ शिल्लक राहिलेले पाहायला मिळते. जननी देवीच्या मंदिराजवळ दोन भग्न वीरगळ आहेत. या शिवाय मंदिरात चार हातांची समभंग अवस्थेतील सात शिल्पे आहेत. शिल्पशैलीवरून वीरगळ चौदाव्या शतकातील, तर इतर शिल्प मराठा काळातील असावेत.

**देवळे (**17° 58'17" N, 73° 33'6" E )

पोलादपूरच्या पूर्वेस नऊ किलोमीटर सावित्री नदीच्या दक्षिण तीरावरील असलेल्या या गावातून सातारा जिल्ह्यात जाणारा फारसा वापरत नसलेला जुना घाटमार्ग आहे. देवळे गावातील शिवमंदिराचा जीर्णोद्धार झाला असून या मंदिराबाहेर मराठा काळातील व नंतरच्या काळातील आयताकृती समाध्या आहेत. या मंदिराबाहेर आयताकृती आकाराचे सहा चांगल्या अवस्थेतील, तर तीन भग्न वीरगळ, तीन ते चार टप्प्यात कोरलेले बघायला मिळतात. या शिवाय दोन सतीशिळा, दोन भग्न नंदी शिल्पही आहेत. एका वीरगळाचे वैशिष्ट्य म्हणजे वीरा सोबत चार स्त्रिया सती गेलेल्या दिसतात. शिवाय खालून दुसऱ्या टप्प्यात युद्ध करणाऱ्या वीराच्या डोक्यावर छत्र धरलेला सेवक दिसतो. यावरून हा वीरगळ इथला स्थानिक राजघराण्यातील प्रमुखासाठी असावा. वीरगळाची शिल्पशैली अकराव्या किंवा बाराव्या शतकातील दिसते. या मंदिरासमोर पुष्करणीचे, त्रिकोणाकृती घटक असलेला स्तंभाचा तळखडा व शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारलेल्या मंदिराचे काही वास्तूघटकही पाहायला मिळतात.

**करंजे (**17° 58'25" N, 73° 34'46" E )

पोलादपूरपासून पूर्वेस १३ किलोमीटर अंतरावरील या गावाच्या मागील टेकडीत एक मानवनिर्मित गुहा सांगितले जाते. पण सर्वेक्षणात सदर गुहा सापडली नाही.

**केवनाले (**17° 56'34” N, 73° 33'34” E )

पोलादपूरच्या पूर्वेस सात किलोमीटर अंतरावर असलेल्या, या गावात काळकाई देवतेचे मंदिर आहेत. कोणतेही पुरावशेष महत्त्वपूर्ण आढळले नाहीत.

**लहुळसे (**17° 56'53” N, 73° 35'19” E )

हे गाव पोलादपूरपासून पूर्वेस १३ किलोमीटर अंतरावरील महाबळेश्वराच्या पायथ्याला व समुद्रसपाटीहून सुमारे ३०० मीटर उंच आहे. गावात सावित्री नदीचे उगमस्थान आहे. सावित्री धबधब्याच्या रूपाने खाली येते. या नदी पात्रात लाल रंगाचा कातळ आहे तसेच लालसर रंगाचे दगड, गोटेही आढळून येतातात. कदाचित या मुळेच गावाला लहूळसे नाव पडले असावे. गावदेवाचे मंदिर दाट जंगलात आहे. येथील दोन शिल्पे शैलीवरून मराठा काळातील असावीत. या गावातून सातारा जिल्हयातील जावळी गावाकडे घाटातून पायी जाणाऱ्या मार्गावर जाताना तंबाखूची घळ, कुसबाची घळ, हनवतबाची घळ नावाच्या नैसर्गिक घळी आहेत. यांचा वापर सातारा जिल्हयातील जावळी गावात जाणारे वाटसरू करतात.

**रान कडसरी (**17° 55'57” N, 73° 28'18” E )

पोलादपूरच्या पूर्वेस असलेल्या या गावात जननी, कुंभळजाई व काळकाई देवतेचे मंदिर आहेत. येथे कोणतेही उल्लेखनीय पुरावशेष आढळले नाहीत.

**देवपूर (**17° 55'57” N, 73° 28'18” E )

पोलादपुरहून दक्षिणेस सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या कोंडजाई या गावदेवी मंदिर परिसरात या भागातील पुरावशेष आढळतात. हे स्थान खरतर कोंढवी किल्ल्याच्या पायथ्याशी असल्यामुळेच या देवीला कोंडजाई म्हटले जात असावे. चोळई नदीच्या तीरावरील मंदिराभोवती अनेक वीरगळ, सतीशिळा तसेच समाधीचे दगड आहेत. येथे आढळणाऱ्या वीरगळांची संख्या ३२ आहे. आयताकृती व एकाच बाजूस कोरलेले वीरगळ, चौकोनी खांब प्रकाराचे व सर्व बाजू शिल्पांकित केलेले वीरगळ व अनेक सतीशिळा दिसतात (छायाचित्र क्रमांक ७७). सतीशिळांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक मृत वीरासोबत त्याच्या किमान दोन स्त्रिया सती गेलेल्या दिसतात. वाघाच्या शिकारीत स्वतःच शिकार झालेल्या वीराचा वीरगळ उभारलेला दिसतो. येथे असलेल्या एका देवतेचे नाव वाघजाई आहे, ही विशेष बाब आहे. वीरगळ शिल्पे बाराव्या शतकापासून ते चौदाव्या शतकापर्यंतची असावीत. या ठिकाणी अनेक

शिल्पे आहेत यात अर्ध पद्मासनातील व मानवी शरीरावर आसनस्थ झालेली चार हातांची स्त्री देवतेची ४० सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद आकाराची चार शिल्पे आहेत.

**फौजदारवाडी (**17° 57'49" N, 73° 28'7" E )

पोलादपूरच्या दक्षिणेस कापडे गावाजवळ या ठिकाणी दहीदुर्ग नावाची टेकडी असून येथे शिवाजी महाराजांनी किल्ला बांधायला घेतला होता असे सांगितले जाते, एक उंच टेकाड सोडल्यास सध्या येथे कोणतेही पुरावशेष आढळले नाहीत. ही एक संरक्षक वसाहत असावी.

**कालवली** (18° 2'23" N, 73° 29'53" E )

पोलादपूरच्या उत्तरेस १३ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात गंगाभागीरथी नद्यांच्या नावाने नैसर्गिक कुंड आहेत. या ठिकाणी राजापूरला जेंव्हा गंगा येते तेंव्हा या ठिकाणीही कुंडात पाणी येते हे पाणी गरम व दुधी रंगाचे असते असे सांगतात. पण या परिसरात पाण्याच्या शोधासाठी सुरुंग लावल्यामुळे हे पाणी येणे बंद झाले.

**माटवन** (18° 4'38" N, 73° 28'52" E )

पोलादपूरच्या ईशान्येस १२ किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या पूर्व तीरावर हे गाव असून या गावात एका मोठ्या तळ्याकाठी वल्लभेश्वराचे शिवमंदिर आहे. या मंदिराच्या परिसरात एकूण ३२ वीरगळ असून यातील १७ वीरगळ चौकोनी खांब प्रकारचे व सुमारे १.३५ मीटर उंचीचे आणि त्याच्या चार ही बाजूस तीन ते चार टप्प्यात शिल्पांकित केले आहेत. याशिवाय येथे आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले नऊ वीरगळ आहेत. बाकीचे वीरगळ भग्नावस्थेत आहेत. यांवर नेहमीची दृश्ये असून गोधन व गावाच्या रक्षणासाठी येथे युद्ध झाले असावेत. या शिवाय पाच सतीशिळा आहेत. याशिवाय येथे कळसाचे नक्षीदार दगड व शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारण्यात येणाऱ्या कोरीव शिळांचे व वास्तू घटकांचे अवशेष आहेत. मंदिराशेजारी भग्न नंदी चार हातांच्या स्त्री देवतेची भग्न प्रतिमा व तेलाच्या घाण्याचे अवशेष आहेत. परिसरातील शेतांमध्ये नांगरटीच्या काळात लाल व काळ्या मृद भांड्यांचे अवशेष सापडतात.

**सवाद** (18° 3'40" N, 73° 28'36" E )

पोलादपूरच्या ईशान्येस १० किलोमीटर अंतरावर सावित्री नदीच्या पूर्व तीराववरील या गावात गावदेवाचे व शिवमंदिर आहे. या ठिकाणी त्रिपुरी पौर्णिमेला फार मोठी जत्रा भरते.

मंदिराबाहेर भग्न शिवलिंग, योनीपीठ, व शुष्कसांधी बांधीव तंत्राने उभारण्याच्या कोरीव शिळांचे व वास्तू घटकांचे अवशेष आहेत. मंदिरासमोर चार आयताकृती व एकाच बाजूस शिल्पांकित केलेले वीरगळ व दोन सतीशिळा आहेत. शैलीवरून ही शिल्पे बाराव्या शतकातील असावीत. नदीपात्रातील कातळावर खोदीव काम केल्याच्या खुणा सापडतात. कदाचित या ठिकाणावरून काढलेल्या शिळांपासून जुन्या शिवमंदिराचे बांधकाम केले असावे. मात्र या खुणा एका प्राचीन राजाच्या रथाच्या चाकाच्या खुणा असल्याची रंजक कथा स्थानिक सांगतात.

**कोंढवि** (17° 55'14” N, 73° 27'30” E )

पोलादपूरच्या दक्षिणेसआठ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावास पूर्वी परगण्याचे स्थान होते. गावामागील समुद्रसपाटीपासून २५० मीटर उंच टेकडीवर कोंढवि नावाचा मराठा काळातील किल्ला आहे. किल्ल्यावर काळभैरी गावदेवाचे मंदिर आहे. हे देवस्थान या परिसरातील आठ गावांचे गावदेव म्हणून मानले जाते. मंदिराजवळ मराठा काळापूर्वी असलेल्या मशिदीचे शिल्पावशेष आढळून येतात (जोशी २०११: ११८-११९). भौगोलिक वैशिष्ट्यामुळे टेहेळणीचे ठिकाण म्हणून वापर होत असलेल्या या ठिकाणास बाराव्या शतकापासून संरक्षक वसाहत अथवा किल्यासारखे स्वरूप आले असावे. येथे शिलाहारकालीन स्तंभाचा तळखडा, खुर कुंभ व कर्णिका युक्त मूर्ती ठेवायचे पीठ आढळते. मंदिरातील शिल्पे मात्र आधुनिक काळातील वाटतात. मंदिराबाहेरील भैरव व इतर भग्न शिल्पांवरून हे अवशेष चौदाव्या शतकातील असावेत. या शिवाय येथे तेल घाण्याचे व चौकटच्या फुलाची नक्षी असलेला शिल्पावशेष, तसेच लाल व काळ्या रंगाची मध्ययुगीन खापरे आढळून येतात.या छोटेखानी किल्ल्याला केलेली तटबंदी आज जरी शिल्लक नसली, तरी येथे सापडणाऱ्या शुष्कसांधी बांधीव पद्धतीच्या ७० सेंटीमीटर लांब व ३० सेंटीमीटर रुंद आकाराच्या कोरीव शिळा पाहायला मिळतात. गावातील तळ्याचीवाडी या ठिकाणी शिवमंदिर असून, येथे मंदिराबाहेर चार वीरगळ व एक सतीशिळा पाहायला मिळते. शिल्पशैलीवरून हे सर्व बाराव्या व तेराव्या शतकातील असावेत. जननी मंदिराजवळ एक शीर तुटलेल्या स्त्रीदेवतेचे दोन हातांचे शिल्प आढळते. देवीने उजव्या हातात दंड व डावा हात मोकळा सोडलेला आहे. अशा प्रकारचे शिल्प अनेक ठिकाणी आढळून येते. हे शिल्प मराठा काळातील असावे. येथील राजाला फार पूर्वी परचक्र आले असता, चिपळूण येथील राजाने मदत केली होती असे मानले जाते. फणसकोंडयेथे मराठा काळातील बाव म्हणजे विहीर आहे.

**महारगुळ (**17° 54'24” N, 73° 27'45” E )

पोलादपूरच्या दक्षिणेस १० किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून २२२ मीटर उंचीवरील, या गावात मल्लिकार्जुन नावाचे शिवमंदिर आहे. जीर्णोद्धार झालेल्या याठिकाणी आधुनिक काळातील शिल्पे आढळून येतात. मात्र मंदिराच्या आत जुनी शिल्पे ही ठेवली आहेत. ही मात्र शिल्प शैलीवरून चौदाव्या ते सतराव्या शतकातील असावीत. या ठिकाणी द्विरंगी बांगड्यांचे तुकडे आढळून आले.

**कोतवाल (**17° 54'6” N, 73° 29'38” E )

पोलादपूरच्या दक्षिणेस हे गाव रायगड व रत्नागिरी जिल्ह्याच्या हद्दीवर आहे. या ठिकाणी गावाच्या दक्षिणेस रत्नागिरी जिल्ह्यातील मध्ययुगीन काळातला प्रसिद्ध असलेला महीपतगड नावाचा किल्ला व मिठखडा नावाचा वैशिष्ट्यपूर्ण डोंगर आहे. या मीठखडा डोंगरावर एक धनगर वस्ती आहे व डोंगराच्या पायथ्याशी आयताकृती मुख असलेली व कातळात कोरलेल्या पाण्याच्या टाक्या आहेत. यांना पांडव टाके असे म्हटले जाते, टाक्यांच्या स्वरूपावरून दहाव्या शतकातील व नंतरच्या काळातील असाव्यात.रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या घाटमार्गावर लक्ष ठेवण्यासाठी निर्माण झालेली ही एक संरक्षक वसाहत असावी. कोतवाल गावातील शेतात पावसाळ्याच्या दिवसात वाहून आलेली आद्य ऐतिहासिक व पूर्व मध्ययुगीन काळातील खापरे सापडतात.

**क्षेत्रपाल (**17° 52'37” N, 73° 33'12” E )

पोलादपूरच्या दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावरील या गावात गावदेवी मंदिरात आधुनिक काळातील शिल्पे आढळून येतात

**कुडपण (**17° 52'37” N, 73° 33'12” E )

पोलादपूरच्या दक्षिणेस हे गाव रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याच्या हद्दीवर आहे. याला शेलारांचे कुडपण असेही म्हणतात. भराडी या स्थानिक गावदेवी मंदिरात महिषासुरमर्दिनी प्रकारची, दोन हातांची व त्रिभंग अवस्थेतील झीज झालेली प्रतिमा आहे. या शिवाय मंदिर परिसरात दोन वीरगळ, एक सतीशिळाआहे. शिल्पशैलीवरून ही शिल्पे बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावीत. गावाच्या मागे समुद्रसपाटीपासून ९६० मीटर उंचीचा कोलदुर्ग व दुर्ग नावाचा डोंगर आहे. येथे सुमारे ९०० मीटर उंचीवर सुमारे सहा मीटर लांब व दीड मीटर रुंद

व दोन मीटर खोल आकाराची कातळात  कोरलेली पाण्याची टाकी आढळली आहे. या टाकीशेजारी एक मीटर लांब व चाळीस सेंटीमीटर रुंद आकाराच्या कोरीव शिळा तटबंदीच्या स्वरुपात रचलेल्या आढळतात. एकंदर स्वरूपावरून हे टाके उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील असावे. या गावातून 'महार खिंड' नावाचा घाटमार्ग खेड तालुक्यातील करंजनी भागात जातो. या मार्गावर काही कोरीव लेणीही असल्याचे सांगतात. या खिंडीवर लक्ष ठेवण्यासाठी या संरक्षक वसाहतीची अथवा दुर्गाची निर्मिती झाली असावी.

**कुडपण बुद्रुक** 17°52'58" N,  73°    32'23" E )

पोलादपूरच्या दक्षिणेस आठ किलोमीटर अंतरावरील, या  गावात कोणतेही पुरावशेष आढळून येत नाहीत. येथून खेड तालुक्यातील वडगाव या गावी पायी चालत जाता येते.

**पैठण (**17° 54'54" N,  73°    28'41" E )

पोलादपूरच्या दक्षिणेकडील या  गावात कुंभाळजाई या स्थानिक गावदेवी मंदिरात आधुनिक काळातील शिल्पे आढळून येतात.

**परसूळे** 17° 54'27" N,  73°    30'9" E )

या गावात गावदेवी मंदिरात आधुनिक काळातील शिल्पे आढळून येतात. या ठिकाणी गावाच्या पूर्वेस कापडा बुद्रुक व दहीदुर्ग गावाच्या मार्गावर जाताना वैराटाचा माळ म्हणून एक ठिकाण आहे. या ठिकाणी कातळात  कोरलेली काही पाण्याची टाकी होती. यांपैकी काही बुजली असून. दोन टाक्या आजही पाहायला मिळतात. यांची निर्मिती उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगात झाली असावी.

**लोहारे** (18° 0'45" N,  73° 27'44" E )

मुंबई गोवा महामार्गावरील सावित्री नदीच्या पश्चिम  तीरावरील हे गाव येथील शिवमंदिरामुळे प्रसिद्ध आहे. मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून. या ठिकाणी असलेल्या अनेक वीरगळापैकी काही वीरगळ व शिल्पे महाराष्ट्र शासनाच्या रत्नागिरी संग्रहालयात नेऊन प्रदर्शित केली आहेत. सध्या या ठिकाणी सात ते आठ भग्न वीरगळ, नंदी  आहेत. येथे मुखलिंग असलेली शिवलिंगेहि आहेत. शैलीवरून यांचा काळ बाराव्या शतकाचा असावा. बौद्धवाडीजवळ गावदेव भैरीमंदिर परिसरात मराठा काळातील दीपमाळ व शिल्पे आहे. याठिकाणी शुष्कसांधी बांधीव मंदिराचा भग्न चौथारही पाहायला मिळतो. याशिवाय येथे एक गद्धेगळ शिल्पही पाहायला

मिळते. हे शिल्प काहीसे वेगळे असून यात गाढव व स्त्री वेगवेगळी दाखविली आहे. शैलीवरून हे अवशेष बाराव्या ते चौदाव्या शतकातील असावेत.

**पार्ले** (18° 2'28" N, 73° 27'49" E )

मुंबई गोवा महामार्गावरील हे गाव आहे. गावदेव मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून येथे आधुनिक काळातील शिल्पे स्थापन केली आहेत. याशिवाय मंदिराबाहेर मराठा काळातील भग्न शिल्पे आहेत.

**मोरसडे** (18° 1'26" N, 73° 33'14" E )

हे गाव पोलादपूरच्या ईशान्येस सुमारे १२ किलोमीटर अंतरावर वसले आहे. गावच्या दिवाळवाडी भागात शिवमंदिराचे अवशेष आहेत. हे मंदिर जुन्या पीठावर उभारले आहे. मंदिराच्या पीठाचा प्रवेशाजवळचा पायरीचा भाग कुंभ व खुर पद्धतीचा पाहायला मिळतो. जवळ तीन टप्प्यातील भग्न वीरगळ व दोन नंदी आहेत. गावदेव कांगोरीमालच्या मंदिरात भैरवाच्या तीन झीज झालेल्या प्रतिमा आहेत. शिल्पशैलीवरून हे अवशेष बाराव्या शतकाच्या पूर्वार्धातील असावेत.

**बोरघर** (18° 1'48" N, 73° 34'53" E )

पोलादपूरच्या ईशान्येस सुमारे १४ किलोमीटर अंतरावर कामाथी नदीच्या काठावर वसले आहे. जननी गावदेवी मंदिराजवळ तीन टप्प्यातील दोन भग्न वीरगळ आहेत. गावात वेताळदेव म्हणून गद्धेगळ सदृश्य भग्न शिळा पुजली जाते.

**चांदले** (18° 1'40" N, 73° 36'8" E )

पोलादपूरच्या ईशान्येस सुमारे १५ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात डोंगरावरील सापाटीस चांदल्याचा मुऱ्हा म्हटले जाते या ठिकाणी पुरावशेष आढळले नाहीत.

**कामथे** (18 ˚ 2' 10" N, 73˚ 34' 18" E )

या गावातून पुणे जिल्ह्यात पायवाट रायरेश्वर पठाराच्या नाखिंदा भागात जाते. रायरेश्वराच्या पश्चिम बाजूस उगम पावणाऱ्या कामाठी नदीच्या काठावर हे गाव आहे. नदीजवळील गावदेव मंदिराजवळ तीन टप्प्यातील एक वीरगळ पाहायला मिळतो. गावातील गावदेवी जननी मंदिरात दोन हातांचे स्त्री शिल्प आहे. शैलीवरून ते मराठा काळातील असावे.

**वडघर** (18 ˚ 2’ 10” N, 73˚ 30’ 14” E )

गावात जननीमाता स्वयंभू तांदळा स्वरुपात पाहायला मिळते. चार हातांची समभंग अवस्थेतील स्थानक पण झीज झालेली पुरुष प्रतिमा आढळते. शैलीवरून हे शिल्प अलीकडच्या काळातील असावे. इतर पुरावशेष आढळले नाहीत.

**सडे** (18 ˚ 2’ 10” N, 73˚ 34’ 16” E )

हे गाव कांगोरी उर्फ मंगळगड या किल्ल्याच्या पायथ्याशी पोलादपूरच्या ईशान्येस सुमारे १४ किलोमीटर अंतरावर वसले आहे. गावच्या विहिरीजवळ चौकोनी खांब प्रकारचा तीन टप्यातील वीरगळ आहे. याशिवाय गावदेवी मंदिराजवळही तीन भग्न वीरगळाचे अवशेष आहेत. या गावात चांदणी चौक म्हणून ओळखले जाणारे एक ठिकाण आहे. येथे ३६ मीटर रुंद, २५ मीटर लांब व १ मीटर उंच आकाराचा दगडी चौथरा आहे. हे पूर्वाभिमुख असलेल्या एका मोठ्या वाड्याच्या पायाचे अवशेष आहेत. दर्शनी भागाच्या दोन्ही बाजूस दोन लहान आकाराचे हत्ती कोरलेले पाहायला मिळतात. मध्यभागी चौक असून यामध्ये अनेक मोऱ्यांची सोय देखील केली आहे. या शिल्पांच्या स्वरूपावरून हे अवशेष बाराव्या शतकातील तर वाड्याचा चौथरा त्या नंतरच्या काळातील असावा. या ठिकाणी ७५ सेंटीमीटर उंच व ३५ सेंटीमीटर रुंद कोरीव शिळा लेखासाठी कोरलेली असावी पण आता यावर लेख आढळून येत नाही. कांगोरी हा किल्ला शिवकाळाच्या पूर्वीपासूनच अस्तित्वात असावा.

**पोलादपूर (**17 °59'6"N, 73° 27'56 "E)

पोलादपूर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण मुंबई-गोवा या मार्गावर असून सावित्री नदीच्या पश्चिम तीरावर आहे. गावात गावदेव काळभैरवचे मंदिर, सिद्धेश्वर नावाचे शिवमंदिर व पोलादजंग वा फौलादजंगचा दर्गा आहे. पोलादपूरचा काळभैरी महाडच्या विरेश्वराचा धाकटा भाऊ मानला जातो, तर विन्हेऱ्याची झोलाईदेवी ही या दोघांची थोरली बहीणी मानली जाते. काळभैरव परिसरात व मंदिरात मराठा काळातील शिल्पे आहेत. मंदिराच्या मागच्या बाजूस शिल्पशैलीनुसार चौदाव्या शतकातील मूर्ती ठेवायचे पीठ आहे. गावात मठआळी येथे शिवाजी महाराजांचे दरबारातील राजकवी परमानंद यांचा राहता वाडा होता आता येथे त्यांची समाधी आहे. पोलादजंगच्या दर्ग्याजवळ काही शिल्पावशेष विखुरले आहेत. यात अर्धवर्तुळाकृती शीर्षभाग असलेले एक ५७ सेंटीमीटर लांब व २७ सेंटीमीटर रुंद कोरीव शिळा आहे. या शिळेवर वरील बाजूस एक दंड दाखविला असून त्याच्यावर अंकुश व त्यास खाली दोन्ही बाजूस जुबकेदार गोंडे लोम्बताना दाखविले आहेत. खालची बाजू लेख लिहिण्यासाठी मोकळी सोडली असून सध्या यावर कोणताही लेख आढळून येत नाही. या शिवाय चारही

बाजूपैकी एका बाजूस साखळी बांधलेला लामण दिवा, दुसऱ्या बाजूस अंकुश शिल्पांकित केलेला असाच एक लघुखांब पाहायला मिळतो. सिद्धेश्वराचे शिवमंदिर त्याच्या बांधणीवरून महाडच्या वीरेश्वर मंदिरास समकालीन असावे (छायाचित्र क्रमांक ५५). गावातील बौद्धवाडी परिसरात एक भग्न गजलक्ष्मीचे शिल्प आढळून येते. पोलादपूर येथील वसाहत पंधराव्या शतकानंतर वाढलेली दिसते.

**सडवली (**17°57'21"N 73°30'16"E)

पोलादपूरच्या नैऋत्य दिशेस ४ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. गावात कोणतेही पुरावशेष नाहीत. गावच्यामागील डोंगरात फुजी आंबवडे गावचा भाग असून येथे दोन्ही गावाच्या सरहद्दीवर बालेकिल्ला नावाचा मराठा काळातील किल्ला होता असे म्हणतात.

# प्रकरण ४

## पुरावशेषांचे स्वरूप व महत्वाचे पुरावशेष

४.१ पुरावशेषांचे स्वरूप

४.२ महत्त्वाचे पुरावशेष

४.३ सर्वेक्षण कार्यात असलेल्या मर्यादा

## ४.१ पुरावशेषांचे स्वरूप

आद्य ऐतिहासिककालखंडातील पुरावशेष म्हणून बौद्धलेणी, कातळात कोरीव पाण्याच्या पोढ्या, शिल्पे, खापरे, शंख व हस्तिदंती बांगड्याचे तुकडे इत्यादिचा वापर करता आला. उत्तर ऐतिहासिक व पूर्व मध्ययुगीन कालखंडातील पुरावशेष म्हणून या काळातील लेणी, कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या, मंदिरे, शिल्पे, वीरगळ, सतीशिळा, बांगड्यांचे तुकडे, मृदभांड्यांची खापरे, इत्यादिचा वापर करता आला.मध्ययुगीन पुरावशेष म्हणून किल्ले, शिल्पे, बांगड्याचे तुकडे, काचेचा लेप दिलेली खापरे, चिनीमातीची भांडी व मृदभांड्यांचे अवशेष इत्यादींचा वापर करता आला.

## ४.२ महत्वाचे पुरावशेष

### लेणी

अभ्यास क्षेत्रातील लेणींचे वर्णन प्रत्येक तालुका विभागात त्या ठिकाणी केले आहे. या विभागात मुख्यतः कुडा-मांदाड व महाड परिसरातील लेणी या इसवीसनाच्या सुरुवातीच्या शतकातील असून, पहिल्या शतकापासून ते सहाव्या शतकापर्यंत यांची निर्मिती सुरु होती असे दिसते. या नंतरच्या कालखंडातही या लेणी वापरात राहिल्या असे दिसते. या लेणींपैकी अनेक लेणींचा तलविन्यास (Ground plan) हा साधारणपणेसमोर प्रांगण, मग मुख्य प्रवेशात जाणाऱ्या भागात पायऱ्यांची योजना, पायऱ्यांच्याकडेला स्तंभ व त्यांस लागून बसायला दगडी बाके, मागे मंडप व या मंडपास मध्यवर्ती ठेवून बाजूस वा लागून इतर खोल्या किंवा गर्भगृह. उदाहरणार्थ महाड लेणे क्रमांक ७, ८ व इतर तर कुडा लेणे क्रमांक ४, ७. या परिसरातील ग्रामीण भागात अशाच प्रकारची काही जुन्या घरांची रचना आजही झालेली व शिल्लक राहिलेली पाहायला मिळते. या भागातील लयन वसाहत निर्मिती अचानकपणे सहाव्या शतकानंतर थांबल्याचे दिसते.साधारणपणे दहाव्या शतकानंतर एक चौरस मीटर क्षेत्र व जेमतेम उभे राहता येईल अशा, एक खोली प्रकारच्या लेणी या भागात आढळतात. ही कातळात कोरीव ठिकाणे शिवमंदिर व गावदेव मंदिर परिसरात आढळून येतात. यांना आज मठ या नावाने ओळखले जाते. घूम, भेकाऱ्याचा कोंड, चांढोरे या ठिकाणी या लेणी आढळल्या आहेत. या नंतर दुर्ग किंवा किल्ल्यांसारख्या संरक्षक वसाहतीवर, कोणत्याही धार्मिक नसलेल्या शुद्ध लौकिक स्वरूप असलेल्या चौकोनी खांब असलेल्या व नसलेल्या तसेच

तलविन्यासाने आधीच्या लेणींपासून भिन्न तलविन्यासाच्या लेणींची निर्मिती झाली. उदाहरणार्थ, किल्ले रायगड, माणगड, कुर्डु उर्फ विश्रामगड, भैरव टेकडी किंवा डुंग या संरक्षित वसाहतीत झालेली लेणींची निर्मिती पूर्व मध्ययुगीन काळात या वसाहतींच्या उपयोगासाठीच झाली असावी.

**कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या**

कातळात कोरीव पाण्याच्या टाक्यांना सुरुवातीच्या बौद्ध आणि ब्राम्हणी लयन स्थापत्यामध्ये पोढी असे म्हटले आहे. अशा पोढी विहाराच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा लयनसमूहात स्वतंत्र जागी आढळतात. नागराजूंनी (Nagaraju,1981:323-324) पाणपोढ्याचे दोन प्रकार पाडले आहेत.

अ) पिण्याचे पाणी साठवण्याची टाकी, पाणिपोढी किंवा पाणपोढी व

ब) आंघोळीचे पाणी साठवण्याची टाकी, न्हाणपोढी.

लेणींच्या सानिध्यात असलेल्या या पाण्याच्या टाक्या लेणीत वास्तव्य करणाऱ्या लोकांची पाण्याची गरज भागविणाऱ्या होत्या. पाणपोढ्याचे पुन्हा दोन प्रकार नागराजूंनी पडले आहेत.
अ) भुपृष्ठावर साधे चौरसाकृती तोंड असलेल्या पाणपोढ्या व

ब) आयताकार प्रवेश भागात चौरसाकृती तोंड असलेल्या पाणपोढ्या.

प्रस्तर लेखीय पुराव्यासह इतर अनेक पुराव्यावरून नागराजूंनी ‘अ‘ प्रकारच्या पाणपोढ्या हीनयानकाळातील म्हणजे इसवीसनपूर्व पहिल्या शतकातील तर ‘ब‘ प्रकार दुसऱ्या शतकात विकसित झालेला असावा असे मानले आहे. असे असले तरी अशा प्रकारच्या पाण्याच्या टाक्या या इसपूर्व पहिल्या शतकापासून ते इसवीसन सहाव्या शतकापर्यंत विकसित झाल्या असाव्यात. अभ्यास क्षेत्रात आढळून आलेल्या ‘अ‘ प्रकारच्या पाण्याच्या पोढ्या किंवा टाक्या कोणत्याही धार्मिक स्थळांशी निगडीत नसून, व्यापारी मार्गालगत आहेत किंवा दुसऱ्या शब्दात अशा स्थळावरून व्यापारीमार्ग जात असावेत असे दिसते.

या दोन्ही प्रकारापेक्षा थोड्या वेगळ्या प्रकारची रचना असलेल्या कोरीव टाक्या नंतरच्या काळात म्हणजे उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन कालखंडात आढळून येतात. यातील पहिला प्रकार म्हणजे डोंगर उतारावर भुपृष्ठाला समांतर आयताकृती मुख व तलविन्यासात कुऱ्हाडीच्या पात्याप्रमाणे मुखाशी अरुंद व कातळात आडव्या रुंदावत खोदलेल्या अशा खांब

विरहित टाक्या, तर दुसरा प्रकार म्हणजे प्रकार म्हणजे आयताकृती मुख व आयताकृती तलविन्यासाच्या असलेल्या, पण चौकोनी आकाराचा खांब असलेल्या कातळात कोरीव पाण्याच्या टाक्या होय. या पैकी पहिला प्रकार म्हणजे खांब विरहित असलेल्या टाक्या, या तुलनेने आधी उपयोगात आल्या असाव्यात, दुसरा प्रकार नंतर निर्माण झाला असावा. दुसऱ्या प्रकारच्या टाक्या उत्तर ऐतिहासिक किंवा पूर्व मध्ययुगीन काळात साधारण उशिराच्या कालखंडातील व्यापारी मार्ग किंवा तत्कालीन दुर्गांवर आढळल्या आहेत.

आजही मार्गा लगत अस्तित्वात असलेली अशी अनेक स्थळे मार्ग रुंदीकरण, विकास वा भूविकसनामुळे नष्ट आहेत. खऱ्या अर्थाने शुद्ध लौकिक कामांसाठी निर्माण झालेल्या या स्थळांना काही ठिकाणी आज धार्मिक संदर्भ मिळाला असून, ही स्थळे 'सातीआसरा' म्हणजे सप्तमातृका या स्थानिक देवतेच्या नावाने पुजली जातात. कदाचित यामुळेच ती टिकून आहेत.

**गध्देगळ**

गध्देगळ हा वैशिष्ट्यपूर्ण शिल्पप्रकार दानलेख म्हणून महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेरदेखील आढळतो. गध्देगळ ही एक आयताकृती दगडावर किमान मीटरभर आकाराची उभी शिळा असते आणि यांवर ब-याचदा देवनागरी भाषेतील लेख कोरलेला असतो काही शिळा लेख रहित असतात. तसेच मानवी आकृती आणि गाढव यांच्या संभोगाचे शिल्प कोरलेले आढळते. दगडाची एक बाजू सपाट करून त्यावर चंद्र-सूर्य, मंगलकलश आणि गदर्भ शापाच्या आकृत्या कोरून, शिलालेखासाठी काही भाग शिल्लक ठेवलेला आढळतो. ब-याचदा गध्देगळ शिळा तीन भागात विभागलेली असते. वरच्या भागात मंगलकलश आणि चंद्र-सूर्य दाखवलेले असतात. मधल्या भागात लेख किंवा गदर्भशिल्प कोरलेले असते किंवा असा भाग मोकळा ठेऊन खाली गदर्भ शापशिल्प कोरलेले असते.

गध्दा म्हणजे गाढव तर गळ म्हणजे दगड होय. गध्देगळ हा दानलेखाचा प्रकार असल्यामुळे एखाद्या व्यक्तीस दिलेले दान हे चंद्र-सूर्य असेपर्यंत टिकून रहावे यासाठी अशा प्रकाराच्या दगडांवर चंद्र-सूर्य कोरलेले आढळून येतात. यावर ब-याचदा झाकण असलेला मंगलकलश पूर्ण आकारात अथवा उठावात कोरलेला पहिल्या भागात आढळून येतो. दुस-या भागात ब-याचदा लेखासाठी मोकळी सोडलेली जागा तर तिस-या भागात ज्या व्यक्तीस उद्देशुन लेख लिहीला आहे अशी मानवी आकृती आणि गाढव यांचा संग झालेला दाखवतात.

यामध्ये गाढवाने त्या व्यक्तीस मागून पकडलेले किंवा समोरून पकडलेले आढळते. अशा प्रकारे दिलेले दान भविष्यामध्ये मोडणा-यास व्यक्तीस अशा भयानक शब्दामध्ये व शिल्पांकित केलेली शाप योजना आढळते. यात दाखवलेली स्त्री ही दान मोडणा-याची आई असल्याचे अनेक लेखांमधून स्पष्ट होते. अशा प्रकारचे लेख दहाव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंतच्या काळातले आढळतात. अभ्यास क्षेत्रात विशेष उल्लेखनीय गद्धेगळ नांदगाव, वेळास आगर, चिरगाव, लोहार माळ, वडपाले वडवली इत्यादी ठिकाणी आढळून आले आहेत.

**वीरगळ**

भारतात सर्वत्र आढळणारे वीरगळ म्हणजे वीराची स्मारक शिळा होय. युद्धात मृत्यूमुखी पडणारी व्यक्ती वीर होते आणि ती स्वर्गात जाते असे मानले जाते. ग्रामरक्षण, गोधनाचे रक्षण यासाठी लढाईत वा युद्धात स्वतःचे प्राण त्यागणाऱ्या व्यक्तीच्या नावे स्मृतीशिळा उभारली जायची या शिळेला वीरगळ असे म्हणतात. वीरासाठी स्मारक शिळा उभारायची पद्धत पाचव्या-सहाव्या शतकात सुरु झाली (ढवळीकर २००४: २४२). या शिळेची रचना विशिष्ट पद्धतीची असते. वीरगळ शिळांवर तीन ते चार टप्पे दाखविलेले असतात. खालच्या पहिल्या टप्प्यात मृत वीर, वरच्या दुसऱ्या टप्प्यात वीराच्या मृत्यूचा कारण प्रसंग व युद्ध प्रसंग, वरच्या तिसऱ्या टप्प्यात त्याचे स्वर्गात स्वागत करणाऱ्या अप्सरा व त्यास पालखीत बसून नेणारे वाहक किंवा यक्ष, या टप्प्याच्या वरील भागात वीर आपल्या इष्ट देवतेची करीत असलेली पूजा दाखविलेली असते. येथे बऱ्याचदा शिव पूजा करताना तर क्वचित गणेश पूजा करताना दिसतो. या परिसरात वीरगळ शिळा या पुढील तीन पद्धतीच्या पाहायला मिळतात.

पहिला प्रकार म्हणजे आयताकृती आकाराच्या शिळेच्या, एकाच बाजूस दोन, तीन व चार टप्प्यात शिल्पांकित केलेल्या, दुसरा प्रकार म्हणजे आयताकृती शिळेवर एकटाच वीर कोणाशीही युद्ध न करता फक्त युद्धाच्या पवित्र्यात दिसतो, तिसरा प्रकार चौकोनी खांब, प्रकारचा चारही बाजू दोन, तीन, चार टप्प्यात शिल्पांकित केलेला अशा पद्धतीचा असतो. वीरगळाचा कालखंड दहाव्या शतकापासून ते पंधराव्या शतका पर्यंतचा असू शकतो. वीरगळ बनविण्याची प्रथा कमी कमी होत मराठा काळापर्यंत बंद झालेली दिसते. अभ्यास क्षेत्रात जवळजवळ प्रत्येक गावात वीरगळ आढळत असले तरी माटवन, देवपूर, वाळण, देगाव, महाड, किंजलोळी, वहूर, वडशेत वावे इत्यादी ठिकाणी विशेष उल्लेखनीय आहेत.

**सतीशिळा**

सती म्हणजे शक्ती होय. मृत पती सोबत चितेवर जिवंतपणी मृत्यू पत्करणाऱ्या स्त्रीस सती म्हटले जाते. अशा स्त्रीसाठी तिच्या पश्चात तिच्या नातलगांकडून तिची स्मृती शिळा उभारली जाते त्याला सतीशिळा म्हणता. या शिळावर एका ठराविक पद्धतीने शिल्पांकन केलेले असते. यात मृत वीरासोबत सती चीतेवर हात उंचावून आशीर्वाद देत बसलेली स्त्री, तर कधी कधी त्याच्या वरच्या टप्प्यात घोड्यावर बसून जाणारी स्त्री दिसते. वरील भागात पती-पत्नी शिव पूजा करताना दिसतात. त्यावर मंगलकलश व चंद्र-सूर्य कोरलेले असतात. मुख्यतः स्त्रीचा कोपरापासून दुमडलेला चुडा भरलेला हात शिल्पांकित असतो. अभ्यास क्षेत्रात देगाव, माटवन, विन्हेरे, भारडोली, कारीवने इत्यादी ठिकाणी उल्लेखनीय सतीशिळा आढळून आल्या.

**गजलक्ष्मी शिल्प**

आयताकृती शिळेवर आसनस्थ असलेल्या दोन किंवा चार हातांच्या लक्ष्मीला तिच्या दोन्ही बाजूस उभे राहून आपल्या सोंडेतील कलशाने अभिषेक करणारे दोन किंवा चार हत्ती दाखवूलेले असतात. देवीच्या हातात धान्याची किंवा लांब देठाची कमळाची फुले पाहायला मिळतात. या शिल्पाला गजलक्ष्मी किवा गजांतलक्ष्मी शिल्प म्हटले जाते. धनधान्याचे, वैभव व संपत्ती, समृद्धीचे प्रतिक म्हणून मानले जाते. या भागात गजलक्ष्मी शिल्प हे इसवीसन पूर्वीपासून पाहायला मिळते, परंतु साधारण दहाव्या शतकानंतर त्यांचा आढळ जास्त प्रमाणात झालेला दिसतो. अभ्यास क्षेत्रात वाळवटी, लाडवली, महाड, तामसोली, दिवे आगर, शेडसई, पाथरशेत, तळेगाव इत्यादी ठिकाणी विशेष उल्लेखनीय गजलक्ष्मी शिल्प आढळून आले.

**गायवासरू शिल्प**

हा एक दानलेखाचाच प्रकार आहे. चौकोनी किंवा आयताकृती शिळेवर चंद्र-सूर्य, मंगलकलश या सोबत गाय आणि तिचे दुध पिणारे वासरू यांचे शिल्प कोरलेले आढळते. उत्तर ऐतिहासिक किंवा पूर्व मध्ययुगीन काळखंडातील सुमारे अकराव्या शतकापासून या शिल्पांचा आढळ होऊ लागतो. अशा शिळा लेखासहित किंवा लेखरहित असतात. या प्रकारचे शिल्प शिलाहार अनंतदेवाचा सन ११९८ मधील वसई लेखात आढळते. गायवासरू हे शिल्प धार्मिक असण्यापेक्षा ज्या भागातते आढळले आहे तो विशिष्ट भाग शेतीसंपन्न, कुरणाचा अथवा जंगल संपत्तीने समृद्ध असल्याचे दाखविणारा आहे. शेती तसेच डोंगरी भागातही अनेक

ठिकाणी हे शिल्प आढळून येते. अभ्यास क्षेत्रात वडघर, तामसोली, भानंग, बोर्ली पंचतन, चिखलप, केल्टे इत्यादी ठिकाणी उल्लेखनीय गायवासरू शिल्प आढळले आहे.

**बांगड्यांचे तुकडे**

*आद्य ऐतिहासिककालखंड*

या कालखंडातील स्तरांत विविध प्रकारचे पुरावशेष खूप प्रमाणात मिळतात. यात मुख्यतः शंखाच्या बांगडयांचे प्रमाण जास्त दिसून येते. या बांगडया विविध आकारातील जाडीच्या असून क्वचित प्रसंगी त्यांवर कोरीव नक्षीकाम दिसून येते. या कालखंडात विविध दगडांचे, काचेचे व मातीचे मणीही खूप प्रमाणात मिळतात. अभ्यास क्षेत्रात फक्त महाड येथे अशा प्रकारच्या बांगड्या आढळल्या आहेत(छायाचित्र क्रमांक ६०).

*उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंड*

या कालखंडातील स्तरांत मिळणा-या पुरावशेषांमध्ये मुख्यतः फक्त काळया रंगात असलेल्या बांगडया खूप प्रमाणात मिळतात. या अपारदर्शक असून कमी जाडीच्या असतात. यांच्या पृष्ठभागावर कोणत्याही प्रकारचे अलंकरण दिसून येत नाही. या बांगडया या कालखंडात मोठया प्रमाणावर मिळतात. अभ्यास क्षेत्रात भालघर, चांभारखिंड, म्हसळा, श्रीवर्धन, खर्डी, उंबार्डी, देवखोल इत्यादी ठिकाणी या प्रकारच्या बांगड्यांचे तुकडे आढळले आहेत.

*मध्ययुगीन कालखंड*

मध्ययुगीन कालखंडातील मिळणा-या पुरावशेषांमध्ये बहुरंगी व द्विरंगी काचेच्या बांगडया जास्त प्रमाणात मिळतात. या प्रकारचे अवशेष महाराष्ट्रातील नेवासे (Sankalia *et al*. 1960), ब्रम्हपुरी-कोल्हापूर (Sankalia and Dikshit 1952) भोकरधन व पंढरपूर (Mate and Dhavalikar 1968-69) या ठिकाणी या कालखंडात दिसून येतात. बहुरंगी काचेच्या बांगडया या अपारदर्शक असून त्या निळया, अबोली, पिवळया व हिरव्या रंगांच्या बारीक पट्टयांचे एकतत्रीकरण करून केलेल्या दिसतात. या रंगाच्या पट्टयांचे वेगवेगळे क्रमही पहावयास मिळतात. या बांगडयांचा पृष्ठभाग मणीसमान टोकांचा असून त्याच्या जाडीत व रूंदीत ब-याच वेळा फरक दिसून येतात. त्यांचा पृष्ठभाग सपाट असून त्यावर कधीकधी अलंकरण केलेले दिसून येते. यात मुख्यतः उभ्या, आडव्या व तिरप्या रेषांचे तर कधी ठिपक्यांचे अलंकरण असते, तर काळया रंगाच्या पृष्ठभागावर पिवळया रंगाचे अलंकरण असते (छायाचित्र क्रमांक ६१).

**खापरे अथवा मृदभांडी (**रेखाचित्र क्रमांक १)

*आद्य ऐतिहासिक काळातील खापरे*

आद्य ऐतिहासिक कालखंडातील मृदभांड्यांचे वर्गीकरण मुख्यतः जाड पोताची लाल रंगाचा मुलामा दिलेली मृदभांडी, काळी अथवा राखाडी रंगाची मृदभांडी, काळी आणि लाल रंगाची मृदभांडी (छायाचित्र क्रमांक ५८,६३), लाल रंगाची चकचकीत मृदभांडी आणि उत्तरेकडील काळी झिलईदार मृदभांडी या वर्गात केले आहे. या कालखंडातील मृदभांड्यांत मुख्यतः जाड पोताची अथवा लाल रंगाचा मुलामा दिलेली भांडी व लाल लेपाची भांडी खूप मोठया प्रमाणात मिळतात. या कालखंडात भांडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेली चिकणमाती नंतरच्या कालखंडातील भांडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेल्या चिकणमातीपेक्षा शुद्ध स्वरूपाची आहे. चांगल्या प्रकारच्या भाजणीमुळे या भांडयांचा गाभा लालसर रंगाचा दिसतो. पृष्ठभागावरील संस्करण व अलंकरण बाकीच्या कालखंडातील भांडयाच्या तुलनेत उत्तम प्रतीचे आहे. या कालखंडातील भांडयांचे आकार नंतरच्या काळातील भांडयांपेक्षा ब-याच प्रमाणात वेगळे आहेत. या कालखंडातील भांडयांची प्रत नंतरच्या काळातील भांडयांपेक्षा खूप चांगली आहे.

*उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडातील खापरे*

या कालखंडातील मृदभांड्यात आद्य ऐतिहासिक काळातील भांडयांचे सातत्य काही आकारांत पहावयास मिळते. या काळात मुख्यतः लाल रंगाच्या लेपाची व काळया रंगाचा लेप दिलेली भांडी जास्त प्रमाणात मिळतात( छायाचित्र क्रमंक ५९). तर काळया अथवा राखाडी रंगाची भांडी त्यापेक्षा कमी प्रमाणात मिळतात व जाड पोताची लाल रंगाची भांडी खूप कमी प्रमाणात सापडतात. ही भांडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेली चिकणमाती मिश्र स्वरूपाची असून त्यात वाळूचे कण मिश्रित केल्याचे दिसून येते. या भांडयांची भाजणी मध्यम प्रकारची असल्याने या भांडयांचा गाभा काळा व तांबडा असलेला दिसून येतो. या कालखंडातील भांडयांवर खूप प्रमाणात कोरीव नक्षीकाम केल्याचे दिसून येते यात खोल व उथळ चरे, आडव्या व उभ्या रेषा, तिरप्या रेषा व काही प्रमाणात भौमितिक नक्षी व साधारणसारखे असलेले दिसून येतात. यात मुख्यतः लंबवर्तुळाकार आकाराची भांडी, कोनयुक्त भांडी, द्रोणाकार भांडी आणि झाकण्या मिळतात. या काळातील भांडयांत वाडगे व थाळया यांचेप्रमाणे अत्यंत कमी आहे. या कालखंडातील भांडयांचे वर्गीकरण लाल रंगाच्या लेपाची भांडी, काळया रंगाच्या

लेपाची भांडी, काही अथवा राखाडी रंगाची भांडी आणि जाडसर पोताची लाल रंगाची भांडी या वर्गात केले आहे.

*मध्ययुगीन कालखंडातील मृदभांडी*

या कालखंडातील मृदभांड्यांमध्ये काळया रंगाचा लेप दिलेली व काळी अथवा राखाडी रंगाच्या भांडयांचे प्रमाण खुप जास्त आहे. ही भांडी अत्यंत साधारण पध्दतीने बनविलेली असून फक्त दैनंदिन उपयुक्ततेसाठी वापरण्यात येणारी असावीत. ही भांडी बनविण्यासाठी वापरण्यात येणारी चिकणमाती खूप जाडया भरडया पोताची असून यांची भाजणीही अतिशय अप्रमाणबध्द आहे. या भांडयांवरील अलंकरणही साधारण पध्दतीचे असून ते फक्त भांडयांच्या विशिष्ट भागावरच (स्कंधावर) दिसून येते. यात कोरीव चरे, भौमितिक नक्षी, तिरप्या रेषा, तिरकस काटकोन व त्रिकोण या स्वरूपात पहावयास मिळते. ही भांडी ठराविकच आकारात मिळत असून ते मुख्यतः कोनयुक्त भांडी (हंडी), साठवणुकीची भांडी, वाडगे, द्रोणाकार भांडी व झाकण्या या स्वरूपात मिळतात. या काळातील मृदभांड्यांची प्रत खालावलेली दिसून येते. या कालखंडातील भांडयांचे वर्गीकरण काळी अथवा राखाडी रंगाची भांडी, तकाकी दिलेली काळी भांडी, जाडयाभरडया पोताची लाल रंगाची भांडी व झिलई दिलेली भांडी या वर्गात केले गेले आहे.मध्ययुगीन कालखंडातील भांडयात उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडातील भांडयांचे काही प्रकार दिसून येतात(छायाचित्र क्रमांक ६२).

*झिलई दिलेली मृदभांडी (Glazed Ware)*

या भांडयांच्या पृष्ठभागावर निळया, तपकिरी व हिरव्या रंगात पानाफुलांची नक्षी काढून त्यावर काचेच्या द्रव्याची झिलई दिलेली असते. ही भांडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेली चिकणमाती शुद्ध स्वरूपाची असून उकृष्ट प्रकारच्या भाजणीमुळे या भांडयांचा गाभा लालसर रंगाचा असतो. ही भांडी मुख्यतः बशी, कप, झाकण्या, वाडगे या आकारात मिळतात( छायाचित्र क्रमांक ६४). सर्वेक्षणात या प्रकारातील भांडयाचे पुरावे कमी प्रमाणात मिळाले आहेत.

**४.३ सर्वेक्षण कार्यात असलेल्या मर्यादा**

रायगड जिल्हयातील अभ्यासक्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम करताना आलेल्या अडचणींमुळे पुरातत्त्वीय स्थळांच्या पृष्ठभागावरील अवशेषांची नोंदणी करण्यावर व विश्लेषणावर काही प्रमाणात मर्यादा आल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळातील वसाहती झालेल्या अनेक ठिकाणी नारळाच्या, सुपारीच्या व आंब्यांच्या बागा यांची लागवड झालेली असल्याने या ठिकाणी पुरावशेष शोधण्यात अडचणी आल्या.

२. कोकणातील एक गाव म्हणजे अनेक वाड्या मिळून बनलेले असते. ही ठिकाणे निरनिराळ्या दुर्गम ठिकाणी असल्याने प्रत्येक वाडीवर जाणे शक्य झालेले नाही. त्यामुळे स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीच्या आधारावरून काही पुरावशेषांची नोंद केली आहे.

३. कोकणात होणाऱ्या प्रचंड पावसामुळे जमिनीवरील पुरावशेषांचे स्तर धुऊन व धुपून जातात, तसेच त्यांची झीज झालेली दिसते. त्यामुळे सांस्कृतिक पुरावशेष नष्ट झाले आहेत. या ठिकाणी फारच स्तरबद्ध अवशेष आढळत नाहीत.

४. पावसामुळे भूस्खलन, दरड कोसळणे यासारख्या गोष्टींमुळेही मूळ ठिकाणे गाडली जातात वा मूर्तीशिल्पे असतील तर त्यांची नव्या जागी स्थापना होते. यामुळे मूळ वसाहतींची स्थान निश्चिती करणे कठीण होते.

५. अभ्यास क्षेत्रातील बहुतेक काही स्थळांवर आद्य ऐतिहासिककिंवा मध्ययुगीन कालखंडापासून सलग आतापर्यंत वस्ती झाल्याने या स्थळांच्या पृष्ठभागावरील पुरावशेष गोळा करण्यात खूप मोठया प्रमाणात मर्यादा आल्या. स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीच्या आधारावरून पुरातत्वीय स्थळांचीव्याप्ती ठरवण्यात आली आहे.

६. काही प्राचीन स्थळांवर सध्या शेती सुरू असल्यामुळे त्याचे स्वरूप व सांस्कृतिक कालक्रम ओळखण्यास अडचणी येतात. तसेच या स्थळांच्या पृष्ठभाग खूप वर्षापासून नांगरला जात असल्याने पुरावशेषांचे मिश्रण होणे स्वाभाविक आहे. यामुळे विविध संस्कृतीच्या स्थान निश्चितीस अडचणी येतात.

७. काही ठिकाणी मंदिरांचा जीर्णोद्धार केल्यामुळे अनेक ठिकाणची भग्नशिल्पे समुद्रात विसर्जन करण्यात आली. त्यामुळे पुरावे नष्ट झाले आहेत. या ठिकाणच्या शिल्पांची स्थानिक लोंकाकडून माहिती घेण्यात आली.

८. पुरामुळे नदीकाठच्या गावांचे स्वरूप बदलले जाते किंवा वसाहती नष्ट होऊन त्यांचे स्थलांतर होते, त्यामुळे बंदरांचे धक्के वा त्यांचे अवशेष दिसून येत नाहीत.

# प्रकरण ५

## प्रकरण पाच - अभ्यास क्षेत्रातील वसाहतींचे स्वरुप

५.१ अभ्यासक्षेत्रातील वसाहतींचे स्वरूप व निर्मितीच्या प्रेरणांचा अभ्यास

५.२ वसाहतींचे वर्गीकरण

५.३ व्यापारी मार्ग

आपल्या भोवतालच्या पर्यावरणाचा मानवाने नेहमीच मोठया कल्पकतेने वापर करून घेतला आहे. तो ज्या परिसरात राहतो त्या वस्तीचा आणि भौगोलिक घटकांचा फारच जवळचा संबंध असतो. काळानुरूप मानवाचा विकास होत गेला यातुन पर्यावरणाशी एकरूप होण्याचा प्रयत्न सुरू झाला, यातूनच मानवी वस्ती निर्माण झाल्या. यामुळेच कोणत्याही प्रदेशातील मानवी वस्ती ही मानव आणि निसर्ग यांच्यातील देवाण-घेवाणीचा आलेख असतो. स्थैर्यातून त्याच्या प्राथमिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गरजा पूर्ण होऊ लागल्या. वस्ती म्हणजे या सर्व गरजांच्या पूर्तीची एक कालसापेक्ष क्षेत्रीय व्यवस्था असते. मानवी वस्तींमध्ये मानव आणि निसर्ग यांच्यातील क्रिया-प्रक्रिया सोबतच मानवी संस्कृतीची विविध अंगे त्या वस्तीत प्रतिबिंबित होत असतात.

मानवाचा धर्म, सामाजिक संस्था, सामाजिक पध्दती यांचे प्रतिबिंब वस्तीत पडलेले असते. या सर्वांमुळे प्रत्येक वस्तीला एक व्यक्तिमत्व प्राप्त होते. हे व्यक्तिमत्व व त्यांचे विविध पैलू यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. वस्तीची आंतररचना, वस्तीचे कार्य, वस्तीचे पर्यावरणाशी व परिसराशी असलेले हेतुनिष्ट अनुबंध यांमुळे वस्तींचे व्यक्तिमत्व ठरत असते. वस्त्यांच्या व्यक्तिमत्वाला व वस्त्यांतील अनुबंधांना स्थलीय पार्श्वभूमी तसेच काळाचे संदर्भ असतात. वस्तीची निर्मिती ही मानवी गरजेतून होते तर वस्तीचा विकास व वस्त्यांतील अनुबंध काळाच्या गरजेनुसार बदलत असतात.काळाच्या संदर्भात वस्त्यांचा विकास होतो.सांस्कृतिक पर्यावरणाच्या विकासामुळे वस्त्यांमधील अनुबंध दृढ होतात. या सर्वाचा परिणाम प्रदेशाच्या भूचित्रावर दिसून येतो.

वसाहत रचना म्हणजे माणसाच्या वसाहतीचे भूपृष्ठावर त्याच्या भौगोलिक पर्यावरण, भौगोलिक स्थितीचे सामाजिक पद्धतीने केलेले नियोजन होय (Chang 1958: 299). ब्रूस ट्रिगरच्या मते वसाहत रचना म्हणजे भूपृष्ठावर मानवाच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्षेत्राचा विस्तार होय (Trigger 1963: 86-101).

**वसाहत रचनेवर परिणाम करणारे घटक**

**पाणी**

वसाहतींच्या रचनेवर मुख्यतः परिणाम करणारा घटक म्हणजे पाणी. नद्या किंवा उपनद्या फक्त पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न करता गाळाची माती, भांडयासाठी लागणारी चिकणमाती व वसाहतींना सुरक्षा वगैरे गोष्टी उपलब्ध करून देतात. या भागातील वसाहती मुख्य नद्या किंवा त्यांच्या उपनद्यांच्या काठावर वसल्या आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे या भागाची प्राथमिक अर्थव्यवस्था ही जरी शेतीतून उत्पादित झालेल्या मालावर निर्धारित असली तरी पूर्वी लोकांची व

व्यापारी मालाची नद्यातून वाहतूक करणे हे ही महत्वाचे कारण होते. मुख्य नद्यांच्या खाडी अंतर्गत भागात समुद्राचे भरतीचे पाणी घुसत असल्याने हे पाणी काही अपवाद वगळता पिण्यायोग्य नाही. अभ्यास क्षेत्रातील अनेक ठिकाणे नैसर्गिक झरे, तळी यांच्या परिसरात आहेत. इथली शेती मुख्यतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धीप्रमाणे विखुरलेल्या छोट्या वाड्यांची रचना असलेल्या आजच्या वसाहती पेक्षा पूर्वीच्या वसाहतींचे स्वरूप फारसे वेगळे नसावे.

**माती**

वसाहत होण्यासाठी उत्तम पिक येणारी जमीन हा महत्वाचा घटक असतो. अभ्यास क्षेत्रात उंच सखलपणा हे या भूभागाचे वैशिष्ट्य आहे. डोंगररांगात उथळ कणीची माती असल्याने ही जमीन शेतीयोग्य नाही. सहाजिकच या भागात वसाहतींची घनता कमी प्रमाणात दिसून येते. परंतु या जंगलयुक्त जमिनीतून इमारती लाकूड व औषधी वनस्पती हे उत्पन मिळते. मुख्य नद्यांच्या मुखाशी व खाडीलगत दलदलीचे प्रदेश व खाजण निर्माण झालेले आहे. नदीकिनारी काहीच ठिकाणी गाळाची सुपीक माती आहे. त्यामुळे शेतीयोग्य जागी पिके घेतली जातात.

**भू-रचना व नैसर्गिक साधन संपत्ती**

मानवी वसाहतींची स्थापना व त्यांच्या वितरण या संबंधी प्रदेशातील भूपृष्ठ रचनेवर अवलंबून असते. भूपृष्ठाचा उंच सखलपणा, उठाव वसाहतींच्या रचनेवर व घनतेवर व विस्तारावर परिणामकारक ठरू शकतो. याशिवाय उत्तम दळण-वळण, राजकीय संस्था, युद्ध, धर्म आणि उपजीविकेचे साधन यावर देखील वसाहतींचे स्थान निश्चित केले जाते.

**वसाहतींचे वर्गीकरण**

प्रांतीय वसाहत रचनेचा अभ्यास करताना प्रादेशिक सर्वेक्षणात वसाहतींच्या भूपृष्ठावर असलेल्या अथवा सापडणाऱ्या पुरावशेषांचा आधार घ्यावा लागतो. या अवशेषांवरून त्या कालखंडातील स्थळांचीव्याप्ती ठरवण्यात मर्यादा येऊ शकतात. जर पुरातत्वीय स्थळ हे द्विसांस्कृतिक अथवा बहुसांस्कृतिक असेल तर या मर्यादा खूप प्रमाणात वाढू शकतात. अभ्यास क्षेत्रात अनेक ठिकाणी आद्य ऐतिहासिक किंवा मध्ययुगीन कालखंडापासून आतापर्यंत सलग लोकवस्ती आहे.

अभ्यास क्षेत्रातील वसाहतींचे वेगवेगळे वर्ग करताना समान गुणधर्म असलेल्या वसाहतींचा एक वर्ग याप्रमाणे या वसाहतींचे वेगवेगळया वर्गात विभाजन केले आहे. यात मुख्यतः समान कालखंडातील

वसाहतींच्याव्याप्ती, स्थान, स्वरूप व कार्यानुसार त्यांची वर्गवारी करण्यात आली आहे. मानवी वसाहतींच्या विकासात वसाहतींचे स्थान व स्थिती या दोन घटकांना खूप महत्त्व आहे. वसाहतींचे स्थान हे ती वसाहत ज्या ठिकाणी स्थापन झाली आहे त्या भूमीशी निगडीत असते, तर स्थिती ही वसाहतींच्या सभोवतालच्या प्रदेशातील प्राकृतिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी निगडीत असते. मानवी वसाहतींचे स्थान हे नैसर्गिक किंवा सांस्कृतिक परिस्थितीच्या विशिष्ट घटकांशी म्हणजे उपलब्ध भूमी, पाणी पुरवठा, नैसर्गिक साधन संपत्ती या घटकांशी संबंधित असते.

**वसाहतींचे साधारण दिसणारे प्रकार**

कोकणातील स्थळांचा आकार व विस्तार यांबाबत निश्चित मत सांगता येत नाही.कोकणातील भूप्रदेश उंच व सखल व टेकड्यांचा बनलेला असल्यामुळे, अनेक गावे डोंगर व टेकड्यांच्या भागात वाड्यांच्या स्वरुपात विखुरलेल्या आहेत. पठारी प्रदेशात असते तशी एकच सलग पसरलेली वस्ती, फक्त दिवे आगरसारखे काही अपवाद वगळता अभ्यास क्षेत्रात झालेली दिसत नाही. वसाहतींचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) लयन वसाहत
२) बंदर वसाहत
३) नगर वसाहत
४) कृषक वसाहत
५) डोंगर वसाहत
६) संरक्षक वसाहत
७) व्यापारी मार्गावरील सामान्य वसाहत.

**लयन वसाहती**

आद्य ऐतिहासिककाळात हा प्रकार अस्तित्वात आलेला दिसतो. सातवाहन काळात मिळालेल्या राजकीय स्थैर्य व वाढलेल्या व्यापारातून बौद्धभिक्खूना उदारपणे मिळालेल्या देणग्यांतून सह्याद्री पर्वताच्या मुख्य व उपरांगांमधून कातळ कोरीव लयन वसाहती अस्तित्वात आल्या. सुरुवातीस फक्त धर्मप्रसार करणाऱ्या भिक्खूच्या वर्षावासासाठी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत असलेल्या लेणींची संख्या वाढून तात्पुरत्या स्वरुपात असलेल्या या वसाहती पुढे कायम स्वरूपाच्या वसाहती बनल्या. या भिक्खुंच्या वास्तव्यासाठी कायम स्वरूपाच्या देणग्यांची सोय केली गेली.कुडा येथील लेणे क्रमांक १४ मध्ये तसेच महाड जवळील गांधारपाले लेणे क्रमांक २८ व कोलगावाच्या लेणीतील शिलालेखात काही सार्थवाह अथवा श्रेष्ठीचे उल्लेख आले आहेत (देव १९८४: १०६). हे श्रेष्ठी काही

स्थानिक तर काही इतर ठिकाणाहून आलेले दिसतात. अशा वसाहती फक्त आद्य ऐतिहासिककाळातच होत्या पुढे यांचा वापर थांबला. तळा तालुक्यातील कुडा व महाड येथील गांधारपाले लयन समूह हे या विभागातील अशा प्रकारच्या वसाहतींचे सर्वात मोठी उदाहरणे म्हणता येतील. तत्कालीन राजकीय व भौगोलिक परिस्थितीमुळे अस्तित्वात आलेल्या, महाड या बंदर नगराचा या समूहाला आश्रय असावा. सहाव्या शतकानंतर येथील परिस्थिती बदललेली दिसते. सहाव्या शतकानंतर परदेशी चाललेलाव्यापार खंडित झाल्यानंतर या वसाहती ओस पडल्या.याच काळात महाड जवळील कोल, कोळोसे, शिवथर या भागात तर माणगाव तालुक्यातील नीळगुण, बामनोलीयेथे या प्रकारच्या वसाहती अस्तित्वात आल्या. याशिवाय सातव्या किंवा आठव्या शतकात वनंतर समूहाने नसलेल्या एक खोली पद्धतीच्यालेणींची निर्मिती अभ्यास क्षेत्रात अगदी बाराव्या शतकापर्यंत होत राहिली.

**नगरवसाहती**

नगर वसाहतींचे प्रशासकीय नगर वसाहत व सामान्य नगर वसाहत असे वर्ग करता आले. खरतर एखाद्या स्थळाला नगराचे स्वरूप येवून महत्त्व मिळाल्यानंतर ते प्रशासकीय दर्जाचे स्थान ठरले असावे. प्रशासकीय स्थाने ही स्थानिक प्रशासनाच्या सोयींसाठी निर्माण झाली होती. प्रशासकीय यंत्रणेच्या दृष्टीकोनातुन काही ठिकाणांना महत्त्व प्राप्त झाल्यामुळे ही ठिकाणे प्रशासकीय केंद्र बनली. प्रशासकीय स्थान बनल्यामुळे त्या भागातील राजकीय व स्थानिक पातळीवरील व्यवहार या ठिकाणाहून चालत असावेत. अशा काही महत्वाच्या स्थानांना नगराचे रूप मिळाले असावे. 'मंदरज विषय' हा त्यांपैकीच एक प्रशासकीय विभाग, अद्यापही या शिलाहारकालीन प्रशासकीय स्थानाची अभ्यासकांना माहिती झाली नव्हती. या स्थानाची ओळख येथे प्रथमच पटविली आहे. पूर्व मध्ययुगीन काळामध्ये विहुळे या माणगाव तालुक्यातील ठिकाणाला शिलाहार काळापूर्वीच महत्त्व येऊ लागल्याचे शिलाहार शासनातून दिसते. यातूनच मग येथे प्रशासकीय सोयीसाठी मूळच्या चिख्खलाड विषयाचे विभाजन करून मंदरज विषयाची म्हणजे आजच्या जिल्ह्यासारख्या विभागाची नवीनच निर्मिती झाली. आजच्या तळा तालुक्यातील वावे मांद्रज या गावाच्या चार किलोमीटर परिसरातील चरई, तळेगाव व पन्हेळी या ठिकाणांवर दहाव्या शतकापासून ते पंधराव्या शतकातील अवशेष सापडतात. या अवशेषांचे वर्णन पुरातत्त्वीय स्थळांच्या वृतांतात आले आहे. त्यामुळे त्याचे येथे वर्णन केलेले नाही. तळाखाडी व म्हसळा खाडी या ठिकाणाहून येणाऱ्याव्यापारी मार्गावर वसले असल्यामुळे या ठिकाणाला लवकरच नगराचे स्वरूप प्राप्त झाले असल्याचे येथील अवशेषांवरून दिसते.

दुसरे प्रशासकीय नगर म्हणजे माणगाव तालुक्यातील उंबार्डी येथील कुर्डु या संरक्षक वसाहतीच्या पायथ्याशी ईशान्य बाजूस आढळून आलेली नगर वसाहत. ही वसाहत व्यापारी मार्गावरआहे. माणगाव तालुक्यातून पुणे या ठिकाणी देशावर जाणाऱ्या लिंगा घाट व देव घाटासारख्या अडचणीच्या व दुर्गम ठिकाणी असली तरीव्यापारी मार्गावर असल्यामुळेच विकसित झाली. दरीच्या किंवा डोंगराच्या उतारावरील टेकाडे पद्धतशीरपणे सपाट करून त्यावर ही वसाहत उभी राहिली. या वसाहतीचा विस्तार, येथे आढळलेल्या लांब व रुंद इमारतींच्या पायांचे अवशेष, सामान्य लोकांची राहती घरे ते मोठे राजवाडे असे स्पष्टपणे ओळखता आले अशी रचना असलेल्या वास्तू, यांवरून ही वसाहत त्या काळात महत्वाची असावी. येथे आढळलेल्या वास्तू, खापरे इत्यादि पुरावशेषावरून ही वसाहत प्रशासकीय स्वरुपाची असावी. काळनदीच्या उगम स्थानी असल्याने पावसाळ्यात वाहणारे ओढे ओलांडण्यासाठी मोठी लाकडे वापरून साकव उभारले जात. पश्चिम किनारपट्टी वरील एकमेव उदाहरण असलेली वैशिष्ट्यपूर्ण रचना असलेली ही वसाहत शिलाहार कालीन वसाहतीचा उत्तम नमुना आहे. इंग्रजी U आकाराच्या दरीच्या मुखाशी सुमारे ८०० मीटर लांबीची दक्षिणोत्तर जाणारी तटबंदी या वसाहतीचे संरक्षण व घाट माथ्यावर जाणारामार्ग अडवणे या दुहेरी हेतूने उभारली आहे. ही वसाहत वा येथील घाटमार्ग ताब्यात घेण्यासाठी येथे घनघोर युद्धे देखील झाली हे दाखविणारे वीरगळांसारखे पुरावशेष विपुल आहेत.

याशिवाय माणगाव तालुक्यात चांढोरे, गोरेगाव, देगाव, मालुस्ते, तळाशेत-इंदापूर, पानोसे येथे नगर वसाहती असाव्यात. म्हसळा तालुक्यात म्हसळा व खामगाव, महाड तालुक्यात महाड, बिरवाडी-खरवली, विन्हेरा, वरंध, वाळण येथे पूर्व मध्ययुगीन काळात नगर वसाहती असाव्यात. या वसाहती शिवाय रोहा तालुक्यात अष्टमी, बिरवाडी, लांढर, पिंगळसई; श्रीवर्धन तालुक्यात चिखलप, श्रीवर्धन येथे; तर मुरूड तालुक्यात मुरूड, नांदगाव व राजपुरी या ठिकाणी मध्यम नगर वसाहती असाव्यात. कदाचित यामुळेच अशा ठिकाणी स्थानिक पातळीवर बाजारपेठ किंवा व्यापारी पेठा असू शकतात. महाड व श्रीवर्धन सारखी बंदरे प्रशासकीय नगर वसाहती बरोबरच व्यापारी पेठ असलेली ठिकाणेही होती. महाडमध्ये सापडलेले पुंरावे व परिसरात असलेल्या लयन वसाहती या पुराव्यांवरून महाड हे आद्य ऐतिहासिक काळापासून ते आजतागायत महत्वाचे नगर राहिल्याचे दिसते.

**बंदर वसाहत**

भौगोलिकदृष्ट्या योग्य अशा समुद्र तसेच खाडी अंतर्गत नदीकाठावर असलेल्या गावांमधून आढळलेल्या पुरावशेष व मृदभांड पुराव्यावरून समुद्र किनारी तसेच नदीकाठच्या स्थळांजवळ बंदरांची अथवा धक्क्यांची निर्मिती झाली असावी. या बंदरांना केंद्रस्थानी ठेवून बंदराच्या सानिध्यात

वसाहती झाल्या. बंदारांसोबत त्यांचाही विकास होत गेला. समुद्र किनारपट्टीवरील बंदरांचे स्थान खाडी मुखाशी अगदी समुद्र किनारी न होता, खाडीमुखातून थोडेसे आत नदीच्या अंतर्गत भागात असणे सुरक्षित व सोयीचे असे.

अभ्यास क्षेत्रातील पूर्व-पश्चिम वाहणा-या कुंडलिका व सावित्री या मुख्यनद्यांचा मार्ग महाड व अष्टमी यासारख्या अंतर्गत बंदराच्या ठिकाणापासून खाडीमुखाकडे खोल व समुद्राला समांतर होत गेला आहे. या भागापासून पुढे या नद्या सुमारे १५० ते २०० मीटर उंचीच्या डोंगराळ भागातून वाहतात. या डोंगराळ भागातून सावित्री व कुंडलिका या मुख्य नद्यांना दक्षिण व उत्तरेकडून वाहत येत मिळणा-या उपनद्यांमुळे त्यांच्या संगमाच्या ठिकाणी काहीशी खोल पात्रे निर्माण झाली आहेत. याठिकाणी बंदरांची वा धक्यांची निर्मिती झालेली दिसते. आजही अनेक ठिकाणी बंदरांची अथवा धक्याची सोय आहे. ज्या ठिकाणी मुख्य नद्यांचे पाणी उपनद्यांच्या अंतर्गत भागात घुसते येथे होडी, नौका अथवा छोटी जहाजे लावण्यासाठी धक्के अथवा छोटी बंदरे निर्माण झाली आहेत.नद्यांच्या काठालगत व खाडीच्या अंतर्गत भागात असल्यानेनदी किनाऱ्याना लागून एक वा अनेक धक्के असावेत. स्थानिक भाषेत यांना पकटी म्हटले जाते. या दृष्टीने नदीकिनारी, पावसाळी येणा-या पुराच्या पाण्यापासून सुरक्षित उंचीवर असणा-या कोलमांडला, बागमांडला, आंबेत, खारगाव, कारीवणे (तालुका श्रीवर्धन), आडी-महाडखाडी, पांगलोळी, संदेरी, तळवडे, कोले इ. (तालुका म्हसळा), शेडसई, सानेगाव-यशवंतखार, न्हावे (तालुका रोहा) यासारख्या गावांची उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन काळात तसेच मध्ययुगीन काळात बंदर म्हणून नियोजनबध्द योजना केली असावी. या ठिकाणाहून व्यापारी उपकेंद्रांच्या व इतर भागात प्रवास करणे सोयीचे होत असावे.या ठिकाणी चढ उतार करणाऱ्या प्रवासी अथवाव्यापाऱ्यांच्या खाण्यापिण्याच्या, वसतीगृहांच्या सोयी व सुविधा पुरवण्यासाठी उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळापूर्वीपासूनच या ठिकाणी अशा सामान्य वसाहती झाल्या असाव्यात. होडी अथवा नौका दुरुस्ती किंवा त्यांची देखभाल करणे, त्यासाठी लागणारा कारागीर, कामगार वर्ग यांच्या वास्तव्यातून अशा वसाहती विकसित होत गेल्या असाव्यात. उदा. कुंडलिका नदीच्या उत्तर तीरावरील यशवंतखार व दक्षिण तीरावरील महाळुंगे तथा महादेवखार व शेडसई ही ठिकाणे.

सावित्री नदीच्या उत्तर तीरावरील बागमांडला, कोलमांडला, आडी महाडखाडी, कोंजर, तोराडी, संदेरी, या ठिकाणी उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन काळात अशा ठिकाणी बंदर अथवा धक्का असल्यामुळे वसाहती झाल्याचे पुरावे मिळतात. याच नदीच्या दक्षिण तीरावर विनोला नदीवर रोहन गावात, अंबा नदीवर शिरगाव याठिकाणी तर अभ्यास क्षेत्राच्या बाहेर पणदेरी व म्हाप्रळ, तालुका

मंडणगड येथेही उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन काळातील अशा प्रकारच्या वसाहती झाल्याचे पुरावे मिळतात (Dhanawade and Joglekar 2012: 179-184). माणगाव काळनदीचे पाणी गोरेगाव या ठिकाणापर्यंत पोहचते. या भागात नागाव, भिंताड, मूर भागात मिळणाऱ्या मृदभांड्याच्या पुराव्यामुळे याठिकाणी आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन काळात वसाहती झाल्याच्या व या वसाहतींसाठी धक्यांच्या सोयी झाल्या. गोरेगावजवळच असलेल्या देगाव सारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मिळालेली वीरगळांची संख्या या बंदरातून चाललेल्या व्यापाराचे रक्षण व त्यावर वर्चस्व मिळवणे यासाठी झालेल्या युद्धाची निदर्शक असावी.

उंबार्डी येथे उगम पावून महाडला दासगाव येथे मिळणाऱ्या काळ किंवा घोड नदीवर नागाव हे छोटे बंदर असावे. इथले सातवाहनकालीन अंतर्गत बंदर म्हणजे घोडेगाव म्हणजे आजचे गोरेगाव होय. याच उल्लेख टॉलेमी याने हिप्पोकुरा असा केला आहे. गोरेगावपासून दोन किलोमीटर अंतरावरील देवळी गावाजवळ एक टेकडी असून येथून अगदी गोरेगावपर्यंत चिंचोळा भूभाग गोरेगावपर्यंत गेलेला दिसतो, याच्या दुतर्फा नदीचे पात्र असल्यामुळे होड्या लावण्यास योग्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे या ठिकाणी आज जरी चिखल व दलदल दिसत असली तरी नागाव आणि मूर या परिसरात येथे आढळणाऱ्या पुरावशेषावरून शिलाहार काळात बंदर असावे. अनंतदेवाच्या सन १०९४ च्या खारेपाटण ताम्रपटात नागपूर या बंदराचा उल्लेख येतो तो कदाचित इथल्या नागावचा असावा (मिराशी १९७४:१३५) मिराशींनी हे नागाव म्हणजे चौलजवळचे नागाव म्हटले आहे, परंतु या ताम्रपटानुसार चौल व नागपूर या दोन्ही ठिकाणी जकातीत सूट दिली आहे. इतक्या जवळ असलेल्या दोन बंदरांचा एकाच ठिकाणी वेगवेगळा उल्लेख केला गेला नसता, त्यामुळे येथे अभिप्रेत असलेले चौलच्या सोबत बरोबरीचा दर्जा मिळालेले नागपूर म्हणजे गोरेगावजवळचे नागाव असावे. या ताम्रपटानुसार नागाव बंदरात व्यापारासाठी येणाऱ्या खारेपाटण येथील काहीव्यापाऱ्यांना जकातीमध्ये सूट दिलेली होती. याशिवाय अरबी घोड्यांची आयात फार होत असे. त्यांचा व्यापार कोकणातील बंदरात जकातीच्या दृष्टीने फार फायद्याचा होत असे.

येथील व्यापारी महत्वाचे गावाचे नाव घोडेगाव, नदीचे घोडनदी, तर परिसरात घोडेघुम सारखी ठिकाणे येथे घोड्यांचा होत असलेला व्यापारावर शिक्का मोर्तब करतात. परिसरातील याच काळातील वीरगळावर आढळून येणारी घोड्यांची शिल्पे या काळात येथे घोड्यांचा व्यापार वाढल्याचे दाखवितात. घोडेगाव उर्फ गोरेगाव चे व्यापारी केंद्र म्हणून असलेले महत्त्व आद्य ऐतिहासिककाळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत कायम राहिलेले दिसते.

**कृषक वसाहती**

कृषक समाज सुपीक जमीन व पाणी पुरवठा करणाऱ्या भागात वसाहती करतात. अभ्यास क्षेत्रातील फार थोडी जमीन शेतीयोग्य असली तरी रायगड जिल्ह्यात बहुतांश लोक शेती व शेतीशी निगडीत व्यवसायावर अवलंबून होते व आज काही प्रमाणात आहेत. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असली तरी शेती हा प्राथमिक व्यवसाय अभ्यास क्षेत्रातील रोहा आणि माणगाव तालुका सोडल्यास इतर भागात डोंगर व दऱ्यांचा उंच सखल प्रदेश असल्यामुळे फार कमी ठिकाणी होतो. अंबा आणि कुंडलिका नद्यांच्या खोऱ्यात शेती व्यवसाय व लोकसंख्या केंद्रित झाली आहे. सावित्री नदी व तिची उपनदी काळ या त्यांच्या उगमापासून निम्मे अंतर डोंगररांगांमधून वाहतात. सावित्री नदीचे खोरे राजेवाडी या ठिकाणापासून थोडे रुंद असल्यामुळे येथे दोन्ही तीरांवरील सुपीक जमीन लागवडीखाली आहे. तसेच महाड आणि सभोवतालची जमीन मोठ्या प्रमाणावर शेती खाली आहे. महाडच्या पुढे दासगावापासून पश्चिमेला नदी डोंगराळ प्रदेशातून वाहते, त्यामुळे फारच थोडी जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. डोंगर पायथ्याशी व वाहणाऱ्या नद्यांच्या शिल्लक भागात शेती केली जाते. अनेक ठिकाणी शेत जमिनीच्याकडेला खेडी वसली आहेत. पूर्वीही हे चित्र फारसे वेगळे नसावे. कोकणातील नद्यांना पावसाळयात येणारे पूर लक्षात घेता नदीकिना-या वरील वसाहती या उंच ठिकाणी म्हणजे पुरपातळीपासून सुरक्षित उंचीवर झालेल्या दिसतात.

अभ्यास क्षेत्रातील शेतीसाठी उपयुक्त असलेल्या ठिकाणी आद्य ऐतिहासिकते मध्ययुगीन कालखंडात शेती झाली असावी. आद्य ऐतिहासिककाळातील लयन वसाहतीमध्ये शेतकरी व त्यांनी लेणींना दिलेल्या दानाची अनेक अभिलेखांमधून उदाहरणे आली आहेत. कुड्याच्या लेणी क्रमांक ६ मध्ये एका शाक्य भिखूने दिवा लावण्यासाठी चेन्दिनी नावाच्या एका शेताचे दान केले (Luders 1909-10: 110). तसेच महाड येथील पाले लेणे क्रमांक २७ मधील शिलालेखात वादसिरीया या महिलेने लेणी समोरील शेतातून येणाऱ्या उत्पन्नाचे दान अक्षयनिवी म्हणून दिल्याची नोंद येते (Luders 1909-10:114). गांधारपाले लेणीं समोरील हा भाग आजही शेतीसंपन्न आहे. शेतीतून येणारे जादा उत्पादन हे विक्रीसाठी, व्यापारासाठी वापरले जात असावे. सातव्या शतकापासून परदेशी होणाराव्यापार बंद पडल्यामुळे उत्तर ऐतिहासिक व पूर्व मध्ययुगीन काळातील अर्थव्यवस्थाहि शेतीवरच अवलंबून असावी. अभ्यास क्षेत्रात अनेक पुरातत्त्वीय ठिकाणी गद्धेगळ, गायवासरू सारखी शिल्पे मिळाली आहेत. ही ठिकाणे त्या काळात शेतमाल उत्पादन करणारी असावीत असे सूचित करणारी आहेत. ज्या ठिकाणी मिळाली तो प्रदेश शेतीचा वा कुरणांचा असावा. मिराशी यांनी गाय हे शेतीचे प्रतिक तर तिचे दुध पिणारे वासरू हे उत्पादकाचे प्रतिक असून तर दुध हे उत्पादनाचे प्रतिक

मानले आहे. असे दिसते की उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात जमिनी लागवडीखाली येण्यासाठी सुपीक जमिनीचे दान विद्वान लोक, सरदार यांसारख्या लोकांना मोठ्या प्रमाणावर दिले गेले. या जमिनी कसण्यासाठी त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर शेतकरी लोकांना येथे आणून नवीन वसाहती निर्माण झाल्या असाव्यात.

शेती व्यतिरिक्त बागायती शेती नारळी पोफळीच्या बागांच्या रूपाने झालेली पाहायला मिळते. छित्तराजाच्या सन १०२४ मधील भोईघर ताम्रपटाचा उद्देश कोलपल्लिका म्हणजे मुरूड तालुक्यातील कोलमांडला गावाच्या आरामातील म्हणजे बागांमधील नारळी पोफळी च्या वृक्षासंबंधी कर व्यवस्था लावून देण्याचा होता (मिराशी १९७४: ३३७) या शिवाय अनेक ताम्रपटातून भूमीदानाचे यासंबधीचे उल्लेख येतात. मध्ययुगीन काळात बलुतेदारी पद्धती ही बदललेल्या शेतीप्रधान ग्रामव्यवस्थेचाच एक भाग होती. आद्य ऐतिहासिककाळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत कृषक वसाहती सातत्याने झालेल्या दिसतात. या काळात शेतीशी निगडीत तेल निर्मिती हा एक महत्वाचा व्यवसाय दिसतो. अभ्यास क्षेत्रातील बहुतेक पुरातत्त्वीय स्थळांवर तेल घाण्याचे अवशेष सापडले आहेत. या भागात विविध प्रकारच्या तेल बियांचे उत्पादन होत असावे. यास शिलाहार व समकालीन राजघराण्यांच्या शासनपत्रातून उपलोब्धक पुरावा मिळतो. शिलाहार राजा छित्तराज याच्या सन १०३४ चा चिंचणी ताम्रपट, यादव नरेश सिंघणचा सन ११०६ चा पाटण ताम्रपट यांमधून तेलघाण्याचे उल्लेख आले आहेत. या सर्व तेलघाण्याना मंदिरामध्ये दिवे लावण्यासाठी व मंदिरातील इतर कामासाठी ठराविक मापाचे तेल कर म्हणून द्यावे लागत होते. दक्षिण शिलाहार नरेश रट्टराजच्या सन १००८ च्या खारेपाटण ताम्रपटात तेली कुटुंबाचा उल्लेख आला आहे. माणगाव तालुक्यातील एका गावाचे नाव तिलोरे आहे हे अर्थपूर्ण आहे.

**डोंगर वसाहत**

अभ्यास क्षेत्रातील अंतर्गत खोलवर डोंगर व टेकड्यांच्या भागात वरकस जमिनीवर झालेल्या वसाहती, कदाचित जंगल संपत्तीचा वापर करण्याच्या हेतूने वसलेल्या असाव्यात. जंगलयुक्त जमिनीतून इमारती लाकूड व औषधी वनस्पती हे उत्पन मिळते. उदा.म्हसाळा तालुक्यातील चीरगाव, घूम, करंजे, ताम्हाणे-करंबे, गायरोणे, नळेफोडी-माणगाव, महाड मधील भेलोशी, तळा मधील मलूक, कुम्बेत, श्रीवर्धन मधील आतखोल, मुरूड मधील महालोर सारखी ठिकाणे करंज, ताड, आंबा, कुसुम यांसारख्या वन्य वृक्षापासून मिळणाऱ्या उत्पनावर जगणारी असावीत.

**संरक्षक वसाहती**

दुर्ग, किल्ले, गड अथवा गढ अशा विविध नावानी संरक्षक वसाहती आद्य ऐतिहासिक कालखंडापासून ते मध्ययुगीन कालखंडापर्यंत सातत्याने झालेल्या आढळतात. अभ्यास क्षेत्रात गिरिदुर्ग, जलदुर्ग व स्थलदुर्ग संरक्षित वसाहती झाल्या. या संरक्षित वसाहतींचा कालखंड ठरविण्यासाठी या वसाहतीवर असलेल्या पुरातत्त्वीय वास्तू व शिल्पे यांचा अभ्यासावरून या वसाहतींचा ढोबळमानाने कालखंड ठरविण्यात आला आहे. खालील तालिकेवरून हे दाखविले आहे.

| तालुका | आद्य ऐतिहासिक | उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन | मध्ययुगीन | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| महाड | कावळ्या | चांभारगड, मंगळगड उर्फ कांगोरी, रायगड, सोनगड,लिंगाणा जन्नीचा दुर्ग व पांडवदरा | महाडचा कोट पाचाडचा कोट<br>दौलतगड<br>दासगाव | ११ |
| पोलादपूर | मीठखडा डोंगर | चंद्रगड उर्फ ढवळगड, कोंढवि, कोलदुर्ग | | २ |
| माणगाव | कुर्डु किल्ला | विश्रामगड, मानगड, पन्हाळघर, किल्ला,निकडांग, भैरीचा दुरुग,भांदरे,खंडोबाची टेकडी, मल्लिकार्जुनची टेकडी | विश्रामगडमानगडपन्हाळ घर | ९ |
| मुरूड | | | सामराजगड<br>जंजिरा<br>पद्मदुर्ग<br>कोरलईचा किल्ला | ४ |
| म्हसळा | | अगीनदुरुंग-संदेरी, देवघर, 'अमृतेश्वर टेकडी' | | १ |
| रोहा | | बिरवाडीचा किल्ला,घोसाळगड,अवचितगड, सुरगड. | बिरवाडीचा किल्ला<br>घोसळगड<br>अवचितगड<br>सुरगड | ४ |
| तळा | | तळगड | तळगड | १ |
| श्रीवर्धन | जाखमाता डुंग | जाखमाताचा डुंग | मदगड | २ |
| एकूण | ३ | २५ | ८ | ३४ |

या तालिकेवरून लक्षात येते की अनेक संरक्षित वसाहतींची निर्मिती उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन कालखंडात झालेली आहे. या वसाहतींचे स्थान पहिले की त्या व्यापारी मार्गावर वसल्या गेल्या आहेत हे लक्षात येते. व्यापारी मार्गाचे संरक्षण करण्यासाठी त्यांची निर्मिती झाली. इतर डोंगर रांगेपासून वेगळा झालेला आणि फार उंच नसलेल्या टेकड्यांची निवड या संरक्षक वसाहतीसाठी केली गेली. सुरवातीस टेहळणीचे नाके म्हणून त्यांचा उपयोग होत असावा. आद्य ऐतिहासिक काळात निर्माण झालेल्या वसाहतींची संख्या कमी आहे. उत्तरऐतिहासिक काळात अनेक वसाहती निर्माण झालेल्या दिसतात. मध्ययुगीन काळात या वसाहतींच्या संखेत वाढ झालेली दिसते. उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळात उदयाला आलेल्या वसाहती वापरात असलेल्या वसाहती नंतरच्या काळातही म्हणजे मध्ययुगीन काळातही वापरात राहिल्या, परंतु आकाराने व विस्ताराने फार मोठे नसलेले दुर्ग पुढे मध्ययुगीन काळातील बदलत्या युद्ध पद्धतीला तोंड देण्यास योग्य न ठरल्यामुळे उपयोगशून्य ठरले. फक्त टेहेळणीसाठी उपयुक्त असलेले दुर्ग काळाच्या विस्मृतीत गेले. त्यामुळे अशा दुर्ग अथवा किल्ल्यांचे मध्ययुगात महत्त्व कमी झाले. मोक्याच्या ठिकाणी असलेले आकाराने मोठे व मध्ययुगीन तोफा, बंदुका, दारुगोळा यांसारख्या शास्त्रांना तोंड देऊ शकतील अशा किल्ल्यावर भक्कम तटबंदी उभारली गेली, या ठिकाणच्या संरक्षक वसाहती अधिक विकसित झाल्या.

**डुंग उर्फ दुर्ग वसाहती**

अभ्यास क्षेत्रात गिरीदुर्ग प्रकारच्या वसाहती सर्व तालुक्यांत आढळल्या असून, यांपैकी महाड तालुक्यातील चांभारगड उर्फ महेंद्रगड, मंगळगड उर्फ कांगोरी, रायगड, कावळा, सोनगड, लिंगाणा, माणगाव तालुक्यातील विश्रामगड उर्फ कुर्डु, माणगड, पन्हाळघर चा किल्ला, रोहा तालुक्यातील बिरवाडीचा किल्ला, घोसाळगड, अवचित गड, सुरगड, पोलादपूर तालुक्यातील कोंढवि, चंद्रगड उर्फ ढवळगड आणि तळा तालुक्यातील तळागड या वसाहती उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन कालखंडात निर्माण होऊन, मध्ययुगीन काळातही वापरात राहिल्या. याशिवाय महाड तालुक्यातील पाचाडचा कोट, दौलतगड ; दासगावचा किल्ला, श्रीवर्धन तालुक्यातील मदगड, मुरूड तालुक्यातील सामराजगड, जंजिरा, पद्मदुर्ग, कोरलई चा किल्ला हे किल्ले मध्ययुगीन काळात निर्माण झाले व ते आधुनिक काळातहि वापरात राहिले.

उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीनकाळात अनेक संरक्षक वसाहती निर्माण होऊन कमी विस्तार, उंची, आकार यामुळे किंवा मध्ययुगातील बदलत्या युद्धनीतीला साजेसे नसल्यामुळे हे किल्ले मध्ययुगात विस्मृतीत गेले वा कदाचित अजिबात वापरात आले नाहीत. मध्ययुगात वसाहती न झालेले म्हसळा तालुक्यातील आगीनदुरुंग अथवा दुर्ग, महाड तालुक्यातील वाघोली गावातील पांडवकडा, तळईजवळचा जननीचा दुर्ग, माणगाव तालुक्यातील पोटनेर गावातील निकडांग टेकडी, भांदरे येथील डुंग, भिनाड येथील भैरवडुंग तसेच रोहा तालुक्यातील तिसे गावाजावळचा जननीचा दुर्ग, तिलोरे येथील खंडोबाचा दुरुंग या संरक्षक वसाहती अथवा दुर्ग पुढे वरील कारणामुळे विस्मृतीत गेले. त्यांना पुढे मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे लढाऊ स्वरूप प्राप्त झाले नाही.

या किल्ल्यात कुर्डु उर्फ विश्रामगड ची गोष्ट वेगळी आहे. यातील सध्या फक्त किल्ला म्हणून असलेला भागच मध्ययुगात वापरात आला, मात्र उत्तर ऐतिहासिक वा पूर्वामध्ययुगीन काळात या दुर्गाच्या संरक्षणाखाली जी नगर वसाहत निर्माण झाली होती, तिथे दरडी कोसळल्या मुळे हा भाग वसाहत म्हणून वापरत न येता विस्मृतीत गेला.

नदीला समांतर अगदी खाडीमुखापासून ते घाटमाथ्यावर जाणाऱ्या व्यापारी मार्गाचे व अंतर्गत बंदरांचे, व्यापारी व वसाहतींचे संरक्षण व लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्या सानिध्यात असलेले डोंगर व टेकड्याची टेहेळणीकरता त्यावर पाण्याच्या टाक्या व इतर बांधकामे करून दुर्ग म्हणून वसाहत निर्मिती या काळात हे झालेली दिसते. संदेरी, तालुका म्हसळा जवळील अगीनदुरुग हे त्याचे मोठे उदाहरण मानावे लागेल. संदेरी गावाच्यासमोर सावित्री नदीच्या पलीकडच्या तीरावर पणदेरी (तालुका मंडणगड, जिल्हा रत्नागिरी) या गावात नुकत्याच सापडलेल्या लेणी (Dhanawade and Joglekar 2011-2012) या नदीला समांतर जाणाऱ्या मार्गाचे उत्तर ऐतिहासिक वा पूर्व मध्ययुगीन व्यापारी महत्त्व अधोरेखित करतात.

**सामान्य वसाहती**

वरील वसाहती शिवाय सामन्य वसाहती उपरोल्लेखित वसाहतींच्या दरम्यान झालेल्या आढळतात. या वसाहतीव्यापारी मार्गावरच आहेत. या वसाहतींनी कदाचित या इतर केंद्रांप्रमाणे वाटसरू, व्यापारी वर्गास काही प्रमाणात विविध प्रकारच्या सोयी पुरवणे यांसारखी कामे केली असावीत. अशी उदाहरणे म्हणजे म्हसळा तालुक्यातील कणघर, देहेन, माणगावातील खरवली, पानसई सारखी गावे होत.

**व्यापारी मार्ग**

इसवीसनाच्या सुरुवातीच्या काळात रोमन साम्राज्याशी वाढलेला व्यापार व राजकीय स्थैर्य यामुळे अभ्यास क्षेत्रात अनेक स्थळांना भरभराटीचे दिवस आले. या स्थळांना जोडण्यासाठी नवीन मार्गाची निर्मिती होऊ लागली. अभ्यास क्षेत्रातून पठारी भागातील देशावर जाण्यासाठी सह्याद्री रांगेत दुर्गम ठिकाणी असलेल्या खिंडी घाटावर जाणारे मार्ग शेवते, गोप्या घाटासारखे दुर्गम असलेले मार्ग देखील वाहतुकीसाठी नेटके करण्यात येऊन देशावर जाणारा मार्ग सुरळीत करण्यात आलाअसल्याचे दिसते. नदीचे पाणी खारे असल्यामुळे नदी काठावर पिण्याच्या पाण्याची सोय केली असावी. या व्यापारी मार्गलगत ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आल्याचेही दिसते. सारख्याच आढळलेल्या पुरातत्त्वीय व सांस्कृतिक अवशेषावरून याठिकाणी आद्य ऐतिहासिक काळात व्यापाऱ्यांना वाहतूक प्रवासाठी नदी पात्रालगत जाणारे हे मार्ग बनविण्यात आले असावे असा निष्कर्ष काढता येतो. सावित्री नदीच्या काठावर दोन्ही असे पुरावे सापडतात. दर उत्तेजन देण्याचे काम झाले असा निष्कर्ष काढता येतो. या मार्गांचा वेध घेता यापैकी बरेच मार्ग आजच्या वर्तमान मार्गांना समांतर वा आजही उपयोगात येणारे आहेत. उदाहरणार्थ सावित्रीच्या दक्षिण काठा लगत खेटून जाणारा मार्ग आजही म्हाप्रळ-पंढरपूर (जिल्हा सोलापूर) या नावाने आजही वाहता आहे. तसेच अभ्यास क्षेत्रातून दुसऱ्या जिल्ह्यात प्रवेश करणारे मार्ग खिंडीतून जात होते. असे दिसते कि आजचा मुंबई-गोवा महामार्ग हा पूर्वीचाच प्राचीन मार्ग असावा. पूर्वीच्या या मार्गाला समांतर किंवा तोच असलेला मार्ग नागोठणे ते दासगाव या प्रवासात गोरेगाव नजीक तळेगाव व नागोठणे नजीक सुकेळी खिंड पार करीत असे व पुढे महाड या अंतर्गत बंदरावरून नागेश्वरी नदीच्या काठाने विन्हेरे येथे मल्लिकार्जुन डोंगराची तुळशी खिंड ओलांडून रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश करी.

अभ्यास क्षेत्रात मुख्य नद्या व उपनद्या यांच्या खोऱ्यात आढळून आलेले मार्ग पुढील प्रमाणे आहेत.

**अ) सावित्री नदी विभाग**

पुढील मार्गांपैकी सावित्री नदीच्या दक्षिण काठावरील म्हाप्रळ या रत्नागिरी जिल्ह्यातील गावावरून सुरु होणारा व सोलापूर जिल्हातील पंढरपूर किंवा तेर (तगर) या ठिकाणी जाणारा मुख्य मार्ग असावा.

१. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-कोल-नडगाव-काळीज-वरंध-पारमाची-कावळ्या-उंबर्डी-शिरवळ-पंढरपुर.

२. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-कोल- नडगाव- काळीज-वाकी-शेवते - मढेघाट.

३. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-कोल- नडगाव- काळीज-वाकी-रानवडी-कसबे शिवथर - गोप्याघाट.

४. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-कोल- नडगाव-काळीज-बारसगाव-तळीये-चिकण्याघाट-पाथरटाके (पुणे जिल्हा).

५. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-कोल-कुर्ला-विन्हेरा-मल्लीकार्जुन डोंगर-तुळशीखिंड (तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी)

६. म्हाप्रळ-रोहन-मुठवली-रावढळ-विन्हेरे-मल्लीकार्जुन डोंगर-तुळशीखिंड-(खेड, जिल्हा रत्नागिरी)

७. म्हाप्रळ-रोहन-तुडील- खुटील (तालुका मंडणगड, जिल्हा रत्नागिरी)

७. म्हाप्रळ-दाभोळ-देवळी-नागाव-गोरेगाव-निजामपूर-धमनी-उंबर्डी-कुंभ (जिल्हा पुणे)

८. अंतर्गत मार्ग- महाड-मोहोप्रे-आचलोळी-नाते-कोळोसे-संदोशी-कोकणदिवा (घोळ, जिल्हा पुणे).

**कुंडलिका नदी विभाग**

१. खाजणी-वावे दिवाळी-पानस्पे . निजामपूर-कडपे-जिता लिंगाघाट- धामणवहाळ

२. खाजणी-कारीवणे-लांढर-अष्टमी

३. नागोठणे-पाटणसई-सुकेळी खिंड-पुई-ऐनवहाळ-तामसोली-पाली- ठाणाले-वाघजाई घाट (पुणे जिल्हा)

४. चौल-चिंचोटी-अष्टमी-चिंचाळी तर्फे आतोणे-गोमाशी-पाली खडसांबळा (पुणे जिल्हा)

५. कोरलई -कोरलई-साळाव-शेडसई-न्हावे-अष्टमी-बिरवाडी- शेडसाई-कोलाड-पाथरशेत-जामगाव-विळा-ताम्हिणी-मुळशी .

६.श्रीवर्धन-भार्डोली-मेघरे-मामवली-नेवरूळ-म्हसळा-खांबगाव-मढेगाव-नांदवी-गोरेगाव-टोळ बुद्रुक-नागाव.

**म्हसळा विभाग**

म्हसळा-देवघर-चांढोरे-तळेगाव-तळा- इंदापूर.

म्हसळा-देवघर-चांढोरे-माणगाव-निजामपूर-जिता.

**दक्षिणोत्तर जाणारा मार्ग**

अभ्यास क्षेत्रात दक्षिणोत्तर जाणारा आजच्या मुंबई - गोवा महामार्गाला समांतर असलेला मोठ्या पल्ल्याचा एक मार्ग अस्तित्वात होता. हा मार्ग कदाचित सर्व अंतर्गत व्यापारी केंद्रे व बंदरांना जोडणारा असावा.

महाड-दासगाव-वीर-खांडपाले-तळेगाव-रातवड-तीसे-मढाली- खांबगाव-सुकेळी खिंड-नागोठणे.

# प्रकरण ६
# अनुमाने व निष्कर्ष

कोकणातील रायगड जिल्हा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा असूनही चौल मधील संशोधन वगळता या प्रदेशाच्या पुरातत्त्वीय पार्श्वभूमीची फारशी सखोल मांडणी झाली नव्हती. वेळ आणि संसाधने या मर्यादेत राहून संशोधन करणे क्रमप्राप्त असल्याने या प्रबंधापुरते रायगड जिल्हयाच्या दक्षिण भागावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. तथापि या भागाचा सखोल अभ्यास करून त्यामधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसते की प्रस्तुत प्रबंधात नोंदविलेले निष्कर्ष या प्रदेशासाठी प्रातिनिधिक मानता येतील. या संशोधनादरम्यान केलेला क्षेत्रीय अभ्यास, पुरातत्त्वीय निरीक्षणे व वसाहत रचनेचा आकृतीबंध या संबधीच्या निष्कर्षाची चर्चा खालीलप्रमाणे आहे.

या संशोधनासाठी आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडांमधील पुरातत्त्वीय अवशेष यांची तपशीलवार पाहणी करण्याचे योजिले होते. या उद्दिष्टाला अनुसरून वापरलेल्या संशोधन पध्दतीनुसार रायगड जिल्हयातील मुरूड, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड व पोलादपूर तालुक्यांत मिळून एकूण ९२५ वसाहतींचा अभ्यास केला आहे. वर उल्लेखलेल्या आठही तालुक्यांतील प्रत्येक गावात जाऊन सर्व प्रकारच्या पुरातत्त्वीय अवशेषांची नोंदणी केली आहे. तसेच भुपृष्ठावर व पुरातत्त्वीय निक्षेपांमध्ये मिळणा-या मृदभांडयांच्या तौलनिक अभ्यासावरून व इतर उपलब्ध प्रकाशित लेख, नाणी, शिलालेख आणि मंदिरे वगैरे पुराव्यांवरून असे दिसते की अभ्यास क्षेत्रामध्ये अनेक ठिकाणी आद्य ऐतिहासिक कालखंडापासून मध्ययुगीन कालखंडापर्यंत काही ठिकाणी आजतागायत सातत्याने वसाहत अस्तित्वात होती. आद्य ऐतिहासिक कालखंडात ३८ स्थळांवर, उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडात ३०८ आणि मध्ययुगीन कालखंडात ५६६ स्थळांवर वस्ती झाल्याचे पुरावे मिळाले. या प्रदेशातील पुरातत्त्वीय स्थळांवर प्रचंड पाऊस, भूस्खलन, पूर यांसारख्या नैसर्गिक घटकांचा विपरीत परिणाम येथील पुरातत्त्वीय अवशेषांवर झालेला आहे. पावसामुळे वसाहतींची धूप होऊन वसाहतींचा नाश झालेला दिसतो. तसेच या भागामध्ये बहुसंख्य ठिकाणी नारळी, पोफळीच्या बागायती व शेती किंवा इतर वापरांसाठी पुरातत्त्वीय

स्थळांचा उपयोग स्थानिक लोक करत असल्याने पुरातत्त्वीय स्थळांची मोठया प्रमाणत नासधूस झाली आहे. अनेकदा पुरातत्त्वीय स्थळाची ओळख पटणेही अवघड होते. तरी देखील अभ्यास क्षेत्रात अद्यापही काही पुरातत्त्वीय स्थळे शाबूत आहेत.  उदाहरणार्थ उंबार्डी, तळेगाव यांसारखी ठिकाणे सुस्थितीत आहेत.

अभ्यास क्षेत्रातील वसाहतींचा कालानुक्रम ठरविण्यासाठी वास्तू,  लेणी, मंदिरे,  मूर्ती, शिल्पे या महत्वाच्या पुरावशेषांसोबत बांगड्या व मृदभांड्यांचा पुरावा प्राथमिक मानला आहे. बहुसंख्य पुरातत्त्वीय स्थळांवर पावसाळयामध्ये वाहून आलेली, नांगरटीच्या काळात, इमारतीसाठी खणलेल्या खड्ड्यांच्या निक्षेपांमध्ये विविध प्रकारच्या मृदभांड्यांचे अवशेष मिळाले आहेत. तुलनेने शंखाच्या अथवा काचेच्या बांगड्या, नाणी, मणी, धातूच्या वस्तू आणि काचेच्या वस्तू वगैरे इतर पुरावशेषांचे प्रमाण कमी आहे. रायगड जिल्ह्यातील आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडाच्या पुरातत्त्वीय विश्लेषणासाठी लागणारे मृदभांडयांचे कालानुक्रमाचे मानक म्हणून, कोल्हापूर येथील ब्रम्हपुरी उत्खनन, चौल या पुरातत्त्वीय स्थळाचा उत्खनन अहवाल आणि सोलापूर जिल्ह्यातील सुप्रसिध्द तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील पुरातत्त्वीय संशोधनाचा अहवाल हे संदर्भ म्हणून वापरले आहे.

अभ्यास क्षेत्रातील पुरातत्त्वीय स्थळांवर आढळलेल्या मृदभांडयाच्या अभ्यासातून आद्य ऐतिहासिक ते मध्ययुगीन कालखंडापर्यंतचे  सर्वसाधारण दिसून आलेले बदल पुढील प्रमाणे आहेत.

आद्य ऐतिहासिक कालखंडात काळी आणि लाल रंगाची खापरे, लाल रंगाची चकचकीत खापरे आणि उत्तरेकडील काळी झिलईदार खापरे आणि रोमन रूलेटेड खापरे हे भाडयांचे प्रकार आद्य ऐतिहासिक कालखंडाचे द्योतक मानता आले. मृदभांडयांचे हे प्रकार उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडापासून मिळणे बंद होते. कदाचित या कालखंडापासून महाराष्ट्राच्या या भागाचा उत्तरेकडील अथवा देशाच्या इतर भागातील संपर्क कमी झाला असल्यामुळे, तसेच या प्रकारच्या खास महत्वाच्या भांडयांचा वापर करणारा समाज अथवा वर्ग अस्तित्वात नसल्यामुळे असे घडले असावे. आद्य ऐतिहासिक कालखंडात सर्वाधिक प्रमाण, जाडपोताची लाल रंगाचा मुलामा दिलेली खापरे यांचेआहे. तर उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडात काळ्या रंगाच्या लेपाच्या भांड्यांचे प्रमाण जास्त आहे. मध्ययुगीन कालखंडात जाड पोताची लाल रंगाचा मुलामा दिलेली मृदभांडी अथवा खापरे अत्यल्प असून काळी अथवा राखाडी रंगाची खापरे सर्वाधिक आहेत. सर्व कालखंडातील मिळणाऱ्या

मृदभांडयामध्ये कंगोरे, कोरून केलेले नक्षीकाम अथवा चिकटवून केलेले नक्षीकाम सर्वत्र आढळते. ठसे मारलेली खापरे आद्य ऐतिहासिक कालखंडात आणि खूप कोरीव काम व कंगोरा असलेली भांडी उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडात दिसून येतात. या प्रकारची खापरे जरी मध्ययुगीन कालखंडात आढळत असली तरी त्यांचे प्रमाण कमी झालेले दिसते. या तिन्ही कालखंडातील मृदभांडयांकडे सर्वसाधारण दृष्टीक्षेप टाकल्यास एक महत्वाचे वैशिष्ट्य लक्षात येते. ते म्हणजे आद्य ऐतिहासिक काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यत मृदभांडयांचा दर्जा अनुक्रमे कमी होत जातो. मृदभांडयांचा दर्जामध्ये झालेली घसरण ही अनेक घटकांमुळे असू शकेल. मध्ययुगीन काळात येईयपर्यंत हळूहळू सर्वसाधारण अर्थव्यवस्था कमकुवत होणे किंवा उत्तम खापरे बनविण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध नसणे, अथवा असे तंत्रज्ञान उपलब्ध असूनही उत्तम दर्जाच्या मृदभांडयांना पुरेशी मागणी नसणे अशा विविध कारणांमुळे प्रस्तुत अभ्यास क्षेत्रात मिळालेल्या मृदभांडयांचा दर्जा कालानुक्रमे खालावला असावा. मध्ययुगीन कालखंडात काचेचा लेप दिलेली विविध रंगात आढळणारी, चिनीमातीच्या भांड्यांची खापरे समुद्र आणि खाडी लगतच्या प्रदेशात आढळून येतात.

पुरातत्वीय स्थळांचा आकार व विस्तारानुसार वर्गीकरण केल्यास विशिष्ट कालखंडातील वसाहत आकृतीबंधाची कल्पना येते. उदाहरणार्थ जर एखादया कालखंडात छोटया वसाहती अधिक असतील आणि मोठया वसाहती कमी असतील तर आकृतीबंध अधिक ग्रामीण स्वरूपाचा आहे असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे  वसाहतींमधील अंतर हे देखील विशिष्ट आकृतीबंधाचे निदर्शक ठरते. मोठया आकाराच्या वसाहतींच्या लाभक्षेत्रात त्यापेक्षा कमी व्याप्तीच्या वसाहती आढळतात. छोटया व मोठया वसाहती आर्थिक व सामाजिक कारणांनी परस्परांवर अवलंबून असल्याचे चित्र दिसते. महाड, वरंध, दिवे आगर, म्हसळा सारखी मोठीव्यापारी वसाहत व या वसाहतीला पूरक कार्य करणारी छोटी गावे अथवा मुख्य वसाहतींकडे जाणाऱ्या व्यापारी मार्गावरील जोडकेंद्रें असल्यामुळे जो आकृतीबंध तयार होतो, तो आद्य ऐतिहासिक कालखंडात दिसून येतो. बहुधा या काळात पूर्वीच्या कालखंडातील व्यापार कमी झाल्याने किंवा अर्थव्यवस्था तितकीच भक्कम न राहिल्यामुळे व्यापारावर आधारित मोठया नागरी वसाहतींचे विघटन अथवा रूपातरण झाले असावे. त्यामुळे छोटया प्रकारच्या वसाहतींचा, विस्कळीत स्वरूपाचा आकृतीबंध दृष्टीस पडतो. तथापि व्यापारी महत्वाची असलेली महाड सारखी मोठी स्थळे तशीच टिकून राहीली असावीत. तसेच प्रशासकीय महत्वामुळे मंदरज व उंबार्डी सारखी मध्यम आकाराची नगरे नव्याने तयार झाली असावीत. उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडात जमिनीची दाने दिल्याचे पुरावे

असणारे अनेक अभिलेख उपलब्ध आहेत. यावरून असे दिसते की या काळात काही नवीन वसाहती निर्माण झाल्या असाव्यात. उत्तर कोकण शिलाहार राजांच्या ताम्रपटातील 'किइच्छित' म्हणजेच म्हसळा तालुक्यातील केलटे हे असे उदाहरण आहे.

उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडातव्यापारी मार्गालगत संरक्षक वसाहतींची वाढ झालेली दिसते. सहाव्या शतकानंतर जरी व्यापार खालावला असला, तरी तो पूर्णपणे थांबला मात्र नसावा. अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे हे घडले असावे. आकाराने लहान व उंचीने कमी असलेल्या या वसाहतींनी सुरुवातीस टेहेळणीचे नाके किंवा ठिकाण एवढेच काम केले असावे. विस्ताराने मोठ्या व तटबंदी असलेल्या जननीचा दुर्ग, रायगड सारख्या संरक्षक वसाहती मात्र एखादे प्रशासकीय केंद्र असाव्यात.

आद्य ऐतिहासिक कालखंडानंतर ग्रामिणीकरण प्रक्रिया सुरु होऊन मोठ्या वसाहतींचे विघटन होणे, व काही छोटया वसाहती पूर्णतः नव्याने तयार होणे असे सर्वसाधारण चित्र उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन कालखंडात दिसून येते. मध्ययुगीन कालखंडात आल्यावर अभ्यास क्षेत्रातील सर्व तालुक्यांत वसाहतींच्या एकुण संख्येत वाढ झालेली दिसते. आता मोठया आणि मध्यम वसाहतींचे प्रमाण घटलेले असून ग्रामिणीकरण व वसाहतींच्या विघटनांची प्रक्रिया तशीच पुढे चालू राहिलेली दिसते. उदा. मंदरज या उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन काळातील प्रशासकीय वसाहतीचे मध्ययुगीन काळात विघटन होऊन तळेगाव, चरई खुर्द, वावे मांद्रज, गायमुख पन्हेळी यांसारख्या छोट्या वसाहतींमध्ये रुपांतर झालेले दिसते.

मध्ययुगात देखील अनेक वसाहती नव्याने झालेल्या (उदा. कोंढवी, पाचाड, पद्मदुर्ग, कोरलई, देहेन, निजामपूर) दिसतात. तथापि त्यांच्या निर्मितीमागे बदलती राजकीय व्यवस्था कारणीभूत असावी. कारण या काळात बऱ्याच ठिकाणी गड अथवा किल्ले अशा संरक्षक रचनांची वाढ झालेली दिसते. प्रदेशावर नियंत्रण ठेवणे, आजूबाजूच्या परिसरातील कर गोळा करून महसूल यंत्रणेला पुरवणे, आजूबाजूच्या परिसरातील वसाहतींना संरक्षण देणे व त्यांच्या गरजा पुरविणे या मुख्य कार्यातून त्यांची निर्मित झाली असावी. याच काळात निर्माण झालेल्या या सामाजिक-आर्थिक आकृतीबंधामुळे वसाहती या संरक्षक वसाहती भोवती केंद्रित झालेल्या दिसतात. या संपूर्ण कालखंडाचा एकत्रित विचार केल्यास असे दिसून येते की, आद्य ऐतिहासिक काळातव्यापार व स्थिर राजवटीमुळे या भागाची भरभराट झाली. त्यानंतरच्या काळात मंदावलेला व्यापार व अस्थिर राजकीय परिस्थिती आणि कदाचित

प्रतिकूल पर्यावरण यांच्या एकत्रित परिणामामुळे जीवनमान खालावलेले असू शकते. याचबरोबर या अस्थिर राजकीय परिस्थितीतून निर्माण झालेल्या साम्राज्य विस्ताराच्या गरजेमुळे अधिकाधिक गावे  वसवली गेली असावीत. विविध राजवटींनी दिलेल्या दानपत्रातून ही गोष्ट अधोरेखित होते. मध्ययुगीन काळात राजकीय अस्थैर्य वाढले व पर्यावरण अधिकाअधिक प्रतिकूल होत गेले असे प्रा. ढवळीकर यांचे मत आहे. तेव्हा या नवीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी एक वैशिष्ट्यपूर्ण वसाहत रचना व समाज व्यवस्था उदयास आली असावी. सततच्या लढायांमुळे गावाचे रक्षण करणे अनिवार्य बनले. इस्लामी राज्यकर्त्यांनी तसेच मराठयांनी राज्यविस्तारासाठी व महसूल गोळा करण्यासाठी वापरलेल्या वतनदारी पध्द्तीमुळे स्थानिक पातळीवर शासनकर्त्यांचा एक नवीन वर्ग उदयास आला हे रॉय यांनी दाखवले आहे. या वर्गावर गावाच्या संरक्षण व नियंत्रण आणि विस्ताराची जबाबदारी आली व त्यांना समाजव्यवस्थेत महत्वाचे स्थान प्राप्त झाले. अभ्यास क्षेत्रातील गड अथवा किल्ले हे यांचे प्रतिबिंब आहे. प्रत्येक गावात असलेले गढीचे स्थान या वर्गाचे महत्त्व दर्शविते. या शासनकर्त्या वर्गाबरोबरच शेतीला पूरक व कृषीप्रधान सामाजाच्या गरजा भागविणारे अनेक व्यवसाय व व्यावसायिक वर्ग तयार झाले. अशा प्रकारे प्रत्येक वसाहतीच्या गरजा या त्या वसाहतीतच किंवा फार फार तर पंचक्रोशीतच पूर्ण होऊ लागल्या व एक स्वयंपूर्ण व स्वालंबी ग्रामीण समाजव्यवस्था उदयास आली.

अभ्यास क्षेत्रात व एकूण रायगड जिल्ह्यातशेतीयोग्य जमीन कमी असली तरी प्राथमिक अर्थव्यवस्था अद्यापही शेतीवर अवलंबून असल्याने जास्त प्रमाणात छोटी व मध्यम आकाराची गावे हा आकृतीबंध दिसून येतो. वसाहतींचे स्थान जलस्रोतांच्या जवळ, म्हणजे नदी, नाले, तळी यांच्या जवळपास, असल्याने जे आजचे चित्र संपूर्ण रायगडात दिसते, त्याचा उगम प्राचीन काळापासून आहे. प्रस्तुत प्रबंधात केलेली पुरातत्त्वीय व इतर ऐतिहासिक साधनांची चर्चा आणि रायगडातील आजच्या सामाजिक व आर्थिक रचनेतील सातत्य लक्षणीय आहे. यावरून असे दिसते की, आधुनिक रायगडाचा समग्र सांस्कृतिक अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनामुळे पुरातत्त्वीय दृष्टीकोनातून एक नवीन दिशा उपलब्ध झाली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून रायगड जिल्हयातील दक्षिण भागाचा अभ्यास केला असला तरी अजून पुरेसा अभ्यास न झालेल्या इतर भागातील म्हणजेच, ठाणे, रत्नागिरीव सिंधुदुर्ग या जिल्हयांमधील पुरातत्त्वीय अवशेषांच्या एकत्रित अभ्यासाने प्राचीन

महाराष्ट्रातील आद्य ऐतिहासिक कालखंडापासूनच्या वसाहत रचनेवर प्रकाश टाकणे शक्य होईल. आजच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीची मुळे शोधायची असतील तर आपल्याला उत्तर ऐतिहासिक अथवा पूर्व मध्ययुगीन व मध्ययुगीन काळातील पुरातत्त्वीय सांस्कृतिक आकृतीबंधाचे विश्लेषण करणे अत्यावश्यक आहे. या विस्तृत प्रमाणावरील उद्देशाची प्रस्तुत संशोधन हे एक प्राथमिक पायरी असून, अशा प्रकारे संशोधन केल्याने पुरातत्त्वीय व ऐतिहासिक ज्ञानात भर पडेल हे या संशोधनाचे फलित आहे असे म्हणता येईल.

# छायाचित्रे



छायाचित्र क्रमांक १




छायाचित्र क्रमांक २





छायाचित्र क्रमांक ३

छायाचित्र क्रमांक ४





छायाचित्र क्रमांक ५

छायाचित्र क्रमांक ६






छायाचित्र क्रमांक ७

छायाचित्र क्रमांक ८





छायाचित्र  क्रमांक ९

छायाचित्र क्रमांक १०





छायाचित्रक्रमांक ११

छायाचित्र क्रमांक १२







छायाचित्र क्रमांक १३

छायाचित्र क्रमांक १४



छायाचित्र क्रमांक १५



छायाचित्र क्रमांक १६




छायाचित्र क्रमांक १७



छायाचित्र क्रमांक १८



छायाचित्र क्रमांक १९



छायाचित्र क्रमांक २०





छायाचित्र क्रमांक २१

छायाचित्र क्रमांक २२






छायाचित्र क्रमांक २३

छायाचि त्रक्रमांक २४





छायाचित्र क्रमांक २५

छायाचित्र क्रमांक २६




छायाचित्र क्रमांक २७



छायाचित्र क्रमांक २८



छायाचित्र क्रमांक २९



छायाचित्र क्रमांक ३०



छायाचित्र क्रमांक ३१



छायाचित्र क्रमांक ३२



छायाचित्र क्रमांक ३३



छायाचित्र क्रमांक ३४



छायाचित्र क्रमांक ३५



छायाचित्र क्रमांक ३६



छायाचित्र क्रमांक ३७





छायाचित्र क्रमांक ३८

छायाचित्र क्रमांक ३९





छायाचित्र क्रमांक ४०

छायाचित्र क्रमांक ४१





छायाचित्रक्रमांक ४२

छायाचित्र क्रमांक ४३





छायाचित्र क्रमांक ४४

छायाचित्र क्रमांक ४५





छायाचित्र क्रमांक ४६

छायाचित्र क्रमांक ४७





छायाचित्र क्रमांक ४८

छायाचित्र क्रमांक ४९





छायाचित्र क्रमांक ५०

छायाचित्र क्रमांक ५१





छायाचित्र क्रमांक ५२

छायाचित्र क्रमांक ५३



छायाचित्र क्रमांक ५४



छायाचित्र क्रमांक ५५



छायाचित्र क्रमांक ५६



छायाचित्र क्रमांक ५७



छायाचित्र क्रमांक ५८



छायाचित्र क्रमांक ५९




छायाचित्र क्रमांक ६०




छायाचित्र क्रमांक ६१



छायाचित्र क्रमांक ६२



छायाचित्र क्रमांक ६३



छायाचित्र क्रमांक ६४

# संदर्भ


(अ) मराठी संदर्भसूची

दीक्षित, मो.ग. १९४७. *महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख,* पुणे.

देशपांडे, म.न. १९८१ *ठाणाला बौद्धलेणी-पन्हाळे काजी वज्रयान केंद्र-शैव गाणपत्य व नाथसंप्रदायावर नवा प्रकाश.* वि.गु.पिंगळे स्मारक व्याख्यानमाला, पुष्प ३, विदर्भ संशोधन मंडळ,नागपूर.

देव, शां.भा. १९६१. *महाराष्ट्रातील उत्खनने,* दिल्लीः पब्लिकेशन्स डिव्हिजन, माहिती व नभोवाणी मंत्रालय भारत सरकार.

देव, शां.भा. १९८४. महाराष्ट्र व गोवे येथील शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक सुची. मुंबईः महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ.

धनावडे, अं.शं. २०१५. कातळगाव ता.लांजा, जिल्हा रत्नागिरी येथील शैव आणि वैष्णव लेणी, *संशोधक* ४,वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

ढवळीकर, म.के. २००४. पर्यावरण आणि संस्कृती. पुणेः श्रीविद्या प्रकाशन.

जोशी, स.वि. २०११. *रायगड जिल्ह्याचे दुर्गवैभव*, बुकमार्क पब्लिकेशन.

कानिटकर, कु.का. २०१४, अंबरनाथ शिवालय, दिलीप कानिटकर,मुंबई.

कर्वे, इरावती १९९६. *महाराष्ट्र भूमी व लोक.* मुंबईः दार्शनिका विभाग सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन.

*महाड नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथ,* १९६६ .महाड.

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, १९९३ रायगड जिल्हा,दर्शनिका विभाग,मुंबई, महाराष्ट्र शासन.

(ब) इंग्रजी संदर्भसूची

Burgess, J. and Pandit Indraji 1881. Inscriptions from the Caves Temple of Western India, with descriptive notes Vol. IV.

Dehejiya, Vidya 1972. Early Buddhist Rock Temples – A Chronological Study, London

Dhanawade, Anjay, P.P. Joglekar and Abhay Kale 2011-2012 [2013]. Discovery of Rock-Cut Caves at Panderi, District Ratnagiri, Maharashtra, *Journal of Indian Ocean Archaeology* 7-8: 179-184.

Cousens, Henry,1891. An Account of the Caves of Nadsur and Karsumbla, Archaeological Survey of Western India, Vol.XII, Bombay.

Dhavalikar. M.K. 1984. *Late Hinayana Caves of Western India*, Deccan College postgraduate and Research Institute, Pune.

Joglekar P.P., Arati Deshpande-Mukherjee and Sharmila Joshi 1996-97. Report on the Faunal Remains from Kelshi, District Ratnagiri, Maharashtra, *Puratattva* 27: 91-95.

Deo, S.G, Savita Ghate, Arati Deshpande-Mukherjee and P.P.Joglekar 2001. Geomorphological Observations at and Around Kelshi, Konkan Coast, Maharashtra, *Man and Environment* 26(1): 69-74.

Joglekar, P.P, Sushama Deo, Arati Deshpande-Mukherjee and Savita Ghate 2001-2002. Archaeological Investigation at Kelshi, District Ratnagiri, Maharashtra, *Puratattva* 32: 63-73, 244.

Deo, Sushama, P.P. Joglekar, Arati Deshpande-Mukherjee and Savita Ghate 2004-2005. Investigations at Kelshi, Konkan Coast, from 2000 to 2005: A Report, *Bulletin of the Deccan College Research Institute* 64-65: 157-179.

Joglekar, P.P. 2007. Kelshi yetheel bhupuratattvashastriya Sanshodha, *Samshodhak* 75 (3): 15-30. [in Marathi]

Luders, H. 1910. A List of Bramhi Inscriptions from the earliest times to about A.D. 400 with the exception of those of Asoka" Epigraphia India, Vol. X, Appendix.

Mitragotri, V. R. 1999. Socio Cultural of Goa from the Bhojas to the Vijayanagar. Goa: Institute Menezes Braganza.

Mujumdar, R.C. 1960. Classical Account of India, Calcutta.

Nagaraju, S. 1981. Buddhist Architecture of Westren India, Vol.X, Appendix.

Sankalia, H.D. and M.G. Dikshit 1952. Excavations at Bramhapuri ( Kolhapur) 1945-46.

Schoff. W.H. 1912. The Periplus of the Erythraean Sea. New York: Lonbgmans, Green and Co.